ॐ

।। श्रीचित्रापुरगुरुपरंपराचरित्र ।।

प्रथम-खण्ड

अध्याय १ ते ४५

॥ सभा-प्रारम्भ-प्रार्थना ॥

दक्षिणास्यसमारम्भा शङ्कराचार्यमध्यमा । अस्मदाचार्यपर्यन्ता स्मर्या गुरुपरम्परा ॥१॥

श्रुतिस्मृतिपुराणानामालयं करुणालयम् । नमामि भगवत्पादं शङ्करँल्लोकशङ्करम् ॥२॥

शङ्करं शङ्कराचार्यं केशवं बादरायणम् । सूत्रभाष्यकृतौ वन्दे भगवन्तौ पुनः पुनः ॥३॥

ईश्वरो गुरुरात्मेति मूर्तिभेदविभागिने । व्योमवद्व्याप्तदेहाय दक्षिणामूर्तये नमः ॥४॥

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशङ्कर परिज्ञानाश्रम शङ्करसद्गुरु ।
केशव वामन कृष्ण पाण्डुरङ्ग आनन्द परिज्ञानगुरु । सद्योजात शङ्करसद्गुरु ॥५॥

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः । गुरुस्साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥६॥

ॐ सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सहवीर्यं करवावहै ॥
तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै ॥
॥ ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥७॥

श्रीचित्रापुरगुरुपरंपराचरित्र

श्रीभवानीशंकर

श्रीवल्ली भुवनेश्वरीदेवी

प्रथम गुरु प्राप्तिस्थान - कोटितीर्थ, गोकर्ण

ॐ

श्रीचित्रापुरगुरुपरंपराचरित्र

प्रथम-खण्ड

अध्याय १ ते ४५

लेखिका

श्रीमती उमाबाई आरूर (अध्याय १-५७)

श्रीमती शांताबाई नागरकट्टी (अध्याय ५८-५९)

सौ.उषा रवीन्द्र बिजूर (अध्याय ६०-७१)

श्रीचित्रापुरगुरुपरंपराचरित्र

पहिली आवृत्तिः शके १८७६/सन १९५५
दुसरी आवृत्तिः शके १८८६/सन १९६५
तिसरी परिवर्धित आवृत्तिः शके १९१६/सन १९९५
चौथी परिवर्धित आवृत्तिः शके १९३४/सन २०१२

प्रकाशक
श्री चित्रापुर मठ
शिराली, उत्तर कन्नडा,
कर्नाटक, भारत ५८१३५४
दूरध्वनि क्रमांकः ०८३८५–२५८३६८
www.chitrapurmath.net

मुद्रक
सुरेखा प्रेस
ए/२०, शालिमार इंडस्ट्रियल इस्टेट,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९
दूरध्वनि क्रमांकः ०२२-२४०४३८७७,२४०९३८७७

ही चौथी आवृत्ती सौ.मीरा शांताराम माविनकुर्वे यांच्या सौजन्याने

ग्रंथानुक्रम

		पृष्ठसंख्या
१.	प्रकाशकाचे निवेदन (चौथी आवृत्ति)	II
२.	प्रकाशकाचे निवेदन (तिसरी आवृत्ति)	IV
३.	प्रकाशकाचे निवेदन (दुसरी आवृत्ति)	V
४.	प्रकाशकाचे बोबडे बोल (पहिली आवृत्ति-संक्षिप्त)	VI
५	कृताञ्जलिः	VIII
६.	संशोधकाचे नम्र निवेदन	IX
७.	सारस्वतांचे मूळ– श्री.वि.ग.जोशी	XII
८.	ग्रंथलेखिकेची प्रस्तावना	XV
९.	अध्यायानुसार विषयानुक्रम	XVIII
१०.	श्रीगुरुपरंपरास्तोत्र	XXIV
११.	प्रथम खण्ड : ग्रंथ अध्याय -१ ते ४५	१ ते ३९१
१२.	आरती श्रीमत् पांडुरंगाश्रम स्वामींची	३९२
१३.	आरती श्रीसद्गुरुंची	३९२
१४.	श्रीमती उमाबाई आरुर यांना आदरांजली	३९३
	द्वितीय खण्डः ग्रंथ अध्याय - ४६ ते ७१	३९५
१५.	आरती श्रीसद्गुरुंची	७०९
१६.	शरणाष्टक	७१०
१७.	श्रीमदानंदाश्रमसद्गुरुस्तवनम्	७११
१८.	श्रीमती उमाबाई आरुर यांना आदरांजली	७१३

प्रकाशकाचे निवेदनः(चौथी आवृत्ति)-

||Shrī Gurubhyo Namaḥ || Shrī Bhavānīshaṅkarāya Namaḥ || Shrī Mātre Namaḥ ||

We Chitrāpur Sāraswata-s are very fortunate. We are born into a community with a rich heritage and an illustrious Guruparamparā continuously guiding and protecting us. Smt Ārūr Umābāī-ākkā, with divine inspiration and Blessings from HH Shrīmat Ānandāshram Swāmījī of revered memory, undertook the stupendous task of documenting the Paramparā in 57 chapters. This included not only the Charitra of the lineage of Guru-s till 1954, but also nuggets of wisdom they preached. It was a miraculous confluence of the right people at the right time - Sarvashrī Pāṇḍuraṅg Marbalī, Rāmchandra Kāmat, V G Joshī, H. Shaṅkar Rāo, and G R Bhaṭkal of Popular Book Depot which helped bring out the first Publication of the Guruparamparā Charitra in 1955. The Prastāvana, reproduced from the earlier edition in this book, gives a clear picture of the events then.

Subsequently, Umābāī-ākkā's sister Smt Shāntābāī Nāgarkaṭṭī added two more chapters on the Shishyaswīkāra of HH Shrīmat Parijñānāshram Swāmījī III in the 2nd edition (1965). Smt Ushā Bijoor documented the period of HH Shrīmat Parijñānāshram.

Swāmījī III in four more chapters. Thus in the 3rd edition (1995), there were 63 chapters

When the need arose for a reprint a few years ago, many devotees prayed to HH Shrīmat Sadyojāt Shaṅkarāshram Swāmījī for permission to include more recent events like His Pīthārohaṇa, the changes brought about in the Math and community, the socio charitable activities of the Math and the Historic Guru Jyoti Yātrā. After persistent prayers and much persuasion, Pūjya Swāmījī graciously gave His consent. Smt Ushā Bijoor was the obvious choice for this work, and she lost no time in taking Swāmījī's Blessings and proceeded with the writing of the 64th chapter. The divine inspiration which guided Umākkā and Shāntābāī continued, and within a short time Ushā had drafted 8 new chapters. I must mention here that during this period, she went through a life threatening illness, which she combated bravely, armed with staunch dedication, faith and an unshakeable conviction that God and Guru will take care of her. She continued her work even when she was convalescing in the hospital, and finally completed it soon after returning home.

This new edition has been re-keyed entirely in the Shree Lipi Devanāgarī font and is divided into two parts for convenience. The second part starts with chapter 46, the era of Shrīmat Ānandāshram Swāmījī. Since the treatise is written in Marāthī, nuktā-s have been introduced to facilitate easy and correct pronunciations e.g. Cha (as in Chair) and Cha (as in chāmbhār - cobbler in Marathi). For logistical reasons some of the contents and arrangement other than the Charitra chapters had to be altered and the Anukramaṇika has been modified accordingly. A poem in ovī form, written as an ādarāñjalī to Umābāī-ākkā Ārūr by Shrī Madhukar Chandāvarkar, has been included.

Till now, devotee groups (or individuals) have been conducting the Guruparamparā Charitra Pārāyaṇa as a 7-day saptāhā.

However, now with additional chapters and pages, it may require a few more days. The groups are requested to chart their own schedules as per their convenience.

The Publication Committee is indebted to Pūjya Swāmījī for His Blessings, Guidance, and Suggestions.

We are also grateful to Late Shrī Sadānand Bhaṭkal who readily gave us permission to reproduce this treatise as a Shrī Chitrāpur Math Publication.

A large team of volunteers helped in the re-keying of the book in Shree Lipi, and then rigorously and repeatedly proof read it. We thank Shrī Devkar and staff of M/s Modular Infotech, Puṇe and Shrī Nārāyaṇan Menon of Surekhā Press, Mumbāī for patiently cooperating with us in finalising the grantha. We appreciate Shrī Ravindra Sorāb's help in procuring various photos. Smt. Mira Mavinkurve has sponsored this publication, and we are grateful to her.

On the august and appropriate occasion of Gurupūrṇimā 2012, the Publications Committee of the Shrī Chitrāpur Math is happy to present this offering at the lotus feet of Lord Bhavānīshaṅkar and pray that the Guruparamparā and Swāmījī inspire more and more of our people to read the Guruparamparā Charitra.

For the Publications Committee, Shrī Chitrāpur Math

Dr. Prakāsh Māviṅkurve,

Gurupūrṇimā- July 3rd, 2012

चिंतेचे	'चि'	- is pronounced with 'Ch' as in Chitrapur / Charitra
	'चे'	- is pronounced with 'Ch' as in Chalto / Chamhar
ज़ाहला	'ज़'	- is pronounced with 'J' as in Jamkhan / Jari
जन्म	'ज'	- is pronounced with 'J' as in Jungle / Janma / Jay
झाला	'झ'	- is pronounced with 'Z' as in Zodiac/Xaviers/New Zealand/Zop
झेप	'झ'	- is pronounced with 'Jh' as in Jhoot/Jhendu/Jhenda

२.प्रकाशकाचे निवेदन (तिसरी आवृत्ति)

श्रीचित्रापुरगुरुपरंपराचरित्र' या ग्रंथाची पहिलीआवृत्ति १९५५ साली प्रसिद्ध झाली. १९६५ साली प्रकाशित झालेली दुसरी आवृत्तिही बरीच वर्षे उपलब्ध नव्हती.

हा ग्रंथ अद्ययावत् करण्याच्या उद्देशाने आम्ही सहा नवीन अध्याय या आवृत्तीत देत आहोत. त्यापैकी दोन अध्याय (५८ व ५९)हे श्रीमती उमाबाई आरूर यांच्या भगिनी श्रीमती शांताबाई आनंद नागरकट्टी यांनी लिहिलेले असून ते पुस्तिकारूपाने १९६२ साली प्रकाशित झाले होते.

या प्रकाशनाच्या संकल्पावर काम सुरू असताना सौ. उषा रवींद्र बिजूर यांनी लिहिलेले 'श्रीपरिज्ञानानंदाश्रम चरित्र' या बद्दल माहिती मिळाली.आम्ही त्यांची भेट घेऊन, १९५५ नंतरची गुरुपरंपरा आणि श्रीचित्रापुर मठाचा इतिहास ओवीबद्ध व्हावा अशी इच्छा प्रदर्शित केली. ह्या अभ्यासू व प्रतिभावान लेखिका आहेत. त्यांनी लगेच आमच्या विनंतीस मान देऊन चार अध्यायात (६०-६३)समर्थपणे तो सादर केला.पहिल्या आवृत्तीत गुरुचरित्र पारायणासाठी सात दिवसांच्या पारायणासाठी मार्गदर्शक सूचना दिल्या होत्या.परंतु परिवर्धित आवृत्तीत सहा अध्यायांची भर पडल्याने त्यानुसार भक्तमंडळींनी आपल्या सोयीनुसार विभाजन करावे.

दुसऱ्या आवृत्तीत वगळण्यात आलेली काही प्रास्ताविक पृष्ठेही या ग्रंथात पुनर्मुद्रित करीत आहोत. भाविकांच्या सोयीसाठी आरत्या, भजने इ. ग्रंथाच्या शेवटच्या भागात समाविष्ट केली आहेत.

पहिल्या दोन आवृत्तींचे मुद्रण 'निर्णयसागर प्रेस' मध्ये झाले होते.त्यामुळे पुनर्मुद्रणाचा बराचसा भाग सुकर झाला. तसेच नवीन मजकुराची जुळणी त्या बरहुकूम करणेही सोपे गेले.

या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाच्या वेळी मूळ प्रकाशक कै. पांडुरंग मरबळळी यांनी पुढील आवृत्तीचे प्रकाशन हक्क कै. गणपत रामराव भटकळ यांच्याकडे विनाअट सोपविले होते. या आवृत्तीच्या प्रकाशनाच्या वेळी त्या दोघा सद्गृहस्थांची आठवण येणे साहजिकच आहे. त्याना कृतज्ञतापूर्वक आदरांजली.

ग्रंथाच्या निर्मितीस अनेक सुहृदांनी तत्परतेने बहुमोल सहाय्य केले. विशेषें करून कृष्णा करवार, सदानंद नाडकर्णी, शेखर व गौराङ्ग उभयकर, डॉ. गोपाळ हट्टंगडी, देविदास नाडकर्णी, रामकृष्णभट उल्लाळ, सुरेश चंदावरकर, पॉप्युलर प्रकाशनाचे रघुनाथ गोकर्ण, मृदुला जोशी, गणेश पेडणेकर व श्री ट्रस्ट, कार्ला. या सर्वांना हार्दिक धन्यवाद.

हा ग्रंथ चोखंदळ अभ्यासक व श्रद्धापूर्वक पठण करणारे भक्तजन यांच्यापर्यंत पोहाचविण्याच्या इच्छेने श्री चित्रापुर मठ-स्थायी समिती, श्री नालकूर श्रीपादराव व एक हितचिंतक (ज्यांच्या इच्छेस मान देऊन नावाचा उल्लेख न करणे रास्त होईल) यांनी आर्थिक भार उचलला; त्याबद्दल त्यांना हार्दिक धन्यवाद.

मुंबई सदानंद भटकळ १५ मे १९९५ प्रकाशक

॥ॐ तत् सत् श्रीगुरवे नमः॥

प्रकाशकीय निवेदन (द्वितीय आवृत्ति)

श्रीचित्रापुरगुरुपरंपरा या ग्रंथाची पहिली आवृत्ति श्रीसद्गुरु आनंदाश्रम स्वामींच्या शुभ आशीर्वादाने १९५५ साली प्रसिद्ध झाली व सारस्वत–समाजाच्या सद्गुरुभक्तमंडळीत हा ग्रंथ एवढा लोकप्रिय बनला की त्या आवृत्तीच्या सर्वहि प्रति केवळ एकाच पंधर वड्यात संपल्या! परिणामतः आजवर दहा वर्षांच्या मुदतीत भक्तगणांकडून ग्रंथाबद्दल सतत मागण्याहि येत राहिल्यामुळें आज ही द्वितीय आवृत्ति प्रकाशित होण्याचा सुयोग आला. यांत ग्रंथलेखिका, भक्तगण, आर्थिक व इतर सहाय करणारे यांचा सिंहाचा वाटा आहे हे निराळे सांगण्याची आवश्यकता नाहीं.

पहिल्या आवृत्तींत वस्तुस्थितीशीं विसंगत अशा काही गोष्टी अनवधानतेमुळें राहून गेल्या होत्या; त्या श्रीसंनिधींच्या मार्गदर्शनास अनुसरून यावेळी सुधारल्या आहेत, व त्यामुळेच आज हा ग्रंथ सर्वांगसुंदर होऊन आपल्या हातीं येत आहे हे एक निर्मेळ सत्य आहे.

या आवृत्तीच्या मुद्रणाच्या बाबतीत श्री. गणेश आर. भटकळ-प्रोप्रायटर, पॉप्युलर बुक डेपो, मुंबई यांनी कोणत्याहि तऱ्हेची ऐहिक अपेक्षा न बाळगितां संपूर्ण आर्थिक सहाय करून महत्त्वाची जबाबदारी सर्वस्वी पार पाडली आहे, हे येथे अभिमानाने नमूद करावेसें वाटतें. या त्यांच्या भक्तिप्रवण सहृदयतेची जाणीव सारस्वत समाजात सदैव ताजीच राहील, याबद्दल दुमत नाहीं.

सदरहू आवृत्तीतील जीं नवीन व सुंदर छायाचित्रें घातलीं आहेत व ज्यामुळें ग्रंथाच्या आकर्षणांत भर पडली आहे, तीं आमचे स्नेही श्री. भवानीशंकर कालतोड यांजकडून विनामूल्य देणगीदाखल मिळाली आहेत.या त्यांच्या सौजन्याबद्दल त्यांचेहि आभार न मानता कसें बरें चालेल!

तसेच या आवृत्तीच्या मुद्रणाच्या वेळीं या ग्रंथाची किंमत कमी व्हावी व हा ग्रंथ प्रायः सर्वसाधारण भक्तांनाहि सुलभपणें संग्रहीं ठेवतां यावा, या उद्देशाने पहिल्या आवृत्तीतील संशोधकाचे नम्र निवेदन, प्रकाशकाचे बोबडे बोल, विषयानुक्रमणिका वगैरे खास आवश्यकता नसलेले असे कांहीं विषय कमी करणें भाग पडले आहे, हे शिष्टाचारास अनुसरून येथे नमूद करणे भाग आहे.

शेवटीं, या ग्रंथाच्या दोन्ही आवृत्त्या ज्या सुप्रसिद्ध निर्णयसागर प्रेसने आपल्या कुशल व एकनिष्ठ कामगार-वर्गाच्या सहकार्याने सुबकपणे व त्या प्रेसच्या दर्जाला साजेल अशा रीतीने अल्पावधीत छापून दिल्या त्याबद्दल त्या सर्वांचा येथें नामनिर्देश करणेंहि क्रमप्राप्त आहे.

चित्रापुर परंपरेच्या प्रायः सर्व अनुयायांना हा अमोलिक ग्रंथ सहज खरिदता यावा, श्रीभवानीशंकर व चित्रापुरमठ यांची पारमार्थिक उपासना घडून त्यांचे ऐहिक व पारमार्थिक कल्याण व्हावे या उदात्त हेतूने भयंकर महागाईलाहि न जुमानता या ग्रंथाची किंमत बेताचीच ठेवली आहे. तरी श्रींच्या प्रत्येक भक्ताने या संधीचा अवश्य फायदा घ्यावा व आपले कल्याण करून घ्यावे अशी नम्र विनंति आहे.

मुंबई

मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा, शके १८८७(सन १९६५)

श्रींचा दासानुदास,

पांडुरंग शिवराम मर्बळी

प्रकाशकाचे बोबडे बोल (पहिली आवृत्ति)(संक्षिप्त)

॥ॐ तत् सत् श्रीगुरवे नमः॥

श्री. रा. रा. विठ्ठल गणेश जोशी : राहणार रत्नागिरी. (श्रीवासुदेवानंद सरस्वती यांचे कृपानुग्रहित). सारस्वतांचे मूळ हे काव्य, शरणाष्टक, वंदनाष्टक आणि दोन आरत्या ह्या सर्वांची रचना ह्या सद्गृहस्थांनी केली आहे.

नामयोगी श्री. रा.रा. रामचंद्र (अण्णा) कामतः श्रीगुरुचरित्र, एकनाथी भागवत, श्रीरमावल्लभदासांच्या समग्र ग्रंथांचे संशोधक . नामजपाचे महत्त्व, नामचिंतामणी इत्यादि ग्रंथांचे लेखक .आपल्या उतार वयातहि (वर्षे ८३) यांनी साडेतीन महिने प्रत्येक दिवशी पाच -साडेपाच तास संशोधनाचे काम केले.

श्रीमती उमाबाई आरूर (ग्रंथलेखिका): सद्गुरुकृपेचा व भक्तिभावाचा हा अमोलिक ग्रंथ ह्या अल्पशिक्षित बाईकडून लिहिला गेला. ही त्या बाईंच्या माता-पितरांवर व तिजवरही झालेली श्रीपांडुरंगाश्रमांचीच कृपा आणि त्यांच्याच प्रेरणेनें श्रीमत् आनंदाश्रमांनींच हा ग्रंथ तिच्याकडून लिहविला, असेंच मला साधारणपणें वाटतें. माझी परमपूज्य कुलदेवी ''शांतादुर्गा महालक्ष्मी'' मातापिता स्वरूपांत मी ह्या लेखिकेस पाहतों. म्हणूनच मला हा त्यांचा अमोलिक ग्रंथ प्रकाशन करण्याची संधी श्रीसद्गुरूंनी दिली, म्हणून त्यांचे उपकार मानावे तेवढे थोडेच. कारण हा ग्रंथ गुरुभक्तिप्रेमाचा व गुरुतत्त्वाचाही कळसच आहे.

रा.रा. हट्टंगडी शंकरराव : जगांत पुष्कळ विद्वान व श्रीमंत आहेत, परंतु माझ्या हयातींत ह्यांच्यासारखे गुरुभक्त आणि मठाकरितां आपुलें तनुमनधन अर्पण करून सेवा करणारे पहाण्यांत आले नाहींत. जगांत पुष्कळ लेखक आहेत, परंतु प्रकाशनाच्या अडचणींमुळें ते प्रसिद्धीस येत नाहींत. हें पुस्तक बघतांच त्यांनी मला असें सांगितलें की, ''तूं पैशांविषयीं काहीं काळजी करूं नकोस. हें पुस्तक यथायोग्य रीतीनें छापून निघून,सकल सारस्वतांचे मन मठाकडे व गुरुभक्तिकडे वळून त्याच्या पठनानें इहपर कल्याण होईल अशी माझी पूर्ण भावना आहे.''

काशीचे पंडित वेदांतकेसरी फडके शास्त्री : हा ग्रंथ पाहून त्यांनी असें म्हटलें कीं, ''ही विद्वत्ता त्या बाईची नसून श्रीस्वामींनींच तिच्याकडून फार सोप्या भाषेंत काव्य वदविलें. मीं लहान वयापासून काशीक्षेत्रांत आपलें आयुष्य घालविलें आणि पुष्कळ यात्राही केल्या आहेत. परंतु श्रीआनंदाश्रमांसारखे विद्वान, ब्रह्मनिष्ठ, पूर्णज्ञानी व योगी तसेंच व्यावहारिक गोष्टींत सुद्धा ह्यांच्यासारखी निपुण विभूति अजूनपर्यंत माझ्या पहाण्यांत आली नाही.''

आतां शेवटीं ज्या चित्रापुर मठपरंपरेचा हा गुरुग्रंथ आहे, त्याबद्दल लिहितों; - त्या पीठावर आज असलेली विभूती श्री. प.प. आनंदाश्रमस्वामी यांना हा ग्रंथ छापण्याबद्दल अनुज्ञा विचारतां त्यांच्याकडून जे आशीर्वाद आले त्यामुळेंच हा ग्रंथ मज पामराकडून प्रकाशित करवून घेतला गेला. श्रींची कृपा व आशीर्वाद प्रत्येक कार्यात आम्हांला उत्साह देत आहेत व कामें झपाट्यांने होत आहेत, अडचणी निवारण होत आहेत.श्रींच्याच आशीर्वादानें छपाईचें काम लवकर होऊन आज अल्प अवधींत (४ महिन्यांत) हा ग्रंथ छापून जनताजनार्दनाचे हातीं वेळेवर देतां येत आहे. या सर्व आशीर्वादांबद्दल श्रीचरणीं अनेकवार नतमस्तक होणें यापेक्षां मला जास्त काय करतां येणार? असाच श्रींचा कृपाशीर्वाद सतत आम्हां सकल ज्ञातीला लाभो व मार्गदर्शनाकरितां श्रींचा सहवास दीर्घकाल घडो हीच श्रीभवानीशंकरचरणीं प्रार्थना आहे.

ग्रंथ छापून देणारे छापखान्याचे मालक श्रीमती लक्ष्मीबाई नारायण चौधरी, छापखान्याचे मॅनेजर श्री. सदाशिव हरी मोडक आणि अक्षरसंयोजन करणारे या सर्वांनी आस्थापूर्वक लक्ष देऊन छपाई सुबक व शुद्ध केली याबद्दल त्यांचे आभार मानणें हें माझें काम आहे. निर्णयासागर प्रेसचे श्री.शास्त्री यांनी प्रुफें तपासण्याचे कामीं व शुद्धाशुद्ध यांकडे परिश्रम घेऊन लक्ष दिलें, त्याबद्दल त्यांची फार मदत झाली. त्यांचे आभार मानणें प्राप्त आहे. मला माझे स्नेही श्री. शांताराम नागरकट्टी यांची छापखान्याच्या अधिकाऱ्यांशी ओळख होण्यास व मधून मधून रात्र बेरात्र बसून प्रेसकॉपी तयार करण्याचे कामांत पुष्कळ मदत झाली याबद्दल त्यांचेही आभार मानणें माझें काम आहे. चित्रकार श्री. बी. जी. कालथोड व इतर हरकामीं मदत करणारे स्नेही-सोबती यांनी मला वेळोवेळीं जी मदत केली त्याबद्दल मी त्या सर्वांचा आभारी आहे. माझे स्नेही श्री शांताराम बापू आंबिये यांच्या मदतीबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

आमच्यांत श्रीनृसिंहसरस्वती-गुरुचरित्र वाचणारे फारच थोडे आहेत. कारण त्याला सोवळें वगैरे फारच प्रतिबंध आहेत आणि बायकांना तर वाचण्यास मनाई आहे. सदरहू ग्रंथ स्त्री-पुरुषांनीं वाचण्यास हरकत नाहीं म्हणूनच तो एका बाईकडून वदविला गेला. आपण सर्व श्रीनृसिंहसरस्वती-गुरुचरित्रासारख्या अमोलिक ग्रंथाचीं जशीं पूर्ण श्रद्धेनें व भावयुक्त अंतःकरणानें पारायणें करतों व करवितो; तशीच सर्व बंधु बंधुभगिनींनी या ग्रंथाची वाचनें व पारायणे केल्यास सकल कामना पूर्ण होऊन इहपर कल्याण होईल ह्याबद्दल सद्गुरु श्रीआनंदाश्रमस्वामींच्या हस्तलिखित आशीर्वादपत्राचें छायाचित्र (फोटो) वाचल्यास कळून येईल.

शेवटीं ज्या श्रीसद्गुरुमाऊलीनें हा ग्रंथ माझ्याकडून प्रकाशित करवून घेतला, त्या माझे सद्गुरुंचे चरण ध्यानीं घेऊन त्यांचे चरणीं मी माझें 'मस्तक नम्रपणे' ठेवीत आहे. ह्या गुरुग्रंथाचें वाचन, मनन, पठन नित्य करून अनुग्रह कृपाशीर्वाद मिळवावा अशी सर्वांचे चरणी नम्र प्रार्थना आहे.

चित्रापूर पब्लिकेशन फंडमधून रुपये १००० कॅनरा सारस्वत ॲसोसिएशनतर्फे मिळाले त्यांच्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. रॉय कंपनीचे मालक कुलकर्णी बंधू यांनी सगळ्या ६ फोटोंचा खर्च व ब्लॉक्स् आर्ट पेपर वगैरेकरितां जी मदत केली त्याबद्दल त्यांचा आभारी आहे. शेवटीं सकल ज्ञातिजनांस आणि स्वहित करणाऱ्या लोकांना माझी कळकळीची एकच विनंती म्हणजे हा प्रासादिक ग्रंथ आपण अवलोकन करून यांतील सार सेवन करा आणि नरदेहाचें सार्थक करून घ्या. श्रीस्वामीचरणीं शरण जाऊन स्वहितसाधन त्वरित साधा हीच प्रेमाची विनवणी आहे.

आमची ही गुरुपरंपरा अत्यंत प्रभावशाली असल्यामुळें व आमचा समाज त्यांच्या आज्ञेनुसार वर्तन करीत असल्यांमुळे या लहान समाजाचें सर्वतोपरी कल्याण होत आलेलें आहे. पुढेंही हे सारस्वत असेच त्यांच्या उपदेशाप्रमाणें सद्वर्तन चालू ठेवितील तर असेच अत्यंत प्रभावशाली गुरु, अवतारिक पुरुष ह्या सारस्वत समाजांत सहजासहजीं उद्भवतीलच ह्याबद्दल मला संपूर्ण खात्री आहे.ज्या सारस्वत परंपरेचें हें चरित्र आहे, त्या परंपरेच्या सकल आश्रमांना मनोभावें नम्रपणे मी नमस्कार करतों आणि सकल ज्ञातीच्या त्याचप्रमाणें सकल विश्वजनांच्या कल्याणासाठी त्यांनी आपल्या कृपाशीर्वादांचा वर्षाव आम्हां पामरांवर निरंतर करीत राहावें ही त्यांचे चरणीं नित्य प्रार्थना करितों.

शेवटीं ज्या जगन्नियंत्या प्रभूनें ही सेवा मजकडून करवून घेतली व जो विश्वभावन परमात्मा सकल विश्वांत आंत बाहेर भरून प्रत्येक प्राण्याच्या हृदयांत आत्मरूपानें नांदत आहे, त्या ''हृदयस्थ'' परमात्म्याचे चरणीं मी शतवार प्रणती करीत आहे.श्रीसंतयोगेश्वर परमश्रेष्ठ ज्ञानेश्वरमाऊलीनें सर्व विश्वासाठीं जो आशीर्वाद मागितला, त्याच शब्दांत हे प्रकाशकाचे शब्द संपवितो.

जे कोणी भक्त : -

''अनन्यश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्।।''

(श्रीभगवद् गीता)

त्यांची काळजी मी करितो असे त्या परमात्म्याचें आश्वासन सकल विश्वाला आहे.

दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्ये पाहो।
जो जें वांछिल तो तें लाहो। प्राणिजात।।
वर्षत सकळ मंगळी। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी।
अनवरत भूमंडळीं। भेटो तयां भूतां।।
चला कल्पतरुंचे आर व। चेतना चिंतामणीचें गांव।
बोलते जे अर्णव। पीयुषाचे।।
चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन।
ते सर्वही सदा सज्जन। सोयरे होतु।।
किंबहुना सर्व सुखीं। पूर्ण होऊन तिहीं लोकीं।
भजिजो आदिपुरुखीं। अखंडित।।
।।श्रीसद्गुरुचरणारविंदार्पणमस्तु।।

पांडुरंग शिवराम मर्बळी
४/६/२३ तालमकी वाडी,
ताडदेव रोड, मुंबई ७.

श्रीसद्गुरुचरणरज
पांडुरंग

। कृताञ्जलिः ।

जय जय गुरुदेव समर्थ।

''ग्रंथु नोहें हें कृपेचे। वैभव तिये।।'' हे ज्ञानेश्वरमाउलीचे उद्धार ज्ञानेश्वरीविषयींचे आहेत; पण हेंच विधान प्रस्तुत गुरुचरित्राला अधिक प्रमाणानें लागू पडतें. निःसंशय हें चरित्र म्हणजे गुरुकृपेचे वैभव होय.

केवळ ऐतिहासिक गोष्टींखेरीज, इतर ठिकाणी उल्लेखित व अनुल्लेखित चमत्कार, व आत्मसाक्षात्काराच्या पथावर सुंदर सुबोध आणि संशयनिरसन करणारीं सयुक्तिक प्रश्नोत्तरें सुद्धां ह्या चरित्रातं विलसत आहेत. प्रश्नोत्तरी ही ह्या गुरुचरित्रांचे अपूर्व वैशिष्ट्य होय. सुबोधाचा भाग तर अमोल आहे. शैली सरळ व सहज. दृष्टांत समर्पक व साधे. समजण्यास कठीण असा भाग जवळ जवळ मुळींच नाही. परंतु हे चरित्र असे नाहीं कीं, एकदां वाचून बाजूला ठेवून दिलें. त्याचें नित्य वाचन व मनन झालें पाहिजे; शिकवणूक आचरणांतही आली पाहिजे. चरित्र सर्वांचा निधी आहे, आणि सर्वांचे कल्याण करील.

रोज एका अध्यायाचें वाचन कोणालाही कठीण होऊं नयें. व्यवहारांत व्यग्र असणाऱ्या व्यक्तींना देखील सप्ताह सुटीच्या दिवसांत अशक्य वाटूं नयें. वेळ नाही ही सबब निरर्थक होय. इच्छा असली तर मार्ग मिळतो. देवासाठी वेळ नाही म्हणणे सोपें. पण आमच्यासाठीं देवाला वेळ नसला तर? पुढचा श्वास घेतां येणार नाही; पुढचे पाऊल टाकतां येणार नाहीं.

मठ हा दिसतो त्याहून फार फार महान आहे. गुरुपरंपरा तर कल्पनातीत महत्त्वाची आहे.हे चरित्र डोळ्यांत अंजन घालणारें आहे. त्यांचा लक्षपूर्वक अभ्यास केला तर, मठ व गुरुपरंपरा यांविषयी चकित करणारा प्रकाश पडेल. देवाची भक्ति, मठाबद्दल आदर, गुरुमाऊलीविषयीं पूज्यभाव, गुरुसेवातत्परता - हे आमचें मूलमंत्र असले पाहिजेत. जेथें हे गुण नाहीत, तेथें चरित्राच्या अभ्यासानें ते उत्पन्न होतील; जेथें आहेत, तेथें वृद्धि होऊन दृढच राहतील; पाषाणहृदयालाही पाझर फुटेल.

चरित्राच्या आरंभीं विषयानुक्रमणिका जोडली आहे. शक्यतोंवर मूळांतले शब्दच उपयोगांत आणिलेले आहेत. म्हणून सहज विहंगमावलोकन होईल. विशेषतः चरित्रांत सोडविण्यांत आलेल्या प्रश्नसंशयादिकांची यादी दिली आहे.

पण अजून एक प्रश्न विचारितां येईल. जर गुरु देवच तर महासभा व स्थायीसमितीची आवश्यकता काय? आम्हांला आवडो अगर नावडो, हे दिवस लोकसत्ता व सरकारी नियंत्रणाचे आहेत. व्यवहारांत कांही उपचार पाळावे लागतात. श्रीकृष्णानें कौरवसेनेचा निःपात क्षणांत केला असता, पण तसें केलें नाही. त्यानें साधनांचा उपयोग केला. ''मयैवैते निहताः पूर्वमेव निमित्तमात्रं भव सव्यसचिन्।।'' अर्जुन स्वतः एक निमित्तच होता. महासभा व स्थायिसमीती देखील निमित्तमात्र. ''यो बुद्धेःपरतस्तु सः'' हे जाणून आपलें कर्तव्य पार पाडीत असतात; आपले विचार विनयानें गुरुमाउलीपुढें मांडतात; गुर्वाज्ञा संतोषानें पाळितात. १९३२ सालापासून असेंच चालत आलें आहे. आणि पुढेंही असेच चालू राहील याबद्दल मला संशय वाटत नाही. गुरुमाऊली कार्ये करून घेते. ती योग्य वेळीं योग्य निमित्तांची निवड करिते. गेल्या २२ वर्षांच्या इतिहासावरून हें सिद्ध होतें. ह्या चरित्राचें चरित्रही एक नवीन दृष्टांत. लेखिका, संशोधक, प्रकाशक, मुद्रक इत्यादी हे सर्व निमित्तमात्र. त्यांनी गुरुमाऊलीचे आशीर्वाद सहज मिळविले आहेत. आणि ते सर्वांच्या हार्दिक कृतज्ञतेला पात्र आहेत.

शेवटीं खालील प्रार्थना करून ही विनंती संपवितो.

गुरुमठु आमुची आई। असो आचंद्रार्क स्थायी।।१।।
गुरु जीवींचा जीवनु। तोचि नंदाचा नंदनु ।।ध्रु।।
वरें स्वधर्मराज्य करी। चिरकाल नांदो भारी।।२।।
वदनीं सदा गुरुनाम। हृदयी वसो गुरुप्रेम।।३।।
दास म्हणे सद्गुरुदेवा। सतत करवीं आपुली सेवा।।४।।

गुरुप्रतिपदा,जय सं. गुरुचरणरज,

दि. ७.२.१९५५ शंकर

॥ॐ तत्सत्-श्रीसद्गुरु प्रसन्न॥

॥ॐ॥ आनंदमानंदकरं प्रसन्नं, ज्ञानस्वरूपं निजबोधयुक्तम्। योगीन्द्रमीड्यं भवरोगवैद्यं, श्रीमद्गुरुं नित्यमहं नमामि॥ॐ॥

''गुरुचरणीं करितां भक्ति। अनायासें प्राप्त चारी मुक्ती। निजशांतीसीं विरक्ति। सेवों लागती गुरुभक्तां॥''

''करितां साधनांच्या कोटी। साधनीं समाधान नुठी। झालिया सद्गुरुकृपादृष्टी। ब्रह्मत्वें पुष्टी गुरुभक्तां॥''

''गुरुभजनापरतें सुख। मोक्ष मानिती तेही मूर्ख। मोक्ष गुरुचरणींचा रंक। विरळा लोक हें जाणती॥''

(एकनाथी भागवत)

संशोधकाचें नम्र निवेदन

(लेखक : रामचंद्र कृष्ण कामत, श्रीदुर्गादत्तमंदिर, माशेल-गोवा)

प्रस्तुत चित्रापुर-गुरुपरंपराचरित्र ग्रंथ संशोधनाच्या निमित्तानें माझ्याकडे आला हें मी मोठें भाग्य समजतों व तो गुरुभक्तशिरोमणि श्रीयुत एच, शंकरराव यांनी पाठविला, याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

अघटीत घटना अथवा ऋणानुबंध!

त्या अवधीत प्रस्तुत ग्रंथाच्या लेखिका गु.भ. प. उमाबाई आरूर ह्या मुंबईत मला येऊन भेटल्या व आपला ग्रंथ माझ्या हातांत देऊन एच्. शंकरराव यांनी तुमच्याकडे पाठविलें आहे म्हणाल्या. शंकररावांचें नांव ऐकून त्या ग्रंथाविषयीं अधिक आदर उत्पन्न झाला. त्यावेळीं श्री. ढवळे हे आमच्या गुरुचरित्राची चौथी आवृत्ति छापीत असून त्याचीं मुद्रितें (प्रुफें) तपासण्याकरितां मजकडे येत असत. हें काम चाललें असतां, हें चित्रापुरगुरुपरंपराचरित्र माझ्या हातीं पडलें व ही दुसरी गुरुचरित्रसंशोधनसेवा असें वाटून हा एक देवाच्या घरचा चमत्कारच वाटला. पहा! मी मुंबईस कोणत्या कारणासाठीं आलों व तेथें आल्यानंतर माझ्या हातून काय काय घडलें अथवा देवानें घडविलें, हा देवाच्या लीलेचा चमत्कार नव्हे तर काय? चित्रापुरमठानुयांच्या ओळखीदेखी झाल्यानंतर मठाधिपति स्वामींच्या पुष्कळशा गोष्टी कानांत पडल्यामुळें त्यांच्याविषयींचा प्रेमादर मनांत अगोदरच उत्पन्न झाला होता. तशांत हा ग्रंथ हातीं पडला व देवाच्या लीलेचें कौतुक वाटलें व संशोधनाविषयीं प्रेम वाटूं लागलें.

संशोधन म्हणजे काय?

संशोधन म्हणजे मुद्रितांचे परिशोधन (प्रूफ-करेक्शन) नव्हे. तर मूळ ग्रंथकाराचा शब्द कोणता व मागाहून नक्कल करणाऱ्या लेखकाचा हस्तप्रमाद कोणता हें शोधून काढणें याचें नांव संशोधन होय. असें करण्याकरितां पूर्वीच्या अनेक हस्तलिखित प्रति पाहून त्यावरून ठरवावें लागतें. उगीच चूक वाटली म्हणून आपल्या मताचा शब्द तेथें घालता येत नाहीं. मूळ ग्रंथकाराचा शब्द बदलण्याचा कोणासही अधिकार नाही. ग्रंथ हातांत पडतांक्षणी तो मीं वरवर चाळून पाहिला. तों प्राचीन रामविजय-हरिविजयादि ग्रंथांप्रमाणें रसाळ वाणीचा वाटला. सहरहु ग्रंथ सद्गुरुच्या अमोघकृपेनें व पूर्ण आशीर्वादाने लिहिला गेला आहे, असे ग्रंथकर्त्रीने ग्रंथांतपुष्कळ ठिकाणी म्हटलें आहे. तसेच सरस्वतीगंगाधरानें आपल्या गुरुचरित्र ग्रंथांत 'भाषा न ये महाराष्ट्र' असें म्हटल्याप्रमाणें ह्या लेखिकेनेंही म्हटलें असून, मला ती भाषा सुधारणेचा 'पूर्ण अधिकार' समक्ष भेटींत दिला व ग्रंथ दुरुस्त करून देण्याबद्दल विनंती केली. मी त्या वेळी विलेपार्ल्यास राहात असून उमाबाई मुंबईस आपल्या आजारी बहिणीच्या शुश्रुषेकरितां येऊन राहिल्या होत्या. सवडीप्रमाणें चार आठ दिवसांनीं येऊन भेटत असत.

ग्रंथ छापण्याच्या प्रयत्नाचा इतिहास!

श्री. मर्बळ्ळी व त्यांच्या प्रेमळ पत्नी सौ. रुक्मिणीबाई यांनी माझ्या प्रकृतीची फारच काळजी घेतली. ग्रंथसंशोधनाचें काम सकाळ-संध्याकाळ मिळून चार पांच तास चाले. त्यावेळीं मला भेटण्यासाठी जवळपासचे प्रेमळ लोक येत असत. त्यांना या ग्रंथाची मी ओळख करून देऊं लागलों. सर्वांना तो ग्रंथ आवडला व

हा लवकर छापला जावा असें सर्वांस वाटूं लागलें. मूळ हस्तलिखितावरून सुवाच्य प्रत (fair copy) करण्या -शिवाय गत्यंतर नव्हतें. श्री मर्बळ्ळी यांनी आंखलेल्या कागदाचें रीम आणलें. तपासून झालेले अध्याय सुवाच्य लिहून काढण्याचे काम कांही बंधु-भगिनींनी आपण होऊन पत्करलें. पण प्रत्येकाला स्वतःची कामें सांभाळून हें काम करण्यास दिवस लागूं लागले. आणि मला तर गोव्यास येण्याबद्दल घराकडून पत्रें येऊं लागलीं. (घर सोडून दीड वर्षे झालें होतें. श्रीदत्तजयंतीचा उत्सवही जवळ आला होता. त्याकरितां गेलें पाहिजे होतें)

ग्रंथांची सुवाच्य प्रत लिहून झाल्यानंतर ती मूळ ग्रंथावरून तपासली पाहिजे होती. चार पांच लोकांकडून चार पांच अध्याय लिहून मिळण्यास आठ पंधरा दिवस लागलें! त्यामुळें अशानें हें भागणार नाहीं, कोणीतरी पगारी लेखक शोधला पाहिजे असें ठरलें व मराठी अक्षर चांगले असलेला लेखक शोधून काढला. त्याला श्री. मर्बळ्ळी यांच्या घरींच बसवून चार पांच तास काम करून घेऊं लागलों. त्यांचे वेतन ठरलें. वर्गणी गोळा करावीशी वाटली. प्रथमचा आंकडा मीं घातला व पैसे देऊन सोडले. श्री. मर्बळ्ळी यांच्या इतर स्नेही मंडळीला ही गोष्ट कळली. त्यांनी माझ्यापेक्षां जास्त पैसे स्वखुषीनें दिले. तालमक्कीवाडींतच राहात असलेले आमचे विद्वान मित्र पं. भवानीशास्त्री कर्की यांनी आपल्या एका मित्राकडून एकदम ५० रु आणून दिले. त्याचें नांव ते सांगेनात. कारण देणाऱ्याचें तें गुप्तदान होतें. पण हा दाता सारस्वतेतर असल्याचें श्री. शास्त्री यांनीं सांगितलें. हें ऐकून तर आम्हांला आश्चर्याचा धक्काच बसला. हा ग्रंथ लवकर छापून निघावा अशी परमेश्वराचीच इच्छा आहे असें वरील गोष्टींवरून दिसून आले. तालमक्की वाडींत त्या दिवसांत नवरात्रीचा उत्सव होता, त्या समेंत मलाही थोडेंसें भाषण करावें लागलें. त्यावेळीं जाहीर रीतीनें या ग्रंथाचा परिचय लोकांस करून देण्याची मी संधि साधून घेतली व ग्रंथाचा थोडासा भाग वाचूनही दाखविला. त्यामुळें लोकांत त्या ग्रंथाविषयीं कुतूहल वाढलें. ज्या सत्तेनें हा ग्रंथ निर्माण झाला त्याच सत्तेनें तो छापून निघणार असा माझा विश्वास मीं प्रगट केला. हें माझें वाक्य श्रीयुत एच्. शंकरराव यांना फारच आवडलें. त्यांनी खासगी बैठकींत मदतीचें आश्वासन दिलें. मठाधिपति स्वामींचीं चरित्रें या ग्रंथांत असल्यामुळें, प्रस्तुतचे पीठाधिकारी परमपूज्य गुरुदेव परमहंसपरिव्राजकाचार्य श्रीमद् आनंदाश्रम स्वामीमहाराज यांची परवानगी घेणें जरूर आहे असें वाटल्यामुळें सुवाच्य लिहून काढलेला व मूळावरून तपासलेला एक अध्याय श्रीयुत पांडुरंगरावांतर्फे श्रीस्वामीपादांना चित्रापूरला रजिस्टर बुकपोस्टानें पाठवून दिला. त्यांनी तो वाचून पाहून प्रेमाशीर्वादासह, छापण्यास परवानगी लिहूनपाठविली. ती पाहून सर्वांना मोठा आनंद झाला.पगारी लेखकाकडून सुवाच्य प्रत लिहून घेण्यास सुमारें दोन महिने लागले. सर्वच अध्याय मूळावरून तपासण्यास मला तिकडे साध्य झालें नाहीं. गोव्यास घरीं आल्यानंतर श्री. मर्बळ्ळी यांनी तिकडे येऊन माझ्याकडून हें काम करून घ्यावें असें ठरलें. त्याप्रमाणें आमच्या घरचा श्रीदत्तजयंती उत्सव आटोपल्यानंतर श्री. मर्बळ्ळी इकडे मूळ ग्रंथ घेऊन आले.

श्री. मर्बळ्ळी यांची चिकाटी व त्याग!

'Patience and Perseverance will overcome mountains' ह्या इंग्रजी म्हणीप्रमाणें कोणतीही मोठी कामें चिकाटीच्या प्रयत्नाशिवाय पुरीं होत नाहींत. श्री मर्बळ्ळी आमच्या सुदाम-पर्णकुटींत येऊन राहिले. इकडे दुधातुपाचा अभाव! त्यांच्या मुंबईतील रहाणीप्रमाणें त्यांना आमच्याकडे जेवणखाण मिळत नव्हतें! मला त्याबद्दल वाईट वाटत होतें, पण त्यास उपाय नव्हता!

त्यांच्या मुंबईतील रहाणीप्रमाणें त्यांना आमच्याकडे जेवणखाण मिळत नव्हतें! मला त्याबद्दल वाईट वाटत होतें, पण त्यास उपाय नव्हता! कार्याचा महत्त्वाकडे लक्ष देऊन ते सर्व गैरसोयी सोसून आमच्याबरोबर वागत होते, हा त्यांचा मोठेपणा वाखाणण्यासारखा आहे.

मी ह्या गुरुसेवेच्या कार्यास त्या गुरुभक्ताबरोबर सकाळीं दोन तास व संध्याकाळीं तीन तास काम करीत बसत होतों. केव्हां केव्हां रात्रीही तासभर बसत असूं. एका अध्यायाचें थोडेंसें काम शिल्लक राहीलें म्हणजे तें पुरें केल्याशिवाय उभयतांना चैन पडत नसें. त्यामुळें केव्हां तरी रात्रीं बसावें लागें. असो. तपासतांना कित्येक ठिकाणीं मला संशय येऊन कोणते शब्द घालावे याचा बुद्धीला निर्णय होईनासा झाला म्हणजे उमाबाईंना धारवाडास पत्र लिहून मी विचारीत असें. संशयाचा भाग वेगळा काढून ठेवून पुढचें काम आम्ही करूं लागलो. ग्रंथकर्ता देवाच्या दयेनें जिवंत असल्यामुळें त्यालाच विचारून दुरुस्ती केलेली बरी असें मनाला वाटूं लागलें व तसें करूं लागलो. त्यावेळी उमाबाईंनी धारवाडहून पत्र पाठवून कळविलें

की (कार्ड ता. २५/१/५४) ''आपण दुरुस्त करून बदललेली ओंवी मला फार आवडली.... त्या दृष्टांतांत कांहीं चूक असल्यास ते शब्द काढल्यास माझी कांहीच तक्रार नाहीं. मला पुन्हा त्यांत बघून दुरुस्त करण्याची सवडच नाही. ज्याअर्थी शुद्ध करण्याचें काम आपल्यावर सोंपविलें आहे, त्या अर्थी आपण जें जें कराल तें तें मला मान्यच आहे. कोणताही संशय नाहीं. मी एक इलेक्ट्रीक दिव्यासमोरची समयी आहें असें मी समजतें'' इत्यादी. हा उमाबाईंचा विनय होय; पण मला तो डोईजड वाटला. थोर व खरे ज्ञानी निरभिमान असतात. देहाभिमान मिथ्या ठरल्याशिवाय अशी निरभिमानता येत नाहीं; निरभिमानता बाणल्याशिवाय भगवत्प्राप्ति होत नाहीं.

प्रिय मर्बळ्ळी पांडुरंगराव यांच्या चिकाटीशिवाय व त्यागाशिवाय हा ग्रंथ मुद्रणाला योग्य झाला नसता. याकरितां ग्रंथकर्त्रींच्या व वाचकांच्याही वतीनें मी त्यांचे उपकार मानतों. ग्रंथकर्त्रींचे बंधु श्रीयुत अण्णाजी मंगेश भट्ट यांनी श्री. पांडुरंगरावांना लिहिलेल्या पत्रांत असेंच म्हटलें आहे. "If it was not for the efforts made by you and Shri Kamatmam my sister's work would have been left in the dark" काहीं असो. आम्हीं एकमेकांचे आभार मानण्यापेक्षां ज्या श्रीगुरुदेवाच्या सत्तेनें व कृपेनें हा ग्रंथ तयार झाला व छापूनही निघाला, त्या गुरुदेवाचेच आम्ही सर्वजण आभार मानून त्याचे चरणीं लीन होऊन राहूंया.

प्रस्तावनेंत या ग्रंथाशीं माझा प्रत्यक्ष व पर्यायेंकरून ज्यांचा ज्यांचा संबंध आला त्यांच्या नावांचा कृतज्ञतापूर्वक मी उल्लेख केलाच आहे. त्या सर्वांचे मी प्रेमपुरःसर आभार मानतो. याशिवाय श्री. मर्बळ्ळी यांचे गुरुबंधू परमप्रिय श्री. विठ्ठलराव जोशी यांनी मला संशोधनाच्या कामीं योग्य सूचना करून उत्तेजन दिले, त्याबद्दल त्यांचेही आभार मानल्याशिवाय प्रस्तावना पुरी करवत नाही.

जातां जातां वाचकांना एक सूचना दिल्याशिवाय राहवत नाहीं ती ही कीं, ओंवीबद्ध ग्रंथ वाचण्याची संवय मोडल्यामुळें ज्यांना हा ग्रंथ वाचणें जड होईल, त्यांनी श्रीयुत वेंकटराव चंदावर, राणेबिन्नूर, यांनी मूळ कानडींत लिहिलेल्या ग्रंथाचा, आमचे तरुण मित्र श्रीयुत राममोहन वेंकटराव कोप्पीकर, हुबळी, यांनी मराठीत अनुवाद करून श्री चित्रापुर ''मठ आणि गुरुपरंपरा'' नांवानें पुस्तक छापलें आहे तें अवश्य वाचावें. हें वाचून नंतर हा ओवीबद्ध ग्रंथ वाचावा म्हणजे तो अधिक गोड वाटेल. अस्तु...

शेवटी, संस्थान देवता श्रीमवानीशंकर व चित्रापुर मठपरंपरेचे सर्व मठाधीश यांनी आपली शक्ति ग्रंथकर्त्याच्या व माझ्या अंगांत संचर वून ग्रंथरचनेचें व संशोधनाचें अपूर्व कार्य करवून घेतलें; त्याचप्रमाणें ग्रंथ मुद्रित होण्याकरितां अनेकांच्या मनांत प्रबल प्रेरणा करून हें कार्य शेवटास नेलें; त्यांचे चरणीं वंदन करून, त्याचप्रमाणें नवरत्नमालेंत कौस्तुभाप्रमाणें शोभणारे परमपूज्य शिष्यवत्सल परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्आनंदाश्रमस्वामी यांच्या पवित्र चरणीं साष्टांग प्रणिपात करून, लांबलेली प्रस्तावना पुरी करितों.

॥ॐ तत्सत्-श्रीगुरुचरणारविंदार्पणमस्तु॥ॐ॥

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चिद्दुःखमाप्नुयात्॥

श्रीदुर्गादत्तमंदिर, माशेल-गोवा;
मिति माघ शुद्ध पंचमी शके १८७६
शुक्रवार दि. २८-१-१९५५

श्रीगुरुचरणांचा व गुरुभक्तांचा
दासानुदास,
रामचंद्र कृष्ण कामत

सारस्वतांचे मूळ

॥ॐ तत्सत्॥

॥श्रीसद्गुरवे नमः॥

सारस्वत ऋषि वसती। सरस्वतीतीरीं निश्चिती।
श्रीपरशुरामें तयांप्रती। आणिलें पाचारुनी जगत्काजा॥१॥
निःक्षत्रिय मेदिनी केली। सकलही विप्रां दान दिधली।
रहावयासी ना राखिली। आपणा भार्गवें तिलमात्र।।२॥
परि विप्र ना तोषले। म्हणती आणिक द्यावीं स्थळें।
आशाळभूत विप्रीं संत्रस्त केलें। भार्गवा त्रास जाहला॥३॥
म्हणोनि सकळही द्विजांसी देवोनी। सागर हटविला झणीं।
स्वयें निर्मिलें स्थान दक्षिणीं। सह्यागिरीचे सन्निध॥४॥
तेथें अरण्य असे अपार। न वसती सुबुद्ध विप्र।
अनार्य जाती अतिक्रूर। ऐसे जीव वर्तती॥५॥
तयांचा व्हावा उद्धार। म्हणोनि परशुरामें केला आचार।
आणिले विप्र थोर थोर। ऋषिवंशज त्या प्रांतीं॥६॥
तयांसी देवोनि अधिकारं। दक्षिणदेशीं वाढविला आचार।
धर्ममार्ग वाढविला अपार। वेदाधारेंकरोनी॥७॥
त्या बहुगोत्री विप्रांमाजी। सारस्वतही आले त्या काजीं।
काश्मीर प्रांतांतुनी हो जी। आणिलें देवें तयांसी॥८॥
कांहीं काळ धर्ममार्ग चालिला। पुढें अवकळा आली धर्माला।
परधर्मियांचा घाला। आला तये दक्षिणेंत॥९॥
तैम् सकलही विप्र भयभीत झाले। आसुरी संपत्तीनें त्रासिले।
अभिचार-योगें जन ग्रासिलें। विप्रां आघात करिताती॥१०॥
जीव, धर्म रक्षायाकारण। गेले आन आन ग्रामांतून।
सांडोनियां साच नामें, आन। आन ग्राम नामें, घेती॥११॥
पुढें जाहलें स्थिर स्थावर। तैं सारस्वतीं जाहले दोन शाखाप्रकार।
एक गौड एक सारस्वत विप्र। मठ दोन जाहले॥१२॥
गौडांमाजीं शहाण्णव कुळें। त्यांहीं या दुजियांस हीन लेखिलें।
म्हणती सारस्वतां दाखवा भले। स्वामी आचार्य कोण तुम्हां॥१३॥
तुम्ही म्हणता वेदाधिकारी ज्ञाती। सारस्वत आपणां निश्चिती।
वेदाधारें चालाया इथे प्रांतीं। कवणें तुम्हां कथियेलें॥१४॥
कवण तुमचे मठाधिपती। कवण तुम्हां आचार्य असती।
झणीं दावा आम्हांप्रती। नातरी शूद्रासम मानितों॥१५॥
भय उपजलें सारस्वत द्विजांसी। म्हणती कोपला शंभु आपणांसी।
भवानीशंकरा गती कैसी। सारस्वत ज्ञातीची॥१६॥
तूं कर्पुरगौर शिव थोर। तूंचि मातापिता केवळ।
काय अपराध घडिला अघोर। म्हणोनि ऐसा कोप केला॥१७॥
कां बा कोपलासी देवाधिदेवा। तुजवीण कवण आधार बरवा।
उमापती धांवे देवाधिदेवा। अंत आतां न पाहीं॥१८॥
तूंचि संकटें निवारोनी। पुनरपि आम्हां मार्ग दावुनी।
सारस्वतां स्वधर्माचार जनीं। पुनरपि लावीं ये वेळां॥१९॥
सकळ अपराध क्षमा करावें। लेंकुरां आम्हांसी रक्षावें।
धांवोनियां झणीं यावें। काशीनिवासी विश्वेशा॥२०॥
सारस्वत विप्र थोर। कर्म-ज्ञान भक्ती अपार।
निष्ठावंत आचार फार। तयांनी अनुष्ठान मांडिलें॥२१॥

म्हणती आम्हां कवण स्वामी। कवण आचार्य स्वधर्मी।
मृडानीवरा सत्य दावीं स्वामी। नातरी प्राण सांडूं हो॥२२॥
अनुष्ठान अनशनपूर्वक। कांहीं काळ चालविलें देख।
पाहोनि ज्ञानी विप्रांचा भाव एक। गौरीहर कळवळला॥२३॥
आपुल्या बाळांचा आर्तस्वर। कानीं पडतांचि थोर।
सकळही विसरोनि निजकर्माचार। माता धांवे त्यासाठीं॥२४॥
तेवीं सारस्वतज्ञातिबाळक। कळवळले अनन्य एक।
तें पाहोनि अंबेसहित देख। हिमतनयापति द्रवलासे॥२५॥
सांडोनि कैलासींचें स्थान। सांडोनि नंदी वाहन।
भक्तांसाठी होवोनि सगुण। मुनिरुपें पातला॥२६॥
परमहंस परिव्राजकाचार्य। आपणचि स्वयें जाहला भक्तप्रिय।
आणि सांगे सारस्वतज्ञातिवर्य। आपण असें म्हणोनी॥२७॥
द्वारकापीठावरोनि पाठविले। परिज्ञानाश्रम-स्वामी पहिले।
साक्षात्-शंकर, भक्तांसाठीं खेळे। भक्तभाव पाहोनी॥२८॥
द्वारका-काशी पीठ एक। काशीमाजीं मठ सुरेख।
काशीपीठीं द्वारकेहूनि देख। आले आश्रम यति ते॥२९॥
मूळ-आश्रम द्वारकापीठ। कांहीं कारणें काशीमठ।
दों ठायीं अधिकार वर्तत। ऐसा प्रकार जाणावा॥३०॥
जरी वाराणसीहूनि आले। तरी द्वारकापीठस्थ मूळांतले।
त्याकारणें कथियेलें। द्वारकेहूनि आले कीं॥३१॥
धाडिलें द्वारकेहूनि। संरक्षाया ज्ञातीलागोनी।
स्वयें आली जगज्जननी। भवानी दुर्गा आपण॥३२॥
गजानन ऋद्धिसिद्धिंसहित। सर्वे पातला निश्चित।
अधिकारियांसवें येत। सकळही सेवक सहजचि॥३३॥
तैसा शक्तीसहित उभारमण। आला सारस्वतांलागोन।
प्रकटोनि सांगे आचार्य आपण। असें सारस्वतांचा॥३४॥
आद्य श्रीमत् जगद्गुरु आचार्य। ज्यांनीं चारी धार्मी केलें कार्य।
चारी पीठांवरी, गुरुवर्य। स्थापिती शिष्यांलागोनी॥३५॥
तयांतील सारस्वतांकारण। द्वारकापीठास्थ आम्ही जाण।
आलों आतां करावया स्थापन। मठ येथें ज्ञातीस्तव॥३६॥
म्हणती घ्यावी शंका फेडोनी। आम्ही आलों त्याच कारणीं।
करा वादविवाद जनीं। जेंजें वसे मानसीं॥३७॥
म्हणोनि वेद उच्चार। ऋक्, साम, यजु थोर।
सकळही शास्त्रविचार। श्रुतिसंमत स्मृतीही॥३८॥
अष्टादश पुराणांसहित। उपनिषदें, ब्राह्मणग्रंथ।
सकळही या हो शंकानिरसनार्थ। शंकरें आपण पाठविलें॥३९॥
न करावा छळ सारस्वतांचा। तो धर्म नाहीं कामाचा।
सकळ जनहो विचार साचा। करा आत्महितार्थ॥४०॥
नका जाऊं भ्रमोनी। नका उन्मत्त होऊं जनीं।
नका गर्वे व्यर्थ फुगोनी। घातक न व्हावें निजहिता॥४१॥
आम्ही सारस्वतांचे आचार्य। नाम आमुचें परिज्ञानाश्रम गुरुवर्य।
वेदमार्ग-आचार दावावया, अभय। द्यावया आलों ज्ञातीसी॥४२॥
गोकर्णी स्थापिलें सारस्वत पीठ। द्विज केले सकळ संतुष्ट।
म्हणे आतां न करावे कष्ट। आलों भक्ति जाणोनी॥४३॥
आमुचे आज्ञेनुसार। करावा सकळ ज्ञातीनें आचार।
वेदाज्ञेनुसार वर्णाश्रम थोर। धर्म आपुला सेवावा॥४४॥
गोकर्णी पीठ प्रथम स्थापिलें। उमेसहित शिवा पूजिलें।
भक्तजन मार्गी लाविले। परिज्ञानाश्रम गुरुवर्य॥४५॥
प्रथम समाधि गोकर्णांत। जेथ महाबळेश्वर नित्य।
सागर समीप असे वसत। भवानी-शक्तीसहित तो॥४६॥

तेथोनि दुजे शंकराश्रम। चित्रापुरीं (श्रीवल्लीं) घेती समाधि परम।
आणि अवतारकार्यक्रम। तेथें आपुले संपविती॥४७॥
तेथेंचि द्वितीय परिज्ञानाश्रम। वास करीती उत्तम।
शंकराश्रम स्वामींस धर्म। वाढवावया घेतलें॥४८॥
चित्रापुरीं श्रीवल्लीसी। आचार्यपीठ निर्मिलें स्वयेंसीं।
विप्रां आनंद अपारेंसी। जन सकळ संतोषला॥४९॥
तेव्हां कळलें गौडांसी। वैष्णव स्मार्त जनांसी।
सारस्वतांची परंपरा कैशी। कवण आचार्य तयांचे॥५०॥
कवण ऋषी, कवण गोत्रींचे जन। सकळही आलें कळोन।
सांडोनि दुरभिमान पूर्ण। लीन जाहले त्यांपायी॥५१॥
सकळ द्विजांसी पारणें करविलें। अभय देवोनि रक्षिलें।
माहात्म्य भक्तांचे दाविलें। कलीमाजीं खलजनां॥५२॥
मग सकळही उमजले अंतरात। न करिती अवहेलना तेथ।
साक्षात् उमामरण येथ। कैसा आला न उमजे॥५३॥
परी जयांनीं छळ केला। तयांवरीही न कोपला।
तयांसीही देता जाहला। अभय देव-स्वामी वरू॥५४॥
तयांसीही ज्ञान कथिलें। म्हणे आपुले आचार करा भलें।
आपल्या आश्रमधर्माधारें। आचार्य-आज्ञें वर्तावें॥५५॥
न करावा द्रोह द्वेष। तुम्हां आम्हां एकचि ईश।
सकलान्तरा वसे परेश। तोचि एक सेवावा॥५६॥
तयांसीही गौरविलें। सारस्वतांसी रक्षिलें।
आचार्य परंपरापीठा केलें। स्थापन तयांकारणें॥५७॥
मांडिली उपासना थोर। करावया जगदुद्धार।
नाना रीती श्रीगुरुवर। लीला दाविती जनांसी॥५८॥
यापरी श्रीमत् परिज्ञानाश्रम। पूर्ण करोनि अवतारकाम।
शिष्य घेवोनि द्वितीय शंकराश्रम। आपुलें कार्य संपविती॥५९॥
तेथोनि पुढती आश्रम जाहले। तें इतिहासीं विदित केलें।
घ्यावें जाणोनियां भलें। जयां चाड मानसीं॥६०॥
आजि त्याच पीठावरी। श्रीआनंदाश्रम खरोखरी।
ज्ञातीस्तव देह झिजविती थोरी। काय त्यांची वर्णावी॥६१॥
ब्रह्मचारी-तत्त्वज्ञ थोर। लाभले असती श्रीगुरुवर।
श्रीमत् पांडुरंगाश्रम दत्तावतार। तयांनीं आश्रम दीघला॥६२॥
आजही जयांचा असे भाव। वा न असे, न मानती देव।
त्या सकळही सारस्वतज्ञातीस्तव। श्रीगुरु तपाचरण करिती॥६३॥
सेवा सेवा हो सकळ जन। सांडोनि कुभावना-अज्ञान।
श्रीमत् आनंदाश्रम-स्वामीनाम। सर्वकाळ तें घ्यावें॥६४॥

॥श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु॥

(वि.ग. जोशी)

ग्रंथलेखिकेची प्रस्तावना

ॐ श्रीगणेशाय नमः। श्रीशांतादुर्गांबिकायै नमः। श्रीमत् परमहंस प. आनंदाश्रमगुरुभ्यो नमः। श्रीमत् परमहंस शिवानंदतीर्थगुरुभ्यो नमः।

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः॥१॥
ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्ति,
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम्।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं,
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि॥२॥

श्रीचित्रापुरगुरुपरंपरा चरित्राची ही पहिली प्रत श्रीसद्गुरुभक्तांच्या हातांत देतांना माझें अंतःकरण आनंदाने उचंबळून येत आहे. हा ग्रंथ लिहून पूर्ण होऊन ९/१० वर्षे होऊन गेलीं आणि तो अशा प्रकारें छापून होईल अशी मीं स्वप्नांतही कल्पना केली नव्हती. परंतु, ज्या सद्गुरुंच्या कृपाप्रसादानें हा ग्रंथ लिहिला गेला, त्यांच्याच कृपेंकरून, त्यांच्या कांही सद्भक्तांना प्रेरणा झाली, व हा ग्रंथ छापण्याचा सुयोग घडून आला. हा प्रासादिक ग्रंथ सद्गुरुप्रेमी वाचकांच्या हातीं देतांना माझें मन माझ्या विश्ववंद्य सद्गुरुंच्या प्रेमानें भरून येतें. श्रीगुरुमहाराजांनी माझ्याकडून प्रेमानें तयार करून घेतलेली ही सेवामय अल्पकृति सर्व वाचक गोड मानून घेतील अशी मला आशा वाटते. श्रीसद्गुरुंनी माझ्याकरवीं वांटविलेल्या या प्रेमामृताचें मुमुक्ष लोक श्रद्धेनें अंतःकरणपूर्वक आकंठ सेवन करितील अशी मी आशा बाळगतें.

मीं वर सांगितलेंच आहे कीं हा ग्रंथ लिहून ९-१० वर्षे होऊन गेली. माझ्या परमपूज्य स्वर्गस्थ मात्यापित्यांची हा ग्रंथ छापल्यावर त्याचें पारायण व सप्ताह करण्याची फार प्रबल इच्छा होती. पण त्यांच्या मृत्यूपर्यंत ही त्यांची मनीषा पूर्ण झाली नाही. माझ्या पित्यांच्या मृत्यूनंतर अवघ्या तीन वर्षात हा ग्रंथ छापून प्रसिद्ध व्हावा व तो वाचण्यास आज ते हयात असूं नयेत हा दैवदुर्विपाक आहे. सांगण्याचें तात्पर्य म्हणजे कीं ९-१० वर्षांपूर्वीं हा ग्रंथ तयार झाला असूनही तो छापण्याचें कार्य, त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळें, तसेंच राहून गेलें होतें; परंतु गेल्या वर्षी मी मुंबईला गेलें होतें तेव्हां हा ग्रंथ प्रकाशांत आणून त्याला उजाळा देण्याचें कार्य कांही सद्भक्तांच्या हातून घडण्याचा सुयोग जमून आला, ही देखील सद्गुरुंची कृपाच होय. ज्या परमपूज्य हरिगुरुभक्तपरायण मंडळींनी या महत्कार्याला हात लावला, त्यांचा येथें उल्लेख केल्यावांचून मला समाधान वाटणार नाहीं.

ही माझी अल्प कृती छापून आज वाचकांच्या हातीं पडण्याचा जो सुयोग असून आला, त्याचें सारें श्रेय, श्री.ह.गु.भ.प. श्री. रामचंद्र कृष्ण कामत उर्फ अण्णा कामत, श्री. ह.गु.भ.प. श्री.ह.गु.भ.प. श्री. रामचंद्र कृष्ण कामत उर्फ अण्णा कामत, श्री. ह.गु.भ.प. पांडुरंग शिवराम मरबळ्ळी व श्री. ह.गु.भ.प. एच् शंकरराव, यांनाच द्यावें लागेल. श्री. प.पू. अण्णा कामतांनी आपल्या वृद्धावस्थेंतहीं, अतिशय मेहनत घेऊन, श्री पांडुरंगरावांच्या सहायानें या ग्रंथाचे संशोधन केलें, व हस्तलिखित तपासून योग्य त्या दुरुस्त्याही केल्या याबद्दल मी त्यांची सदैव ऋणी राहीन. श्री. अण्णा, श्री. पांडुरंगराव व श्री. शंकरराव यांनी जर मनावर घेतले नसतें, तर हा माझा ग्रंथ एकाद्या कोंपऱ्यांत धूळ खात पडला असता व शेवटीं मातीमोल ठरला असता. पण सद्गुरूंची महिमा वर्णन करावी तेवढी थोडीच! त्या वेळेस श्री. अण्णा विलेपार्ल्यास आपल्या मित्रमंडळीकडे राहात होते. श्री. आण्णांच्या उतरत्या वयाचा विचार केल्यावर (वर्षे ८३) संशोधनासारखें जिकरीचें व त्रासाचें काम करण्यास त्यांना विनंती तरी कोणत्या तोंडानें करावी, म्हणून माझें मन कचरत होतें. परंतु कोणत्या तरी अनामिक, अबोध व गूढशक्तीनें व श्री. शंकररावांच्या सूचनेनें मला विलेपार्ल्याला त्यांच्याकडे ओढून नेलें– आणि काय सांगावें! अण्णांनी तें कार्य मोठ्या आनंदानें हातीं घेतलें. इतकेंच नव्हें, तर आपल्या वृद्धत्वाचा व प्रकृतीचाही विचार न करितां दिवसांतले कर्मीत कर्मी ४-५ तास या ग्रंथाच्या संशोधनांत घालविले, व अवघ्या एक वर्षाच्या आंत हें काम पूर्ण होऊन जेव्हां तें छापखान्याकडे र वाना झालें, त्यावेळी माझें अंतःकरण, त्यांच्याबद्दलच्या आदरानें व पूज्यभावनेनें भरून आलें. माझ्या पित्यासमान असलेल्या श्री. अण्णांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. मानवी शब्द त्याला अपुरेच पडतील. श्री. रा.ह.भ.प. मरबळ्ळी यांची तर मी अत्यंत आभारी आहे.

संशोधनासारखें किचकट कार्य चाललें होते, त्यावेळीं या सद्गृहस्थांनीं स्वयंप्रेरणेनें अण्णांना अतिपरिश्रमपूर्वक मदत केली. नंतर ते साडेतीन महिने याच कार्यासाठी, अण्णांकडे माशेलला (गोव्यांत) जाऊन राहिले. त्यावेळी, त्यांनी स्वतःच्या प्रापंचिक अडचणींकडे दुर्लक्ष केलें, आर्थिक अडचणींनाही जुमानलें नाहीं, व शेवटी हा ग्रंथ छापखान्यापर्यंत पोंचविण्याचें कार्य देखील त्यांनी मनावर घेऊन केलें, याबद्दल मी त्यांची फार आभारी आहें.

संशोधनाचें कार्य पूर्ण झालें होतें, व हा ग्रंथ छापून प्रसिद्धीस आणण्याची श्री. मरबळ्ळींना व त्यांच्या इतर सहकाऱ्यांना फार उत्सुकता वाटत होती. पण तें शिरावर घेऊन आर्थिक सहाय करण्याची जरूर होती. त्यावेळीं ह.भ.प. एच. शंकरराव पुढें सरसावले व त्यांनीं अगदीं प्रेमपूर्वक या कार्यास हातभार लावून तो छापून प्रसिद्धीस आणला त्याबद्दल त्यांची मी अत्यंत आभारी आहें. निर्णयसागर छापखान्याचे गुरुप्रेमी व्यवस्थापक व त्यांचे इतर सहकारी यांनी हा ग्रंथ अल्पावधीतच शक्य तितका सुबक बनवून तो वाचकांपुढें आणला याबद्दल मी त्यांचेही आभार मानतें.

प्रुफें तपासण्याचें अवघड काम दिलेल्या मुदतींत करून देणारा न मिळाल्यामुळें, तें काम श्री. पांडुरंगराव मरबळ्ळी व त्यांच्या पत्नी सौ. रुक्मिणीबाई यांनी स्वतः मेहनत घेऊन केलें आहें. मराठी त्यांची मातृभाषा नसल्यानें कांही चुका राहण्याचा संभव आहे. परंतु वाचकवर्ग त्या सुधारून घेतील अशी मी आशा करितें. तद्वत् त्या चुका प्रकाशकांच्या नजरेस आणल्यास पुढील आवृत्तींत दुरुस्ती करण्यास सुलभ पडेल.श्री. शांताराम नागरकट्टी, श्री शंकरराव उभयकर इत्यादी गुरुप्रेमी मंडळींनीही या कार्याला उत्तम हातभार लावला याबद्दल या मंडळींचे मी अत्यंत आभार मानतें.

हा ग्रंथ प्रासादिक आहे हें मीं पूर्वी सांगितलेच आहे. नाहींतर मी पामर काय लिहिणार! सद्गुरूंचे वर्णन करतांना वेद-श्रुतींची वाणीही अडखळते. बृहस्पतींना शब्द सुचत नाहींत, तिकडे माझ्यासारखी अल्पमती पामर काय लिहिणार! हा ग्रंथ माझ्या हातून लिहिला गेला तो केवळ गुरुप्रेरणेनेंच!

''यांत माझें कांहीं नाहीं। गुरुनाथांचीच प्रेरणा ही।
ते जैसें वदवितील कांहीं। तैसें तें पाहीं मी वदें॥१॥''

या ग्रंथांत जें कांहीं लिहिलें आहे तें माझ्या गुरुंचें वाक्य आहे. त्यांचा प्रसाद मी तुमच्यापुढें ठेविला आहे. हा प्रासादिक ग्रंथ केव्हां व कसा लिहिला त्याचा इतिहास थोडक्यांत देत आहे.

आजपर्यंत सद्गुरूभक्तांनी आपापल्या इच्छेप्रमाणे आपापल्या गुरूंची चरित्रें लिहिलीं आहेत. श्रीगाणगापुरनिवासी श्रीसद्गुरु श्रीनृसिंहसरस्वतीमहाराज यांचे चरित्र ''गुरुचरित्र'' या नांवानें प्रसिद्ध आहे, तें आबालवृद्धांच्या परिचयाचें आहे. पण आतापर्यंत आमच्या श्रीचित्रापुरगुरुपरंपरेचें चरित्र कुणीं लिहिलें नव्हतें. परंतु कांही वर्षांमागे श्रीसद्गुरुप्रेमी चंदावर वेंकटराव (कोवळ्ळी वेंकटराव) यांनी या परंपरेचें लहानसें गद्य चरित्र कानडी भाषेंत लिहिलें होतें.

तें पाहून माझी आई म्हणाली, ''हे कानडी कांही मला वाचतां येत नाहीं. मराठींत असतें तर मीं तें रोज वाचलें असतें.'' तें ऐकून माझे बंधु श्री. रा. अण्णाजी मंगेश भट हे म्हणाले, ''उमा, तूं कां मराठींत हें चरित्र लिहित नाहींस? ओंवीबद्ध चरित्र लिहिण्याचा तूं प्रयत्न कर. मग आईला तें वाचतां येईल, व तिच्या मनाला शांति लाभेल.'' मीं म्हटलें, ''छे! मला कुठलें येणार लिहायला! मी अशिक्षित, मला इतकें लिहायची कुठली बुद्धि!'' आमच्या बंधुराजांनीं 'शुभस्य शीघ्रं' या म्हणीनुसार लगेच कागद शाई लेखणी वगैरे साहित्य आणून दिलें व म्हणाले ''श्रीगुरूच तुझ्याकडून लिहून घेतील.तूं लिहायला सुरुवात तरी कर.''जणूं सद्गुरूच त्यांच्या जिभेवर बसून हें वदवीत होते, आणि त्याच दिवशीं सुवर्णमुहूर्तावर या ग्रंथाचा पहिला अध्याय लिहिण्यास घेतला. तीन दिवसांत हा अध्याय पूर्ण झाला. त्याच वेळीं सुदैवानें श्रीसद्गुरु आनंदाश्रम हे धारवाडला आले होते. त्यांच्या हातीं हा प्रथम अध्याय ठेवला. त्यांनी तो पाहून प्रसाद म्हणून परत माझ्या हातीं दिला. त्यानंतर वेळोवेळीं माझे सद्गुरु, श्रीपांडुरंगाश्रम, श्रीआनंदाश्रम आणि श्रीशिवानंदतीर्थ, यांनी मला अंतःस्फूर्ति देऊन माझ्याकरवीं हा ग्रंथ पुरा करविला.

पारमार्थिक दृष्ट्या 'स्त्री-पुरुष' हा भेद असूं शकत नाहीं, म्हणून'गुरुदासें' असा पुल्लिंगी ग्रंथ लिहिला आहे. परंतु व्यवहारांत आपण तो भेद मानतोंच. आपले धर्मगुरु परिपूर्ण ज्ञानी आहेत, परंतु सामाजिक प्रतिबंध त्यांना स्त्रीसंभाषण

वर्ज्य करावयास लावतात. साहजिकच स्त्रियांना वाटतें कीं, आपण गुरुप्रेमास मुकतों आहोत. आणि त्या अन्य सत्पुरुषांस शरण जाऊन आपलें पारमार्थिक कल्याण करून घेण्याचा प्रयत्न करितात. वास्तविक पाहतां गुरुप्रेमास आपल्या स्त्रिया मुकल्या नाहींत, आणि कुठेंही जाऊन अनुग्रह घेतला तरी आपल्या स्वामींचे कृपाछत्र त्यांच्यावर असतेंच. म्हणून आपले स्वामी आणि सद्गुरु एकरूपच आहेत अशी भावना साहजिकच होते. धर्मगुरूंच्या कृपेनें मोक्षगुरु लाभतो. आपले स्वामी बाह्यात्कारी स्त्रियांशी बोलत नसले, तरी हृदयांत ते त्यांच्याशीं बोलतात. त्यांचे प्रेमच त्यांना तारतें. आपली भक्ती जर दृढतर असेल तर स्त्रियांना स्वामीमहाराजांकडे न बोलतां सुद्धां, त्यांच्याकडून जप घेतल्यानेंच, आत्मज्ञान मिळूं शकतें. दृढतर भक्ति असेल तर स्वामी, आपल्या हृदयांतच प्रगट होऊन, आपल्याला आत्मज्ञानाचा उपदेश करतात, हें अक्षरशः खरें आहे. आज आपली श्रीआनंदाश्रम माऊली म्हणजे केवळ परब्रह्माची, आनंदाची मूर्तीच आहे. त्यांच्या सांनिध्यांत सुवास भरला आहे. फुलांच्या सांनिध्यांत सुवास भरलेला आहे. तें फूल ज्याच्या डोक्यांत अगर हातांत आहे त्याला मात्र सुवास देतें, आणि त्याच्याजवळील अन्य लोकांना तें सुवास देत नाहीं काय? तद्वत स्वामीमहाराज ज्यांच्याशीं बोलतात त्यांना मात्र स्वस्वरूपाचा आनंद देतात, आणि अन्यांना तो मिळत नाहीं असें कधींही झालें नाहीं. पण अज्ञानामुळें आम्हांला तसें वाटतें. एके काळीं माझी सुद्धां तशीच समजूत होती.

म्हणूनच मींही स्वामींकडे जप घेतला असूनही (१९१९ सालांत) त्यांच्याविषयीं पूज्यबुद्धी गुरूप्रेम असें असूनही वर लिहिल्याप्रमाणें मनाला तळमळ लागली, आणि ३-४ वर्षांपासून श्रीशिवानंदमहाराजांच्या दर्शनाची व उपदेशाची उत्कंठा लागलीहोती. ती स्वामींकडे जप घेतल्यापासून ६महिन्यांनीच पूर्ण होऊन शिवानंदमहाराजांचे दर्शन त्यांच्याच कृपेंनें झालें, व अनुग्रह झाला. म्हणूनच स्वामी आणि महाराज हे माझे दोन डोळे असेंच मला वाटतें. दोन्ही एकरूपच आहेत.

या ग्रंथांत जें काहीं चांगलें आहे ते सर्व श्रीसद्गुरूमहाराजांच्या कृपेंचें फळ होय. शेष राहिलेल्याची जबाबदारी माझी, म्हणून 'हंसक्षीर' न्यायानें वाचकांनीं त्याच फायदा घ्यावा ही नम्र विनंती.

शेवटीं माझ्या पूज्य आईवडिलांच्या चरणीं व सद्गुरूंच्या चरणारविंदी मस्तक ठेवून, हे आरंभीचे चार शब्द मी पुरे करितें.

उमाबाई आरूर

धारवाड, १-२-१९५५

अध्यायानुसार विषयानुक्रम

अध्याय	विषय	ओंव्या	पृष्ठ
	प्रथम खण्डः		
१.	मंगलाचरण-सर्व आश्रमांसी वंदन, आणि आमुचे कुलदेव मिळोन सद्गुरुस्मरण. इतर ग्रंथ सुंदर असतां किमर्थ हा	१३७	०१
२.	नगर-संस्थानी, आमुच्या जनांसी सद्गुरु नसे म्हणोनि राजा क्षोभला; तेव्हां भक्तांनी प्रार्थिला महाबळेश्वर	१०६	१२
३.	ईश्वर-पार्वती संवाद होऊनि, शंकर धांवला धरणीं, येथें राम-कृष्ण आले कोठून? तरी हें वर्णन उत्कृष्ट, परि ग्रंथांपरी न होय, कां हे ऐसा संशय येत.	८५	२०
	प्रथम धर्मगुरु- श्रीपरिज्ञानाश्रम		
४.	महादेव, परिज्ञानाश्रम घेऊनि नांव, सद्गुरु आला; नगर संस्थांनीं प्रयाण करी.	११५	२७
५.	शृंगेरी प्रयाण; देवीचे तेज घे आकर्षोन; शृंगेरीस्वामी तेज घे मागोन, आणि संमतिपत्र देती. स्वामींचे हृदय शांत, तरी आली कैसी खिन्नता तेथ? काय अधर्म जाहला?	८१	३६
६.	शंकराश्रमांसी शिष्य करोनियां, स्वधर्म स्थापुनी उद्धरिलें जनांसी; बांधला मठ गोकर्णीं.	१०९	४५
७.	निजभक्तांसी बोध करोन घेतली समाधी परिज्ञानाश्रमांनी, गुरुभक्तांसी ठाव तो कैसा? मठ हा होय कैसें बंधन?	१०९	५२
	द्वितीय धर्मगुरु - श्रीशंकराश्रम		
८.	बंकीकोड्ल- ग्रामीं जावोनि, दिधलें दर्शन भक्तांलागोनि. विचारें कवणाचा शिरच्छेद करावा? पात्र कैसें व्हावें कृपेसीं?	१०३	६१
९.	केला बोध जो आधीं होता निंदक बद्ध. दरिद्रिया केला श्रीमंत.	११२	६९
१०.	स्वामी जाती आनंदे समाधि-शेजीं चित्रापूर ग्रामांत भटकळ ग्रामीं दुर्लक्ष होतां खिन्न जाहले कां? भटकळ जनांकारण इतुका क्षोभ कासया?	१०५	७८
११.	समाधिवरती मृत्तिकालिंग स्थापिती; तें भंग कराया अधिकारी प्रयत्न करिती; ते नाही विरघळलें; रक्त ओकूनियां ते मेलें, आधींच शिष्यस्वीकार कां न केला? प्रेमा कैसा आणावा? न कळतांचि करुनी श्रवण, काय त्याचें प्रयोजन?	११०	८६
	तृतीय धर्मगुरु - श्रीपरिज्ञानाश्रम		
१२.	परिज्ञानाश्रम तृतीय स्वामी झाले. सावकारकांतेसी वांचविले.	१०७	९५
१३.	लक्ष्मणनामें अभक्तासी भेट होतां प्रेम उपजे मानसीं, शरण गेला गुरुचरणासी. देवासी होय कीं चिंता आमुच्या प्रपंचासाठी? आणि सुखदुःख तत्त्वतः त्यासी बाधे का? जरी ना गेला अनन्य शरण, कां न उद्धरावे त्यालागून? त्यागितां सारे विषय, देह अशक्त न होय?	११०	१०४
१४.	जनांसी करितां बोध उत्तम, करोनि शिष्यस्वीकार, निजधाम गांठिती. आमुचा प्रपंच सद्गुरुलागोन पुसावा कीं?	९९	११३
	चतुर्थ धर्मगुरु - श्रीशंकराश्रम		

अध्याय	विषय	ओंव्या	पृष्ठ
१५.	अनुष्ठानसमयीं शंकराश्रम दंडावरी ज्वर ठेविती. उत्तम बोध करिती. शिष्य-स्वीकार. ज्वर कां न ठेवीत दंडावरीच सर्वदा?	९४	१२१
१६.	वडे न भाजती विस्तव असोन, स्वामींस पेज न वाढिल्याकारण. केशवाश्रम-गुरुंचा अपराध कां न, त्यांच्याची आज्ञेवरूनी पेज नाहीं केली ती?	७९	१२८
१७.	पेज न वाढिल्याकारणें भक्तांनी क्षमा मागितली; बोधुनी केलें समाधान स्वामींनी. सद्गुरुंसी द्यावें काय? हृदयीं मूर्ति कैसी येईल विषयचि गोड वाटती त्या?	११३	१३४
१८.	नरसोबावाडीच्या पुजाऱ्यासी स्वप्न झालें मी असें मल्लापुरासी; जातां तेथें तुज आणि तव पुत्रासी बरें होईल वदती. येथें रहस्य काय घ्यावें?	८१	१४३
१९.	मल्लापूर-समाधि उघडिती, बिल्वदळें ताजींच तेथें दिसती. पांडुरंगाश्रम कुमठ्यांत घंटा घेती स्वप्नापरी. सद्गुरुचि कां व्यापक? वाचितां पुस्तकें सर्वही ज्ञान येईल, कासया सद्गुरु आम्हां?	८०	१५०
	पंचम धर्मगुरु - श्रीकेशवाश्रम		
२०.	सात वरुषांचे एक बाळ वाचा नसतां करी तळमळ, त्यासी दिधली वाचा केशवाश्रमें. जरी सद्गुरुमहिमा आहे पूर्ण, तरी भक्तांवरी कासया येती संकटे?	११६	१५७
२१.	स्वप्नीं तेल चोळूनि, केला एक गरीब भक्त बरा. काय कसासी लाविला? शिष्य-स्वीकार	१०४	१६६
	षष्ठ धर्मगुरु - श्रीवामनाश्रम		
२२.	कृष्णाश्रममूर्ति श्रेष्ठे ऐसें बालपणीं कथिलें भविष्य; वामनाश्रम स्वामींनी शिष्य-पाट दिधला. सद्गुरुमाय कनवाळू हें कैसें? बालवयांतचि जनांचे रक्षण करावें, ऐसे त्यांसी कोठून उपजे ज्ञान इतुकें?	८४	१७५
२३.	वामनाश्रमगुरुंनी समाधि घेतली देवीस प्रार्थुनी. श्रीस्वामी आनंदधाम, हें कां न कळे भजतां सकाम? ते कासया क्षोभले, देवीकडे बोलिले नेईं त्वरेनें म्हणोनी?	८१	१८२
२४.	रामराव लाभादाय, खटला होतां वाटलें त्या भय, गुरुमाय पावली त्यास. जरी घेतली त्यांनी समाधि, कृपा त्यांची नच जाय कैसें? सद्गुरुंसी आम्हांसी भेद काय? मठ स्थापन कां केला?	१०५	१८८
	सप्तम धर्मगुरु -श्रीकृष्णाश्रम		
२५.	मुल्कीग्रामीं देऊळ बांधाया, कृष्णाश्रमांसी घालावया पाया बोलाविलें; तेव्हा बोधिलें जनांस. काही जरी न केलें आपण, तरी कैसे होईल संरक्षण?	८६	१९७
२६.	नागरकट्टी दुर्गप्पय्यालागून दिधली सप्तशती कराया पारायण, झालें कल्याण त्यांचे. सद्गुरुचें मन निष्ठुर आहे का? भावना-प्रारब्ध एकवटतां गुरुकृपा होण्यांत त्यांचे महत्त्व काय? मोक्ष प्रयत्नानें मिळतो किंवा गुरुकृपेनें? भावना धरितां सद्गुरुकृपा न होय भक्ता?	१०१	२०४
२७.	पांडुरंगाश्रम शिष्य झाले, कंठी पाहिजे म्हणोनि बैसले, शिष्याचे लाड पुरविले. शिष्याचा स्वभाव हट्टी होता का?	१००	२१२
२८.	पांडुरंगाश्रम-शिष्यप्रेमास्तव ठेविला चैत्रमांसीं रथोत्सव. जगासी कैंचा शिकविला स्वधर्म? उत्तमासी शिकविती, अधमासी कां नाही?	९६	२२०

अध्याय	विषय	ओंव्या	पृष्ठ
	रथोत्सवाकरितां आग्रह धरण्यांत जगाचा काय उद्धार? हल्ली कां उत्सव टाकिला काढोन?		
२९.	बाजारकारीं केली निंदा, बाजारा अग्नि लागला, शांत होय शरण जातां गुरुपदां, कासया लागला अग्नि? शिष्यस्वामींना शेवटला उपदेश कृष्णाश्रम समाधि	९५	२२८
	अष्टम धर्मगुरु- श्रीपांडुरंगाश्रम		
३०.	एक एक अक्षरेंकरोन स्तुति, श्रीपांडुरंगाश्रम यांचा अवतार, केल्या सगुणलीला अपार, गुरुआज्ञेपरी वर्तले निरंतर.	१०३	२३७
३१.	स्वामींचे वाक्य सत्य होय शीघ्र. शिराली खेडें केले शहर केवळ लोकहितासी.	१०९	२४६
३२.	बैंदूर मंगेश यावरी द्वेषें खटला केला, श्रीस्वामींच्या कृपाकटाक्षें पार पडला.	११२	२५४
३३.	हासगणी कुळकर्णी हिंडला साऱ्या क्षेत्रस्थानीं, समाधान न मिळे, मग स्वामींनी भेट देऊनि उद्धरिला.	१३१	२६३
३४.	सावकार-सुता जगविलें, बोध केला. गुरुसी भेटती बहुत जन, उपदेश घेती त्यांकडोन, परी कां न फिटे अज्ञान?	११७	२७३
३५.	गणपत रामजी माने यांची नोकरी गेली, स्वामींसी प्रार्थितां मिळाली.	१०८	२८२
३६.	गोकर्ण शंकर यांसी आपण उपदेश न देतां, अन्यांच्या जपें मुक्त केला. वाक्यमहिमा. ज्ञानियां कां ना पापपुण्य, जरी केलें यथेष्टाचरण तरीही पाप ना कैसें?	८८	२९०
३७.	मंगेश भट्ट यांची कन्या इजसी सन्निपात झाला, हटेना, गुरुवाक्यें काढा पाजितां जगली. त्यांचे वाक्य इतुकें कासया श्रेष्ठ? जावें जरी गुरुसी शरण, तरी अणुमात्र चुकतां, गति कठीण होईल ना? हातीं काम मनीं राम.....	११३	२९७
३८.	कुंदापुरींचा सावकार कामत त्यावरी मिठाचा आरोप येत, स्वामींसी शरण जातां रक्षिलें त्या. जरी प्रारब्धें मिळे, तरी गुरुकृपा काय कारण? सद्गुरु हा ईश्वर असतां, त्यावरी आणिक ईश्वर कवण प्रारब्ध- रचिता? ज्ञानी हानी न करी प्रारब्धाची, काय कारणे?	१३३	३०६
३९.	दुमाप्पशेट्टीचा हरिला अभिमान, पुनरपि घोडा गेला घेऊन शरण जाऊन स्वामींसी. गर्व कां हरण केला? प्रसाद केवळ प्रेममय कैसें?	११०	३१६
४०.	अल्लीशा नामें यवन, त्यावरी आलें संकट दारुण, रक्षिला त्याचा भाव बघोन. प्रेम स्वरूप आपुलें कैसें?	१६२	३२५
४१.	अल्लीशावरी पुनरपि संकट ओढवता, रक्षी सद्गुरुनाथा तोचि अंती स्वामींसी स्मरत प्राण सोडी. बघतांचि मूर्ति प्रेमळ, उपजे प्रेम अंतरी, काय कारण?	८४	३३७
४२.	श्रीस्वामींच्या आशीर्वचनें, राधा राहिली सौभाग्यानें, अभक्तासी दत्तदरुशनें ओढिला प्रेमबळें. मन हें विषयींरत, तेव्हां कैंचें नाम येत मनीं?	१४५	३४४
४३.	स्वामी-पांडुरंगाश्रम झाले क्षीण, शिष्य-स्वीकारा प्रार्थिती जन, सद्गुरु म्हणती न करूं आपण. स्वधर्मे	१५१	३५५

अध्याय	विषय	ओंव्या	पृष्ठ
	वागतां हित तें कवण? परधर्म हा क्लेशकारक कैसें? शिष्य स्वीकाराविषयीं स्वामी निष्ठुर कां दिसले? अन्नाची उपमा सद्गुरुलागून कैसी शोभे?		
४४.	सद्गुरुस्वामींसी दृष्टांत होता, शिष्य स्वीकारसिद्धता 'करा वेगेंसी', ऐसें आज्ञापिलें. सद्गुरुवांचोनि अन्य नसतां, प्रेम कैंचें उद्भवे तें?	१०४	३६७
४५.	शिष्य-स्वीकार केला त्वरें, आनंदाश्रम नाम ठेविलें.	२२२	३७५

अध्याय	विषय	ओंव्या	पृष्ठ
	स्वर्गाचे देव दिसती कां आम्हांसी? बांधोनि ठेविला दंड घट्ट, दोरा तुटला तत्काळ, यांत आश्चर्य आहे तें कवण? गुरुस्वामींचा शिष्यस्वामींना आशीर्वाद. गुरुवरें घेतली समाधि. कासया त्यांसी इतुके कष्ट? काय केले जनकल्याण? कासया त्यांसी अनुष्ठान जे असती ब्रह्मज्ञानी पूर्ण? कर्तव्य ही व्याधि कैसी? गुणदोषातील माउली कैसे?		

अध्याय	विषय	ओंव्या	पृष्ठ
	द्वितीय खण्डः		
	नवम धर्मगुरु- श्रीमदानंदाश्रम		
४६.	एक एक अक्षरेंकरोन स्तुति. जर्गी स्वधर्म रक्षायाकारण अवतार घेई रमारमण.	१०९	३९५
४७.	आनंदाश्रम नाम घेऊनि लीला दावियली. जन्मा येतांचि ब्रह्मज्ञान प्राप्त झालें तयां कोठून, ब्रह्मतेज कैंचें ते? ''हा घोडा नाहीं कधींही देखिला'' काय यामाजीं चतुरता? कैसी घडे हिंसा अधर्में?	१३६	४०५
४८.	बहुत श्रमें विद्याभ्यास केला. खरे साधु कैसे असती? कल्पना नसतां कैसा घडे व्यापार?	८९	४१६
४९.	एकान्तवास करावा म्हणोन जाती स्वामी ग्राम सोडोन; प्रार्थुनी आणिती भक्तजन. गुरुकृपा झालियावांचुनी एकरूपभाव ये कैसा? कासया होय मठाचें बंधन? स्वामींसी इतुके कासया दुःख होय?	१९९	४२३
५०.	हरिद्वार-हृषीकेशादि क्षेत्रयात्रा करिती; कृष्णाचार्य स्वामींकडोनि केलें श्रवण. कल्पना म्हणजे मिथ्या सारी, ती सद्गुरु कैसेनि?	१३७	४३८
५१.	गुलवाडी अंबाबाईसी पांडुरंगाश्रम-आनंदाश्रम स्वप्नीं भेटलें, एकरूपचि आपण ऐसें दाविलें. स्वामींसी नसे इच्छा, तरी कासया मठाची चिंता? अवतारिक, तरी त्यासी कैंचें असाध्य म्हणोन पैसा गोळा करावा? पांडुरंगाश्रम स्वामी कडक होते, अपराध होतां क्षोभती. तरी ते अज्ञचि कीं काय? रथोत्सव रहित केला, काय कारण? ठरविला साधन-सप्ताह.	१६१	४४९
५२.	तोंबत बंधुद्वय यांना अनुताप झाला ऐकतां प्रवचना, शरण गेले सद्गुरु-चरणा. कासया जन परमार्थहीन जर्गी? प्रवचन ऐकती जर्गी अनेक जन, सकलांचेही पूर्ण मन कां न लागे परमार्थी? शांतता जनांच्या अंतरी कैसी येई?	११२	४६२
५३.	नारायण शूद्र भक्त खटल्यांतुनी केला मुक्त. सुब्राय भटजी यांप्रत भक्ति उपजली. सद्गुरुचि सर्वां अधिष्ठान, त्याची सत्ता सकलां कारण, हे कैसें ओळखावे? गुरुवरा भजाया मन उत्सुक व्हावया काय उपाय? सद्गुरुसहवास करितां सहजचि येती सद्विचार कैसें?	११४	४७१
५४.	मठ स्वामी आमुच्यास्तव, म्हणोनि वर्गणी द्यावी जनांनीं सर्व. स्वामींनी त्रयोदश वरुषांपासून बहुत कष्ट सोशिले. ते कोणते? संसाररूप नदी तरोनि जावया करावें? सत्कर्में कैसेनि स्वधर्म होय? सरकार सकलही न देती कर. वर्गणी सकलांनी कां द्यावी? वर्गणी दिल्यानें काय होय आमुचें कल्याण? उत्सव-अभिषेकांत पुण्य काय? सद्गुरु आले भूतळीं, तरी आम्हीं करावें काय?	१५२	४८०
५५.	गुरुदासाचे सद्गुरु शिवानंदतीर्थ, यांचे सद्गुण; अवतरले ते साक्षात दत्त. मोक्षगुरु आणि धर्मगुरु एकरूप असती. आमुचे जातीचे स्वामी असोन, कां जावें अन्य स्थळीं आत्मज्ञानासाठीं आपण?	१७८	४९२

अध्याय	विषय	ओंव्या	पृष्ठ
५६.	एक एक अक्षरेंकरोन स्तुति. नऊ आश्रमांसी नमन. सद्गुरुंनी जनांचा काय उद्धार केला असे? भटजी कासया ठेविले? भटजींचे वर्णन. श्रीस्वामींचि आम्हां रक्षिती कैसे? साधन-सप्ताहसमयीं रक्षिले जन.	१७४	५०६
५७.	गुरुदासाची माता सौभाग्यें निवर्तली स्वामींच्या आशीर्वादे, सकल अध्यायाचें सार. फलश्रुती. सप्ताह करणें कवणे रीती? पुण्यप्राप्ति कासयानें होय? गुरुनाथें वदविलें समस्त कैसे?	१४७	५२२
	दशम धर्मगुरु श्रीमत् परिज्ञानाश्रम		
५८.	रेखाटले परिज्ञाश्रम जन्मचरित्र. जन्मस्थान शिराली तीर्थक्षेत्र चित्रापुर सारस्वतांचे.	१८५	५३५
५९.	कथिले शिष्य-स्वीकार भले परिज्ञानाश्रम नाम दिधले, स्वामी आनंदाश्रमांनी.	१८३	५४८
६०.	संपूर्ण गुरुतत्वाचे केले वर्णन. सद्गुरु महिमा वर्णिला संपूर्ण. समाधिस्थ होती स्वामी आनंदाश्रम.	१४६	५६२
६१.	वर्णिला पट्टाभिषेक सोहळा. स्वामींचा कार्याविषयी सगळा कथिला वृत्तान्त.	१५५	५७४
६२.	स्वामी परिज्ञानाश्रम करिती पर्यटन. भक्तांसी धर्मसार उपदेश केला भक्तोद्धार.	१५७	५८७
६३.	स्वामी परिज्ञानाश्रम महानिर्वाण वार्ता. देवी प्राणप्रतिष्ठा जाहला कार्ला ग्रामांतरी.	१२२	६००
	एकादश धर्मगुरु श्रीमत् सद्योजात शंकराश्रम		
६४.	स्वामी सद्योजातांची बाल्यावस्था, स्वामी परिज्ञानाश्रम भेटीची वार्ता, स्वामी ईश्वरानंदगिरींची प्रत्यक्ष भेट	१५३	६११
६५.	स्वामी सद्योजातांचे श्रीवल्लीसी आगमन, शृंगेरी मठाधिपतींची अनुमती, पट्टाभिषेक सोहळ्याचे वर्णन	११८	६२५
६६.	गुरुपद यात्रा	१५४	६३५
६७.	स्वामींच्या यात्रा विविध स्थळी, रामनगर येथील आशिर्वचन	१२९	६४९
६८.	स्वामींचे धार्मिक, सांस्कृतिक कार्य देवीपूजन, शिवमहात्म्यआशिर्वचन	१४१	६६०
६९.	स्वामींचे सामाजिक कार्य, तीर्थ- महिमा	१६४	६७३
७०.	गुरुपूजन विषयावरिल स्वामींचे आशिर्वचन	१३०	६८८
७१.	जप, तप,श्रीचक्र विषयांवरील स्वामींचे आशिर्वचन	९७	७००

श्रीगुरुपरंपरास्तोत्रम्

शिवं हरिं पद्मभुवं वसिष्ठं शक्तिं च तत्पुत्रपराशरं च।
व्यासं शुकं गौडपदं महान्तं गोविन्दयोगीन्द्रमथास्य शिष्यम्।।
श्रीशंङ्कराचार्यमथास्य पद्मपादं च हस्तामलकं च शिष्यम् ।
तं तोटकं वार्तिककारमन्यानस्मद्गुरून् सन्ततमानतोऽस्मि।।
दृग्दृश्यज्ञानशून्याय स्वप्रकाशस्वरूपिणे। चिन्मयानन्दरूपाय अच्युताश्रम ते नमः।।
तस्य पादाम्बुजे लीन आनन्दाश्रमयोगिराट्। तमहं सन्ततं वन्दे सच्चित्सुखमयं विभुम्।।
आनन्दाश्रमयोगीन्द्रपादपङ्कजषट्पदः। कैवल्याश्रमविख्यातस्तत्त्वज्ञाननिरूपकः।।
रक्तशुक्लपदद्वन्द्वं स्मृत्वा च गुरुपादुकाम्। ध्यानाद्ब्रह्ममयो जातो नृसिंहाश्रमदेशिकः।।
तत्पादाम्बुजभक्तिस्थः केशवाश्रमसंज्ञकः। तद्धस्तपद्मसञ्जातः सर्वागमविशारदः।।
वामनाश्रम इत्याख्यस्तदनन्तरतां गतः। करकञ्जात्तस्य जातः कृष्णाश्रम इतीरितः।।
पाण्डुरङ्गाश्रमाह्वोऽभूत्तस्मात्कृष्णकराम्बुजात्। परिज्ञानाश्रमगुरुं प्रणतोऽस्मि निरन्तरम्।।
त्वमेव सद्गुरुवरस्त्वमेव परमेश्वरः। त्वमेव सच्चिदानन्दस्त्वां विना नान्यथा गतिः।।
इत्थं यः पठते नित्यं गुरोर्नामावलिं पराम्। सायं प्रातर्मुहुर्भक्त्या स मुक्तो नात्र संशयः।।

।। ॐ तत्सत् ।।

भगवत्पाद श्रीमत् शंकराचार्य

अष्टमगुरु परमपूज्य श्रीमत् पांडुरंगाश्रम स्वामिजी

नवमगुरु परमपूज्य श्रीमत् आनंदाश्रम स्वामिजी

दशमगुरु परमपूज्य श्रीमत् परिज्ञानाश्रम (तृतीय) स्वामिजी

एकादशगुरु श्रीमत् सद्योजात् शंकराश्रम स्वामिजी

अथ श्रीचित्रापुरगुरुपरंपराचरित्र-प्रारंभः।

प्रथम-खण्डः।

ॐ

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर।
परिज्ञानाश्रम शंकर सद्गुरु।।
केशव वामन कृष्ण पांडुरंग।
आनंद परिज्ञानगुरु।।
सद्योजात शंकर सद्गुरु।।ॐ।।

।। श्रीगणेशाय नमः।। श्रीशारदांबायै नमः।। श्रीगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।। श्रीमत्परम-हंसश्रीपांडुरंगाश्रमस्वामीगुरुभ्यो नमः।। श्रीमत्परम-हंसश्रीआनंदाश्रमस्वामीगुरुभ्यो नमः।। श्रीमत्परम-हंसश्रीपद्मनाभतीर्थस्वामीगुरुभ्यो नमः।। श्रीमत्परम-हंसश्रीसच्चिदानंदस्वरूपश्रीशिवानंद-तीर्थस्वामीगुरुभ्यो नमः।। गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः। गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः।।ॐ।। जय जया जी श्रीगणनाथा। निरसे सकल भवभयचिंता। ऐकूनि तव गुणकीर्ति आतां। आलों ताता शरण मी।।१।। प्रथम करितों तुझें स्तवन। सकलही होऊनि विघ्ननिरसन। यश ये कार्या न लागतां क्षण। करितों वंदन तुज़लागीं।।२।। तुझें नाम गातां मन। होय उत्सुक कराया ध्यान। मग सत्वर समाधान। होय परिपूर्ण ज्ञान पैं।।३।। आतां करूं सरस्वतीवंदन। दुरितें सर्व ज़ाती पळून। आठवितां तुज़ आमुचें मन। होय तल्लीन चरणीं या।।४।। जय जय जय जय शारदादेवी। स्तवितों तुज़ला करितां ओवी। दिव्यमति देऊनि दावीं। सुपंथातें मज़लागीं।।५।। शुद्ध निर्विकल्प शांति। नाम घेवोनि 'सरस्वती'। प्रख्यात अससी तूं या जगतीं। देसी विद्या सकलांसी।।६।। संत-साधु-सद्गुरुस्वामी। 'ब्रह्मविद्या' या प्रसिद्ध नामीं। स्तविती तुज़ला ग्रामोग्रामीं। अतिउल्हासें दिनरजनीं।।७।। हे सरस्वति काश्मीरवासिनी। तूं सारस्वतांची अससी जननी। प्रसन्न हो या मंदमतीलागुनी। करीं सुमति माझी ही ।।८।। असो आतां सद्गुरुनाथा। नमन करूनि सुखवूं चित्ता। तूंचि सकल जगाची माता। निरसीं चिंता या समयीं।।९।। जय जय सद्गुरु करुणाकरु। तूंचि सर्वांसी आधारु। तुज़वांचोनि पैलपारु। नाहीं कोणी पावविता।।१०।। तुझी देवा महिमा अपार। नेणें मी तो अज्ञ पामर।

वर्णन कराया सविस्तर। मंदप्रज्ञ असें मी।।११।। कृपा करीं बालकावरी। भक्ति नाहीं मम अंतरीं।म्हणोनि नच मज़ धिक्कारीं। ऐसी प्रार्थना माझी ही।। १२।। तूंचि देऊनि स्फूर्ति मज़ला। मज़कडुनी करवीं ग्रंथाला। वंदन करितों तव पदाला। देवा समर्था गुरुराया।।१३।। असो आतां गोमांतक प्रांत सुंदर। सारस्वतांचे कुलदेव थोर। वसती तेथें साचार। आठवूं सकलां या समयीं।।१४।। जय जय शांतादुर्गादेवी। तव पद माझ्या मस्तकीं ठेवीं। वेगें मोक्षपदासी दावीं। आई माझ्या कुलदेवते।।१५।। तूं आलीस शोधावयासी। श्रीहरसांबसदाशिवासी। प्राप्त झालीस भक्तजनांसी। अपार महिमा तुझी गे।।१६।। 'शांतादुर्गा' घेऊनि नाम। प्रकटलीस गिरिजे पाहूनि प्रेम। भक्तजनांचा पुरविसी काम। कवळें- ग्रामीं राहोनि।।१७।। गोत्र कौशिक आणि भारद्वाज। तुझे भक्त होऊनि सहज़। सेवा करिती सोडूनि लाज़। करिती पूजा प्रेमानें।।१८।। महारुद्र नवचंडिका। हवन करितां सकल लोकां। इच्छित फळें देसी भाविकां। किती वानूं तव करणी।।१९।। तूंचि माझ्या जिव्हेवरी। बैसूनि वदवीं तुझी थोरी। कांहीं नेणे बाळ हा ज़री। देईं थारा तव पायीं।।२०।। नमितों आतां तव पदकमळां। क्षमुनी पदरीं घे तव बाळा। हेचि प्रार्थना करितों तुज़ला। शांत सगुणे वेल्हाळे।।२१।। असो आतां चित्रापुर सारस्वत-। कुलदेव आमुचे परम विख्यात। करोनि वंदन तयांप्रत। आठवूं चित्त स्थिर करोनि।।२२।। नमूं हा श्रीमंगेश सुखकर। देवी शांतादुर्गेचा भ्रतार। तोचि भक्तांसी आधार। विनवूं आतां त्या देवा।।२३।। जय जय जय जय श्रीमांगिरीशा। नमितों तुज़ला तोडीं पाशा। सोडूनि आलासी निज कैलासा। रुसुनी तूं अंबेवरी।।२४।। करोनि ढोंग भक्तकाज़ा। पळवुनी आणी संगें गिरिजा। प्रियोळ-ग्रामीं वास

समज़ा। करोनि सकलां तोषविसी।।२५।। वत्स आणि कौंडिण्य गोत्री। तुझे भक्त अहोरात्रीं। स्तविती तुज़ला सतत धरित्रीं। येती तुझिया दरुशना।।२६।। करिती लघुरुद्र-आवर्तन। महारुद्र त्रिदारीं अर्चन। कोणी करिती प्रेमें कीर्तन। काय वानूं तव महिमा।।२७।। कित्येक धरोनि हेतु मानसीं। पुसती लावोनि प्रसाद तुज़सी। उत्तर देसी त्यांच्या प्रश्नासी। सत्य होय सांगसी तें।।२८।। ऐसी तुझी महिमा ऐकुनी। प्रार्थना करितों तुज़लागुनी। भजनीं लावीं माझी वाणी। शिव-हर-शंकर-मंगेशा।।२९।। आतां नमूं महालक्ष्मी। बांदिवडें या सुंदर ग्रामीं। स्तवितों तुज़ला सेवक हा मी। करुणा करीं गे तूं आई।।३०।। जय जय महालक्ष्मी देवी। मंगीश शांतादुर्गा कुळावी। असती तुज़ला बहुत पालवी। सकलां रक्षीं शिशूपरी तूं।।३१।। पापी हीन दीन हा मी। देह झिज़विला नाहीं धर्मीं। विषयीं बुडालों सारा नेहमीं। जन्म वायां गेला हा।।३२।। अपराध सारे घालुनी पोटीं। सत्वर मज़ला देईं भेटी। ठेवूनि मज़वरी कृपादृष्टी। उद्धरीं माते करुणाळे।।३३।। आतां नमूं या महालसांबे। म्हाडदोळ बिदी अति शोभे। ऐशा स्थानीं राहोनि जगदंबे। वाट तूं पाहसी भक्तांची।।३४।। जय माते महालसादेवी। अससी तूं महालाघवी। जनीं घेउनी उत्तम पदवी। होसी प्रसन्न सकलांसी।।३५।। अत्रि-गोत्री असती भक्त। तुझिया संनिधीं येती सतत। त्यांवरी त्वां धरिला हस्त। कृपारूप वरद तो।।३६।। न कळे मज़ला कवन कराया। परि तूं देईं मज़सी अभया। क्षमा करूनि निजदासा या। देईं सद्भक्ति गुणसरिते।।३७।। आतां प्रार्थूं श्रीनागेशा। निजभक्तांच्या पुरवूनि आशा। सकलही ओढूनि तोडिसी क्लेशा। ऐशा तुज़ला नमन असो।।३८।। कांहीं भक्त सारस्वत। तुज़ला भज़ताति प्रख्यात। आतां धरूनि माझा हात। दावीं सुपंथ तूं

ताता।। ३९।। आतां नमूं लक्ष्मीनृसिंहा। वंदितों तुज़ला मी पहा। मज़ला देईं भक्ति महा। येतों शरण तुज़लागीं।।४०।। तुझी महिमा असे अपार। नच ज़ाणे हा अज्ञानी नर। तूंचि देऊनि बरवा विचार। सांभाळीं या निजबाळा।।४१।। कांहीं सारस्वत हे तुज़सी। भज़ती प्रेमानें दिवसनिशीं। इच्छित फलें तूं बा त्यांसी। देसी झडकरी तूं देवा।।४२।। ऐसा तूं परम कृपाघन। तुज़ला भज़तां होय निरसन। द्वैतभाव सकलही ज़ाण। प्रल्हादापरी तयांचा।।४३।। जय लक्ष्मीनारायण देवा। वंदन करितों धरुनी भावा। देईं आतां निजपद-ठेवा। दीनदयाळा तूं ताता।।४४।। तुझें स्थानअंकोलेसी। आर्यादुर्गा-ज़वळी घेसी। कांहीं सारस्वत तुज़सी। भज़ती प्रेमें दिनरजनीं।।४५।। एवं सारस्वतांचे कुलदेव। सकल एकरूप स्वयमेव। भक्तां आवडे ज़ें ज़ें नांव। तें तें दिधलें त्यांनीं तुज़।।४६।। आतां आमुचे चरित्रनायक। सारस्वतांचे मुख्य सन्मार्गदर्शक। सांगती सकलां सद्विवेक। म्हणती त्यांसी 'धर्मगुरु'।।४७।। चित्रापुर-मठाधीश। नाहीं त्यांच्या अंगीं दोष। नऊ आश्रम ज़ाहले खास। जीवन्मुक्त सकलही।।४८।। ऐसी ही गुरुपरंपरा। यांचें नाम घेतांचि त्वरा। येईल स्फूर्ति लिहिण्या चरित्रा। सत्य सत्य त्रिवाचा।।४९।। असो आतां तयां आश्रमां। चित्तीं धरूनि निर्मल प्रेमा। वंदन स्तवन करूनि, कामा। ज़ाळूनि टाकूं निर्लोभें।।५०।। मग येईल सहज़ चित्तीं। सुंदर सुखकर सद्गुरुमूर्ति। कैसी वानूं आपुली कीर्ति। तूंचि शिकवीं दयाळा।।५१।। आद्य सद्गुरु प्रथम आश्रम। 'परिज्ञानाश्रम' धरोनि नाम। पुरवावयासी भक्तकाम। येईं धांवूनि लवलाहीं।।५२।। जय जय 'परिज्ञानाश्रम' स्वामी। वंदन करितों दृढभावें मी। धरिली इच्छा

अंतर्यामीं। ती तूं पुरवीं समज़ोनि।।५३।। धरोनि नाना अवतार। करिसी जनांचा उद्धार। कैलासवासी श्रीशंकर। येसी अवनीं तूं ताता।।५४।। आतां नमूं द्वितीय आश्रमा। धैर्य येईल स्तवनीं आम्हां। भक्तकामकल्पद्रुमा। नमो नमो गुरुनाथा।।५५।। जय जय देवा श्रीगुरुराया। 'शंकराश्रम' स्वामी सदया। वंदन करितों मी तव पायां। तारीं तारीं करुणाकरा ।।५६।। ध्यातां तुज़ला बा दिनरजनीं। अज्ञान सारें ज़ाय निपटोनी। वर्णाया ही माझी वाणी। न शके देवा खचित पैं।।५७।। तृतीय आश्रमा करितों नमन। आतां प्रेमभावें ज़ाण। नाम घेतां पाप दहन। होईल सारें निश्चयें।।५८।। जय जय जय जय करुणासिंधु। 'परिज्ञानाश्रम' आपत्-बंधु। तुज़वांचोनि कवणा वंदूं। ठायीं ठायीं तूंचि अससी।।५९।। परि हा बालक नेणे कांहीं। म्हणूनि बडबडे व्यर्थचि पाहीं। मातेलागीं वीट न येई। तैसी तूं मम माउली गे।।६०।। आतां करूं सत्वर नमन। चतुर्थ या आश्रमालागुन। धरोनि अंतरीं सद्गुरुवचन। करितों आतां वाक्सेवा।।६१।। जय जया जी सद्गुरुराजा। 'शंकराश्रमा' स्वामी माझ्या। सकल अपराध क्षमूनियां काज़ा। देईं यश तूं विनवितसें।।६२।। मज़ ना कांहीं भक्तिश्रद्धा। कैसा पोंचूं निज आनंदा। सदा करोनि प्रपंच-धंदा। श्रमलों आतां मज़ तारीं।।६३।। पंचम आश्रमा आतां वंदूं। सकल तोडिती भेदाभेदु। चित्तीं नुरवी अल्पही खेदु। ऐसा सद्गुरु सुखमूर्ती।।६४।। जय जय 'श्रीकेशवाश्रम' गुरवे। वंदन करितों तुज़ला भावें। देईं मातें सज्जन बरवे। भजन कराया सप्रेमें।।६५।। आतां नमूं षष्ठ आश्रमा। तुज़ला ध्याऊं कैसें आम्हां। न कळे, परि तूं शिकवूनि धर्मा। नेईं हळू हळू निजमार्गा।।६६।। जय जय स्वामी गुरुदेवा। 'वामनाश्रमा' या

जडजीवा। उद्धरीं आतां घेईं सेवा। दीन दुर्बल दासाची।।६७।। आतां करावा नमस्कार। सप्तम आश्रम महाथोर। करूं सर्वही जयजयकार। थै थै नाचूं आनंदें।।६८।। जय जय 'कृष्णाश्रम'-गुरुराया। लागे पाठीं दुस्तर माया। विषयानंदें फुले ही काया। रक्षीं रक्षीं दयाळा।।६९।। आतां नमूं अष्टमाश्रमा। बोलूं त्यांच्या सुंदर नामा। असे तयांचा अगाध महिमा। पुढती वर्णूं चरित्रीं।।७०।। जय जय जय जय श्रीगुरुनाथा। 'पांडुरंगाश्रमा' नमितों ताता। सकल जनांसी तुज़वीण त्राता। न दिसे कोणी या जगतीं।।७१।।श्रीदत्तात्रेय-अवतार। अससी तूं हा आमुचा निर्धार। धर्मजागृति दिधली साचार। निजभक्तांसी सप्रेमें।।७२।। बालपणीं मला झालें। तुझें दरुशन परम कृपाळे। परि मज़ आठवतें वेल्हाळे। शांत कांति ती मुखकमळीं।।७३।। ऐसा तूं देवाधिदेव।वदनीं तुझें वदतां नांव। दग्ध होय अहंभाव। खचित मज़ला वाटतें।।७४।। ज़े तुज़ला म्हणती नर। तयांसी होय नरक थोर। परि ऐकतां तुझें चरित्र। ज़ळती पापें सर्वही।।७५।। आतां नमूं या नवम आश्रमा। परिचय सकलां आहे आम्हां। युक्ति साधूनि लाविती धर्मा। सकल जनांसी प्रेमानें।।७६।। ऐसा हा नवम आश्रम। असे परम सुंदर सुगम। 'आनंदाश्रम' घेऊनि नाम। साक्षात् विष्णु अवतरला।।७७।। जयजयाजी सद्गुरुराया। आनंदाश्रम-स्वामीपायां। वंदन करितों दे मज़ अभया। क्षमूनि सर्व अपराध ।।७८।। त्वां केली भक्ति थोर। आपण तरूनि जनउद्धार। केला, झिज़वूनि काया समग्र। जनकल्याणा निर्लोभें।।७९।। ऐशा तुज़ला वारंवार। स्मरतां पळती पापें दूर। भेटतां येई सद्विचार। पूजितां होय निष्कामी।।८०।। देईं मज़ला आशीर्वचन। चरित्र कराया उत्सुक हें मन। कर्ता करविता

तूं एक ज़ाण। सद्गुरुराया दयाळा।। ८१।। नाहीं मज़ वक्तृत्वशक्ति मोठी। असती अंतरीं अपराध कोटी। परि तूं करूनि कृपादृष्टी। वदवीं तूंचि मज़कडुनी।।८२।। असो आतां नमूं भवानीशंकरा। चित्रापुरग्रामीं अससी प्रभुवरा। तारीं तारीं निजकिंकरा। धांव दयाळा लवलाहीं।।८३।। जय जय भवानीशंकरा। चुकवीं जन्ममरणाचा फेरा। घेईं पदरीं क्षमूनि पुत्रा। करितों नमन तुज़लागीं।।८४।। सारस्वत-चित्रापुरमठासी। तूंचि सर्वां अधिष्ठान होसी। समुद्रामाजीं लहरी ज़ैसी। तैसे आहों सकलही।।८५।। कित्येक कवि थोर थोर। करिती तुझें वर्णन अपार। तयांपुढें हा अज्ञ पामर। काय वर्णील तव महिमा।।८६।। आतां नमूंया दत्तात्रेय-अवधूत। श्रीसद्गुरूचें आराध्य दैवत। 'बाड' ग्रामीं राहे सतत। होय उद्धार जनांचा।।८७।। जय जय दत्तात्रेय देवा। देईं शाश्वत दृढतर भावा। दिव्य मति देऊनि घ्यावा। पदरीं आपुल्या हा दास।।८८।। तुझी कीर्ति महाथोर। अनसूया पतिव्रता सुंदर। कसासी लाविली येऊनि सत्वर। ज़ाहलासि बाळ तियेचा।।८९।। तूं काय बघसी कसोटी। नाहीं तुज़ला मत्सर पोटीं। वाढविण्या भक्तकीर्ति गोमटी। केलें ढोंग छळण्याचें।।९०।। कराया जनांचा उद्धार। आलासि निमित्त करोनि भूवर। तुझी महिमा असे अपार। असमर्थ मी वर्णाया।।९१।। देवा आतां परम कृपाळा। तुझें स्वरूप वेळोवेळां। दावीं दत्ता माझ्या डोळां। करीं खंडन द्वैताचें।।९२।। संसार दुस्तर लागला पाठीं। हेचि लागली चिंता मोठी। करोनियां कृपादृष्टी। तारीं तारीं निजदासा।। ९३।। आतां नमूं 'स्वयंप्रकाश'। माझा परात्पर गुरु जगदीश। काय वानूं करी विध्वंस। अज्ञानाचा क्षणमात्रें।।९४।। जय जय सद्गुरो स्वयंप्रकाशा। देईं तूंचि मज़ला मोक्षा। तेवींच

या निजदासा। दे वैराग्य-विवेकादि।।९५।। लक्ष चौऱ्यांशीं फिरूनि योनी। आलों नरजन्मासी अवनीं। परि वय दवडिलें मीं दिनरजनीं। विषयीं सारें व्यर्थचि।।९६।। तूंचि माझा करिसी सांभाळ। ऐसा निश्चय धरिला सबळ। तो तूं दृढतर करूनि सकळ। निवारीं संकट ही प्रार्थना।।९७।। आतां नमूं परमगुरूसी। 'पद्मनाभतीर्थ' स्वामीसी। महिमा अपार त्यांची मज़सी। अशक्य वर्णन करावया।।९८।। जय जय पद्मनाभतीर्था। करितों वंदन तुज़ला ताता। निरसीं माझी मोहममता। कृपा करोनि बा देवा।।९९।। तीव्र वैराग्य तुझें अमित। भलें सांगसी जना अद्वैत। तुझी कीर्ति परम विख्यात। न ज़ाणें मी अज्ञ असें।।१००।। द्वादशदिन तूं उभा राहसी। शिळेवरी तिष्ठत गुरुचरणापाशीं। शीत उष्ण साहुनी दिननिशीं। गुरुआज्ञेपरी बा।।१०१।। बालपणींच संन्यासग्रहण। करुनी केलें जनांसी पावन। देह झिज़विला भक्तांलागुन। अगणित उपकार तव देवा।।१०२।। साक्षात् दत्तात्रेय-अवतार। नसे संशय यांत अणुमात्र। नाहीं मज़ला तुझें चरित्र। विदित कांहीं देवा हो।।१०३।। मी असें एक पापी हीन। नाहीं झालें तव सत्य दर्शन। म्हणोनि मज़ला न कळे महिमान। कैसी वर्णावी तव लीला।।१०४।। आतां नमूंया आद्य सद्गुरु। 'शंकराचार्य' करुणासागरु। वैदिक मार्ग स्थापण्या सुंदरु। अवतरे तो महादेव।।१०५।। जया जया जी शंकराचार्या। नमितों तुज़ला श्रीगुरुवर्या। बोधूनि आपुल्या निजदासा या। पार करीं तूं झडकरीं।।१०६।। बघुनी जगतीं स्वेच्छाचरण। लगबगें येसी तूं धांवून। वेदधर्मस्थापना करून। केलें पावन भारतियां।।१०७।। तूंचि देवा 'शिवानंद'। नाम धरोनि परम सुखद। बघूनि आम्हां मतिमंद। येसी मागुती आतां तूं।।१०८।। ऐसा माझा

मोक्षदायक। श्रीशिवानंदतीर्थ सम्यक। स्वामी सद्गुरु तोचि एक। सकलार्थदाता ईश्वरु।।१०९।। असो आतां नमन स्तवन। त्या सद्गुरूचें करुनी स्मरण। पुढें आरंभूं चरित्र कथन। त्याच्याच कृपाप्रसादें।।११०।। जय जय स्वामी परमहंसा। शिवानंदतीर्था सद्गुरु-महेशा। भक्तजनांच्या संकटनाशा। अवतरसी तूं या जगतीं।।१११।। 'शिवानंदतीर्थ' धरोनि नांव। साक्षात् अवतरे महादेव। ऐसा तूं मम सद्गुरुराव। देईं ठाव तव पायीं।।११२।। करितों तुज़ला नमस्कार। सद्भावें प्रेमपुरःसर। तुज़वांचोनि कराया उद्धार। कोणी नाहीं मज़ ताता।।११३।। तूंचि सकल कार्या आधार। ऐसा असे बा निर्धार। ग्रंथारंभा येईल धीर। तुज़ आठवितां गुरुमाये।।११४।। निजभक्तांच्या कार्यालागीं। किती झिज़विला देह हा जगीं। कंठ शोषूनि बोधूनि सुमार्गीं। लाविलें सकळां प्रेमानें।।११५।। नाहीं अणुमात्र क्रोध अंगीं। करिसी भक्तांचें समाधान वेगीं। निंदक वंदक अथवा ढोंगी। सारे तुज़ला एकचि।।११६।। स्तवितां नाहीं मनासी हर्ष। निंदितां खेद नव्हे चित्तास। सर्वही आत्मरूपचि खास। पाहसी तूं निर्धारें।।११७।। नाहीं किंचित् तुज़ला आळस। पुराण प्रवचन रात्रंदिवस। सांगण्या मनासी अति हौस। किती कनवाळू तूं देवा।।११८।। राजा रंक सकळ जनांसी। शिशूपरी बघसी आपुल्या मानसीं। तव गुण वर्णाया मज़सी। योग्यता नाहीं गुरुराया।।११९।। मज़ला करोनि निमित्त। तूंचि वदविसी प्रेमळ ग्रंथ। परि अभिमान मानसीं गुप्त। धरितों व्यर्थ मी पाहीं।।१२०।। श्रीकृष्णानें द्वापारयुगीं। उचलिला गोवर्धन तो वेगीं। लावूनि वेळू म्हणती ढोंगी। आम्हीं उचलिला निजबळें।।१२१।। तैसा मी तव विसरूनि महिमा। मीचि कर्ता होऊनी कामा। सिद्ध ज़ाहलों, परि तूं आम्हां।

ज़ाऊं नेदीं कुपंथा।।१२२।। तूंचि देवा सकल कर्ता। करविता आणि ज्ञेय ज्ञाता। ज्ञान सर्वही एकचि ताता। मी तूं ऐसा भेद नाहीं।।१२३।। परि मज़ कांहीं नाहीं विदित। देहचि मी हा असे खचित। ऐसें म्हणे माझें चित्त। म्हणोनि अभिमानें हुंबरे।।१२४।। नाठवी ज़री तुज़लागोन। न कळे कांहीं कराया कवन। अनुभवसिद्ध असे हें वचन। नव्हे असत्य कदापि।।१२५।। असो आतां श्रीगुरुमाये। घडिघडीं स्मरतों तुज़ला पाहें। चरित्रारंभा धांवत ये ये। स्फूर्ति द्याया दयाळा।।१२६।। तूंचि देवा मज़ला ताता। पार घालीं सत्वरीं आतां। हेचि प्रार्थना सद्गुरुनाथा। चरणीं माथा ठेवितों।।१२७।। असो आतां श्रोतयां सकलां। भाविक सज्जन भक्तप्रेमळां। वंदन करितों आपुला चेला। चुकलों तरी मज़ सांभाळा।।१२८।। चित्रापुर-श्रीगुरुचरित्र। करूं कथन परम पवित्र। अवधारावें देऊनि श्रोत्र। चित्तीं धरूनि गुरुमूर्ति।।१२९।। नऊ आश्रम नवरत्न सोज्ज्वळ। किमपि नाहीं यांत बाष्कळ। त्यांचें ऐकतां चरित्र सकळ। पापें ज़ाती नासोनि।।१३०।। इंग्रजी कर्नाटकी फार। ग्रंथ एकाहूनि एक सुंदर। असतां किमर्थ हा म्हणाल तर। सांगतों कारण त्यांचें मी।।१३१।। इंग्रजी भाषेचा ज़ो ग्रंथ। असे चांगलाच तो खचित। परि उपयोगा नाहीं येत। भोळ्या भाबड्या स्त्रियांसी।।१३२।। आणिक कर्नाटक भाषेचें। पुस्तक ज़ाहलें असे साचें। तरी तें नित्य पारायणाचे। उपयोगा न ये पहा हो।।१३३।। असो आतां सकलां वंदन। करोनि पावलों समाधान। पुढील अध्यायीं निरूपण। आळविती सारस्वत शंकरासी।।१३४।। मग कळवळोनि त्रिनयन। अवतार घ्यावया ये धांवोन। ऐकतां पापें होती दहन। होउनी सावधान परिसावें।।१३५।। श्रीसद्गुरु-आनंदाश्रम। शिवानंदतीर्थ हे एकरूप

ब्रह्म। यांच्या कृपाप्रसादें प्रथम। अध्याय गुरुदासें संपविला।।१३६।। स्वस्ति श्रीचित्रापुर। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां पापें ज़ळती समग्र। प्रथमाध्याय रसाळ हा।१३७।।अध्याय।।१।। ओंव्या।।१३७।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति प्रथमोऽध्यायः समाप्तः।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकरसद्गुरु

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।।श्रीगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।। ॐ जय जय भवानीशंकरा सदया। सारे दुर्गुण नेसी तूं विलया। धांव झडकरी दे मज़ अभया। वदवीं चरित्र मज़कडुनी।।१।। बालकहस्त धरूनि जनक। लिहवी आपण स्वतः सुबक। तैसा तूं मज़कडूनि देख। लिहवीं ग्रंथ सकलही।।२।। येऊनि अवनीं जगदोद्धार। केला पाहूनि भक्तनिर्धार। आतां ऐका हो श्रोते चित्रापुर–। गुरुपरंपरा चरित्र हें।।३।। ऐकतां समूळ अज्ञान। क्षण न लागतां होय निरसन। परि दृढतर निश्चय पूर्ण। धरावा तुम्हीं निजमनीं।।४।। ज्याच्या अंतरीं दृढतर निश्चय। त्यासीच़ संकटीं तो प्रभुराय। रक्षी येऊनि करी निर्भय। नाहीं आक्षेप यामाजीं।।५।। बहुत ग्रंथ मुखोद्गत। जनांप्रति बडबडे वेदान्त सतत। परि नसतां निश्चय चित्तांत। निष्फल होय सकलही।।६।। धनी शिकवी ज़े ज़े शब्द। राघू बोले ते ते विविध। बरवे वाईट विधिनिषेध। न कळे त्यासी अंतरीं।।७।। तैसें आपण पुस्तकें वाच़ून। शिकलों वेदान्त बहुत दिन। परि सद्गुरूवांच़ूनि त्याची खूण। न बाणेचि कदापि।।८।। म्हणोनि काया वाचा आणि मन। प्रेमें अर्पूनि ज़ावें शरण। मग धरावे त्यांच़े चरण। श्रीसद्गुरूच़े दृढभावें।।९।। तरी तो सद्गुरु भक्तांलागुन। करी उद्धार न लागतां क्षण। परि असावा निश्चय पूर्ण। तरीच़ कार्य साधेल।।१०।। निश्चयें कवणा कसें होय प्राप्त। तेचि कथा सांगूं अद्भुत। ऐकतां विश्रांति पावे चित्त। निजानंदीं सहज़ तें ।।११।। मागील अध्यायीं निरूपण। गुरुदेव यांच़ें वंदन। आतां बोलूं चरित्रकथन। चित्त देऊनि अवधारा।।१२।। आम्ही ब्राह्मण सारस्वत। चित्रापुरमठीं आहों भज़त। देश आपला काश्मीर प्रख्यात। मूळस्थान तें आमुच़ें।।१३।। असती

ऋग्वेदी स्मार्त ब्राह्मण। शाकलशाखा, सूत्र आश्वलायन। पुढें काय तें वर्तमान। सांगूं आतां लवलाहीं।।१४।। कांहीं दिवस लोटल्यावरी। आपुले पूर्वज एके अवसरीं। पंजाब प्रांतीं सरस्वतीतीरीं। करिती वास येवोनि।।१५।। पुढें बहुत दिवसांउपरी। परशुरामें क्षत्रियांचा स्वकरीं। नाश करोनियां निर्धारीं। दिलें ब्राह्मणां भूदान।।१६।। आणिक विचार केला मानसीं। दान दिलें ऐशा प्रदेशीं। योग्य नव्हे राहणें मज़सी। म्हणोनि गेला दुज्या स्थळीं।।१७।। सह्याद्रिपर्वत दिशेसी प्रयाण। करूनि समुद्रराजाकडोन। घेतली भूमि बहुत विस्तीर्ण। परशुरामें त्या समयीं।।१८।। तया भूमीसी 'कोंकणपट्टी'। आणि म्हणती 'परशुरामसृष्टी'। तेथें परशुरामें करोनि वस्ती। आरंभिला यज्ञ महाथोर।।१९।। तेव्हां त्यासी योग्य ब्राह्मण। असावे म्हणोनि सारस्वतांलागुन। भिन्न भिन्न गोत्री मिळवोन। आणिलें कांहीं कोंकण देशीं।।२०।। इष्ट देवादिकांसहित। पाचारिले ब्राह्मण समस्त। यज्ञ आरंभोनि त्वरित। संपूर्ण केला आनंदें।।२१।। मग सारे सारस्वत। येऊनि गोमांतक-देशांत। राहिले ते सुखानें शांत। वास करोनि आनंदें।।२२।। पुढें गेले बहुत दिन। गोमांतक प्रांतीं राज्याधिकरण। पोर्तुगीज़ें केलें येऊन। घातला गोंधळ त्या प्रांतीं।।२३।। लागती हिंदुजनांच्या पाठीं। ख्रिस्तीधर्मा बलात्कारें नेती। बहुत ब्राह्मण पळोनि ज़ाती। कर्नाटक प्रांतीं त्या समयीं।।२४।। गोकर्णादि-ग्रामांतरीं। जिकडे तिकडे राहती सत्वरी। नगर प्रांतींचे अधिकारी। श्रेष्ठ झ़ाले कांहीं ते।।२५।। ऐसें असता तेथील जन। अधिकारी इतर ब्राह्मण। सारस्वत ब्राह्मणांलागोन। म्हणती तुम्हां नाहीं गुरु।।२६।। सद्गुरु नसतां तुम्हीं हीन। ऐसें बोलूनि दाविती हांसून। आणिक करिती मत्सर पूर्ण। ज़ाऊनि सांगती

नृपाप्रति।।२७।। नगर संस्थानींचा राजा। त्यासी म्हणती इतर प्रजा। सारस्वत करिती मौज़ा। गुरुविण ब्राह्मण वृथाचि।।२८।। ऐकूनि रायें त्यांचें वचन। बोलाविले सारस्वत ब्राह्मण। म्हणे तुम्हांसी गुरु कोण। आहे कीं नाहीं सांगावें।।२९।। कुठें असती स्वामी तुमचे। मज़ला करवा दरुशन त्यांचें। नातरी तुम्हां सकलां साचें। योग्य शासन करितों मी।।३०।। ऐकूनि रायाचें कठोर भाषण। म्हणती आमुच्या सद्गुरूचें स्थान। काश्मीर देशीं असे ज़ाण। असती सद्गुणी बहुत ते।।३१।। ब्रह्मज्ञानी असती पूर्ण। दरुशनें होय पाप दहन। मान्य करोनि आपुलें वचन। प्रार्थूनि आणवूं स्वामींसी।।३२।। ऐसें बोलूनि ज़ाती सदनीं। विचार करिती सारे मिळोनी। धाडिती पत्र तत्क्षणीं। गोकर्णीं प्रमुख वडिलांसी।।३३।। पोंचतां पत्र गोकर्णासी। सारस्वत चिंताक्रांत मानसीं। आतां उपाय कोणता यासी। ऐसें बोलती परस्पर।।३४।। देश असे आमुचा काश्मीर। नाहीं विदित समाचार। आपुल्या पूर्वजें येऊनि फार। दिवस झाले या देशीं।।३५।। कुठें राहती कोणत्या ग्रामीं। आम्हां सारस्वतांचें सद्गुरुस्वामी। आतां उपाय कोणता आम्ही। कैसा करूं समज़ेना।।३६।। दुज़ा उपाय न दिसे कांहीं। म्हणती देवचि आतां पाहीं। तोचि संकटीं रक्षी लवलाहीं। ज़ाऊं शरण त्यालागीं।।३७।। ऐसें बोलूनि सत्वर। तेथील आपुल्या जनांसी समग्र। बोलावूनि सांगती विचार। आपुला सारा तयांतें।।३८।। म्हणती गोकर्ण-महाबळेश्वर। देवासी ज़ाऊनि प्रार्थूं सत्वर। मनीं धरोनि दृढ निर्धार। बैसूनि ध्याऊं दिनरजनीं।।३९।। ऐसें म्हणोनि ज़ाती सर्व। पूजिला सद्भावें महादेव। विधिपूर्वक सकल वैभव। अर्पिलें देवासी प्रेमानें।।४०।। मग देवासंनिधीं समस्त। बैसूनि लाविती आपुलें चित्त। श्रीशिव-

ध्यानामाजीं सतत। निमग्न झाले त्या ठायीं।।४१।। सारा दिवस उपवास। अन्न उदक नाहीं तयांस। म्हणती शंभो तूं आम्हांस। रक्षीं रक्षीं जगत्पते।।४२।। आतां ऐका श्रोते हो सकल। तयांची प्रार्थना अति प्रेमळ। ऐकतां दगडही विरोनि ज़ाईल। क्षण न लागतां पाहीं पां।।४३।। असो तेव्हां प्रार्थिती देवा। म्हणती आम्हां आतां सर्वां। अभय देऊनि सद्गुरु दावा। आलों शरण तव पाया।।४४।। जय जया जी महाबळेश्वरा। येईं झडकरीं उद्धरीं कुमरां। नेदी कोणी आम्हां थारा। तुज़वांचोनि या जगतीं।।४५।। तूंचि देवा आम्हां आतां। भेटवी स्वामी सद्गुरुनाथा। गुरुवांचोनि नाहीं त्राता। जगतीं देवा दयाळा।।४६।। आमुचे स्वामी असती कोण। हें नाहीं विदित आम्हांलागून। मानिती सकळ आम्हां हीन। देवा दीनदयाळा।।४७।। म्हणोनि आलों तुला शरण। तूंचि आमुचें करीं रक्षण। न सोडूं हे आतां चरण। सद्गुरुदर्शनावांचोनि।।४८।। न कळे आम्हां भजन कराया। नाहीं सेविलें तुझिया पाया। नको धिक्कारूं बा तूं सदया। क्षमा करीं अपराध।।४९।।नाहीं केले दान धर्म। कर्मउपासनादि नेम। स्मरलों नाहीं तुझें नाम। सतत विषयीं रत झालों।।५०।। निंदिलें सकलां साधुसंतां। आणिक धरूनि देह-ममता। पुराण श्रवण कानीं पडतां। घातलीं बोटें तिरस्कारें।।५१।। नाहीं केला नमस्कार। देखिली नाहीं मूर्ति सुंदर। सेविला नाहीं प्रसाद थोर। ऐसे पापी आम्हीं असूं।।५२।। मी कोण कैसा आलों कोठूनि। नाहीं कळलें आम्हांलागोनि। मोह-मदानें धुंद होऊनि। पडलों दुर्धर प्रपंचीं।।५३।। ऐसे अनंत अपराध। किती सांगूं अंगीं क्रोध। मानसीं होतो बहुत खेद। कवणा सांगूं दुःख हें।।५४।। धिक् धिक् जिणें झालें व्यर्थ। साधिला नाहीं बा परमार्थ। अंतरीं धरोनि

बहुत स्वार्थ। पशूसम काल दवडिला।।५५।। अपराध सारे घालूनि पोटीं। देईं आम्हांसी सत्वर भेटी। धांवूनि येईं ऐशा संकटीं। दीनबंधु म्हणती तुज़।।५६।। ज़री बालका अंगीं दुर्गुण। तयाचें पाहूनि म्लान वदन। माय प्रेमें पोटीं धरोन। देई स्तनपान झडकरी।।५७।। तेवीं तूं आम्हांसी ज़ाण। रक्षिसी ऐसा भाव धरोन। आलों धांवूनि तुज़ला शरण। नको आतां उपेक्षूं।।५८।। माता ज़री टाकी बाळा। ज़ाईल कुठें तें सांग दयाळा। पृथ्वीनें ढकलिलें ज़री वृक्षाला। कोण आधार त्या सांगें।।५९।। असो आतां येईं झडकरी। हेतु पुरवीं तूं या अवसरीं। किती आळवूं तुज़ त्रिपुरारी। कठोर कां बा तूं होसी।।६०।। प्रल्हादें बाहतां तुज़ला अंतरीं। स्तंभीं प्रगटलासी सत्वरी। नारसिंह होऊनि त्या अवसरीं। वधिलें हिरण्यकशिपूसी।।६१।। कौरवें द्रौपदी-वस्त्रहरण। करितां आलासि लगबगें धांवून। एक ओढितां दुज़ें त्या क्षण। निर्मून लाज़ राखिली।।६२।। नक्रें धरितां गजेंद्रासी। आलास झडकरी हांकेसरसी। उशीर कां बा आतां करिसी। किती पाहूं वाट तुझी ।।६३।। मीराबाईसी जनकें दिधलें। विष कालवूनि,त्वां त्या वेळे। शोषूनि आपण परम कृपाळें। दाविला सकलां चमत्कार।।६४।। कबीरें आपुली दिधली कांता। वाणियालागीं संतांकरितां। फौज़दार होऊनि ताता। सोडविली त्वां तिज़लागीं।।६५।। दामाजीचा ऐकूनि धांवा। विठू महार होऊनि तेव्हां। बेदररायासी भेटूनि बा त्वां। रसीद भरली सकलही।।६६।। चोरिलें म्हणूनि घालूनि आळ। जनाबाई भक्त प्रेमळ। सुळीं चढवितां तूं घननीळ। तात्काळ आलासी धांवुनी।।६७।। सुळाचें तैं ज़ाहलें पाणी। तुझिया कृपाकटाक्षेंकरुनी। वाटलें आश्चर्य सकलांलागुनी। असाध्य कैंचें तुज़लागीं।।६८।। रावणें स्तुति करितां त्यासी। दिधली पार्वती

आपुली कैसी। येऊनि राहिलास गोकर्णासी। जनांच्या उद्धाराकारणें।।६९।। पार्वतीसंगें सारीपाट। खेळतां रुसोनि येसी थेट। घोर काननीं बैसलास त्वरित। गुप्तरूपें तेथेंचि।।७०।। मग आक्रोशें धांवे गिरिजा। श्रमली शोधितां हिमनगात्मजा। व्याघ्ररूप धरोनि माझा। तूंचि शंकर आलासी।।७१।। बघूनि फोडिली उमेनें किंकाळी। महांगिरीशा म्हणण्या बोबडी वळली। मंगीशा ये सत्वर ज़वळी। म्हणतां प्रगटलासि त्या क्षणीं।।७२।। आतां कैसी लागली झ्रोंप। कीं तुज़ आला सांगें कोप। अथवा नाहीं आम्हां अमूप। श्रद्धा ऐसें भाविसी कां।।७३।। किती विनवूं शिवहरसांबा। श्रमलों आतां पुरे बाबा। रडवितां आम्हां नाहीं शोभा।भक्तवत्सल तुज़ म्हणती।।७४।। रडतां बालक माता त्यासी। ज़री ना घेई आपुल्यापाशीं। म्हणती निष्ठुर जन हे तिज़सी। दोष पाहें कवणाचा।।७५।। ऐसा तूंही निष्ठुर होतां। स्तवील न कोणी तुज़ला ताता। नको नको बा उशीर आतां। लावूं येण्या दयाळा।।७६।। खचित दया अंतःकरणीं। नसे वाटे आम्हां झ्रणीं। झाला कोरडा घसा बाहुनी। 'वाहवा वाहवा' म्हणसी तूं।।७७।। नाहीं आम्हांसी लाज़ कांहीं। म्हणुनी विनवणी केली तुज़ ही। ऐकुनी कीर्ति बहुत पाहीं। आलों धांवत तव चरणीं।।७८।। भक्त म्हणती तुज़ला भोळा। परि तूं दिससी अंतरीं काळा। नातरीं ऐशा समयीं बाळां। नेदिसी कां तूं आसरा।।७९।। बुडत्यासी पाहुनी मानिती मौज़। तैसेंच तुवां केलें आज़। कळलें सकळही आम्हां सहज़। बहुत कपटी अससी तूं।।८०।। पुरे आतां तुझी संगति। स्तवितां खुंटली आमुची मति। परि करुणा न ये तुज़प्रति। नवल वाटे आम्हांसी।।८१।। किती तरी बघसी अंत। हंसतील भक्तजन समस्त। तोडीं क्लेश येऊनि धांवत। आणिक नाहीं

मागणें।।८२।। निंदक सारे म्हणती तुला। महाबळेश्वर आतां मेला। उगीच़ तुम्हीं कां हो बैसलां। लोक म्हणतील आम्हांसी।।८३।। ते म्हणती नाहीं देव। लागलें खूळ म्हणोनि भाव। धरुनी मानसीं घेती नांव। शिव शिव शंभो शंकरा।।८४।। जन्म वायां घालुनी अंतीं। देव देव करुनी मरती। कवणा मिळाला देव तो जगतीं। देव सद्गुरु फुकाचि।।८५।। ऐसें आतां म्हणतील सकल। उशीर न करीं धांव तत्काळ। तुझें ब्रीद तूंचि राखीं येवेळ। सांगाया लाज़ वाटतसे।।८६।। देवाधिदेवा करुणासागरा। तुज़विण आतां चित्तासी थारा। द्यावया समर्थ नाहीं दुसरा। धांव माये दयाळे।।८७।। तूंचि आम्हां दाता त्राता। सत्वर सद्गुरु होऊनि ताता। येउनी सकलां बोधुनी आतां। करीं सारस्वतां पावन।।८८।। नगर-राजासी दिधलें वचन। करवितों सारस्वत-सद्गुरुदर्शन। नातरी होईल सकलां शासन। विदित सर्वही तुज़लागीं।।८९।। नाहीं देवा तुझा दोष। प्रारब्ध आमुचें असे खास। म्हणोनि श्रमलों आम्ही विशेष। तरी न करिसी समाधान।।९०।। कवण भक्ता भेटाया गेलासी। अथवा मांडिलें सारीपाटासी। कीं सवड नसे येण्यासी। गुंतलासि कां जगसंहारा।।९१।। किंवा गणेश-षण्मुख-बाळां। धरुनी खेळविसी तूं वेल्हाळा। न समज़े बा तव लीला। अज्ञ पामरां आम्हांसी।।९२।। अथवा कुणीकडे धराया अवतार। गेलासी तूं लगबगें भूवर। निजभक्तांच़ा कराया उद्धार। नोळखूं आम्ही तव महिमा।।९३।। तुझे असती अगणित भक्त। परि तूं नटसी स्वरूपें अनंत। असाध्य कैंचें आहे तुज़प्रत। येईं देवा झडकरी।।९४।। न येसी तूं म्हणुनी तुज़ला। बहुविध बोलुनी दोष दिधला। क्षमा करोनि भक्तवत्सला। महाबळेश्वरा ये वेगीं।।९५।। असो आतां करितों नमन। सद्भावेंसीं तुज़लागोन।

आतां तरी येसी धांवून। ऐसा भाव धरियेला।।९६।। ज़री आमुचा गेला प्राण। नच करूं अन्नउदकपान। दाविल्यावांचुनी श्रीगुरुचरण। न ज़ाऊं आम्ही सदनासी।।९७।। ऐसा निश्चय करोनि समस्त। बैसले प्रेमें होउनी ध्यानस्थ। उपवासी राहिले दिवस सात। कळवळला तो महादेव।।९८।। बालका नाहीं मातेवांचुनी। विदित दुज़ा या अवनीं। म्हणोनि धांवे ती कळवळोनि। रडतां वेगें बालक।।९९।। तद्वत् अनन्य ज़ो येई शरण। त्यासी रक्षी स्वयें आपण। यांत किमपि नसे अनुमान। असावा दृढतर निश्चय तो।।१००।। निश्चयेंचि मिळतसे फल। निश्चय नसतां सकलही फोल। केव्हां येईल न्यावया काळ। हें कोणाही कळेना।।१०१।। तस्मात् सत्कार्यासी न लावितां वेळ। झिज़वावा आपुला देह निर्मळ। तरीच पावे मोह सोडुनी सकळ। निजस्वरूपासी निश्चयें।।१०२।। असो आतां सारस्वत ब्राह्मण। स्तवितां ज़ाहले ध्यानीं निमग्न। मग काय करिता झाला उमारमण। कळवळोनि तेधवां।।१०३।। तें सांगूं सविस्तर। पुढील अध्यायीं साचार। शिव-पार्वतीसंवाद थोर। ऐकतां संतोष होईल।।१०४।। आनंदाश्रम-सद्गुरुराय। शिवानंदतीर्थ एकचि उभय। यांच्या कृपाप्रसादें द्वितीय । अध्याय गुरुदासें संपविला।।१०५।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां पापें नासती थोर। द्वितीयाध्याय रसाळ हा।।१०६।। अध्याय।।२।। ओंव्या।।१०६।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति द्वितीयोऽध्यायः समाप्तः।।

।। श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय जय जय सद्गुरुराज। स्मरतां होय सकलही काज़। महिमा अपार वर्णितां सहज़। होय विश्रांति मनासी।।१।। सद्गुरो तूंचि सकलां रक्षक। नाहीं आप्त तुज़हुनी आणिक। तूंचि अससी माय जनक। आम्हां अज्ञ जनांसी ।।२।। असो आतां भाविक सज्जन। परिसा रसाळ महिमा वर्णन। मागील कथेचें निरूपण। पुढें बोलूं लवलाहीं।।३।। ऐकुनी[१] आलाप भक्तजनांचा। कंठ दाटला सदाशिवाचा। प्रेमाश्रु लोटले मग तो साचा। उठला लगबगें त्या समयीं।।४।। जटा बांधुनी सांवरी नेसण। सिद्ध ज़ाहला पंचवदन। मग निजकांतेसी म्हणे येऊन। देवी पार्वती येतों मी।।५।। ऐकतां आपुल्या पतीचें वचन। म्हणे अंबा कुठें हो गमन। मुखें गेलीं कोमेज़ून। सौख्य आहे ना तुम्हांसी।।६।। यावरी बोले पिनाकपाणी। गेलें पाहिजे मज़ला धरणीं। भक्तसंकटा पाहुनी नयनीं। तळमळ वाटे मम जीवा।।७।। काय तयांची प्रेमळ भक्ती। असे अंगीं बहुत विरक्ती। रात्रंदिन ते मज़ला बाहती। प्रेमोद्गारेंकरोनि।।८।। अन्य कित्येक बाहती भक्त। नाना ढोंगें करोनि दावित। मी नच देईं दरुशन त्यांप्रत। काय सांगूं गिरिजे तुज़।।९।। खरे भक्त मिळणें दुर्लभ। म्हणुनी ज़ातों मी तुझा वल्लभ। यापरी बोलतां शिवहरसांब। बोले वेल्हाळ स्मितमुखें।।१०।। म्हणे अंबा प्राणनाथा। कोण भक्त सांगा कीं आतां। कोणत्या ग्रामीं काय ती वार्ता। सांगावें मज़ सदाशिवा।।११।। यावरी बोले जाश्वनीळ। सांगतों ऐक तुज़ला सकळ। गोकर्णग्रामीं ज़ातों येवेळ। काय सांगूं तुज़लागीं।।१२।। तेथील सारस्वत ब्राह्मण।

१. अदृश्य सृष्टीबद्दल विवरण करितानां अ.४५ ओ.१२ ते २५ पहा.

नाहीं त्यां अन्न सप्तदिन। बैसले माझें करीत ध्यान। तनुमन सकलही अर्पुनी।।१३।। दुःखी झाले गुरुवांचोन। केला दुर्जनीं त्यां अवमान। मीचि धरोनि अवतार ज़ाण। करितों उद्धार तयांचा।।१४।। ऐकतां भवानी कळवळे चित्तीं। म्हणे कां हो तुम्ही जगतीं। पडतां भक्त ऐशा संकटीं। अंत किती पाहातां हो।।१५।। यावरी बोले जाश्वनीळ। काय सांगूं तुज़ला सकळ। परीक्षा पाहतों आधीं समूळ। मग धांवतों सत्वरी।।१६।। ना तरी ऐसे बहुत भज़ती। देहममता धरोनि चित्तीं। किंचित् शिणतां डगमगे वृत्ती। ज़ाती आपुल्या कार्यासी।।१७।। ज़ो असे खरा भक्त। कधींही न ढळे तो विरक्त। ज़री घोर संकट येत। तरी मज़ला न विसंबे।।१८।। ज्याच्या अंतरीं दृढभाव। त्यासीच मी रक्षितों सदैव। ज़ें ज़ें मागे तें तें सर्व। देतों त्याज़ला निश्चयेंसीं।।१९।। ज़री तो भज़े होऊनि कामुक। त्याची इच्छा मी पुरवितों देख। हे तरी ब्राह्मण भाविक। सद्गुरूकरितां तळमळती।।२०।। नाहीं मागती पुत्र पौत्र। सद्गुरु स्वामी परम पवित्र। त्याच्या दरुशना अहोरात्र। करिती चिंतन प्रेमानें।।२१।। ऐशा माझ्या भक्तांलागुन। धिक्कारील सांग तूं कवण। ज़ाउनी ध्यानीं सांगतों खूण। एका प्रमुख ब्राह्मणासी।।२२।। ज़ो येई अनन्य शरण। त्यासीच आम्ही देऊं दरुशन। आतां सत्वर समाधान। करितों ज़ाउनी भक्तांचें।।२३।। यावरी बोले हेरंब-जननी। अवतार धरितों म्हणसी धरणीं। सोडुनी मज़ला कैलासस्थानीं। कैसा ज़ासी तूं एकटा।।२४।। आज़वरी ऐसें नाहीं नाथा। अवतार धरिला मज़वीण सर्वथा। रामावतारीं ज़ाहल्यें मी सीता। कृष्णावतारीं रुक्मिणी।।२५।। आतां सोडुनी मज़ त्रिपुरारी। कां होतां हो अवतारी। मीही येवोनियां अवनीवरी। अवतारकार्य करीन।।२६।।

तिचें ऐकुनी ऐसें वचन। काढितील आक्षेप सारे जन। येथें राम-कृष्ण आले कोठून। तो अवतार विष्णूचा।।२७।। तरी ऐका हो चित्त देऊन। सांगतों आतां सद्गुरुवचन। विष्णु आणि शंकर ज़ाण। एकचि परिपूर्ण देव तो।।२८।। नाहीं त्यांसी कांहीं भेद। अज्ञजन म्हणती त्रिविध। विधि-हर-विष्णु ऐसा छंद। धरिला आम्हीं नरांनीं।।२९।। आणिक ऐका एक वचन। एका ग्रामीं एक ब्राह्मण। तो करी वेदमंत्र पठण। म्हणती त्यासी 'भिक्षुक'।।३०।। तोचि शिकवी ज़ाउनी शाळेसी। म्हणुनी 'शिक्षक' म्हणती तयासी। औषध देतां रोगी जनांसी। तेव्हां 'वैद्य' म्हणती त्या।।३१।। मुलें म्हणती आमुचा 'पिता'। 'पुत्र' म्हणे त्याची माता। भार्या बोले 'प्राणनाथा'। ऐसें बहुविध बाहती।।३२।। कार्यपरत्वें बाहती त्या जन। परि तो एकचि असे ब्राह्मण। तैसें देवासी आपण। बाहतों सर्व नानापरी।।३३।। सृष्टिकर्ता म्हणोनि नामा। देती सकलही त्यासी 'ब्रह्मा'। तोचि करितां पालन-कामा। 'विष्णु' नामा पावला।।३४।। करितो सकलां संहार। म्हणुनी म्हणतों तया 'शंकर'। नाहीं भेद अणुमात्र। तिघेही एक खचित पैं।।३५।। एवं एकचि तिन्ही देव। मंदमति आम्ही भिन्न भाव। धरुनी चित्तीं देतों नांव। नानापरी देवांसी।।३६।। असो आतां ऐका वृत्तांत। श्रीहर-सांब-सदाशिव हांसत। पार्वतीसी उत्तर देत। कीं हें काय बोलसी तूं।।३७।। अवो मागील सकळ अवतारीं। तुज़ला वरिलें होतें भूवरी। परि संन्यासी मी त्रिपुरारी। होऊनि ज़ातों आतां पैं।।३८।। तेथें तुझें नसे काज़। कासया नेऊं तुज़ला आज़। ऐसें म्हणोनि श्रीप्रभुराज। गदगदां हांसे प्रेमभरें।।३९।। यावरी खेदयुक्त बोले गौरी। टाकुनी ज़ातां मज़ अंतरीं। कैसें करमेल सांगा सत्वरी। नच मी सोडीं चरण हे।।४०।।

ऐसें बोलोनि दाक्षायणी। सिद्ध ज़ाहली ज़ावया अवनीं। तेव्हां बोले मधुर वचनीं। गिरिजाकांत कनवाळू।।४१।। आतां मी अयोनि-संभव। अवतरोनि महादेव। शीघ्र ज़ातों तळमळती सर्व। भक्त माझे गुरुवीण।।४२।। म्हणोनि मीचि होऊनि संन्यासी। दरुशन देतों मद्भक्तांसी। तुज़ला संगें नेतां आम्हांसी। हंसतील पिशुन सकलही।।४३।। म्हणोनि अंबे ऐसी आर्त। सोडीं तूं येतों आतां त्वरित। ऐकुनी वचन पतीचें अद्भुत। करी रुदन भवानी।।४४।। म्हणे ''शंभो पिनाकपाणी। राहूं कैसी तुज़ला सोडुनी। प्रियकर भक्तचि तुज़लागोनी। मज़हुनी ज़ाण खचितचि''।।४५।। ऐसें बोलुनी ती वेल्हाळ। धरी घट्ट चरणकमल। म्हणे नाथा तूं कृपाळ। नको करूं उपेक्षा।।४६।। यावरी बोले नीलकंठ। तुज़हुनी मज़ला भक्तचि श्रेष्ठ। खचितचि स्थापोनियां मठ। राहतों सदा तेथेंचि।।४७।। ऐसें वचन पडतां कानीं। दचकोनि पडली हिमनगनंदिनी। म्हणे नाथा अघटित करणी। कवणासीही न कळे तुझी।।४८।। नको पाहूं माझा अंत। धरोनि आपुल्या कांतेचा हस्त। ज़ाउनी राहें भूतळीं सतत।करीं उद्धार जनांचा।।४९।। ऐसें म्हणोनि अपर्णा सुंदरी। स्फुंदस्फुंदोनि रडे बहुपरी। म्हणे काय करावें त्रिपुरारी। तुज़विण देवा दयाळा।।५०।। यावरी बोले पंचवदन। तुज़ नाहीं कळली खूण। तुज़ला नाहीं कीं मी सोडून। गिरिजे सांगतों निर्धारें।।५१।। अग्निवीण न राहे ज्योति। शर्करेसी गोडी न सोडे ती। तैसें तूं हो मज़ सांगातीं। राहसी निरंतर सहज़चि।।५२।। तूं निर्विकल्प परम शांति। संत संन्यासी तुज़ला सेविती। हें तूं विसरसी कीं तव प्रख्याति। अथवा ढोंग करिसी हें।।५३।। पहा तूं नसतां संन्यास। त्याहुनी बरा गृहस्थाश्रम विशेष। म्हणोनि तुज़वांचोनि खास। होउनी

संन्यासी न ज़ाऊं।।५४।। इतुकेंचि नव्हे आणिक एक। सांगतों चित्त देउनी ऐक। सारस्वतस्वामी सकलही देख। तुज़सहित नांदतील।।५५।। अर्थात् सारस्वत-गुरुपरंपरा। ब्रह्मनिष्ठ होउनी स्वधर्म सारा। करुनी आपण दावितील इतरां। पूर्णज्ञानी सकलही।।५६।। ऐसी ही तुज़ पुढील वार्ता। सांगितली गुह्य गोष्ट आतां। संगें घेउनी तुज़ला भक्तां। ज़ाउनी भेटतों लवलाहीं।।५७।। ऐसें बोलुनी अपर्णावर। आरूढ होउनी नंदीवर। धांविन्नला श्रीहर शंकर। गोकर्णग्रामीं भूवरी।।५८।। श्रोते ऐका सावधान। पुढील अध्यायीं निरूपण। श्रीशंकर अवतार धरोन। करील उद्धार जनांचा।।५९।। नाम घेवोनि 'परिज्ञानाश्रम'। सुखवुनी जनांसी मार्ग सुगम। दावुनी सकलां लावील प्रेम। निजस्वरूपाचें सर्वेंचि।।६०।। ऐकतां चित्त होय तल्लीन। सकलही पाप ज़ाय नासोन। यामाजीं नसे अनुमान। नच सांगें लटिकें मी।।६१।। नकळे मज़ला ब्रह्मज्ञान। नाहीं केलें पुराणश्रवण। अति पापी मूढ मलिन। हीनदीन मंदमति।।६२।। ऐसा मी काय करितों वर्णन। श्रीसद्गुरुचरित्र कथन। श्रोते हो काय सांगूं तुम्हांलागून। सद्गुरुचि देई मज़ स्फूर्ति।।६३।। मी अज्ञ बालक काय वर्णन। कैसें हो करूं शकेन। मज़ला निमित्त करोन। तोचि वदवी गुरुनाथ।।६४।। येथें करितील प्रश्न थोर। म्हणसी घडिघडी श्रीसद्गुरुवर। तोचि करवितो ग्रंथ सविस्तर। तरी संशय एक उठे।।६५।। आज़वरी बहुत ग्रंथ ज़ाहले। एकनाथ-ज्ञानदेवादि संत भले। यांनीं नाना ग्रंथ सविस्तर केले। अति सुंदर सुकुमार।।६६।। नाना युक्तीनें दृष्टांतसहित। लिहिले परम रसभरित। ऐकतां तल्लीन होय चित्त। असे विदित तुज़लागीं।।६७।। परि त्वां हें ज़ें वर्णन केलें। येर ग्रंथांच्या ज़ोडीस न आलें। म्हणसी सद्गुरुनाथाच्या

कृपाबळें। करितों चरित्रवर्णन हें।।६८।। तरी हें वर्णन परम उत्कृष्ट। येर ग्रंथांपरी न होय खचित। कां हे ऐसा संशय येत। ऐसा आक्षेप धरितील।।६९।। तरी अवधारा श्रोते हो सज्जन। उत्तर देऊं तुम्हांलागुन। तेंचि किंचित् करोनि कथन। अध्याय संपूर्ण करितों पैं।।७०।। ज्ञानेश्वरादिक संत महंत। तयांची योग्यता कैंची मज़प्रत। अवतारी पुरुष ते प्रख्यात। काय वानूं तयांसी।।७१।। सूर्यासमीप खद्योत च़मके। तयाच़ा उजेड काय तो फांके। तैसा मी संतांच्या सन्मुखें। काय तें कवन करीन।।७२।। ज़री सद्गुरु वदविता सकल। तरी पाहिजे आपुलें पुण्य विपुल। नातरी सद्गुरु काय करील। वृत्तिच़ मलिन माझी पैं।।७३।। ज़ें ज़ें होईल आपुलें कार्य। तें तें सफल करी गुरुराय। येथें नाहीं संशय। न बोलें मी लटिकें हें।।७४।। परि जयाची जितुकी भक्ती। तितुकीच़ तयासी होय प्राप्ती। जेवढें पात्र नदीसी नेती। आणिती पाणी तितुकेंचि।।७५।। आणिक एक असे दृष्टांत। अहो तुम्ही भाविक भक्त। करोनि आपुलें सावध चित्त। ऐका प्रेमळ श्रोते हो।।७६।। एका मातेसी दोघे सुत। आपुल्या हस्तीं तयांच़े हात। धरोनि एकेकासी च़ालवी त्यांप्रत। दोघांलागीं सारिखेंचि।।७७।। परि ज्याच़े पाय असती बळकट। धरोनि हात दुडदुडां धांवत। च़ालोनि ज़ाय तो त्वरित। मातेसंगें त्या समयीं।।७८।। ज्याच्या पायां नसे शक्ति। तो अडखळोनि पडे खालती। आणि हळूहळू च़ाले सांगातीं। जननी-कराच्या आधारें।।७९।। यांत असे कवणाच़ा दोष। मातेच़ा कीं पुत्राच़ा विशेष। याच़ा विचार करील तयास। कळेल पुत्राच़ा दोष हा।।८०।। तद्वत् येर ज़े करिती ग्रंथ। तयांच़े भक्तिरूप पाय बळकट। सद्गुरुकृपेच़ा धरोनि हस्त। करिती वर्णन रसाळ ते।।८१।। माझी भक्तीचि

असे अशक्त। चंचल अवघी, निश्चल नसत। परि गुरुकृपेचा धरूनि हस्त। अणुमात्र वर्णन करितों पैं।।८२।। ज़री मज़ला नसे भक्ती। सद्गुरुमाउली कृपा करी ती। म्हणोनि धैर्यें लागलों कार्याप्रती। पार करील तीचि पैं।।८३।। आनंदाश्रम सद्गुरुसदय। शिवानंदतीर्थ अभेदरूप उभय। यांच्या कृपाप्रसादें तृतीय। अध्याय गुरुदासें संपविला।।८४।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां पापें नासती थोर। तृतीयाध्याय रसाळ हा।।८५।। अध्याय।।३।। ओंव्या।।८५।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति तृतीयोऽध्यायः समाप्तः।।

परमपूज्य परिज्ञानाश्रम (प्रथम) स्वामिजींची समाधि, गोकर्ण

श्रीआदिमठ, भण्डिकेरि-गोकर्ण

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीपरिज्ञानाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।। ॐ जय जय आद्य श्रीगुरुनाथा। परिज्ञानाश्रम-गुणातीता। विशुद्धसत्त्वा परम विख्याता। त्राता सकलां तूं एक।।१।। जय जय श्रीगुरु करुणासिंधु। भक्तवत्सला मी मतिमंदु। न कळे मज़ला निज आनंदु। प्रेमें वंदूं पदकमलां।।२।। जय जय सद्गुरो करुणासागरा। देईं सुमति ग्रंथविस्तारा। नातरी या अज्ञ-पामरा। कैसें समज़ेल कथाया।।३।। मी बालक कांहीं नेणें। तूंचि दावुनी पंथ कृपेनें। पार करोनि नेईं त्वरेनें। निजसुखधामीं कृपाघना।।४।। ज़ाहले अपराध सहस्र कोटी। ते घालोनि आपुल्या पोटीं। देउनी सत्वर दिव्य दृष्टी। लिहवीं देवा ग्रंथ हा।।५।। काय करावें न कळे चित्ता। तूंचि स्फुरवीं श्रीगुरुनाथा। पार घालीं यांतूनि आतां। हेंचि मागणें दयाळा।।६।। आतां करितों तुज़ला नमन। तूंचि करवीं ग्रंथ संपूर्ण। न विसंबें तुज़लागोन। देवा सद्गुरो दयाळा।।७।। देईं मज़ला श्रीगुरुराया। प्रथम 'श्रवण'-भक्ति सदया। हेचि प्रार्थना करितों पायां। प्रभो देवा कृपाघना ।।८।। आतां ऐका श्रोते हो सादर। आद्य सद्गुरु धरी अवतार। 'परिज्ञानाश्रम' यांचें चरित्र। परम अमृत घ्या प्याया।।९।। महिमा त्यांचा अपार। नाम गातां येतो धीर। सांगूं आतां सविस्तर। सकल वृत्तांत या समयीं।।१०।। सद्गुरु हाचि एक समर्थ। त्यावीण दुज़ा नाहीं आप्त। तोचि देतसे निजभक्तांप्रत। शाश्वत सुख निर्लोभें।।११।। न पावे कुणाही सद्गुरुवीण। कदापि स्वयें ब्रह्मज्ञान। म्हणोनि त्यासीच ज़ावें शरण। मानवें ज़ाण निर्धारें।।१२।। हें जग सारें नश्वर। नाहीं सुख यांत अणुमात्र । म्हणोनि गुरुमुखेंचि विचार। सारासार करावा।।१३।। लक्ष चौऱ्यांशीं फिरूनि योनी। आलों नरजन्मासी अवनीं। करावा

आतांचि विचार स्वमनीं। निजरूपाचा त्वरित पैं।।१४।। एकदां गेला हातींचा निसटोन। पुनः न मिळे आम्हांलागोन। येर जन्मीं आत्मज्ञान। मनुष्यावीण नोहेचि।।१५।। परि करावा विषयासक्तीचा त्याग। तरीच लाभेल मोक्षाचा मार्ग। करितां श्रीसद्गुरूचा संग। होय हें सारें सहजचि।।१६।। असो आतां सद्गुरु एक। तोचि दाता सकल विवेक। दुजें नाहीं त्याहुनी आणिक। श्रेष्ठ कुठेंही त्रिभुवनीं।।१७।। ऐका श्रोते हो सावधान। मागील कथेचें अनुसंधान। श्रीसद्गुरूच्या कृपेनें जाण। पुढें सांगेन सकलही।।१८।। गोकर्ण-ग्रामीं महाबळेश्वर। देउळामाजीं बैसले जे नर। सारस्वत ब्राह्मण समग्र। ध्यानीं निमग्न जाहले।।१९।। तेव्हां जाहला चमत्कार। काय तो सांगूं साचार। अंगीं उठती रोमांच थोर। शरीर कांपे थरथरां।।२०।। असो इकडे कैलासीं शंकर। मागील अध्यायीं निघाला भूवर। नंदीवरी बैसुनी सत्वर। आला गोकर्ण-ग्रामासी।।२१।। पंचवदन दशहस्त कृपाळ। अंकीं धरिली उमा वेल्हाळ। मस्तकीं शोभे गंगा सोज्ज्वळ। भोळानाथ दयाघन तो।।२२।। भाळीं भस्म त्रिपुंड्र-टिळा। गळां घातली नररुंडमाळा। रुद्राक्ष नाग हींचि तयाला। भूषणें जाणा शोभती।।२३।। ऐसें सुंदर रूप साजिरें। आला धांवुनी देवस्थानीं त्वरें। जेथें बैसले ब्राह्मण आतुरें। तेथें ठाण मांडियलें।।२४।। ब्राह्मणांमाजीं प्रमुख एक। ध्यान करितां समरसला देख। दिसे प्रकाश परम सुरेख। त्यामाजीं विलसे श्रीसांब।।२५।। बघतां नयन दिपले सारे। आले ब्राह्मणा-अंगीं शहारे। मग श्रीशंकर बोले बा रे। इच्छित काय असे तुझें।।२६।। नको भिऊं, अभय तुम्हांला। द्याया आलों सांगें मजला। हेतु काय असे तो आपुला। शीघ्र सांगें ये समयीं।।२७।। ऐसें बोलुनी ठेविला

हस्त। भक्तमस्तकीं प्रेमभरित। ब्राह्मण ज़ाहला सद्गदित। प्रेमाश्रु नयनीं लोटले।।२८।। ओठ थरथरां कांपती। घर्मबिंदु कपाळीं चमकती। ऐसें पाहुनी त्या भक्ताप्रती। आलिंगिला प्रेमानें।।२९।। म्हणे सदाशिव भक्तालागीं। कवण दुःख ज़ाहलें तें वेगीं। बोल वत्सा तूं मज़लागीं। भिऊं नको बा सर्वथा।।३०।। ऐसें ऐकतां अभय वचन। बोले मंजुळ शब्दें ब्राह्मण। विदित सकलही तुज़लागोन। सर्वकर्ता सर्वज्ञ तूं।।३१।। बालकहेतु माता ज़ाणे। परि कौतुकें बालका दावी नेणे। तैसें हें बा तुझें बोलणें। कळलें देवा मज़लागीं।।३२।। परि आतां सांगतों देवा। पुत्र पौत्र दारा अथवा। नको मज़ला धनाचा ठेवा। नको कांहीं इतर तें।।३३।। एक सद्गुरुस्वामीराव-। दरुशनावांचुनी तळमळे जीव। म्हणुनी धरूनियां दृढभाव। प्रार्थिलें आम्हीं तुज़लागीं।।३४।। नगर-संस्थानींचे जन। गुरुवीण आम्हां म्हणती हीन। एवं सकल वर्तमान। सांगे ब्राह्मण देवासी।।३५।। यावरी बोले पिनाकपाणी। होईल दर्शन तुम्हांलागुनी। श्रीस्वामींचें या गोकर्णीं। उदईक ज़ाण सकलांसी।।३६।। उत्तर हिंदुस्थानापासुनी। येईल एक संन्यासी सद्गुणी। धरा तयाचे चरण दोन्ही। करा प्रार्थना त्याज़वळी।।३७।। ज़ावें तुम्हीं त्यासी शरण। तोचि सद्गुरु होय कृपाघन। अवतार असे तो माझाचि पूर्ण। ज्ञानसंपन्न होय पां।।३८।। कोटितीर्थासमीप गुरुजी। येईल खचितचि शंका ना दुजी। उदईक सायंकालामाजीं। भेटतील ते निश्चयेंसीं।।३९।। इतुकें सांगुनी उमाकांत। अदृश्य ज़ाहला तो क्षणांत। मग ब्राह्मण उत्थानीं येत। ध्यानांतुनी तेधवां।।४०।। चकित झाला बहुत चित्तीं। मग येई सत्वर गती। ब्राह्मण सकल ध्यानस्थ बैसती। तेथें ज़ाउनी उठवी तयां।।४१।। जी शंकरें

सांगितली खूण। ती सकलां करी निवेदन। ऐकतां हर्षती तेव्हां ब्राह्मण। उठती लगबगें त्या समयीं।।४२।। म्हणती आतां आम्ही सकल। ज़ाऊं तेथेंचि बैसूं प्रेमळ। अंतःकरणें आठवूं पदकमल। श्रीसद्गुरूचे सुकुमार।।४३।। ऐसें बोलुनी प्रातःकाळीं। गेले कोटितीर्थाज़वळी। स्नान संध्या सारुनी त्यावेळीं। मार्गप्रतीक्षा करिती ते।।४४।। केव्हां येतील ते संन्यासी। दरुशन होईल कधीं आम्हांसी। उत्सुक होउनी निजमानसीं। बैसती सायंकाळवरी।।४५।। आतां ऐका श्रोते हो सज्जन। श्रीशिवशंकर-अवतार ज़ाण। देईल त्वरेंचि सारस्वतां दरुशन। नसे संशय यामाजीं।।४६।। ज़े साधु ब्रह्मज्ञानी। ते देवचि असती या धरणीं। मुकती जन्ममरणा लागोनी। म्हणोनि धन्य धन्य ते जगीं।।४७।। असो आतां सारस्वत ब्राह्मण। श्रीसद्गुरूचें करिती ध्यान। पुढें काय ज़ाहलें वर्तमान। अवधारा सावध होवोनि।।४८।। दंड-कमंडलु घेउनी हस्तीं। पायीं पादुका मधुर वाज़ती। आणि शुभ्र लाविली विभूती। काषायांबर धरियेलें।।४९।। कंठीं शोभे रुद्राक्षमाळा। भाळीं झळके चंदन-टिळा। मुखें उच्चारी वेळोवेळां। 'नारायण' शब्द मंजुळ।।५०।। आजानुबाहु भव्यमूर्ति। असे गौरवर्ण अंगकांति। ब्रह्मतेज परम शांति। विलसे सुंदर मुखावरी।।५१।। कोटि मन्मथ ओंवाळोनी। टाकावे ऐशा मुखावरोनी। वर्णूं न शके ही मम वाणी। श्रमेल खचितचि निर्धारें।।५२।। आणिक कुक्षीं एक झोळी। त्यांत भवानीशंकर चंद्रमौळी। याची मूर्ति सुंदर सांबळी-। माजीं विलसे बहुतचि।।५३।। शांत मनोहर सुंदर मूर्ति। बघतां तल्लीन होईल वृत्ति। काय सांगूं आतां श्रोतीं। चित्त देऊनि ऐकावें।।५४।। ऐशापरी एक संन्यासी। कोटितीर्थ-संनिधेंसीं।

सायंकाळीं सूर्यास्तासी। आला गंगावळीकडोनि।।५५।। जेथें बैसले सारस्वत ब्राह्मण। तेथेंचि पातला तो दयाघन। उठले सकलही न लगतां क्षण। घातला साष्टांग प्रणिपात।।५६।। घेतली माथां चरणधूली। पाद प्रक्षाळुनी त्यावेळीं। तीर्थ प्राशन करोनि घातली। प्रदक्षिणा ती ब्राह्मणीं।।५७।। करिती पुनःपुनः नमस्कार। बघती मुखकमल वारंवार। मनीं हर्ष ज़ाहला थोर। केला अभिषेक अश्रुधारें ।।५८।। मग करुनी जयजयकार। केला सद्गुरु-नामाचा गजर। आणि प्रेमपुरःसर शीघ्र। आरंभिलें स्तवन तयांचें।।५९।। जय जय सद्गुरो करुणासागरा। भक्तवत्सला सद्गुणसांद्रा। आम्हां आतां पायीं थारा। देईं तूंचि दयाळा।।६०।। तुझें स्वरूप सद्गुरुमाउले। शांत सुंदर तूं वेल्हाळे। धन्य दिवस हा परमकृपाळे। लाभला आजि आम्हांसी।।६१।। साक्षात् तूं शंकर-अवतार। नाहीं संदेह यांत अणुमात्र। बहुत दिनींचें सुकृत थोर। उदया आलें आजि हें।।६२।। म्हणोनि आम्हां लाभले चरण। नातरी गेला असता प्राण। सकलही विदित तुज़लागोन। अससी सर्वज्ञ तूं देवा।।६३।। हंबरतां वत्स धेनु धांवे। तैसा संकटीं पावसी स्वभावें। उपकार किती तुझे स्मरावे। तूंचि सांगें दयाळा।।६४।। आतां देवा आम्हां आपण। व्हावें सद्गुरु तूंचि ज़ाण। नसे आधार आपुल्यावीण। आम्हांसी अन्य जगतीं या।।६५।। करावें आगमन आमुच्या सांगातीं। रहावें येथेंचि करोनि वस्ती। सकलांचा उद्धार करावा स्वहस्तीं। श्रीगुरुराया कृपाघना।।६६।। देउनी उपदेश निरसीं चिंता। भवभयाची देवा आतां। तुज़वीण आम्हां अन्य त्राता। नाहीं सारस्वतांसी।।६७।। भवानीशंकरें सांगितली खूण। होईल तुम्हां स्वामींचें दरुशन। तोचि सद्गुरु

करा सघन। माझ्याचि अवतार तो पाहीं।।६८।। सत्य झालें देवाचें वचन। खचितचि देखिले आजि चरण। आतां यावें कृपा करोन। आमुच्या स्थानीं दयाळा।।६९।। ऐसें स्तवितां स्तवितां ब्राह्मण। लागती चरणीं होउनी दीन। बघुनी तयांचें म्लान वदन। कळवळलें हृदय सद्गुरूचें।।७०।। कंठ ज़ाहला सद्गदित। विमलांबुधारा नयनीं वर्षत। ठेविला मस्तकीं वरद हस्त। निजभक्तांच्या त्या समयीं।।७१।। आणिक म्हणती 'ना-भीं-ना-भीं'। भवानीशंकरा ऐसी सुरभी। असतां संनिध तुमच्या ती उभी। मग कैंचें भय तुम्हां।।७२।। मज़ही सांगे येवोन। कैलासवासी पार्वतीरमण। भेट देईं तुम्हांलागोन। ऐसा दृष्टांत ज़ाहला मज़।।७३।। म्हणोनि तुम्हां द्यावया दरुशन। येथें आलों लगबगें धांवून। ऐसें ऐकतां सद्गुरुवचन। आनंद चित्तीं न समावे।।७४।। आणि म्हणती सद्गुरुराया। यावें आतां कृपा करोनियां। हेचि प्रार्थना, नत या पायां। झालों देवा कृपाघना।।७५।। तेव्हां सद्गुरु अवश्य म्हणती। ज़ैसी इच्छा तुमच्या चित्तीं। तैसेंचि होवो येऊं सांगातीं। भवानीशंकर समर्थ असे।।७६।। ऐकतां ऐसें सद्गुरुवचन। सकलांसी ज़ाहला आनंद पूर्ण। सकल सामग्री सिद्ध करोन। आणिती तेव्हां लवलाहीं।।७७।। पालखी सज़वूनि सुंदर। माजीं बैसविली मूर्ति मनोहर। घेऊनि संगें वाद्य थोर। मिरवुनी आणिती आनंदें।।७८।। गोकर्ण-ग्रामीं भंडिकेरी। उमामहेश्वर-देउळामाझारीं। गौरवुनी बैसविलें सिंहासनावरी। झाला गजर वाद्यांचा।।७९।। [१]गगनीं दाटलीं विमानें अपार। मूर्ति पाहण्या येती सुरवर। घालिती तेव्हां पृथ्वीवर। पुष्पवृष्टि सुमनांची।।८०।।

१. अदृश्य सृष्टीबद्दल विवरण करितानां अ.४५ ओ. १२ ते २५ पहा.

असो करोनि पादपूजादि समग्र। मांडिला तयांनीं उत्सव थोर। करिती नामाचा जयजयकार। गर्जती अपार प्रेमभरें।।८१।। सोळाशें तीस शकांतरीं। 'सर्वधारी' नाम संवत्सरीं। माघ शुद्ध सप्तमी रविवारीं। झालासे हा समारंभ।।८२।। उत्सवा येती नगरींचे लोक। बघतां स्वामींसी करिती कौतुक। एकमेकांप्रति म्हणती देख। महाबळेश्वर खचितचि हा।।८३।। किती शांत सुंदर मूर्ति। होईल याची मोठी कीर्ति। निंदकांसीही येईल स्फूर्ति। करावें वंदन या ठायीं।।८४।। ऐसें बोलुनी ग्रामींचे जन। निरुपायें गेले गृहालागुन। मनीं धरिले सद्गुरुचरण। भाविक सज्जनीं त्या समयीं।।८५।। असो मग सारस्वतांसी। समाधान झाले सर्वांसी। सद्गुरु भेटला म्हणोनि मानसीं। धीर आला सहजचि।।८६।। त्यासमयीं न लगतां क्षण। प्रसिद्ध झाले सद्गुरु सघन। 'परिज्ञानाश्रम' या नामेंकरून। जगामाजीं सर्वत्र।।८७।। ऐसें असतां गोकर्णाहुनी। कळविली वार्ता नगर-संस्थानीं। आपुल्या सारस्वतांलागुनी। सद्गुरु येथें पातले।।८८।। तेथील जनीं केले काय। सांगती राजासी आमुची माय। सद्गुरु स्वामी प्रेमळ सदय। आली गोकर्ण-ग्रामांतरीं।।८९।। तेव्हां बोले तेथील राव। अधिकाऱ्यांप्रति तुम्ही सर्व। तुमचे स्वामी श्रीगुरुदेव। पाचारूनि भेटवा आम्हांसी।।९०।। ऐसें ऐकतां निरोप घेउनी। कांहीं ज़ण गेले गोकर्णीं। गुरुमूर्ति पाहूं कधीं नयनीं। वाटे उत्सुकता त्यां भक्तां।।९१।। मग घेउनी दरुशन स्वामींचें। चित्तीं आनंदले साचे। म्हणती भाग्य उदेलें आमुचें। परस्परांप्रति त्या वेळीं।।९२।। तेव्हां प्रार्थना करिती सकल। सांगती वृत्तांत स्वामींसी समूळ। यावें नगरासी ये वेळ। म्हणोनि घातलें दंडवत।।९३।। यावरी स्वामी दयाघन। म्हणती भवानीशंकर-कृपेकरून।

नाहीं भय तुम्हांसी ज़ाण। अवश्य येऊं त्या ठायीं।।९४।। ऐसें बोलतां सद्गुरुनाथ। सन्मानें बोलावुनी आणिती त्यांप्रत। नगर-रायासी सांगती वृत्तांत। तैं भेटला राजा स्वामींसी।।९५।। तंव बोले राजा तयांसी। सारस्वतांचें सद्गुरु आपण ऐसी। 'संमतिपत्रिका' पाहिजे आम्हांसी। तरीच संशय फिटेल।।९६।। ज़ाउनी आपण शृंगेरीसी। संमतिपत्र जगद्गुरूपाशीं। मागुनी आणावें, द्यावें मज़सी। ऐसें बोले तो राजा।।९७।। ऐकतां राजयाचे शब्द। सकल सारस्वत ज़ाहले स्तब्ध। परि सद्गुरुस्वामींसी खेद। अणुमात्र चित्तीं न होय।।९८।। काय सांगूं तयांचें वर्णन। श्रोतीं असावें सावधान। लिहावया न पुरे मेदिनी ज़ाण। किंचित बोलूं अवधारा।।९९।। नाहीं अणुमात्र अंगीं अवगुण। अंतरीं परम समाधान। तेवीं पूर्ण ब्रह्मज्ञान-। संपन्न पहा असती ते।।१००।। शिशुपरी बघती सकल जनांसी। तैसेचि समान सुखदुःखांसी। रागद्वेष नाहीं मानसीं। पाहती सारें आत्मरूप।।१०१।। असो राजयाचें ऐकतां वचन। सकलांचें ज़ाहलें भयभीत मन। परि स्वामीसद्गुरूलागून। खेद भय ना अणुमात्र।।१०२।। ज्यासी जगचि मिथ्या दिसे। त्यासी देह खोटा दिसे आपैसें। तेव्हां अभिमान कैंचा वसे। ऐशिया अंगीं सांगा हो।।१०३।। जेथें पाहे तेथें मीचि। आत्मरूप दिसे सर्वचि। तेव्हां आपुली आपणा लाज़ ती कैंची। येईल कवणासी निश्चयें।।१०४।। जेथें असे 'मी-तूं'पणा। तेथेंचि वाटे लज्जा ज़ाणा। म्हणोनि अभिमान वाटे आपणा। अज्ञ जनांसी जगीं या।।१०५।। येथें आपुल्या सद्गुरुराया। परिज्ञानाश्रम-स्वामीया। नसे 'मी-तूं'पण म्हणोनियां। बोलती काय तें ऐकावें।।१०६।। म्हणती जगद्गुरु शंकराचार्य। असती आम्हांसी बहुत प्रिय। ऐशा मिसें दरुशन होय। तेथील

स्वामींचें आम्हांसी।।१०७।। तयां-आम्हांसी नाहीं भेद। अणुमात्र चित्तीं नुपज़े खेद। भवानीशंकर ज़ो कां प्रसिद्ध। कर्ता करविता तोचि पैं।।१०८।। ज़ाऊनि आतां शृंगेरीसी। संमतिपत्र आणूं त्वरेंसीं। मग दावूं तुम्हांसी। प्रेमेंकरोनि राजया।।१०९।। ऐसें बोलोनि उठले तेथून। सिद्ध ज़ाहले न लगतां क्षण। ज़ावया शृंगेरीलागोन। भक्तांसहित त्या समयीं।।११०।। तेव्हां त्वरेंचि भक्तजन। सन्मानें नेती स्वामींसी ज़ाण। पुढें काय ज़ाहलें वर्तमान। सांगूं पुढील अध्यायीं।।१११।। ऐशा गुरूच्या भेटीलागीं। अनंत जन्म घ्यावे हो जगीं। ज्यांचें पुण्य उगवेल वेगीं। त्यांसीच लाभे ही संधि।।११२।। म्हणोनि जेव्हां भेटे गुरुमाय। तेव्हांचि धरावे त्यांचे पाय। तेचि सांगती उपाय। संसारापासुनी तराया।।११३।। आनंदाश्रम-सद्गुरुनाथ। आणि स्वामी शिवानंदतीर्थ। एकचि यांच्या कृपेनें चतुर्थ। अध्याय गुरुदासें संपविला।।११४।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां ताप हरती समग्र। चतुर्थाध्याय रसाळ हा।।११५।। अध्याय ।।४।। ओंव्या।।११५।।ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति चतुर्थोऽध्यायः समाप्तः।।

।। श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीपरिज्ञानाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय जय जय त्रिगुणातीता। निर्विकारा अव्यया अव्यक्ता। बंधमोचका भवभयहर्ता। सद्गुणसांद्रा सुखमूर्ते।।१।। नमो परिज्ञानाश्रम ताता। भक्तजनांच्या पुरविसी आर्ता। न धरिसी अणुमात्र अंतरीं स्वार्था। काय वाखाणूं गुणमहिमा।।२।। परम उदारा शांत दयाळा। धांवलासि नतजनकार्याला। बोधामृत पाज़ुनी उद्धरिलें सकलां। देवा दयाळा तूं पाहीं।।३।। मज़ दावीं आतां वाट। तूंचि कृपा करोनि नीट। वृत्तीचा मार्ग करोनि सपाट। नेईं मोक्षासी बा वेगीं।।४।। असो आतां तुम्ही हो सज्जन। ऐका पुढील वर्तमान। मागील अध्यायाचें निरूपण। बोलूं आतां लवलाहीं।।५।। मागील अध्यायीं परिज्ञानाश्रम। स्वामी सद्गुरु ते गुणग्राम। नगर-संस्थान सोडुनी धाम। ज़ावया निघाले शृंगेरीं।।६।। मग स्वामी शृंगेरीसी। परिवारसहित येती मठासी। उरकुनी स्नान-अनुष्ठानासी। ज़ाती दर्शना देवीच्या।।७।। परि स्वामींसी न पुसे कोणी। बघती सकलही आपुल्या नयनीं। गेले आपापल्या गृहालागुनी। अर्चकादि सकलही।।८।। कुलुप लाविलें देउळाद्वारीं। तैसेंचि ठेविती सायंकालवरी। कोणीही न येती पाहुनी त्यावरी। कळलें अंतरीं स्वामींसी।।९।। केला जनांनीं अपमान। न होय हें स्वामींसी सहन। तेव्हां प्रार्थिती शारदादेवीलागून। भक्तिप्रेमपुरःसर।।१०।। शंकराचार्यें आणिली मूर्ति। काश्मीराहुनी स्थापिली तिज़प्रति। परम सुंदर लावण्यवती। शारदांबा देवी त्या ठायीं।।११।। आळविती तिज़ सद्गुरुस्वामी। खिन्न होउनी अंतर्यामीं। येथें शंका कराल तरी मी। सांगतों विवरुनी आधीं पैं।।१२।। म्हणतां स्वामींचें हृदय शांत। तरी आली कैसी खिन्नता तेथ। तरी सावध करोनि चित्त। अवधारा भाविक चतुर

हो।।१३।। आम्हां अज्ञांचा शोक तो अनिवार। मी कर्ता भोक्ता ऐसा निर्धार। तेंचि ध्यान लागे निरंतर। म्हणोनि शांतता नाहीं पैं।।१४।। परि ज्ञानियांलागीं उदकावरी। अक्षरें काढितां राहती कोठवरी। तैशीच क्षणिक त्यांची खिन्नता सारी। मानी अकर्ता अभोक्ता आपण।।१५।। म्हणोनि ज्ञात्यांच्या अंतःकरणीं। शांतता राहे वास करोनी। भोग्य भोगणें नसतां दोन्ही। भोक्ता कैंचा होईल तो।।१६।। जो भोक्ताचि नव्हे मानी आपण। तया खेद कैंचा होय उत्पन्न। खेद व्हावया काय कारण। तेंचि आतां बोलूं पैं।।१७।। जेथें राहे सदा भेद। तेथें वसे परम खेद। ज्याच्या अंगीं शुद्ध बोध। त्यासी नाहीं भेद तो।।१८।। दांत लागतां ओंठा जाणा। दोष तो द्यावा सांगा कवणा। तैसें ज्ञानिया अन्य दिसेना। म्हणोनि अपमान ना तेथें।।१९।। परि जनीं ज्यांचा असे व्यवहार। त्यांनीं त्यापरि वागणें हें कर्तव्य थोर। अंध नव्हे त्यांचा विचार। मानवांपरी ज्ञानियांचा।।२०।। नाहीं तयांसी दुरभिमान। परि असतो सदभिमान। जरी झाला ज्ञानी पूर्ण। न होय अपराध तो त्यांचा।।२१।। नाटकामाजी घेतां वेष। त्यापरि करावें लागे त्यास। परि विसरेना मी कोण यास। दावी शोक वरीवरी।।२२।। तद्वत् स्वामींचें लक्ष निरंतर। 'असें मी ब्रह्म' ऐसा निर्धार। परि संन्यासी असतां महाथोर। अवमानिलें तें न साहे।।२३।। धर्मस्थापक असतां संन्यासी। सन्मुख करिती अधर्मराशी। कैसें साहेल सांगा तयांसी। म्हणाल काय अधर्म जाहला।।२४।। तरी ऐका संन्याशां अपमान। तोचि अधर्मासी मूळ कारण। त्यावीण थोर पाप आन। नसे कांहीं जगतीं या।।२५।। म्हणोनि स्वामी झाले खिन्न। आणि गेले तेथुनी उठोन। मग करोनि अनुष्ठान। आरंभिलें स्तवन शारदेचें।।२६।।

जय जय भगवते शारदा देवी। भिन्न तूं नससी मज़हूनि पाहीं। नमन करावें कवणा केवीं। सांग सुंदरे करुणाळे।।२७।। तुझें स्वरूप न कळे कवणा। मग कैसें करावें तुझ्या स्तवना। कोण करील त्वद्गुण-वर्णना। प्रणवरूपिणे जगदंबे।।२८।। आम्हां अज्ञांसी न कळे कांहीं। म्हणुनी करितों प्रार्थना तव ही। येईं आतां सन्मुख पाहीं। देईं दरुशन आम्हांसी।।२९।। देउळाचें लाविलें द्वार। करितों पूजा येथेंचि सत्वर। करोनि घेईं स्वीकार। पूजेचा आमुच्या करुणाळे।।३०।। करीं सकलांचें कल्याण। देउनी पूर्ण आशीर्वचन। निंदक वंदक सारे समान। ब्रह्मस्वरूप सर्वही ते।।३१।। काय तुझें तें स्वरूप-लावण्य। येईं आतां संनिधीं ज़ाण। देउनी आम्हांसी प्रेमें दरुशन। सांभाळीं माते गुणसांद्रे।।३२।। ऐसें म्हणोनि ज़ाहले ध्यानस्थ। मानसपूजा आरंभिली तेथ। शारदांबा येउनी बैसत। हृदयांतरीं त्या काळीं।।३३।। साक्षात् शंकर अवतार पूर्ण। असाध्य कैंचें त्यांप्रति ज़ाण। असे संनिधींत येईल कोठून। परि दावीत लोकां चमत्कार।।३४।। मग करोनि षोडशोपचार। पूजा भक्तिप्रेमपुरःसर। आपुल्याकडे आकर्षिलें समग्र। तेज देवीचें तपोबळें।।३५।। अहाहा तें सामर्थ्य काय। तपोबळाचें थोर होय। स्वामी समर्थ सद्गुरुराय। धन्य धन्य तयांची।।३६।। ऐशी त्यांनीं करुनी पूजा। तोषविलें पूर्ण तिज़ला सहज़ा। प्रसन्न होउनी भक्तकाज़ा। सिद्ध ज़ाहली वेल्हाळ ती।।३७।। म्हणे मद्भक्ता परमश्रेष्ठा। प्रसन्न ज़ाहल्यें तुज़ला आतां। ऐसें म्हणाया लाज़ वाटे चित्ता। प्रभो शंकरा गुरुराया।।३८।। कारण तूं सकळ देवांचा देव। तुज़हुनी नाहीं दाविता ठाव। निजरूपाचा, म्हणोनि सर्व। येती शरण तुज़लागीं।।३९।। ऐशा सद्गुरो तुझें दरुशन। घ्यावया आल्यें मी धावोन। तुझ्या संगतीं

येत्यें येथून। म्हणोनि अदृश्य ज़ाहली।।४०।। मग ज़ाहला चमत्कार।शृंगेरी मठाचे स्वामी गुरुवर। पहुडले असतां रात्रीं थोर। देखती स्वप्न अद्भुत तें।।४१।। म्हणे सरस्वती जगद्गुरूंसी। काय झालें तुझिया मठासी। न कळे कांहीं बापा तुज़सी। अपराध थोर त्वां केला।।४२।। येथें येउनी कैलासनाथ। राहिला असतां परिवारासहित। योग्य सन्मान तयांप्रत। दिधला नाहीं तुमच्या जनीं।।४३।। इतुकेंचि नव्हे आणिक एक। सांगत्यें चित्त देउनी ऐक। येतां भेटीस ते माझ्या देख। पूजारी गेले द्वार झांकोनि।।४४।। ऐसा त्यांचा ज़ाहला अपमान। पाहुनी कळवळलें माझें मन। आतां ज़ात्यें मी येथोन। त्यांचिया संगें खचितचि।।४५।। ऐसें सांगोनि शारदांबा। अदृश्य ज़ाहली ती जगदंबा। तैं जगद्गुरूंसी वाटे अचंबा। करिती विचार बहु मनीं।।४६।। मग उठोनि लगबगेंसीं। पाचारोनि सांगती जनांसी। ज़ाऊं आतां राउळासी। पूजासामग्री सिद्ध करा।।४७।। ऐसें म्हणोनि स्नानादिक। करूनि नित्याचें आन्हिक। गेले पूजेसी अंबेसन्मुख। राहिले उभे त्या वेळीं।।४८।। मूर्ति बघतां दचकले भारी। कळा उतरली देवीची सारी। आतां काय करावें, म्हणती अंतरीं। खरा दृष्टांत रात्रींचा।।४९।। तेव्हां बोलावूनि निजपरिवारासी। म्हणती कोण नूतन आले, आम्हांसी। सांगा आतां, तुम्हीं तयांसी। कां न केला सन्मान।।५०।। योग्य प्रकारें करावा सन्मान। ऐसें असतां गेलां पळोन। रात्रीं पाहिलें आम्हीं स्वप्न। देवी क्षोभली आम्हांवरी।।५१।। बघा देवीचें गेलें तेज। मुखकमलींचें कैसें आज़। सांगा घडला वृत्तांत ज़ो निज। म्हणोनि क्षोभले तयांवरी।।५२।। तेव्हां सांगती सकल वृत्तांत। अपराध ज़ाहला आमुचा अत्यंत। क्षमा करावी, आतां तयांप्रत। सन्मानूनि आणूं गुरुराया।।५३।। सारस्वत ब्राह्मणांचे

स्वामी। अज़ूनी असती याचि ग्रामीं। तयांसंनिधीं ज़ाउनी आम्हीं। आणूं बोलावुनी आज्ञेपरी।।५४।। मग जगद्गुरु निजपरिवारासहित। आले स्वामी असती जेथ। घेतली आदरें तयांची भेट। आणि बोलिले तें ऐकावें।।५५।। आमुच्या जनांचा अपराध थोर। नाहीं केला आपुला सत्कार। क्षमा करावी तयां साचार। ऐसें विनविते ज़ाहले।।५६।। यावरी बोलती स्वामी सुंदर। अपराध कवणाचा नाहीं, सर्वत्र। भरला प्रभु भवानीशंकर। दोषातीत असे तो।।५७।। ऐकतां ऐसें स्वामींचें वचन। आणि ब्रह्मतेजाचें पाहतां वदन। संतोषलें जगद्गुरूंचें अंतःकरण। मग प्रेमें बोलती उभयतां।।५८।। तेव्हां तयांचें कळलें संपूर्ण। विद्वत्ता आणि तपोबल पूर्ण। स्वप्नीं सांगितली जी खूण। सत्य वाटली त्यांलागीं।।५९।। शारदादेवीचें तेज तें ज़ाण। घेतलें यांनीं आकर्षून। ऐसी योग्यता आहे पूर्ण। सत्य सत्य यांच्यांत।।६०।। ऐसें म्हणोनि अंतर्यामीं। विचार करिती जगद्गुरु स्वामी। कीं शारदादेवीचें तेज तें आम्हीं। घेऊं माघारें विनवोनि ।।६१।। नातरी आपुल्या पवित्र मठाची। कीर्ति नष्ट होईल साची। म्हणोनि कला शारदेची। मागुनी घ्यावी त्यांपाशीं ।।६२।। ऐसें विचारोनि मानसीं। म्हणती आमुच्या स्वामींसी। शारदादेवीची कला ज़ैसी। घेतली तैसी द्या हो।।६३।। करावें पुनरपि आवाहन। कलेचें प्रतिमेमाजीं पूर्ण। ऐकतां तयांचें प्रेमळ वचन। डोलविती मान स्मितमुखें।।६४।। अवश्य देऊं कला तेज आतां। नका करूं कांहीं चिंता। सकलही कर्ता करविता। तोचि भवानीशंकर।।६५।। ऐसे ऐकतां मधुर बोल। जगद्गुरूंच्या आनंदा नाहीं मोल। त्वरेंचि आणवुनी वाज़ंत्री ढोल। मिरवित नेलें मठासी।।६६।। देउनी नाना वस्त्रें भूषणें। गौरविलें बहुत सन्मानानें। आणि देउळीं नेउनी त्वरेनें। देवविलें

दरुशन देवीचें।।६७।। मग आमुच्या सद्गुरुनाथें। काय केलें सांगतों मी तें। करिते ज़ाहले एकाग्र चित्तें। अनुष्ठान थोर त्या स्थानीं।।६८।। आणि करिती प्रार्थना स्तवन। म्हणती शारदे बिंबीं येऊन। बैसें तूं आतां सकलां दरुशन। देईं झडकरी माउलिये।।६९।। ऐसें बोलतां स्वामी सुकुमार। काय ज़ाहला चमत्कार। मुखकमळीं तेज तें अनिवार। झळकलें शारदा देवीच्या।।७०।। बघतां सकलही आश्चर्यचकित। जगद्गुरु तोषले मानसीं बहुत। मग घातलें दंडवत। जगद्गुरूंनीं तेवेळीं।।७१।। उपरी केला सन्मान। संस्थाना शोभे ऐसें भूषण। छत्रचामरादि बिरुदावळी अर्पण। केली आमुच्या स्वामींसी।।७२।। आणिक 'आडवी पालखी' याचा। अधिकार दिधला मनःपूर्वक साचा। यावरी म्हणती कांहीं तुमचा। हेतू असेल तो सांगावा।।७३।। येथें येण्याचें काय कारण। नाहीं पुसिलें आपुल्यालागुन। आतां सांगावें काय तें पूर्ण। करूं कार्य आपुलें पैं।।७४।। यावरी बोलती सद्गुरुस्वामी। पुसतां तें कारण सांगतों आम्हीं। ''संमतिपत्र आणावें तुम्हीं'। म्हणोनि रायें पाठविलें।।७५।। नगर-संस्थानींचा राव। म्हणे तुम्ही सारस्वत हे सर्व। यांचे स्वामी होय हा ठराव। सिद्ध करोनि दावा पैं।।७६।। ज़ाउनी शृंगेरी मठासी ज़ाण। आणावें संमतिपत्र जगद्गुरूंकडून। दाखवावें आम्हांलागून। ऐसें बोले तो राव''।।७७।। तेव्हां स्वामी जगद्गुरु यांनीं। दिधलें संमतिपत्र तत्क्षणीं। मग सद्गुरु संतोषोनि। परतले परिवारासमवेत।।७८।। आश्विन शुद्ध नवमी दिवशीं। अद्यापिही शृंगेरीसी। आमुच्या सारस्वत जनांसी। प्रथम सन्मान देती पैं।।७९।। मग नगर-संस्थानीं रायाप्रती। भेटावयासी सद्गुरु ज़ाती। संमतिपत्र तया दाखविती। पाहुनी संतोषला तो राव।।८०।। त्यानें साष्टांग घातलें दंडवत।

म्हणे अपराध माझा झाला बहुत। क्षमा करोनि बालकाप्रत। रक्षीं देवा दयाळा।।८१।। नकळतां आपुला महिमा अगाध। शिणविलें आपुल्यासी बहुविध। उद्धरीं आतां हा मतिमंद। असे शरण या पायीं।।८२।। ऐकुनियां आपुली कीर्ति। आकर्षिली शारदांबेची कांति। क्रोध नाहीं अणुमात्र चित्तीं। प्रार्थितां दिधली पुनरपि।।८३।। यापरि शृंगेरी-ग्रामीं सकल। महिमा दाविली तेथें विपुल । ऐकतां वर्णन पाषाणही विरेल। काय पाड मानवांचा।।८४।। ऐसें करोनि रायानें स्तवन। गौरविलें बहुत सन्मानेंकरून। मग गुरुनाथें गोकर्णीं गमन। केलें परिवारासहीत पैं।।८५।। राहीले येवोनि मठांतरीं। आनंदले ग्रामींचे नर नारी। केला उत्सव नानापरी। अति प्रेमानें त्या वेळीं।।८६।। असो कांहीं दिवस गेले। सद्गुरुस्वामींच्या कृपाबळें। राहती सुखानें तये वेळे। सांगतों वृत्तांत पुढील तो।।८७।। श्रीसद्गुरुस्वामीलागीं। वाटे कीं मी असोनि त्यागी। म्हणिजे आपण संन्यासी योगी। असतां येथेंचि कां राहूं।।८८।। सदा सर्वदा मठामाजीं। राहणें उचित नव्हे सहजीं। तीर्थयात्रा करणें आजि। कर्तव्य आमुचें हेंचि पैं।।८९।। ऐसा विचार करुनी मानसीं। निवेदिला हेतू भक्तांपाशीं। ऐकतां ताप जाहला सकलांसी। काय सांगूं ती कथा।।९०।। पडली जणूं वीज अंगावरी। अथवा भूकंप झाला सत्वरी। ऐसें वाटूनियां नरनारी। करिती आकांत ते समयीं।।९१।। लागले चरणीं तये वेळ। करिती प्रार्थना मिळुनी सकल। मंजुळ स्वरें परम कोमल। संनिधीपाशीं त्या काळीं।।९२।। प्रभो देवा सद्गुरुराया। करुणा करीं आम्हांवरी सदया। नका जाऊं टाकूनियां। अज्ञ बालकां आम्हां हो।।९३।। धेनु टाकितां निजवत्सासी। त्याची गति होईल कैसी। हें सांगावें

नलगे तुम्हांसी। अज्ञ म्हणोनि विनवितों।।९४।। माता अव्हेरुनी गेली बाळासी। तरी त्याची गति होईल कैसी। कोण सांभाळील तयासी। सांगा प्रभो दयाळा।।९५।। तद्वत् आम्हां दीन बालकां। टाकितां आपदा येईल देखा। कोण सांगूनि आम्हां विवेका। तारील स्वामी गुरुराया।।९६।। शिकवी कोण स्वधर्म सारा। येईल कैसा चित्ता थारा। तुज़वांचोनि सर्व पसारा। सांभाळील कोण सांगा हो।।९७।। नाना आभरणें वस्त्रें सुंदर। रूप लावण्य वर्ण गौर। परि कपाळीं कुंकूं नसतां सुकुमार। काय शोभा तियेची।।९८।। तैसे आम्ही सकल भक्त। नसतां सद्गुरु देशीं सतत। कैंच्या सुखासाठीं ज़गावें जगांत। त्याहुनी मरणें योग्य गमे।।९९।। म्हणोनि देवा दयाळा आतां। नका ज़ाऊं सोडुनी ताता। उद्धरावया आपुल्या भक्तां। रहावें येथेंचि आनंदें।।१००।। यावरी बोलती सद्गुरुराय। येथें आमुचें काज़ काय। हृदयीं धरोनि सद्गुरुपाय। रहा सुखानें सकलही।।१०१।। सद्गुरु व्यापक सर्वत्र भरला। घडिघडी आठवा या मद्वाक्याला। नश्वर ज़ाणा दिसे ज़ें तुम्हाला। शाश्वत तें एक परब्रह्म।।१०२।। नश्वर ऐशा या देहासी। भुलुनी शेवटीं ज़ावें फांशीं। यमराजाच्या दरबारासी। कर्मापरी आपापुल्या।।१०३।। फिरुनी लक्ष चौऱ्यांशीं योनी। येई मनुष्य-जन्मालागुनी। हा अमोलिक जन्म दिनरजनीं। विषयसुखांत घालूं नये।।१०४।। मी कोण कोठला याचा विचार। करावा मानवें अहोरात्र। तरीच होईल तयांचा उद्धार। गुरुकृपेनें सहज़चि।।१०५।। म्हणोनि तुम्ही करा विचार। निजस्वरूपाचा वारंवार। देह मी नव्हें ऐसा निर्धार। धरा निर्मल चित्तानें।।१०६।। मग होईल परम ज्ञान। यामाजीं नसे अनुमान। करा निर्मल अंतःकरण। तरीच कार्य साधेल।।१०७।। असो आतां

आम्ही ज़ाण। ज़ाऊं कराया तीर्थाटन। सद्गुरुकृपा असे परिपूर्ण। तुम्हांवरी खचित पैं।।१०८।। ऐसें ऐकतां सद्गुरुवचन। झालें सर्वांचें मन उद्विग्न। म्हणती देवा न करीं कठिण। आम्हांवरी हृदय तें।।१०९।। बालका मातेवीण पुसे कवण। सांगा हो देवा आम्हांलागून। ज़ावें आतां कवणा शरण। प्रभो गुरुनाथा दयाळा।।११०।। देउनी आम्हांसी दरुशन। सुखविलें सकलांसी कांहीं दिन। आतां गेलां ज़री टाकून। ज़ाईल प्राण आमुचा हा।।१११।। दीप नसतां ज़ैसें सदन। अंधारें उपयोगा न ये ज़ाण। तैसें श्रीसद्गुरूवांचून। जिणें आमुचें व्यर्थचि।।११२।। ऐसी नानापरी करुनी प्रार्थना। म्लान वदनें भाकिली करुणा। आणि घालुनी लोटांगणा। वर्षला पर्जन्य अश्रूंचा।।११३।। यापरी प्रार्थितां बहुत। द्रवलें सद्गुरुस्वामींचें चित्त। म्हणती तुमच्या भक्तीनें आम्हांप्रत। बांधिलें तें सोडवेना।।११४।। तेव्हां संतोषले समस्त। राहवुनी घेतलें तयांप्रत। मठामाजीं प्रेमानें बहुत। सारस्वतवृंदानें तेधवां।।११५।। लोटल्यावरी कांहीं दिवस। नगर-संस्थानींच्या जनांस। कळविलें इकडील वृत्तांतास। गोकर्णींच्या जनांनीं।।११६।। पुढील अध्यायीं हेंचि निरूपण। सांगूं तुम्हां विस्तारून। शाश्वत मठ तेथें बांधून। शिष्यस्वीकारही करविला ।।११७।। श्रीसद्गुरु आनंदाश्रम। आणि शिवानंदतीर्थ सद्गुरु परम। यांच्या प्रसादें पंचम। अध्याय गुरुदासें संपविला।।११८।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां दैन्य हरेल समग्र। पंचमाध्याय रसाळ हा।।११९।। अध्याय ५।। ओंव्या।।११९।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति पंचमोऽध्यायः समाप्तः।।

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

।।श्रीगणेशाय नमः।।श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीपरिज्ञानाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ जय जय सद्गुरो देवा सदया। करुणाकरा निजबाळासी या। पार घालीं कृपा करोनियां। भवसागरांतूनि पैं।।१।। तूंचि करविसी कार्य समस्त। ऐसा धरोनि चित्तीं भावार्थ। पुढें सरसावलों स्मरुनी तुज़प्रत। तूंचि सफल करीं हें आतां।।२।। मातेवीण बालका आधार। कोणी नाहीं पृथ्वीवर। तैसा तूं मज़ सद्गुरु सुखकर। आधार सर्वांसी असशी पैं।।३।। आधार म्हणिजे अधिष्ठान। असशी तूंचि सकलां ज़ाण। मग कैसा राहूं भिन्न। तुज़हुनी देवा दयाळा।।४।। समुद्र लाटेसी होय अधिष्ठान। तेव्हां लाट कैसी होईल भिन्न। अलंकार सुवर्णाहून। न राहे वेगळा कदापि।।५।। तैसा देवा तुज़वांचोन। नच मी कधींही राहें भिन्न। परि ना समज़े मज़लागोन। तूंचि दयाळा शिकवीं बा।।६।। असो आतां ऐका सज्जन। मागील अध्यायीं नगरासी ज़ाण। धाडिलें पत्र सारस्वतांलागून। गोकर्णाहुनी प्रमुख जनीं।।७।। बघतां पत्र तेथील लोक। भक्तवृंद सारे प्रमुख। गोकर्णग्रामीं धांवुनी देख। आले लगबगें त्या ठायीं।।८।। भेट घेऊनि सद्गुरु-स्वामींची। करिती प्रार्थना चरणीं साची। म्हणती दयाळा रहावें येथेंचि। म्हणोनि घातलें लोटांगण।।९।। आम्हां बालकां सोडुनी येथ। न ज़ावें ऐसें प्रार्थितों तुज़प्रत। कांहीं अपराध ज़री होत। तरी करावी क्षमाचि बा ।।१०।। ज़ावया निघालां ऐसी वार्ता। ऐकुनी आलों चरणीं ताता । कृपा करोनि त्वां बा आतां। रहावें येथेंचि कृपानिधे।।११।। ऐकुनी सकल जनांची प्रार्थना। तोषला चित्तीं सद्गुरुराणा। आणि म्हणती न करा अनुमाना। निर्भय मानसीं असा हो।।१२।। तुमच्या भक्तीच्या दोरीनें आम्हांस। बांधिले तें न सुटे खास।नका

होऊं तुम्हीं उदास। राहूं आम्ही येथेंचि।।१३।। मातेसी न लगे सांगणें येथ। कीं बालकाचें रक्षण करीं तूं सतत। तैसें आपुल्या निजभक्तांप्रत। स्वयें गुरुनाथ सांभाळी।।१४।। ज़ैसें भक्तांसी सद्गुरुप्रेम। तैसेचि निजभक्त सद्गुरूसी परम। प्रियकर असती ऐसा नेम। असे सहज़चि निर्धारें।।१५।। निजभक्तांच्या प्रेमासाठीं। अवतार धरितो जगजेठी। मग आम्ही कैसे ज़ाऊं उठाउठीं। सांगा पाहूं आतां पैं।।१६।। तुमच्याकरितांचि आमुचा अवतार। तेव्हां ज़ाऊं कुठें भूवर। परि पाहिला निर्धार। भक्तजनांचा आम्हीं पैं।।१७।। आतां तुम्ही सुखानें शांत। रहा धरोनि नाम सतत। हृदयीं आठवा प्रभुवर समर्थ। भवानीशंकर तो पाहीं।।१८।। ज़ें ज़ें दिसतें तें तें सर्व। पहा सारा एकचि देव। ऐसा धरितां दृढभाव। पार करील तोचि पैं।।१९।। हातानें ज़ें करितां काम। तें असावें शुद्ध उत्तम। तरी ती सेवा होय सुगम। परमेश्वराची पाहीं पां।।२०।। सर्वांठायीं भगवद्भाव। धरोनि करावा व्यवहार सर्व। तेव्हां होईल संतुष्ट देव। नसे संशय यामाजीं।।२१।। होतां संतुष्ट परमेश्वर। सहज़चि होईल उद्धार। म्हणोनि धरा निरंतर। ध्यान त्या गुरुदेवाचें।।२२।। करितां ध्यान वारंवार। सारें जगचि दिसेल साचार। कीं भगवद्रूप खचितचि, निर्धार। धरा चित्तीं निजप्रेमें।।२३।। ऐसें तेव्हां ऐकतां वचन। श्रीसद्गुरूचें प्रेमळ भाषण। गुंगुनी गेले सकल सज्जन। प्रेमळ भक्त त्यावेळीं।।२४।। यावरी करोनि नमस्कार। निरोप घेऊनि सत्वर। गृहासी परतले नगराचे नर। धरोनि मानसीं गुरुमूर्ति।।२५।। यावरी करोनि सर्वीं विचार। सद्गुरु-आज्ञा घेऊनि सत्वर। मठ बांधावया उत्तम सुंदर। केली सिद्धता त्या समयीं।।२६।। मग गेले नगरासी। संस्थानांतुनी बहुवसी। लांकुडें मठ बांधावयासी।

राजाज्ञेनें मिळालीं।।२७।। मग बांधोनि सत्वर सुरेख। मठ तयार केला देख। आणि सद्गुरुस्वामींसन्मुख। प्रार्थना केली ती ऐका।।२८।। भवानीशंकर-देवासमवेत। येथेंचि राहावें आपण सतत। अवश्य म्हणुनी सद्गुरुनाथ। राहीले अत्यंत प्रेमानें।।२९।। मग करिती तेथें भक्त। गुरुमुखें श्रवण परमार्थ। ऐसें असतां सुखानें शांत। गेलीं कांहीं वरुषें तीं।।३०।। एके दिनीं भक्त मिळोनि। प्रार्थिती संनिधीं येवोनि। शिष्यस्वीकार करावा झणीं। कृपा करोनि आम्हांवरी।।३१।। पुढें गुरुपरंपरा अनुदिनीं। चालावी शाश्वत ऐसीच धरणीं। ज़री आज्ञा द्याल कृपा करोनी। तरी आम्ही प्रयत्न करूं।।३२।। पाहुनी जनांचें भक्तिप्रेम। आनंदलें स्वामींचें हृदय परम। म्हणती शिष्यस्वीकार करूं, प्रेम। धरा त्या ठायीं मीचि असें।।३३।। ऐकुनी तेव्हां आनंदले चित्तीं। भक्तजन ते कार्या लागती। कोणता शिष्य करावा निश्चितीं। ऐसा विचार चालविला।।३४।। तेव्हां एक हरिटेकार। यांचा वंशज परम पवित्र। कृष्णय्या कुलकर्णी यांचा पुत्र। मर्तू याज़ला निवडिला।।३५।। अंगीं असती बहुत सद्गुण। क्षमा शांति वसे पूर्ण। आणि भक्तिप्रेम बहुत ज़ाण। ऐसा पुत्र तो देखा।।३६।। म्हणूनि तोचि शिष्य पटासी। योग्य ऐसें वाटुनी सर्वांसी। विचारिते झाले कृष्णय्यासी। काय तें आतां अवधारा।।३७।। म्हणती तेव्हां दहा लोक। कृष्णय्या तुमचा पुत्र देख। शिष्यपटासी योग्य सुरेख। म्हणोनि आलों मागावया।।३८।। यावरी बोले कृष्णय्या कुलकर्णी। ''एकुलता एक पुत्र सुलक्षणी। तस्मात् द्यावया अंतःकरणीं। खेद वाटतो बहुतचि।।३९।। म्हणोनि मागतों संनिधीपाशीं। क्षमा करावी मज़ला ऐसी। प्रार्थना करितों निज-

भावेंसीं''। ऐकतां खिन्न झाले जन ।।४०।। मग बोलती एकमेकांज़वळी। करावें काय आम्हीं या वेळीं। ऐसें सुपात्र कोणत्या स्थळीं। मिळेल कैसें कळेना।।४१।। यावरी सकलांनीं करोनि विचार। नगर-संस्थानीं जनांसी सविस्तर। कळविली वार्ता लिहोनि पत्र। धाडिलें झडकरी त्या समयीं।।४२।। बघतां पत्र नगरींच्या सुजनीं। उत्तर दिधलें गोकर्णालागुनी। दहा ज़णांसी न लागतां क्षणीं। युक्तिपूर्वक तेव्हां पैं।।४३।। ''कृष्णय्यासी घालावी समज़ूत। कीं तुम्ही देतां आपुला सुत। मठाचें आधिपत्य तुमच्याप्रत। देऊं सर्व आम्ही हो।।४४।। आणिक यापुढें तुमचाचि वंशज। शिष्य निवडुनी आणूं सहज़। ऐसें सांगतां तरीच काज़। होईल सारें निश्चयें''।।४५।। ऐसें पत्र पोंचतां गोकर्णीं। विचारण्या कृष्णय्यालागुनी। गेले सकलही धांवोनी। अति उल्हासें लगबगें।।४६।। भेटूनियां कृष्णय्यासी। म्हणती सकलही सांगतों तुम्हांसी। ज़री मान्य होईल तुम्हांसी। तरी अंगीकार करा हो।।४७।। तुमच्या पुत्राऐसा सद्गुणी। धुंडितां मिळेना साऱ्या स्वजनीं। आतां द्यावा तोचि म्हणोनि। सांगतों गोष्ट ऐका ती।।४८।। आधिपत्य देऊं मठाचें सकल। तुम्हांसीच खचितचि ये वेळ। पुढेंही तुमचाचि वंशज निर्मल। निवडूं शिष्यपट द्यावयासी।।४९।। यावरी म्हणे कृष्णय्या जनांसी। ऐसीच इच्छा ज़री तुमच्या मानसीं। देऊं पुत्र, सर्व कबूल मज़सी। ऐकुनी आनंदले सकलही।।५०।। तेव्हां धाडिती पत्र नगराप्रती। आपुले जन ज़ेथें असती। मग ते सकल गोकर्णा येती। अति आनंदें परियेसा।।५१।। तेव्हां करोनि करारपत्र। लिहिला विचार केला ज़ो समग्र। त्याहुनी आणिक एक साचार। लिहिलें काय तें सांगूं पैं।।५२।। ज़री कृष्णय्या यांच्या वंशजीं। न मिळे योग्यसा मुलगा

सहजीं। तरी त्यांनींच़ दुज्या वंशामाजीं। शोधूनि दिला तोचि शिष्य करूं।।५३।। ऐसें एक करारपत्र। करुनी दिधलें कृष्णय्यासी शीघ्र। दहा ज़णांनीं तेव्हां समग्र। केली सिद्धता त्या समयीं।।५४।। मग पाचारुनी कृष्णय्या-सुतासी। 'मर्तू' या नामें बाहती ज्यासी। मिरवुनी नेला निजमठासी। मोठ्या थाटें त्या समयीं।।५५।। नंतर तयांनीं विधिपूर्वक। केलीं कर्में सकलही देख। विरजा-होमादि करुनी च़ोख। संपादिलें कार्य सर्वही।।५६।। सोळाशें बेचाळ शकामाझ़ारीं। शार्वरी संवत्सर शनिवारीं। चैत्र शुद्ध पौर्णिमेच्या अवसरीं। केला उपदेश गुरुनाथें।।५७।। एवं झ़ाला शिष्य-स्वीकार। अभिधान देउनी 'शंकराश्रम' सुंदर। करिती सकलही महाथोर। उत्सव परम उत्कृष्ट तो।।५८।। स्वर्गींच़े सुरवर सुमनवृष्टि। करिती गुप्तपणें आणि म्हणती। धन्य ते नर राहती जगतीं। सद्गुरुसंगें प्रेमानें ज़े।।५९।। यापरि समारंभ गोकर्णग्रामीं। ज़ाहला मठामाजीं नामी। द्वितीय सद्गुरु शंकराश्रमस्वामी। साक्षात् अवतार विष्णूच़ा।।६०।। असो तेव्हां सकल मिळोनि। कृष्णय्यासी म्हणती आजिपासोनि। तुम्हां आणि संततीलागूनि। 'शुक्ल' भटजी हें नाम असो।।६१।। ज़ैसा वाढे शुक्लपक्षींच़ा चंद्र। तैसा वाढो तव वंशसमुद्र। ऐसा आशीर्वाद सद्गुरु यतींद्र। देती तुम्हां निजमानसीं।।६२।। म्हणोनि 'शुक्लभट्ट' किताब तुज़ला। वंशपरंपरा असे पहा, दिधला। उपकार मोठा आम्हांवरी झ़ाला। तुझ़ा, कृष्णय्या धन्य तुझी।।६३।। ऐसें म्हणुनी कृष्णय्यासी। वचनापरी 'मणेगार' नेमला त्यांसी। अर्थात् मठाच़े आधिपत्य-कामासी। नेमिला सकल जनांनीं त्या।।६४।। मग गेले सकल लोक। मनीं धरोनि सद्गुरु-विवेक। आपापुल्या ग्रामीं अनेक। नगरसंस्थाना परतूनि।।६५।।

असो ऐसा हा कृष्णय्या कुलकर्णी। यांच्या पुण्य-संततीपासोनी। तीन शाखा पहा होवोनी। नांदती अद्यापि अवनीं या।।६६।। मंगलूर-शिराली-मल्लापूर-। ग्रामीं अद्यापिही नांदती थोर। 'शुक्लभट्ट' या नामें साचार। असो नमन तयांसी।।६७।। स्वामींच्या जन्म ज्यांच्या वंशीं। तो वंशचि असे पुण्यराशी। काय वर्णावें ऐशा वंशासी। सद्गुरु जन्मले ज्यामाजीं।।६८।। विपुल पुण्य पाहिजे ज़ाण। व्हावया ऐशा सद्गुरूचें दरुशन। म्हणोनि जेव्हां भेटे तो दयाघन। तत्काळ शरण ज़ावें तया।।६९।। तोचि दावी खरा मार्ग। दिसे हें ज़ें तें मिथ्या जग। आणिक येथील सर्वही भोग। असती मिथ्या ते ज़ाणा।।७०।। ऐसा विचार न येई आम्हांसी। म्हणोनीच ज़ावें सद्गुरुपाशीं। त्यांचे विचार घेऊनि मानसीं। धरावे दृढतर ते पाहीं।।७१ ।। ज़ातां त्यासी अनन्य शरण। तोचि उद्धरी आम्हांलागुन। परि करावा परम प्रयत्न। आपणचि ज़ाणा तो पाहीं।।७२।। ज़री घेतला गुरु-उपदेश। गुरु न करी साधन-अभ्यास। आपणचि करावा प्रयत्न विशेष। फलदाता असे सद्गुरु तो।।७३।। बीज पेरितांचि झ़ाड नुगवे। तयासी प्रयत्न बहुविध करावे। तरीच उगवोनि वाढे स्वभावें। फल लाभेल त्यानंतरीं।।७४।। घालुनी खत पाणी सर्व। आपणचि कष्ट करावे सदैव। तरीच फल देईल तो देव। नातरी काय करील तो।।७५।। तैसें येथें श्रीगुरुराव। देईल पहा ज्ञान अपूर्व। परि करावा प्रयत्न सर्व। साधन-अभ्यासें करोनि।।७६।। एवं सद्गुरु-देव एक। परम श्रेष्ठ असे व्यापक। स्वरूप त्याचें न वर्णवे देख। कवणाचेनि निर्धारें।।७७।। पुढील अध्यायीं शंकराश्रमस्वामींचें। सद्गुणवर्णन करूं साचें। आणि परिज्ञानाश्रमगुरूंचें। होय गमन निजधामा।।७८।। ऐशा सद्गुरुमाऊली प्रति। आठवितां लाभ ज्ञानविरक्ति ।

तेणें होय सहज़ प्राप्ति। निजस्वरूपाची तात्काळ।।७९।। आनंदाश्रम-सद्गुरु श्रेष्ठ। शिवानंदतीर्थ ब्रह्मनिष्ठ। एकचि यांच्या प्रसादें षष्ठ। अध्याय गुरुदासें संपविला।।८०।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां येत सद्विचार। षष्ठाध्याय रसाळ हा।।८१।। अध्याय।।६।। ओंव्या।।८१।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति षष्ठोऽध्यायः समाप्तः।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीपरिज्ञानाश्रमगुरुभ्यो नमः।।श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।।
जय जया जी श्रीगुरुदेवा। भक्तवत्सला करुणार्णवा। उद्धरिसी तूं सकलां जडजीवां। निजकृपेनें लडिवाळें।।१।। जय जय सद्गुरो ऐशा तुज़ला। नमितों दावीं परम सुखाला। देईं सुमति वर्णायाला। तव गुणमहिमा तूंचि बा।।२।। परिसें आतां देवा दयाळा। धरितों हृदयीं चरणकमळां। महिमा ऐकुनी प्रार्थितों ये वेळां। तूंचि कृपाळू बाळासी।।३।। असो आतां श्रोते हो सज्जन। सांगूं मागील कथेचें अनुसंधान। शिष्यस्वीकार होऊन। झ़ाले चौदा दिन ते पैं।।४।। सोळाशें बेचाळ शकांतरीं। शार्वरी नाम संवत्सरीं। चैत्र वद्य चतुर्दशी रविवारीं। झ़ाली वार्ता ती सांगूं।।५।। पहाटे उठतांक्षणीं स्वामी। बाहुनी म्हणती भक्तां आम्ही। सांगतों तें चित्तीं धरा तुम्ही। आणि रहा सुखानें।।६।। करावा स्वधर्म आपुला आपण। न करावी निंदा परधर्माची ज़ाण। तेव्हां करी तोचि रक्षण। प्रभु भवानीशंकर।।७।। ज़री आपुला कठिण धर्म। तरीही करावा धरोनि प्रेम। तेव्हांचि कळे आत्माराम। कोण मी कैसा हें पाहीं।।८।। स्वधर्म हीच़ मोक्षाची वाट। त्याविण ज़ावया न होय नीट। ज़री होतील तेथें कष्ट। तरी भिऊं नये किमपिही।।९।। ज्याचिया अंगीं दुखणें असतें। तेणें कडुनिंबा घ्यावें लागतें। कंटाळतां न ये उपयोगातें। न ज़ाय तें दुखणें त्याविण।।१०।। तैसा स्वधर्म ज़री कठिण। तेणेंच़ तरुनी ज़ाऊं आपण। नातरी पुनरपि जनन मरण-। फेऱ्या लागती घालावया।।११।। ज़री आपुली माता कुबडी। तरी बालका तिचीच़ आवडी। तिच्याचि प्रेमें आपण सांकडीं। ज़गतों खचित निश्चयेंसीं।।१२।। ज़री कुबडी होय ती माता। प्रेमा कुबडा न होय सर्वथा। येर रंभेहुनी सुंदर वनिता। बालका ती कैशी प्रिय

होय।।१३।। आपुल्या मातृप्रेमाच्या अभावीं। येरावरी प्रेम करवेल केवीं। तैसा स्वधर्म हाचि दावी। मोक्षमार्ग आपणांतें।।१४।। पाण्याहुनी तूप बहुमोल। परि त्यांत मासा कैसा ज़गेल। तैसें स्वधर्म सोडुनी परधर्म धरील। तरी होतील कष्ट बहु।।१५।। म्हणोनि स्वधर्मेंचि करा व्यवहार। मग सहज़चि येईल अधिकार। परमार्थाच़ा यांत लवमात्र। संशय न धरा तुम्ही हो।।१६।। करितां स्वधर्म कर्म थोर। होय चित्तशुद्धि साचार। मग होय ज्ञान अनिवार। निजानंद-स्वरूपाच़ें।।१७।। विवेक वैराग्य-शमादिषट्क। मुमुक्षुत्व मिळुनी चारही देख। साधनें अंगीं असतां सकळिक। येई अधिकार श्रवणासी।।१८।। श्रवण करितां होय मनन। मननेंचि होय निदिध्यासन। मग निजानंदीं समाधान। होईल पहा तत्काल।।१९।। म्हणोनि असावा अधिकार पूर्ण। तरीच़ होय श्रवण मनन। नातरी काय उपयोग ज़गून। पशुसम आयुष्य ज़ाय सारें।।२०।। आतां सांगूं अधिकाऱ्याच़ें लक्षण। तरी ऐका चित्त देऊन। ऐसें ते स्वामी चिद्धन। परिज्ञानाश्रम सांगती पैं।।२१।। हरएक कार्या असावा अधिकार। नातरी तें काज़ न होय निर्धार। अधिकार म्हणिजे काय तो साचार। दाखवूं तुम्हां आतांचि।।२२।। परीट करी वस्त्रें शुभ्र। वस्त्रें विणी तो पट्टेगार। शिंपी शिवी आंगरखे सुंदर। परम उत्कृष्ट सकलही।।२३।। ज्याच़ा अधिकार त्यासी म्हणोनि। करिती ते कीं उत्तम करणी। करूं ज़ातां आम्हांलागोनि। न येईचि तें सर्वथा।।२४।। तेवीं परमार्थीं कवणा अधिकार। तरी ज्याच्या अंगीं साधनें चार। असती त्यासीच़ तो मिळे साचार। येरां न मिळे कदापिही।।२५।। विणण्यासी कळे ज्या सुंदर। त्यासचि म्हणती त्याच़ा अधिकार। तैसें ज़ें ज़ें ज्यासी कळे साचार।

तो तो अधिकार तयाचा।।२६।। येथें घ्याल तुम्ही आक्षेप। पाहिजे श्रवणासी अधिकार खूप। त्यासी होती कष्ट अमूप। हेंचि पैं अवघड मानवां।।२७।। तरी याचें उत्तर आइका। प्रपंचीं अवघड कवणाही एका। नाहींत हीं साधनें खचितचि देखा। सांगतों हेंचि विवरुनी।।२८।। आधीं चारी साधनें विवरून। मग करूं शंकेचें समाधान। परिसा एकाग्र चित्त करून। ऐसें बोलती सद्गुरु।।२९।। 'ब्रह्म सत्य, मिथ्या जग' हें। ऐसा ज़ो मनाचा निश्चय होये। त्यासीच म्हणती 'विवेक' पाहें। हेंचि प्रथम साधन पैं।।३०।। येथील आणि परलोकींचे। भोग अनित्य म्हणोनि साचें। उबगे मन हें तेथें न वचे। त्यासीच म्हणती 'वैराग्य'।।३१।। शम-दम-श्रद्धा ज़ाण। उपरति-तितिक्षा-समाधान। एवं सकलही मिळोन। 'शमादिषट्क' म्हणती त्या।।३२।। 'शम' म्हणजे सकल वासना। त्याग करुनी शमवावें मना।'दम' म्हणती इंद्रियदमना। शब्दादिविषयांपासोनि।।३३।। प्रपंचापासुनी निवृत्ति। त्यासी म्हणती 'उपरति'। शीत-उष्ण-क्षुधा-तृषा ती। साहणें हेचि 'तितिक्षा' ।।३४।। आणि मान-अवमान। साहणें हेंही तितिक्षा-लक्षण। ऐसें हें द्वंद्व-धर्म ज़ाण। सांगितलें बा तुज़लागीं।।३५।। गुरु आणि वेदान्त-वाक्यावरी। भक्ति असणें जी निर्धारीं। तीचि 'श्रद्धा' ज़ाणा बरी। निश्चयें तुम्ही श्रोते हो।।३६।। करितां अध्यात्माचें श्रवण। एकाग्र व्हावें आपुलें मन। त्यासीच म्हणती 'समाधान'। एवं 'षट्संपत्ति' ही पाहीं।।३७।। मोक्षाची ज़ो तीव्र इच्छा करी। तोचि 'मुमुक्षु' निर्धारीं। एवं ऐसीं हीं साधनें चारी। सांगितलीं पैं तुम्हांसी।।३८।। ऐसीं हीं साधनें आपुल्या अंगीं। येती प्रपंचामाजीं वेगीं। नको शिकवावें कोणींच या जगीं।

असती अंगीं सहज़ तीं।।३९।। समज़ा एकासी पाहिजे नोकरी। तरी ज़ाऊनि श्रेष्ठांच़ा आश्रय तो धरी। तेथें मानावमान सहन करी। ज़री झिडकारिलें श्रेष्ठानें।।४०।। ज़री सद्गुरु क्षोभती आम्हांसी। अपमान होय निजमानसीं। आपुलें हित होय हे ऐसी। न ये कल्पना त्या काळीं।।४१।। दोघे बोलती तेव्हां आपण। करितों आपुलें एकाग्र मन। देऊनि तिकडेचि आपुले कान। काय हे बोलती समज़ूं पैं।।४२।। यापरि प्रपंचीं चारी साधनें। येती आपुल्या अंगीं त्वरेनें। ऐसें होणें कोणत्या कारणें। बोलूं आतां अवधारा।।४३।। विषय ते सकलही वाटती गोड। खरेंच़ ऐसें वाटे तें दृढ। म्हणोनि मोह ममता वाढ। होय तेथें सहज़चि।।४४।। जेथें वाटे सत्यता पूर्ण। तेथें ज़ाय आपुलें मन। मनचि मुख्य कारण। सकल कार्यांलागीं पैं।।४५।। जेथें आपुलें मन ज़ाय। धांवती तेथें इंद्रियें निःसंशय। म्हणोनि त्यासी आधीं करावें काय। तेंचि आतां सांगूं पैं।।४६।। वर्णाश्रमविहित कर्म। करणें हा आपुला स्वधर्म। तेव्हां होईल मन हें परम। शुद्ध ज़ाणा निर्धारें।।४७।। मग श्रवणासी अधिकार। येतसे ज़ाणा सत्वर। तेव्हां आत्मसाक्षात्कार। होय सहज़चि गुरुकृपें।।४८।। समई आणि वाती तेल। सिद्ध असतां नाहीं वेळ। उज़ळितां दीप सोज्ज्वळ। विलसे सुंदर तो पाहीं।।४९।। तद्वत् स्वधर्मकर्में करितां करितां। होय चित्तशुद्धि तत्त्वतां। मग सद्गुरूच़ा उपदेश घेतां। उशीर न लागे निजज्ञाना।।५०।। म्हणोनि मद्भक्तांनो आतां। केला उपदेश तुम्हां ज़ो त्वरितां। तैसेंचि वागलिया येईल हाता। मोक्षधाम सहज़चि।।५१।। समर्थ असे भवानीशंकर। तोचि करी सकलां पार। शंकराश्रम सांगेल विचार। पुढें सकलांसी पहा हो।।५२।। आतां आमुच़ें संपलें

कार्य। येतों आम्हीं देतों अभय। सांगीतला तरण्या उपाय। धरा अंतरीं सकलही।।५३।। ऐसें सांगोनि निजभक्तांसी। बाहती शंकराश्रम-स्वामींसी। मद्वाक्य कळलें कीं आतां तुज़सी। ऐसाच़ उपदेश करीं जना।।५४।। आधीं आपण वर्तोनि दावीं । मग जनासीं सांगें तेवीं। ना भीं, हृदयीं सदा ठेवीं। अनुसंधान तें पाहीं।।५५।। 'असें मी ब्रह्म परिपूर्ण चिद्धन'। हेंचि धरीं अनुसंधान। पुढें येतील विघ्नें दारुण। लय-विक्षेपादि चार पाहीं।।५६।। परि नको भिऊं त्यांसी ताता। विचारें दवडुनी त्यांसी तत्त्वतां। धरिलें अनुसंधान न सोडीं सर्वथा। निजस्वरूपाच़ें कदापि।।५७।। सर्वांभूतीं समान भाव। ठेवुनी करीं व्यवहार सर्व। भवानीशंकर असतां देव। नाहीं भय तुज़लागीं।।५८।। ऐसें बोलुनी सद्गुरुराव। परिज्ञानाश्रमस्वामी देव। बैसले स्तब्ध होऊनि ठाव। द्यावया आपुल्या भक्तांसी।।५९।। कोणता 'ठाव' काय तो कैसा। प्रश्न उद्भवेल श्रोतया-मानसां। त्याच़ें उत्तर देऊं स्वस्थ असा। तुम्ही निवांत चित्तानें।।६०।। सद्गुरु न मिळतां सारस्वत। औदासीन्य येई आपुल्या चित्तांत। हें सकलांसी असे विदित। मागील अध्याय वाच़ोनि।।६१।।आधीं जनांची कैसी स्थिति। मग भेटतां सद्गुरुमूर्ति। धीर तो बहु तयांप्रति। आला निर्धारें ज़ाणा हो।।६२।। सद्गुरु होय भक्तां आधार। त्यावीण न मिळे मनासी थार। विश्रांतीच़ें स्थान तें निर्धार। त्यासीच़ 'ठाव' म्हणती पैं।।६३।। सद्गुरु हेंचि विश्रांति-स्थान। अनुभवसिद्ध ना अनुमान। ज़ैसें मीनासी जीवन। तैसे जनांसी गुरुराय।।६४।। म्हणोनि सद्गुरु करुणाकर। द्यावया भक्तांसी आधार। करूं लागले अनुष्ठान थोर। च़ालण्या गुरुपरंपरा शाश्वत।।६५।। त्याचि पुण्यप्रभावेंकरुनी। आज़वरी वाढली परंपरा

धरणीं। नऊ आश्रम झाले सद्गुणी। नसे ज्ञानहीन एकही।।६६।। पुढें येईल सकलांचें वर्णन। प्रस्तुत बोलूं सद्गुरु सघन। परिज्ञानाश्रम-स्वामींनीं अनुष्ठान। केलें पांच तासावरी।।६७।। तेव्हां पसरे वार्ता सकल। परिज्ञानाश्रमस्वामी प्रेमळ। घेती समाधि ये वेळ। ऐकुनी धाविन्नले नरनारी।।६८।। येती मठामाजीं सर्व। भेटाया धरुनी दृढभाव। आनंदें म्हणती सद्गुरुराव। निजभक्तांसी तेधवां।।६९।। मुखीं सतत धरा नाम। तेव्हां निर्मल निर्विकार निष्काम। मन होउनी, निःसीम प्रेम। बाणेल अंगीं सहज़चि।।७०।। धरा प्रेम सद्गुरुचरणीं। तोचि तुम्हांसी बोध करोनी। नेईल निजपदासी तत्क्षणीं। परि ठेवावा विश्वास।।७१।। धरिल्या तुम्हीं विश्वास। तुमचेंचि होईल कल्याण खास। नको आम्हां संन्यासीयांस। मठादिक हें पहा हो।।७२।। कैंचा ग्राम कैंचा मठ। जेथें ज़ाऊं तेथें राहूं स्पष्ट। ब्रह्मांड हाचि आमुचा श्रेष्ठ। संन्याशाचा मठ पहा हो।।७३।। आम्हां नाहीं ज़ात गोत। जगचि सारें आमुचे आप्त। जेथें प्रारब्ध असे तेथ। वसे देह हा पाहीं।।७४।। ऐसें बोलुनी सद्गुरुनाथ। प्राण नेती ब्रह्मरंध्रीं त्वरित। नेत्रीं बघती जन समस्त। झाले समाधिस्थ गुरुराज।।७५।। तेव्हां सकलांसी बहुत खेद। वाटला चित्तीं अति विषाद। परि उठे वृत्ति धैर्यप्रद। बघुनी शंकराश्रम-स्वामींतें।।७६।। असो मग पुढील कार्य। थोर थाटें करी समुदाय। विधिपूर्वक कर्में सविनय। केलीं लोकांनीं त्या समयीं।।७७।। मग चिन्मय सद्गुरुमूर्ति। बैसवुनी ठायीं समाधि देती। झाली आजि अवतार-समाप्ति। म्हणोनि हळहळती सकल जन।।७८।। अहा देवा सद्गुरुनाथा। महिमा अपार तुझी ताता। सद्गुण कैसे वर्णावे आतां। न कळे अज्ञ बालकांसी।।७९।।

साहुनी सारा मानावमान। संरक्षिलें निजभक्तांलागुन। केलें शिशूपरी संगोपन। कैसे फेडूं उपकार तव।।८०।। सद्गुरु माता ऐसें म्हणती। मातेहुनी अमित तुझी प्रीति। कैसी गाऊं आतां कीर्ति। न कळे आम्हां दयाळा।।८१।। कधींही जनांसी निष्ठुर वचन। न बोलिलासी तूं दयाघन। राव-रंक-हीन-दीन । सकलही समान तुज़लागीं।।८२।। तव गुणांसी नाहीं सीमा। कोणती द्यावी तुज़ला उपमा। न कळे देवा कांहीं आम्हां। बोलावया बापा हो।।८३।। निजभक्तांच्या कार्यासाठीं। देह झिज़विला त्वां जगजेठी। परि अनुताप आमुच्या पोटीं। नुपज़े देवा गुरुराया।।८४।। तुज़ कासया ऐसें बंधन। मठाऐसें महाकठिण। परि तूं सकलजनांकारण। घेतला भार सकलही।।८५।। येथें श्रोते करितील प्रश्न। कीं मठ हा होय कैसें बंधन। मठाचे स्वामी सुखी पूर्ण। काय कठिण होय तयां।।८६।। तरी ऐका त्याचें उत्तर। दृष्टांतसहित सांगूं निर्धार। येथें असावें सादर। आतां भाविक चतुरांनीं।।८७।। परमार्थविचारें बघतां। स्वामी खचितचि सुखी तत्त्वतां। दुःख नसे त्यांचिया चित्ता। अणुमात्र ज़ाणा निश्चयें।।८८।। सुखदुःखातीत तयांची। वृत्ति असतां पूर्ण साची। तेथें दुःखप्राप्ति कैंची। सदा सुखी ते परिपूर्ण।।८९।। ऐसें बघतां नाहीं बंधन। श्रीस्वामी सद्गुरूलागुन। नातरी मठाऐसें कठिण। आणिक बंधन ना दुसरें।।९०।। तरी ऐका तें आतां आपण। समज़ा एक धनाढ्य ब्राह्मण। नाना परीनें सुखी तो पूर्ण। परि थोर कुटुंब तयाचें।।९१।। सर्वांचा भार असे त्यावरी। तेव्हां कैंचें सुख त्याच्या अंतरीं। चिंता होय दिवसरात्रीं। चित्तीं त्याच्या बहुत हो।।९२।। एका मुलाचें दुखे पोट। एकानें धरिली सदा खाट। एक होय बहु उद्धट।

येती गाऱ्हाणीं ग्रामींचीं।।९३।। करितां सकलांचें समाधान। थके तो बहुतचि ब्राह्मण। जन म्हणती सुखी तो पूर्ण। धनसंपन्न म्हणोनि।।९४।। एवढा प्रपंच असे कठीण। ज्याचें त्यासी होय बंधन। पुरे पुरे बा ऐसें म्हणोन। तापे अंतरीं बहुत तो।।९५।। एवं इतुका थोर भार। सर्व ज्ञातीचा असे मठावर। करितां समाधान निरंतर। त्रास अनिवार होई त्यां।।९६।। मठ नव्हे सद्गुरूसाठीं। लोकांची होतां भेटी गांठी। त्यांचा उद्धार होईल शेवटीं। म्हणोनि संस्था स्थापिली।।९७।। एका कुटुंबाचा व्यवहार। करितां थकती सगळे नर। सद्गुरु तरी विश्वकुटुंबी साचार। विचार करितां समजेल।।९८।। म्हणाल सद्गुरु सर्वां अलिप्त। त्यांसी कोणतें कार्य असे येथ। मठाचा भार सर्व गृहस्थ। घेती बघती सकलही।।९९।। स्वामींलागीं काय बंधन। तरी ऐका सांगतों वचन। जो धनाढ्य ब्राह्मण। त्यासी न लगे कांहींएक।।१००।। सकलही करवी त्याची कांता। परि भार यावरी म्हणोनि चिंता। बहुत काय बोलावें आतां। सकलांसी विदितचि हें सारें।।१०१।। एवं मठ हा होय बहुत बंधन। परि राहती स्वामी जनांकारण। नातरी संन्याशां काय गरज म्हणून। रहावें ऐशा बंधनीं ।।१०२।। नको पैसा अडका त्यांसी। न लगे ग्राम मठ परियेसीं। जेथें जातील तेथें आपैसी। होय सोय गुरुकृपें।।१०३।। म्हणोनि मठ नव्हे केवळ स्वामींचा। आम्हां सर्व सारस्वतांचा। पुढें बोलिजेल विवर याचा। तेव्हां समजेल सकलही।।१०४।। असो आतां सकल जनांनीं। केला आकांत गुण आठवोनी। मग आपापुल्या गृहालागुनी। गेले सकलही तेधवां।।१०५।। शके सोळाशें तिसापासुनी। बेचाळीसपर्यंत अनुदिनीं। परिज्ञानाश्रमस्वामीजींनीं। स्वधर्म-राज्य चालविलें।।१०६।।

पुढील अध्यायीं सद्गुरुराय। शंकराश्रमस्वामी सदय। सांगती जनां बोध सुखमय। उत्कृष्ट ज़ाणा तो पाहीं।।१०७।।परमहंस-आनंदाश्रम।शिवानंदतीर्थ एकचि ब्रह्म।यांच्या कृपाप्रसादें सप्तम।अध्याय गुरुदासें संपविला।।१०८।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां लाभे मोक्ष सत्वर। सप्तमाध्याय रसाळ हा।।१०९।। अध्याय।। ७।। ओंव्या।।१०९।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति सप्तमोऽध्यायः समाप्तः।।

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

परमपूज्य शंकराश्रम (प्रथम) स्वामिजींची समाधि, चित्रापुर मठ

श्रीचित्रापुर मठ, शिराली

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीशारदांबायै नमः।। श्रीशंकराश्रमस्वामीगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय द्वितीय शंकराश्रमा। भक्तकामकल्पद्रुमा। कैसी वर्णावी तुझी महिमा। सांग तूंचि दयाळा।।१।। मी कांहीं वेडें वांकुडें। बोलतसें देवा तुज़पुढें। परि तूं क्षमा करिसी एवढें। धैर्य म्हणोनि बडबडतों।।२।। कैसें तरी बोले बाळ। नाहीं त्यासी काळवेळ। बोबडे अथवा अर्धवट बोल। तरी मातेसी त्याचा वीट न ये।।३।। तद्वत् देवा सद्गुरुराया। न ये वीट तुज़ला सखया। निजदासाच्या भाषणा म्हणूनियां। करितों अल्प सेवा ही।।४।। तूंचि देवा देउनी शक्ति। वदवीं आपुली सुंदर कीर्ति। असो नमन तव चरणांप्रति। देईं सद्गति सकलांसी।।५।। आतां मज़वरी कृपा करोनि। द्वितीय भक्ति 'कीर्तन' ही झणीं। देउनी उद्धरीं मज़लागोनि। ऐसी तव चरणीं प्रार्थना।।६।। असो आतां ऐका सज्जन। मागील अध्यायीं निरूपण। परिज्ञानाश्रम यांचें गमन। होय निज-कैलासासी।।७।। ज़ाहला सकलांच्या मनासी खेद। सांगते ज़ाहले परम बोध। शंकराश्रम सद्गुरु सुखद। पूर्ण ज्ञानी ते पाहीं।।८।। नका करूं आतां खेद। विचारें करा 'शिरच्छेद'। हें काय बोलतां तुम्ही अबद्ध। कवणाचा शिरच्छेद करावा।।९।। ऐसा प्रश्न ज़री करितां। तरी उत्तर त्याचें आतां। सावध करोनि आपुल्या चित्ता। परिसा तुम्ही सकळिक।।१०।। येथें खेदासी काय कारण। मन हेंचि असे प्रधान। त्याचेंचि करितां खंडन। खेद उद्भवे कोठोनि।।११।। बापचि नसतां पुत्र कोठोन। होईल, सांगें तूं बा उत्पन्न। तैसें मनचि नसतां ज़ाण। कैंचें दुःख होईल।।१२।। मनचि एक सर्वासी कारण। सुखदुःख होय त्यापासून। म्हणोनि त्याचेंचि करितां खंडन। कैसें होय सुखदुःख।।१३।।

सुखदुःख हे मनाचे धर्म। मी आत्मा परिपूर्ण ब्रह्म। मज़ नाहीं सुखदुःख नाम-। रूपातीत मी पाहीं।।१४।। नाम-रूप सारें खोटें। तेथें कैंचें सुंदर वोखटें। बरवें वाईट तेथें कुठें। केवल ब्रह्म मी पाहीं।।१५।। बरवें आणि वाईट जेथें। सुखदुःख असे तेथें। मनचि पाही सारें येथें। बरवें वाईट इत्यादिकां।।१६।। पहा कैसें तें सांगूं आतां। लावा येथें आपुल्या चित्ता। आधीं बरवें वाईट तत्त्वतां। विवरूं स्वल्प तें पाहीं।।१७।। असे एक फळ उत्तम। तें एकासी आवडे परम। तो म्हणे हें असे अनुपम। दुज़ा बोले वाईट हें।।१८।। एकचि फळ परि दोघांसी। द्विधा लागे खचित त्यांसी। त्यापरी बोलती त्या फळासी। वाईट चांगुलें ऐसें हें।।१९।। तें फळ नव्हे वाईट चांगुलें। त्यासी मनचि कारण ज़ाहलें। मन पाही ज़ैसें सगळें। दिसे तैसें त्यासी पैं।।२०।। यावरी दुज़ा दृष्टांत ऐका। लिहिणें वाचणें मुलासी एका। नावडे कधींही, त्या लेका। खेळ आवडे बहुतचि।।२१।। तेव्हां तो म्हणे खेळ चांगुला। शिकणें वाईट वाटे त्याज़ला। मनचि कारण इतुकियाला। कैसें तें ऐका आतां पैं।।२२।। खेळ खेळतां तो बाळ। शाळेचा खेळ करुनी एक वेळ। खेळे खेळ म्हणुनी केवळ। बहुत आवडे त्या समयीं।।२३।। तेव्हां त्यासी शिकणेंचि गोड। वाटे त्यासी नाहीं तोड। हे मनाचे धर्म ज़ाड। असती दोन्ही निश्चयें।।२४।। एवं चांगुल्या वाइटा मनचि कारण। तेंचि सुख-दुःख भोगे संपूर्ण। आत्मा वेगळा मनाहून। त्यासी न बाधे सुख-दुःख।।२५।। म्हणोनि मनासी आधीं जिंकावें । तेव्हां होय सहज़ स्वभावें । सुख-दुःखातीत आघवें। सारें जग हें दिसतसे।।२६।। ऐसा केला सकलां बोध। आपण आधींचि स्वतःसिद्ध। आत्माराम परम शुद्ध। सद्गुरुकृपेनें असती ते।।२७।। गुरुकृपा ज़ाहलिया प्राप्त।

मग कैंचा उशीर तेथ। आत्मज्ञान होय त्वरित। परि व्हावें पात्र कृपेसी।।२८।। पात्र कैसें व्हावें कृपेसी। ऐसा प्रश्न उद्भवेल मानसीं। तरी जितुकें समज़ेल मज़सी। तितुकें सांगतों आतां पैं।।२९।। सद्गुरु ज़ो करिती बोध गोड। धरावा मानसीं तो अखंड। तेव्हां होईल गुरुकृपा सदृढ। नाहीं अनुमान यामाजीं।।३०।। असो आपुले सद्गुरु स्वामी। ज्यांसी 'शंकराश्रम' म्हणतों आम्ही। ते गुरुकृपेनें होऊनि निष्कामी। झ़ालें परिपूर्ण ज्ञान तयां।।३१।। आणि स्वधर्म आपण करुनी। शिकवितातिं भक्तांलागुनी। प्रेम धरोनि अंतःकरणीं। बोधिती सकलां निर्लोभें।।३२।। नसे अणुमात्र लोभ अंगीं। अथवा कीर्ति व्हावी जगीं। हाही नसे हेतु सुमार्गीं। लाविले जन सकलही।।३३।। तीव्र बुद्धि, अति चतुर। असती सद्गुण त्यांचे अपार। ऐसी मूर्ति परमसुंदर। काय वानूं कीर्ति त्यांची।।३४।। नानाविध विषयांमाजीं। सूक्ष्म विचार करुनी सहजीं। मन घालिती प्रत्येक काजीं। तेणें कार्य सफळ होय।।३५।। अर्थात् ज़ें ज़ें करिती कार्य। तें तें सूक्ष्म विचारेंचि होय। म्हणोनि बळकट निश्चय। त्यांचा न ढळे कदापिही।।३६।। आम्ही मानव करितों काय। विचारावांचुनी करितों कार्य। म्हणोनि आमुचा निश्चय। ढळे वारंवार तो पाहीं।।३७।। असो आतां सद्गुरुनाथ। आपुल्या प्रेमळ भक्तांप्रत। बोधामृत पाज़ुनी सतत। देह झिज़विती सत्कार्या।।३८।। काय तयांची लीला सुंदर। यावरी एक कथा सविस्तर। सांगूं आतां चमत्कार। चित्त देऊनि अवधारा।।३९।। गोकर्णाज़वळी एक ग्राम। 'बंकीकोड्ल' ऐसें नाम। तेथें एक ब्राह्मण उत्तम। सारस्वत होता पैं।।४०।। असे धनाढ्य महाथोर। परम भाविक आणि उदार। शंकराश्रम श्रीसद्गुरुवर। यांचा भक्त होता तो।।४१।। वारंवार भंडिकेरी-मठासी।

ज़ाउनी घेई दर्शनासी। सदा अंतरीं श्रीस्वामींसी। आठवीतसे तो भक्त।।४२।। त्याचा असे एक नेम। संध्यापूजादि उरकुनी काम। ज़ाउनी मार्गावरी तो इसम। वाट पाहे अतिथीची।।४३।। ज़री असे अतिथि ब्राह्मण। तरी त्यासी संगें घेऊन। करीतसे प्रेमें भोजन। ऐसा नेम तयाचा।।४४।। ज़री भेटला अतिथि शूद्र। तरी त्यासी वाढुनी समग्र। मग ज़ाउनी आपण शीघ्र। करी भोजन प्रत्यहीं।।४५।। ऐसा नेम असे तयाचा। सद्गुरुरूप समज़ुनी साचा। करी सदा तो अतिथींचा। सत्कार पूर्ण निजभावें।।४६।। ऐसें असतां एके दिवशीं। रात्रीं झोंपतां विचार मानसीं। करिता झाला कीं श्रीगुरूसी। आमुच्या गृहासी आणावें।।४७।। जेथें तेथें पाचारिती भक्त। कधींही आम्हीं श्रीस्वामींप्रत। पाचारिलें नाहीं सदनांत। काय अपराध हा म्यां केला।।४८।। तरी आठ दिवसांआंत। पाचारुनी आणावें खचित। नातरी आमुचें जिणें व्यर्थ। ऐसा निश्चय दृढ केला।।४९।। असो मग तो ब्राह्मण। निद्रिस्त झाला न लागतां क्षण। उठतां दुसऱ्या दिवशीं ज़ाण। बोले आपुल्या बंधूप्रति।।५०।। म्हणे मीं एक केला विचार। शंकराश्रम-स्वामी गुरुवर। त्यांसी येथें बोलावुनी साचार। आणावें ऐसें वाटतें।।५१।। ठेवुनी घ्यावें चार दिवस। आणिक उत्सव करावा बहुवस। ऐसें वाटतें माझ्या मनास। सांगतों आतां तुज़प्रति।।५२।। ऐकुनी वडील बंधूचा विचार। म्हणे धाकुटा बंधु त्यावर। कासया इतुकें अवडंबर। असावी भक्ति मानसीं।।५३।। उगीच कासया आणावें सदनीं। तेथेंचि करावी पूजा ज़ाउनी। योग्य न वाटे आपुली करणी। वृथाचि देह शिणवावा।।५४ ।। घेतां ठेवुनी दिवस चार। कष्टचि होतील आम्हां साचार। म्हणोनि तुझा हा विचार। देईं सोडुनी तूं बापा।।५५।। ऐकतां बंधूचें हें वचन।

खिन्न ज़ाहलें अंतःकरण। परि न बोलतां कांहींच आपण। स्तब्ध राहिला तो भ्राता।।५६।। म्हणे आपुल्या मानसीं तेव्हां। काय हें प्रारब्ध आमुचें देवा। प्रपंचीं बहुत होती सर्वां। कष्ट नानापरी नित्यचि।।५७।। परि तुज़ आणावयासी। त्रास वाटती बहुत आम्हांसी। म्हणोनि बंधु सांगे मज़सी। काय प्रारब्ध माझें पैं।।५८।। जेव्हां येईल तुझ्या मनासी। तेव्हां येसी तूं माझ्या गृहासी। तूंचि माझी इच्छा पुरविसी। श्रीगुरुनाथा दयाळा।।५९।। तुज़ला कळे मम अंतर। तूंचि करावी कृपा मज़वर। ऐसें बोलतां येई गहिंवर। त्या ब्राह्मणाच्या मानसीं।।६०।। कंठ ज़ाहला सद्गदित। प्रेमाश्रु आले नयनांत। ओठ थरथरां कांपती बहुत। ज़ाहला परम दुःखित तो।।६१।। मग करोनि विवेक मानसीं। लागला आपुल्या कामासी। नित्यनेमापरी त्या दिवशीं। गेला मार्गप्रतीक्षा करावया।।६२।। कुणीही अतिथी-अभ्यागत। मिळतील कीं ऐसें बघत। उभा असतां मार्गीं तेथ। भेटले अवचित संन्यासी।।६३।। दंड-कमंडलु हातीं घेउनी। येतां दिसले तयासी दुरूनी। उभा राहिला पाहात नयनीं। संन्याशासी ब्राह्मण तो।।६४।। असतां लांब दहा हात। ओळखुनी त्या संन्याशाप्रत। ब्राह्मण धांवे दुडदुडां तेथ। साष्टांग प्राणिपात घातला।।६५।। मग धरोनि त्याच्या करासी। घेउनी येई आपुल्या घरासी। आनंद झ़ाला त्या ब्राह्मणासी। भेटले गुरुराज म्हणोनि।।६६।। मग ते शंकराश्रम-गुरुराज। म्हणती त्यासी भिक्षा मज़। द्यावी झ़डकरी ती आज़। घेउनी चालों गोकर्णीं।।६७।। तेव्हां लगबगें वाढुनी भिक्षा। म्हणे तो ब्राह्मण एक अपेक्षा। असे माझी, न करा उपेक्षा। रहावें येथेंचि आजि पैं।।६८।। मग म्हणती स्वामिराय। तुझी इच्छा सफल होय। धरीं मानसीं प्रभूचे पाय। नाहीं कदापि भय

तुज़ला।।६९।। ऐसें म्हणोनि लवलाहीं। भिक्षा घेतसे सद्गुरुमाई। बैसविली आसनीं ब्राह्मणें पाहीं। तेव्हां चमत्कार थोर झ़ाला।।७०।। आसनीं सद्गुरूंसी बैसवुनी। क्षणभरी तो गेला कामालागुनी। पुन्हां पहातो तेथें येउनी। तंव स्वामिराज दिसती ना।।७१।। मग गेला लगबगें थेट। गोकर्णामाजीं ब्राह्मण त्वरित। भंडिकेरी मठाप्रत। ज़ाउनी बघे त्या स्थानीं।।७२।। म्हणे तो तेथील जनांसी। स्वामी आले का सांगा मज़सी। येरू बोलती श्रीस्वामींसी। झ़ोंप लागली या समयीं।।७३।। भिक्षा होउनी केलें शयन। मग भेटवूं तुम्हांलागुन। ऐकतां विस्मित झ़ाला ब्राह्मण। बंकीकोड्ल-ग्रामींच़ा।।७४।। यावरी म्हणे, 'सद्गुरुराय। यांची भिक्षा कुठें होय। येथेंचि ज़ाहली कीं काय'। तेव्हां येरू 'होय' म्हणती।।७५।। हें ऐकुनी तयांच़ें वचन। गहिंवरला तो ब्राह्मण। मनामाजीं बोले आपण। अहा देवा कृपाघना।।७६।। तुझी कोणा न कळे लीला। अगाध महिमा दाविली डोळां। कैसी वर्णावी ती न कळे मज़ला। श्रीगुरुराया दयाघना।।७७।। माझी इच्छा केली पूर्ण। आमुच्या सदनीं त्वां येऊन। भिक्षा घेउनी दिधलें दरुशन। काय नवलाई तव देवा।।७८।। ऐसें म्हणोनि होय सद्गद। पुढें बोलवेना एकही शब्द। राहे तैसाचि होउनी स्तब्ध। चित्तीं गुरुमूर्ति न्याहाळी।।७९।। यावरी ज़ातां कांहीं क्षण। सद्गुरु उठले ऐसें म्हणोन। सांगण्या आले याज़लागोन। तेथील जन ते पाहीं।।८०।। तेव्हां गेला झ़डकरी उठोन। श्रीस्वामींच़ें घेतलें दरुशन। सांगितलें सकल वर्तमान। संनिधीप्रती तेधवां।।८१।। मग सद्गुरुस्वामी सदय। म्हणती तुझी ही भक्तीच़ होय। फळली तुज़ला म्हणोनि पाय। देखिले त्वां बा निजसदनीं।।८२।। धरितां दृढतर भक्तिभाव। तयांसी भेटती

सद्गुरुदेव। येथें नसे सर्वथैव। संशय तिळभरी निर्धारें।।८३।। ऐसें बोलुनी सद्गुरुनाथ। देते ज़ाहले फलमंत्राक्षत। इकडे बंकीकोड्ल ग्रामांत। झालें वर्तमान तें ऐका।।८४।। या भक्ताच़ा बंधु धाकुटा। आधींच़ जेवुनी कामाकरितां। गेला होता सदनीं नव्हता। स्वामी आलिया वेळेसी।।८५।। मग येतां गृहामाजीं। कळली सकल वार्ता सहजीं। तेव्हां म्हणे असो आजि। ज़ाउनी येतों गोकर्णा।।८६।। मग तो गेला शीघ्रगतीं। भंडिकेरी मठाप्रति। भेटे ज़ाउनी सद्गुरुमूर्ति। जेथें असे तेथें पैं।।८७।। तेथें ऐकिला सकल वृत्तांत। कीं स्वामी आपुल्या सदनाप्रत। न येतांचि दर्शन अवचित। दिधलें बंधूसी आपुल्या।।८८।। तेव्हां आश्चर्य वाटलें बहुत। म्हणे मानसीं काय हे अद्भुत। घालूनियां साष्टांग दंडवत। बोले सद्गुरो दयाळा।।८९।। तुझी महिमा इतुकी थोर। न कळतां मी अज्ञ पामर। माझ्या बंधूलागीं मी खर। बोलिलों विरुद्ध आज़ पैं।।९०।। ऐसें म्हणोनि सकलही वृत्तांत। निवेदिला स्वामींसी त्वरित। आणिक म्हणे देवा मज़प्रत। क्षमा करावी दयाळा।।९१।। अज्ञपणें बोलिलों म्हणुनी। न धरीं तूं कोप स्वमनीं। यावें आपण आमुच्या सदनीं। सद्गुरुराया कृपाळा।।९२।। सद्गुरूंच़ें महत्त्व मज़ला। न कळतां जन्म वायां गेला। असती आपुले गोकर्णाला। स्वामी एक सारस्वतांच़ें।।९३।। जनांनीं त्यांसी स्वामी केलें। आमुच्यापरीच़ ते मनुष्य भले। त्यांसी कां भज़ावें ऐसें वाटलें। क्षुद्र बुद्धि ही माझी।।९४।। परि आतां कळलें मज़ला। उगीच़ स्वामींसी दोष दिधला। ऐसा अनुताप पोटीं ज़ाहला। काय करावें म्हणोनियां।।९५।। देवा आतां त्वांचि मज़ला। उद्धरावें खचित ये वेळां। तुज़वांच़ोनि परम कृपाळा। नाहीं त्राता अन्य जगीं।।९६।। ऐशा पतितासी

कवणही नाहीं। उद्धरिता तुज़वांचोनि पाहीं। तूंचि कृपा करीं गे आई। शांत सद्गुणे वेल्हाळे।।९७।। आतां न ज़ाईं मी येथोनि। संनिधींच राहतों वास करोनि। नातरी त्वांचि आमुच्या सदनीं। राहावें येवोनि सर्वदा।।९८।। यापरी बहुविध केली प्रार्थना। घाली प्रेमें लोटांगणा। पुनरपि करोनि वंदन चरणां। ओतिला कलश नयनांचा।।९९।। केला अभिषेक अश्रुधारें। मग गुरुनाथें उठवोनि स्वकरें। म्हणती न करीं विलाप बा रे। सांगतों विचार तुज़लागीं।।१००।। पुढील अध्यायीं हेंचि निरूपण। कथिती बोध स्वामी त्यालागून। आणिक एका दरिद्रियाचें अन्न। सेवुनी करिती श्रीमंत त्या।।१०१।। श्रीसद्गुरु-आनंदाश्रम। शिवानंदतीर्थ पूर्ण ब्रह्म। यांच्या कृपाप्रसादें अष्टम। अध्याय गुरुदासें संपविला।।१०२।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां अज्ञान निरसे समग्र। अष्टमाध्याय रसाळ हा।।१०३।। अध्याय ८।।ओंव्या ।।१०३।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति अष्टमोऽध्यायः समाप्तः।।

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीशंकराश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय जय जय श्रीगुरुराया। निर्गुण सगुण तुझिया पाया। भज़तां येईल भक्ति हृदया। तूंचि दाता तियेच़ा।।१।। कैसें भज़ावें काय करावें।। हेंही नाहीं चित्ता ठावें। त्वांचि शिकवुनी मज़ला द्यावें। भक्ति-ज्ञान-वैराग्य।।२।। तव गुणमहिमा न कळतां ज़ाण। बळें धरुनी देहाभिमान। विसरलों तुज़लागीं म्हणोन। भवबंधन लागलेंसे।।३।। न कळे मार्ग निज बालका। माय हातीं धरोनि त्या देखा। घेउनी ज़ाई आपुल्या मुलुखा। तैसा तूं मज़ ने स्वपदीं।।४।। त्वांचि देउनी आतां बुद्धि। मज़कडुनी करवीं ग्रंथवृद्धि। ऐसी प्रार्थना करितों तव पदीं। प्रभो सद्गुरो दयाळा।।५।। असो आतां श्रोते हो सज्जन। मागील अध्यायीं निरूपण। दिधलें स्वामींनीं दरुशन। निजभक्तांसी बंकीकोड्लीं।।६।। आणि त्या भक्ताच़ा बंधु। त्यानें केला अपराधु। म्हणोनि सद्गुरु करुणासिंधु। प्रार्थिला अनुतापें त्या समयीं।।७।। तेव्हां तयाच़ें स्वामीराय। समाधान करिती देउनी अभय। श्रोते हो सावध परिसा काय। सांगती वचन तें आतां।।८।। म्हणती शंकराश्रमस्वामी सदय। ना भीं चित्तीं धरीं अभय। सहज़चि सद्गुरुकृपा होय। होतां अनुताप निजहृदयीं।।९।। अनुतापेंचि होय निरसन। पाप-ताप-दैन्य ज़ाण। यांत किमपि नसे अनुमान। परि असावा दृढतर विवेक।।१०।। वरिवरी ज़री अनुताप होय। तरी त्याच़ा उपयोग काय। क्षणांतचि त्याच़ा होत विलय। पुनरपि दोष घडतीच़।।११।। म्हणोनि ज़ो खरा अनुताप। त्याच़ा न होय कधींही लोप। तेणेंचि ज़ाईल सकल पाप। पुनरपि दोष घडतीना।।१२।। विवेकवैराग्यासहित अनुताप। ज़री होईल हृदयीं अमूप। तरीच़ वाढेल भक्तीच़ा

परिज्ञानाश्रम शंकर सद्गुरु

प्रताप। नातरी ढळेल सकलही।।१३।। पाया ज़र झ़ाला बळकट। गृह तें होय परम उत्कृष्ट। पडेल ऐसें नाहीं तेथ। भय सर्वथा तें पाहीं।।१४।। नातरी नसतां पाया घट्ट। गृह बांधितां होय नष्ट। म्हणोनि मुख्य पाया श्रेष्ठ। तोचि बळकट असावा।।१५।। तैसा अनुताप हाचि मूळ। पाया असे येथें सबळ। असतां तो एक बळकट निश्चल। भक्तिभाव दृढ होई।।१६।। अनुतापाच़ा पाया खणुनी। वैराग्य माती घ्यावी त्यांतुनी। कालवावी प्रेमजळें करूनी। आणिक दगड आणावे ते ऐका।।१७।। विवेकाच़े दगड आणुनी। पाया बांधावा घट्ट करोनी। त्यावरी भक्तीच्या विटा च़ढवुनी। बांधावें गृह सुंदर तें।।१८।। एवं वैराग्यसहित अनुताप पाया। बांधिता घट्ट विवेकेंचि या। भक्ति ढळेल ऐशा ना भया। धरावें बापा निर्धारें।।१९।। पाया बांधुनी बळकट थोर। बांधितां त्यावरी सुरेख मंदिर। तेथें वास करील निरंतर। मालक ज़ाणा सहज़चि।।२०।। तद्वत् येथें विवेकासहित। अनुताप होतां न ढळे किंचित। परि विवेकावांचुनी व्यर्थ। अनुताप न ये उपयोगा।।२१।। दगडावांचुनी कैसा पाया। येईल सांग बांधावया। गृह बांधितां तैशा ठाया। पडेल सहज़चि कांहीं दिनीं।।२२।। म्हणोनि येथें विवेकासहित। अनुताप-पाया व्हावा घट्ट। तेव्हां बांधितां भक्तीच़ें गृह तेथ। होय बळकट तें पाहीं।।२३।। जेथें असे भक्तिभाव। तेथें सहज़चि वसे देव। म्हणोनि आपण करावी सदैव। भक्ति दृढतर निश्चयेंसीं।।२४।। ज़री केलें वरिवरी ढोंग। काय त्याच़ा होईल उपयोग। भक्तिभाव नसतां सांग। कैसा लाभेल देव तो।।२५।। म्हणोनि विवेकासह होतां अनुताप। भक्तिप्रेम आपोआप। येईल तुझ्या अंगीं खूप। मग वसेल देव हृदयीं तुझ्या।।२६।। आतां तुला झ़ाला

ताप। गेलें सर्व तुझें पाप।नको करूं तूं दुःख विलाप। नामस्मरण करीं सदा।।२७।। वदतां वाचे सदा नाम। उपज़ेल विवेक वैराग्य परम। उत्कृष्ट होउनी भक्तिप्रेम। निश्चल होय तें पाहीं।।२८।। मग कैंचें भय बा तुज़ला। सदा वास करितों मी बाळा। खचित तुझ्या हृदयींच़ प्रेमळा। सत्य वचन हें आमुचें।।२९।। येथें तूं राहुनी करिसी काय। अथवा आम्ही येतां काय होय। भक्तिप्रेमावांचुनी चिन्मय-। स्वरूप न लाभे कदापि।।३०।। कमळाच्या बुडासी बेडूक सतत। राहे परि त्या काय मिळे तेथ। मातीच़ सारी खाय तो बहुत। मकरंद सेवी भ्रमर पहा।।३१।। भ्रमर सेवी ज़ैसा मकरंद।तैसा तूं बा आमुच़ा बोध। ग्रहण करोनि घे आनंद। कधीं कधीं येवोनि भ्रमरापरी।।३२।। बेडुकापरी ज़री तूं सतत। राहिलासि येथें आमुच्याप्रत। तरी न होय ज्ञान प्राप्त। खचितचि ज़ाण निर्धारें।।३३।। म्हणोनि आम्हीं सांगितला ज़ो बोध। ज़री हृदयीं धरिसी शुद्ध। भ्रमरापरी तरी तें सिद्ध। होईल कार्य तुझें बा।।३४।। अर्थात् भ्रमर सेवी मकरंद। तैसा तुज़ला आमुच़ा बोध। ग्रहण करितां निजपद। होईल प्राप्त तुज़लागीं ।।३५।। संनिध राहुनी बेडुकापरी। अभिमानरूप माती खासी ज़री। काय उपयोग ऐसा विचार करीं। सूक्ष्म बुद्धीनें तूं बाळा।।३६।। म्हणोनि तूं भ्रमरासारिखा। मकरंद सद्गुरुबोधाच़ा देखा। घेशील ज़री गोड घुटका। निश्चयें तृप्त होशील बा।।३७।। म्हणोनि हातानें करितां काम। मुखीं धरीं सतत नाम। तेव्हां उपज़ेल खरें प्रेम। भिऊं नको तूं सर्वथा।।३८।। खरें प्रेम उपज़तां अंतरीं। बोधग्रहण होय भ्रमरापरी। तेणें आत्मज्ञान निर्धारीं। होईल प्राप्त तुज़लागीं।।३९।। असो आतां अखंड प्रेम। धरीं हृदयीं तूं निष्काम। ज़वळीच़ असें मी आत्माराम।

कळेल तुज़ला निश्चयेंसीं।।४०।। यावरी स्वामी वडील बंधूसी। म्हणती तूंही धरीं मानसीं। सांगितला ज़ो बोध तुम्हांसी। घेईं समज़ोनि न त्यागीं।।४१।। ऐसें बोलतां स्वामिराय। दोन्ही बंधु धरिती पाय। म्हणती शिरसावंद्य होय। आज्ञा आपुली आम्हांसी।।४२।। परि एक आमुची आर्त। पुरवावी देवा येउनी ग्रामांत। रहावें चार दिवस तेथ। सदनासी चरण लावावे।।४३।। आणिक तीन दिवसांनीं येथ। पाचारावया येतों खचित। करावें आगमन त्वरित। बंकीकोड्ल-ग्रामासी।।४४।। यावरी बोलती सद्गुरुस्वामी। अवश्य येऊं तुमच्या ग्रामीं। सांगितला बोध ज़ो आम्हीं। धरा अखंड हृदयांत।।४५।। यावरी दोघे बंधु म्हणती। आज्ञा मान्य असे आम्हांप्रती। ऐसें बोलुनी झडकरी ज़ाती। बंकीकोड्ल-ग्रामासी।।४६।। मग करोनि सिद्धता सर्व। नाना वाद्यें घेउनी अपूर्व। गोकर्ण-ग्रामासी घेतली धांव। दोन्ही बंधूंनीं तेधवां।।४७।। पालखी परम सुंदर सज़वुनी। तींत बैसविलें स्वामींलागुनी। आणिलें मिरवीत आपुल्या सदनीं। भक्तिपूर्वक त्या समयीं।।४८।। स्वामींप्रति एक मास। विनवणी केली रहावयास। उत्सव करिती प्रेमानें बहुवस। संतोषलें चित्त सकलांचें।।४९।। घेतला बंधूंनीं उपदेश प्रेमें। करिती जपध्यानादि नेमें। निर्मल चित्त बहु निष्कामें। ध्याती सर्वदा गुरुमूर्ति।।५०।। असो मग स्वामी भंडिकेरी। मठासी आले त्याउपरी। काय महिमा तयांची भारी। कैसी वर्णावी कळेना।।५१।। परिसा आतां सावधान। शंकराश्रमस्वामींचे सद्गुण। आणिक एक चमत्कार सांगोन। अध्याय संपूर्ण करितों पैं।।५२।। गोकर्णग्रामीं एक द्विजवर। होता एक सारस्वत चित्रकार। नाना चित्रें करी निरंतर। परि तया कोणी पुसेना।।५३।। न मिळे पोटभरी खावया अन्न। परम दुर्बल

द्रव्यहीन। कुणीही न पुसे त्यासी ज़ाण। तूं कोण कोठील म्हणोनि।।५४।। ज़री तो करी चित्रें सुरेख। तरी तयासी कवणही एक। न पुसे तयाच्या चित्रांसी सन्मुख। दाविलीं तरी धिक्कारिती।।५५।। दारिद्र्यानें झ़ाला पीडित। परि अंतर परम शांत। भक्तिभाव असे बहुत। अंगीं त्याच्या निष्काम।।५६।। शंकराश्रमस्वामी यांच़ा। परम भक्त भाविक साच़ा। सतत गुंतवी आपुली वाचा। नामस्मरणीं बहु प्रेमें।।५७।। सुंदरमूर्ति मनोहर। सद्गुरुस्वामींची निरंतर। चित्तीं धरोनि व्यवहार। करी सकलही आनंदें।।५८।। सदा मठासी ज़ाउनी घेई। भेट स्वामींची भक्तीनें पाहीं। परि एक तयाच्या हृदयीं। उपज़ली इच्छा उत्कृष्ट।।५९।। कीं स्वामी श्रीगुरुनाथ। यांसी एकदां आपुल्या गृहाप्रत। पाचारुनी आणावें तरी श्रीमंत। नव्हें मी आतां काय करूं।।६०।। तरी देवा सद्गुरुनाथा। आमुच्या गृहासी तूं बा येतां। काय काणिक तुज़ला ताता। देऊं दरिद्री मी असें।।६१।। काय वाढूं तुज़ला देवा। नाहीं पंच पक्कान्न मिठाई मेवा। कैसा मीं बा तुज़ला द्यावा। सन्मान थोर दयाळा।।६२।। सकळही नेती तुज़ला गृहासी। नाहीं मज़ला योग्यता तैसी। ऐसें म्हणोनि हळहळे मानसीं। चित्रकार तो भक्त।।६३।। मग रात्रीं निज़तां ज़ाण। देखिलें परम सुंदर स्वप्न। श्रीसद्गुरूंनीं देउनी दरुशन। म्हणती ऐक मद्भक्ता।।६४।। मी येतों तुझिया सदनीं। नको काणिक मज़लागोनी। देईं एक मन-वाणी। पुरे इतुकेंचि बा वत्सा।।६५।। इतुकें तया भक्तासी सांगून। अदृश्य ज़ाहले न लगतां क्षण। मग हा इसम ज़ागा होऊन। सांगे स्वप्न पत्नीसी।।६६।। येरु म्हणे मींही तेंच़। स्वप्न देखिलें खचित आतांच़। हेचि शब्द सांगितले साच़। श्रीसद्गुरूंनीं मज़लागीं।।६७।। म्हणोनि मज़ला

वाटे खास। स्वप्न नव्हे हें दृष्टांत विशेष। उदयीकचि आणूं तयांस।ज़ावें आजि मठासी।।६८।। तेव्हां बोले चित्रकार। ज़ाउनी येतों आतांचि सत्वर। ऐसें बोलुनी गेला तो नर। मठामाजीं त्या समयीं।।६९।। ज़ाउनी भेटे सद्गुरुनाथा। म्हणे आमुच्या गृहीं ताता। यावें भिक्षेसी म्हणोनि माथा। ठेविला चरणीं प्रेमानें।।७०।। उदयीक भिक्षा आपुल्यासी। करवावी ऐसें आमुच्या मानसीं। कृपा करोनि आमुच्या गृहासी। लावावे चरण हे देवा।।७१।। ऐसें बोलतां दाटला कंठ। अश्रु लोटले प्रेमभरित। घातलें साष्टांग दंडवत । मग स्वामी बोलती त्या।।७२।। म्हणती अवश्य येऊं तुझिया। सदनीं, घेऊं शिष्यराया। भिक्षा आनंदें, न धरीं तूं भया। कैसें होईल म्हणोनि।।७३।। नको मज़ला काणिक कांहीं। करीं अर्पण मन हें पाहीं। मिष्टान्न भोजन त्यामाजीं सर्वही। येई खचितचि निश्चयें।।७४।। तूं ज़ें जेविसी तेंचि अन्न। इतुकेंचि वाढीं मज़लागोन। कांहींच न करीं अनुमान। आज्ञा आमुची तुज़लागीं।।७५।। ऐकतां श्रीस्वामींचें वचन। हरुषला चित्तीं बहुत ज़ाण। मग गृहासी त्वरित ज़ाऊन। सांगे वृत्तांत पत्नीसी।।७६।। पहा कैसें सद्गुरूंचें मन। नाहीं तयांसी भेद ज़ाण। दरिद्री श्रीमंत तयांसी समान। सारें जग ब्रह्मरूप।।७७।। न पाहती पैसा अडका। भाव एक बघती देखा। त्यावीण न ढुंकिती विशेषिका। श्रीमंती गरीबी ते पाहीं।।७८।। विद्या-गुण-शौर्य-कीर्ती। यांकडे सद्गुरु न बघती। ज्यासी प्रेमळ भाव चित्तीं। त्याकडे ओळती कृपाघन।।७९।। असो मग तो चित्रकार। यथाशक्ति सिद्धता समग्र। करी उत्सुक होउनी साचार। दुज्या दिवशीं पहाटेचि।।८०।। गेला पाचारावया तयांसी। श्रीसद्गुरुस्वामी-मठासी। इकडे पत्नीनें

सिद्धता कैसी। केली उत्तम प्रेमानें।।८१।। गुरुआज्ञेपरी केला पाक। सदा जेवितो तैसाचि देख। परि तो झाला उत्तम सकळिक। स्वयंपाक खमंग बहुत तो।।८२।। इतुक्यामाजीं आला घेऊनि। श्रीसद्गुरुस्वामींलागूनि। पाद्यपूजादि प्रेमें करोनि। ठेविली काणिक ती ऐका।।८३।। होतें तयाज़वळी एक। चार आण्यांचें नाणें चोख। तेंचि दिधलें नाहीं आणिक। तयापाशीं द्रव्य कांहीं।।८४।। ती त्याची काणिक परम। घेतली स्वामींनीं करोनि प्रेम। पाहुनी त्याची भक्ति निःसीम। ज़ाहला संतोष तयांसी।।८५।। शक्तीपरी देतां काणिक। नच ज़री स्वीकारी सद्गुरु देख। खचितचि भक्त तो पावे दुःख। म्हणोनि घेती ते पाहीं।।८६।। नातरी साधूंसी नाहीं आशा। द्रव्याची अणुमात्र निश्चयें मानसा। ज़री घेतला भक्तांचा पैसा। न करिती दुरुपयोग तयाचा ते।।८७।। सत्कार्यासी घालिती पाहीं। दानधर्म करिती सर्वही। म्हणोनि साधूंसी देतां न होई। अणुमात्र व्यर्थ तें द्रव्य।।८८।। असो मग सारुनी पूजा। भिक्षा वाढली सद्गुरुराजा। स्वीकारिली तेव्हां ती सहज़ा। सद्गुरुनाथें बहु प्रेमें।।८९।। ज़ाहला आनंद सकलांसी थोर। घेती प्रसाद भिक्षेचा समग्र। पाक ज़ाहला परम रुचिकर। बघुनी विस्मित सर्वही।।९०।। काय महिमा गुरुरायाची। उपज़ल्यापासुनी न देखेंचि। इतुकी गोडी स्वयंपाकाची। म्हणोनि बोलती परस्पर।।९१।। असो मग स्वामींसी एक। दिवस ठेवुनी घेतलें देख। केला उत्सव परम सुरेख। भक्तिप्रेमें तयानें पैं।।९२।। भक्तीवांचुनी उत्सवासी। कराया द्रव्य ना त्यापाशीं। परि तो उत्सव सद्गुरूसी। परम प्रिय ज़ाहला।।९३।। करोनि प्रेमानें नामाचा गजर। आरती दाविली मनोहर। हाचि उत्सव त्याचा थोर। वाटे कनवाळू सद्गुरूतें।।९४।। असो मग त्या ब्राह्मणासी। गुरुकृपें

तिसऱ्याचि दिवशीं। बोलावुनी नेला परगांवासी। एका धनाढ्य पुरुषानें।।९५।। करविलीं कांहीं चित्रें सुंदर। दिधलें बक्षिस महाथोर। कार्य बघुनी याचें सुकुमार। धनाढ्य पुरुषें त्यालागीं।।९६।। सहस्त्र रुपये तबकीं भरोनि। दिधले तयासी ज़वळी आणूनि। येरु बोले मज़लागोनि। इतुके रुपये कासया।।९७।। तेव्हां तो धनाढ्य पुरुष। म्हणे हें मीं तुज़ला बक्षिस। दिधलें पाहुनी कार्यसाहस। घ्यावेंचि त्वां हें प्रेमानें।।९८।। मग तो रुपये घेउनी ग्रामीं। आला शंकराश्रम-सद्गुरुस्वामी। यांचें दरुशन घेउनी म्हणे मी। करितों पूजा आजि पैं।।९९।। ऐसें म्हणोनि पाद्यपूजा। करूनि अर्पिलें सद्गुरुराजा। म्हणे आपुलेंचि द्रव्य हें समज़ा। घ्यावें दयाळा गुरुराया।।१००।। मग काय केलें गुरुरायें। त्यांतील घेऊनि पांच रुपये। प्रेमभरें सदय-हृदयें। उरलें सकलही दिलें तया।।१०१।। म्हणती प्रसाद हा तुज़ला। दिला तो घेउनी ज़ाय गृहाला। ऐसी आमुची आज्ञा निर्मला। करीं मान्य तूं बापा।।१०२।। मग तो गेला गृहालागुनी। सांगे वार्ता पत्नीच्या कर्णीं। तेव्हां बोले त्याची पत्नी। गुरु-आज्ञेपरी वर्तावें।।१०३।। असो मग तो गुरुकृपें झणीं। प्रसिद्ध झाला साऱ्या अवनीं। जेथें तेथें त्यासी बोलावोनि । नेती चित्रें करावया ।।१०४।। तेणें तो झाला बहु श्रीमंत। तेव्हां पुनरपि श्रीसद्गुरूप्रत। सदनीं नेउनी उत्सव करीत। परम थाटानें त्या काळीं।।१०५।। सद्गुरुकृपा ज़री होय। तरी तयासी उणीव ती काय। गुरूसी देतां शतपट होय। हें सांगाया नलगेचि।।१०६।। तया चित्रकारें स्वामींसी काणिक। चार आणे भक्तीनें देख। अर्पितां तो परम भाविक। किती लाभ पावला पहा।।१०७।। त्याची भक्ति निष्काम खास। अणुमात्र कामना नव्हती तयास।

म्हणोनि तयासी सद्गुरु महेश। पावला पाहुनी भक्तीतें।।१०८।। असो आतां सद्गुरुनाथ। लीला तयांची अगाध बहुत। निर्धनासी केलें धनवंत। निजकृपेनें हो पाहीं।।१०९।। पुढील अध्यायीं सद्गुरुस्वामी। यांचें गमन आपुल्या धामीं। जन लाविले निजधर्मीं। बोधोनि देह झिजविला।।११०।। सद्गुरु स्वामी-आनंदाश्रम। शिवानंदतीर्थ एकचि ब्रह्म। यांच्या कृपाप्रसादें नवम। अध्याय गुरुदासें संपविला।।१११।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां लाभे गुरुकृपा थोर। नवमाध्याय रसाळ हा।।११२।। अध्याय।।९।। ओंव्या।।११२।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति नवमोऽध्यायः समाप्तः।।

ॐ परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीशंकराश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।। ।।ॐ।। जय जय देवा श्रीगुरुराया। काय तुझी अवघी माया। मी अज्ञ बालक न ज़ाणें तया। अगाध महिमा अपार।।१।। काय तुझें स्वरूप दयाळा। कवणासीही न कळे लीला। तूंचि प्रभो भक्तवत्सला। दावीं देवा कृपाळा।।२।। करूं ज़ाता तुज़ला नमन। तरी हो ऐसें हें मन। तुज़वांचोनि ना मी भिन्न। हेंचि वंदन घडतसे।।३।। शब्द-स्पर्श-रूप-रस-। गंध मिळोनि पांच हे सुरस। या पंचविषयीं तूं भरलास। व्यापक अससी सर्वत्रीं।।४।। ऐकतां तुझें गुण-कीर्तन। निंदा-स्तुतिही सर्व समान। शब्दातीत ब्रह्म आपण। ऐसें ज्ञान उदया ये।।५।। त्वचेसी लागतां चरणस्पर्श। तुटती सर्व कामपाश। स्पर्श-विषयामाजीं खास। दिससी तूं बा घनदाट।।६।। पाहतां तुझें रूप सुंदर। न दिसे नयनीं सारासार। सर्वही ब्रह्म पूर्ण हा निर्धार। होय साचार सहज़चि।।७।। जिव्हा चाखितां तव प्रसादा। तिखट आम्ल याचिया फंदा। न पडे, निशिदिनीं निज आनंदा। पोंचविसी तूं निजभक्तां।।८।। ऐशा या रस-विषयीं। यांतही तुझेंचि स्वरूप पाहीं। याहुनी आणिक कांहीं नाहीं। ऐसा निश्चय बाणविसी।।९।। चरणकमलीं पुष्पतुळसी। वाहती त्यांचा सुगंध भक्तांसी। घ्राणामाजीं येतां कैसी। वृत्ति स्वरूपीं निमतसे।।१०।। याही गंध-विषयाभीतरीं। तूंचि दिससी देवा अंतरीं। तुझ्या स्वरूपा नाहीं सरी। कवणाचीही ब्रह्मांडीं।।११।। एवं पंचविषयीं दिशा दाही। आत्मरूपा दाविसी पाहीं। ऐसी तूं सद्गुरु माझी आई। निजभक्तां सांभाळिसी।।१२।। असो आतां श्रोते हो सज्जन। मागील अध्यायीं निरूपण। गरीब भक्तालागीं ज़ाण। उद्धरिलें भाव बघोनि।।१३।। बघती एक भावार्थ। जेथें बाहती तेथें

ज़ात। नाहीं गरीब श्रीमंत त्यांप्रत। सारें आत्मरूपचि तयां।।१४।। असो आतां परिसा सावध। सांगूं त्यांचा परम प्रसिद्ध। जनासी करिती ज़ो शुद्ध बोध। अति आवडीं ते पाहीं।।१५।। जेथें तेथें आमुचे जन। असती तेथें ज़ाउनी आपण। शंकराश्रमस्वामी सघन। करिती उद्धार जनांचा।।१६।। कासया त्यांसी करणें भ्रमण। केवल जगदोद्धाराकारण। न पाहे देहाकडे ज़ाण। खचितचि बापा निश्चयें।।१७।। एवं फिरुनी ग्रामोग्रामीं। सुखवीतसे जनांसी स्वामी। आणिक लाविले जन स्वधर्मीं। वारंवार बोधोनि।।१८।। इतुकें कराया काय कारण। कासया त्यांसी इतुकें बंधन। करावया जनांचें कल्याण। हेंचि काज़ सद्गुरूचें।।१९।। असो आतां सद्गुरुस्वामी। कधीं कधीं ज़ाती ग्रामोग्रामीं। तेथें भक्त अंतर्यामीं। आनंदोनि काय करिती।।२०।। धेनूसी देखतां वत्स पाठीं। लागे आनंद न समाये पोटीं। तैसी गुरुमाउली देखतां दृष्टीं। भक्त धांवती आनंदें।।२१।। सन्मानोनि आणिती भक्त। आणि उत्सव करिती बहुत। आपापुल्या गृहाप्रत। पाचारूनि नेती प्रेमानें।।२२।। करोनि सुंदर सिंहासन। बैसविती स्वामींसी प्रेमेंकरून। पादपूजादि करूनि ज़ाण। सर्वोपचार समर्पिती।।२३।। घेउनी ज़ाती गृहालागून। आणिक करोनि भिक्षावंदन। नाना वैभव करोनि अर्पण। भाविक सज्जन संतोषती।।२४।। सकलांसी आनंद थोर होय। म्हणती आम्हीं सद्गुरुपाय। देखिले आजि परम सदय। बोलका देव हा पाहीं।।२५।। पाषाणमूर्ति न बोले कांहीं। त्यापासूनी जनांसी उपयोग नाहीं। परि ही सद्गुरुमाई। करी बोध भक्तांसी।।२६।। म्हणोनि सद्गुरु बोलका देव। तयांपासुनी जनांसी सर्व। होउनी सद्बोध लाभे अपूर्व। निजस्वरूपाचें तें ज्ञान।।२७।। देव म्हणिजे स्वयंप्रकाश। ज़ाणणें

ऐसें म्हणती त्यास। ज़ो ज़ाणे आपुल्या स्वरूपास। तोचि देव निर्धारें।।२८।। त्याविण अन्य नाहीं देव। म्हणोनि धरावा तेथेंचि भाव। त्यावांचुनी आणिक आठव। करूं नये विषयांच़ा।।२९।। असो यापरि करितां उद्धार। लोटलीं कांहीं वरुषें परिकर। भक्तजनांनीं अपार। आनंदें काल क्रमियेला।।३०।। ऐसें असतां एकेकाळीं। शंकराश्रम-सद्गुरु माउली। भटकळ ग्रामाप्रति पातली। परिवारसमवेत ज़ाण पां।।३१।। तेथील आमुच़े सारस्वत। यांनीं केला अपराध बहुत। श्रीसद्गुरुसंनिधीप्रत। केलें दुर्लक्ष अनिवार।।३२।। ज़ो करावा योग्य सत्कार। तो त्यांनीं न केला निर्धार। तेथुनी मग सद्गुरुवर। निघाले गोकर्ण-ग्रामासी।।३३।। आधींच़ देहासी व्यथा होत। त्यामाजीं तेथील गृहस्थ। नच करिती सन्मान आपुल्याप्रत। बघतां खिन्न ज़ाहले।।३४।। खिन्न कां ज़री प्रश्न करितां। तरी सांगूं उत्तर आतां। सावध करोनि आपुल्या चित्ता। परिसा भाविक चतुर हो।।३५।। अवचित लाभला हातासी परिस। तो टाकतां म्हणावें काय त्यास। कामधेनु येतां घरास। तिज़सी दवडी अज्ञपणें।।३६।। मिळतां परम उत्कृष्ट भोजन। अविचारें ज़ाय दवडून। ऐसें करितां होय नुकसान। हें न कळे अज्ञपणें।।३७।। तैसें साधु येतां ग्रामासी। करितां दुर्लक्ष त्यांज़पाशीं। काय गति होईल कैसी। हेचि चिंता सद्गुरूंतें।।३८।। ज़े असती धर्मगुरु आमुच़े। त्यांसी सकलही सारस्वत साच़े। मुलांपरी वाटती, त्यांच़े। रक्षणा इच्छिती सदा ते।।३९।। पुत्र ज़री मातेसी अव्हेरी। तरी खिन्न माता आपुल्या अंतरीं। म्हणे देवा क्षमा करीं। माझ्या बाळाच़ा अपराध।।४०।। ज़री त्याच़ा अपराध थोर। तूं करीं त्याच़ें रक्षण साचार। ऐसें विनवी माता सत्वर। आपुल्या पुत्रासाठी पैं।।४१।। मातेच़ा ज़ो करी धिक्कार। पाप नसे

त्याहुनी थोर। येर केले पुण्याचे डोंगर। निष्फल होती त्यापुढें।।४२।। म्हणोनि मातेसी वाटे चिंता। घडी घडी प्रार्थी रक्षण करीं सुता। न होय अपमान तिचिया चित्ता। ज़री अव्हेरी पुत्र तिला।।४३।। परि तिच्या मनासी खिन्नता। वाटे ती इतुक्याचकरितां। कीं आपुल्या मुलानें कर्तव्या सर्वथा। चुकूं नये हेंचि पैं।।४४।। नाहीं तिच्या अंगीं स्वार्थ। मुलापुढें खचितचि किंचित। सुखी असो आपुला हा सुत। करी ती प्रार्थना दिनरजनीं।।४५।। तैसी आपुली सद्गुरुमाता। आम्हां सारस्वतां जनां समस्तां। बघे शिशुपरी आपुल्या भक्तां। न वाटे अपमान त्यांलागीं।।४६।। सद्गुरूचा केला अव्हेर । तें पाप महा थोर। म्हणोनि खिन्न झाले अपार । निघाले सत्वर ग्रामासी।।४७।। ज़ावया गोकर्ण-ग्रामांतरीं। शिरालीमाजीं ते अवसरीं। आले बघोनि येती सामोरी। भक्तमंडळी तेथील पैं।।४८।। पालखीमाजीं बैसवुनी त्वरित। मिरवित नेलें ग्रामाप्रत। गौरवुनी सकलांनीं तेथ। उत्सव थोर मांडियला।।४९।। आणिक म्हणती रहावें येथ। स्वास्थ्य नाहीं आपुल्या देहांत। आतां नच ज़ावें गोकर्णाप्रत। येथेंचि रहावें ही प्रार्थना।।५०।। शरीरव्यथा ज़ाय तोंवरी। येथेंचि वास करावा निर्धारीं। ऐसी प्रार्थना करुनी चरणांवरी। घातलें दंडवत त्या समयीं।।५१।। पाहुनी भक्तांचा अति आग्रह। राहिले तेथें परिवारासह। दिवसेंदिवस झाला देह। अशक्त बहुतचि स्वामींचा।।५२।। केलें औषध नाना उपचार। परि ते निष्फल झाले समग्र। मग सारस्वत चिंतातुर। ज़ाहले सकल निजमानसीं।।५३।। केला विचार सकल जनांनीं। कीं स्वामी ज़ातील कैलासभुवनीं। पुढें आम्हां सारस्वतांलागुनी। कोण दावील सुपंथ।।५४।। म्हणोनि गेले संनिधीज़वळी। म्हणती शिष्य-स्वीकार करावा ये वेळीं।

ऐसी प्रार्थना चरणकमलीं। देवा गुरुराया दयाळा।।५५।। पाहुनी भक्तजनांचा भाव। परम संतोषे सद्गुरुदेव। परि कराया शिष्य-स्वीकारा ठाव। नेदी बळेंचि त्या काळीं।।५६।। म्हणती कासया शिष्य आतां। सांगितला बोध धरा चित्ता। आम्ही न करूं शिष्य-स्वीकार सर्वथा। सत्यवचन आमुचें पैं।।५७।। तेव्हां म्हणती भक्त सारे। करावा शिष्य-स्वीकार स्वकरें। तरीच आम्हांसी पुढती बहु बरें। होय निर्धारें अज्ञजनां।।५८।। नसतां सद्गुरु कोण करील। सुबोध जनांसी देवा ये वेळ। कृपा करोनि त्वां वेल्हाळ। करावाचि शिष्य-स्वीकार तो।।५९।। यावरी बोले सद्गुरुराय। भटकळ ग्रामींची बघतां सोय। मन हें आमुचें खिन्न होय। नको वाटे शिष्य पुढें।।६०।। सांगतों आतां निर्वाण वचन। नको शिष्य-स्वीकार कवण। भवानीशंकर तुमचें कल्याण। करील ज़ाणा खचितचि।।६१।। भिऊं नका सर्वथा तुम्ही। धरा वचन अंतर्यामीं। आतां सांगतों ज़ो आम्ही। बोध धरा दृढ तो मनीं।।६२।। ज़री धरितां दृढभाव। काय उणीवता तुम्हां सर्व। भावें भज़तां सद्गुरुराव। मिळेल सहज़चि निर्धारें।।६३।। मुख्य परमात्म्यावरी धरावें प्रेम। तरीच साधेल आपुलें काम। प्रेमावांचुनी कैंचाही नेम। न येचि उपयोगातें पैं।।६४।। प्रेम म्हणजे प्रीति। त्यासीच म्हणती भक्ति। ऐसी भक्ति करितां दृढ ती। कैंचें असाध्य होय त्या।।६५।। तीच करावी भक्ति बळकट। पार होईल सकल संकट। ज़री आले नाना कष्ट। तरी न सोडावे चरण ते।।६६।। सारा मोह सांडुनी ज़ाण। काया वाचा आणि मन। करावें प्रभूसी अर्पण। भक्तिपूर्वक निर्धारें।।६७।। ऐसें करितां तो दयाघन। पार करील न लागतां क्षण। येथें न करावें अनुमान। खचितचि ज़ाण निश्चयें।।६८।। असो आतां श्रोते हो सज्जन। येथें थोर येईल प्रश्न। भटकळ-जनांकारण।

इतुका क्षोभ कासया।।६९।। शिराली-ग्रामीं सकल जनांनीं। प्रार्थिलें परि तें न घेती कर्णीं। कैसी नुपज़ली करुणा स्वमनीं। श्रीस्वामींच्या ज़ाणा हो।।७०।। तरी ऐका तुम्ही भाविक। साधुपुरुषां अमुक एक। ऐसेंचि वर्तावें नाहीं देख। स्वइच्छेपरी वागती ते।।७१।। न होय कष्ट दुज्यांलागून। ऐसेंचि आचरण करिती ते ज़ाण। ज़ें ज़ें करिती तें तें पूर्ण। होय कार्य सफल त्यांचें।।७२।। नाहीं त्यांसी मानावमान। न होती ते कवणाच्या स्वाधीन। मनासी येतां सकलही ज़ाण। कराया सिद्ध असती ते।।७३।। ते ज़ें करिती कार्य। तेणें सकलांचें हितचि होय। आम्हां अज्ञांसी सत्पुरुषांचें हृदय। कैसें असे तें समज़ेना।।७४।। नसे त्यांच्या अंगीं क्रोध । त्यांची क्रिया होय ती शुद्ध। आम्ही मानव आहों बद्ध। म्हणोनि शब्द लावितों त्यां।।७५।। एवं ज़े पुरुष जीवन्मुक्त। ते करुनी अकर्ते होत। भोगुनी अभोक्ते असती सतत। मग कैंचा दोष तयांसी।।७६।। जगाच्या कल्याणास्तवचि सदय। सद्गुरूचा अवतार खचित होय। म्हणोनि ते ज़ें करिती कार्य। तेणेंच होय हित आमुचें।।७७।। असो आतां श्रीगुरुराय। बोधुनी सकलांसी देती अभय। मग करिती सारस्वत-समुदाय। विचार थोर तो पाहीं।।७८।। कीं हे ज़री झाले मुक्त। समाधि कोठें करावी येथ। ऐसें परस्परांमाजीं बोलत। बैसले विचार करावया।।७९।। तेव्हां तेथें एक गृहस्थ। नागरकट्टी सकलां विदित। त्यांचा पूर्वज एक भक्त। म्हणे आम्ही ज़ागा देऊं पैं।।८०।। आमुच्या सदनीं स्थळ उत्तम। समाधि द्यावया होईल सुगम। देतों आम्हीं शंकराश्रम-। स्वामींलागीं निश्चयेंसीं।।८१।। ऐकतां ज़ाहलें समाधान। तेथील सारस्वत जनांलागून। सद्गुरुस्वामींचा आज़ार ज़ाण। अतिशय झाला त्या काळीं।।८२।। ज़री

केले नाना उपचार। तरी उपयोगा न येती साचार। त्यामाजींच त्यांनीं क्षीरसागर। मार्ग क्रमिला त्या काळीं।।८३।। शके सोळाशें एकूणऐंशीं। ईश्वर-संवत्सर आश्विनमासीं। शुद्ध षष्ठी ऐशा दिवशीं। ज़ाहले समाधिस्थ ज़ाणा हो।।८४।। ज़ाहला थोर हाहाःकार। हळहळती सकल नारी नर। सांगावया भला विचार। नाहीं कोणी म्हणोनि।।८५।। ज़ाहला सकलांसी बहुत ताप। सद्गुरूसाठीं करिती विलाप। मग करोनि उत्सव खूप। पुढील कार्य जन करिती।।८६।। त्याचि समयीं तेथें एक। उत्तर हिंदुस्थानाहूनि देख। संन्याशी आले होते साहजिक। पाचारिलें तयांसी।।८७।। अंत्यविधि-कर्म ते वेळ। करविलें तयांकडुनी सकल। मिरवुनी केला उत्सव विपुल। शंकराश्रमस्वामींचा ।।८८।। नेमिल्या ज़ागीं नागरकट्टी। यांच्या सदनामाजीं गोमटी। बैसवुनी प्रेमळ सद्गुरुमूर्ति। दिधली समाधि त्या समयीं।।८९।। तेथेंचि आतां चित्रापुर-। मठ ज़ाहला महाथोर। आणि देव भवानीशंकर-। मूर्ति स्थापिली त्या स्थानीं।।९०।। तीच होय मुख्य समाधी। आपण त्यासी म्हणतों 'होडि-समाधि'। ऐसी त्याची होय प्रसिद्धी। सारस्वतांसी विदितचि।।९१।। असो तयां नागरकट्टी। यांनीं दिधली ज़ागा मोठी। अद्यापिही त्यांची कीर्ती। गाज़तसे आमुच्यांत ही।।९२।। द्यावया समाधि आणि मठासी। दिधली आपुली ज़ागा कैसी। उत्तम असुनी अर्पिली मानसीं। अणुमात्र खेद न करितां।।९३।। म्हणोनि त्यांच्या स्मरणार्थ ज़ाण। अज़ूनिही त्या वंशजांलागुन। मठामाजीं प्रथम सन्मान। देती सकल कार्यासी।।९४।। सर्व सत्कार्याचे दिवशीं। पूजादि यांची व्हावी प्रथम ऐसी। चाल अद्यापि आहे हें सर्वांसी। असे विदित पहा हो।।९५।। आमुच्या मातृभाषेमाजीं। 'पहिलो विडो'

म्हणती सहजीं। नागरकट्टी यांच्या वंशजीं। अर्पिती सन्मान हा पहा।।९६।। असो आतां परिसा सावध। झाले समाधिस्थ सद्गुरु सुखद। शिष्य-स्वीकार न करितां, अंध । ज़ाहले सारस्वत गुरुवीण।।९७।। पुनरपि आली पूर्वस्थिती। सद्गुरुवांचुनी जन तळमळती। पुढील अध्यायीं ती प्रख्याती। बोलूं सविस्तर पहा हो।।९८।। काय महिमा त्यांची सुंदर। आठवितां सद्गुण मनोहर। ज़ळतील पापें समग्र। क्षण न लागतां निर्धारें।।९९।। काय तें हृदय किती कोमल। भक्तांसाठीं फिरोनि सकल। देह झिज़विला आपुला निर्मल। काय काज़ तयांसी।।१००।। केवल भक्तप्रेमासाठीं। जेथें तेथें उठाउठीं। ज़ाउनी सकलां देउनी भेटी। केला उद्धार जनांचा।।१०१।। ज़री झाले व्याधिग्रस्त। तरीही न सोडिती जनांचे हस्त। वारंवार बोधुनी त्यांप्रत। आणिलें निजमार्गासी।।१०२।। किती वानूं त्यांची कीर्ती। लिहाया मेदिनी पुरत नसे ती। तेथें हा मंदमती। काय वर्णूं शकेल पैं।।१०३।। सद्गुरुस्वामी-आनंदाश्रम। शिवानंदतीर्थ एकचि ब्रह्म। त्यांच्या कृपाप्रसादें दशम। अध्याय गुरुदासें संपविला।।१०४।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां भक्ति होय दृढतर। दशमाध्याय रसाळ हा।।१०५।। अध्याय १०।। ओंव्या १०५।। ॐ।। तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति दशमोऽध्यायः समाप्तः।।

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीशंकराश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।। ।। ॐ।। जय जय सद्गुरो शंकराश्रमा। असे तुझी अपार महिमा। परि न समज़े मानवां आम्हां। काय लीला तव देवा।।१।। तूं भक्तांची माउली। संकटसमयीं सकलां पावली। तयासाठींच़ अवनीं आली। जगदोद्धाराकारणें।।२।। ज़री केली कोणीं निंदा। तूं न सांपडसी त्याचिया फंदा। सदा राहसी निज आनंदा-। माजीं देवा कृपाघना।।३।। कैसें करावें तुझें स्तवन। हेंचि न कळे मज़लागोन। तुझ्या स्वरूपाचें वर्णन। कराया कवण समर्थ जगीं।।४।। आतां ऐका मागील अध्यायीं। शंकराश्रम सद्गुरुमाई। करोनि संचार सर्वां ठायीं। केला उद्धार जनांच़ा।।५।। मग आतां शिराली-ग्रामीं। तेथेंचि घेती समाधि स्वामी। जन झ़ाले अंतर्यामीं। दुःखित गुरूविण ते पाहीं।।६।। पुनरपि झ़ाले सद्गुरूवीण। कष्टी अंतरीं उदासीन। मग निंदा करिती दुर्जन। मत्सरही करूं लागले।।७।। मागें ज्यांनीं केला द्वेष। ते अधिकारी आतां विशेष। देते झ़ाले सारस्वतां दोष। मग काय करिती तें ऐका।।८।। नगर-संस्थान येथील राया। सांगती तेथील अधिकारी तया। सारस्वत-स्वामींच्या ठाया। नाहीं पुनरपि गुरु केले।।९।। होते ज़े स्वामी मुक्त झ़ाले। त्यांनी आणिक शिष्य नाहीं केले। मठासी कुलूप घालावें ये वेळे। नाहीं वारस म्हणोनि।।१०।। तेथील सर्व ज़मीन-ज़ुमला। करावा ज़प्त ये वेळां। संस्थानासी ज़ोडावा वहिला। ऐसें सांगती रायासी।।११।। मग तो राजा देई हुकूम। अधिकाऱ्यांवरी सोंपवी काम। ज़प्त करोनि आणावें प्रथम। शिरालीसी ज़ावोनि।।१२।। आधींच़ तेथील येर अधिकारी। करिती द्वेष आमुच्या जनांवरी। राजाच़ा हुकूम होतां सत्वरी। गेले शिराली-

ग्रामासी।।१३।। एक अधिकारी आणि हेर। गेले दोघे ग्रामाभीतर। मठासी ज़ाउनी करिती दुर्धर। पापाचरण ते पाहीं।।१४।। शंकराश्रम-स्वामींसी जेथें। समाधि दिधली होती तेथें। लिंग त्यावरी ठेविलें होतें। मृत्तिकेचें जनांनीं।।१५।। त्यावरी ओतुनी पाणी सारें। लिंग विरवोनि टाकीं त्वरें। ऐसा हुकूम केला अहंकारें। हेरासी अधिकारीयानें पैं।।१६।। तेव्हां हेर तेथें ज़ाऊन। लिंगावरी घाली जीवन। असंख्य घातलें तरी तें ज़ाण। विरघळेना कदापि।।१७।। मग तेणें केलें काय। फोडावया लिंग बहुत उपाय। केला परि तो निष्फल होय। ज़ैसें तैसेंचि असे तें।।१८।। पाण्यामाजीं विघुरेना। फोडों गेल्या न फोडवे कवणा। अघटित करणी देखुनी स्वमना-। माजीं विस्मित झ़ाला हेर।।१९।। भयभीत होउनी निजमानसीं। गेला तो इसम अधिकाऱ्यापाशीं। ज्यानें केला हुकूम त्यासी। सकल वृत्तांत निवेदिला।।२०।। म्हणे खचितचि भीति हो मज़। वाटते बहुतचि महाराज। दुज़ें कांहीं सांगा काज़। नका पाठवूं त्या मठासी।।२१।। तया स्वामींची महिमा अपार। काय सांगूं तुम्हां निर्धार। साक्षात् विष्णूचा अवतार। नाहीं संशय यामाजीं।।२२।। हुकुमापरी केलें काम। ओतितां उदक आला घाम। अमित घातलें, झ़ाला बहु श्रम। विरोनि नच ज़ाय तें पाहीं।।२३।। मग तें फोडाया केला प्रयत्न। न फुटेचि सर्वथा ज़ाण। पाहिले नाना उपाय करोन। सकल निष्फल ज़ाहले ते।।२४।। म्हणोनि ते स्वामी नव्हेत मनुष्य। देवचि ते कीं असती खास। आतां सांगतों मी तुम्हांस। पुनः तेथें नच ज़ाऊं।।२५।। ऐसें ऐकतां त्याचें भाषण। अधिकाऱ्याचेंही भयभीत मन। होउनी विचारी मानसीं ज़ाण।

काय चमत्कार हा म्हणावा।।२६।। असो मग तेचि दिनीं। रात्रीं रक्त भडभडां ओकुनी। हेर आणि अधिकारी त्या स्थानीं। पावले मरण तत्काळ।।२७।। तेव्हां पसरली वार्ता समूळ। भ्याले संस्थानींचे अधिकारी सकळ। नको ज़प्त करूं ये वेळ। म्हणोनि स्वस्थ बसले ते।।२८।। येथें आमुचे सारस्वत ब्राह्मण। करिते झ़ाले अर्जी आपण। संस्थानींच्या रायालागून। काय ती सांगूं आतां पैं।।२९।। अहो राया आमुचे स्वामी। मुक्त झ़ाले, आतां आम्ही। शिष्य करूं तोंवरी तुम्ही। न करा ज़प्त कांहींही।।३०।। यावरी राजा ज़ाहला कबूल। करा शिष्य झ़डकरी ये वेळ। नातरी पुढें ज़प्त होईल। ऐसा हुकूम पाठविला।।३१।। असो मग सारस्वत। ज़ाहले परम चिंताक्रांत। आळविती तेव्हां शंकराश्रमांप्रत। देवा आतां काय करूं।।३२।। तूंचि राखीं तुझें ब्रीद। दावीं आतां सद्गुरु प्रसिद्ध। कोण करील आम्हां बोध। तूंचि सांगें दयाळा।।३३।। ज़री झ़ाला अपराध थोर। तरी त्वां पोटीं घालुनी सत्वर। दाखवीं आम्हां सद्गुरुवर। क्षमा करोनि तूं बापा।।३४।। मागें बहुपरी विनविलें तुज़ला। परि शिष्यस्वीकार नाहीं केला। काय ती नेणे आपुली लीला। तूं ज़ें करिसी तेंचि खरें।।३५।। सद्गुरु नसतां कोण दुर्दशा। होते जनांची कळलें जगदीशा। म्हणोनि आतां धरूनि आशा। आलों शरण तुज़ देवा।।३६।। व्हावा मनासी अति अनुताप। तेव्हांचि मिळेल सद्गुरुबाप। म्हणोनिच तुवां दाविला प्रताप। नच केला शिष्य सर्वथा पैं।।३७।। त्वां केलें तें बरवेंचि झ़ालें। परि आतां न करीं उशीर ये वेळे। सत्वर दावीं सद्गुरुमाउले। काय करूं तें कळेना।।३८।। ऐसें म्हणोनि सकल भक्त। स्तविते झ़ाले श्रीसद्गुरूप्रत। इकडे भटकळ ग्रामीं जेथ। दुर्लक्षिलें स्वामींसी ते येती।।३९।।

ऐकुनी सकल वर्तमान। श्रीसद्गुरुनाथांचे महिमान। मृत्तिकेचें लिंग तें ज्ञाण। कांहीं केल्या विघुरेना।।४०।। ऐसी वार्ता पडतां कानीं। धांवत आले सद्गुरुचरणीं। म्हणती देवा आम्हां-लागुनी। क्षमा करावी दयाळा।।४१।। नाहीं कळलें तुझें चरित्र। ऐकतां दिसूं लागे विचित्र। ऐशा तुज़ला स्मरतां पवित्र। होईल वाणी आमुची ही।।४२।। अहा देवा भक्तवत्सला। अपराध आमुचा थोर झाला। परि तूं क्षमा करोनि तारिसी सकलां। ऐसें वाटतें हो देवा।।४३।। ऐसी विनवणी नानापरीनें। करिती प्रेमें केविलवाणें। म्हणती देवा आतां त्वरेनें। दावा सद्गुरुस्वामींसी।।४४।। यापरी करिती प्रार्थना सकल। मग करिती विचार प्रबल। सारे मिळोनि भक्त प्रेमळ। करावें स्वामी कवणातें।।४५।। आतां ऐका श्रोते सादर। नभीं विमानें दाटलीं अपार। करिती पुष्पवृष्टि समाधीवर। स्वर्गींहुनी सुरवर ते।।४६।। कीं आतां होईल तृतीय। अवतार येथें येईल सदय। श्रीमहेशचि म्हणोनि अभय। देती आनंदें ते पाहीं।।४७।। किती धन्य अवनींचे लोक। ऐकती सतत सद्गुरुविवेक। आम्ही देव तयांसन्मुख। काय उपयोग आमुचा पैं।।४८।। ऐसें म्हणोनि स्वर्गींचे देव। जयजयकार करिती सर्व। तेव्हां काय झालें तें अपूर्व। सांगूं आतां परिसा हो।।४९।। आमुचे हे सारस्वत ब्राह्मण। सद्गुरुसंनिधीं प्रार्थना करोन। विचार करिती तेव्हां ज़ाण। कवण मिळेल शिष्यपदा।।५०।। ऐसें परस्पर बोलतां तेथ। बैसले होते वडील बहुत। एक बोले तेव्हां त्यांच्याप्रत। म्हणे सांगतों मी ऐका।।५१।। शंकराश्रम स्वामी आमुचे। यांचे शिष्य असती साचे। शिराली पंडित यांच्या वंशजाचे। कोल्लूर-ग्रामीं वसती ते।।५२।। संन्यासदीक्षा त्यांनीं घेतली। शंकराश्रमस्वामींज़वळी। आप-संन्यासी होउनी या काळीं।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

असती योगाभ्यास करुनी ते।।५३।। ते आमुचे सद्गुरु व्हावया। योग्य असती ऐशा ठाया। त्यांसीच येथें पाचारूनियां। करावें सद्गुरु वाटतें।।५४।। ऐसें ऐकतां सकल जनांसी। आनंद ज़ाहला निजमानसीं। म्हणती ज़ाउनी तयांपाशीं। विनवुनी आणूं आतांचि।।५५।। ऐसा विचार सकल जनांनीं। करोनि लगबगें प्रमुख कुणी कुणी। गेले पाचारावया स्वामींलागुनी। कोल्लूर-ग्रामीं त्या समयीं।।५६।। पुढील अध्यायीं निरूपण। तृतीय अवतार होईल ज़ाण। ऐकतां पाप होय दहन। त्यांचे सद्गुण ते पाहीं।।५७।। पहा आतां कैसें होय। दाविले श्रीसद्गुरूचे पाय। शंकराश्रमस्वामी सदय। ओळले यांच्या भक्तीस।।५८।। आपुल्या बाळांचें माता सहज़। कळवळोनि करी सकलही काज़। सांगावें नलगे तिज़ला समज़। आपणचि करी ती प्रेमानें।।५९।। नाहीं तिज़ला मानावमान। झटे ती प्रेमानें बाळाकारण। तैसा आपुला शंकराश्रम सघन। कळवळोनि धांविन्नला।।६०।। त्यांनींच त्या वृद्ध मुखानें। सुचविलें सकलां बहु प्रेमानें। गुरुकृपेनें काय तें उणें। होईल सांगा खचितचि।।६१।। आतां येथें येईल प्रश्न। कीं स्वामी यांनींच दाविला सघन। सद्गुरु कोल्लूरीं आहे म्हणोन। वृद्धमुखानें म्हणसी तूं।।६२।। आणिक म्हणतां मातेपरी। शंकराश्रम आपुल्या अंतरीं। कळवळोनि धांवे सत्वरी। निजभक्तांसी रक्षाया।।६३।। तरी आधींच शिष्यस्वीकार। कां न केला सांगा साचार। तरी ऐका त्याचें उत्तर। तुम्ही भाविक श्रोते हो।।६४।। मुलें ज़री करिती अपराध। मातेच्या अंतरीं नाहीं खेद। परि शिकवाया त्यांसी,क्रोध। दावी वरिवरी ती पाहीं।।६५।। म्हणे नायकें तुमचें वचन। खावया नेदीं तुम्हांलागुन। परि ठेवी लपवून। त्यांसीच द्यावयाकारणें।।६६।। जेव्हां तीं येती

ताळ्यावरी। आणिक अपराध न करूं निर्धारीं। म्हणोनि रडतां झडकरी। देई कळवळोनि तेधवां।।६७।। तैसें केलें सद्गुरुरायें। शंकराश्रमस्वामी-सदयें। बुद्धीवर यावया जनांसी पाहें। बळेंचि शिष्य नच केला।।६८।। जेव्हां जनांसी ज़ाहला अनुताप। तेव्हां आपुलें परमस्वरूप। शंकराश्रम मायबाप। निजभक्तांवरी ओळले।।६९।। आधींच़ सिद्ध करोनि स्वामी। ठेविले होते कोल्लूर-ग्रामीं। शरण येतां भक्त निष्कामी। दाविले तत्काल त्या समयीं।।७०।। साक्षात् अवतरे शंकर खचित। बळेंचि लपवुनी ठेविला जगांत। मातेच़ा ज़ो दिधला दृष्टांत। त्यापरी केलें सद्गुरूंनीं।।७१।। ज़ाहले म्हणोनि समाधिस्थ। न पावे त्यांच़ा आत्मा अस्त। असती व्यापक निश्चयें सतत। सद्गुरुस्वामी ते पाहीं।।७२।। महिमा तयांची न ज़ाय कोठें। म्हणोनि दाविलें महत्त्व मोठें। कांहीं केल्या लिंग न फुटे। विरेना तें मृत्तिकेच़ें पैं।।७३।। घेतली समाधि म्हणोनि पाहीं। महिमा न ज़ाय कुठें कांहीं। अज्ञपणें मानव म्हणे नाहीं। सद्गुरुस्वामी ते पाहीं।।७४।। ज्याच्या चित्तीं असे भाव। त्यासी सदा दिसे देव। नातरी तो सद्गुरुराव। सन्मुख असतांही दिसेना।।७५।। चित्त असे आमुच़ें मलिन। म्हणोनि न दिसे आम्हांलागुन। संनिध असतां सद्गुरु ज़ाण। भावितों मनुष्य ऐसें त्यां।।७६।। अणुमात्र नसावी मनुष्यभावना। यामाजीं विचारचि करावा ज़ाणा। न लागे विचारावें कवणा। मनामाजींच़ करावा।।७७।। विचार करितां समज़ेल आपणा। मनुष्य नव्हे सद्गुरुराणा। बघतां तयाच्या सद्गुणा। सहज़चि समज़ेल मानवा पैं।।७८।। ज़ो असेल खरा भक्त। त्यासीच़ कळे सद्गुरु समर्थ। देवचि ऐसा भाव निश्चित। धरी त्या ठायीं तो सर्वदा।।७९।। ज्यासी होय पित्तज्वर। त्याची जिव्हा कडवट

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

समग्र। मुखीं घालितां पदार्थ रुचिकर। म्हणे कडू हें सकळही।।८०।। तैसें ज्याचें चित्त मलिन। त्यासी सद्गुरूचे गुणदोष ज्ञाण। दिसती अमित याचिकारण। मनुष्य समज़ोनि दवडिती।।८१।। आपुली जीभ कडू म्हणोन। लागे कडू सकलही ज़ाण। तैसें आपुल्याकडे असतां दुर्गुण। साधूंसी लाविती ते दोष।।८२।। म्हणती पदार्थचि कडू सर्व। तैसें साधूंसी म्हणती असे गर्व। बहुत ढोंगी निष्ठुर स्वभाव। ऐसें वाटे आपुल्यापरी।।८३।। ज्याचें असे चित्त शुद्ध। त्यासी सद्गुरु देवचि दिसे प्रसिद्ध। तोचि भोगी निजानंद। न ढळे कदापि तो मनीं।।८४।। न पाही कदापि गुणदोष त्यांचे। ते ज़ें सांगती आपुल्या वाचे। तेंचि प्रमाण तया साचें। त्यावरी संशय ना दुसरा।।८५।। अन्य न बघे तो सद्गुरूवांचून। सारें जगचि गुरुरूप ज़ाण। गुरूवांचोनि त्यासी आन। देव खचितचि नाहीं पैं।।८६।। जेथें ज़ाय आपुलें मन। तेथें सद्गुरूचि दिसे पूर्ण। ऐशिया भक्तालागुन। म्हणती 'सद्भक्त' खचित पैं।।८७।। असो आतां बहुत कासया। बोलतां ज़ाईल वेळही वायां। त्यापरीच आम्हींही गुरुराया। भज़ावें तरीच सार्थक पैं।।८८।। ज़री आम्हां नाहीं भक्ति। बळेंचि आणावी आम्हीं ती। मग येईल सहज़गतीं। दृढतर भक्ति निर्धारें।।८९।। कित्येकांचा प्रेमा बहुत। नाहीं तैसा आम्हांप्रत। म्हणतां ज़ुलुमेंचि आणावा तरी त्यांत। कैसा आणावा सांगा पैं।।९०।। ऐका उत्तर कैसें तें हें। श्रीगुरु ज़ें बोधीत आहे। प्रवचनादि करूनि पाहें। तें लक्ष देऊनि ऐकावें।।९१।। करावें नेमानें श्रवण। जेथें मिळेल तेथें ज़ाण। कळो न कळो तरी ज़ावोन। करिती प्रवचन तें परिसावें।।९२।। यावरी ऐसा येईल प्रश्न। न कळतांचि करुनी श्रवण। काय त्याचें प्रयोजन। त्याचें परिसा उत्तर पैं।।९३।। श्रवणाचा गुण पापदहन।

न कळतां ज़री केलें श्रवण। तरी पाप सारें होय हरण। नसे संशय यामाजीं।।९४।। अग्नीचा गुणचि पोळावयाचा। न कळतांचि ज़री पाय आमुचा। पडे त्यावरी तरीही साचा। पोळल्यावीण न राहे।।९५।। तैसें करितां पुराणश्रवण। ज़री ना कळे आम्हांलागून। अथवा लक्ष नसे तेथें ज़ाण। तरीही पाप दहन होय।।९६।। श्रवणाचा गुणचि पापदहन। होतसे खचितचि, नसे अनुमान। पाप गेलिया सर्वही पूर्ण। येई गुरुभक्ति दृढतर ती।।९७।। ज़री न मिळे गुरुमुखें श्रवण। तरी कोणी सांगती तेथें ज़ावोन। परिसावें तेंचि सद्गुरु कृपाघन। सांगती ऐसें समज़ोनि।।९८।। तेंही न मिळे ज़री एकासी। तरी त्यानें ग्रंथ आपुल्याशीं। उपास्यमूर्ति-सन्मुखेंसीं। गुरु त्या मानोनि वाचावा।।९९।। आपणचि मुखें वाचावें। परि गुरु सांगती ऐसें भावावें। गुरुभावचि तारक स्वभावें। गुरूपरिस ज़ाणा हो।।१००।। ज़री ना समज़े वाचावयासी। तरी करावें आपुल्या मानसीं। नामस्मरण तेंही नाशी। पाप सारें निर्धारें ।।१०१।। एवं पाप नासतां संपूर्ण। सद्गुरुभक्ति ज़डेचि ज़ाण। गुरुवांचोनि न दिसे आन। काय सांगूं ती नवलाई।।१०२।। गुरुभक्ति होतां दृढतर। होय आत्मज्ञान साचार। म्हणोनि बळेंचि करावी भक्ति थोर। नच तरी अंगीं आणावी ती।।१०३।। करितां अभ्यास वारंवार। उपज़ें भक्ति साचार। असो आतां आठवूं सत्वर। श्रीसद्गुरूचे चरण पैं।।१०४।। शंकराश्रम द्वितीय आश्रम। झालें अवतारकार्य सुगम। दाविला जनांसी मार्ग उत्तम। सुलभ करोनि सकलांसी।।१०५।। यापरी करोनि प्रेमानें त्यांनीं। शके सोळाशें बेचाळपासुनी। एकोण्यांशींवरी जगीं राहुनी। स्वधर्म-राज्य चालविलें।।१०६।। पुढील अध्यायीं तृतीय आश्रम। परिज्ञानाश्रम सद्गुरु

परम। सद्गुणी माउली च़ालवील स्वधर्म-। राज्य सारस्वतवृंदाचें।।१०७।। त्यांची कथा परम सुरस। महिमा असे अगाध विशेष। ऐकतां होईल चित्त खास। तल्लीन प्रेमळ भक्तांचें।।१०८।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें एकादश। अध्याय गुरुदासें संपविला।।१०९।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां चित्त होय एकाग्र। एकादशाध्याय रसाळ हा।।११०।। अध्याय।।११।। ओंव्या।।११०।। ।।ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति एकादशोऽध्यायः समाप्तः।।

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

परमपूज्य परिज्ञानाश्रम (द्वितीय) स्वामिजींची समाधि, चित्रापुर मठ

२००८ साली झालेल्या नूतनीकरणापूर्वीचा श्रीमत् परिज्ञानाश्रम (द्वितीय) स्वामिजींची समाधि
दर्शविणारा श्रीचित्रापुरमठाचा अंतर्भाग

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीपरिज्ञानाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय तृतीय परिज्ञानाश्रमा। वदनीं वदतां तुझिया नामा। येई चित्तासी धीर तो आम्हां। अधिकचि कार्या बा पाहीं।।१।। ज़री नाहीं चित्तीं विवेक। तरी तुज़ला भज़तां देख। येतो धांवत सत्वरी सन्मुख। सावध सावध म्हणोनि।।२।। प्रेमें न्याहाळितां रूप। समाधान होय अमूप। ऐसा देवा तूं मायबाप। देईं सुमति मज़लागीं।।३।। तुझी महिमा तूंचि वदवीं। लीला अपार परम लाघवी। नकळे मज़ला कैसी वर्णावी। स्वामिराया दयाळा।।४।। आतां तृतीय तूंचि देवा।'स्मरण' भक्ति देउनी दावा। सच्चित्सुखमय निजपदठेवा। हीचि प्रार्थना तुज़ करितों।।५।। स्वामी तुझा हा तृतीय आश्रम। वर्णूं तुझें चरित्र उत्तम। साक्षात् शंकरचि अससी परम। उत्कृष्ट ज्ञानी तूं पाहीं।।६।। असो आतां ऐका सज्जन। मागील कथेचे अनुसंधान। गेले प्रमुख लोक कोल्लूरीं ज़ाण। पाचारावया स्वामींसी।।७।। स्वामींच्या भेटीस सर्वही ज़ात। प्रार्थना करूं लागले त्वरित। म्हणती स्वामी सद्गुरुनाथ। परिसा विनंति कृपाघना।।८।। शिरालीहुनी आलों आम्ही। गुरुवीण ज़ाहलों कष्टी स्वामी। म्हणोनि यावें आमुच्या ग्रामीं। कृपा करोनि बा देवा।।९।। नगर-संस्थानींच्या रायें। केला हुकूम कीं लवलाहें। करा शिष्य नातरी सकल हें। होईल आमुच्या स्वाधीनचि।।१०।। ज़मीन-ज़ुमला आदिकरुनी। ज़प्त करूनियां संस्थानीं। आम्ही नेऊं आतां, म्हणोनि। करा सद्गुरु झडकरी।।११।। यापरी सकलही वृत्तांत। सांगती कोल्लूरीं स्वामींप्रत। लिंग निर्दळण्या केला आघात। इत्यादि सकल निवेदिलें।।१२।।

असो मग प्रार्थिती सकळ। देवा त्वांचि आतां कृपाळ। येउनी सारस्वतां दावावा निश्चल। मार्ग बरवा दयानिधे।।१३।। नसतां स्वामी कासया मठ। कवण निवारील जनांचें संकट। ऐसें म्हणोनि घातला स्पष्ट। प्रणिपात त्यांनीं चरणांवरी।।१४।। श्रीशंकराश्रम स्वामींचें। गादीवरी बैसण्या योग्यतेचे। आपणचि आहां साचे। म्हणोनि आलों ये ठायीं।।१५।। तरी देवा यावें गुरुनाथा। आमुच्यासवें ग्रामा आतां। करावा उद्धार जनांचा ताता। स्वामिराया तूंचि बा।।१६।। ऐसी करोनि प्रार्थना सकळ। लोळती चरणावरी प्रेमळ। कंठ दाटला नयनीं घळघळ। अश्रुधारा वाहती।।१७।। ऐकुनी स्वामींचें द्रवलें हृदय। देती तेव्हां तयांसी अभय। म्हणती असे श्रीप्रभुराय। कर्ता करविता तोचि पैं।।१८।। घालितां भार तयावरुती। तोचि रक्षितो करुनी प्रीति। नाहीं चिंता आणिक भीति। ऐशा जनांसी कदापि।।१९।। येऊं आतां तुमच्या सांगातीं। शंकराश्रम-सद्गुरुमूर्ति। यांच्या संनिधीं घडेल वस्ती। सहजचि पुण्यस्थानीं त्या।।२०।। ऐकतां सद्गुरुस्वामींचे भाषण। हरुष जाहला जनांलागुन। धाडिला मनुष्य न लागतां क्षण। शिरालीसी तेधवां।।२१।। पहा साधूंचें कैसें हृदय। किती कोमल तयांचें होय। जनांची स्थिती ही कष्टमय। ऐकुनी ओळले दयाळू।।२२।। बघुनी तयांसी आली करुणा। प्रेमाश्रु आले स्वामींच्या नयना। म्हणोनि झडकरी उठले जाणा। जावया चित्रापुर-ग्रामासी।।२३।। नातरी ते विरक्त संन्यासी। कासया मठ इत्यादि त्यांसी। परि रक्षावें संकटीं भक्तांसी। म्हणोनि निघाले ते पाहीं।।२४।। मग सजवुनी पालखी सुंदर। नाना वाद्यें आणुनी थोर। बैसवुनी पालखीमाजीं गुरुवर। मिरवीत नेती थाटानें।।२५।।

इकडे चित्रापुर-ग्रामांतरीं। धाडिला मनुष्य पोंचुनी सारी। वार्ता कळवितां सत्वरी। केली सिद्धता सकलांनी।।२६।। सर्वही गेले सामोरे त्वरा। तारीबागिल नदीतीरा। भेटती ज़ाऊनि स्वामीवरा। सन्मानोनि आणिलें पैं।।२७।। मग तयांसी विधिपूर्वक। बैसविलें गादीवरी देख। पादपूजादि करुनी आणिक। करिती घोष मंत्रांच़ा।।२८।। घालिती गळां सुमनहार। करिती गुरुनामाच़ा गजर। सकलही जन वारंवार। नमस्कार बहुत घालिती।।२९।। नानापरी करोनि उत्सव। संतोषले जन हे सर्व। मठामाजीं येतां सद्गुरुदेव। आली शोभा म्हणती पैं।।३०।। करोनि नाना अलंकार। सज़विली मूर्ति देवाची सुंदर। परि नसतां दीप थोर। काय शोभा येईल ती।।३१।। केलीं नाना पक्कान्नें रुचिकर। लवणावांचुनी होती निस्सार। तैसें मठासी नसतां गुरुवर। कैंची शोभा येईल ती।।३२।। असे धनाढ्य महाथोर। वाडा बांधिला परम सुंदर। परि नसतां पोटीं पुत्र। कैंची शोभा त्या सदना।।३३।। तैसें स्वामी नसतां मठासी। येईल शोभा सांगा कैसी। म्हणोनि आमुच्या सकल जनांसी। ज़ाहला होता खेद बहु।।३४।। आतां येतां सद्गुरु मठासी। आनंद झ़ाला सर्वांच्या मनासी। आली शोभा मठासी कैसी। म्हणती आम्हांसी न वर्णवे।।३५।। भुकेलियासी देखतां अन्न। कैसें उल्हासे त्याच़ें मन। तैसें स्वामींच़े बघता चरण। झ़ाला सारस्वतां आनंद।।३६।। असो ज़ाहला सर्व समारंभ। प्रगटला तो उमावल्लभ। भक्तांसी तो लाभला सुलभ। 'परिज्ञानाश्रम' या नामें।।३७।। मग चित्रापुर-ग्रामींच्या जनांनीं। मठासी स्वामी केले म्हणोनि। कळविलीं वार्ता नगर-संस्थानीं। तेथील अधिपतियालागीं।।३८।। त्यासी वाटलें समाधान। ज़ो केला हुकूम ज़प्तीच़ा ज़ाण।

घेतला माघार रायें आपण। मनःपूर्वक त्या काळीं।।३९।। तेव्हां ज़ाहला आनंद थोर। सारस्वतब्राह्मणां समग्र। मग राहिले सुखानें ते नर। आठवुनी चित्तीं गुरुमूर्ती।।४०।। असो आतां तृतीय आश्रम। स्वामी सद्गुरु परिज्ञानाश्रम। साक्षात् शंकरचि चित्रापुर-ग्राम। येथें येउनी राहिला।।४१।। परम विरक्त ब्रह्मज्ञानी। आत्मरूपचि पाहे त्रिभुवनीं। महातपस्वी योगी असुनी। बहुत सद्गुणी ते पाहीं।।४२।। क्षमा शांति दया अनुदिनीं। राहिल्या अंगीं वास करोनि। काय सांगूं रसाळ वाणी। करिती बोध जनांसी पैं।।४३।। मठाच्या अधिपत्यामाजीं विशेष। लक्ष न घालिती ते निमिष। योगाभ्यासामाजीं खास। असती निमग्न सर्वदा।।४४।। ज़े येती मुमुक्षु ज़वळी। तयांसी तेव्हां वेळोवेळी। परमार्थविचार समूळीं। कथिती विवरुनी प्रेमानें।।४५।। कधीं कधीं ज़ाउनी कोल्लूर-ग्रामीं। राहती एकांतवासीं स्वामी। कीर्ती तयांची बहुतचि नामी। वर्णाया अशक्त मी पाहीं।।४६।। तरी गुरुकृपें कथा कांहीं। मज़ला विदित त्या मी पाहीं। करितों निवेदन आतां, सर्वही। कर्ता करविता गुरुराज।।४७।। असो आतां ऐका प्रेमळ। एकेकाळीं सद्गुरु दयाळ। परिज्ञानाश्रम भक्तवत्सल। निघाले परिवारासमवेत।।४८।। ज़ावया गोकर्णीं भंडिकेरीं। ज़ातां मध्यें कुंभापुरीं। 'कुमठा' म्हणती त्या ग्रामांतरी। राहिले तेव्हां श्रीस्वामी।।४९।। तेथें एक सावकार। त्याची भार्या परम चतुर। शांत सद्गुणी पतिव्रता थोर। झ़ाला विषमज्वर तिज़लागीं।।५०।। झ़ाला ज्वर अतिशय तिज़ला। शुद्धीच़ नाहीं त्या साध्वीला। श्वासोच्छ्वास इतुकाचि राहिला। बघुनी घाबरला सावकार।।५१।। आठवुनी गुण तियेचें स्वमनीं। रडूं लागला स्फुंदस्फुंदोनी। आतांचि ज़ाईल प्राण ये क्षणीं। म्हणोनि

दुःखित ज़ाहला।।५२।। केले बहुपरी उपचार सकल। परि ते होती सकलही निष्फल। प्राणोत्क्रमण-समय आला ज़वळ। त्या साध्वीचा ते वेळीं।।५३।। तितुकियामाजीं एक सारस्वत। तेथेंचि पातला अवचित। काहीं कारणानिमित्त। सावकारापाशीं तो पाहीं।।५४।। बघुनी तियेची स्थिती भयंकर। म्हणे सारस्वत आमुचे गुरुवर। परिज्ञानाश्रम स्वामी थोर। ब्रह्मज्ञानी असती ते।।५५।। आले येथें ग्रामामाजीं। दोन दिवस ज़ाहले सहजीं। अकरा तासांवरी आजि। ज़ाती गोकर्णीं ते पाही।।५६।। करूनि प्रार्थना तयांज़वळी। मस्तक ठेवीं चरणकमळीं। त्यांच्या कृपाप्रसादें ये वेळीं। बरी होईल तव पत्नी।।५७।। इतुके शब्द पडतां कानी। तो सावकार लगबगें धांवुनी। गेला परिज्ञानाश्रमस्वामींच्या स्थानीं। घातलें दंडवत त्या समयीं।।५८।। म्हणे सद्गुरो दयाळा आतां। काय करूं माझ्या भार्येला ताता। तुज़वांचोनि ना कोणी सोडविता। खचितचि ज़ाणा निर्धारें।।५९।। केले नाना उपचार थोर। आणिले वैद्य चतुर अपार। परि वृद्धीच पावला विषमज्वर। म्हणोनि आलों चरणीं या।।६०।। चार घटिका वेळ नच ज़ाय। ऐसी तियेची स्थिती होय। आतां कवण करावा उपाय। न समज़े तो मज़लागीं।।६१।। तिचे गुण परम उत्कृष्ट। परासी तिळभरी न दे कष्ट। म्हणोनि मज़ला वाटतें वाईट। गुण आठवुनी दयाळा।।६२।। म्हणोनि देवा आलों शरण। कृपा करावी मज़वरी ज़ाण। रडूं लागला ऐसें म्हणोनि। स्फुंदस्फुंदोन तेधवां।।६३।। यावरी बोले सद्गुरुराज। कृपा करील तुज़वरी सहज़। भवानीशंकर तोचि समज़। नाही भय तुज़ 'स्मर' त्यासी।।६४।। हा संसार नव्हे शाश्वत। ऐसें समज़ुनी ठेवावें चित्त। श्रीप्रभुरायाच्या चरणीं सतत। तोचि

रक्षक सकलांसी।।६५।। ऐसें म्हणोनि फलमंत्राक्षता। देउनी सांगती धीर धरीं चित्ता। ऐसें प्रेमळ वचन ऐकतां। आला धीर सावकारा।।६६।। केला नवस निजमानसीं। आरोग्य होतां आपुल्या कांतेसी। आणितों भेटीसी सद्गुरूपाशीं। ऐसें म्हणोनि गेला तो।।६७।। मग ज़ाउनी आपल्या सदनीं। घातल्या मंत्राक्षता कांतेच्या वदनीं। तेव्हां झ़ाला चमत्कार काय तो झ़णीं। सांगतों इकडे चित्त द्यावें।।६८।। हळू हळू येऊं लागला घाम। शुद्धीवर येउनी म्हणे राम। सांगूं लागली ''मज़ला परम। सुंदर संन्यासी भेटले कीं।।६९।। येउनी माझ्या मस्तकावरी। ठेवुनी हस्त म्हणाले तूं बरी। होशील आतां क्षणेंचि झ़डकरी''। ऐसें स्वप्न देखियलें।।७०।। ऐकुनी स्वप्नाचा समाचार। विस्मित ज़ाहला सावकार। म्हणे खचितचि ते गुरुवर। नव्हती मनुष्य सर्वथा।।७१।। मग निवेदिला सकल वृत्तांत। आपुल्या निजकांतेप्रत। ऐकतां तोषली ती बहुत। म्हणे भेटवा मज़लागीं।।७२।। यावरी बोले सावकार। धीर धरीं तुज़ला ज्वर। गेलियावरी तेथे सत्वर। घेउनी ज़ातों मी पाहीं।।७३।। ऐसें बोलुनी तो लगबगें। संनिधींपाशीं ज़ावया लागे। झ़ाला तो वृत्तांत सकलही सांगे। श्रीसद्गुरु-संनिधानीं।।७४।। मग करोनि नमस्कार। मूर्ति पाहे वारंवार। कंठ दाटुनी नयनीं पूर। आला भडभडोनि प्रेमानें।।७५।। यावरी बोलती दयाघन। धरितां विश्वास दृढतर पूर्ण। मग तो कृपाळू करी निवारण। निजभक्तांचें सांकडें।।७६।। म्हणोनि एक सदृढ भाव। धरीं निजमानसीं सदैव। ऐसें करितां तो गुरुदेव। राहे पाठीसी सर्वदा।।७७।। इतुकें सांगुनी स्वामी पाहीं। निघाले गोकर्णीं लवलाहीं। इकडे सावकार

ज़ाय आपुल्या गृहीं। धरोनि हृदयीं गुरुमूर्ति।।७८।। मग तयाच्या पत्नीचा ज्वर। गुरुकृपेंनें गेला सत्वर। तेव्हां लोटतां दिवस चार। गेला सावकार गोकर्णीं।।७९।। भेटला पुनरपि सद्गुरुचरणी। पादपूजा आदिकरूनी। मग आला ग्रामालागुनी। कुंभापुरीं सत्वर।।८०।। असो आतां सद्गुरुनाथ। गेले शिरालीग्रामाप्रत। इकडे सावकार पत्नीसहित। निघाला ज़ावया चित्रापुरा।।८१।। कांहीं दिन लोटल्यावरी। ज़ाउनी शिराली-ग्रामांतरीं। भेटला स्वामींसी सत्वरी। घेउनी कांतेसी तेधवां।।८२।। बघतां ती आनंदली स्वमनीं। कीं मीं पाहिले ज़े स्वप्नीं। तेचि संन्यासी महामुनी। असती स्वामी हे पाहीं।।८३।। ऐसें ती सांगे निज भ्रतारा। तेव्हां अधिकचि वाटे हा खरा। साक्षात् ईश्वरचि, नव्हे दुसरा। उभयतांसी त्या समयीं।।८४।। मग राहुनी तेथें कांहीं दिन। गेलीं आपुल्या स्थानालागुन। आठवीत स्वामींचें सद्गुण। राहिलीं सुखानें स्वस्थानीं।।८५।। पुढील अध्यायीं रसभरित। कथा करावी श्रवण त्वरित। ऐकतां होय प्रेमळ चित्त। सद्गुरुस्वामींची गुणकीर्ति।।८६।। ऐकुनी करावें त्यापरी आपण। धरावे मानसीं त्यांचें सद्गुण। अर्थात् करावें तैसेंचि वर्तन। आठवुनी गुण सद्गुरूचे।।८७।। तरी तो सद्गुरु घाली पार। तोचि रक्षी वारंवार। परि धरावा निश्चय थोर। गुरूचि आम्हांसि तारक।।८८।। सद्गुरूवांचोनि आत्मज्ञान। न होय कवणासी प्राप्त ज़ाण। ज़री तो साक्षात् ईश्वरचि पूर्ण। तरीही गुरुविण न होय।।८९।। श्रीराम तो वसिष्ठासी। ज़ातां शरण परियेसीं। झालें आत्मज्ञान त्याज़सी। हें विदित असे सकलां कीं।।९०।। सांदीपन या ऋषीलागीं। साक्षात् श्रीकृष्ण होउनी विरागी। शरण ज़ाउनी तो वेगीं। ब्रह्मज्ञान पावला

।।९१।। कलियुगामाजीं नामदेव। विठोबाचरणीं निस्सीम भाव। त्याची भक्ति परम अपूर्व। योग्यता त्याची कवणा न ये।।९२।। जेव्हां गेला तो गोरा कुंभार। यांच्या सदनी संतांबरोबर। तेव्हां सांगे ज्ञानेश्वर। गोरयालागीं तें ऐका।।९३।। अरे गोरया तुवां येथ। आसनीं बैसविले घट समस्त। हिरवे भाज़ले कैंचे यांत। निवडुनी आम्हां सांगें बा।।९४।। तेव्हां तो थापटी घेउनी हातीं। मारी सकल संतांच्या माथीं। सारे बैसले स्वस्थ चित्तीं। मग येई नामयाकडे।।९५।। नामा उठे आईग करोन। गोरा म्हणे हें एक भाजन। हिरवेंचि असे अद्यापि ज़ाण। न भाज़े बरवें, कच्चें पैं।।९६।। ऐकुनी सकल हांसती संत। अपमान पावुनी नामदेव त्वरित। गेला थेट पंढरी-ग्रामांत। विठोबा-संनिधीं दुःखानें।।९७।। तेव्हां विठ्ठलें बहुपरी तयासी। सांगितलें खचितचि बाळा तुज़सी। करितां सद्गुरु तेव्हांचि तूं पावसी। आत्मज्ञान निर्धारें।।९८।। गुरूवांचोनि आत्मज्ञान। न होय बापा खचितचि ज़ाण। म्हणोनि तुज़ला 'कच्चा' म्हणोन। हांसले संत ते पाहीं।।९९।। अससी तूं माझा खरा भक्त। गुरुवाक्यावीण होय तें व्यर्थ। म्यांही केला सद्गुरु समर्थ। प्रतिअवतारीं निर्धारें।।१००।। म्हणोनि आतां ज़ाईं शरण। विसोबा खेचर याचे चरण। धरोनि घेईं उपदेश ज़ाण। धांव झडकरी त्या ठायीं।।१०१।। असो मग तो ज़ाउनी गुरुपदीं। उपदेश घेतला प्रेमानें आधीं। तेव्हांचि पोंचें निज-आनंदीं। प्रसिद्ध आहे हें जगतीं।।१०२।। एवं सद्गुरुवीण ब्रह्मज्ञान। न होय म्हणुनी सोडुनी अभिमान। ज़ावें आपण त्यालागींच शरण। तरीच होईल सार्थक पैं।।१०३।। नातरी जन्ममरणांच्या घोर। घिरट्या घाली वारंवार। यांत सुख नसे अणुमात्र। म्हणोनि ज़ावें

शरण तया।।१०४।। तोचि निवारी आपुलें संकट। उद्धरी प्रेमें आम्हांसी स्पष्ट। सुलभ युक्तीनें दाखवी वाट। परम उत्कृष्ट मोक्षाची।।१०५।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ हे एकचि खास। यांच्या कृपाप्रसादें द्वादश। अध्याय गुरुदासें संपविला।।१०६।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां गुरुरूपचि होय साचार। द्वादशाध्याय रसाळ हा।।१०७।। ।।अध्याय१२।। ओंव्या।।१०७।।ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति द्वादशोऽध्यायः समाप्तः।।

ॐ परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीपरिज्ञानाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जया जी श्रीगुरुराया। देवा तुझ्या नामस्मरणासी काया। झिज़वावी न लागे निश्चयें सदया। परम सुलभ साधन हें।।१।। तरी वाटतें परम कठीण। कैसें करावें न कळे भजन। ऐसें व्हावया एकचि कारण। विषय गोड वाटती म्हणोनि।।२।। तूंचि आतां कृपा करोनि। विषयांतुनी मज़ला सोडवुनी। लावीं मन हें नामस्मरणीं। तुझिया देवा कृपाघना।।३।। स्मरतां नाम तुझें सतत। होईल सारें शुद्ध चित्त। म्हणोनि आणिक नाहीं मागत। देईं बुद्धि तव स्मरणातें।।४।। असो आतां सद्गुरुनाथा। तूंचि करोनि शुद्ध चित्ता। वदवीं सविस्तर तुझिया ग्रंथा। दीनदासाकडूनियां।।५।। आतां श्रोते हो सावधान। करा परम अमृत-श्रवण। परिज्ञानाश्रम यांचे महिमान। प्रेमळ सज्जन तुम्ही हो।।६।। मागील अध्यायीं सद्गुरुनाथ। परिज्ञानाश्रम परम विख्यात। यांचा तृतीय अवतार होउनी त्वरित। केला उद्धार जनांचा।।७।। आणि श्रीसद्गुरुरायें। उठविलें सावकाराच्या भार्ये। ज्वरांतुनी क्षणांत पाहें। होय सुखरूप ती ज़ाणा।।८।। एवं सद्गुरुमहिमा अपार। आणिक एक ऐसी सुंदर। कथा वर्णन करूं साचार। असावें सावध चित्तानें।।९।। भटकळ-ग्रामीं होता एक। सारस्वत ब्राह्मण असे तो देख। विषयांमाजी सदा गर्क। त्याचें नाम लक्षुमण।।१०।। नाहीं विदित त्या स्वामी देव। परि तो न करी सर्वथैव। निंदा स्तुति दोन्हीचा ठाव। नसे त्या ब्राह्मणा काहीं हो।।११।। ऐसें असतां एके दिवशीं। ज़ाई तो सहज़ शिराली-ग्रामासी। नावेवरी बैसतां त्यासी। भेटला दुजा सारस्वत।।१२।। म्हणे तो सारस्वत लक्षुमणासी। कुठें ज़ासी तूं या दिवशीं। येरू बोले शिराली-

ग्रामासी। असे काज़ मज़लागीं।।१३।। तेव्हां बोले सारस्वत। मीही ज़ातों तेथेंचि मठांत। येसी कां तूं आमुच्या सांगात। सद्गुरुभेटीसी ज़ाण पां।।१४।। याबरी बोले लक्षुमण। काय करावें तेथें ज़ाऊन। मग बोले सारस्वत ब्राह्मण। सद्गुरुदर्शना घ्यावें बा।।१५।। घेतां स्वामींचें दर्शन। होय सारें पाप दहन। करितां त्यांचा बोध श्रवण। आत्मज्ञान होय पहा।।१६।। ऐकतां हांसे लक्षुमण मानसीं। खूळ लागलें म्हाताऱ्यासी। म्हणोनि सांगे मज़सी। ब्रह्मज्ञान फुकटचि।।१७।। मग बोले तयापाशीं। ज़री होईल सवड मज़सी। तरी येतों एके दिवशीं। भेटीलागीं मठांत।।१८।। यावरी बोले सारस्वत। आतांचि येईं भेटूं त्वरित। काज़ तुझें बा असे सतत। न सोडीं मी तुज़लागीं।।१९।। पहा तरी येउनी एक वेळ। सद्गुरुमूर्ति परम वेल्हाळ। किती तयांचें हृदय कोमल। बघतां ना सोडिसी तूं चरण।।२०।। यापरी केला बहुत आग्रह। तोंवरी संपला नदीप्रवाह। नावेवरुनी उतरे लक्षुमणासह। गेले ग्रामासी दोघेही।।२१।। सारस्वताच्या आग्रहास्तव। लक्षुमण घेई मठासी धांव। आपुलें काज़ सोडुनी सर्व। गेला संगे तयाच्या।।२२।। सद्गुरुस्वामी यांचे दर्शन। घेउनी आनंद ज़ाहला पूर्ण। म्हणे मानसीं आजि सुदिन। कधीं ना पाहिले चरण हे म्यां।।२३।। ऐसें म्हणोनि लक्षुमण। घाली प्रेमानें साष्टांग नमन। म्हणे दयाळा आज़वरी तव न। घडलें दर्शन मज़लागीं।।२४।। नाहीं मज़ला महिमा विदित। आजि हा भेटे सारस्वत। ओढुनी आणिलें त्याने मज़प्रत। अति आग्रहेंकरोनि।।२५।। कैंचे सद्गुरु कैंचे स्वामी। यापरी बोलोनि वायां गेलो मी। येथेंचि असुनी भटकळ-ग्रामी। नाहीं आलों या ठायीं।।२६।। असो आतां देवा

मज़ला। क्षमा करावी या निज बाळा। बोलतां अश्रु लोटले डोळां। कांपे थरथरां अधरोष्ठ।।२७।। ऐसें म्हणोनि वारंवार। करी प्रदक्षिणा नमस्कार। तेव्हां तो सारस्वत बोले चतुर। लक्षुमणाप्रती तेधवां।।२८।। नाहीं तुझा अपराध कांहीं। पूर्वसुकृतावांचुनी पाहीं। सद्गुरुस्वामी कवणासही। सन्मुख असतां न दिसती।।२९।। ज़वळी असुनी सद्गुरु सघन। न दिसती आम्हांलागुन। खरे साधु कलियुगीं ज़ाण। म्हणती न दिसती कवणासही।।३०।। ज़े दृष्टी पडती साधु। ते सर्वही असती भोंदू। ऐसा तयांसी लावितों शब्दु। अज्ञानें ज़ाणा आपण।।३१।। एवं असतां साधु सन्मुख। म्हणतों आम्ही त्यासी मूर्ख। आपुल्यापरी मानितों देख। सद्गुरुस्वामींसी त्या खचित।।३२।। आपुलें मुख करोनि वांकुडें। बघतां दर्पणीं तेणेंचि पाडें। दिसे तेव्हां दोष कवणाचा घडे। आपुलाच ऐसें सिद्ध होय।।३३।। तद्वत साधूंचा नव्हे दोष। आपुलाचि तो असे खास। म्हणुनी आम्ही बोलतों तयांस। भोंदू ऐसें म्हणोनि।।३४।। परि ते न होती भोंदू कधींही। ज़ैसे ते तैसेचि असती पाहीं। ऐकुनी ऐसें सद्गुरुमाई। काय बोले तें ऐका।।३५।। म्हणती लक्षुमणा ऐक। सांगतों तुज़ला अणुमात्र विवेक। चित्तीं धरोनि तो एक। राहें सुखानें तू बापा।।३६।। जगीं ज़ें ज़ें दिसे सर्व। तें तें नश्वर रूप-नांव। म्हणोनि धरावा दृढभाव। प्रभुचरणीं सदा तो।।३७।। धरितां दृढभाव तया चरणीं। तोचि उद्धरील तुज़लागोनी। काया आणि मन वाणी। लावीं भजनीं तयाच्या।।३८।। ऐसें करितां रात्रंदिन। तोचि करी तुझें रक्षण। यामाजीं न करीं अनुमान। ठेवीं विश्वास मम वचनीं।।३९।। नलगे सोडावें प्रपंचकाज़। करीं निष्काम चित्तानें सहज़। धरोनि अंतरीं

प्रभुराज। करीं व्यवहार निर्धारें।।४०।। समज़ एक असे नोकर। करी धन्याच़ा सारा व्यवहार। धन्याहुनी सूक्ष्म विचार। करोनि कार्य करीतसे।।४१।। न करी पैशाची हयगय कांही। इमानीपणें करी तो पाहीं। परि अंतरी चिंता नाहीं। अणुमात्र तया च़ाकरासी।।४२।। धन्याच़ा लाभ अथवा हानि। च़ाकरालागीं समचि दोन्ही। परि धन्याच्या अंतःकरणीं। सुखदुःख तें बाधतसे।।४३।। होतां लाभ आनंद होय। हानि होतां दुःख अतिशय। ऐसें व्हावया कारण काय। धन्यासी वाटे 'माझें हें'।।४४।। म्हणोनि केला ज़री प्रपंच। ममत्व तेथें न धरीं साच़। धनी येथें प्रभु तोच़। आपण नोकर समज़ावें।।४५।। प्रपंचाच़ें काज़ थोर। सुलभ अथवा कठिण अपार। घडो आपुल्या हाताने निरंतर। परि असावें अलिप्तचि।।४६।। लाभ अथवा हानि साची। न करीं पर्वा तूं तयाची। सुख दुःख सर्व समचि। पहा नोकरापरी बा तूं।।४७।। एवं सर्व प्रपंचाची। सोडुनी देईं मालकी साची। प्रभु परमेश्वर याची। करितों नोकरी मी खास।।४८।। ऐसें भावूनि रात्रंदिवस। अर्पण करावें त्याच़ें त्यास। सर्वेश्वर सर्वात्मा ऐशा प्रभूस। अनन्य असावें सर्वदा।।४९।। माझें नाहीं यांत अणुमात्र। तोचि प्रपंचाच़ा धनी स्वतंत्र। ऐसा भाव असावा पवित्र। पहावें सर्वत्र त्यासीच़।।५०।। त्याच़ेचि करावें चिंतन। तेव्हां सहज़चि होशी पावन। असत्य नोहे आमुच़ें वचन। होईल उद्धार तव बापा।।५१।। ऐशिया दृष्टांतावरी प्रश्न। येईल बापा तुज़लागोन। तरी त्याच़ें उत्तर देऊन। करितों निवारण शंकेच़ें।।५२।। धन्यासी सुख दुःख सकळ। नोकरा नाहीं भय समूळ। आतां सांगतां देव दयाळ। धनी आपुल्या प्रपंचाच़ा।।५३।। तरी त्यासी होय कीं चिंता। आमुच्या प्रपंचासाठीं चित्ता। आणि सुख दुःख तत्त्वता। त्यासी

बाधे कां सांगा।।५४।। तरी ऐक सांगतों आतां। लावीं इकडेचि तुझिया चित्ता। तो असे अकर्ता अभोक्ता। न बाधे त्यासी दुःख।।५५।। दृष्टांत सारा साम्य कधींही। नसे कदापि निश्चयें पाहीं। योग्य अर्थ तितुकाचि घेईं। अयोग्य टाकुनी दे सारें।।५६।। असो एवं प्रभु परमेश्वर। तोचि धनी असे साचार। त्यावरी टाकुनी आपुला भार। करीं निरंतर ध्यान त्याचें।।५७।। ऐकतां सद्गुरुस्वामींचा बोध। आश्चर्य करिती भक्तवृंद। यासी इतुके कठिण शब्द। कैसे पटतील म्हणोनि।।५८।। परि सद्गुरूची कृपा होतां। सहज़चि येई ज्ञान हाता। होय निरसन भवभयचिंता। क्षण न लागतां ती पाहीं।।५९।। असो तो गेला स्वामींसी शरण। घेतला उपदेश सद्गुरूंकडोन। झाला परमज्ञानी पूर्ण। तो लक्षुमण सारस्वत।।६०।। गुरुकृपा ज़ाहलिया काय उशीर। करुनी सोडी मनुष्या ईश्वर। महिमा तयाची अपार। वर्णूं न शकें अज्ञ मी।।६१।। परि धरावे दृढतर चरण। ज़ावें त्यासी अनन्य शरण। तेव्हां तो सद्गुरु दयाघन। क्षणेंचि उद्धरी त्यालागीं।।६२।। 'अनन्य' म्हणिजे गुरूवांचुनी। अन्य दैवत नसे कोणी। त्यापुढें विषयही तुच्छ समज़ोनी। राहे अलिप्त तो पाहीं।।६३।। अनन्य मात्र शरण यावा। तरीच सद्गुरु उद्धरी त्या जीवा। नातरी सद्गुरूंनी कैसा करावा। उद्धार त्याचा सांगा पैं।।६४।। ज्याच्या अंगी भक्ति-श्रद्धा। तोचि शरण ज़ाय सद्गुरुपदा। मग ते कनवाळू त्याची आपदा। चुकविती जन्ममरणांची।।६५।। ज़री ना गेला अनन्य शरण। कां न उद्धरावें त्यालागून। ऐसा कोणी करील प्रश्न। ऐका त्याचें उत्तर पै।।६६।। ज़री करिती सद्गुरु उद्धार। तरी ज्याचा त्यासीच पाहिजे विचार। कैसा ते हे सांगूं सविस्तर। सद्गुरु स्फुरवील त्यापरी।।६७।।

चित्त स्थिर झालियावीण। न जाई तो अनन्य शरण। अनन्यासीच आत्मज्ञान। होय खचितचि निर्धारें।।६८।। ज्याचें असेल चंचल मन। त्यासी न होय उपदेश-ग्रहण। उपदेश-ग्रहण झालियावांचोन। न होय ज्ञान निश्चित।।६९।। सद्गुरु असती ताराया समर्थ। राहती धरुनी कृपेचा हस्त। परि असावें आपुलें चित्त। सिद्ध होउनी तरण्यासी।।७०।। मन हें असे परम चंचळ। तेथें कैसा बोध ठसेल। मर्कटापरी धांवे सकल। जगभरी तें अनिवार।।७१।। तेव्हां त्यासी करावें काय। गुरुनाथाचा नसे अन्याय। आपुला आपुणचि करोनि उपाय। स्थिर करावें तयासी।।७२।। पर्जन्य पडे महाथोर। सर्वांठायीं समचि अपार। परि राहे खळग्यामाजीं नीर। दगडावरी न राहे।।७३।। तैसें खळग्यापरी ज्याचें हृदय। खोल असे तेथें ग्रहण होय। दगडापरी जो वरीवरी घेय। त्यासी न ठसे सर्वथा।।७४।। ऐसें व्हावया काय कारण। चित्तीं विषय भरलें संपूर्ण। मग कैंचे आत्मज्ञान। होईल त्यासी सांगा हो।।७५।। करूं जाता श्रवण मनन। विषयचि आमुच्या सन्मुख जाण। उभे राहती दत्त करून। मग कैसें समजेल।।७६।। समजल्यावीण कैसें उमजें। उमजें तरीच 'नव्हे हें माझें'। ऐसा चित्तीं विचार उपजे। खचितचि जाणा निर्धारें।।७७।। म्हणोनि आधीं करावा त्याग। विषयसुखाचा सकलही चांग। तरीच आला समजा योग। निजसुखाचा त्या पाहीं।।७८।। येथें येईल ऐसा आक्षेप। कीं म्हणतां विषयचि आमुच्या समीप। उभे राहती म्हणोनि निजरूप। न होय प्राप्त आपुल्यासी।।७९।। तरी येथें करावें काय। त्यागितां सारे आम्हीं विषय। देह हा आमुचा अशक्त होय। तरी कैसें करावें पैं।।८०।। ऐका आतां त्याचें उत्तर। करा सारा आपुला व्यवहार। स्वधर्मापरी

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

निरंतर। न व्हावें आसक्त त्यांत पैं।।८१।। न होतां विषयीं आसक्त। कर्तव्य जितुकेंचि येथ। न धरिता अंगी स्वार्थ। करा प्रपंच तो पाहीं।।८२।। म्हणोनि न होतां विषयासक्त। करितां श्रवण मनन यथार्थ। आत्मज्ञान होय प्राप्त। साधकालागीं निर्धारें।।८३।। एवं चित्ती असतां विषय। निजस्वरूपाचें ज्ञान न होय। यावरी आतां एक रमणीय। दृष्टांत देऊं तो परिसा।।८४।। एकदां एक सभ्य गृहस्थ। बैसला असतां अकस्मात। बहुत वर्षांनीं त्याचा अत्यंत। प्रेमळ मित्र भेटला पैं।।८५।। तेव्हां तयासी अति हर्ष। झाला पाहुनी एकमेकांस। मग बोलती दोघेही बहुवस। गर्क ज़ाहले त्यामाजीं।।८६।। तितुक्यामाजी एक इसम। आला असे म्हणोनि काम। बैसला ऐकत आराम। संवाद उभय मित्रांचा।।८७।। हाही बैसे त्यांच्याचि सन्मुख। परि मित्रापुढें त्यासी आणिक। न दिसे तेव्हां कांहींएक। मित्रमोहामाजीं पैं।।८८।। जेव्हां गेला मित्र आपुल्या गृहासी। तेव्हां हा इसम दिसे त्यासी। म्हणे कधीं येथे बैसलासी। तो म्हणे दोन तास झाले।।८९।। यावरी बोले हा गृहस्थ। कुणी आल्याचा भास मज़प्रत। ज़ाहला परि लक्ष ना तेथ। कळलें ना कोण कांहीं तें।।९०।। तैसें आपुल्या चित्तीं बहुत। विषय भरोनि बैसल्या तेथ। श्रवण मनन परमार्थ। विषयांपुढे न दिसेचि।।९१।। विषयसुखामाजीं रममाण। झाल्यामुळें आम्हांलागोन। न समज़ें श्रवण मनन। मग कैंचें निजसुख तें।।९२।। असतां चित्तीं विषय अमित। ज़री बैसलों श्रवण करीत। काय होईल आम्हां प्राप्त। परि न होय व्यर्थ तें।।९३।। ज़ैसा त्या गृहस्थासन्मुख। बैसला दुज़ा इसम देख। दिसला तरी निश्चयात्मक। कळलें ना चित्तीं तयाच्या।।९४।। तैसें विषयीं

होऊनियां रत। ज़री केलें श्रवण अमित। शब्द तितुकेचि कानीं पडत। समज़ उमज़ ना तेथें।।९५।। म्हणोनि सद्गुरूसी अनन्य शरण। ज़ो ज़ाई त्याची विषयेच्छा पूर्ण। सहज़चि नासे आपण होऊन। सांगूं कैसें तें ऐका।।९६।। ज़ो ज़ाई अनन्य शरण। त्यासी गुरूविण विषय श्रेष्ठ ना आन। तेव्हां विषयीं कां म्हणोन। ज़ाईल सांगा तो बापा।।९७।। ऐशा भक्तासी सद्गुरुराज। क्षण न लागतां उद्धरी सहज़। येरांचेही करी काज़। नच धिक्कारी त्या पाहीं।।९८।। ज़री अनन्य शरण न गेला। भक्ति प्रेम आहे ज्याला। करिती कधीं कधीं बोध तयाला। लाविती हळुहळू निजमार्गा।।९९।। म्हणोनि धरावे सद्गुरुचरण। कळो न कळो आपुल्यालागोन। ज़री विषयीं आपुलें हें मन। तरी न सोडावें गुरुचरणां।।१००।। ऐसें करितां करितां सहज़। विषयासक्ति सोडवी गुरुराज। त्यासीच़ असे त्याची लाज़। आपुल्या ब्रीदाची निर्धारें।।१०१।। म्हणोनि ज़ावें त्यासीच़ शरण। भार घालावा त्यावरीच़ ज़ाण। परि बळेंचि गुरुवांच़ोन। विषयसेवन न करावें।।१०२।। शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध। यांत सद्गुरूच़ाचि बघावा आनंद। आतां म्हणाल श्रोते सबंध। सेवावें काय दुर्विषयां।।१०३।। ऐसे मात्र नच करावें। गुरुरूप म्हणोनि नच सेवावें। दुर्विषय बा ते आघवे। अंधश्रद्धा करूं नये।।१०४।। ज़री झाला परम ज्ञानी। तोही विधि-निषेध ठेवुनी। करी व्यवहार दुर्विषय टाकुनी। कर्तव्यापरी वर्ते तो।।१०५।। तेव्हां आम्हीं अज्ञ जनांनीं। कैसे सेवावे दुर्विषय सांगा झणीं। असो सद्गुरुवांच़ोनी। अन्य विषय न सेवावे।।१०६।। आतां पहा परिज्ञानाश्रम। सद्गुरुस्वामी हे कीं उत्तम। बोधुनी जनांसी लाविती प्रेम। निजस्वरूपाचे तें ज़ाणा।।१०७।। पुढील अध्यायीं शिष्य-स्वीकार करोन। करिती निजधामासी

गमन। तेथुनी तृतीय अवताराचे पूर्ण। झालें कार्य सकलही।।१०८।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें त्रयोदश। अध्याय गुरुदासें संपविला।।१०९।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां विघ्नें नासती साचार। त्रयोदशाध्याय रसाळ हा।।११०।।अध्याय।।१३।। ओंव्या।।११०।।ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति त्रयोदशोऽध्यायः समाप्तः।।

।। श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीपरिज्ञानाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय सद्गुरो महादेवा। भक्तवत्सला तूं करुणार्णवा। दावीं दयाळा ज्ञानदिवा। करीं उद्धार बाळाचा।।१।। विसरलों मी मज़लागोन। कोण कैसा आलों कोठून। हेंहीं न कळे मज़ला ज़ाण। दावीं तूंचि माउलिये।।२।। भवजलडोहीं बुडालों सारा। नाहीं माझ्या चित्ता थारा। तुज़विण नाहीं आन आसरा। म्हणोनि करितों प्रार्थना ही।।३।। भज़तां तुज़ला पाप-ताप। दैन्य सर्व ज़ाउनी अमूप। ज्ञान होय परमस्वरूप। नसे संशय यामाजीं।।४।। तूं आतां वदवीं खास। तव गुणमहिमा दावूनि विशेष। पायीं रत हा तुझा दास। तरी उद्धरीं कृपाघना।।५।। असो आतां श्रोते हो सज्जन। मागील अध्यायीं केले निरूपण। बोधुनी उद्धरिला लक्षुमण-। सारस्वत, कृपेनें।।६।। ऐसे सद्गुरु परम ज्ञानी। सद्गुणांचीच़ असे खाणी। वर्णन कराया मज़कडुनी। शक्य नसे कल्पांतीं।।७।। परिसा आतां स्वामीराज। करितां कालक्रमण रोज़। वृद्धापकाल होय सहज़। क्रमेक्रमेण त्यांलागीं।।८।। तेव्हां करावया शिष्य-स्वीकार। करिती प्रार्थना जन समग्र। अवश्य म्हणोनि श्रीसद्गुरुवर। करिती बोध भक्तजनां।।९।। आतां श्रोते हो काय तो बोध। परिज्ञानाश्रमस्वामींचा शुद्ध। चित्त करोनि आपुलें सावध। परिसा भाविक सज्जन हो।।१०।। म्हणती स्वामी भक्तजनांसी। अवश्य करूं शिष्य त्वरेंसीं। कथितों विचार धरा मानसीं। करा त्यापरी आचरणा।।११।। आज़वरी आपुली पाहुनी भक्ति। संतोष झ़ाला आमुच्या चित्तीं। सद्गुरु हाचि श्रेष्ठ जगतीं। तोचि देईल मोक्षासी।।१२।। तयावांचूनि नाहीं अन्य। त्याची आज्ञा करावी मान्य। तेव्हां तोचि

हरील दैन्य। नाहीं अनुमान यामाजीं।।१३।। घालूनि तयावरी भार। करावा परमार्थ-विचार। तेव्हां सहज़चि करील उद्धार। आपुल्या भक्तांच़ा तो पाहीं।।१४।। काया-वाचा-मनें करोनि। भज़ावें त्या सद्गुरुलागूनि। धरावा विश्वास त्याच्या वचनीं। मग कैंच़ें भय त्याला।।१५।। गुरुभक्ति हीचि मुख्य सर्वांसी। तेणेंच़ होय समाधान मानसीं। निजात्मस्वरूप क्षणेंचि पावसी। बळकट गुरुभक्ति करितांचि।।१६।। ते ज़ें सांगती साधन। बरवेंचि ऐसें समज़ोन। करावें कार्य न करितां अनुमान। तरी हें होय सफल हो।।१७।। ज़ें करूं नका म्हणती। त्यावरी बलात्कारें करूं लागती। तरी तें बरवें न होय निश्चितीं। कार्य समूळ तें पाहीं।।१८।। सद्गुरु म्हणिजे नव्हे मनुष्य। साक्षात् देवचि म्हणावें त्यास। त्यांची वाणी होय ती खास। सत्यचि सारी सहज़चि।।१९।। म्हणोनि त्यांच्या वदनांतून। निघती ज़े शब्द तेचि प्रमाण। यावरी तिळभरी नच करी भाषण। तरीच़ उत्तम कार्य होय।।२०।। प्रापंचिक अथवा पारमार्थिक। कवणही असो तें कार्य देख। शास्त्रीय अथवा लौकिक। करावें गुरुवाक्यापरी तें।।२१।। येथें कराल कुणीही प्रश्न। आमुच़ा प्रपंच सद्गुरुलागोन। पुसावा कीं तो आपण। सांगूं उत्तर आतां तें।।२२।। प्रपंचामाजीं महत् कार्य। तरी तें विचारितां दोष न होय। ज़ैसें सांगती श्रीगुरुराय। तैसेंच़ करावें निजभावें।।२३।। घालुनी सद्गुरूवरी भार। आज्ञेपरी करितां समग्र। तोचि कृपाळू निरंतर। करी रक्षण तयांच़ें।।२४।। करितां व्यवहार नानापरी। घडती आपुल्या हातुनी कितीतरी। न कळतां अथवा कळोनि अंतरीं। बरीं वाईट कर्में पैं।।२५।। न कळतां जीं कर्में घडती। तें नाहीं आपुल्या हातीं। जीं बळेंचि समज़ोनि करिती। वाईट अथवा च़ांगुलीं।।२६।। त्यांत करावा विचार

थोर। हें च़ांगुलें किंवा वाईट अतितर। आपुल्या चित्तासी ज़री वाटे बरोबर। तरीही पुसावें सद्गुरूसी।।२७।। ज़री असे आपण चतुर। तरीही पुसावा गुरूसी विचार। यासी कासया सद्गुरुवर। ऐसी अहंता दवडावी।।२८।। सद्गुरूपाशीं व्हावें दीन। करावें प्रेमळ मृदु भाषण। ज़री ज़ाहला चतुर आपण। सद्गुरूसन्मुख अज्ञचि तो।।२९।। म्हणोनि करितां महत्कार्य। पुसावें गुरूसी करूं कीं काय। आज्ञा देतां श्रीगुरुमाय। तरीच़ करावें प्रेमानें।।३०।। समज़ा एक बरवेंचि कार्य। परि सद्गुरूलागीं ते मान्य न होय। तरी तें कधींही न करण्या निश्चय। धरावा निजमानसीं दृढतर तो।।३१।। ज़री त्या कार्यापासुनी बहुत। होय नुकसान आपणाप्रत। तरीही नुल्लंघी आज्ञा तोचि खचित। खरा गुरुभक्त ज़ाणिजे।।३२।। एवं गुरुआज्ञेवांचुनी श्रेष्ठ। नाहीं कैंच़ेंही भक्तांसी वरिष्ठ। म्हणे माझ़ा सद्गुरु एक बलिष्ठ। त्यावीण नको मज़ अन्य।।३३।। सद्गुरु ज़े सांगती काम। तेंचि माझ़ें विश्रांतिधाम। त्यांची आज्ञा तोचि परम। आनंद सुख मज़ पाहीं।।३४।। सद्गुरुवीण नसे आन। जगामाजीं समाधान। त्यावीण नसे दुज़ा कवण। विषय जगामाजीं पैं।३५।। विषय पांच असती अवनीं। शब्द-स्पर्श-रूप आणि। रस-गंध सारे मिळोनि। पंचविषय हे पाहीं।।३६।। परि सद्गुरुमाउली-सन्मुख। काय तयांच़ा उल्लेख। ज़े ज़े विषय ते ते देख। तुच्छ सारे मज़लागीं।।३७।। सद्गुरुस्वामी तोचि एक। सकळ विषयांच़ा सुखदायक। त्याहुनी नाहीं आणिक। सुख मज़लागीं वेगळें।।३८।। म्हणोनि देवा श्रीसद्गुरुनाथा। आपुली आज्ञा मान्य ती ताता। तुझिया वचनापरता। नाहीं अणुमात्र सुख तेथें।।३९।। ऐसें वाटावें आपुल्या चित्ता। आणिक वर्तावें तेसेंचि तत्त्वतां।

मग तो कृपाळु आपुल्या भक्तां। सहज़चि रक्षण करी प्रेमें।।४०।। यापरी करितां सकलां बोध। संतोषले परम भक्तवृंद। धरिले प्रेमानें सद्गुरुपाद। म्हणती धन्य धन्य प्रभो।।४१।। असो मग जन समस्त। गेले आपापुल्या गृहाप्रत। काहीं प्रमुख जन देशांत। फिरती शिष्य निवडावया।।४२।। मठाच्या करारापरी एक। शुक्लभट्ट यांचा सुरेख। पुत्र वेंचोनि काढिला देख। शिष्य-स्वीकार करावया ।।४३।। कुमठ्याचे ग्रामासन्मुख। 'मल्लापुर' या नामें खेडें एक। तेथील शुक्लभट्ट प्रमुख। त्याचा पुत्र सुलक्षणी।।४४।। असे परम उत्कृष्ट चतुर। अंगीं सद्गुण भरले अपार। ऐसें पाहुनी मागती नर। तया पुत्रालागीं पैं।।४५।। इतुक्यामाजीं स्वामी गुरुवर। गोकर्णा ज़ावया येती सत्वर। परिवारासहित ग्रामांतर। कुंभापुरीं त्या काळीं।।४६।। मग तेथुनी मल्लापुरासी। पाचारूनि नेती स्वामींसी। येथेंचि शिष्य-स्वीकार व्हावा ऐसी। प्रार्थना करिती तेधवां।।४७।। मग केला शिष्य-स्वीकार। 'शंकराश्रम' अभिधान सुंदर। देउनी मग तोषले अपार। भक्तजन ते त्या समयीं।।४८।। नानापरी उत्सव थोर। करिती जन प्रेमपुरस्सर। दुमदुमलें 'मल्लापुर' नगर। येती जन बहुतचि।।४९।। यापरी करोनि शिष्य-स्वीकार। घेउनी संगें श्रीसद्गुरुवर। येती शिराली-ग्रामाभीतर। परिवारासहित त्यावेळीं।।५०।। पुढें कांहीं दिवस लोटतां। परिज्ञानाश्रम आपुल्या पंथा। ज़ावया निघाले सोडुनी ममता। निजदेहाची ती ऐका।।५१।। विकृत संवत्सर भाद्रपद। दिवस तो पाहीं एकादशी वद्य। सांगती बोलावुनी शंकराश्रमा, सिद्ध। परिज्ञानाश्रम त्यावेळीं।।५२।। देह हा असे अशाश्वत। न करावी यावरी खचित। प्रीति कदापि दिवसरात। करावें भजन

श्रीहरीचें।।५३।। ज़री झाला देह गुप्त। आत्मा येथेंचि राहे सतत। ना भीं तूं बा परमविख्यात। पावसी पद उत्तम तें।।५४।। करीं जनांसी प्रेमें बोध। असती जन नाना-विध। परि तूं न करीं तयांसी भेद। पहा सर्वांसी शिशूपरी।।५५।। असो आतां येतों आम्ही। म्हणती जनांसी अहो तुम्हीं। सांगितला विचार अंतर्यामी। धरा निरंतर तो पाहीं।।५६।। आणिक वर्तोनि तैसेंचि। राहतां तरीच़ सार्थकता त्याची। नातरी कासया तनु साची। पुष्ट करोनि ठेवाया।।५७।। ऐसें न करितां आपण। करावें जितुकें होईल साधन। यांचें पुढें विवरण। सांगतील श्रीशंकराश्रम।।५८।। इतुकें बोलुनी परिज्ञानाश्रम-तात। झाले तेव्हां समाधिस्थ। आले धांवुनी जन समस्त। जेथील तेथील ऐकोनि।।५९।। ज़ाहला सकलां अपार शोक। परि शंकराश्रम पाहुनी सन्मुख। तेचि हे म्हणोनि विवेक। धरिला चित्तीं जनांनीं।।६०।। मग सकल मिळोनि भक्त। देती समाधि स्वामींसी तेथ। मुख्य समाधि असे जेथ। दक्षिणभागीं दिधली पैं।।६१।। आणि करुनी पुढील कर्में। परम थोर उत्सव प्रेमें। करिती सज्जन भक्त निष्कामें। विधिपूर्वक त्या समयीं।।६२।। करिती यावरी आणिक काय। शंकराश्रम श्रीगुरुवर्य। यांसी गादीवरी बैसवी समुदाय। सर्वही मिळोनि त्यासमयीं।।६३।। सद्गुरुवीण व्यर्थचि जन्म। ज़गोनि करावें कोणतें काम। तोचि शिकवी उत्तम धर्म। आणिक ज्ञान ते पाहीं।।६४।। आधीं लाविती निजधर्मासी। मग हळू हळू नेती कैसी। युक्ति सांगुनी परमार्थासी। दाविती मार्ग स्वरूपाच़ा।।६५।। म्हणोनि करावा त्यांच़ा संग। तेव्हां होईल सहज़चि त्याग। विषयसुखाच़ा दवडी भोग। प्रेममदानें निश्चयेंसीं।।६६।।

ज़ोवरी न लाभे सद्गुरुप्रेम। तोंवरी धरी विषयकाम। ज़ें ज़ें दिसतें तें हें 'मम'। वाटे आपुल्यासी खचित पैं।।६७।। सद्गुरुप्रेम काय असत। कैसें तें सांगण्या नाहीं येत। तया गांवी ज़ो कोण ज़ात। तोचि ज़ाणे तें पाहीं।।६८।। सद्गुरुप्रेम ऐसे शब्द। वाचेनें म्हणतां न होय मोद। भोगितांचि परमानंद। प्राप्त होय त्यापासुनी।।६९।। साखरेची कैसी गोडी। वाचेनें बोलतां न कळे घडीघडी। ज़री लाविली जिव्हेसी थोडी। तरीच़ ती कळतसे हो।।७०।। तैसें येथें म्हणतां वाचे। अथवा भजन करोनि नाचे। तरी त्यासी गुरुप्रेम कैंचें। प्राप्त होईल तें बापा।।७१।। ज्यासी गुरुचरणांची आवडी। त्यासीच कळे प्रेमाची गोडी। अनुभवेंचि पहावें घडीघडी। चित्तीं विचार करोनियां।।७२।। केलें बहुत वेद-पठण। अथवा देतां नाना प्रवचन। सद्गुरुप्रेमाइतुकी गोडी ज़ाण। न ये त्यामाजीं खचितचि।।७३।। जपतप ऐसें नाना कर्म। उपासनादि केला नेम। गुरुप्रेमाइतुकी गोडी परम। न ये त्यामाजीं खचितचि।।७४।। गायत्रीजपादि पुरश्चरण। अथवा केलें होमहवन। गुरुप्रेमाइतुकी गोडी ज़ाण। न ये त्यामाजीं खचितचि।।७५।। कीर्तन-भजन-नामस्मरण। केलें नानाग्रंथ-लेखन। गुरुप्रेमाइतुकी गोडी ज़ाण। न ये त्यामाजीं खचितचि।।७६।। एवं सद्गुरुप्रेमाची गोडी। कवणही न ये त्याच्या ज़ोडी। ज्यासी अनुभव त्यासीच़ आवडी। अन्यासी न कळे गोडी ती।।७७।। मी कथितों म्हणोनि मज़ला। गुरुप्रेमा कैसा हा नाहीं कळला। बहुत सुकृत पाहिजे त्याला। सद्गुरुप्रेम ठसावया।।७८।। ज्यासी असे खरें प्रेम। त्यासी सुखदुःख सर्वही सम। कैसें सांगूं त्याचें वर्म। देउनी चित्त परिसा हो।।७९।। एक सद्गुरुप्रेमावांचूनि। अन्य विषय गुरुभक्ता-

लागोनि। नको कांहीं ऐसें म्हणोनि। न बाधे त्यासी सुखदुःख।।८०।। अमुक एक विषय आवडे। म्हणूनिच़ येई सुखदुःख बापुडें। ज़री तो आम्हां न सांपडे। होय दुःख त्यावेळीं।।८१।। ज़री मिळे तो विषय वेगीं। तरी सुख उपज़े त्यालागीं। म्हणोनि द्वैत विषय हेचि जगीं। सुखदुःखांसी कारण पैं।।८२।। म्हणोनि ज्यासी सद्गुरु हाचि। एकचि विषय आवडे, त्याची। वृत्ति न वच़े अन्य विषयीं साची। मग कैसें सुख-दुःख बाधे तया।।८३।। पंचज्ञानेंद्रियांच्याद्वारें। पांच़ विषय भोगी सारे। परी हे विषय गुरुभक्त विसरे। सद्गुरुप्रेमाच्या सन्मुख पैं।।८४।। म्हणोनि गुरुप्रेम धरावें बळकट। तोचि निवारी आपुलें संकट। त्यापुढें सर्व विषयांच़ा थाट। कसपटासमान समज़ावा।।८५।। बहुत काय सांगावें आतां। निशिदिनीं धरावे गुरुचरण तत्त्वतां। तोचि होय सकलां त्राता। म्हणोनि न विसंबें त्यालागीं।।८६।। एवं सद्गुरुप्रेमाची गोडी। ज़री नसे आम्हां त्याची आवडी। बळेंचि आणुनी घ्यावी तांतडी। अति प्रयत्नें करोनियां।।८७।। जेव्हां येईल आपुल्या मानसीं। तेव्हांचि करीं त्याच़ दिवशीं। उदयीक म्हणोनि ज़री तूं बससी। तरी नसे देहाच़ा भरंवसा।।८८।। इतुकेंचि नव्हे, मन हें आपुलें। हेंही क्षणेंचि होय वेगळें। आतां असे जी इच्छा ये वेळे। क्षणेंचि बदले ती पाहीं।।८९।। म्हणोनि जेव्हां येईल सद्वासना। तेव्हांचि तें करावें काम ज़ाणा। उदयीक म्हणोनि ठेवितां नाना। येती विघ्नें तयासी।।९०।। यापरी जेव्हां येईल स्वमना। शरण ज़ावें ऐसें सद्गुरुचरणां। तत्काळ ज़ावोनि त्या कृपाघना। ज़ावें शरण प्रेमानें।।९१।। ज़री असती दूर देशीं। तरीही ज़ावें इच्छासरशीं। उशीर न करावा येविषीं। खचितचि ज़ाण निर्धारें।।९२।। ऐसें करितां रोज़। येईल योग कांहीं

दिनीं सहज़। भेट देईल सद्गुरुराज। करील उद्धार प्रेमानें।।९३।। असो आतां परिज्ञानाश्रम-। स्वामी यांचा तृतीय आश्रम। यांनीं करोनि जनांसी निष्काम। दाविला मार्ग मोक्षाचा।।९४।। यापरी करोनि प्रेमानें यांनी। शके सोळाशें एकोण्यांशींपासुनी। ब्याण्णवपर्यंत जगीं राहोनी। स्वधर्मराज्य चालविलें।।९५।। असो आतां पुढील अध्यायीं। चतुर्थ आश्रम शंकराश्रम गुरुमाई। चालवील स्वधर्मराज्य सर्वही। सारस्वतवृंदाचें।।९६।। त्यांची कथा परम प्रेमळ। महिमा अगाध अति रसाळ। ऐकतां चित्त होय निर्मळ। महापातकी यांचेही।।९७।। आनंदाश्रम परमहंस। शिवानंदतीर्थ एकचि खास। यांचे कृपाप्रसादें चतुर्दश। अध्याय गुरुदासें संपविला।।९८।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्रसुंदर। ऐकतां मोह निरसे समग्र। चतुर्दशाध्याय रसाळ हा।।९९।। अध्याय१४।। ओंव्या ९९।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति चतुर्दशोऽध्यायः समाप्तः।।

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

परमपूज्य शंकराश्रम (द्वितीय) स्वामिजींची समाधि, मल्लापुर मठ

श्रीगुरुमठ, मल्लापुर

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीशंकराश्रमस्वामीगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय चतुर्थ शंकराश्रमा। बालक नेणे तुझी महिमा। परि तूंचि दाखवीं आम्हां। अज्ञजनांसी तव लीला।।१।। न कळे मज़ ब्रह्मज्ञान। नाहीं माझ्या अंगी सद्गुण। नसे भक्ति प्रेम ज़ाण। ऐसा दुर्गुणी मी पाहीं।।२।। अंगीं नाहींत साधनें चार। ऐसा मी खरा पामर। त्वांचि रक्षावा निजकिंकर। हेंचि मागतों चरणीं या।।३।। तुझा एक दुर्बल दास। हीन दीन भजनीं आळस। म्हणोनि माते तूंचि खास। देईं उल्हास मज़लागीं।।४।। देईं मज़ला सद्गुरुनाथा। चतुर्थ भक्ति 'पादसेवन' आतां। हेचि प्रार्थना त्यावीण सर्वथा। न मागेंचि तुज़पाशीं।।५।। आतां परिसा सावधान। शंकराश्रम यांचें सद्गुण। ऐकतां होती पापें दहन। अगणित पुण्य ये अंगी।।६।। मागील अध्यायीं निरूपण। परिज्ञानाश्रम स्वामी चिद्घन। शिष्य करुनी झ़ाले आपण। समाधिस्थ कांहीं दिवसांनीं।।७।। आतां सद्गुरु चतुर्थाश्रम। ऐका यांचे सद्गुण परम। उत्कृष्ट असूनि जनांसी सुगम। दाविला मार्ग युक्तीनें।।८।। ऐसे सद्गुरु शंकराश्रम। करिती जनांवरी बहुत प्रेम। सांगती आपुला उत्तम धर्म। अति निर्लोभें ते पाहीं।।९।। परम विद्वान महायोगी। झ़ाले क्षण न लागतां विरागी। सदा निजात्मसुखासी भोगी। काय वानूं महिमा ती।।१०।। अंतःकरण तयांचे बहुत शांत। प्रवचन देतां परम अद्भुत। वाक्पटुता असे ती अमित। सुलभ युक्तीनें सांगती।।११।। येई संनिधी भक्तवृंद। सकाम निष्काम भजती द्विविध। कामिकां देती फल समृद्ध। निष्कामा देती मोक्षासी।।१२।। कित्येक येउनी प्रार्थना करिती। कष्ट कैसे आमुचे ज़ाती। तयांसी आशीर्वचना देती। 'कल्याण होईल तुमचे' पैं।।१३।। भवानीशंकर

असे समर्थ। भज़ा प्रेम धरोनि त्याप्रत। तोचि तुमचे कष्ट निवारीत। धांवत येउनी क्षणमात्रें।।१४।। ऐसें येतां मुखांतुनी। सत्यचि होय त्यांची वाणी। मनुष्य न मानी त्यांसी कोणी। साक्षात् दत्तात्रेय-अवतार ते।।१५।। खचित असती दत्तावतार। ऐसें बोलती नारीनर। म्हणती आमुचें भाग्य थोर। म्हणोनि लाभले चरण हे।।१६।। यापरी नानाविध भज़ती जन। कवणाचेंही न दुखविती मन। ज्याचें ज़ैसें होय समाधान। युक्तीनें बोधुनी करिती पैं।।१७।। गरीब अथवा श्रीमंत। कुणीही येवो सद्भक्त। प्रेमें भाषण करिती त्यांप्रत। कळवळोनि अंतरीं।।१८।। बघतां मूर्ति परम सुंदर। विलसे ब्रह्मतेज मुखावर। देव तळमळती स्वर्गीं फार। म्हणती भूवरीचे धन्य जन।।१९।। असो आतां ऐसें असतां। स्वामींचें चित्त सदा परमार्था। न करी अणुमात्र देहाची ममता। करिती दुर्लक्ष अतितर ते।।२०।। म्हणोनि होय देह अशक्त। वरचेवरी तयांसी व्याधि होत। यास्तव वेगेंचि जन समस्त। प्रार्थना करिती ती ऐका।।२१।। प्रभो देवा सद्गुरुराया। शिष्य-स्वीकार करावा सदया। अवश्य म्हणती बघुनी हृदया। भक्तजनांच्या तेधवां।।२२।। तेव्हां प्रमुख जन लागती। शोधावया योग्य व्यक्ति। न मिळे योग्य शुक्लभट्ट त्यांप्रति। म्हणोनि बघती दुज्या कुळीं।।२३।। कंडलूर कुळींचा एक। सांप्रत त्या कुळासी लोक। 'तलगेरी' ऐसें बोलती देख। निवडिला मुलगा उत्कृष्ट।।२४।। केली मागणी त्यांपाशी। माघ शुद्ध दशमी दिवशीं। प्लव-संवत्सर शके सत्राशें तीन। केला स्वीकार गुरुरायें।।२५।। 'केशवाश्रम' नामाभिधान। देउनी केला उपदेश ज़ाण। शंकराश्रमें शिष्यालागून। परम प्रेमानें त्याकाळीं।।२६।। असो सद्गुरु शंकराश्रम। असती परिपक्व आत्माराम। तपःसामर्थ्य असे परम। चमत्कार घडती त्यायोगें।।२७।।

यावरी एक कथा अद्भुत। सांगूं इकडे लावा चित्त। ऐकतां द्रवेल प्रेमळ भक्त। इतुकी सुंदर कथा ती।।२८।। हे श्रीसद्गुरु शंकराश्रम। करितां पारमार्थिक नेम। करिती दुर्लक्ष देहाचें परम। हें कथिलें आहे आधीच।।२९।। ऐसें दुर्लक्ष करितां परियेसीं। हिंवताप लागे शरीरासी। तेव्हां कथा झाली ती कैसी। कथितों आतां श्रोते हो।।३०।। थंडी वाज़े बहुवसी। ज्वर येई सदा स्वामींसी। अनुष्ठाना बैसतां देहासी। हाल होती बहुतचि।।३१।। अनुष्ठाना बैसतां थंडी येत। तेव्हां ते करिती काय त्वरित। निजदंडावरी खचित। ज्वर आवाहन करिती ते।।३२।। जेव्हां संपे अनुष्ठान। तेव्हां दंडावरीचा ज्वर ज़ाण। अंगावरी परत घेती आपण। ऐशी शक्ति तयांची।।३३।। ऐसें असतां एके दिनीं। अनुष्ठान-समयीं थंडी भरोनी। आली अतिशय तेव्हां स्वामींनी। झांकिली उपरणी दंडावरी।।३४।। ज्वरावाहन करिती दंडीं। तेव्हां वाज़े दंडास थंडी। थरथरां कांपे दंड तांतडी। पाहिलें तेव्हां एकानें।।३५।। जेव्हां संपले अनुष्ठान। तेव्हां स्वामी परतुनी आपण। ज्वर अंगी घेती पूर्ण। पाहुनी विस्मित झाला तो।।३६।। मग येतां सद्गुरु बाहेरी। भेटला तो गृहस्थ सत्वरी। भीत भीत तो निजअंतरीं। बोले संनिधीं तें ऐका।।३७।। म्हणे देवा कृपाघना। एक प्रश्न येतो मन्मना। तेव्हां बोले सद्गुरुराणा। ना भीं बोल झडकरी।।३८।। यावरी बोले तो गृहस्थ। पाहिला चमत्कार संनिधींत। दंड थरथरां कांपे तेथ। अनुष्ठान संपे तोंवरी।।३९।। जेव्हां तयावरील उपरणी। घेतली आपण काढोनी। तेव्हां थांबे काय ही करणी। न कळे देवा तव लीला।।४०।। मुख पाहतां ज्वर बहुत। आला ऐसें आपुल्यासी दिसत। कृपा करोनि मज़प्रत। काय चमत्कार तो सांगावा।।४१।। यावरी बोलती हास्यवदन।

शंकराश्रम-स्वामी कृपाघन। काय असे ती तुज़ला खूण। सांगतो ऐक एकाग्र।।४२।। आम्हांसी ज़ो येतो ज्वर। तो आवाहन या दंडावर। करितों अनुष्ठान-समयीं साचार। संपलिया घेतों पुनरपि।।४३।। यावरी बोले तो गृहस्थ। इतुकें ज़री आपुल्याप्रत। समज़े तरी कां ना ठेवीत। दंडावरीच़ सर्वदा।।४४।। तेव्हां बोलती सद्गुरुनाथ। सांगतों कासया तें तुज़प्रत। परि येथें लावीं चित्त। चंचल होऊं नेदीं बा।।४५।। प्रारब्ध हें कवणाही न सुटे। ज़री झ़ाले ज्ञानी मोठे। तयांसीही नाना संकटें। येती प्रारब्धें पाहीं बा।।४६।। कर्में असती विविध। संचित-क्रियमाण-प्रारब्ध। क्रियमाण आणि संचित दग्ध। होय सारें ज्ञात्याच़ें।।४७।। परि प्रारब्ध ज्ञात्यालागीं। चुकेना कल्पांतींही जगीं। ज्याच़ें प्रारब्ध तोचि भोगी। न वच़े अन्यासी तो भोग।।४८।। सुख अथवा दुःख। ज़ें ज़ें येईल आपुल्या सन्मुख। तें तें भोगावें तेव्हांचि देख। अकर्ता अभोक्ता समज़ोनि।।४९।। ज़ो मानी आपणासी कर्ता। तोचि भोगी सुखदुःख तत्त्वता। ज्ञानियासी तयाची वार्ता। न कळे साक्षित्वामुळें पैं।।५०।। ज़ें येई भोगावयासी। तें भोगुनी सारावें येचि जन्मासी। आतां ज़ें सांगितलें तुज़सी। धरीं मानसीं विवेक हा।।५१।। ज़री नकळे ज्ञानाज्ञान। तरी अंतरी धरीं वचन। इतुकेंचि बापा तूं ज़ाण। सांगतों आतां अवधारीं।।५२।। सुख आणि दुःख सकळिक। यामाजीं बघावा श्रीहरी एक। त्यावीण नाहीं आणिक। तोचि भरला सर्वत्र।।५३।। ज़ैसें प्रारब्ध उदया येई। तैसे भोग मिळतील पाहीं। आपण अलिप्त राहुनी सर्वही। बघावी लीला देवाची।।५४।। आतां म्हणसी ब्रह्मज्ञान। न होतां इतकी योग्यता कोठून। येईल कैसी मज़लागोन। तरी ऐक बापा उत्तर।।५५।। नलगे तयासी

ब्रह्मज्ञान। असावा एक दृढभाव पूर्ण। मग होईल सहज़चि ज़ाण। ब्रह्मज्ञान तें पाहीं।।५६।। प्रथम करावी निष्काम भक्ति। येईल तेव्हां सहज़ विरक्ति। ज़ें ज़ें दिसे भासे जगतीं। तें तें अर्पावें देवासी।।५७।। 'अर्पावें' म्हणजे उच़लुनी द्यावें। ऐसा त्याच़ा भाव नव्हे। देवा तुझें त्वांचि घ्यावें। म्हणावें नाहीं माझें हें।।५८।। हें जगत् सर्व तुझेंचि। येथें धरावी ममता कैंची। सर्व रूपें नटसी तूंचि। नाहीं अन्य वस्तु पैं।।५९।। तेव्हां तुज़ला काय अर्पण। करावें कवणासी कोणते कोण। देता घेता तूंचि सघन। वृथाचि अहंता धरणें ही।।६०।। अहंता ममता त्यागितां सर्व। मग कैंच़े सुखदुःखभाव। ज्यासी 'मी-माझें' त्यास सदैव। बाधे सुखदुःख तें पाहीं।।६१।। 'अहंता-ममता' याच़ा अर्थ। 'मी-माझें' ऐसा होत। एवं तेणेंच़ सुखदुःख बाधत। कैसें तें सांगूं आतांचि।।६२।। असे एक थोराच़ें सदन। तेथें येती बाळें दोन। आपुल्या मातेसंगें ज़ाण। फिरावयास सहज़चि।।६३।। मुलांची खेळणीं परम सुंदर। असती त्या गृहाभीतर। तयांसाठीं तंटा थोर। उपज़ला त्या बाळांमाजीं।।६४।। एक बाळ म्हणें हें माझें। दुज़ा बोले नव्हे तुझें। माझेंचि सारें मज़ पाहिजे। म्हणोनि भांडती दोघेही।।६५।। एकानें घेतां एकास दुःख। ज्यानें घेतलें त्यासी होय सुख। दुज़ा रडे स्फुंदस्फुंदोनि देख। माझें घेतलें म्हणोनि।।६६।। दुःख व्हावया तयालागोन। 'मी व माझें' हेंचि कारण। माझी वस्तु ऐसें समज़ोन। म्हणे माझेंचि हें पाहीं।।६७।। म्हणोनि पाहे करी तो दुःख। माझें घेतलें म्हणोनि देख। इतुक्यासी कारण काय तें ऐक। अज्ञ बाळें म्हणोनि।।६८।। इतुक्यामाजीं आली माता। म्हणे भांडूं नका आतां। दोघांच़ेंही नव्हे तत्त्वतां। येथील मुलांच़ें तें ज़ाणा।।६९।। वृथाचि तुम्ही तंटा करितां। येईल

मालक त्याचा आतां। रडूं नका तुम्ही सर्वथा। न मिळे तुम्हांलागीं ते।।७०।। ऐसें नानापरी समज़ावोनि। घेऊनि गेली आपुल्या सदनीं। मग विसरले बाळ ते झणीं। सुखदुःख तें सर्वही।।७१।। तद्वत् आम्ही येथें मानव। बालकांपरी अज्ञ सर्व। विषय माझे म्हणोनि गर्व। धरोनि दुःख भोगितों।।७२।। येथें असे जगाचा मालक। प्रभु परमेश्वरचि एक। तेव्हां येथील विषय सकळिक। कैसे माझे होतील ते।।७३।। सकल विषय देवाचे देख। मी नसें त्यांचा मालक। म्हणोनि मज़ला त्यांचा हक्क। नसे खचित निर्धारें।।७४।। वृथाचि 'मी-माझें' ऐसें। अभिमान वाहुनी घेत असें। तेव्हां सुखदुःख आपैसें। होय तयासि निर्धारें।।७५।। एवं 'मी-माझें' हेंचि ज़ाण। सुखदुःखांसी मूळ कारण। याचा विचार करितां पूर्ण। समज़ेल सारें त्या पाहीं।।७६।। देवचि या जगाचा मालक। नसे माझा कशावरीही हक्क। ऐसें भावितां सहज़चि देख। कैंचें सुख-दुःख बाधे त्या।।७७।। ज़ैसा बाळ थोडा होतां थोर। समज़े त्यासी आपपर। तेव्हां तो दृष्टि न फिरवी त्यावर। होय उदास सहज़चि।।७८।। ज़री वस्तूचा मालक बाळ। देई खेळाया थोडा वेळ। तरीच बाळ खेळेल। किंचित् वेळ घेवोनि।।७९।। तद्वत् ज़ो करी भक्ति देवावरी। त्यासी विवेक उपज़ें अंतरी। तेव्हां सन्मुख विषय दिसती ज़री। तरी न बघे तो त्यांकडे।।८०।। ज़ें दिलें देवें त्यासी। तेंचि सेवुनी तृप्त मानसीं। केवळ देह रक्षावयासी। भोजनादि विषय तो भोगी।।८१।। एवं ज़री नाहीं आत्मज्ञान। तरी इतुकेंचि पुरे तुज़लागोन। श्रीहरीचे आठवीं चरण। दृढभाव धरोनि।।८२।। आणि कथिल्यापरी करीं अर्पण। सकलही विषय त्यालागोन। ऐसें करितां गुरुकृपा पूर्ण। होऊनि ज्ञान दृढावे।।८३।। परि न सुटे त्यासी प्रारब्ध।म्हणोनि न करावे

प्रयत्न बहुविध। भोगुनीच़ सारावें समृद्ध। सुखदुःख तें पाहीं बा।।८४।। आणिक ईश-सृष्टीवरी सर्व। आपण न दावावी आपुली थोरीव। ज़ैसें ठेवील आपुल्यासी देव। तैसेंचि रहावें आनंदें।।८५।। त्याचि कारणें ज्वर आमुच़ा। सदा दंडावरी न ठेवीं साच़ा। नको आम्हां मानवांच़ा। ईश्वरासन्मुख चमत्कार।।८६।। परि करावया अनुष्ठान। तितुकेंचि कार्य केलें ज़ाण। तुवां ज़ो कां केला प्रश्न। दिधलें उत्तर तुज़लागीं।।८७।। पहा साधु कैसे असती। आपुली न करिती प्रख्याती। देव गुरूपुढें लघुत्व घेती। नाहीं अभिमान तयांसी।।८८।। असो तेव्हां तो गुरुभक्त। करी साष्टांग दंडवत। म्हणे देवा त्वांचि मज़प्रत। कृपा करोनि उद्धरावें।।८९।। ऐसें नानापरी विनवूनि तेव्हां। घेतला उपदेश धरोनि भावा। करितां निष्काम मनें सेवा। झ़ाला उद्धार तयाच़ा।।९०।। ज़ें धरिती दृढभाव। तयांसी प्रसन्न श्रीगुरुदेव। तेव्हां फिटोनि अहंभाव। होय ज्ञान त्यालागीं।।९१।। सद्गुरु म्हणजे नव्हे मनुष्य। असे तयांची महिमा विशेष। सांगती जनांसी बोध सुरस। पुढील अध्यायीं सांगूं तो।।९२।। आनंदाश्रम-परमहंस। श्रीशिवानंदतीर्थ एकरूप खास। यांचिया कृपाप्रसादें पंचदश। अध्याय गुरुदासें संपविला।।९३।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां पापें ज़ळती समग्र। पंचदशाध्याय रसाळ हा।।९४।। अध्याय १५।। ओंव्या ९४।। ॐ तत्सत् श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति पंचदशोऽध्यायः समाप्तः ।।

।। श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीशंकराश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।। ।।ॐ।। जय जय सद्गुरो करुणाघना। नमितों देवा आपुल्या चरणा। उद्धरीं मातें अत्रिनंदना। भक्तवत्सला करुणाळा।।१।। तुझें नाम वदतां वदनीं। ज़ळती पातकांच्या खाणी। ऐसी तुझी महिमा ऐकोनी। आलों धांवत चरणीं या।।२।। किंचित् स्तवन करावें म्हणुनी। वाटलें माझ्या अंतःकरणीं। परि देवा मज़लागोनी। त्वांचि द्यावी स्फूर्ति बा।।३।। कर्ता करविता तूंचि एक। मज़ नाहीं बा कांहीं विवेक। म्हणोनि धरितों अहंता देख। म्यां केलें म्हणोनि।।४।। परि देवा मज़ला ज़ाण। तूंचि सोडवीं अहंतेपासोन। आणिक करवीं चरित्र संपूर्ण। करीं रक्षण बा देवा।।५।। असो आतां परिसा सज्जन। मागील अध्यायीं केलें कथन। शंकराश्रमस्वामींची ज़ाण। महिमा वर्णन केली पैं।।६।। अनुष्ठानसमयीं येतां हिंवताप। दंडीं ठेवितां सुटे त्या कंप। विस्मयें एकानें पुसतां खूप। केला बोध स्वामींनीं।।७।। साधूंसी कांहीं करितां प्रश्न। त्यावरी करिती मोठें प्रवचन। नसे तयांसी देहाचें भान। न वाटे शीण अणुमात्र।।८।। असो आतां आणिक एक। स्वामींची लीला सांगतों सुरेख। तुम्ही सज्जन श्रोते हो भाविक। परिसा चित्त देवोनि।।९।। शंकराश्रमसद्गुरुनाथ। सदा योगाभ्यासीं रत। येतां भेटीसी आपुले भक्त। करिती बोध योग्य तयां।।१०।। एवं सतत परमार्थीं। घालिती मन दिवसरातीं। यापरी असतां निजदेहाप्रती। करिती दुर्लक्ष बहुतचि।।११।। मागें कथिल्यापरी येई हिंवताप। गोड न लागे, अन्न साफ। सोडिलें, आणि घेती ते सुखरूप। पेज़चि सारी त्या समयीं।।१२।। अनुष्ठान होतांक्षणी। पेज़ेची भिक्षा करिती ते झणीं। ऐसें असतां एके दिनीं। चमत्कार एक ज़ाहला।।१३।। श्रीस्वामी-परिज्ञानाश्रम

यांची। पुण्यतिथि होती साची। म्हणोनि केशवाश्रम स्वामींची। आज्ञा झाली आचाऱ्यांतें।।१४।। कीं आज़ परमगुरूंची पुण्यतिथी। म्हणोनि नका करूं पेज़ तुम्ही ती। स्वयंपाक वेगेंचि करा निश्चितीं। इतुकें सांगुनी गेले ते।।१५।। तेव्हां आचारी स्वयंपाक। करूं लागती लगबगें देख। पेज़ न करितां सकळिक। लागती आपुल्या कामासी।।१६।। यावरी शंकराश्रम सद्गुरुराज। अनुष्ठानादि सारुनी सहज़। भिक्षा करावी आतां पेज़। म्हणोनि आले पाकगृहीं।।१७।। नेहमीं भिक्षा करिती पेज़। त्यापरी गेले सद्गुरुराज। स्वयंपाकी सोडुनी हातींचें काज़। उभे राहती ते पाहीं।।१८।। एकमेकां बघती सकल। म्हणती आपुल्या मानसीं ते वेळ। कासया आले आतां दयाळ। काहीं न कळे हें आम्हां।।१९।। पेज़ घ्यावया आले कीं काय। नच केली म्हणोनि वाटलें भय। आतां करूं काय उपाय। म्हणोनि घाबरले अंतरीं ते।।२०।। तेव्हां बघती सद्गुरु भोंवतीं। पेज़ न दिसे चुलीवरती। मग आचाऱ्यांप्रति पुसती। झाली कीं सिद्ध पेज़ पहा।।२१।। सांगती मग आचारी तेव्हां। केली नाहीं पेज़ देवा। आमुच्यावरी क्षोभ न करावा। प्रभो गुरुराया दयाळा।।२२।। यावरी बोलती कृपाघन। न कराया काय कारण। तेव्हां बोलती आचारी ब्राह्मण। झालें वर्तमान तें सारें।।२३।। परमगुरूंची पुण्यतिथी आज़। म्हणोनि छोटे सद्गुरु महाराज। यांनी आज्ञा केली‘नको पेज़। स्वयंपाकचि वेगें करावा’।।२४।। तेव्हां स्वामी सद्गुरुनाथ। बरें म्हणोनि शय्यागृहांत। ज़ाउनी पहुडले स्वस्थ। विसांवा घ्याया त्या समयीं।।२५।। पहा कैसी श्रीगुरुमाय। किती शांत त्यांचें हृदय। अणुमात्र चित्तीं क्रोध न येय। ज़री झाला अपराध थोर।।२६।। असो यावरी ऐका सज्जन। काय चमत्कार झाला तो

पूर्ण। पाकशालेमाजीं ज़ाण। सांगतो आतां भाविक हो।।२७।। पाक सिद्ध झ़ाला झ़डकरी। वडे तळायाची केली तयारी। कढई ठेविली चुलीवरी। घातला विस्तव उत्कृष्ट।।२८।। तेल तापतां वडे सोडिती। परि ते तळासी ज़ाउनी बैसती। कांहीं केल्या वरी न येती। ज़ैसेचे तैसे राहती ते।।२९।। वडे नच तळूनि येती। हा प्रकार सकलही बघती। मानसीं बहुत विस्मय करिती। म्हणती काय हा चमत्कार।।३०।। नैवेद्यासी होय उशीर। काय करावें ऐसा विचार। करोनि गेले आचारी थोर। केशवाश्रम गुरूंकडे।।३१।। म्हणती स्वामिन् चमत्कार। होय एक महाथोर। ऐसें म्हणोनि सकल प्रकार। कथुनी प्रार्थिती त्या काळीं।।३२।। तेव्हां म्हणती केशवाश्रमस्वामी। विस्तव प्रज्वलित न केला तुम्हीं। येरू म्हणती नाहीं, आम्हीं। केला विस्तव थोर तो।।३३।। तापलें तेल कडकडीत। परि वडे तळूनि नाहींत येत। सकल बुडाशीं ज़ाऊनि बैसत। काय कारण कळेना।।३४।। येरही जन तें पाहती। स्वामींप्रति येऊनि सांगती। नसे अपराध निश्चितीं। आचारी जनांचा कांहींही ।।३५।। केला असे विस्तव अमित। काय हें न कळे परम अद्भुत। महास्वामी यांसी विदित। नाहीं कळत आम्हांसी।।३६।। तेव्हां छोटे स्वामी म्हणती। करा प्रार्थना श्रीगुरूंप्रति। सांगा वार्ता झ़ाली जी ती। तेचि निवारण करतील।।३७।। त्यांचीच़ ही सर्व करणी। असती ते पहा परमज्ञानी। न कळे महिमा कवणालागुनी। आम्हां अज्ञ जनांप्रति।।३८।। पहा कैसी सद्गुरुभक्ति। केशवाश्रमस्वामींची ती। वाढवावया त्यांची कीर्ति। बळेंचि पाठविती त्या स्थानीं।।३९।। असुनी आपुल्यासी सकल विदित। दाविती न कळे आपुल्याप्रत। असो पुढें वर्णूं यांचे समस्त। सद्गुण सारे हो पाहीं।।४०।। मग ज़ाती

सकल सद्गुरुसंनिधीं। करिती प्रार्थना परमावधी। म्हणती काय चमत्कार सांगा आधीं। कृपा करोनि गुरुराया।।४१।। अहो देवा सद्गुरुराया। काय सांगूं आतां सदया। चुलीवरी कढई वडे कराया। ठेविली तेल घालोनि।।४२।। खालीं विस्तव पेटतो थोर। तेल उकळे अति भयंकर। वडे घातले त्यामाझार। परि तळाशीं बसती ते।।४३।। तळुनी वरी नच येती। केली आम्हीं बहुविध युक्ति। परि सकल निष्फल होय ती। कां हें ऐसें कळेना।।४४।। आतां देवा त्वांचि दयाळा। कृपा करावी, तरीच़ ये वेळां। कार्य होईल सफल, हें सकळां। आम्हां वाटतें खचितचि।।४५।। काय अपराध झ़ाला आमुच़ा। कांहीं न कळे कवणाही साच़ा। आपुल्यावांचुनी आम्हां कैच़ा। सद्गुरु येउनी उद्धरील।।४६।। आतां त्वांचि क्षमा करुनी। पार करावें आम्हांलागुनी। ऐसें म्हणोनि लागले चरणीं। भक्तजन ते सकलही।।४७।। यावरी बोलती ते हंसून। सांगतों ऐका आतां वचन। भवानीशंकर याची ज़ाण। लीला सकल ही पहा।।४८।। ज़री पेटविली आग बहुत। कढईखालीं तुम्हीं सतत। काय उपयोग होईल तेथ। व्यर्थ होईल सर्वही।।४९।। आमुच्या उदरामाजीं बहुत। महाभयंकर दाह होत। तेव्हां कैसी पोंच़ेल तेथ। वड्यांसी उष्णता सांगा हो।।५०।। ऐकतां ऐसें सद्गुरुवचन। कळवळलें सकलांच़ें अंतःकरण। काय त्याची कळली खूण। पेज़ न वाढिली यांसी पै।।५१।। म्हणोनि ऐसा चमत्कार। झ़ाला असे हा निर्धार। ऐसें चित्तीं ज़ाणोनि सर्वत्र। गेले शरण गुरुचरणीं।।५२।। घातलें साष्टांग दंडवत। म्हणती देवा आपुल्याप्रत। पेज़ न दिधली ऐसा बहुत। अपराध आमुच़ा ज़ाहला

।।५३।। अज्ञपणें अपराध केला। क्षमा करावी त्वां आम्हांला। कवणा न कळे बा तव लीला। पाहिल्यावांचुनी कदापि।।५४।। ऐसें बोलुनी पुनरपि नमन। करुनी लगबगें ज़ाती धांवून। पेज़ करवुनी वाढिती ज़ाण। शंकराश्रम स्वामींसी।।५५।। करितां भिक्षा झ़ाले तृप्त। उदरींच़ा अग्नि झ़ाला शांत। इकडे वड्यांसी दाह लागुनी त्वरित। वडे तळूनि येती छान।।५६।। मग करोनि नैवेद्य देवाच़ा। घेतला प्रसाद जनांनीं साच़ा। अद्भुत चमत्कार हा स्वामींच़ा। पसरली वार्ता च़ोहोंकडे।।५७।। पहा कैसी साधूंची वृत्ति। ज़री पेज़ न वाढिली आपुल्या प्रति। अणुमात्र मानसीं न वाटे खंती। बैसती एकांतीं ज़ावोनि।।५८।। परि न चुके तयांसी भोग। क्षुधादि आणिक नाना रोग। याच़े कारण उदरीं आग। आली, अशक्त म्हणोनि।।५९।। केवळ ब्रह्मज्ञानी म्हणोनि। केली आग सहन तयांनीं। परि हें न सोसे देवालागोनि। दाविला थोर चमत्कार।।६०।। अज्ञजनांसी कळावें म्हणोनि। कीं साधुसंत हे देवचि असूनि। तयांसी तृप्त न करितां मज़लागोनि। करिती नैवेद्य हें व्यर्थ।।६१।। ऐसें समज़ोनि भवानीशंकर। करिता झ़ाला चमत्कार। परि केशवाश्रम-श्रीसद्गुरुवर। यांच़ा नाहीं अपराध।।६२।। येथें कुणीही करील प्रश्न। केशवाश्रम-गुरूंच़ा अपराध कां न। त्यांच्याचि आज्ञेवरूनि ज़ाण। पेज़ नाहीं केली ती।।६३।। तरी ऐका याच़ें उत्तर। जनीं ज़ैसा असे प्रचार। त्यापरी वागणें कर्तव्य थोर। ज़री झ़ाला ज्ञानी तो।।६४।। परिज्ञानाश्रम यांची पुण्यतिथि। ऐशा दिवशीं आधींच़ जेविती। म्हणोनि गुरूंची निंदा करिती। येती प्रसादासी जन बहुत।।६५।। यापरी त्यांनी ज़ें केलें कार्य। तें विचारेंचि खचित होय। पूर्ण ब्रह्मज्ञानी उभय। गुरु-शिष्य ते पाहीं।।६६।। गुरु म्हणिजे

शंकराश्रम। शिष्य केशवाश्रम उत्तम। विख्यात असे त्यांचें नाम। त्या सद्गुरु-स्वामींचें।।६७।। असती केशवाश्रम ब्रह्मज्ञानी। सर्व विदित तयांलागुनी। म्हणोनि येथें तयांसी कोणीं। दोष न द्यावा सर्वथा।।६८।। सद्गुरुस्वामींची विमल कीर्ति। वाढवावी जगीं निश्चितीं। ऐसा हेतु धरोनि चित्तीं। इतुकें कार्य केलें त्यांनी।।६९।। असो देव आणि सद्गुरुराय। एकचि असती ते उभय। अर्जुना सांगे श्रीकृष्ण सदय। कीं सद्गुरूसी भज़तां मज़ पावे।।७०।। तोचि सकलांसी सन्मार्गदायक। त्याहुनी त्राता नाहीं आणिक। तोचि निवारील भवभय-दुःख। सत्य वचन हें पाहीं।।७१।। असो बहुत बोलणें तें वायां। हातींच्या कंकणा आरसा कासया। दाविला कीं सद्गुरूचि श्रेष्ठ म्हणोनियां। वरील कथेमाजीं पैं।।७२।। अद्यापिही त्यांची महिमा। असे कैसी ती सांगतों तुम्हां। समाधिसंनिधीं मल्लापुरग्रामा। नवस करिती तो ऐका।।७३।। कांहीं येतां आपत्काळ। पेज़-नैवेद्य करविती ते वेळ। तेव्हां इच्छा होय सफल। अद्यापिही लोकांची।।७४।। आणिक कांहीं गोष्टी असती। सकलही त्या सांगूं पुढती। सद्गुरु जितुकी देईल स्फूर्ति। सांगूं तितुके सविस्तर।।७५।। पुढील अध्यायीं कथा सुरस। सद्गुरु सांगती बोध जनांस। ऐकतां वृत्ति होईल खास। निजानंदीं निमग्नचि।।७६।। आणिक घेती समाधि सघन। सांगूं तेथील महिमान। बोलूं तेंहीं रसाळ वर्णन। असा सादर श्रोते हो।।७७।। आनंदाश्रम-सद्गुरु महेश। आणि शिवानंदतीर्थ एकरूप खास। यांच्या कृपाप्रसादें षोडश। अध्याय गुरुदासें संपविला।।७८।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां, अज्ञान निरसे समग्र। षोडशाध्याय रसाळ हा।।७९।। अध्याय १६।। ओंव्या ७९।।ॐ तत्सत् -श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।। ।। इति षोडशोऽध्यायः समाप्तः।।

।। श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीशंकराश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।। ।।ॐ।। जय जय नमो सद्गुरुराया। निरसीं देवा मोहमाया। आणिक आतां तव पदीं बा या। दासालागीं दे थारा।।१।। काय लिहावें न कळे चित्ता। तूंचि देवा स्फुरवीं ताता। आणिक कवणा सांगूं आतां। तुज़वांचोनि दयाळा।।२।। तव कृपेवीण न होय सर्वथा। कैंचेंही कार्य निश्चयें ताता। म्हणोनि दयाळा तूंचि आतां। पार घालीं मज़लागीं।।३।। तुज़ काय अवघड बापा। न लगे उपमा तव स्वरूपा। आठवूं ज़ातां कल्पनेच्या खेपा। सहज़चि चुकती भक्तांच्या।।४।। ऐसें तुझें स्वरूप अपूर्व। बघतां अभक्तही ठेवी भाव। अगाध महिमा पाहुनी सर्व। धांवती तुझ्या संनिधानीं।।५।। असो आतां ऐका हो सज्जन। तुम्ही श्रोते सावधान। शंकराश्रम यांचें महिमान। आणिक बोलूं रसाळ तें।।६।। मागील अध्यायीं कथा सुंदर। निरूपिली श्रीशंकराश्रम-गुरुवर। यांसी पेज़ न वाढितां थोर। चमत्कार सकलां दावियला।।७।। यावरी सकलां झाला ताप। कळवळोनि करिती विलाप। सायंकाळी ज़ाऊनि समीप। सद्गुरूलागीं प्रार्थिती।।८।। अहा देवा सद्गुरुराया। बहुत शिणविलें तुज़ला सदया। परि त्वां साहुनी कैसें हृदया। ठेविलें शांत त्या समयीं।।९।। आधींच ज्वर न रुचे अन्न। आणिक होसी महाक्षीण। ऐशा वेळीं आम्हीं पेज़ न। करविली, थोर अपराध हा।।१०।। तूंचि असतां श्रेष्ठ देव। तुज़ला प्रसाद कवणाचा अपूर्व। धरोनि आम्हीं मूर्ख भाव। उगीच शिणविलें तुज़लागीं।।११।। तुज़ नाहीं द्वंद्वभेद। मग कैंचे विधि-निषेध। आम्हीं मूर्खीं धरोनि छंद। उगीच शिणविलें तुज़लागीं।।१२।। सर्व अपराध घालोनि पोटीं। आमुच्यावरी करोनि कृपावृष्टी। द्यावी आम्हांसी

ज्ञानदृष्टी। तूंचि तारक सर्वांसी।१३।। यावरी बोलती सद्गुरुस्वामी। नका करूं खेद हो तुम्ही। नाहीं शिणविलें मज़ला हें मी। सांगतों असत्य न पाहीं।।१४।। ज्या ज्या वेळीं ज़ो ज़ो भोग। तो तो येई आपैसा च़ांग। यात कवणाच़ा दोष तो मग। प्रारब्धचि तें ज़ाणा हो।।१५।। तुमची भक्ति असे अपार। बघुनी चित्त आमुच़ें फार। संतुष्ट झ़ालें हो साचार। नाहीं भय तुम्हांसी।।१६।। आतां आमुच़े थोडे दिवस। राहिले असती सांगतों खास। द्यावें येथें तुम्हीं लक्ष। सारे विषय टाकोनि।।१७।। सद्गुरूसी द्यावें काय। तरी तयांसी असे ज़े प्रिय। तेंचि देतां संतोष होय। अन्य न मागती ते कांहीं।।१८।। संतांची इच्छा जनकल्याण। आणिक नको तयांलागून। देहरक्षणार्थ करिती भोजन। तेवींच़ इतर भोग तयांसी।।१९।। परि नसे त्याची चिंता। न धरिती ते अणुही स्वार्था। दिवसरातीं ते परमार्था। झिज़विती देह आपुला हो।।२०।। तोचि प्रिय तयांलागीं। आणिक कांहीं न मागती जगीं। हेंचि करा तुम्ही सवेगीं। तरीच़ संतोष आम्हांसी।।२१।। न लागे धन आणि दौलत। काय कराया ती आम्हांप्रत। ज़री घालाल आपुलें चित्त। परमार्थीं तें प्रिय आम्हां।।२२।। यावरी बोले एक भक्त। कैसें परमार्थीं घालावें चित्त। विषयामाजींच़ ज़ाय सतत। न ज़ाय तें परमार्थीं।।२३।। विषयचि गोड वाटती मज़ला। क्षणैक न शिवे माझ्या चित्ताला। परमार्थ-विचार, म्हणोनि त्याला। काय दयाळा करावें।।२४।। तेव्हां बोले सद्गुरुनाथ। तुवां प्रश्न केला यथार्थ। ज़ें आम्हांसी प्रिय अत्यंत। तेंचि पुसिलें तूं बापा।।२५।। ज़ो कां तुवां केला प्रश्न। परमार्थीं कैसें घालावें मन। देतों उत्तर तुज़लागोन। चित्त देऊन अवधारीं।।२६।। विषयचि गोड वाटे मनासी।

तेव्हां परमार्थ न घडे मज़सी। ऐसें ज़री तूं म्हणसी। तरी सांगतों तुज़लागीं।।२७।। मन हें नसे आपुल्या स्वाधीन। न ऐके परांचेंही वचन। तेवीं असे चंचल पूर्ण। म्हणोनि धावें जेथे तेथें।।२८।। तरी तयासी करावें काय। सांगतों तुज़ला एक उपाय। तैसें करितां मग तें ज़ाय। परमार्थामाजीं सहज़चि।।२९।। नलगे त्यासी करावें बंधन। ज़ाऊं दे त्यासी विषयीं ज़ाण। परि त्याचें करावे रक्षण। विवेकेंचि ते साध्य पै।।३०।। यावरी सांगूं दृष्टांतसहित। ऐकें सावध करोनि चित्त। सांगितल्यापरीच करितां त्वरित। लाभे परमार्थ सहज़चि।।३१।। पहा असे एक बाळ लहान। तें न धरी एकचि ठिकाण। जिकडे तिकडे ज़ाय धांवोन। ज़ें ज़ें देखे तें उचली।।३२।। बरवें वाईट कुठें काहीं। देखतांक्षणी उचली पाहीं। अग्नीचे निखारेही घेई। अज्ञ बालक ज़ाण तें।।३३।। भाज़तां रडे आक्रंदोन। क्षण न लागतां विसरे ज़ाण। पुनरपि ज़ाय दुडदुडां धांवोन। रांगत रांगत तेथेंचि।।३४।। यापरी तें अज्ञ बाळ। अज्ञपणेंचि करी हळहळ। म्हणोनि त्याची माय ते वेळ। काय करी तें ऐकावें।।३५।। बहुत ज़पोनि करी पालन। जेथें ज़ाय तें तेथें आपण। ज़ाउनी सोडवी धोक्यापासून। तया बालका ती पाहीं।।३६।। एक काढितां घेई एक। इकडुनि तिकडे धांवे बालक। ज़े ज़ें दिसे त्यासी सन्मुख। तें तें काढी त्वरेनें।।३७।। ज़री तें कांहीं भलतेंच घेई। तरी माता करूनियां घाई। येर कांहींतरी घेऊनि ज़ाई। आधीं हातीं द्यावयासी।।३८।। कीं तें बालक आपुल्या हातींची। वस्तु द्यावया रडेल बहुतचि। ऐसें ज़ाणुनी देई त्या साची। अन्य कांहीं खेळावया।।३९।। म्हणे घेईं चेंडू तुज़ला। ऐसें म्हणूनि दावी त्याज़ला। ते बालक धांवे बघुनी डोळां। हातांतील वस्तू टाकोनि।।४०।।

त्यासी न देतां अन्य खेळाया। ज़री घेईल हातांतील त्याचिया। तरी तें बालक रडोनियां। करील आकांत बहुतचि।।४१।। ज़री मागाहूनि दिधलीं अनेक। खेळणीं खेळाया त्यासी देख। परि तिकडे न ढुंके बालक। तेंचि पाहिजे म्हणतसे।।४२।। म्हणोनि आधीच़ त्या दुज़ा खेळ। दावितां पूर्वींच़ा टाकी बाळ। न करितां कांहीं तळमळ। शांत चित्तें तें पाहीं।।४३।। तैसें येथे आपुलें मन। बालकापरी असे अज्ञ। जिकडे तिकडे धांवे ज़ाण। विषयांमाजीं तें पाहीं।।४४।। च़ांगले वाईट न बघे कांहीं। ज़ें ज़ें देखे ते ते घेई। त्यामुळें भोगी दुःख पाहीं। विषयासक्त होऊनियां।।४५।। ज़ैसें बालक घेई निखारे। तैसें मन हें अज्ञ बिचारें। दुर्व्यसनीं ज़ाउनी पडे बा रे। आणि रडे बुडतांचि।।४६।। त्यामाजीं होतां त्रास बहुत। दुःख होय तयासी अमित। परि विसरूनि दुर्व्यसनांत। पडे ज़ाउनी पुनरपि।।४७।। तेथें विवेक हा असावा एक। मनाच्या पाठीं निश्चयात्मक। तेणेंचि आणावें ओढूनि देख। ज़पावें त्यासी सर्वदा।।४८।। जेथें धावें मन आपुलें। तेथें विवेकें ज़ाउनी ते वेळे। शीघ्र पाहिजे सोडविलें। तरीच़ सुटेल तें पाहीं।।४९।। नातरी विषयांमाजीं बुडोन। ज़ाय खचितचि रात्रंदिन। मग कैंच़ें समाधान। होय बापा सांगें तूं।।५०।। माय पाठीसी ज़ाउनी बालका। ज़ैसें रक्षी तयासी देखा। तैसें धरोनि परम विवेका। करावा बोध सतत त्या।।५१।। बोधिलें तरी नायके मन। परम दुस्तर असे तें ज़ाण। नाना दुर्विषयीं ज़ावोन। होय रममाण बालकापरी।।५२।। एकांतुनी वळवितां मन। ज़ाय दुज्या विषयीं आपण। ज़ैसें एक काढितां एक ज़ाण। काढी बालक त्यापरी।।५३।। परि असावा विचार बळकट। जेथें तेथें होउनी धीट। माय बालका

रक्षी नीट। तैसें मनासी आवरावें।।५४।। न करितां माय ताडन। कैसें युक्तीनें बालकाकडोन। चेंडू दावूनि घे उपटोन। भलती वाईट वस्तु ती।।५५।। तैसें करावें येथें आपण। विवेकें युक्तीनें वळवावें मन। चेंडूपरी मूर्ति सगुण। धरावी अंतरी प्रेमानें।।५६।। धरितां मूर्ति हृदयीं सुंदर। कधीं न ज़ाय विषयीं साचार। मन हें खचितचि निर्धार। मग सहज़चि घडे परमार्थ।।५७।। आतां येथें कराल प्रश्न। मूर्ति कैसी येईल ज़ाण। तेथें नच ज़ाय माझें मन। विषयचि गोड वाटती त्या।।५८।। तरी ऐका उत्तर समूळ। माय खेळुनी चेंडूचा खेळ। दावी आधीं ती त्या सकळ। देखोनि बालक सुख पावे।।५९।। तैसें येथें करावें काय। लीला ऐकावी देवाची सुखमय। पुराण श्रवण करितां होय। सहज़चि प्रिय देव तयां।।६०।। तरीही नको वाटे जीवा। विषयचि गोड वाटती सर्वां। पुनः पुनः दावुनी देवा। सोडवावें तेथुनी तयासी।।६१।। चेंडू बघतां ज़ैसें बालक। धांवे सोडुनी हातांतील सकळिक। तैसें धरितां मूर्ति सुरेख। न ज़ाय मन तें दुर्विषयीं।।६२।। ज़ोंवरी न लागे येथील गोडी। तोंवरी तें विषय न सोडी। म्हणोनि तूं आठवीं तांतडीं। मूर्ति मानसीं ती पाहीं।।६३।। करूं नये मनासी बंधन। खुशाल ज़ाऊं दे तें विषयी पूर्ण। परि आवरावीं इंद्रियें आपण। मनापरी वर्तन करूं नये।।६४।। कैसें तें आतां सांगतों ऐक। वरील दृष्टांतावरीच़ देख। चित्त देऊनि, सकळिक। जन हो तुम्ही अवधारा।।६५।। ज़ैसें बालका माता पाहीं। भलता पदार्थ घेई तरीही। घेऊं नेदी त्याज़ला कांहीं। न रडवितांचि ती ज़ाण।।६६।। दावुनी आधीं चेंडू उत्तम। मग करी फत्ते काम। तैसी सुंदर मूर्ति परम। दावितां विषयां मन सोडी।।६७।। न दुखवितां मनासी ज़ाण। घ्यावी मूर्ति सुंदर सगुण। ऐसें करितां सहज़चि आपण। येई मन

हें मूर्तीकडे।।६८।। जेथें जेथें ज़ाय हें मन। तेथें तेथें विवेकें ज़ाऊन। मूर्ति सुंदर धरोनि आपण। वळवावें मनासी त्या ठायीं।।६९।। ऐसें करितां क्रमें क्रमेण। सहज़चि कळेल परमार्थ ज़ाण। म्हणोनि आधीं करावा प्रयत्न। मूर्ति धराया हृदयीं ती।।७०।। हेंचि एक मुख्य साधन। यांत न करावें अनुमान। मग तुज़ला अधिकार पूर्ण। परमार्थाच़ा येईल पैं।।७१।। म्हणोनि धरी मूर्ति सतत। करीं तिज़वरी प्रेम बहुत। ऐसें करितां मन हें खचित। सहज़चि ज़ाय ते ठायीं।।७२।। ज़री म्हणसी नाहीं प्रेम। तरी धरीं तूं ऐसा नेम। कीं ज़पावें सतत नाम। प्रभु परमेश्वर याच़ें बा।।७३।। हस्तानें ज़री करिसी काम। मुखीं धरीं तूं रामनाम। मग येईल मूर्ति सुगम-। रीतीनें आपुल्या हृदयीं ती।।७४।। तीचि तुझ्या अंतःकरणीं। सांगितल्यापरी धरीं तूं झ़णीं। आणिक साधन तुज़लागोनी। नलगे निश्चयें बा वत्सा।।७५।। हरएक कार्या लागे साधन। कार्य न होय साधनावांच़ोन। दीप उज़ळावया पाहिजे ज़ाण। वाती-तेल-समई ही।।७६।। एवं सकल कार्या पाहिजे साधन। त्यावीण न होय कार्य ज़ाण। म्हणोनि सिद्ध करोनि साधन। लागावें मग परमार्था।।७७।। तरी आतां सांगूं सविस्तर। अवधारा चित्त करूनि स्थिर। तुम्हींही जन समग्र। पावाल शाश्वत कल्याणा।।७८।। एकानें केला प्रश्न म्हणोनि। त्यासीच़ हा बोध समज़ूनि। तुम्ही सारे न घ्याल कर्णीं। तरी होईल जन्म व्यर्थ।।७९।। असो आतां सांगतों आधीं। परमार्थाची करोनि वृद्धी। नित्य असावें निजानंदी। तळमळ सर्वही सांडोनि।।८०।। कर्म-उपासना-ज्ञान। असती हीं कांडें तीन। न मिळे मोक्ष त्यांवांच़ोन। खचितचि ज़ाणा निर्धारें।।८१।। कर्मानें होय पापनाश। उपासनेनें विक्षेप-दोष। ज़ाउनी, होय

ज्ञान निर्विशेष। ज्ञानेंचि पावे मोक्षपदा।।८२।। ज्याचा होय विक्षेप-नाश। त्यासी होय आत्मप्रकाश। त्यालाच म्हणावें खास। परमार्थाचा अधिकारी।।८३।। म्हणोनि ध्यावी मूर्ति स्वमनीं। ऐसें सांगतों तुज़लागोनी। तेव्हां अधिकार आलाचि म्हणोनी। समज़ावें मनीं निश्चयेंसी।।८४।। कर्मानें होऊनि पापनाश। पुसावेंसें वाटलें तुज़ला खास। परमार्थ कैसा घडेल आम्हांस। ऐसा प्रश्न केला त्वां।।८५।। म्हणोनि तुज़ला उपासना। सांगितली आम्हीं ज़ाणा। दृढ धरीं ती अंतःकरणा-। माजीं मूर्ति सुंदर ती।।८६।। ज़री न ज़ाय तेथें मन। तरी आणावें त्यास विवेकें ज़ाण। परि नको आणूं त्यालागोन। ज़ुलुमें कदापि ज़ाण तूं।।८७।। श्रवण मनन करितां यथार्थ। भक्ति उपज़ेल ती अवचित। भक्ति उपज़तां दृढावे चित्त। मूर्तीच्या ठायीं निरंतर।।८८।। ऐसा करितां दृढ अभ्यास। विक्षेपाचा होय नाश। मग होय निर्विशेष। ज्ञान त्यासी सहज़चि।।८९।। ज़ो असे तीव्र प्रज्ञ। त्यासी श्रवण-मननें होय ज्ञान। मंद बुद्धि ज्याची ज़ाण। त्यासी मार्ग सुलभ हा।।९०।। न कळे कराया श्रवण मनन। त्यासी मुख्य हेंचि साधन। प्रभुपरमेश्वर मूर्ति सगुण। धरावी अंतरीं सततचि।।९१।। तेव्हांचि घडेल परमार्थ। आत्मज्ञान होईल यथार्थ। ना भीं तूं बा सद्गुरु समर्थ। असतां कैंचें भय तुज़ला।।९२।। यापरी केला तयासी बोध। प्रश्नाचें उत्तर देउनी बहुविध। ऐकुनी ज़ाहला सकलां आनंद। सद्गुरुवचन ऐसें तें।।९३।। ज्यानें केला होता प्रश्न। त्यासी वाटलें समाधान। दुज्या दिनींच स्वामींकडोन। घेतला उपदेश तयानें।।९४।। सांगितल्यापरी प्रेमानें। करी तो शुद्ध अंतःकरणें। पावला निजस्वरूपा त्वरेनें। मग काय उणें त्याज़ला।।९५।। असो यापरी बहुत जनां। उद्धरिलें श्रीकेशवाश्रमादिकांना।

आपुल्यासारखें करोनि त्यांना। मुक्त केलें कृपेनें।।९६।। ऐसें असतां सद्गुरुनाथ। शंकराश्रम परम विख्यात। ज्वरें पीडित होऊनि अत्यंत। क्षीण झाले ते पाहीं।।९७।। मग गोकर्ण-ग्रामासी ज़ाती। आद्य गुरूंचें दरुशन घेती। माघारे येतां कुमठ्यासी। उतरती परिवारासमवेत ते पाहीं।।९८।। तेव्हां मल्लापुर-ग्रामांतील। जन येती पाचाराया सकल। म्हणती स्वामी गुरुराया, ये वेळ। यांवें मल्लापुर-ग्रामासी।।९९।। कांहीं दिन तेथें राहुनी। बघावें कैसें हवा-पाणी। यावें आतां कृपा करोनी। आमुच्या सांगातीं गुरुराया।।१००।। ऐसी करोनि प्रार्थना थोर। बोलावुनी नेलें स्वामींसी सत्वर। कांहीं दिन राहती गुरुवर। परि न ज़ाय ज्वर त्यांचा पैं।।१०१।। दिवसेंदिवस झाले क्षीण। केले नाना परी प्रयत्न। परि प्रारब्ध सरतां पूर्ण। प्रयत्न काय करितील।।१०२।। शके सतराशें सात। विश्वावसु-संवत्सर प्रख्यात। माघ शुद्ध तृतीयेसी सद्गुरुनाथ। शंकराश्रम मुक्त झाले।।१०३।। मग येऊनि जन समस्त। मिरवुनी पालखीमाजीं त्यांप्रत। विधिपूर्वक समाधि देत। मल्लापुर-ग्रामांतरीं।।१०४।। चोंहीकडे पसरली वार्ता। भक्तजन आले पहातां पहातां। तळमळ वाटे त्यांच्या चित्ता। आठवुनी सद्गुण स्वामींचें।।१०५।। सद्गुरु एक विश्रांतिस्थान। यांत किमपि नसे अनुमान। कैसें तें परिसा चित्त देऊन। तुम्ही सज्जन भाविक हो।।१०६।। कित्येक मानवां नानापरी। संकष्टें येती म्हणोनि अंतरीं। दुःख होय तयांसी निर्धारीं। हे सकळां विदित असे।।१०७।। ऐशा समयीं सद्गुरु-मठासी। ज़ातां तो विसरे आपुल्या दुःखासी। क्षणभरी कां होईना मनासी। विश्रांति वाटे खचितचि।।१०८।। जितुका वेळ राहूं संनिधीपाशीं। तितुकें तरी

समाधान चित्तासी। वाटे हा अनुभव आम्हांसी। खचितचि ज़ाणा निर्धारें।।१०९।। वारंवार घेऊनि दर्शन। करितां त्यांचा बोध ग्रहण। होय परिपूर्ण समाधान। नसे अनुमान यामाजीं।।११०।। एवं सद्गुरु हेंचि एक। विश्रांतिस्थान निश्चयात्मक। पुढील अध्यायीं सांगूं आणिक। मुक्त झाल्यावरील कथा।।१११।। आनंदाश्रम-परमहंस। आणि शिवानंद एकचि खास। यांच्या कृपाप्रसादें सप्तदश। अध्याय गुरुदासें संपविला।।११२।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां पावे मोक्ष साचार। सप्तदशाध्याय रसाळ हा।।११३।। अध्याय १७।। ओंव्या।।११३।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति सप्तदशोऽध्यायः समाप्तः ।।

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीशंकराश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय सद्गुरो सद्गुणसांद्रा। परमार्थाची वाट यतींद्रा। तूंचि दाखवीं मज़ला उदारा। नेईं मोक्षपदा मज़ बापा।।१।। जगामाजीं तूंचि एक। वससी सर्वांमाजीं देख। तुज़वांचोनि नाहीं आणिक। वेगळा विषय बा देवा।।२।। ऐसें तुझें स्वरूप असतां। कैसें न कळे माझिया चित्ता। हाचि अचंबा वाटे ताता। माझा मज़चि दयाळा।।३।। अससी व्यापक तूं बा त्रिभुवनीं। नामरूप हें सोडून दोन्ही। अस्ति-भाति-प्रियत्वेंकरुनी। अससी जगतीं तू देवा।।४।। नामरूपाचा होय कीं नाश। परि नाहीं नाश तव स्वरूपास। स्पष्ट दिसे तव स्वरूप खास। साऱ्या ब्रह्मांडी बा देवा।।५।। ऐसें तुझें स्वरूप अगाध। परि नकळे त्याचा आम्हां आनंद। खरा गुरुपुत्र असे ज़ो प्रसिद्ध। तोचि ज़ाणे तें पाहीं।।६।। आतां माझ्या सद्गुरुनाथा। किती आठवूं तुज़ला ताता। तूंचि आकर्षुनी माझिया चित्ता। तव स्वरूपीं स्थिर करीं।।७।। ज़ैसा चुंबक आपुल्या स्थानीं। सुईसी घेई आकर्षोनी। तैसें तूं बा मज़लागोनी। निजस्वरूपीं आकर्षीं।।८।। काय दयाळा अवर्णनीय। स्वरूप असे तुझें रमणीय। कैसें कथावें तूंचि सदय। स्फुरवीं आतां मज़लागीं।।९।। असो आतां परिसा सज्जन। तुम्ही श्रोते हो सावधान। शंकराश्रमस्वामींचें महिमान। असे अगाध बहुतचि।।१०।। मागील अध्यायीं निरूपण। श्रीशंकराश्रम स्वामींसी ज़ाण। पेज़ न वाढिल्याकारण। क्षमा मागितली भक्तांनी।।११।। त्यांसी सांगितला उत्तम मार्ग। कांहीं दिनांतीं मल्लापुरीं मग। घेतली समाधि, सोडोनि जग। राहीले व्यापक ते होऊनि।।१२।। ज़री न दिसे त्यांचा देह। ब्रह्मात्म्याचा न होय विरह। तो असे सर्वव्यापक

यांत संदेह। अणुमात्रही न धरावा।।१३।। नाम-रूप सारें ज़ाय। अस्ति-भाति आणि प्रिय। यांचा मात्र लोप न होय। कल्पांतींही ज़ाणा हो।।१४।। सद्गुरु हे असती व्यापक। अस्ति-भाति-प्रियरूपें देख। ज़री गेला देह सुरेख। तरी न ज़ाय अस्तित्वादि।।१५।। न कळे आम्हां वेदान्तविचार। तरीही पाहूं सगुणचि सुंदर। न लोपे कधींही साचार। अस्ति-भाति-प्रियत्व पैं।।१६।। आहे यासी 'अस्ति' म्हणती। आहे तें ज़ाणणें हेचि 'भाति'। जगतीं उपज़े जी त्यावरी प्रीति। तेंचि 'प्रिय' समज़ावें।।१७।। एवं अस्ति-भाति-प्रियरूप असती। सद्गुरुस्वामी हे निश्चितीं। विचार करितां येई प्रचीति। त्यांच्या स्वरूपाची आपणां।।१८।। सद्गुरुचें अस्तित्व हें कधींही न ज़ाय। ज़री गेला देहादि समुदाय। तरीही उरे अस्तित्वें सदय। कैसें सांगूं तें अवधारा।।१९।। सद्गुरु असो कोणत्याही स्थानीं। 'आहे' हें न ज़ाय कुठेंही धांवुनी। आहे ऐसें ज़ें कळे स्वमनीं। तीच 'ज़ाणीव' राहे पैं।।२०।। ज़ाणिलें म्हणोनि तेथ 'प्रियता'। सहज़चि उपज़े आपुल्या चित्ता। एवं अस्ति-भाति-प्रियही सर्वथा। नच ज़ाय तें कदापि।।२१।। कांहीं केल्या अस्तित्व ज़ाईना। हें आपुल्या मानसीं तुम्ही ज़ाणा। 'आहे' ऐसें 'भासे' मना। सद्गुरुराणा तो पाहीं।।२२।। असल्यावांचूनि न भासे कधींही। भासल्यावीण प्रियत्व ना पाहीं। म्हणोनि सद्गुरुमाउली राहे ही। अस्ति-भाति-प्रियत्वेंचि।।२३।। पहा प्रपंचीं विषयीं सतत। असे आपुली प्रीति बहुत। परि सद्गुरुपुढें ती कसपट। भासे कैसी ती अवधारा।।२४।। विषयसुखाचा असे ज़ो आनंद। तो असे खचितचि अंध। म्हणोनि अविचारें होऊनि धुंद। बुडोनि ज़ाय विषयांतरीं।।२५।।

तया प्रेमामाजीं देख। नाश असे म्हणोनि अनेक। भोगीतसे तो सहज़ दुःख। सुख क्षणिक तें पाहीं।।२६।। येथें सद्गुरुप्रेमापासून। आनंद ज़ो होय उत्पन्न। तो नव्हे अंध खचितचि ज़ाण। नष्ट न होय कदापि।।२७।। अंध म्हणजे अविचारयुक्त। खरें तत्त्व न कळे तेथ। विषयचि गोड म्हणोनि रमत। परि नाश होय क्षणें त्यांच़ा।।२८।। सद्गुरुप्रेमाच़ा ज़ो आनंद। तोचि खरा परमानंद। येर ज़ो विषयानंद। त्याच़ा नाश होय सदा।।२९।। विषय सारे असती फोस। म्हणोनि आनंदाच़ा होय नाश। स्वरूप हें सत्यचि खास। तेथील आनंद न नासे।।३०।। ज़ें असे खरें स्वरूप। त्याच़ा न होय कधींही लोप। राहे तें सदा सुखरूप। असत्य तें सारें ज़ाय।।३१।। श्रीसद्गुरु यांच़े स्वरूप। सत्य म्हणोनि न होय लोप। 'अस्ति–भाति–प्रिय' रूपें समीप। असे तें ज़ाण निर्धारें।।३२।। एवं सद्गुरुरूपेंचि बघतां। कळे अस्ति-भाति-प्रियता। नलगे त्यासी ब्रह्मज्ञान सर्वथा। सहज़ बघतां कळतसे।।३३।। देह ज़री गेला त्यांच़ा। 'आहेपणा' न ज़ाय साच़ा। तैसें 'भाति-प्रिय' ही याच़ा। नाश न होय निर्धारें।।३४।। एवं 'आहे' हें राहे सतत। कैंच्याही रूपें असो तेथ। तैसेंचि 'भाति-प्रियत्व' हेंही असत। त्याच़ाही नाश न होय पैं।।३५।। म्हणोनि त्यांची महिमा ऐसी ही। न ज़ाय कुठेंही खचितचि पाहीं। देह मुक्त ज़री होई। तरीही नच ज़ाय महिमा ती।।३६।। असो श्रीशंकराश्रम-गुरुमाय। मुक्त ज़री झाले सदय। त्यांची महिमा कुठेंही न ज़ाय। अद्यापिही असेचि ती।।३७।। ज़ें असती खरे संत। त्यांची लीला परम विख्यात। सांगाया मी असें असमर्थ। खचितचि ज़ाणा निर्धारें।।३८।। तरीही गुरुकृपें कथा एक। सांगूं आतां चमत्कारिक।

शंकराश्रम यांची देख। महिमा अगाध ती पाहीं।।३९।। कोल्हापूर संस्थांनीं एक। 'नरसोबावाडी' या नामें देख। क्षेत्र असे परम सुरेख। ज़ाणती सकळही त्या स्थाना ।।४०।। श्रीनृसिंहसरस्वती–स्वामी। त्यांची कीर्ति बहुत नामी । हेंही ज़ाणतों सकल आम्ही। तेथील देवाची महिमा ती।।४१।। श्रीगुरुचरित्रामाजीं केलें। वर्णन अपार तयांच्या लीले। जेथें तेथें करिती भले। पारायणादि सेवा ती।।४२।। किती जनांच़ा केला उद्धार। संकट येतां धांवुनी सत्वर। देउनी तयांलागीं धीर। करी सांकडें निवारण।।४३।। ऐसी ती सद्गुरुमूर्ति। साक्षात् दत्त-अवतार जगतीं। झ़ालासे नृसिंहसरस्वती। नाम हें विख्यात सर्वत्र।।४४।। ऐशा त्या देवाच़ा अर्चक। नरसोबावाडीमाजी एक। होता परम भाविक। पुजारी तो सज्जन।।४५।। एके काळीं तया अर्चका। आणि त्याच्या पुत्रासी देखा। व्याधि लागली बापलेका। प्रारब्धें दारुण ती पाहीं।।४६।। पुत्राची व्याधि वाढली फार। केले नाना औषधोपचार। अधिकचि वाढे तेव्हां तो पुत्र। झ़ाला क्षीण बहुतचि।।४७।। भिऊनि आप्तइष्ट समस्त। म्हणती आतां काय उपाय येथ। मायबाप चिंताक्रांत। होऊनि आळविती देवासी।।४८।। प्रभो देवा दत्तात्रेया। श्रीपाद-श्रीवल्लभराया[१]। तुज़वांच़ोनि कवणही पुत्रा या। रक्षिता नसे अन्य जगीं।।४९।। आतां नच करूं कांहीं उपचार। संपली देवा औषधें समग्र। घातला सर्व तुज़वरी भार। तूंचि रक्षीं दयाळा।।५०।। यापरी प्रार्थना करुनी। झ़ोपलीं मायबापें रजनीं।

---

१ श्रीदत्तात्रेयाचा पहिला अवतार श्रीपाद-श्रीवल्लभ, आणि त्यांच़ा च़ दुसरा अवतार नरसिंह–सरस्वती, म्हणून येथें असें आळविलें आहे.

दृष्टांत झाला तयां स्वप्नीं। परम सुंदर तो ऐका।।५१।। काषायांबर केलें धारण। भाळीं भस्म विलेपन। दंड कमंडलु हातीं धरोन। घातल्या पायीं पादुका।।५२।। गळां रुद्राक्षस्फटिकहार। विलसे मूर्ति अति मनोहर। काय स्वरूप-लावण्य सुकुमार। रतिमदनाहुनी सुंदर तें।।५३।। ऐसी मूर्ति येऊनि बैसे। श्रीनृसिंहसरस्वतींची संतोषें। अर्चकाज़वळी, म्हणे तूं ऐसें। करीं आमुच्या वचनापरी।।५४।। कुमठा तालुकीं 'मल्लापुर'। या नामें एक खेडें साचार। तेथें सारस्वतांचा मठ सुंदर। असे ज़ाण निर्धारें।।५५।। तेथें असे समाधि थोर। तो असे माझाचि अवतार। तुझ्या पुत्रासी घेउनी सत्वर। ज़ाईं तेथें तूं पाहीं।।५६।। करीं सद्गुरुसमाधीची सेवा। तुझा पुत्र होईल बरवा। आणिक बरें होईल सर्वां। सत्य वचन हें आमुचें।।५७।। इतुकें बोलुनी श्रीस्वामी नरहरी। अदृश्य ज़ाहले क्षणाभीतरी। प्रारब्धरेषा त्यांची बरी। म्हणोनि भेटला तो देव।।५८।। मग होऊनि ब्राह्मण जागृत। सांगे पत्नीसी सकल वृत्तांत। ज़ाहला होता ज़ो स्वप्नीं दृष्टांत। निवेदन केला तो पाहीं।।५९।। ऐकतां तिज़ला ज़ाहला हरुष। म्हणे आम्ही घेउनी पुत्रास। मल्लापुर या ग्रामास। येचि दिनीं ज़ाऊं पैं।।६०।। ऐसें बोलुनी निघालीं सत्वर। ज़ावयासी मल्लापुरा आतुर। घेऊनि संगें आपुला पुत्र। अर्चक आणि पत्नी पैं।।६१।। ज़ाऊनि तया ग्रामाभीतरी। देखिली शंकराश्रम-समाधि बरी। आनंदलीं अंतर्यामीं भारी। राहिलीं प्रेमें त्या ठायीं।।६२।। करोनि प्रार्थना समाधि–संनिध। धरोनि तेथे भाव अति शुद्ध। प्रदक्षिणादि नानाविध। सेवा करुनी राहती पैं।।६३।। यापरी करितां कांहीं दिन। ज़ाहले बरे दोघेही पूर्ण। आनंद झाला सकलां ज़ाण।

तेव्हां निघाले तेथोनि।।६४।। गेलीं आपुल्या ग्रामालागुन। नरसोबावाडी येथें ज़ाण। बघतां यांसी तेथील जन। करिती आश्चर्य त्या समयीं।।६५।। म्हणती काय केलें यांसी। औषधोपचार सांगा आम्हांसी। यावरी म्हणे अर्चक तयांसी। तीर्थप्रसाद सद्गुरूचा।।६६।। कुमठा तालुकीं 'मल्लापुर'। या नामें एक खेडें सुंदर। तेथें समाधि असे थोर। एक सारस्वत गुरूंची।।६७।। साक्षात् दत्तात्रेय-अवतार। 'शंकराश्रम' या नामें यतिवर। होउनी केला जनांचा उद्धार। महिमा अगाध त्यांची पैं।।६८।। आम्हां स्वप्नीं सांगितली खूण। श्रीनृसिंह-सरस्वतींनीं येऊन। त्यापरी आम्हीं तेथें ज़ाऊन। सेवा केली समाधीची।।६९।। तेव्हां म्हणती जन सकल। काय महिमा त्यांची विपुल। घेतां तीर्थप्रसाद केवल। गुण ज़ाहला दोघांसी।।७०।। असो ऐसे नानापरी। भज़ती लोक मल्लापुरीं। मुक्त झाले म्हणुनी ईश्वरी-। महिमा न ज़ाय कुठेंही।।७१।। आणिक ऐका महिमा तयांची। शंकराश्रम-सद्गुरुरायांची। पुढील अध्यायीं सांगूं साची। अद्भुत चमत्कार तयांचा।।७२।। परि आम्हीं येथें रहस्य काय। घ्यावें सांगा जेणें सार्थक होय। महिमा म्हणोनि बोलतां भवभय। न चुके आमुचें तें पाहीं।।७३।। महिमा तयांची म्हणोन। पूर्ण ज्ञानी ते समज़ून। भक्ति-प्रेम ठेवुनी चरण। धरावे दृढतर स्वमनीं ते।।७४।। आणिक त्यांचे शांत सद्गुण। चित्तीं आठवोनि रात्रंदिन। त्यापरीच वर्तावें आपण। तरीच होईल सार्थक तें।।७५।। नातरी उगीच बडबडतां काय। होईल प्राप्त कीं सांगा निश्चय। दुज़ा 'श्रीमंत' बोलतां न येय। आम्हांलागीं श्रीमंती।।७६।। आपणचि करितां नाना यत्न। मिळेल पैसा आपुल्यालागुन। जनांची श्रीमंती मुखानें वदोन। काय उपयोग होय तयां।।७७।।

तैसा येथें सद्गुरुमहिमा। बोलुनी उपयोग न होय आम्हां। त्यापरीच करोनि क्रोध-कामा। ज़ाळुनी टाकावें सर्वस्वीं।।७८।। मग येईल सहज़चि अंगीं। स्वसुख-समाधान तें वेगीं। म्हणोनि सद्गुरुवीण न पहावें जगीं। अन्य विषय निर्धारें।।७९।। आनंदाश्रम-पुण्यपुरुष। शिवानंदतीर्थ एकचि खास। यांच्या कृपाप्रसादें अष्टादश। अध्याय गुरुदासें संपविला।।८०।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां गुरुरूपचि होऊं समग्र। अष्टादशाध्याय रसाळ हा।।८१।। अध्याय १८।। ओंव्या ८१।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति अष्टादशोऽध्यायः समाप्तः।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

।। श्रीगणेशाय नमः।।श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीशंकराश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय सद्गुरो करुणाकरा। तुज़ला करितों नमस्कारा। तूंचि देऊनि अभयकरा। करवीं ग्रंथविस्तार हा।।१।। केवीं करावें तुझें वर्णन। तुझ्या स्वरूपासी ज़ाणेल कवण। कैसें करावें ज़ाणिल्यावीण। वर्णन देवा तुझें तें।।२।। काय सांगूं चमत्कार। तुझ्या स्वरूपाचा न होय निर्धार। निर्गुण म्हणों कीं सगुण सुंदर। हेंचि नकळे मज़लागीं।।३।। नको देवा निर्गुण-सगुण। तूंचि एक पाहिजे ज़ाण। तुज़वांचोन आणिक ज्ञान। कासया देवा दयाळा।।४।। तूंचि एक पुरे मज़ला। त्यामाजीं सारें आलें दयाळा। तीर्थयात्रा करणें कशाला। असतां तूं एक गुरुनाथ।।५।। गंगेचे करिती स्नान। करी ती गंगा पापक्षालन। म्हणोनि ज़ाती सकल जन। गंगास्नान करावया।।६।। चंद्रमा आपुल्या शीतल किरणें। बाह्य ताप हरी त्वरेनें। शांतता मिळे जनांसी तेणें। चंद्रकृपेनें सकलांसी।।७।। कल्पवृक्ष इच्छिला ज़ो भोग। तो देउनी काय करी मग। दीनतेचा करी भंग। एवं दैन्य हरी तो।।८।। तुझी संगति करितां देवा। पाप-ताप-दैन्य या सर्वां। हरूनि टाकिसी तूं करुणार्णवा। खचितचि ज़ाण निर्धारें।।९।। पापाचा न उरे लवलेश। अंतरबाह्य तापाचा नाश। करोनि, आणिक दैन्य विशेष। हरिसी सारें निश्चयेंसीं।।१०।। म्हणोनि देवा तुझी एक। संगति मिळतां लाभ अनेक। मग कासया दुज़ें आणिक। ऐसें दैवत सांपडतां।।११।। असो आतां सद्गुरुनाथा। न विसंबें तुज़ला ताता। परि देईं तूंचि स्फुरण चित्ता। स्तवन कराया मज़लागीं।।१२।। असो मागील अध्यायीं केलें कथन। शंकराश्रमस्वामी ज़ाण। ज़री झाले मुक्त दयाघन। तरी न लोपे महिमा त्यांची ती।।१३।। नरसोबावाडीच्या अर्चकासी। पाठवितां

देवानें मल्लापुरासी। व्याधि ज़ाऊनि निजग्रामासी। गेले दोघेही बापलेक।।१४।। एवं सद्गुरु झाले ज़री मुक्त। कीर्ति त्यांची राहें सतत। 'अस्ति-भाति-प्रियत्वें' असत। सर्वत्र व्यापक ते पाहीं।।१५।। आतां कुणीही करितील प्रश्न। सद्गुरूचि कां व्यापक ज़ाण। आम्ही सकलही व्यापक असोन। काय हें सांगतां विपरीत।।१६।। तरी ऐका त्याचें उत्तर। आम्ही व्यापक सर्वही निर्धार। तैसें आहे का आमुचें अंतर। तरीच बोलावें हें पाहीं।।१७।। सद्गुरूंचें तैसेंच अंतर। त्यापरीच ते राहती निरंतर। कर्ता करविता तोचि साचार। म्हणोनि सर्व साध्य तयालागीं।।१८।। तयाहुनी नाहीं देव निराळा। सर्वांचा ज़ाणता तोचि एकला। म्हणोनि तोचि सर्व जगाला। अधिष्ठान होय पां।।१९।। ऐशा त्या सद्गुरुस्वामींची। महिमा काय वर्णावी साची। आम्हां अज्ञांसी योग्यता कैंची। येईल कोठुनी सांगा हो।।२०।। जितुकें तो स्फुरवील आम्हां। तितुकेंचि सांगूं आतां तुम्हां। आणिक काहीं त्यांची महिमा। अवधारा प्रेमानें भाविक हो।।२१।। एके काळीं पांडुरंगाश्रम। आश्रम ज़ाणा त्यांचा अष्टम। शिरालीहुनी मठासी उत्तम। मल्लापुर-ग्रामीं आले ते।।२२।। घेऊनि समाधीचें दर्शन। कांहीं दिवस तेथे राहून। शिरालीसी ज़ावया निघाले ज़ाण। पांडुरंगाश्रम स्वामिराय।।२३।। मल्लापुर मठींचा घंटानाद। ऐकतां जनांसी होय आनंद। ऐसी उत्कृष्ट घंटा प्रसिद्ध। होती ज़ाणा मठांतरीं।।२४।। ही घंटा शिराली-ग्रामीं। नेऊनि लावूं तेथें आम्ही। ऐसें म्हणुनी पांडुरंगाश्रमस्वामी। करिती सिद्धता नेण्याची।।२५।। तेव्हां स्वामींसी तेचि दिनीं। झोपतां रात्रीं पहा स्वप्नीं। समाधिस्थ शंकराश्रमस्वामींनीं। दर्शन देऊनि सांगितलें।।२६।। म्हणती बाळा पांडुरंगा। नेऊं नको घंटा ही गा।

इज़सी असो हिची ज़ागा। ठेव येथेंचि ही पाहीं।।२७।। ज़री पाहिजे शिराली मठासी। तरी सांगतों एक तुज़सी। येचिपरी कुमठा-ग्रामासी। मिळेल घंटा तुज़लागीं।।२८।। कुमठा-ग्रामीं असे एक। कांसार हुशार परम भाविक। तयाकडुनी करवीं देख। ऐसीच़ घंटा करील तो।।२९।। इतुकें सांगुनी श्रीगुरुनाथ। शंकराश्रम ज़ाहले गुप्त। पांडुरंगाश्रम झ़ाले जागृत। विस्मित मानसीं होती ते।।३०।। मग ती घंटा तेथेंच़ सोडुनी। गेले परिवारासहित तेथुनी। पांडुरंगाश्रम सद्गुणखाणी। कुमठा-ग्रामासी तेधवां।।३१।। तेथें ज़ाउनी जनांपाशीं। कांसाराची केली च़ौकशी। ऐकतां खूण तेथील जनांसी। कळलें अमुकचि कांसार।।३२।। मग ज़ाऊनि तया कांसारा। कथिला घंटेच़ा वृत्तांत सारा। मग त्यानें प्रेमानें त्वरा। केली घंटा उत्तम ती।।३३।। घेऊनि आला संनिधींपाशीं। दाविली घंटा अतिप्रेमेंसीं। बघुनि झ़ाला हर्ष मानसीं। सकलांच्याही ते वेळां।।३४।। ज़ैसा मल्लापुरांतील घंटेच़ा। नाद होतां आनंद साच़ा। त्यापरीच़ याही घंटानादाच़ा। आनंद वाटे सकलांसी।।३५।। तेव्हां ज़ाहलें आश्चर्य सकलां। म्हणती शंकराश्रमस्वामींची लीला। अगाध आतां पाहिली डोळां। ऐकिली होती कानांनी जी।।३६।। ऐसें बोलती परस्पर। स्वामींसही वाटला आनंद थोर। श्रीशंकराश्रम-गुरुवर। यांची लीला बघोनियां।।३७।। असो यापरी आणिक अमित। असती कथा त्यांच्या अद्भुत। परि आम्हांसी जितुक्या विदित। तितुक्या सांगूं आतां पैं।।३८।। पुन्हां कथा एक अद्भुत। सांगुनी करूं अध्याय समाप्त। श्रोते हो करा सावध चित्त। तुम्ही सज्जन भाविक हो।।३९।। शके

अठराशें छत्तिसामाजीं। पांडुरंगाश्रम श्रीसद्गुरुजी। आले मल्लापुर-ग्रामीं सहजीं। भेटीसी एकदां मठांत।।४०।। तेव्हां केला थोर विचार। करावा येथें जीर्णोद्धार। समाधि आणि मठ समग्र। पुनरपि बांधावा सुंदर तो।।४१।। ऐसें म्हणोनि स्वामींनीं। केली सिद्धता बांधावया झणीं। लाविले जन तये स्थानीं। कामालागीं त्या समयीं।।४२।। काढितां समाधीवरील दगड। आश्चर्य वाटलें सकळां उघड। बिल्व तुलसी गंधादि उदंड। यांचा परिमळ पसरला।।४३।। तेव्हां तेथे डोकावुनी। बघती सारे जन येउनी। देखिला तेथें त्यांनी नयनीं। चमत्कार तो ऐकावा।।४४।। तुलसी-बिल्वपत्र-पुष्पादि। वाहिलीं होतीं देतां समाधि। तीं टवटवीत दिसलीं संनिधीं। पाहुनी रोमांचित झाले सर्व।।४५।। आश्चर्य करिती सकल जन। म्हणती अघटित महिमान। शंकराश्रमस्वामींचें हें ज़ाण। धन्य धन्य सारस्वत हे।।४६।। देवही येती स्वर्गींहुनी। धांवत विमानीं बैसुनी। पुष्पवृष्टि ते करिती झणीं। समाधीवरी प्रेमानें।।४७।। म्हणती देवा दत्तात्रेया। त्वां ज़ाउनी धरणीं श्रीगुरुराया। सकळ जनांचा उद्धार करूनियां। वाढविली कीर्ति आपुली।।४८।। काय ते नर धन्य तेथील। असे तयांचे पुण्य प्रबल। तयांपुढें आम्ही देव सकल। परम दुर्बल निश्चयेंसीं।।४९।। ऐशियापरी स्तविती देव। खचितचि त्यांचें बोलणें सर्व। परि ज्याच्या अंतरी असे भाव। तोचि तरेल निर्धारें।।५०।। नसतां चित्तीं प्रेमभाव। त्यासी काय करील देव। वृथाचि देवा ठेविती नांव। महिमा नेणतां तयाची।।५१।। विचार करितां सद्गुरुवीण। नाहीं ताराया समर्थ कवण। म्हणोनि ज़ातां त्यासीच शरण। तोचि सोडवी यांतुनी।।५२।। येथें करतील कुणी प्रश्न। कासया सद्गुरु आम्हां ज़ाण।

वाचितां पुस्तकें सर्वही ज्ञान। येईल आमुच्या हातीं पैं।।५३।। तरी याचें उत्तर अवधारा। काय करावा पुस्तक-पसारा। गुरूवांचोनि चित्ता थारा। न मिळे कदापि निश्चयेंसी।।५४।। खरें तत्त्व पुस्तकीं न मिळे। कैसें तें सांगूं ये वेळे। लक्ष लावोनि येथें आपुलें। अवधारा भाविक श्रोते हो।।५५।। होता एका ग्रामीं एक। शेतकरी परम हुशार देख। काबाडकष्ट करोनि सुरेख। चालवी प्रपंच आपुला तो।।५६।। ऐसें असतां तयालागीं। व्याधि लागुनी दुःख भोगी। कंटाळला बहुत तो जगीं। शेतकरी आपल्या व्याधीसी।।५७।। आयुष्य संपलें त्याचें समग्र। जवळी नव्हता त्याचा पुत्र। लिहुनी ठेविलें एक पत्र। मरणसमयीं त्यानें पैं।।५८।। मग सोडिला त्यानें प्राण। लोकांनी केलें त्याचें दहन। ऐकोनि आला पुत्र धांवोन। लगबगें जाण त्या समयीं।।५९।। तेव्हां त्यानें बापाचें पत्र। वाचुनी पाहिलें निरखुनी नेत्र। न करितां विचार क्षणमात्र। उठला झडकरी तो पाहीं।।६०।। पत्रामाजीं लिहिलें काय। असे तो पाहीं कोणता विषय। येईल श्रोत्यांच्या चित्तीं संशय। सांगतों आतां अवधारा।।६१।। तुजकरितां कांहीं प्राप्ति। करोनि ठेविली नाहीं अंतीं। शेत आहे ठेविलें तुजप्रति। खणितां कष्टें प्राप्ति पैं।।६२।। ऐसें वाचितां पुत्र झडकरी। गेला थेट शेतावरी। सारें शेत खणुनी निर्धारीं। पाही त्यामाजीं काय असे।।६३।। परि न मिळे त्यासी कांहीं। शेतामाजीं द्रव्यादि पाहीं। तेव्हां घाबरूनि म्हणे काय ही। करणी विपरीत देवाची।।६४।। स्पष्ट लिहिलें माझ्या वडिलें। शेतामाजीं तुज ठेविलें। कष्ट करितां मिळेल तरी ये वेळे। काय झालें धन तें पैं।।६५।। सारें शेत खणुनी खणुनी। केलें सर्व रक्ताचें पाणी। तरीही न सांपडे

त्यालागोनी। धन पाहीं अणुमात्र।।६६।। आतां ऐका सावधान। कां न सांपडे त्यासी धन। ठेविलेंचि नसतां ज़ाण। कैसें सांपडे त्याला हो।।६७।। बापानें ज़ें लिहिलें पत्र। त्याच़ा अर्थ न ज़ाणतां पुत्र। खणूं लागला भूमि पवित्र। उगीच़ शिणला तो पाहीं।।६८।। तया पत्राच़ा ऐसा अर्थ। कीं शेत आहे तुज़प्रत। बीज घालूनि करीं कष्ट सतत। पीक येईल तेव्हां पैं।।६९।। ऐसा त्याच़ा असोनि अर्थ। वाचिल्यानें न कळे त्याप्रत। तेंचि मुखानें सांगता विवरोनि समस्त। कळलें असतें त्यालागीं।।७०।। तैसें येथें पुस्तकें वाचितां। न कळे तत्त्व आपल्या चित्ता। सद्गुरुवीण जनासी सर्वथा। म्हणोनि ज़ावें शरण तया।।७१।। तूं नव्हे देह-मन-बुद्धि। ब्रह्मस्वरूप आहेसी इत्यादी। ज़री पुस्तकीं त्याची प्रसिद्धि। तरीही न कळे गुरुवीण।।७२।। गुरुमुखें करी श्रवण। तरीच़ त्याची कळे खूण। तेव्हांचि होईल ब्रह्मज्ञान। आम्हां अज्ञानी जनांसी।।७३।। असो आतां तया गुरुनाथा। सतत स्मरावें तरी चित्ता। होईल समाधान तें तत्त्वतां। आम्हां जनांसी निर्धारें।।७४।। आतां श्रीगुरुशंकराश्रम। असे हा प्रेमळ चतुर्थ 'आश्रम'। लावुनि जनांसी भक्तिप्रेम। उद्धरिलें ज़ाण सर्वांसी।।७५।। यापरी करोनि प्रेमानें यांनीं। शके सोळाशें ब्याण्णवापासोनी। सत्राशें सात वरी जगीं राहोनि। स्वधर्मराज्य च़ालविलें।।७६।। पुढील अध्यायीं केशवाश्रम। स्वामी आमुच़े ज़ाणा पंचम। प्रेमाने च़ालवितील स्वधर्म-। राज्य सारस्वतवृंदाच़ें।।७७।। त्यांची कथा परम अद्भुत। एका भक्ताच़ा पुरविला मनोरथ। ऐकतां होईल संतुष्ट चित्त। अभक्तांच़ेही तें पाहीं।।७८।।

आनंदाश्रम-पुण्यपुरुष। शिवानंदतीर्थ हे एकचि खास। यांच्या कृपाप्रसादें एकोनविंश। अध्याय गुरुदासें संपविला।।७९।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां भक्ति होय दृढतर। एकोनविंशाध्याय रसाळ हा।।८०।। अध्याय१९।। ओंव्या ८०।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति एकोनविंशोऽध्यायः समाप्तः।।

परमपूज्य केशवाश्रम स्वामिजींची समाधि, चित्रापुर मठ

परमपूज्य केशवाश्रम स्वामिजींनी स्थापन केलेली श्रीउमामहेश्वर सन्निधि (विठ्ठल)

।। श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीकेशवाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।। ॐ ।। जय जय पंचम केशवाश्रमा। कोण देवा उद्धरील आम्हां। तुज़वांचोनि अज्ञांच्या क्रोध-कामा। ज़ाळील कवण हो स्वामी ।।१।। आंधळ्या हातीं ज़ैसी काठी। तैसी तुझी मूर्ति गोमटी। सदा राहे भक्तांपाठीं। रक्षिसी संकटीं त्यांसी पैं।।२।। ऐसी तूं आमुची माउली। भक्तांसाठीं वेगें धांवली। आणिक कांहीं काज़ ना या वेळीं। अवनीं यावया तुज़ला पैं।।३।। तुज़ नाहीं जनन-मरण। परि तूं येसी भक्तांकारण। येथें अवनीवरी बापा ज़ाण। काय काज़ तुज़लागीं।।४।। शिक्षकासी नाहीं शिकणें। परि शाळेसी ज़ाई नेमानें। मुलांसी शिकवाया-कारणें। ज़ावें लागे त्यासी पैं।।५।। तैसें देवा भक्तांकारण। घेसी अवतार तूं बा ज़ाण। परि न लागे तुज़ला बंधन। प्रपंचाचें पाहीं पां।।६।। ज़री राहिलास तूं प्रपंचीं। तरीही न लागे ममता त्याची। सारें तुज़ला आत्मरूपचि। तेव्हां कैंचें बंधन पैं।।७।। ज्यासी असे मीतूंपण। त्यासीच हें सारें बंधन। तूं तरी गुरुराया संन्यासी पूर्ण। तेव्हां कैंचें बंधन तुज़लागीं।।८।। तुज़ विषम नाहीं कांहीं कांहीं एक। सारें जग तुज़ला देख। ब्रह्मरूपचि भासे सम्यक। नाहीं संशय यामाजीं।।९।। आतां दुज़े न मागें कांहीं। एकचि मागतों मज़ला देईं। तुज़वांचोनि कोणी नाहीं। द्यावया अन्य समर्थ पैं।।१०।।'अर्चन' भक्ति पंचम आतां। देईं दयाळा शमवीं चित्ता। ऐसी प्रार्थना करितों ताता। भक्तवत्सला करुणाळा।।११।। असो आतां ऐका सज्जन। मागील अध्यायीं केलें निरूपण। श्रीशंकराश्रम-स्वामींचें महिमान। मल्लापुर येथील समाधीचें।।१२।। आतां सांगूं श्रीकेशवाश्रम-। स्वामी यांचे सद्गुण परम। उत्कृष्ट असुनी दाविला

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

सुगम। मार्ग जनांसी प्रेमानें।।१३।। शंकराश्रम मुक्त झालियाउपरी। यांसी बैसविती गादीवरी। स्वधर्म- राज्याचे अधिकारी। करिती सारस्वतवृंदाचे।।१४।। मूर्ति असे परम सुंदर। ब्रह्मतेज झळके मुखावर। म्हणती साक्षात् विष्णूचा अवतार। भेटला आम्हां जगतीं या।।१५।। जनांलागीं अति प्रेमानें। बोधुनी आकर्षिलें ज़वळी तयानें। युक्तीनें भक्ति वाढविली जेणें। होईल समाधान ज्यापरी।।१६।। ऐसें करितां जनांलागीं।भक्ति विशेष उपज़ली वेगीं। आमुच्या मठाचे सद्गुरूचि हे जगीं। आमुचा उद्धार करितील।।१७।। आम्हांसी पाहिजे सद्गुरुराय। मठ इत्यादि हेंचि सुखमय। याहुनी आणिक जगतीं ना प्रिय। ऐसी भावना दृढ झाली।।१८।।'आमुचें' ऐसें ज्याचें मन। त्यासी त्याची चिंता ज़ाण। म्हणोनि त्याचा अभिमान। बाहुनी रक्षण तो करी।।१९।। म्हणोनि येथें 'मठ आमुचा'। ऐसा भाव धरी ज़ो साचा। तो वाहे सहज़चि मठाचा। अभिमान सारा प्रेमानें।।२०।। जेव्हां ऐसा अभिमान वाहे। तेव्हां तो करी त्याचें पाहे। रक्षण, 'माझें' म्हणोनि हें। अतिप्रेमानें अवधारा।।२१।। असो यापरी बहुत जन। घेती मठाचा अभिमान। करिती विचार सकल मिळोन। वर्गणी द्यावी आम्हीं पैं।।२२।। ऐसा ठराव करोनि देख। देती वर्गणी मठासी प्रत्येक। प्रतिवर्षीं पाठविती रोख। आपापुल्या ग्रामांतुनी।।२३।। ज्याच्या त्याच्या उत्पन्नापरी। देती वर्गणी शक्त्यनुसारी। तेव्हां मठासी सहज़चि निर्धारीं। ऊर्जित स्थिति आली पैं।।२४।। घेतलीं कांहीं शेतें सुंदर। उत्पन्न स्वल्प वाढलें साचार। नाना उत्सव करिती थोर। मठामाजीं त्या काळीं।।२५।। असो सद्गुरु केशवाश्रम-। स्वामी आमुचे शांत परम। पूर्णज्ञानी आत्माराम। बघतां प्रेम उद्भवे पैं।।२६।। महिमा

अपार न वर्णवे कवणा। अमुक ऐसी न होय कल्पना। तशांतही आम्हां अज्ञ जनां। कैसें समज़ेल सांगा हो।।२७।। सूर्याचा प्रकाश आंधळ्यासी। पुसतां कैसें सांगवेल त्यासी।तैसें आम्हां अज्ञ जनांसी। कैसी वर्णवेल महिमा ती ।।२८।। परि त्या सद्गुरूच्या प्रसादें।जितुकें शक्य तितुकें आनंदें। करूं वर्णन आतां स्वच्छंदें। परिसा सज्जन भाविक हो।।२९।।'मुर्डेश्वर' या नामें एक। खेडें असे शिरालीनजीक। तेथें होता एक भाविक। सारस्वत ब्राह्मण पैं ।।३०।। तो करीतसे रात्रंदिन। केशवाश्रम-सद्गुरूंचें स्मरण। आणि कधीं कधीं भेटे ज़ाऊन। स्वामींसी परम प्रीतीनें।।३१।। किंचित् न धरी मनीं कामना। सदा करी तो नामस्मरणा। वारंवार करी प्रार्थना। देईं भक्ति मज़ देवा।।३२।। याहुनी न मागे कधीं कांहीं। सद्गुरुसंनिधीं खचितचि पाहीं। ऐसें असतां उदया येई। पुण्य त्याचें त्या काळीं।।३३।। झाला त्यासी एक पुत्र। परम तेजस्वी अति सुंदर। बघतां होय मन सत्वर। आनंदित सकलांचें।।३४।। झालें बाळ सुंदर बहुत। वर्षे झालीं त्यासी सात।परि न बोलेचि तो सुत। मुका म्हणती त्यासी पैं।।३५।। परि या गृहस्थाप्रति। न वाटे अणुमात्र त्याची खंती। पत्नी सांगे दिवसरातीं। स्वस्थ कां हो बैसलां।।३६।। तुम्ही भज़तां स्वामींसी। त्यांच्या चरणीं घाला यासी। नातरी याची गति कैसी। सांगा पुढें होईल ती।।३७।। तुम्हां नाहीं अणुमात्र चिंता। सदा परमार्थी घालितां चित्ता। परि न सुटे संसार सर्वथा। मज़लागीं हा पाहीं हो।।३८।। तरी करा माझ्यावरी। उपकार आणि चला निर्धारीं। संनिधीपाशीं प्रार्थना सत्वरी। करोनि चरणीं या घाला।।३९।। यावरी बोले तो भक्त तियेसी। काय मागावें सद्गुरूपाशीं। सांगतों आतां परियेसीं। चित्त देउनी अवधारीं

।।४०।। ठेविलें राजानें अन्नछत्र। त्यापाशीं मागितलें किंचित तक्र। तेव्हां हंसतील जन समग्र। काय मंदमती म्हणोनि।।४१।। तेव्हां त्यासी पाहुनी खचित। आश्चर्य वाटेल राजाप्रत। म्हणे मानसीं यासी विदित। नाहीं मी राजा म्हणोनि।।४२।। तैसें येथें सद्गुरुराज। शाश्वत सुख द्यावया सहज़। समर्थ असतां कीं म्हणावें मज़। नश्वर प्रपंच द्या देवा।।४३।। ऐसें मागतां सद्गुरुराय। हंसतील मज़ बघुनी सदय। म्हणोनि न मागें मी सांगतों निश्चय। सद्गुरुमाउलीज़वळी हें।।४४।। पुत्र धन दारा सारें। नश्वर म्हणोनी सदा न उरे। उगीच़ माझें म्हणोनि मरे। मानव अहंता धरोनि।।४५।। ज़ें घ्यावें सद्गुरूपासोन। तें न घेतां भलतेंचि मागतां ज़ाण। होय आपुलेंचि नुकसान। नसे अनुमान यामाजीं।।४६।। नुकसान काय म्हणसी ज़री। तरी सांगतों तें अवधारीं। उगीच़ खिन्न न व्हावें अंतरीं। वृथाचि ज़ाण गे पाहीं।।४७।। ज़ो द्यावया समर्थ अमृत। तें न मागतां दूध मागत। तरी येथ आपुलीच़ हानि होत। हें न कळत अज्ञांना।।४८।। ज्यासी मिळे हो अमृत। तो होय अमरचि त्वरित। तैसें ते दवडुनी दूध घेत। यासी काय म्हणावें।।४९।। तैसें येथें सद्गुरुमाय। समर्थ असे दावाया चिन्मय। स्वरूप आपुलें, देउनी अभय। निजभक्तांसीं ती पाहीं।।५०।। म्हणोनि ऐशा गुरुसंनिधीं। काय मागावें हें आधीं। विचारूनि मानसीं त्या पदीं। शरण ज़ावें मग पाहीं।।५१।। तरीच़ देईल तो करुणार्णव। खऱ्या सुखाच़ें ज़ाण वैभव। त्याहुनी आणिक सुख तें अपूर्व। सांग आहे कैंच़ें तें।।५२।। हा नव्हे तुझा पुत्र। वृथा न करीं प्रेम अणुमात्र। धरीं तूं मार्ग परम पवित्र। परमार्थाच़ा बहु सुलभ।।५३।। ज़री धरिला अति मोह। तरी न राहे हा शाश्वत देह। म्हणोनि न करीं तूं याच़ा संग्रह। अशाश्वत

प्रेमाचा।।५४।। जें आपुलें खरें स्वरूप। त्याचा न होय कदापि लोप। ऐसें तें निजरूप दावी अमूप। सद्गुरुराणा तो माझा।।५५।। ऐशा त्या सद्गुरूपाशीं। विषय मागतां लाज वाटे मजसी। म्हणोनि घडीघडी येविषीं। बोलूं नको मजपाशीं तूं।।५६।। ऐसें ऐकतां पतीचे वचन। झाली मानसीं क्रोधायमान। बैसली तेव्हां करीत रुदन। आळवी स्वामींसी त्या समयीं।।५७।। म्हणे देवा केशवाश्रमा। अपार ऐकिली तुझी महिमा। आमुच्या पतीनें जाळुनी कामा। टाकिलें सर्व निर्धारें।।५८।। त्यासी नको हा संसार। मजसाठीं तूं देईं साचार। माझा एकचि असे पुत्र। मुका जाण तो पाहीं।।५९।। हें असे तुजला विदित। म्यां काय सांगावें येथ। त्वांचि समजुनी शिकवीं त्याप्रत। बोलावयासी दयाळा।।६०।। मज नाहीं भक्ति-प्रेम। मीं भजलें तुजला सकाम। म्हणुनी नच अव्हेरीं, सुगम-। मार्ग दावीं तूंचि पैं।।६१।। ऐसी नानापरी करुनी प्रार्थना। चित्तीं आठवी श्रीगुरुराणा। मग ती रात्रीं ललना। पहुडे आपल्या शय्येवरी।।६२।। तेचि दिनीं रात्रीं स्वप्नीं। गेली शिराली-ग्रामीं तेथुनी। घेतलें दरुशन स्वामींचें ते क्षणीं। मुलासहित तियेनें।।६३।। स्वामींनीं दिधलें अभयवचन। ना भीं बाळे तूं न करीं रुदन। तुझा पुत्र सुखसंपन्न। होईल जाण निर्धारें।।६४।। इतुकें सांगुनी झाले अदृश्य। स्वामी आणि मठ विशेष। मग पाहतां अंथरुणीं खास। असे ती नारी आपुल्या गृहीं।।६५।। होतां संपूर्ण जागृत। जाहली मानसीं विस्मित। आनंद न मावे गगनांत। परि न सांगे कवणाप्रति।।६६।। मग दोन दिवस गेलियावरी। तया भक्तासी रात्रीं निर्धारीं। येउनी स्वामी स्वप्नामाझारीं। बोलते झाले तें ऐका।।६७।। अगा मद्भक्ता विरक्ता। घेउनी येईं तुझिया सुता। दरुशन करवीं आणुनी

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

आतां। आज्ञा आमुची तुज़लागीं ।।६८।। इतुकें बोलुनी केशवाश्रम। सद्गुरु ते सद्गुण-ग्राम। अदृश्य ज़ाहले क्षणेंचि परम। भाविक भक्तासी भेटोनी।।६९।। तेव्हां तो झ़ाला जागृत। पत्नीसी सांगे वृत्तांत। श्रीसद्गुरुस्वामी-मठाप्रत। ज़ाऊं आजि शिराळीसी।।७०।। ज़ाहला ज़ो स्वप्नीं दृष्टांत। तो निवेदिला तिज़ला समस्त। ऐकतां बोले हर्षयुक्त। पत्नी आपुल्या पतीप्रती।।७१।। म्हणे ऐका प्राणनाथा। मज़ही स्वप्न पडिलें, आतां। सांगतें तुम्हांलागीं सर्वथा। असत्य न सांगें मी पाहीं।।७२।। दोन दिवस झ़ाले खास। स्वप्न देखिलें परम सुरस। श्रीस्वामींनीं सांगितलें, आम्हांस। भेट बालकास घेउनी।।७३।। आणि एक सांगितली खूण। तुझ़ा बाळ करील भाषण। ना भीं तूं ऐसें वचन। बोलिले ज़ाण मज़लागीं।।७४।। यावरी बोले तो सद्गुरुभक्त। काय महिमा सांगूं अद्भुत। च़ला ज़ाऊं आतां त्वरित। घेऊं दर्शन त्यांच़ें पैं।।७५।। ऐसें बोलुनी तो भक्त। गेला कांता-पुत्रासहित। शिराली-ग्रामीं श्रीमठांत। घेतलें दर्शन स्वामीच़ें।।७६।। तेव्हां बोलती स्वामिराय। घालीं आमुच्या पदीं तनय। ऐकतां चित्तीं पावती विस्मय। पतिपत्नी उभयतां।।७७।। गुरु-आज्ञेपरी घातला पायीं। मग तो ठेविता झ़ाला डोई। तास झ़ाला तरी नुच़ले पाहीं। तो बाळ आपुलें मस्तक।।७८।। स्फुंदस्फुंदोनि रडूं लागला। स्वामी उठविती स्वकरें तयाला। म्हणती भिऊं नको तूं बाळा। होईल कल्याण तुझ़ें बा।।७९।। ऐसें म्हणोनि ठेविला हस्त। त्याच्या मस्तकीं प्रेमभरित। तेव्हां त्याच्या मातेप्रत। झ़ाला आनंद अमितचि।।८०।। असो मग तीं उभयतां। चार दिवस राहिलीं तत्त्वतां। पादपूजादि करूनी चित्ता। पावलीं समाधान त्याकाळीं।।८१।। घेतला मंत्र-उपदेश ज़ाण। केलें मुलाच़ें मौंजीबंधन। मुलगा हळूहळू करी भाषण। अद्भुत

महिमा श्रीगुरूंची।।८२।। मग तीं गेलीं पुत्रासहित। आपुल्या ग्रामीं पहा त्वरित। सकल विद्या-पारंगत। झाला पुत्र सुलक्षणी।।८३।। तोही झाला सद्गुरुभक्त। आत्मज्ञान पावला त्वरित। प्रपंच करुनी परमार्थ। करी तो प्रेमें सद्भावें।।८४।। आणि माताही त्यापरीच। पुढें झाली विरक्त साच। निष्काम भजे ती स्वच्छ। नसे संशय अणुमात्र।।८५।। आधीं होती जी परम कामिक। मग झाली निष्काम भाविक। सद्गुरुकृपाचि ही एक। खचितचि जाणा निर्धारें।।८६।। असो यापरी सद्गुरुमहिमा। काय सांगूं आतां तुम्हां। पहा कैसें त्यांच्या नामा। अद्यापिही गाती पैं।।८७।। कैसें त्यांचें भक्तप्रेम। लीला दावुनि पुरवी काम। ऐशा गुरूचें घेतां नाम। तुटे भवभय पाप्यांचें।।८८।। आधीं दावुनी लीला बहुत। मग हळूहळू दाविती सुपंथ। आकर्षिती परमार्थीं चित्त। निजभक्तांचें ते पाहीं।।८९।। कडू औषध द्यावयाकारण। माता मुलांसी काय करी आपण। गोड पदार्थ मुखी घालोन। मग देई ती औषध पैं।।९०।। तैसें येथें साधु-संत। दावुनी किंचित् लीला अद्भुत। ओढिती परमार्थीं चित्त। निजभक्तांचें तें पाहीं।।९१।। हें सांगाया काय कारण। कीं श्रोते करितील प्रश्न। जरी सद्गुरुमहिमा आहे पूर्ण। तरी न व्हावें दुःख भक्तां।।९२।। कित्येक गुरुभक्त असती मोठे। त्यांवरी कासया येती संकटें। तेव्हां महिमा जाय कुठें। ऐसा प्रश्न उद्भवेल।।९३।। याचि प्रश्नाचें उत्तर। वरील दृष्टान्तें दिधलें साचार। कीं बाळासी देतां औषध कडुतर। गोड आधीं दे खावया।।९४।। तैसें येथें सद्गुरुमाय। अणुमात्र लीला दावुनी सदय। ओढिती प्रेमबळें समुदाय। निजभक्तांचा तो पाहीं।।९५।। अवतार घ्यावया काय कारण। केवळ

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

जगाचें कराया कल्याण। आणिक कांहीं येथें काज़ न। येण्याचें त्या प्रभुलागीं।।९६।। भक्तसंकट पाहुनी अवनीं। तळमळ वाटे अंतःकरणीं। कीं 'देहचि हा मी' ऐसें समज़ुनी। व्यर्थ आयुष्य घालविती।।९७।। विषयचि गोड वाटे जीवा। आठवेना क्षणमात्र देवा। काय करावें ऐशिया सर्वां। म्हणोनि अवतरे प्रभुराय।।९८।। जधीं जधीं साधु होउनी प्रगटे। हराया जनांचीं नाना संकटें। परि जन आंधळे मोठे। न दिसती साधु तयांसी।।९९।। म्हणोनि किंचित लीला दावितां। जन ठेविती भावना तत्त्वतां। तेव्हां तयांसी बोधितां। सहज़ ग्रहण होईल पैं।।१००।। ज़ैसे व्यापारी जाहिराती। लिहिती तेथें नाना व्यक्ती। चमत्कारी चित्रें छापिती। कैशा कारणें तें सांगा।।१०१।। आपुला माल खरेदी व्हावा। ऐसा हेतु धरोनि नांवा। छापिती मालाच्या तेव्हां। जाहीर करिती व्यापारी।।१०२।। आपुलें नांव वाचावें लोकांनीं। ऐसा हेतु धरोनि स्वमनीं। नाना चित्रें त्यावरी छापुनी। लाविती जिथें तिथें तीं पाहीं।।१०३।। चित्रें बघतां अद्भुत विचित्र। लक्ष देती तेथें सत्वर। चित्र बघाया उत्सुक थोर। होय मन हें मानवांचें।।१०४।। तेव्हां बघती जाहिरात। अमुक माल येथें मिळत। म्हणोनि छापिती चित्रें बहुत। व्यापारी ज़ाण ते पाहीं।।१०५।। चित्रें बघावीं जनांनीं ऐसा। हेतु नाहीं त्यांच्या मानसा। केवळ माल विकावा सहसा। हेंचि व्यापारी इच्छिती।।१०६।। याचिकारणें नाना चित्रें। जाहिरातीपुढें छापिती सर्वत्रें। तैसीं साधुपुरुषांचीं चरित्रें। असती ज़ाणा निर्धारें ।।१०७।। अर्थात् नाना लीला दाविती। चित्रांपरी असे खचित ती। चमत्कार पाहुनी जन भजती। म्हणोनि किंचित दाविती ते।।१०८।। परि हेतु केवळ त्यांचा। उद्धारावें जनांसी साचा । लीला दावितां तरी याच्या। हृदयी ठसेल तो बोध

।।१०९।। ऐसा हेतु धरोनि मानसीं। करिती युक्तीनें बोध जनांसी। देह झिज़विती दिवसनिशीं। काय महिमा वर्णावी ।।११०।। याविण तयांसी न वाटे आपण। लीला दावोनि कीर्ति घेवोन। जनांसी फसवोन उदरभरण। करावें ऐसें कदापिही।।१११।। म्हणोनि न दाविती बहुत लीला। जितुकी पाहिजे कार्याला। तितुकीच़ दावुनी निजभक्ताला। करिती उद्धार त्यांच़ा हो।।११२।। जेव्हां उपज़े भक्ति त्याला। तेव्हां न दाविती त्यासी लीला। आणिक लावुनी कसाला। करिती उद्धार तयांच़ा।।११३।। पुढील अध्यायीं हेंचि कथन। सांगूं गुरुकृपें विस्तारोन। ऐकतां होईल संतुष्ट मन। प्रेमळ श्रोत्यांच़ें निर्धारें।।११४।। आनंदाश्रम- परमहंस। शिवानंदतीर्थ एकचि खास। यांच्या कृपाप्रसादेंचि विंश। अध्याय गुरुदासें संपविला।।११५।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां नासती दोष समग्र। विंशतितमाध्याय रसाळ हा।।११६।। अध्याय २०।। ओंव्या ११६।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति विंशतितमोऽध्यायः समाप्तः।।

।। श्रीगणेशाय नमः ।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीकेशवाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय सद्गुरो दीनदयाळा। करुणाकरा भक्तवत्सला। स्वस्वरूपाचा सुखसोहळा। दाविसी डोळां निजकृपेंचि।।१।। कैसे तुझे गुण वर्णावे। तूं गुणातीत अससी स्वभावें। ऐशा तुला वर्णाया व्हावें। त्वद्रूपचि बा देवा।।२।। तुझ्या स्वरूपाची न कळतां खूण। कैसें करावें देवा वर्णन। नाहीं योग्यता मज़ला ज़ाण। सद्गुरुराया दयाळा।।३।। बालक करितां स्तनपान। न्याहाळे मातेचें वदन। ऐसें करितां ओळखे पूर्ण। हीच माता म्हणोनि।।४।। तैसा तुझ्या प्रेम-दुग्धाचा। घुटका घेतांचि निश्चय साचा। होय अनुभव चित्ता आमुच्या। स्वस्वरूपाचा बा पाहीं।।५।। म्हणोनि देवा तूंचि आतां। भक्ति-प्रेमरस पाज़ुनी ताता। ओळखवीं दिव्य स्वरूप चित्ता। कृपासागरा वेल्हाळा।।६।। ज़री पाहिलें स्वरूप डोळां। तरीही न कळे तुझी लीला। केवढी किती अंत ना त्याला। मग कैसें वर्णवे।।७।। वर्णिता वर्णविता तूंचि ज़ाण। विचार करितां नाहीं आन। तूंचि अससी सर्वत्र परिपूर्ण। नाहीं अनुमान यामाजीं।।८।। असो आतां श्रोते हो सादर। ऐका सद्गुण परम थोर। श्रीसद्गुरु कृपासागर। यांचे साचार आतां पैं।।९।। मागील अध्यायीं कथा सुंदर। निष्काम भक्त यांचा कुमार। मुक्यासी वाचा देऊनि उद्धार। केला परम प्रीतीनें।।१०।। ऐशी ती सद्गुरुमूर्ति। परम कृपाळू अंगीं शांति। लाविले जन सन्मार्गाप्रति। बोधुनी वारंवार तयां।।११।। नको त्यांसी पैसा अडका। केवळ भाव बघती देखा। यावरी कथा कथितों ऐका। तुम्हीं भाविक सज्जन हो।।१२।। मंगळूर ग्रामीं होता एक। सारस्वत भक्त बहु भाविक। केशवाश्रमस्वामींचा देख। प्रेमळ भक्त तो साचा।।१३।। ब्रह्मचारी असे तो

सज्जन। होता बंधूंचें अन्न खावोन। स्वतंत्र एक पैही ज़ाण। नसे हातीं तयाच्या।।१४।। अंगकष्ट करुनी नाना। पोटासी अन्न मिळे त्या ज़ाणा। चित्तीं धरी सद्गुरुराणा। निशिदिनीं, तो भाविक पैं।।१५।। ऐसें असतां एके दिनीं। विचार करी तो अंतःकरणीं । ज़ावें सद्गुरु-संनिधानीं। शिराली-ग्रामीं आतां पैं।।१६।। ऐसें योजुनी निघाला त्वरित। पायींच़ गेला मार्ग आक्रमित। शिणला तो भक्त अमित। सुज़ले पाय बहुतचि।।१७।। वाटेंत एक गांव लागतां। तेथें अश्वत्थ वृक्ष होता। तेथें निज़तां लागली चिंता। म्हणे आतां पुढें कैसें क्रमावें।।१८।। अहा देवा भक्तवत्सला। काय करूं बा ये वेळां। कधीं पाहूं मूर्ति डोळां। काय प्रारब्ध हें माझें।।१९।। येथेंचि आतां माझा प्राण। ज़ाईल तरी मग कोठून। होईल बापा तुझें दर्शन। सांग दयाळा तूं मज़ला।।२०।। येथवरी आलों कैसातरी। पुढें च़ालवेना निर्धारीं। आतां तूंचि कृपा करीं। अनाथावरी करुणाळा।।२१।। त्वां रक्षिलें बहुत जनांसी। आतां कां न उपज़े दया मानसीं। येथें टाकितां अर्ध वाटेसी। कोण गती मम देवा।।२२।। तुज़वांच़ोनि मज़ रक्षिता। कवणही नसे जगीं ताता। आणिक न मागें मी आतां। भेटीवीण तव देवा।।२३।। यावरी ज़ैसें तुझ्या मानसीं । तैसेंचि करीं तूं बा मज़सी। भक्तजनांची चिंता तुज़सी। म्यां तरी कासया सांगावें।।२४।। ऐसें म्हणोनि तो भक्त। पहुडला मूर्ति चिंतुनी त्वरित। निद्रा लागली तेव्हां त्याप्रत। पडिलें स्वप्न सुंदर त्या।।२५।। केशवाश्रम- सद्गुरुनाथ। येउनी बैसले ज़वळी तेथ। पायांसी तेल च़ोळिलें त्याप्रत। अति प्रेमानें त्या काळीं।।२६।। अदृश्य ज़ाहले अवचित। मग ज़ागा ज़ाहला तो भक्त। बघतां झ़ाला आश्चर्यचकित। दिसे तेल पायांसी।।२७।।

झाले पाय सडसडीत। न दुखती पाय किंचित। तेव्हां उठला तेथूनि त्वरित। भक्त चालूं लागला तो।।२८।। ज्याची भक्ति दृढतर। त्याची चिंता सद्गुरूसी थोर। आपण वाहती तयाचा भार। काय महिमा वर्णावी।।२९।। पहा काय आश्चर्य थोर। स्वप्नींचा कैसा चमत्कार। ऐसी सद्गुरुमूर्ति सुंदर। साक्षात् महेश्वर अवतरला।।३०।। असो मग तो भक्तराज। शिराली-ग्रामीं पोंचला सहज। दर्शन घेतलें स्वामींचें निज-। प्रेमानें त्यानें जाण पां।।३१।। म्हणे मानसीं धन्य धन्य । देवा तुजवीण नाहीं अन्य। विषय पांचही असती शून्य। तूंचि एक सत्य अससी।।३२।। ऐसें भावुनी निजमानसीं। धरी प्रीतीनें गुरुचरणांसी। तृप्त होउनी परियेसीं। पावला अखंड समाधान।।३३।। असो यावरी घेउनी दर्शन। राहिला तेथें कांहीं दिन। मग गेला ग्रामीं जाण। मंगळूरासी तो भक्त।।३४।। यापरी तो प्रतिवर्षीं। येतसे सद्गुरुदर्शनासी। करितां करितां त्याचे मानसीं। उपजलें वैराग्य संसारीं।।३५।। ऐसें असतां सद्गुरुनाथ। कसासी लाविती भक्ताप्रत। आलें त्यावरी संकट बहुत। काय तें आतां परिसा हो।।३६।। कष्ट करोनि नानापरी। बंधुजनांची करी चाकरी। देहरक्षणार्थ उदर भरी। ध्याई सतत गुरुमूर्ति।।३७।। ऐसें असतां तो भक्त। प्रारब्धवशें झाला अशक्त। कष्ट कराया न होय शक्त। करिती तुच्छ सकलही।।३८।। छी थू करिती सकलही आप्त। परि हा न डगमगे किंचित। गुरूपदेश धरोनि चित्तांत। नांदे सुखानें तो पाहीं।।३९।। न देती पोटभरी त्यासी अन्न। म्हणती खा कष्ट करोन। आम्हीं आणावें कोठोन। तुजलागीं कैंचें वाढावें।।४०।। ऐसे नानापरी बोलती शब्द। परि याच्या अंतरीं नाहीं खेद। पाही सर्वत्र सद्गुरुपाद। चित्तीं

अखंड गुरुनाम।।४१।। मग झाला हा बहु अशक्त। बंधु दवडिती त्याप्रत। ज़ाया निघाला शिराली-ग्रामांत। हळू हळू वाट चालोनी।।४२।। घेतलें स्वामींचें दर्शन। आनंदला मनीं पूर्ण।ज़ें करिती सद्गुरु सघन। म्हणे तें आमुचें हितचि होय।।४३।। मग स्वामींनीं त्याज़लागीं। प्रेमानें न्याहाळिलें वेगीं। तेव्हां तयासी अंगीं। आली शक्ति हळू हळू।।४४।। सेवा करी श्रीस्वामींची। मनोभावें मूर्ति साची। हृदयीं धरोनि, सर्व जनांची। सेवा करी तो प्रेमानें।।४५।। सर्वांठायीं सद्गुरुमूर्ति। ऐसा भाव धरोनि चित्तीं। ज्यासी नसे अंगीं शक्ति। त्याची सेवा करी पैं।।४६।। ऐसा त्याचा भाव बघोनि। सद्गुरु संतोषती अंतःकरणीं। आणिक त्यावरी परम सद्गुणी। माउली प्रीति करितसे।।४७।। पहा कैसी त्यांची वृत्ति। सत्पुरुषांची ऐसीच स्थिती। ज़े जनांवरी करिती प्रीति। तेचि होती प्रिय त्यांस।।४८।। आपुली सेवा न केली। न बघती त्याकडे कधींकाळीं। परि सेवितां संकटकालीं। कोणाही तें प्रिय त्यांना।।४९।। परोपकाराइतुकें पुण्य। नाहीं जगतीं आणिक अन्य। म्हणोनि सद्गुरूसी होय मान्य। परोपकार हा पाहीं।।५०।। ज़ातीचा अंत्यज कां असेना। आपत्काळीं त्याच्याही ज़ाणा। करावें प्रेमें संगोपन। तोचि ज़ाणा खरा भक्त।।५१।। सोवळें वस्त्र करोनि परिधान। पूजेचें साहित्य हातीं धरोन। समज़ा ज़ाय देउळीं ज़ाण। पूजेलागीं कुणी एक।।५२।। तेव्हां तेथें रस्त्यावरी। एक अंत्यज पडला भूवरी। मूर्च्छा येउनी निर्धारीं। काय करावें तेव्हां त्यासी।।५३।। सोवळें आहे माझें म्हणुनी। ऐसें न पाहतां लगबगें धांवुनी। सावध करावें त्यासी झणीं। पाणी लावुनी डोळ्यांसी।।५४।। आणिलें ज़ें पंचामृत। त्यासी पाज़ावें तें त्वरित। अंत्यज जेव्हां सावधान होत। तेव्हां पोंचवावें गृहासी त्या।।५५।।

मग येउनी आपुल्या गृहासी। स्नान करावें परियेसीं। न चुकावें आपुल्या धर्मासी। परि करावा परोपकार।।५६।। ऐसियासी पुण्य अपार। पूजेच्या कोटिगुणें पहा थोर। ऐसी ही सद्गुरूची वाणी मधुर। श्रोतयांसी सांगितली।।५७।। असो यापरी तो गुरुभक्त। जनांवरी करी उपकार बहुत। बंधूंनीं ऐकुनी ऐसी मात। आश्चर्यचकित झाले ते।।५८।। झाला बहुत अशक्त म्हणुनी। दवडिला होता गृहांतुनी। परि तो सद्गुरु-कृपावलोकनीं। झाला सशक्त नंतरी।।५९।। म्हणोनि झालें आश्चर्य। धांवुनी येती बंधुद्वय। बघतां मूर्ति होती तन्मय। आनंद चित्तीं न समावे।।६०।। म्हणती देवा सद्गुरुराया। काय महिमा तुझी सदया। देईं आम्हां तव पदीं ठाया। ऐसें नानापरी प्रार्थिती।।६१।। मग ते पूजा करूनि सर्वतोपरी। ज़ाती आपुल्या ग्रामांतरीं। धन्य धन्य म्हणती अंतरीं। बंधूसी ज़ाणा निर्धारें।।६२।। असो तो झाला परमभक्त। निपुण परमार्थीं विख्यात। ब्रह्मज्ञानी होय त्वरित। काय वानूं गुण त्याचे।।६३।। श्रीकेशवाश्रम सद्गुरुमाय। यापरीच जनांसी उद्धरी सदय। सांगुनी नाना उपाय। दाविती चिन्मय निजरूपा।।६४।। पहा कैसा तो उद्धरिला भक्त। कसासी लावुनी बघितला भावार्थ। आतां कुणीही म्हणतील येथ। काय कसासी लाविला।।६५।। तरी ऐका त्याचें उत्तर। त्या भक्तासी कष्ट थोर। आले बहुतचि साचार। हेंचि कसासी लावणें।।६६।। ज़री झाले तितुके कष्ट। तरीही खेद ना त्याच्या चित्तांत। ज़ो असे खरा भक्त। तो सदैव तृप्त असे।।६७।। म्हणोनि त्यासी अणुमात्र चिंता। नसे स्वार्थ मानसीं तत्त्वतां। लावुनी सद्गुरूपाशीं चित्ता। ब्रह्मज्ञान तेणें ज़ोडिलें।।६८।। सुख-दुःख यांसी भिउनी। ज़री केली भक्ति सज़णी।

त्याचा उपयोग न होय झणीं। जन्म व्यर्थ ज़ातसे।।६९।। ज्यासी असे इच्छा सुखाची। त्याची भक्ति कामिक साची। ज़री केली तेणें भक्ति गुरूची। तरीही न सुटे बंधन पैं।।७०।। म्हणोनि सद्गुरु निश्चय बघती। भक्ता कसासी लावुनी पाहती। ज़री तो उतरेल कसाप्रती। तरीच़ समाधान लाभेल।।७१।। सद्गुरु ज़ें करिती कार्य। तेणेंचि भक्तहित होय। ते ज़ैसें ठेवितील सदय। त्यांतचि आनंदें रहावें।।७२।। ज़री आले कष्ट सतत। तरी आपुल्या सद्गुरूप्रत। नच विसरावें तरीच़ परमार्थ। होईल प्राप्त निश्चयें।।७३।। असो आतां स्वामी सदय। यांनीं करुनी नाना उपाय। उद्धरिला अगणित भक्तसमुदाय। सांगतां ग्रंथ वाढेल हा।।७४।। साधुसंतांचा अवतार ज़ाण। जगाच़ें कराया कल्याण। याहुनी त्यां आणिक काज़ न। अवतरण्यासी कांहीं एक।।७५।। म्हणोनि ते सारा जन्म। झिज़विती देह परमार्थीं उत्तम। ते असती पूर्ण ब्रह्म। निमग्न असती स्वस्वरूपीं।।७६।। नको त्यांसी प्रपंच निश्चितीं। म्हणोनि करिती एकांतीं वस्ती। दाविती जनांसी 'घेतों विश्रांती'। म्हणुनीच़ राहती एकीकडे।।७७।। तैसें केशवाश्रम-श्रीगुरूंनीं। ज़वळीच़ 'तलगेरी' ऐशा स्थानीं। विश्रांति-गृह बांधवुनी। राहती उष्मकालीं ते तेथें।।७८।। जनांसी बघाया विश्रांतिस्थान। परि यांच्या मानसीं निराळेंचि ज़ाण। होती निजस्वरूपीं निमग्न। एकांतीं ज़ाउनी ते पाहीं।।७९।। यापरी ते शुद्ध ब्रह्मज्ञानी। परम सात्त्विक निरभिमानी। सकलां जनांसी लाविलें भजनीं। प्रेमबळानें निर्धारें।।८०।। ऐसें असतां बहुत दिन। सुखें केलें कालक्रमण। निवविती सारस्वत भक्तजन। सद्गुरु निजकृपेंकरोनि।।८१।। कालेंकरूनि वार्धक्य आलें । केशवाश्रम अशक्त बहुत झाले। शिष्यजन विचारांत पडले। काय करावें म्हणोनि

।।८२।। सर्वही करिती मनीं विचार। करवावा आतां शिष्य-स्वीकार। म्हणूनि धुंडूं लागले ते सत्वर। योग्य बटूसी तेधवां।।८३।। धुंडितां मिळाला योग्य सहज़। शुक्लभट्ट यांचा वंशज। सुलक्षणी मुलगा पहा सतेज। भवानीशंकरकृपेनें।।८४।। मंगळूर नामें प्रसिद्ध शहरीं। लाभला मुलगा सुंदर भारी। बघतांचि वृत्ति होय अंतरीं। तल्लीन ज़ाणा मानवांची।।८५।। भक्तजनांच्या आग्रहास्तव। तेथें गेले होते गुरुदेव। तेव्हांचि प्रार्थिती जन सर्व। शिष्य-स्वीकार करावया।।८६।। प्रार्थना त्यांची ऐकूनि कानीं। योग्य वाटलें स्वामींच्या मनीं। शिष्य-स्वीकार करिती झ़णीं। सद्गुरु शिरालींत तेधवां।।८७।। कासया त्यांसी इतुका कठिण। संन्यास-आश्रम तो ज़ाण। पुढील अध्यायीं याचें विवरण। बोलूं गुरुकृपेंकरूनि।।८८।। असो आतां ऐका सकल। शके सत्राशें सव्वीस सोज्ज्वळ। रक्ताक्षी संवत्सर आषाढ शुक्ल। पंचमी ऐशा शुभदिनीं।।८९।। ''वामनाश्रम'' या नामेंकरुनी। हे शिष्य प्रसिद्ध ज़ाहले जनीं। मग येती चित्रापुरीं ते झ़णीं। सद्गुरु निजशिष्यासमवेत।।९०।। कांहीं वर्षें वामनाश्रमांसी। योगाभ्यास शिकविला प्रेमेंसीं। ब्रह्मज्ञानी झ़ाले परियेसीं। 'वामनाश्रम' स्वामी ते।।९१।। 'सुभानु' नाम संवत्सरीं। सत्राशें पंचेचाळ शकांतरीं। मार्गशीर्ष नवमी अवसरीं। झ़ालें वर्तमान तें परिसावें।।९२।। सद्गुरुस्वामी केशवाश्रम। संपतां अवतार-कार्यक्रम। घेती समाधि आनंदें उत्तम। मार्ग सांगुनी सकलांसी।।९३।। ऐसे ज़े साधुसंत। जगाच्या कल्याणा झिज़विती स्वतांप्रत। देहाची ना धरिती प्रीत। नाहीं स्वार्थ अणुमात्र।।९४।। ऐशा सद्गुरु माउलीलागीं। भजतां सहज़चि आपण वेगीं। पावुनी समाधान, जगीं। दुज्यांसी ताराया समर्थ पैं।।९५।। म्हणोनि करावी सत्संगति।

त्यावीण आम्हां नाहीं गति। तेचि देउनी शुद्ध मति। उद्धरिती यांत न संशय।।९६।। ज़ो करी गुरुनिंदा। तो न पोंहचे मोक्षपदा। लटिकें नव्हे हें, त्याची आपदा। कधींही न चुके निश्चयेंसी।।९७।। म्हणोनि आपण धरावे चरण। तरीच चुके जन्ममरण। पुढें होईल याचें विवरण। गुरूचि श्रेष्ठ म्हणोनियां।।९८।। असो आतां केशवाश्रम-। सद्गुरुस्वामी यांनीं परम। उत्कृष्ट जनांसी लावुनी प्रेम। अवतारसमाप्ति केली पैं।।९९।। शके सत्राशें सातांपासुनी। पंचेचाळवरी तयांनीं। निजभक्तांस्तव जगीं राहुनी। स्वधर्मराज्य चालविलें।।१००।। पुढील अध्यायीं षष्ठ आश्रम। 'वामनाश्रम'- स्वामी हें नाम। धरोनि चालविती स्वधर्म-। राज्य सारस्वतवृंदाचें।।१०१।। त्यांचीही महिमा अगाध। तीही बोलूं प्रेमास्पद। ऐकतां होईल आनंद। भाविक भक्तांलागीं पैं।।१०२।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ एकचि खास। यांच्या कृपाप्रसादेंचि एकविंश। अध्याय गुरुदासें संपविला।।१०३।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां भ्रम होईल दूर। एकविंशाध्याय रसाळ हा।।१०४।। अध्याय २१।।ओंव्या १०४।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति एकविंशोऽध्यायः समाप्तः।।

तुमचें न होय वाईट कांहीं। गुरुभक्ति तुमची खरी पाहीं।।
व्यर्थ न होय ती कदापिहीं। अणुमात्र ज़री चुकतांची।।

संपलें आमुचें अवतारकार्य। आम्ही पहातो आमुचा ठाय।
देतों तुम्हां आतां अभय। प्रारब्ध न चुके कवणाही।।

- श्रीमत् वामनाश्रम स्वामीजी

परमपूज्य वामनाश्रम स्वामिजींची समाधि, मंगळूर

श्रीसमाधिमठ, मंगळूर

श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीवामनाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय षष्ठ वामनाश्रमा। कैसें गाऊं तुझिया नामा। अंतरी नसतां निर्मल प्रेमा। सांगें बा तूं मज़लागीं।।१।। मज़ एक असे संशय। चमत्कारिक नामाचा विषय। नामें होय पापक्षय।सहज़चि ज़ाण निर्मल तें।।२।। जेव्हां होय निर्मल मन। मग कैंचा संशय आन। निःसंशय होतां ज़ाण।प्रेम पूर्ण ये अंगीं ।।३।। देवा सद्गुरो तुझ्या नामेंचि। होय मति शुद्ध साची। मति शुद्ध न झालिया आमुची। केवीं ठसेल नाम मनीं।।४।। हेंचि कोडें असे गहन। परि नामेंचि होय सकल निरसन। नामावांचुनी आणिक साधन। नाहीं अन्य सुलभ पैं।।५।। नामें होय शुद्ध मति। तेव्हां ठसे प्रेम चित्तीं। प्रेमेंचि येई सद्गुरुमूर्ति। अंतःकरणीं दृढ बापा।।६।। ऐशी तुझ्या नामाची महिमा। कैसी वर्णावी न कळे आम्हां। तूंचि वदवीं वामनाश्रमा। सद्गुरो स्वामी दयाळा।।७।। आतां देवा षष्ठ भक्ति। 'वंदन' हेंचि देईं चित्तीं। ऐसी प्रार्थना चरणांप्रती। करितो दास हा पाहीं।।८।। आठवा आतां तुम्ही सज्जन। मागील अध्यायीं केलें निरूपण। मंगळूर-ग्रामींचा भक्त ज़ाण। उद्धरिला केशवाश्रम-स्वामींनीं।।९।। आतां परिसा षष्ठ आश्रम। स्वामी सद्गुरु वामनाश्रम। असती ज़े सद्गुणग्राम। त्यांची महिमा सांगूं पैं।।१०।। दया-क्षमा-शांति अंगीं। असुनी, असती परम विरागी। निजात्मसुखभोक्ते योगी। निष्कपट प्रेमळ कनवाळू।।११।। आपुलें चित्त सारा दिवस। घालिती परमार्थीं विशेष। मठाच्या व्यवहारीं न देती लक्ष। कासया आम्हांसी म्हणोनि।।१२।। शुक्लभट्ट यांच्या कुळींचा। मणेगार होता मठाचा। त्याकडेच अधिकार साचा। सोंपविला स्वामींनीं त्या काळीं।।१३।। ऐसे लोटतां कांहीं दिन।

खर्च अधिकचि मठालागून। झाला ऐसें लोकांनीं ज़ाणून। उद्विग्न ज़ाहले ते बहु।।१४।। मग सकल भक्त मिळोनि। मणेगारासी पाचारूनि। पुसते झाले त्यालागोनि। दाखवा आम्हांसी ज़माखर्च।।१५।। तेव्हां दावाया ज़माखर्च। कबूल न होय मणेगार साच। बैसला स्वस्थ अनिर्वाच्य। स्थिती झाली तयाची।।१६।। ऐसें व्हावया काय कारण। मंदमति असे तो पूर्ण। यावीण नसे आणिक दुर्गुण। खचितचि ज़ाणा निर्धारें।।१७।। ज़माखर्च व्यवस्थित। ठेवितां दोष न येई त्याप्रत। परि ज़े कोणी दुर्लक्ष करीत। शब्द ठेविती त्यांवरी।।१८।। असो यापरी भक्तजनांसी। विपरीत वाटलें त्याच्याविषीं। तेव्हां विचार केला आपापसीं। शिष्य-स्वीकार करवावा।।१९।। आणि त्या शिष्याकडे सर्व। मठाचें आधिपत्य आणि देवघेव। अर्पावी, ऐसा करोनि ठराव। लागले ते शिष्य शोधाया।।२०।। वामनाश्रम-सद्गुरुस्वामी। न देती लक्ष मठाच्या कामीं। म्हणोनि सकलांनीं अंतर्यामीं। योज़ुनी विचार केला हा।।२१।। आणि केली प्रार्थना तेव्हां। म्हणती शिष्य-स्वीकार करावा देवा। इतुक्यामाजीं गेले गांवा। मंगळूर-ग्रामीं श्रीस्वामी।।२२।। कांहीं दिन राहुनी तेथ। जनांसी बोधुनी तोषविलें बहुत। मग निघाले तेथूनि शांत। सद्गुरु माउली ती पाहीं।।२३।। परिवारसहित विठ्ठल- ग्रामीं। 'अनंतेश्वर' ऐशा नामीं। देउळीं उतरले सद्गुरुस्वामी। भक्तोद्धारालागीं पैं।।२४।। परिवारासंगें आला एक। मंगळूराहुनी परम सुरेख। मुलगा उत्तमलक्षणी देख। तेज विलसे मुखावरी।।२५।। तो कोण कुठील मुलगा। हे सांगूं तुम्हां आतांचि गा। नका करूं श्रोते हो दंगा। तुम्ही प्रेममदानें।।२६।। सांगतों आतां ऐका प्रेमळ। वृत्तांत मुलाच्या तो सकळ। ऐकतां मन होईल निर्मळ। भाविक भक्तजनांचें।।२७।।

मंगळूर-ग्रामीं होता एक। सारस्वत चिटणीस देख। परम सद्गुणी आणि भाविक। नाम तयाचें 'देवप्पय्या'।।२८।। त्याच्या गृहीं 'परमेश्वर'। या नामें एक परम सुंदर। भाविक सुलक्षणी चतुर। गरीब मुलगा होता पैं।।२९।। तो एक नगरकुळींचा। गरीब बिचारा होता साचा। राहिला चिटणीस देवप्पय्याच्या। गृहीं चाकरी करीत।।३०।। ऐसें असतां एके दिनीं। देवप्पय्या यांच्या सदनीं। आला मलबार देशाहुनी। प्रख्यात एक ज्योतिषी।।३१।। तया समयीं परमेश्वर। याज़कडोनि देवप्पय्या थोर। पाय आवळोनि घेतां, सत्वर। देखिलें ज्योतिषी यानें पैं।।३२।। पाहिलें त्यासी न्याहाळुनी। भविष्य ज़ाणिलें अंतःकरणीं। तेव्हां बोले मधुर वचनीं। देवप्पय्यालागीं तो।।३३।। अहो तुम्ही ऐका वचन। ह्या सुलक्षणी मुलाकडोन। सेवा करवूं नका हीन। काय कारण सांगूं तें।।३४।। याच्या मुखावरी खास। राजचिन्हें दिसती विशेष। म्हणोनि सन्मान द्यावा यास। ऐसें वाटतें मज़लागीं।।३५।। ऐकतां ज्योतिषाचें उत्तर। देवप्पय्याचें कळवळलें अंतर। म्हणे म्यां अपराध केला थोर। अज्ञानपणें ऐसा हा।।३६।। मग त्यानें परमेश्वरासी। ठेवुनी घेतलें सन्मानेंसीं। ही कथा अद्भुत परियेसीं। पुढें समज़ेल सकलांतें।।३७।। ऐसा तो मुलगा परमेश्वर। सद्गुरुपरिवारासमेत सत्वर। येऊनि राहिला देउळामाझार। शांत सद्गुणी सुंदर तो।। ३८।। तेव्हां तेथील अर्चक थोर। परमभाविक आणि चतुर। श्रीस्वामी- मठाचा भक्त साचार। होता ते वेळीं त्या स्थानीं।।३९।। त्या मुलाची मुखचर्या। अति सुलक्षण पाहूनियां। म्हणे मानसीं स्वामींच्या ठाया। योग्य होईल हें पात्र।।४०।। ऐसा विचार करोनि मानसीं। बोलिला भक्तवृंदांपाशीं।

हें पात्र योग्य होय मठासी। पुढील स्वामी कराया।।४१।। याच्या मुखावरील बघतां लक्षण । ब्रह्मज्ञान हा पावेल पूर्ण। म्हणोनि आमुच्या मठाकारण। हेंचि पात्र योग्य असे।।४२।। ऐसें बोलतां पुजारी ज़ाण। सर्वांसी आनंद ज़ाहला पूर्ण। वार्ता पसरली न लागतां क्षण। देशोदेशीं तेधवां।।४३।। तैसीच़ देवप्पय्यासी ज़ाण। ज्योतिष्यें सांगितली होती खूण। ऐशा या दोन्ही वार्ता मिळोन। पसरल्या सारस्वतवृंदांत ।।४४।। इकडे सद्गुरुस्वामी शिरालींत। माघारे आले स्वमठांत। गुंग होऊनि स्वस्वरूपांत। नित्यापरी राहिले।।४५।। तेव्हां करूनि सकलांनीं विचार। मुलासी आणोनि स्वामींसमोर। उभें करोनियां, थोर। प्रार्थना करिती प्रेमानें।।४६।। स्वामी सद्गुरो प्रभो देवा। शिष्य-स्वीकार आतां करावा। योग्य सुलक्षणी चतुर बरवा। उत्तम कुळींच़ा हा असे।।४७।। ऐसें बोलूनि सर्व कथा। त्या मुलाची सांगितली वार्ता। सद्गुरु म्हणती अवश्य आतां। करूं शिष्य-स्वीकार पैं।।४८।। मग करोनि सकल सिद्धता। शिष्य-स्वीकार करोनि भक्तां। तोषविलें जनांसी समस्तां। कनवाळू सद्गुरु-माउलीनें।।४९।। खचितचि असे सद्गुरुमाय। कनवाळू, यामाज़ीं नाहीं संशय। केवल जनहितार्थचि होय। जिणें त्यांच़ें निश्चयेंसीं।।५०।। हें कैसें तें सांगूं आतां। श्रोते हो दृढ करोनि चित्ता। परिसा तुम्ही तत्त्वतां। परम प्रीतीनें भाविक हो।।५१।। ज़री मज़सी नाहीं प्रेम। तरी आपुल्या प्रेमें होईल काम। म्हणोनि लागलों घेउनी गुरुनाम। ग्रंथकार्यालागीं पैं।।५२।। साधूंच़ा जन्म तो खचित। भक्तजनांच्या दैवेंच़ असत। म्हणोनि त्यांच्या उद्धारार्थ। देह झिज़विती परोपरी ते।।५३।। संन्यासधर्म महाकठीण।परि घेती जनांकारण। ते तरी अवतारिकचि पूर्ण-। ज्ञानी परम असती पैं।।५४।। त्यांसी कासया

संन्यासग्रहण। ते जीवन्मुक्तचि असती ज़ाण। परि करावया जनांचें कल्याण। सकल कार्य करिती पैं।।५५।। संन्यास घेतां कष्ट बहुत। हें असे सकलांसी विदित। ऐसें असतांही संन्यास घेत। बाळपणींच तोही पैं।।५६।। पहा कैसें तें सांगतों ऐका। आज़वरी आमुच्या मठांतरीं देखा। स्वामीं ज़ाहले ते निका। बालपणींच संन्यासी।।५७।। वय लहान ज़री होय। तरीही प्रवृत्त होती निर्भय। संन्यास घ्यावयालागीं सदय। बहुत आश्चर्य हें पाहीं।। ५८।। बहुत कासया बोलावें आतां। सहज़चि कळेल विचार करितां। जनांची प्रीति विषयीं तत्त्वतां। बंधन कवणासी नावडे हो।।५९।। त्यांतही बालकांलागीं देखा। विषयचि गोड वाटे सारिखा। अणुमात्र बंधन न सोसवे ऐका। कैसें तें सांगतों आतांचि।।६०।। ग्रहणादि नैमित्तिक दिवशीं। ग्रहण लागे तों खाती निश्चयेंसीं। बालबुद्धि म्हणोनि त्यांसीं। न आवरे मन तयांचें।।६१।। तैसेंचि ज़ाणा नानापरी। विषयींच प्रीति त्यांची सारी। हें सांगावें नलगे, ज़ाणतां अंतरीं। तुम्ही सकल श्रोते हो।।६२।। ऐसीं हीं तरुण बाळें। कैशीं संन्यास घेती निजबळें। निग्रहशक्ति कैशी ते वेळे। येते त्यांच्या अंगीं पैं।।६३।। यावरोनि ओळखावें आपण। कीं आमुच्या मठाचे स्वामी ज़ाण। केवळ निजभक्तांकारण। घेती संन्यास आवडीनें।।६४।। यावरी येईल थोर प्रश्न। बालवयांतचि जनांचें रक्षण। करावें ऐसें त्यांसी कोठून। उपज़े ज्ञान इतुकें हें।।६५।। तरी ऐका याचें उत्तर। स्वामी सद्गुरु ज़े नव्हती नर। साक्षात् परमेश्वराचा अवतार। जगदोद्धाराकारणें।।६६।। म्हणोनि श्रीसद्गुरुस्वामी। जगाच्या कल्याणा शिराली-ग्रामीं। संन्यास घेउनी राहती नेहमीं। बंधन सोसुनी सकलही।।६७।। पुनःपुन्हां नको उलगडा । दुज़ा त्रास ना संन्यासाएवढा। आमुच्यासाठींच ऐसा खोडा।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

अडकवूनि घेतला मठाचा।।६८।। मठाचा खोडा कैसा येविषीं। मागें सांगितलें तुम्हांसी। पुढेंही विवरण करूं परियेसीं। सद्गुरुकृपेंचि ज़ाणा हो।।६९।। असो ऐसा सद्गुरु दयाळ। तोचि जनांसी उद्धरील। ऐसा निश्चय धरोनि निश्चल। धरावे चरण त्याचेचि।।७०।। त्यांचा बोध धरावा मानसीं। तरीच उद्धार होईल येविषीं। संशय नाहीं सांगतों तुम्हांसी। ऐका चित्त देऊनियां।।७१।। ज़ें कार्य जयापाशीं। ज़ातां होय आपुलें परियेसीं। त्याकडेचि ज़ावें निश्चयेंसीं। तेव्हांच साधेल कार्य तें।।७२।। ज्यासी कळे अमुक विद्या। तोचि दुज्यांसी शिकवी सदा। त्याच्याचि लागतां फंदा। कळेल आपणासी ती पाहीं।।७३।। तैसें येथें स्वामी गुरुवर। ब्रह्मविद्या ज़ाणे समग्र। म्हणोनि त्यासीच ज़ावें शीघ्र। शरण आपण अज्ञजनें।।७४।। तोचि आमुचा हितचिंतक। त्याहुनी जगीं कुणीही आणिक। नसे निश्चयें हितेच्छु देख। पुढील अध्यायीं तें सांगूं।।७५।। असो परिसा वामनाश्रम। स्वामी सद्गुरु गुणग्राम। पुरविते झाले भक्तकाम। शिष्य-स्वीकार करोनियां।।७६।। शके सत्राशें सत्तावन। मन्मथ-संवत्सर फाल्गुन। वद्य दशमी दिवशीं ज़ाण। केला शिष्य- स्वीकार पैं।।७७।। 'कृष्णाश्रम' नामाभिधान। देते ज़ाहले शिष्यासी आपण। पुष्पवृष्टी करिती वरून। सुरवर परम आनंदें।।७८।। जयजयकार करिती नर। टाळ्या पिटिती वारंवार। थै थै नाचती प्रेमपुरःसर। मनामाजीं उल्हासें।।७९।। नानापरी करोनि उत्सव। समाधान पावती सर्व। ठेविती गुरुचरणीं दृढभाव। नरनारी भाविक ज़े।।८०।। पुढील अध्यायीं कथा रसाळ। वामनाश्रम यांचें प्रेमळ। वर्तन जन्मवरी समूळ। हेंचि वर्णन करूं सारें।।८१।। आणिक समाधि घेती सघन। तेव्हां कांहीं चमत्कार दावून। करिती जनाचें अंतःकरण। सद्गुरु-

चरणीं दृढतर ते।।८२।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ महेश। यांच्या कृपाप्रसादें द्वाविंश। अध्याय गुरुदासें संपविला।।८३।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां होय निर्भय थोर। द्वाविंशाध्याय रसाळ हा।।८४।। अध्याय २२।। ओंव्या ८४।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति द्वाविंशोऽध्यायः समाप्तः।।

ॐ परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

।। श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।।श्रीवामनाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय सद्गुरो दयाघना। नाहीं स्थिरता माझिया मना। कृपा करोनि उद्धरा ज़ाणा। दीन-दासालागीं पैं।।१।। तुज़ म्हणती भक्तवत्सल। तरी कां न पावसी ये वेळ। न स्फुरे म्हणुनी तळमळे बाळ। ग्रंथ लिहायालागीं पैं ।।२।। ऐशा समयीं तूं बा देवा। न येतां तरी कैसी सेवा। करूं ज़ाण करुणार्णवा। सांगें मज़ला गुरुनाथा।।३।। तुंवा स्फुरविल्यावांचोन। मी काय करूं कवन। कर्ता करविता तूंचि असोन। व्यर्थ अभिमानें हुंबरतों।।४।। 'मी कर्ता' ऐशी भावना। आहे म्हणोनि भाकितों करुणा। 'तूंचि स्फुरवीं' ऐसिया वचना। घडीघडी बोलिलों अज्ञानें।।५।। कर्ता करविता तूंचि असुनी। मी कासया प्रार्थावें चरणीं। तव कृपेवीण कांहींही करणी। न घडे ज़ाण सर्वथा।।६।। ऐसें असतां अज्ञपणें बा। 'मीपणा' करोनि उभा। भाकितां करुणा नाहीं शोभा। खचितचि ज़ाण निर्धारें।।७।। असो ताता सद्गुरुनाथा। तूंचि तोडीं माझी अहंता। तुज़हुनी भिन्न ना मी सर्वथा। ऐसें ज्ञान दे मज़ला।।८।। जेथें नाहीं 'मीतूं'पण। तेथें कर्ता करविता कोण। अवघें ब्रह्मचि परिपूर्ण। ओतप्रोत भरलें पैं।।९।। इतुकीच़ बापा करीं करुणा। आणिक न मागें दयाघना। सारें ब्रह्म दावीं नयना। प्रभो गुरुराया जगदीशा।।१०।। असो आतां परिसा सज्जन। मागील अध्यायीं केलें कथन। वामनाश्रमस्वामींच़े सद्गुण। आणि शिष्यस्वीकार तो।।११।। आतां ऐका सावधान। आणि सद्गुणांच़ें वर्णन। वामनाश्रमस्वामी सघन। यांच़ें ज़ाण सकलही।।१२।। सारें चरित्र कराया कथन। लिहाया न पुरे मेदिनी ज़ाण। अणुमात्रचि आतां करूं वर्णन। अवधारा चित्त देऊनियां।।१३।। श्रीस्वामी 'वामनाश्रम'। ऐसें

घेउनी कलियुगीं नाम। साक्षात् अवतरे श्रीरघुराम। आनंदधाम तें एक।।१४।। कैसें होय आनंदधाम। हें कळेल भज़तां निष्काम। कां न कळे भज़तां सकाम। ऐसा प्रश्न उद्धवे पैं।।१५।। ऐका त्याचें उत्तर आतां। स्थिर करोनि आपुल्या चित्ता। अंतरीं कामना धरोनि भज़तां। मनासी तळमळ सततचि।।१६।। ज़री गेलों संनिधीं आपण। बहुत तळमळे आपुलें मन। कैसें माझें कार्य ज़ाण। होईल ऐसें म्हणोनि।।१७।। कामनेसी नाहीं तूट। मरे तोंवरी न येई वीट। सदा करीतसे वटवट। अमुक पाहिजे म्हणोनि।।१८।। ज़री न होय कार्य सफल। तरी मानसीं करी तळमळ। ऐसियासी कैसें समज़ेल। आनंदधाम सद्गुरु हें।।१९।। ज़ो असे निष्काम भक्त। तो होय परम विरक्त। तेव्हां तेथें कैचा होय आसक्त। विषयांमाजीं तो ज़ाण।।२०।। ज्याच्या चित्तीं नाहीं विषय। त्यासी सदा सुखचि होय। ऐसियासी सद्गुरु सदय। आनंदधाम सहज़ कळे।।२१।। आनंदधाम यामाजीं नाहीं। संशय तिळभरी खचितचि पाहीं। आनंदाची मूर्तिच सर्व ही। आनंदचि त्या भासतसे।।२२।। त्यांसी नाहीं सुखदुःख। केवळ निजानंदीं निमग्न देख। म्हणोनि सद्गुरु आनंदाचें एक। सदन सुरेख तें ज़ाण।।२३।। त्यांसी भज़तां भक्तजनांसी। सुखदुःख तिळमात्र न होय मानसीं। ऐसी माउली ही परियेसीं। वामनाश्रम स्वामी पैं।।२४।। कवणही येतां संनिध। प्रेमें बोलती करुनी बोध। ज़री केला कुणींही अपराध। ना क्षोभती तयावरी।।२५।। परम सात्त्विक आणि चतुर। सूक्ष्म विचार करिती थोर। कवणाचेंही न दुखविती अंतर। ऐसी सद्गुणखाणी ती।।२६।। ऐसें असतां मंगळूर-ग्रामीं। नेले बोलावुनी सद्गुरुस्वामी। आनंदले जन अंतर्यामीं। गुरुशिष्यमूर्ति बघोनियां।।२७।। जनांची भक्ति वाढली

थोर। भज़ती स्वामींसी निरंतर। ऐसे असतां सुखानें समग्र। अपूर्व चमत्कार वर्तला।।२८।। श्रीस्वामीसद्गुरूंचें आगमन। होउनी झ़ाले कांहीं दिन। तेव्हां सर्व भक्त मिळोन। करिती विचार आपसांमध्यें।।२९।। कीं मठाचे आधिपत्य सकल। कृष्णाश्रमस्वामी वेल्हाळ। यांच्या हातीं येतां येवेळ। उत्तम कार्य होईल पैं।।३०।। वामनाश्रम-सद्गुरुनाथ। लक्ष न देती कांहीच येथ। म्हणोनि विचार करोनि समस्त। गेले भेटीसी स्वामींच्या।।३१।। प्रार्थना करिती मधुरवचनें। म्हणती देवा तव कृपेनें। सर्व कार्य बरवेंचि होणें। उणीवता ना अणुमात्र।।३२।। परि असे आमुची प्रार्थना। येते आम्हां एक कल्पना। मठाचें आधिपत्य ज़ाणा। कृष्णाश्रमांसी सोंपविणें।।३३।। तयांज़वळी देतां होय। अनुभव, होउनी पुढें कार्य। नेटकें कराया त्यांसी वेळ काय। ऐसें वाटतें आम्हांसी।।३४।। ऐसें भक्तांचें वचन। स्वामींसी मानवलें नाहीं ज़ाण। मनामाजीं ज़ाहले खिन्न। बहुत उद्विग्न होती ते।।३५।। हातामाजीं होती किल्ली। एकीकडे ती फेंकूनि दिधली। देवीची प्रार्थना आरंभिली। दीर्घस्वरें प्रेमानें।।३६।। महादेवी परमेश्वरी। भगवती तूं गुणसुंदरी। बालकावरी कृपा करीं। नेईं मज़ला येथोनि।।३७।। मी येथें ज़गोनि काय। उपयोग होईल सांगें तूं माय। संपलें आमुचें सर्व कार्य। येतों आतां तव चरणीं।।३८।। ऐसें बोलतां स्वल्पचि दिन। न गेले इतुक्यामाजीं ज़ाण। देवी आली स्वामींलागून। ज्वर अपार आला पैं।।३९।। तेव्हां जनांसी लागली चिंता। वचन असत्य न होय सर्वथा। काय चमत्कार दाविला भक्तां। ऐसें परस्पर बोलती।।४०।। कुठे कांहीं नाहीं देवी। खेड्यांत अथवा संनिध गांवीं। यांच्याकडेच येउनी दावी। प्रभाव आपुला प्रेमानें।।४१।। यावरोनि कळलें सकलां। स्वामींचाचि खेळ

हा आपुला। दाविती जनांसी करुनी लीला। म्हणोनि आश्चर्य वाटलें त्यां।।४२।। आणि म्हणती एकमेकांसी। आमुचाचि अपराध थोर परियेसीं। ऐसें म्हणोनि लागले गुरुचरणासी। क्षमा करीं म्हणताती।।४३।। यावरी बोलती कृपाघन। भिऊं नका तुम्ही भक्तजन। यांत कवणाचाही अपराध न। ज़ाणा तुम्ही खचितचि हो।।४४।। संपलें आमुचें अवतारकार्य। आम्ही पहातों आमुचा ठाय। देतों तुम्हां आतां अभय। प्रारब्ध न चुके कवणाही।।४५।। तुमचें न होय वाईट कांहीं। गुरुभक्ति तुमची खरी पाहीं। व्यर्थ न होय ती कदापिही। अणुमात्र ज़री चुकतांचि।।४६।। पहा साधूंचें कैसें अंतर। ज़री अपराध महाथोर। तरीही न क्षोभती त्यांच्यावर। अधिकचि प्रेम करिती ते।।४७।। आतां श्रोते करितील प्रश्न। कासया तरी क्षोभले दारुण। देवीकडे बोलिले वचन। नेईं त्वरेनें म्हणोनि।।४८।। ऐका तरी त्याचें उत्तर। मनुष्य नव्हती स्वामी साचार। तयां कैंचा क्षोभ अनिवार। सांगा येईल कोठोनि।।४९।। जनांसी शिकवायाकारण। दाविती वरिवरी कोप दारुण। तैसें वामनाश्रमगुरूंनीं ज़ाण। क्षोभुनी दाविलें जनांसी कीं।।५०।। आतां म्हणाल काय थोर। अपराध केला सांगा सत्वर। तरी ऐका तुम्ही श्रोते चतुर। भाविक आणि सज्जन हो।।५१।। बुद्धयाच न केला अपराध। झाला तो अज्ञपणें शुद्ध। अविचारें होउनी बुद्धिमंद। केला घोर अन्याय।।५२।। सद्गुरुस्वामी महाथोर। असे त्यांसी श्रेष्ठ विचार। ते ज़ें करिती कार्य समग्र। तें सारासार पाहुनीच।।५३।। त्यांच्या कार्यामाजीं केवळ। आपण न करावी ढवळा-ढवळ। तरीच तें कार्य सफळ। होईल ज़ाणा निर्धारें।।५४।। ऐसें असतां भक्तजनांनीं। मणेगाराची पाहूनि करणी। द्यावें म्हणती आधिपत्य झणीं। कृष्णाश्रमस्वामींज़वळीं।।५५।।

शुक्लभट्ट मणेगाराज़वळी। व्यवस्था सारी कोणीं सोंपविली। चतुर आपुली सद्गुरुमाउली। हिचेंचि कार्य सकल तें।।५६।। सद्गुरु ज़ें करिती कार्य। तेणें जगाचें हितचि होय। ऐसें असतां घेणें संशय। हाचि अपराध भक्तांचा।।५७।। परि तो अपराध प्रेमयुक्त। हें श्रीस्वामींसी असे विदित। तोही न घडावा किंचित। म्हणोनि दाविला चमत्कार।।५८।। ज़ाणोनि सकल पुढील भविष्य। प्रार्थिलें जनांसमक्ष देवीस। त्यांच्या मानसीं अपराध विशेष। यावा ऐशा हेतूनें।।५९।। परि अंतरीं नाहीं क्षोभ। म्हणती मानसीं भक्त दुर्लभ। मी भक्तप्रेमाचा वल्लभ। मज़हुनी भिन्न ना भक्त।।६०।। यापरी सद्गुरुस्वामीराय। केला ज़री भक्तांनीं अन्याय। तेथें दुर्लक्ष करिती सदय। न क्षोभले अंतरीं किंचितही।।६१।। बालक असे उत्कृष्ट बहुत। परि त्याच्या अंगीं दुर्गुण किंचित। देखतां तयासी ताडण करीत। तरी अंतर-प्रेम खंडेना।।६२।। आणिकही आपुला बाळ। गुणी व्हावा म्हणोनि वेल्हाळ। बोले भेडसावुनी येवेळ। टाकुनी तुम्हां ज़ात्यें मी।।६३।। ऐसें बोलुनी ती जननी। ज़ात्ये माहेरीं मुलासी सोडुनी। परि वेगळा भाव असे मनीं। दावी वरीवरी कोप तया।।६४।। ज़ावयाचें होतें काज़चि म्हणुनी। गेली मुलासी लटिकें सांगुनी। तैसें वामनाश्रमस्वामींनीं। केलें जनांसी दावाया।।६५।। परि अंतरीं जनांचें हित। व्हावें ऐसाचि असे हेत। हितचि चिंतिती म्हणोनि त्यांप्रत। 'हितचिंतक' म्हणती पैं।।६६।। विकारी संवत्सर कार्तिकमासीं। वद्य नवमी ऐशा दिवशीं। शके सतराशें एकसष्ठ या वर्षीं। ज़ाहले मुक्त श्रीस्वामी।।६७।। तेव्हां तेथेंचि मंगळूर-ग्रामीं। समाधि दिधली परम नामी। बघतां आनंद अंतर्यामीं। तेथील जनांसी होय सदा।।६८।। तेथील लोकांचें पुण्य बहुत। म्हणोनि मुक्त ज़ाहले

तेथ। दर्शन घडे समाधीचें सतत। तेथील भाविक भक्तजनां।।६९।। काय लीला तया स्वामींची। कुठेंही नसतां देवी साची। करुणा भाकितां स्वामींनीं तिची। आली धांवूनि तात्काळ।।७०।। कवणालाही न येतां देवी। स्वामींची आज्ञा मान्य करावी। म्हणोनि घेउनी त्यांसी बरवी। गेली आपुल्या स्थानासी।।७१।। पुनरपि न आली कवणासीही। तेव्हां आश्चर्य करिती सर्वही। श्रीसद्गुरु-स्वामींची नवलाई। नाहीं संशय यामाजीं।।७२।। एवं सद्गुरु-स्वामींसन्मुख। न दावावा आपुला विवेक। ते ज़े सांगती तेंचि एक। करावें आपण भक्तजनें।।७३।। असो यावरी तेथील जनांनीं। समाधि देतां विधियुक्त त्यांनीं। प्रायश्चित्त हवनादि करोनि। शहाळ्यांचा अभिषेक केला पैं।।७४।। आणूनि शहाळीं जनांनीं अमित। अभिषेक केला समाधीवरी तेथ। आणिक प्रार्थना करिती बहुत। परम प्रीतीनें ते पाहीं।।७५।। अद्यापिही जन कित्येक। नवस करिती तेथें सुरेख। विशेष कार्यालागीं देख। शहाळ-अभिषेक करिती पैं।।७६।। तेव्हां त्यांचें कार्य सफल। निश्चयानें होतें समूल। हा नव्हे लटिका बोल। बघावें करोनि विश्वासें।।७७।। कवणाही येतां आपत्काल। समाधीसन्मुख सुंदर सोज्ज्वळ। नंदादीप ठेविती निश्चल। नवस करोनि त्या काळीं।।७८।। तेव्हां त्यांचे सारे कष्ट। क्षण न लागतां होती नष्ट। यावरी असे एक गोष्ट। पुढील अध्यायीं सांगूं ती।।७९।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ एकचि खास। यांच्या कृपाप्रसादें त्रयोविंश। अध्याय गुरुदासें संपविला।।८०।।स्वस्ति श्रीचित्रापुर-।गुरुपरंपराचरित्र सुंदर।ऐकतां नासे विषयेच्छा थोर।त्रयोविंशोऽध्याय रसाळ हा।।८१।। अध्याय २३।। ओंव्या ८१।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति त्रयोविंशोऽध्यायः समाप्तः।।

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीवामनाश्रमस्वामीगुरुभ्यो नमः ।। श्रीभवानीशंकराय नमः।। ॐ।। जय जया श्रीवामनाश्रमा। धरितां मानसीं तुझ्या नामा। ठाव न मिळे विषयकामा। ऐशी महिमा चरणाची।।१।। पुरे पुरे चरणचि एक। न लागती साधनें आणिक। सच्चित्सुखासी पोंचाया देख। वाट सुरेख हीच पैं।।२।। कैसे धरावे तुझे चरण। हेंचि न कळे मज़ला ज़ाण। परि आठवतें एक वचन। साधुसंतांचें बा देवा।।३।। सद्गुरु-आज्ञा करितां पालन। मोक्ष होय आपुल्या आधीन। तेव्हां केवीं होतील चरण। दूर ज़ाण मज़लागीं।।४।। गुरु-आज्ञेहुनी श्रेष्ठ आणिक। नाहीं अन्य साधन देख। तीचि घट्ट धरितों एक। सद्गुरुनाथा दयाळा।।५।। तुझ्या आज्ञेमाजीं आन। वस्तु नाहीं तुज़वांचोन। जगामाजीं तूंचि पूर्ण। भरला अससी व्यापक पैं।।६।। आज्ञा म्हणजे तुझें वचन। गोड तेंचि अमृताहून। त्यांत ब्रह्मानंदरस पूर्ण। भरला ज़ाण निश्चयेंसीं।।७।। ऐसी ती आज्ञा न केलिया मान्य। सारें जग दिसेल शून्य। म्हणोनि नको मज़ला अन्य। आज्ञेविण सर्वथा।।८।। तीचि एक करितां पालन। सर्वत्र दिसेल सच्चिदानंदघन। आतां देवा बालकालागून। आज्ञा-उल्लंघन नच करवीं।।९।। वेडे वांकुडे बोलिलों शब्द। कवणाही न होय त्याचा बोध। परि माझी माउली शुद्ध। ज़ाणेल सर्व मम हेतु।।१०।। बालक बोले बोबडे बोल। ते अन्यासी सर्वही फोल। मातेसी कळे आपुलें बाळ। काय बोले म्हणोनियां।।११।। तैसी तूं मम प्रेमळ माय। तुज़ सर्व विदित होय। आतां देउनी मज़ला अभय। उद्धरीं गे करुणाळे।।१२।। असो आतां ऐका सज्जन। मागील अध्यायीं केलें कथन। वामनाश्रमस्वामी सघन। यांनीं घेतली समाधि।।१३।। दावुनी जनांसी चमत्कार। गेले आपुल्या स्थानीं सत्वर।

परि राहिले येथेंचि सुंदर। कीर्तिरूपें जगांत।।१४।। ज़री घेतली त्यांनीं समाधि। तरीही महिमा न ज़ाय कधीं। सांगूं आतां तुम्हां आधीं। तेचि कथा परिसा हो।।१५।। वामनाश्रमस्वामींची समाधि। येथें प्रार्थितां परमावधि। झणींच़ कार्य होय तें आधीं। काय तें सांगूं आतांचि।।१६।। बंटवाळ या ग्रामामाजीं। लाभादाय रामरावजी। सब-रजिस्ट्रार होता सहजीं। परम भाविक तो पाहीं।।१७।। त्या काळीं कल्ले मंजनाथय्या। नामें दस्तलेखक त्या समया। सारस्वत बंटवाळ ग्रामीं या। होता एक सज्जन पैं।।१८।। त्यापासून एक हविक ब्राह्मण। दस्तऐवज़ घेत लिहून। तो नोंद करावयालागून। दिला तालुक- कचेरींत।।१९।। ऐसा तो दस्तऐवज़ कागद। लाभादाय रामरावासंनिध। आला करावयासी नोंद। फिरलें प्रारब्ध रामरायाच़ें तैं।।२०।। कायद्यापरी रामराय। च़ौकशीपूर्वक करी कार्य। 'रजिस्टर' करूनि देय। हविक ब्राह्मणालागीं पैं।।२१।। त्या ब्राह्मणाच्या भार्येनें। केला पतिसह कागद कपटानें। मंजनाथय्या हें नेणे। फसला रामरायही त्यामुळें।।२२।। रामराव आणि मंजनाथय्या यांनीं। केला खोटा कागद सामील होउनी। ऐसें एकानें मॅजिस्ट्रेटालागुनी। कळवुनी फिर्याद गुदरली।।२३।। त्यानें 'डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट'। यांच्याकडे खटला पाठविला थेट। मॅजिस्ट्रेटें विचार करूनि झ़टपट। पाठविला तो सेशन-कोर्टासी।।२४।। आरोपींसी एक श्रेष्ठ वकील। तेंवींच़ कांहीं जन सुशील। ज़ामीन व्हाया सिद्ध झ़ाले ते वेळ। नाहीं गुन्हा हें समज़ोनि।।२५।। परि मॅजिस्ट्रेट जज्ज हे अधिकारी। सोडुनी द्यावया त्यां ज़ामिनावरी। कबूल नच होती अंतरीं। गुन्हेगार त्यां मानुनी।।२६।। ही वार्ता पसरली जनांमाजीं। बोलती जेथें तेथें तयावीण न दुजी।

म्हणती परमेश्वराची मर्जी। कोण हें संकट ओढवलें।।२७।। ऐसे हळहळती सारस्वत जन। त्या समयींच़ स्वामी दयाघन। पांडुरंगाश्रम तेथें ज़ाण। मंगळूर-ग्रामीं होते पैं।।२८।। वामनाश्रमस्वामीराय। यांच्या समाधीसंनिध सदय। राहिले होते तेचि समय। खटला होता यांच़ा तैं।।२९।। असो मग हे आरोपी ज़ाण। भवानीशंकर-देवालागुन। प्रार्थना करुनी मग तेथोन। येती स्वामीसंनिधानीं।।३०।। पांडुरंगाश्रमस्वामींप्रत। सांगती सकल वृत्तांत। आणि घातलें दंडवत। नम्रभावेंकरोनियां।।३१।। तेव्हां स्वामी सद्गुरुनाथ। वामनाश्रमस्वामी यांसी प्रार्थित। म्हणती आरोपियां देवा त्वरित। संकटमुक्त करावें।।३२।। आणिक तेथ करविती सेवा। आरोपी म्हणती वामनाश्रमदेवा। दयासागरा करुणार्णवा। रक्षीं रक्षीं आम्हांसी।।३३।। तूंचि आम्हां बालकांलागीं। कृपा करोनि रक्षावें वेगीं। तुज़वांच़ोनि अन्य ना जगीं। भक्तवत्सला गुरुराया।।३४।। तूं रक्षिलें बहुत जनांसी। तैसेंच़ आतां रक्षावें आम्हांसी। ज़री आम्ही अज्ञ पापराशी। तरी नच आम्हांसी टाकावें।।३५।। ऐशियापरी करुनी प्रार्थना। नंदादीप ठेविती ज़ाणा। शहाळ्यांच़ा अभिषेक आणि नाना। उपचारें पूजा करिती पैं।।३६।। ज़री घेतली त्यांनीं समाधि। कृपा त्यांची नच ज़ाय ती कधीं। कैसें तें परिसा सांगूं आधीं। चित्त एकाग्र करूनियां।।३७।। पहा रेडिओमाजीं ज़ाण। नानापरी ऐकतों आपण। वाद्यें कीर्तन गायन। मुंबई कलकत्ता येथीलही।।३८।। ज़ो करितो तेथें गायन। तो न दिसे डोळियालागुन। परि ऐकूं येत स्पष्टकरोन। गान आणि वार्ता नानाविध।।३९।। ज़री तो मनुष्य न दिसे येथ। तरी तो गातो हें असे सत्य। हवेंतुनी ऐकूं येती त्वरित। शब्द सारे आपुल्यासी।।४०।। शब्द

हा आकाशाचा गुण। म्हणोनि निघे पोकळींतून। परि असावें यंत्र शुद्ध पूर्ण। तरीच ऐकूं येई झणीं।।४१।। तैसें येथ सद्गुरुनाथ। ज़री न दिसले आम्हांप्रत। त्यांची कृपा असे सतत। जिकडे भक्त तिकडे पैं।।४२।। रेडियो नसतां शब्द नायके। भक्त नसतां कृपा न फांके। ज़री भावना-यंत्र अणुमात्र चुके। तरी न होय ती कृपा कधीं।।४३।। ज्यासी रेडियोची पूर्ण माहिती। त्यासीच दावितां यंत्रें सारीं तीं। दुरुस्त होती निश्चितीं। मग ऐकूं येत गायनादि।।४४।। तैसें येथें ज़े सत्पुरुष। भावना दृढ करिती बहुवस। मग होय कृपा खास। सद्गुरुनाथ यांची पैं।।४५।। काढुनी 'संशय-व्हॉल्व' वाईट। 'निश्चय-व्हॉल्व' घालोनि बळकट। भावना-यंत्र करिती नीट। भक्तहृदय-रेडियोचें।।४६।। तेव्हां कृपा होय झडकरी। सकाम-निष्काम भक्तांवरी। देह त्यांचा न दिसे ज़री। कृपा होय सहज़ पहा।।४७।। तेव्हां कार्य होय सहज़। इच्छित असे ज़ें भक्तकाज़। ऐसा तो सद्गुरुराज। काय वर्णूं महिमा ती।।४८।। जेथ येईल भक्तां संकट। तेथ धांव घेती ते थेट। निवारण करिती झटपट। नाहीं संशय यामाजीं।।४९।। तेवींच श्रीपांडुरंगाश्रम। रामराव-मंजनाथय्या यांचें प्रेम। बघुनी उत्तेजन देती परम। समाधिसेवा करावया।।५०।। तेणेंपरी करोनि सेवा। कृपा संपादिली धरूनि भावा। आणि म्हणती तूंचि देवा। रक्षीं आम्हां गुरुराया।।५१।। असो तेव्हां आरोपी यांनीं। ज़ामिनावरी सोडावें म्हणुनी। केलें 'अपील' हायकोर्टालागूनी। पोहोंचला गुरुदेव त्यालागीं।।५२।। तेव्हां हायकोर्टाहुनी। यांसी सोडावें ज़ामीन घेउनी। ऐसा हुकूम पाठविला तो झणीं। सद्गुरुकृपेंचि निर्धारें।।५३।। मग येथें चालविला खटला। डिस्ट्रिक्ट जज्जें सहजीं आपुला। आरोपियांवरी गुन्हा ठरविला। चमत्कार

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

काय तो ऐका।।५४।। आरोपी मानसीं करिती प्रार्थना। प्रभो स्वामी कृपाघना। विसरूं नको आम्हां ज़ाणा। वाहिला भार तुज़वरीच़।।५५।। ज़री करतील आम्हां कैद। तरी होय कीं तुज़ आनंद। पुत्रासी होतां अमर्याद। मातेसीच़ ती लाज़ खरी।।५६।। म्हणोनि देवा तूंचि आतां। धांवुनी येईं झडकरी ताता। ऐसें आळविती दोघेही गुरुनाथा। वामनाश्रमस्वामींसी।।५७।। तोंच़ काय वर्तलें ऐका। खटला च़ालिला असतां देखा। हायकोर्टाहुनी तार ती निका। आली अवचित न्यायाधीशा।।५८।। कीं कन्यानुरासी केली बदली। लगेच़ ज़ावें तुम्हीं त्या स्थळीं। ऐसा हुकूम आला ते वेळीं। न्यायाधीशासी अकस्मात।।५९।। तेव्हां न्यायाधीशानें त्यांसी। रिपोर्ट केला तेचि दिवशीं। कीं मी आतां कन्यानुरासी। ज़ावया प्रतिबंध एक असे।।६०।। महत्त्वाच़ा खटला हातीं। धरिला असे आम्हीं निश्चितीं। त्याच़ा पुरता विचार रीतीं। करोनि ज़ातों कन्यानुरा।।६१।। ऐसा रिपोर्ट हायकोर्टीं करित। त्यावरी तेथुनी पुनरपि त्वरित। तारेनेंचि हुकूम येत। काय तो परिसा श्रोते हो।।६२।। लगबगेंशीं ज़ावें तेथ। उशीर न करीं आतां त्वरित। ऐकुनी जन झ़ाले विस्मित। सारस्वत ब्राह्मण त्या समयीं।।६३।। मग खटल्याच़ें काम अर्धेंचि खास। टाकुनी तैसेंचि कन्यानुरास। मंगळुराहुनी न्यायाधीश। गेला लगबगें तात्काळ।।६४।। तेथें एक आला नवीन। न्यायाधीश मंगळुरीं ज़ाण। आरोपियांनीं तयालागुन। केली अर्जी त्या समयीं।।६५।। अर्जापरी तेव्हां ज़ाण। खटला-विचार प्रारंभापासून। नवीन न्यायाधीशें आपण। केला पुनरपि त्या समयीं।।६६।। तेव्हां तेथें कोर्टांतरीं। पुरावा दाखल झ़ाला त्यावरी। आरोपी निर्दोषी निर्धारीं।

ऐसें ठरविलें न्यायाधीशें।।६७।। आणि तयां दोघांलागुन। सोडिलें तत्काळ सन्मानेंकरून। आरोपियांसी आनंद पूर्ण। झाला हें सांगावें नलगेचि।।६८।। खटल्याचा निवाडा होतां पूर्ण। पुन्हां आधींच्या न्यायाधीशा ज़ाण। मंगळुरासी बदली करोन। पाठविलें तेथ तात्काळ।।६९।। आणि आला ज़ो नवीन जज्ज। त्यासी पाठविलें होतांचि काज़। दुज्या गांवीं धाडिलें सहज़। कैसा चमत्कार झाला पहा।।७०।। आरोपियां सोडावयाकारण । सद्गुरुनाथेंचि कृपा करोन। पाठविलें दुज्या न्यायाधीशालागुन। मंगळुरासी त्या काळीं।।७१।। इतुकेंचि नव्हे आणिक ऐका। स्वल्पदिन ज़ातां देखा। रामराव यालागीं निका। वरिष्ठ ज़ागा दिधली पैं।।७२।। सब्रजिस्ट्रार ज़ागेवरूनी। डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार करुनी। मंगळूर या गांवींच्य झणीं। केली बदली त्याची पैं।।७३।। पहा कैसा चमत्कार। साधुसंतांचा न लगे पार। म्हणोनि न म्हणावें त्यांसी नर। साक्षात् ईश्वर ते पाहीं।।७४।। असो आतां सद्गुरु सदय। वामनाश्रम यांचें हें कार्य। यामाजीं नाहीं संशय। ऐसें बोलती जन सारे।।७५।। आणिक हे आरोपी भक्त। त्यांसी वाटलें समाधान बहुत। नाहीं विसरले चरणांप्रत। श्रीस्वामींच्या ते पाहीं।।७६।। ऐकुनी वृत्तांत सकल सारस्वत। अहा गुरुदेवा ऐसें म्हणत। काय महिमा तुझी अद्भुत। न कळे ती कवणाही।।७७।। असो आतां ऐशा गुरुनाथा। भजतां मुक्ति येईल हाता। येथें संशय नाहीं सर्वथा। सत्य वचन हें पाहें।।७८।। म्हणोनि सद्गुरु एकचि श्रेष्ठ। तेचि जनांसी करिती धीट। वृथा नव्हे आमुची वटवट। भजतां कळेल सकलांसी।।७९।। काय करावें त्यांसी भज़ुनी। न कळे कीं आम्हांलागुनी। त्यांसी आम्हांसी भेद ना म्हणुनी। ऐसा प्रश्न उद्धवतो।।८०।।

प रि ज्ञा ना श्र म शं क र स द्गु रु

तरी त्याचें उत्तर हेंचि। कीं सुवर्ण पितळ दिसे समचि। परि न ये कधींही साची । सुवर्णाची सरी पितळेसी।।८१।। आम्हांसारिख्या अज्ञजनांसी। न कळे त्याची परीक्षा परियेसीं। सराफ त्याची परीक्षा कैसी। करी आपुल्या बुद्धिबळें।।८२।। तैसें येथें आम्हां अज्ञजनां। सद्गुरु मनुष्य दिसे ज़ाणा। खरा सद्भक्त याचिया नयना। सद्गुरु देव श्रेष्ठ दिसे।।८३।। सुवर्ण पितळ यांतील भेद। ज्यासी कळे तोचि आनंद। पावे बघतांचि सुवर्ण संनिध। करी उपयोग त्याचा तो।।८४।। तैसा ज़ो अधिकारी भक्त। तो सद्गुरु देखतां धांवे त्वरित। त्यापासुनी लाभ घेत। आपुल्या खऱ्या स्वरूपाचा।।८५।। सुवर्णपरीक्षा न कळे ज्या माणसा। तोचि दवडील सुवर्ण परियेसा। मर्कट-हस्तीं हिरा कैसा। राहेल सांगा तुम्ही हो।।८६।। ज़री देखिली हिऱ्यांची रास। हर्ष न होय मर्कटास। मनुष्यें पाहिल्या त्या हिऱ्यांस। हर्ष वाटेल सहज़चि।।८७।। तैसे आम्ही अनधिकारी। सद्गुरूसी पाहुनी दूरी। पळोनि ज़ातों सत्वरी। न कळतां लाभ कोणता तो।।८८।। ज़री असतील फळें सुंदर। त्यांवरी झडप घाली वानर। तैसे अनधिकारी नर। विषय-फळासी झोंबती।।८९।। विषय-सुखाच्या गोडीसन्मुख। सद्गुरूसारिखें रत्न सुरेख। धिक्कार करिती त्याचा देख। मर्कटापरी अज्ञपणें।।९०।। अज्ञपणें ऐसें वर्तन। मर्कटापरी न व्हावें म्हणोन। पूर्वजांनीं मठासी स्थापोन। केला उद्धार जनांचा।।९१।। जन्मापासोन सद्गुरुस्वामी। यांचें सद्गुणवर्णन नेहमीं। पडावें आमुच्या अंतर्यामीं। यासाठींच मठ केले।।९२।। सद्गुरुप्रेम ठसतां पूर्ण। सहज़चि त्यांचें घेई दर्शन। दर्शनानें होय पाप दहन। मग येई त्या अधिकार।।९३।। अधिकार आलियावरी देख। सद्भक्त होय तो परम चोख। तेव्हां सत्स्वरूपाचा रोख। अनुभव होय त्यालागीं।।९४।।

म्हणोनि पूर्वजें केलें ज़ें कार्य। तेणें आमुच़ें हितचि होय। नातरी ऐशी सद्गुरुमाय। कैसी लाभती आम्हांसी।।९५।। म्हणोनि ऐसी असतां सोय। न दवडावे त्यांच़े पाय। ज़ोंवरी असती चंद्र-सूर्य। तोंवरी असावा मठ आमुच़ा।।९६।। ह्यापरी करितां वर्तन। सहज़ची होईल उन्नती ज़ाण। धरोनि मठाच़ा अभिमान। भज़ावें तेथें प्रेमानें।।९७।। असो आतां स्वामी माउली। भक्तजनांच्या उद्धारा आली। वामनाश्रम-नामें उरली। कीर्ति त्यांची सतत पहा।।९८।। तया आश्रमा आमुच़ें नमन। तोचि आमुच़ें करील रक्षण। नेईल निजसुखधामीं त्वरेंकरून। सत्य सत्य त्रिवाचा।।९९।। वामनाश्रम षष्ठ आश्रम। यांनीं अवतारकार्य केलें उत्तम। जनांच़ा पुरवुनी काम। सांभाळिलें सकलांसी।।१००।। यापरी करोनि प्रेमानें यांनीं। शके सत्राशें पंचेचाळपासुनी। एकषष्ठवरी जगीं राहोनी। स्वधर्मराज्य च़ालविलें।।१०१।। पुढील अध्यायीं सप्तम आश्रम। श्रीकृष्णाश्रम सद्गुरु परम। सद्गुणी माउली च़ालवील स्वधर्म-। राज्य सारस्वत-वृंदाच़ें।।१०२।। त्यांची कथा परम रसाळ। अमृताहुनी गोड प्रेमळ। घ्या हो घुटका तुम्ही सकळ। भाविक सज्जन श्रोते हो।।१०३।। आनंदाश्रम परमहंस। शिवानंदतीर्थ एकचि प्रेमरस। यांच्या कृपाप्रसादें चतुर्विंश। अध्याय गुरुदासें संपविला।।१०४।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां निवेल तळमळ समग्र। चतुर्विंशाध्याय रसाळ हा।।१०५।। अध्याय २४।। ओंव्या १०५।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति चतुर्विंशोऽध्यायः समाप्तः।।

विवेकेंची होय ज्ञान। नलगे सोडावें प्रपंच भान।
कार्य करितांचि आपण। लक्ष ठेवा तयावरी।।

देहभाव सोडुनी एक। ब्रह्मभाव निश्चयात्मक।
धरोनि स्वधर्मापरी देख। वर्तावें आपण प्रेमानें।।

- श्रीमत् कृष्णाश्रम स्वामीजी

परमपूज्य कृष्णाश्रम स्वामिजींची समाधि (चित्रापुर मठ)

श्रीचित्रापुर रथोत्सव

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।।श्रीकृष्णाश्रमस्वामीगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।
।।ॐ।। जय जय सप्तम कृष्णाश्रमा। देईं सुमति लिहाया आम्हां। अंतरीं धरोनि भक्त-प्रेमा। पार करावें मज़ला पैं।।१।। बालकें सांगावें नलगे मातेसी। जतन करीं तूं आई मज़सी। आपण होऊनि करी ती ज़ैसी। तैसी तूं रक्षिसी आपणचि।।२।। परि तें बालक लागतां भूक। पाज़वी तोंवरी रडे तें देख। तैसें मी हें अज्ञ बालक। विनवित तुज़ला बा देवा।।३।। मातेहुनी तुझें प्रेम। अधिक असे पाहीं अनुपम। म्हणोनि गुरुनाथ मातेसम। हेंही म्हणतां शोभेना।।४।। ऐसें मज़ला वाटे खचित। मातेचें प्रेम कृत्रिम असत। कैसैं तें हें असे विदित। तुज़ला देवा दयाळा।।५।। परि मी बोलतों किंचित् ताता। प्रेमाचे उद्गार म्हणोनि आतां। तूंचि देवा वक्ता वदविता। मी काय बोलतों तुज़पाशीं।।६।। असो मातेचें प्रेम तें ज़ाण। कृत्रिम हें खचितचि पूर्ण। आपुल्यासि सुख व्हावें म्हणून। करी ती प्रीति निर्धारें।।७।। हरएक मनुष्याची प्रीति। केवळ स्वार्थासाठीं असे ती। म्हणोनि खोटी ती प्रीति। ऐसें बोलती साधु पैं।।८।। परि देवा तूं बा खचित। नाहीं धरिसी अणुमात्र स्वार्थ। केवळ जगाचें करावया हित। प्रेम करिसी भक्तांवरी।।९।। एक एकावरी करी ज़ें प्रेम। तें अंतरीं धरोनि काम। तूं कामा छेदिलें धरोनि नेम। विवेक-धनुष्य लावोनि।।१०।। आपुल्यासी व्हावें सुख। म्हणोनि दुज्यावरी प्रेम देख। करिती अतिशय सकळिक। एकमेकांवरी सारें हें।।११।। परि तूं अससी सुखदुःखरहित। मग कैंची सुखाची इच्छा तुज़प्रत। तेवींच तुझें प्रेम खचित। असे अकृत्रिम बा देवा।।१२।। तुझ्या मानसीं अणुमात्र स्वार्थ। नाहीं हो देवा हें खचित। म्हणोनि तूं मातेहुनी निश्चित।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

श्रेष्ठ अससी गुरुराया।।१३।। मातेचें प्रेम अपार ऐसें। जगामाजीं प्रख्यात असे। म्हणोनि गुरुरायातेंही तैसें। म्हणती मातेसम जगांत।।१४।। विचार केलिया तीही उपमा। न साज़े तुझ्या खऱ्या प्रेमा। ऐसी तुझी अगाध महिमा। तूंचि वर्णविसी गुरुराया।।१५।। सप्तम 'दास्य' हीचि भक्ति। देऊनि करीं भवबंधमुक्ति। आणिक सांगुनी सुलभ युक्ति। पार करीं ही प्रार्थना।।१६।। असो आतां श्रोते हो सज्जन। पुढें परिसा सावधान। मागील अध्यायीं केलें निरूपण। भक्तसंकट तें हरिलें।।१७।। लाभादाय-रामरावासी। कल्ले- मंजनाथय्या दोघांसी। दोषमुक्त केलें परियेसीं। वामनाश्रमस्वामींनीं।।१८।। आतां सांगूं सप्तम आश्रम। यांचे सारे सद्गुण परम। उत्कृष्ट शांत अति उत्तम। परिसा चित्त देऊनियां।।१९।। यांच्या समयीं पारिपत्यगार। होता तो बहुत हुशार। लाज्मी वेंकटरमणय्या साचार। नाम तयाचें हो पाहीं।।२०।। त्याच्या साहाय्यें मठाचें काम। योग्य प्रकारें होय तें सुगम। नवीन शेतें घेतलीं उत्तम। वाढली आस्ति सहज़चि।।२१।। तेव्हां भवानीशंकर देवासी। सुवर्णालंकार केले बहुवसी। मठाची व्यवस्था योग्य परियेसीं। सुंदर करोनि ठेवियली।।२२।। साक्षात् विष्णूचा अवतार। 'कृष्णाश्रम' नाम हें थोर। घेउनी जनांचा केला उद्धार। परम प्रीतीनें निर्धारें।।२३।। ज़माखर्च हिशोब सारा। ठेविला व्यवस्थेशीर तो खरा। परम निपुण मठाच्या व्यवहारा। करिती मितव्यय चातुर्यें।।२४।। हरएक कार्य तें आपण। न करिती विचारावांचून। परम शांतचित्तें ज़ाण। राहाती प्रेमळ गुरुराय।।२५।। परम सात्त्विक रसाळ वाणी। ऐकतां भक्तजनांच्या नयनीं। आनंदाश्रु येती झणीं। ऐशी मूर्ति ती पाहें।।२६।। कवणही ज़री येई संनिध। त्यासी प्रेमानें करिती बोध।

ऐकतां होय तया आनंद। परम गोडी वाणींत।।२७।। ऐशी ही आनंदमूर्ति। काय वानूं त्यांची कीर्ति। त्यांच्या वाक्यामाजीं निश्चितीं। भरला आनंद परिपूर्ण।।२८।। भाषण ऐकतां इतुका आनंद। होतसे न बोलवे आणिक शब्द। निःशब्द-स्थितीचा तात्काळ बोध। हो सच्छिष्यालागुनी।।२९।। ऐशी ती मूर्ति सुंदर। कृष्णाश्रमस्वामींची थोर। वर्णूं शकेंना मी अज्ञ पामर। वदवी तोचि मज़कडुनी।।३०।। सूर्यप्रकाशेंचि आपण। सूर्य ऐसा आहे म्हणोन। सांगतों त्याचें करोनि वर्णन। तैसेंच वर्णितों हें सारें।।३१।। सद्गुरुस्वरूप सूर्य ज़ाण। त्या कृपेच्या प्रभेनेंचि आपण। करितों त्यांचे सद्गुण-वर्णन। मग काय अभिमान धरावा।।३२।। असो ऐशी सद्गुरुमूर्ति। ब्रह्मज्ञान झालें त्यांप्रति। जीवन्मुक्तदशाप्राप्ति। झाली तयांलागून।।३३।। गीर्वाणभाषेंत परम निपुण। ज़ाणती न्याय तर्क व्याकरण। अहाहा कैसें करावें त्यांचें वर्णन। सांगा श्रोते तुम्ही हो।।३४।। ऐसें असतां एके दिनीं। लोक 'मुलकी'-ग्रामांतुनी। बोलवावया स्वामींलागुनी। आले महत्कार्यास्तव।।३५।। तरी कार्य काय तें आतां। सांगूं तुम्हांलागीं तत्त्वतां। पहा कैसी मूर्ति समस्तां। होय प्रियकर ती पाहीं।।३६।। जेथें असे शर्करा गोड। तेथें मुंग्यांची सहज़ धडपड। तैसें धांवुनी ज़ाती दुडदुड। सद्गुरुसंनिध सद्भक्त।।३७।। नच सांगावें लागे कोणीं। ज़ाती आपणचि धांवुनी। खऱ्या सद्भक्तालागुनी। सद्गुरूपुढें अन्य नसे।।३८।। यापरी मुलकी-ग्रामांतून। आले भक्त प्रेमेंकरून। कृष्णाश्रमसंनिधीं ज़ाण। करिती प्रार्थना मृदुवचनें।।३९।। जय जय देवा स्वामीराया। आलों आपणां बोलवावया। आमुच्या ग्रामीं यावें सदया। भक्तवत्सला करुणाळा।।४०।। आम्ही

आलों मुलकीहून। तया स्थानीं देवस्थान। बांधावें ऐसा विचार करोन। आलों बोलवावया ये ठायीं।।४१।। 'उमामहेश्वर' ऐशा देवाची। स्थापना करावी म्हणतों साची। सर्व कार्य आपुल्या कृपेंचि। सिद्ध होईल तें पाहीं।।४२।। आपुल्या हस्तेंचि घालावा पाया। ऐशी इच्छा भक्तांसी या। पूर्ण करावी आपण सदया। ऐशी प्रार्थना या चरणीं।।४३।। तेव्हां बोले सुहास्यवदन। अवश्य येऊं आम्ही ज़ाण। भवानीशंकर तोचि आपण। कर्ता करविता समज़ावें।।४४।। जगामाजीं तयावीण। वस्तु नाहीं सांगतों खूण। तोचि एक सच्चिदानंदघन। भरला परिपूर्ण ओतप्रोत।।४५।। त्यावीण सारे विषय शून्य। म्हणोनि पाहूं नये वस्तु अन्य। कदाही न करावी मान्य। असत्य असे ती पाहीं।।४६।। प्रभुपरमेश्वरावांचोन। वस्तु पाहूं नये आन। सदा बघावा आपण। तोचि एक सर्वत्र।।४७।। ज़री नाहीं आपणां ज्ञान। तरी धरावें एकचि वचन। ''सर्वत्र भरला तो दयाघन। अस्ति-भाति-प्रियरूपें''।।४८।। नामरूप याचा त्याग। करितां तेथें काय उरे मग। अस्ति-भाति-प्रियरूपेंचि जग। अनुभवा येईल सत्य पहा।।४९।। म्हणोनि हाचि करावा अभ्यास। नामरूपासी त्यागुनी खास। बघतां येईल अनुभवास। सच्चिदानंद-स्वरूपचि।।५०।। नामरूप त्यागावयास। नच कष्ट लागती त्यास। कैसें तें सांगूं तुम्हांस। अवधारा चित्त देऊनियां।।५१।। अलंकार असती बहुत। सुवर्णचि एक भरलें त्यांत। बालकां सुवर्ण नाहीं कळत। हें अनुभवसिद्ध सकलांसी।।५२।। ज़ो घ्यावया गेला सुवर्ण। तो न बघे अलंकार आपण। केवळ सुवर्णचि बघे तो पूर्ण। हें सकलांसी विदितचि।।५३।। तैसें येथें साऱ्या विषयीं। नामरूप त्यागावें पाहीं। तेव्हां दिसेल ब्रह्मचि

सर्वही। भवानीशंकर तोचि पैं।।५४।। ज़ैसें अलंकाराचें नामरूप। त्यागितां उरे सुवर्णचि अमूप। तैसें येथें अस्ति-भाति-प्रियरूप। उरे आत्मा सहज़चि।।५५।। 'अस्ति' म्हणजे आहेपणा। आहे हें कळणें 'भाति' ज़ाणा। कळतांचि तेथें होय मना। प्रीति उत्पन्न 'प्रिय' तेंचि।।५६।। या तिन्हींसी नाहीं नाश। नामरूप हें नासे खास। हें कैसें दावितों तुम्हांस। लावा चित्त येथेंचि।।५७।। पहा असती साळ्या सुंदर। त्यांचें नामरूप नासे साचार। अस्ति-भाति-प्रियत्व थोर। याचा नाश ना होय।।५८।। एवं अस्ति-भाति-प्रिय। याचा नाश सर्वथा न होय। नामरूप नासुनी ज़ाय। म्हणोनि त्यागावें त्यासी पै।।५९।। नामरूपाचा करोनि त्याग। अस्ति-भाति-प्रियत्वें पहावें जग। त्याचि रूपें तो हिमनग-। जामात शंकर भरियेला।।६०।। तो जैशाचा तैसाचि असे। सर्व वस्तूंमाजीं विलसे। इतुकें तरी धरावें साहसें। अज्ञ भक्तानेंही तें।।६१।। इतुकेंचि धरितां दृढ। हळू हळू आत्मा कळेल उघड। आणिक न धरावी चाड। मनामाजीं कांहीं एक।।६२।। यावरी कराल प्रश्न। कांहीं ज़री न केलें आपण। तरी कैसें होईल संरक्षण। सांगा आमुचें स्वामी हो।।६३।। तरी नव्हे तैसें वचन। व्यवहार करूं नये ऐसें आपण। कथिलें नाहीं तुम्हांलागून। तरी सावधान परिसावें।।६४।। व्यवहार करा सारा नेटका। भोजनादि टाकूं नका। परि एक धरा निका। सांगतों तें मानसीं हो।।६५।। हृदयीं येती नाना कल्पना। त्या सोडुनी धरावें एकासी ज़ाणा। त्यासी न लागे आणावा उसणा। आहे आपुल्याचि ज़वळी तो।।६६।। तो कोण तरी ऐका। विवेक एक, हाचि सारिखा। धरितां घट्ट, बघाल देखा। भवानीशंकर सर्वत्रचि।।६७।। विवेकेंचि होय ज्ञान। नलगे सोडावें प्रपंचभान। कार्य करितांचि आपण।

लक्ष ठेवा तयावरी।।६८।। तुम्ही ज़ें बांधवितां देऊळ। हें करितां कार्य उत्तमचि ये वेळ। ऐसें परमार्थासी स्थळ। योग्य असे बहुतचि।।६९।। याचि कारणें मठ-देउळादि। तेथें पावती सकल सिद्धि। गृहांतरीं नच होय कधीं। सुरळीतपणें परमार्थ।।७०।। म्हणोनि तुम्हीं केली जी योजना। उत्तम केली निश्चयें ज़ाणा। ऐसें म्हणोनि सद्गुरुराणा। परम संतोषे निजमानसीं।।७१।। ऐकतां स्वामींच़ा सुंदर बोध। ज़ाहला तयां बहुत आनंद। प्रेमभावें वंदिले पद। मुलकीच्या भक्तवृंदांनीं।।७२।। आणिक घेउनी गेले स्वामींसी। परिवारासहित निजग्रामासी। तेथील जन संतोषले मानसीं। बघतां प्रेमळ गुरुमूर्ति।।७३।। मग पाहुनी सुमुहूर्त। पाया घातला लावुनी हस्त। श्रीस्वामींच़ा, प्रेमभरित। देवस्थानाच़ा तो पाहीं।।७४।। केला उत्सव-समारंभ। गौरविला स्वामी भक्तवल्लभ। आम्हांसी लाभला सुलभ। म्हणोनि टाळ्या वाज़विती।।७५।। असो नानापरी करोनि उत्सव। संतोषविला श्रीगुरुदेव। परतले माघारे सर्व। चित्रापुर-मठासी।।७६।। मग पुढें प्रतिष्ठाही। त्यांच्याचि हस्तें करविली पाहीं। मुलकी-ग्रामामाजीं नाहीं। तोटा तेव्हां आनंदा।।७७।। हें वेगळें सांगावें नलगे। सद्गुरुदर्शनें आनंद भोगे। गुरुभक्तासी कळेल वेगें। कवण आनंद ये ठायीं।।७८।। सद्गुरुदर्शनें कोणतें सुख। हें वाचेनें सांगतां न ये देख। ज्यासी त्यासीच़ पारख। आम्हां अज्ञांसी न कळे तें।।७९।। असो ऐशी सद्गुरुमाउली। भूतळीं जगदोद्धारा पातली। ज्यांच़ें भाग्य उदेलें तेचि स्वस्थळीं। ज़ाती घेउनी श्रीगुरूंसी।।८०।। लाभाया ऐसें सद्गुरुरत्न। पदरीं पुण्य असावें ज़ाण। पुण्यावांच़ोनि न होय दर्शन। सत्य सांगतों तुम्हांसी।।८१।। धन्य धन्य तें चित्रापुर नगर। धन्य तेथील रहिवासी नर। त्यामाजीं मठाच़े द्विजवर। अगणित पुण्य त्यांच़ें हो।।८२।।

असो आतां आम्हींही ज़ाण। परम साहसें करितां यत्न। आम्हांसीही होय दर्शन। कधीं कधीं स्वामी सद्गुरूंचें।।८३।। यावरी सांगूं पुढें विवरण। आतां अध्याय संपवूं येथून। पुढील अध्यायीं निरूपण। परम रसाळ तें पाहीं।।८४।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें पंचविंश। अध्याय गुरुदासें संपविला।।८५।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां निजस्वरूपीं मिळती शीघ्र। पंचविंशाध्याय रसाळ हा।।८६।। अध्याय २५।। ओंव्या ८६।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति पंचविंशोऽध्यायः समाप्तः।।

ॐ परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

।। श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीकृष्णाश्रमस्वामीगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय सद्गुरो करुणासागरा। भक्तवत्सला जगदोद्धारा। येउनी भूतळीं जनांसी थारा। दिधला देवा त्वां पाहीं।।१।। येउनी 'नगर' कुळींच्या उदरीं। केला उद्धार जनांच्या भूवरी। बहुत पुण्याई त्यांची खरी। म्हणोनि अवतरलां निश्चयेंसीं।।२।। त्यांच्या पूर्व-पुण्यें देवा। सर्व जनांसी लाभली सेवा। उद्धरिलें जडजीवां। कृपाप्रसादें माउलिये।।३।। धन्य धन्य ते मायबाप। गेलें सकलही त्यांचें पाप। ऐशियांसी आठवितां लोप। होईल आमुच्या पापांचाही।।४।। मायबापांची इतुकी थोरी। तरी तुझ्या स्वरूपा नाहीं सरी। कुणाचीही देतां येत निर्धारीं। सत्य सत्य मम देवा।।५।। ऐसें तुझें स्वरूप सुंदर। कैसा ध्याईल हा अज्ञ पामर। तूंचि येउनी माझियासमोर। उभें ठाकावें बा देवा।।६।। तुझ्या प्रेमानेंचि मज़ला। प्रेमभाव उत्पन्न झाला। म्हणोनि ध्यावें देवा तुज़ला। ऐसें वाटतें मज़लागीं।।७।। लोहचुंबक आकर्षे सुईसी। तैसें तूं भक्तांच्या मनांसी। झणींच आकर्षण करिसी। नाहीं शंका अणुमात्र।।८।। आमुच्या अंगीं नसतां प्रेम। आपुलें प्रेम घालुनी निःसीम। कैसें ओढिलें निजबळें परम। साहसें करूनि बा देवा।।९।। ऐसा तूं माझा प्रेमळ। कैसा मावसी हृदयीं वेल्हाळ। सद्गुरुऐसी आणिक रसाळ। नाहीं वस्तु या जगतीं।।१०।। म्हणोनि देवा न मागें कांहीं। तुझें प्रेम एकचि देईं। इतुकीच प्रार्थना करितों पाहीं। चरणकमलीं आतां मी।।११।। असो आतां श्रोते हो सज्जन। मागील अध्यायीं केलें निरूपण। श्रीस्वामींचें सद्गुणवर्णन। आणि मुलकीसी देऊळ बांधियलें।।१२।। आतां ऐका आणिक बहुत। त्यांचे सद्गुण परम अद्भुत। ऐकतां पापें नासती समस्त। सत्वरी यावें

ऐकाया।।१३।। असो आमुचे कृष्णाश्रम। स्वामी सद्गुरु सद्गुणधाम। काय त्यांची लीला उत्तम। वर्णूं न शकें मी पाहीं।।१४।। वाचेनें बोलती रसाळ वाणी। शांत राहती अंतःकरणीं। परम उत्कृष्ट त्रिकालज्ञानी। प्रेमाची खाणी ती पाहीं।।१५।। ते ज़ें कांहीं बोलती वचन। तें असत्य न होय कदापि ज़ाण। यावरी एक वृत्तांत कथन। करूं आतां श्रोते हो।।१६।। शिराली-ग्रामामाजीं देख। होता एक सारस्वत भाविक। दुर्गप्पय्या नागरकट्टी नामक। स्वामींचा भक्त तो ज़ाणा।।१७।। बहुत विश्वास धरोनि मानसीं। स्वामींसी भज़े अहर्निशीं। ऐसें असतां एके दिवशीं। प्रसन्न झाले गुरुराज।।१८।। ज़ो असे निष्काम भक्त। तोचि आवडे श्रीगुरूसी सतत। न मागतांही आपणचि देत। सुख-संपत्ति त्यालागीं।।१९।। ऐशा त्या दुर्गप्पय्यासी। ज़वळी बोलावुनी दिधलें त्यासी। सप्तशती पुस्तक परियेसीं। प्रेमकटाक्षें पाहूनियां।।२०।। आणि सांगितली त्यासी खूण। याचें करितां सदा पारायण। सकल कष्ट होती निवारण। सुख संपत्ति भोगिसी तूं।।२१।। प्रेमपूर्वक करीं पठण। अर्थाकार वृत्ति करोन। यापरी करितां निश्चयें ज़ाण। सकलाभीष्ट पावशील।।२२।। ऐसें बोलूनि केला उपदेश। सप्तशतीचा वाचावयास। आणि म्हणती होईल खास। कल्याण तुमचें जगतीं या।।२३।। तेव्हां तो दुर्गप्पय्या भाविक। स्वामींची आज्ञा म्हणुनी देख। घेउनी सप्तशतीचें पुस्तक। करी पारायण नेमानें।।२४।। सद्गुरु-स्वामींच्या वचनापरी। झालें दुर्गप्पय्यासी सत्वरी। सकल कष्ट होउनी दुरी। सुख-संपत्ति झाली प्राप्त।।२५।। जन सकलही देती सन्मान। हें सद्गुरुस्वामीकृपेंकरून। एवं सर्वांत सुखी पूर्ण। झाला दुर्गप्पय्या त्यावेळीं।।२६।। नित्य करी तो पारायण। न विसंबे कधींही ज़ाण। अज़ूनि त्यांच्या घराण्यामधून।

करिती पारायण प्रेमानें।।२७।। ज़ें स्वामींनीं दिधलें पुस्तक। तें कारवारामाजीं देख। देवासंनिध असे सम्यक। नागरकट्टी यांच्या गृहीं।।२८।। शिवरामप्पा प्रसिद्ध वकील। होऊनि गेले कारवारीं सच्छील। दुर्गप्पय्या- पौत्र प्रेमळ। यांच्या सदनीं आहे तें।।२९।। नागरकट्टी दत्तात्रेय। दुर्गप्पय्याचा पौत्र अज़ुनीही होय। पारायण सप्तशती कार्य। करी प्रेमानें तो पाहीं।।३०।। होता तो मोठा अधिकारी। पेन्शन घेतलेंसे ये अवसरीं। असे पहा धारवाडा माझ्गारीं। अद्यापिही भाविक तो।।३१।। तोही मठाचा प्रेमळ भक्त। आनंदाश्रमस्वामी विख्यात। यांसी पाचारी कधीं कधीं गृहाप्रत। परम प्रीतीनें तो पाहीं।।३२।। असो कृष्णाश्रम-सद्गुरुमूर्ति। गातां न पुरे त्यांची कीर्ति। आपुल्या भक्तांसाठीं जगतीं। खटपट करिती बहुविध ते।।३३।। ज़री आलें त्यांच्या मानसीं। काय करिती हें न कळे कोणासी। सांगतां न ये आम्हांसी। कल्पनाही नच करवे।।३४।। परि यावें त्यांच्या मनास। तरीच सर्वही देतील भक्तांस। नातरी केला ज़री प्राणनाश। तरी ढुंकोनि न पाहतील।।३५।। यावरी करितील श्रोते प्रश्न। इतुकें कां त्यांचें निष्ठुर मन। तरी ऐका चित्त देऊन। सांगूं आतां गुरुकृपेंचि।।३६।। सद्गुरु नव्हे निष्ठुर खचित। मन त्यांचें कोमल सतत। परि ते अंकित नाहीं होत। कवणाच्याही सर्वथा।।३७।। ते असती जीवन्मुक्त। प्रारब्धापरी सदा वर्तत। कर्तव्यचि नाहीं त्यांप्रत। सहज़ासहज़ क्रिया त्यांची।।३८।। 'मी कर्ता' ऐशी भावना। कधींही त्यांच्या न शिवे मना। प्रारब्धापरी वर्तती ज़ाणा। अकर्ता अभोक्ता या भावें।।३९।। त्यांसी नाहीं सान थोर। न पाहती गरीब श्रीमंत नर। सर्वांठायीं ब्रह्मचि साचार। बघती ज़ाणा ते पाहीं।।४०।। भक्त अभक्त निंदक वंदक। सारे त्यांसी समान

देख। एकासी कष्ट एकासी सुख। होवो ऐसें न वाटे त्यां।।४१।। ज्याच्या त्याच्या भावनेपरी। सद्गुरुकृपा होय त्यावरी। तेणेंचि भक्तांचें कार्य निर्धारीं। प्रपंचीं परमार्थीं होय पहा।।४२।। म्हणोनि सकलही जनांसी। सुखचि होईल ऐसें मानसीं। समजूं नये सर्वथा परियेसीं। निष्कामभावें भज़ावें।।४३।। पहा केलिया विचार आपण। श्रीस्वामींसी सर्वही समान। एकासी रक्षिती, आणिकां कां न। करिती रक्षण त्यांचें पैं।।४४।। तरी पहा रक्षिती ते सकलां। भेदाभेद नाहीं तयांला। परि नाहीं भाव आम्हांला। काय करितील गुरुराज।।४५।। यावरी सांगूं दृष्टांत। सूर्यासी सारिखे समस्त। सकलांसी समान प्रकाश देत। पक्षपात त्यासी नसे।।४६।। परि ज़ो असे अंध। त्यासी सूर्य असतां संनिध। ज़री धरिला त्याचा छंद। तरीही उपयोग न होय।।४७।। ज्यासी असती शुद्ध नेत्र। तोचि प्रकाश घ्यावया पात्र। तेणेंचि तो करी पवित्र। व्यवहार आपुला सुखानें।।४८।। तैसी सद्गुरुकृपा सदा उदय। पावलीच असे चिन्मय। त्यांसी सर्व एकचि अद्वय। समान सारे जन पाहीं।।४९।। परि ज्याची भावना असे अंध। त्यासी गुरुकृपेचा काय संबंध। विषयांमाजीं होतां धुंद। कैसी कृपा संपादील।।५०।। विषयांधा गुरुकृपा कैसी। फळेल सांगा हो आम्हासी। सूर्यप्रकाश न लभे अंधासी। कवण्याही काळीं निर्धारें।।५१।। ज़ैसा सूर्य असे सहज़। प्रकाश देऊनि करी काज़। तैसा सद्गुरु स्वामीराज। सदा प्रसन्न तो पाहीं।।५२।। ज्याची असे भावना बळकट। त्याचे सद्गुरु निवारिती कष्ट। परि प्रारब्ध ज्याचें उलट। त्याचे कैसें निवारतील।।५३।। भावना- प्रारब्ध- गुरुकृपा तीन्ही। एकवटतां कार्य होय झणीं। नातरी गुरूच्याही असतां मनीं। तरीही मनोरथ न

फळती।।५४।। सूर्यप्रकाश पडला थोर। शुद्ध असती आपुले नेत्र। परि कपाटें लाविलीं सर्वत्र। काय उजेड मिळेल तया।।५५।। त्यासी कैंचे दिसतील विषय। जगचि सर्व शून्य होय। तैसें येथें पहा काय। लाभेल सुख विषयांधा।।५६।। प्रारब्धाचा पडदा आड। असतां कैंची सुखाची ज़ोड। प्राप्त होईल सांगा उघड। भावना- गुरुकृपा असतांही।।५७।। ज्याचें प्रारब्ध पावलें उदय। ज्याचा असे दृढतर निश्चय। त्यासीच रक्षी सद्गुरुमाय। प्रपंचीं परमार्थीं सर्वदा।।५८।। आतां म्हणाल काय यांत। सद्गुरु-महत्त्व असे दिसत। तरी व्यवहारीं ज़ैसा सूर्य असत। महत्त्वपूर्ण जगीं या।।५९।। तैसेचि येथें सद्गुरुराय। त्यांचें महत्त्व थोर होय। म्हणोनि धरावे त्यांचे पाय। निष्काम चित्तें हो पाहीं।।६०।। न मागावे त्यांकडे विषय। ते प्रारब्धाधीन असती निःसंशय। तैसा मोक्ष प्रारब्धाचा नव्हे चिन्मय। प्रयत्नासह गुरुकृपा पाहिजे।।६१।। परमार्थासी करणें अति प्रयत्न। आणि गुरुकृपाही करावी संपादन। बैसों नये प्रारब्ध म्हणोन। साधकानें कदापिही।।६२।। गुरूकडे न मागावे विषय। धरावे दृढतर त्याचे पाय। निष्काम चित्तें करोनि निश्चय। अर्पावें तनुमनवाचेसी।।६३।। मोक्ष मागावा सद्गुरुसंनिध। अति प्रयत्न करावा शुद्ध। ज़री तो असेल मतिमंद। तरीही उद्धरी गुरुराज।।६४।। ज़री आले नाना कष्ट। तरीही धरावे चरण घट्ट। तेव्हांचि सद्गुरुप्रेमाचा घोट। लाभेल आपुल्यासी निश्चयें।।६५।। तेणेंचि येईल आपणा अनुभव। सद्गुरुप्रेमाचा तो अपूर्व। मग त्यामाजींच रहावें सदैव। सारे विषय टाकोनि।।६६।। विषयींच ज़री ठेविली प्रीति। तरी न लाभे स्वरूपज्ञानज्योती। म्हणोनि त्यागावी विषयासक्ति। तेव्हांचि गुरुकृपा होईल।।६७।। सोडुनि विषयेच्छा,निष्काम चित्तीं। भजतां सद्गुरु कृपा

करिती। गुरुकृपेंचि ज्ञानप्राप्ति। होय साधकांलागीं पैं।।६८।। येथें आक्षेप येईल एक। कीं आधीं सांगितलें मोक्ष हा देख। यासी प्रयत्न करावे अनेक। तेव्हांचि प्राप्त होईल तो।।६९।। आतां म्हणसी गुरुकृपेंचि मोक्ष। प्राप्त होय सकल जीवांस। याचें समाधान सांगतों तुम्हांस। ऐका सद्भाव धरोनि।।७०।। गुरुकृपेंचि पावे आत्मज्ञान। तेणें मोक्ष लाभे न लागतां क्षण। यामाजीं नसे अनुमान। अणुमात्र ज़ाणा श्रोते हो।।७१।। शिष्यें करितां अति प्रयत्न। सहज़चि ओळे तो कृपाघन। पोहोंचवी ब्रह्मपदासी पूर्ण। कृपाकटाक्षेंकरूनियां।।७२।। ज्यासी असे मोक्षाची इच्छा। ते टाकिती सहज़चि विषयांची वांछा। आणि करिती प्रयत्न साचा। ज्ञानप्राप्तीलागीं पैं।।७३।। प्रयत्न करितां देईल फल। सद्गुरुमाउली आपुली कोमल। हिची कृपा अति निश्चल। कधींही न ज़ाय ती पाहीं।।७४।। आणिक एक शंका ऐसी। उद्भवेल श्रोत्यांच्या मानसीं। वरी कथिलें गुरुकृपेसरशीं। मिळालें दुर्गप्पय्यासी प्रपंचसुख।।७५।। आतां म्हणतां आत्मज्ञानासी। गुरुकृपा पाहिजे परियेसीं। प्रयत्न करितां होय आपैसी। सद्गुरुकृपा तयावरी।।७६।। तेथें कथिलें भावना असतां। गुरुकृपा होय सहज़चि तत्त्वतां। येथें कथिलें प्रयत्न करितां। कृपा होय तत्काळ।।७७।। येथें कासया भावना धरितां। सद्गुरुकृपा न होय भक्तां। ऐशा प्रश्नाचें उत्तर आतां। सांगूं ऐका सावधान।।७८।। कांहीं जनांसी सद्गुरु थोर। परमेश्वराचाचि अवतार। ऐसा भाव असतो साचार। परि जग हें सत्य वाटे तयां।।७९।। ऐशियांच्या भावनेपरी। प्रपंचामाजीं सुख निर्धारीं। होय सद्गुरुकृपेनें सत्वरीं। तया भक्तांलागीं हो।।८०।। परि येथें आत्मज्ञानासी। नित्यानित्य–विचार त्यासी। करावा आपण अहर्निशीं। तरीच कार्य साधेल।।८१।। नित्यानित्य– विचार

होतां। विषय सत्य न वाटे सर्वथा। मग तो होय परमार्था। अधिकारी ज़ाण लवलाहीं।।८२।। सकल कार्या लागे अधिकार। त्यावीण कार्य न होय निर्धार। कैसें तें ऐका एकाग्र। श्रोते तुम्ही भाविक हो।।८३।। ज्या कार्याच़ा ज्यासी छंद। ज़री तो असे मतिमंद। तरी तो प्रेमानें होऊनि धुंद। करितो कार्य तें पाहीं।।८४।। ज्या कार्याच़ा ज्यासी अधिकार। त्यासीच़ त्याच़ा छंद निरंतर। छंद लागतां साचार। कार्य करी तो झ़टोनि।।८५।। तरी येथें परमार्था अधिकार। कवणा हें मागें कथिलें सविस्तर। साधनचतुष्टयें युक्त ज़ो नर। तोचि अधिकारी परमार्था।।८६।। ऐसा ज़ो अधिकारी पूर्ण। तेणें करितां परम प्रयत्न। गुरुकृपें होय आत्मज्ञान। तया भक्तासी पाहीं पां।।८७।। सद्गुरु सांगतील ज़ो अभ्यास। झ़टोनि करावा रात्रंदिवस। ऐसें करितां त्यासी खास। आत्मज्ञान दृढ होय।।८८।। यासीच़ म्हणती प्रयत्न। गुरुआज्ञेपरी करावा ज़ाण। ठेवुनी विश्वास गुरुवचनीं आपण। तेव्हांचि समाधान पावे तो।।८९।। ज्यासी सत्य वाटती विषय। त्यासी सद्गुरु करतील काय। असती सदा ते प्रसन्न सदय। उद्धरावया जनांसी।।९०।। म्हणोनि आपण करोनि प्रयत्न। भावें भज़तां सद्गुरुलागून। होय निश्चयें आत्मज्ञान। नाहीं संशय यामाजीं।।९१।। सद्गुरुचरणीं भावना दृढतर। धरितां सकलही येई अधिकार। परमार्थाच़ा साचार। आम्हांलागीं निश्चयेंसीं।।९२।। ज़री आपुल्यासी न कळे कांहीं। तरी प्रेम ठेवितां पाहीं। पार घालती लवलाहीं। सद्गुरु माऊली सत्य पहा।।९३।। ज़री भज़लां सकाम। तरीही न होय तें विषम। त्यांतही भज़तां निष्काम। करिती कृपा तत्काळ।।९४।। सकामासी ज़वळी घेउनी। कामना पुरविती प्रेमेंकरूनी। मग हळू हळू त्यालागोनी।

अधिकार येई परमार्था।।९५।। म्हणोनि सद्गुरूची धरितां कास। पुरवी तो सर्वही आस। भार वाही रात्रंदिवस। निजभक्तांचा प्रेमानें।।९६।। बालकाची मातेसी चिंता। तैसी भक्तांची सद्गुरुनाथा। सर्व साधनें येती हाता। धरितां दृढविश्वास त्या चरणीं।।९७।। असो आतां पुढील अध्यायीं। श्रीकृष्णाश्रम-सद्गुरुमाई। शिष्य स्वीकार करितील पाहीं। जगदोद्धाराकारणें।।९८।। ती कथा परम रसाळ। श्रीदत्तात्रेयचि अवनीं येईल। ऐकतां मनाची ज़ाउनी तळमळ। लीन होईल तें निजरूपीं।।९९।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें षड्विंश। अध्याय गुरुदासें संपविला।।१००।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां लाभती साधनें चार। षड्विंशाध्याय रसाळ हा।।१०१।। अध्याय २६।। ओंव्या १०१।।ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति षड्विंशोऽध्यायः समाप्तः।।

श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीकृष्णाश्रमस्वामीगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।। ।।ॐ।। जय जय देवा करुणाकरा। येसी जगाच्या उद्धारा। आम्हां सारस्वतांसी थारा। दिधला तूं बा सकलांसी।।१।। तुज़ नाहीं येणें ज़ाणें। नाहीं परमार्थ आणिक शिकणें। परि भक्तजनांकारणें। करिसी योग नानापरी।।२।। आपण करुनी जनां दाविसी। तेणें इहपर सुख त्यां देसी। तुझी स्तुति करावी कैसी। न कळे अज्ञ बाळा या।।३।। मुलें खेळती ज़ैसा खेळ। कीं थोरांपरी बोलती बोल। एक म्हणे मी ज़ातों ये वेळ। कचेरीसी आतां पैं।।४।। एक होऊनि मास्तर आपण। मुलांसी शिकवी प्रेमेंकरोन। परि त्यांच्या मनासी ज़ाण। कांहीं एक ना समज़े।।५।। तैसें देवा मी असें अज्ञ। भक्ति नाहीं मज़लागोन। परि लागलों कराया वर्णन। श्रेष्ठ संतांचें पाहूनियां।।६।। अनेक संतांनीं केलें वर्णन। त्यामाजीं प्रेम भरलें पूर्ण। म्हणोनि बघतांचि द्रवतें अंतःकरण। ज़री तो असला अज्ञानी।।७।। आम्हीं ज़ें केलें वर्णन। त्यांत प्रेमाचा बिंदुही ज़ाण। नसे निश्चयें म्हणोन। लाज़ वाटे मज़लागीं।।८।। परि देवा तुझ्या संनिधीं। अणुमात्र लाज़ नाहींच कधीं। तेव्हांचि सरसावलों आधीं। ग्रंथ लिहाया उल्हासें।।९।। ज़री नाहीं प्रेम अंगीं। साहस करितां येई तें वेगीं। सद्गुरुकृपा होतां जगीं। कवणही अज्ञ न उरे।।१०।। करितां साहस सद्गुरुनाथ। करिती कृपा झडकरी तेथ। संशय नाहीं अणुमात्र येथ। सांगतों देवा कृपाघना।।११।। असो आतां श्रोते हो सज्जन। मागील अध्यायीं केलें निरूपण। दुर्गप्पय्यासी सप्तशती देऊन। सुखसंपत्ति दिधली त्या।।१२।। आतां परिसा सावधान। श्रीकृष्णाश्रम यांचे सद्गुण। आणिक करूं निवेदन। सद्गुरुकृपेंचि आतां पैं।।१३।। नसे त्यांसी संसारबंधन।

परि करिती जनांकारण। शिष्य-स्वीकार तो ज़ाण। करिती सहन भार सदा।।१४।। कोणता भार ज़री म्हणाल। तरी बालक तरुण ऐशा कोमल। शिष्याचा भार घ्यावा समूळ। स्वामींनीं आपण हो पाहीं।।१५।। त्याचें करावें रक्षण सारें। हेंचि एक ओझें खरें । साधुत्वलक्षण हेंचि निर्धारें। देह झिज़विती उपकारा।।१६।। असो स्वामी कृष्णाश्रम यांनीं। केलें कल्याण जनांचें झणीं। भक्ति-प्रेम वाढलें जनीं। त्यांच्या उपदेशें हो पाहीं।।१७।। ऐसें असतां एके काळीं। मंगळूरीं आपुल्या जनाच्या मेळीं। वामनाश्रम स्वामींच्या समाधीज़वळी। गेले कृष्णाश्रमस्वामी हे।।१८।। भेट घ्यावया सद्गुरुस्वामींची। गेले परिवारसहित सहज़चि। कांहीं दिन राहिले तेथेंचि। भक्तांच्या प्रार्थनेस्तव ज़ाणा।।१९।। तेव्हां एकेकाळीं समग्र। भक्त आले मठासी शीघ्र। प्रार्थिती सद्गुरूसी सत्वर। शिष्य-स्वीकार करावया।।२०।। तेव्हां सद्गुरु सुहास्यवदन। करिती प्रेमळ मृदु भाषण। शिष्य-स्वीकार आतां ज़ाण। अवश्य करूं ये समयीं।।२१।। ऐकुनी सकलां ज़ाहला आनंद। शिष्य निवडिला सुप्रसिद्ध। 'नगर' कुळींचा आनंदकंद। तेजःपुंज तो पाहीं।।२२।। श्रीकृष्णाश्रमस्वामींचा। चुलत बंधु भाविक साचा। नगर-सांतप्पय्या यांचा। ज्येष्ठ पुत्र प्रेमळ तो।।२३।। 'काळप्पय्या' नामेंकरून। हाका मारिती सकल जन। परम सात्त्विक शुद्ध आचरण। अंतःकरण कोमल तें।।२४।। कमलनयन सुंदर वदन। बघतांचि दिसे सुलक्षण। अंगकांति गौरवर्ण। ऐशी मूर्ति मनोहर।।२५।। पाहुनी मग सुमुहूर्त। केला शिष्य-स्वीकार मठांत। झाले जन समस्त। आनंदित त्या समयीं।।२६।। शके सत्राशें एकोणऐशिं। पिंगळ नाम संवत्सर। कार्तिक शुद्ध पौर्णिमेसी सत्वर। केला उपदेश श्रीगुरूंनीं।।२७।। 'पांडुरंगाश्रम'

नामाभिधान। दिधलें सुंदर प्रेमेंकरोन। जनांमाजीं आनंद पूर्ण। भरला ज़ाण ते समयीं।।२८।। ऐशी ती मूर्ति गोमटी। घातली गळां सुवर्णकंठी। बघतां वाटे लागेल दृष्टी। काय वर्णूं ती आतां।।२९।। असो यापरी झ़ालें कार्य। सर्व जनांसी हितकर होय। आणि कृष्णाश्रम स्वामी सदय। हेही संतोष पावती।।३०।। तीव्र बुद्धीच़ा पाहुनी शिष्य। जनांस स्वधर्म शिकवावयास। योग्य पात्र हें म्हणोनि गुरूंस। परमानंद ज़ाहला।।३१।। हा साक्षात् दत्ताच़ा अवतार। हे सद्गुरु ज़ाणती साचार।परि शिष्याची लीला दावाया समग्र। एक चमत्कार केला त्यांनीं।।३२।। समज़ा एक असे बाळ। तें नानापरी खेळे खेळ। उल्हासे अंतरीं माता प्रेमळ। करी कौतुक लडिवाळपणें।।३३।। जनांसमक्ष ती नारी। खेळवूं लागे नानापरी। आपुल्या बाळाच़ें कौतुक करी। प्रेम नावरे तियेसी।।३४।। तैसें कृष्णाश्रम-स्वामींलागीं। शिष्यप्रेम सहज़ ये अंगीं। त्यांची लीला दावाया जगीं। उत्सुक झ़ाले तात्काळ।।३५।। परिसा आतां तीच़ कथा। लावा इकडे आपुल्या चित्ता। ऐकतां हरती सर्वही चिंता। नाहीं सर्वथा संशय।।३६।। जेव्हां झ़ाला शिष्य-स्वीकार। त्या उत्सवामाजीं एक सुंदर। सुवर्णकंठी पांडुरंगाश्रमगुरुवर। यांच्या गळां घातली पैं।।३७।। ती एका भक्तें उत्सवकालीं। शोभेसाठीं होती घातली। उत्सव पूर्ण होतां गुरुमाउली। म्हणती शिष्यासी तें ऐका।।३८।। कंठी दे ज्याची त्यासी। तो आला आहे येथें मठासी। ऐकतां स्मितमुखें सद्गुरूपाशीं। बोलते झ़ाले प्रेमें ते।।३९।। अहो गुरुराया ही सुवर्णकंठी। दिसे मज़ला अतिशय गोमटी। सद्गुरुप्रेम याच्या पोटीं। भरलें असे घनदाट।।४०।। यावरी बोले भक्तवत्सल । नको ती कंठी तुज़ला बाळ। दुजी करवुनी देतों सोज्ज्वळ। देईं ती ज्याची त्यासीच़।।४१।। येरू बोले सद्गुरु

नाथा। अपराध क्षमा करीं बा ताता। देईना मी कंठी सर्वथा। दुजी करवुनी द्या त्यांसी।।४२।। ये कंठीवरी प्रेम बहुत। कीं ती उपदेशसमयीं येथ। अंगावरी होती निश्चित। ती माझ्या स्वहिताची।।४३।। हा असे आपुला प्रसाद। परम प्रेमळ सुंदर सुखद। द्यावया वाटे मला खेद। सद्गुरुराया करुणाळा।।४४।। ही सुवर्णाची कंठी। घातली जी माझिया कंठीं। ती सबंध दिवस कंठी। सत्सुखामाजीं दिनरजनी।।४५।। एवं तिन्ही मिळोनि कंठी। त्रैमूर्ती ही एक गोमटी। रज-तम-सत्त्व गुणांची मोठी। परम सुंदर ही एक।।४६।। रज-तम-सत्त्व मिळोनि एक। नाहीं येथें निश्चयें अनेक। एक तेथें अन्य ना देख। सारें ब्रह्मचि परिपूर्ण।।४७।। ऐसी ही कंठी तुमचा प्रसाद। मिळालासे मज़ अत्यंत सुखद। तिची महिमा वाटते अगाध। म्हणोनि ती द्यावीसी न वाटे।।४८।। ऐसे हे शब्द ऐकुनी कर्णीं। संतोषले सद्गुरु स्वमनीं। परि जगीं अविहित करणी। न करिती ते कदापिही।।४९।। म्हणोनि बोलती शिष्याप्रती। आमुची आज्ञा तुज़ला श्रेष्ठ ती। म्हणोनि कंठी ज्यांची ती। त्यांसी देईं तूं बाळा।।५०।। यावरी दिधली कंठी काढुनी। प्रेमानें ज्याची त्यासी झणीं। तेव्हां गेले गृहालागुनी। कंठी घेऊनि ते जन।।५१।। परि त्यांसी तेव्हांपासुनी। सुखचि नाहीं त्यांच्या सदनीं। मग तयांसी कळलें मनीं। स्वामींची लीला ही ऐसें।।५२।। बोलती सदनीं आपआपसीं। कंठी नेऊनि द्यावी स्वामींसी। ती आणिल्यापासुनी आम्हांसी। सुखचि नाहीं अणुमात्र।।५३।। ही त्या सद्गुरुस्वामींची करणी। म्हणोनि पुनरपि द्यावी त्या चरणीं। अगाध महिमा दाविती धरणीं। श्रीदत्तावतार संशय ना।।५४।। मग ऐसें बोलुनी तत्काळ। घरांतील मुख्य गृहस्थ वडील। कंठी घेऊनि तो प्रेमळ। धांविन्नला

मठासी।।५५।। अर्पिली कृष्णाश्रमस्वामींच्या चरणीं। आणि बोले मृदुवचनीं। न कळे महिमा काय ही करणी। आम्हांलागीं दयाळा।।५६।। येथुनी ही सुवर्णकंठी। नेल्यापासुनी आमुच्यापाठीं। लागला शनि उठाउठी। त्रासलों आम्ही नानाविध।।५७।। म्हणोनि ही कंठी देवा। पांडुरंगाश्रम-स्वामींसी सेवा। म्हणूनि अर्पितों, धरुनी भावा। स्वीकार करावा याचा पैं।।५८।। तेव्हां म्हणती कृष्णाश्रम-गुरुराय। तुमचें असे स्वच्छ हृदय। न क्षोभे तुमच्यावरी सदय। भवानीशंकर कदापिही।।५९।। प्रारब्धापरी येती कष्ट। न करी प्रभु तो कदापि वाईट। परि ही तुझी प्रेमाची भेट। म्हणोनि स्वीकारूं आम्ही बा।।६०।। मग बोलावुनी शिष्यासी। घातली गळां कंठी परियेसीं। तेव्हां ज़ाहला आनंद मानसीं। कंठीच्या मालका त्या समयीं।।६१।। तो असे परम भक्त। परि स्वामींची इच्छा नसतां विदित। कंठी नेली होती गृहाप्रत। स्वामींनीं देतां त्या समयीं।।६२।। जेव्हां आले नाना कष्ट। संशयेंचि वाटलें वाईट। म्हणोनि आला थेट। स्वामीसंनिधीं तात्काळ।।६३।। मग अर्पण करितां कंठी। परम आनंद ज़ाहला पोटीं। सद्गुरु-नाम बोले ओठीं। प्रेमपूर्वक तो भक्त।।६४।। मग जनांच्या मुखें कळला वृत्तांत। त्या गृहस्थालागीं समस्त। कीं पांडुरंगाश्रम स्वामींचा मनोरथ। हीच कंठी प्रिय त्यांसी।।६५।। तेव्हां तो गहिंवरला भक्त। म्हणे साक्षात् अवतरला दत्त। भाग्य आमुचें अपरिमित। म्हणोनि लाभली ही मूर्ति।।६६।। ऐसें बोलुनी साष्टांग नमन। घातलें गुरुशिष्यांलागून। म्हणे सद्गुरो आम्ही अज्ञ। न कळे महिमा कवणाही।।६७।। म्हणोनि देवा तूंचि पाहीं। शिष्याचा प्रभाव लवलाहीं। दाविला आम्हां सकलही। नाहीं संशय यामाजीं।।६८।। काय तुझें

भक्तप्रेम। निश्चयेंसीं असे निस्सीम। भक्तकामकल्पद्रुम। म्हणती तुज़ला असत्य नव्हे।।६९।। असो आतां आम्हां देवा। कृपा करोनियां जडजीवां। उद्धरावें करुणार्णवा। क्षमा करोनि अपराध।।७०।। ऐसें ऐकतां भक्तवचन। द्रवलें स्वामींचें अंतःकरण। म्हणती कृपाळु दयाघन। धैर्य धरावें मानसीं बा।।७१।। भवानीशंकर देवाच्या कृपें। ज़ाती नासुनी सर्वही पापें। त्याच्या वचनीं धरणी कांपे। सत्यवचन हें आमुचें।।७२।। तोचि विधि-हरि-शंकर। अवतरला येथें भूवर। साक्षात् दत्तावतार। नव्हे भाषण असत्य तुझें।।७३।। ऐसी भावना होतां दृढ। प्रपंचीं परमार्थाची होईल वाढ। अंतीं परमार्थ वाटेल गोड। विटेल मन प्रपंचीं।।७४।। यावरी तो करुनी नमन। दोन्ही आश्रमां प्रेमेंकरोन। निघाला आपुल्या गृहालागून। आठवुनी सद्गुण स्वामींचे।।७५।। तेव्हां त्यांचे सकलही कष्ट। निरसन झ़ाले निश्चयें स्पष्ट। अधिकचि सुख पूर्वींहुनी श्रेष्ठ। स्थिति आली त्यांसी पैं।।७६।। पहा कैसी सद्गुरुमाय। यांची कृपा पावली उदय। विपुल पुण्य त्यांचें होय। म्हणोनि कंठी घेतली ती।।७७।। त्यांसी नाहीं सुवर्णाची हौस। परि दाविली इच्छा जनांस। कृष्णाश्रमस्वामींच्या प्रेरणेस। अनुकूल होवोनि।।७८।। दावाया जनांस लीला अगाध। वरिवरी करोनि शिष्यासी बोध। ज्याची कंठी त्याच्या संनिध। देवविली आपण स्वामिरायें।।७९।। ज़ो साक्षात् दत्तावतार। त्यासी स्वाभाविक असे विचार। परि शिष्यमहिमा असे थोर। हें दाविलें जनीं प्रेमानें।।८०।। जनांचा भाव ऐसा होय। कीं पांडुरंगाश्रम-स्वामिराय। यांचें असे बालवय। तेवींच हट्टी स्वभाव।।८१।। परि हें ऐसें नव्हे खचित। हट्ट कैंचा येईल त्यांप्रत। परि केली कृष्णलीला बहुत। हेतु जगाचें कल्याण।।८२।। आपण वरिवरी हट्ट दावित। जनांचें त्यांत कल्याण करीत। यावरी

आणिक कथा प्रख्यात। पुढील अध्यायीं बोलूं पैं।।८३।। असो पुढें यांचें चरित्र। असे लीला परमविचित्र। प्रस्तुत गाऊं यांचें स्तोत्र। श्रीकृष्णाश्रम-स्वामींचें।।८४।। महिमा असे परम अपार। वर्णितां होय ग्रंथविस्तार। सद्गुण-शांतीचा समुद्र। दुर्गुणा ठाव ना तेथें।।८५।। ज़री शिष्य लहान बाळ। त्यासी संगोपन करी वेल्हाळ। मृदु आणि परम प्रेमळ। वचनेंसीं तया सांभाळिलें।।८६।। मातेहुनी अधिक प्रेम। निजभक्तांवरी असे निःसीम। कंठ शोषुनी आत्माराम। दाविती साधकांलागीं पैं।।८७।। इतरांसीही लावुनी नेम। शिकविती आपुला स्वधर्म। तेवींच येई ज़ो सकाम । त्याचा पुरविती मनोरथ।।८८।। एवं सर्व जनांसी ज़ाण। देती फल त्या-त्यांलागोन। इच्छेपरी सर्व देऊन। करिती उद्धार त्यांचा हो।।८९।। ज़ैसी माता आपुल्या मुलांसी। रक्षण करी दिननिशीं। तैसी गुरुमाउली आम्हांसी। रक्षीतसे प्रेमानें।।९०।। ज्याची प्रकृति असे ज़ैसी। तैसेंचि अनुपान माता तयासी। देऊनि जतन करी, तैशी। गुरुमाउली आम्हां पैं।।९१।। सकामासी देऊनि इच्छित। हळू हळू त्या निष्काम करीत। मग तो लागे परमार्थाप्रत। साधक होऊनि निश्चयें।।९२।। नानापरी कराया भक्ति। साधन करुनी जगीं ठेविती। पुढील अध्यायीं हेंचि निगुती। सांगूनियां वृत्ति तोषवूं।।९३।। एवं सद्गुरु स्वामी एक। हेचि श्रेष्ठ निश्चयात्मक। म्हणोनि आम्ही सकळिक। ध्याऊं ऐशी गुरुमूर्ति।।९४।। आप्त हे सारे धनाचे असती। निर्धनासी कोणीही न पुसती। म्हणोनि त्यांची सोडावी भ्रांती।'माझीं माझीं' हीं म्हणोनि।।९५।। द्रव्य बघतां हातामाजी। करिती तेव्हां हांजी हांजी। अथवा आपुली त्यावरी मर्जी। दाविती अपार बळेंचि।।९६।। म्हणोनि स्वजनांची प्रीति शेवटीं। निश्चयें

ज़ाणा ठरते खोटी। परि सद्गुरुमूर्ति गोमटी। त्यांचीच प्रीति खरी असे।।९७।। नाहीं त्यांसी अंगीं स्वार्थ। केवळ करिती कल्याणार्थ। ऐशियां भजतां न होय व्यर्थ। शुद्ध परमार्थ लाभे त्यां।।९८।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें सप्तविंश। अध्याय गुरुदासें संपविला।।९९।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां अज्ञान निरसे समग्र। सप्तविंशाध्याय रसाळ हा।।१००।। अध्याय २७।। ओंव्या १००।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु ।।

।। इति सप्तविंशोऽध्यायः समाप्तः।।

ॐ परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम श्रीशंकरसद्गुरु

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीकृष्णाश्रमस्वामीगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।। ।।ॐ।। जय जय श्रीस्वामिराया। काय करूं मी आतां सदया। धीर ना अंगीं कवन कराया। तूंचि पार घालीं झणीं।।१।। माझ्या अंगीं नाहीं सद्गुण। असें मी एक भक्तिहीन। परि देवा तुज़लागोन। सारे समान जन बापा।।२।। भक्त अभक्त निंदक वंदक। सारें ब्रह्मचि तुज़ला देख। म्हणोनि गुण दोष दिसतां सन्मुख। हर्ष खेद न बघसी।।३।। ऐसा तूं सद्गुरुनाथ। उद्धरिसी मज़ला खचित। यांत संशय न वाटे किंचित। सद्गुरुराया दयाळा।।४।। परि एकचि येतो संशय। कीं आमुच्या अंगीं नसतां निश्चय। कैसी तुझी कृपा होय। सांगें बापा मज़लागीं।।५।। ज़री नाहीं भक्तिभाव। तरी निश्चय असावा सदैव। तैसियांसी सद्गुरुदेव। उद्धरी हा निर्धार।।६।। म्हणोनि देवा आणिक कांहीं। न मागें तुज़पाशीं पाहीं। निश्चयें तो एकचि देईं। ग्रंथ परिपूर्ण कराया।।७।। असो आतां श्रोते हो सज्जन। मागील अध्यायीं केलें निरूपण। कृष्णाश्रमांनीं शिष्य-स्वीकार करोन। शिष्याच़ा महिमा दाखविला।।८।। आतां कृष्णाश्रम कृपाघन। यांच़े आणिक ऐका सद्गुण। देह झिज़विती कराया कल्याण। निजभक्तांच़ें दिनरजनीं।।९।। लाविले जन भक्तिमार्गा। आणि शिकविला स्वधर्म जगा। येथें संशय कोणता सांगा। येईल श्रोत्यांसी आतां पैं।।१०।। कीं जगासी कैंच़ा शिकविला स्वधर्म। तरी सांगतों ऐका त्याच़ें वर्म। जगामाजीं मनुष्य उत्तम। त्यासी शिकविती हो पाहीं।।११।। येथें एक येईल प्रश्न।'उत्तम मनुष्य' म्हटले ज़ाण। यांसीच़ शिकविती कृपाघन। अधमासी कां नाहीं सांगा हो।।१२।। तरी ऐसें कैसें घडेल। ज़री अधम म्हणोनि दवडील। त्यासी सद्गुरु कोण म्हणेल।

ऐसें सहसा मानूं नका।।१३।। याचें आतां ऐका उत्तर। मनुष्य हाचि उत्तम साचार। पशुपक्ष्यादि समग्र। अधम योनी त्या पाहीं।।१४।। ज़ो असे मनुष्य एक। तो ज़री अधम पापी अधिक। तरीही न दवडिती देख। सद्गुरुस्वामी ते पाहीं।।१५।। विद्या गुण गरीब श्रीमंत। कांहीं न बघती साधुसंत। केवळ त्याचा भावार्थ। पाहुनी त्यासी उद्धरिती।।१६।। ज़री नाहीं अंगीं भाव। महापातकीही असतां सदैव। येतां संनिधीं त्यां गुरुराव। कळवळोनि अंगीकारिती।।१७।। परि असावा निश्चय दृढतर। तेव्हां भक्ति उपज़े सत्वर। म्हणोनि ऐशियासी श्रीगुरुवर। कधींही न दवडिती पहा हो।।१८।। त्यांचा अवतारचि जन-उद्धारा। दुज़ें कर्तव्य नाहीं त्या गुरुवरां। सिद्धचि होऊनि राहती त्वरा। वाट पाहात भक्तांची।।१९।। ऐसी आमुची माउली ज़ाण। श्रीकृष्णाश्रमस्वामी कृपाघन। कैंच्या उपायें उद्धरावे जन। हीच चिंता त्यांलागीं।।२०।। म्हणोनि करिती नाना प्रयत्न। जगाचा उद्धार व्हावयाकारण। हेचि सांगूं कथा संपूर्ण। तुम्ही भाविक अवधारा।।२१।। श्रीस्वामी पांडुरंगाश्रम। यांसी शिष्यपट होतां उत्तम। रथोत्सव आला व्यंकटापुर[१]- ग्राम। येथें रथसप्तमीसी।।२२।। तेव्हां पांडुरंगाश्रमस्वामी। म्हणती सद्गुरुसंनिधीं आज़ मी। ज़ाऊं का व्यंकटापुर-ग्रामीं। रथोत्सवासी गुरुराया।।२३।। ऐशी प्रार्थना प्रेमपुरःसर। केली मृदुवचनें सुंदर। घातला साष्टांग नमस्कार। लडिवाळपणें गुरुचरणीं।।२४।। तेव्हां सद्गुरुराय बोलती। तेथें ज़ाऊं नये निश्चितीं। संन्यासियानें खचिती। माझ्या बाळा वेल्हाळा।।२५।। यावरी येरु बोले वचन। कासया न ज़ावें आपण।

१ व्यंकटापुर या नांवाचें खेडें शिराळीपासून दोन मैलांवर आहे. तेथें दरसाल रथोत्सव होत असतो.

रथावरी बैसेल लक्ष्मीरमण। हें पहावें ऐसें मज़ वाटे।। २६।। तेव्हां बोलती सद्गुरुराज। तूं बा नको ज़ाऊं आज़। हंसतील सारे जन तुज़। सोडीं आग्रह हा आपुला।।२७।। यावरी बोले शिष्यराय। देवा धरितों आपुले पाय। मज़ देऊनियां अभय। पाठवा तेथें कृपेनें।।२८।। रथोत्सव मज़ परम प्रिय। काय सुंदर श्रीरघुराय। बैसतां रथीं दिसे रमणीय। देखावा उत्तम तो असे।।२९।। म्हणोनि देवा सद्गुरुराया। बाळावरी कृपा करोनियां। आज्ञा द्यावी हो ज़ावया। यावेळीं व्यंकटापुर-ग्रामासी।।३०।। तेव्हां बोलती स्वामी दयाळ। नको ज़ाऊं तूं बा ये वेळ। येथेंचि करूं रथोत्सव सोज्ज्वळ। धरीं धीर आतां पैं।।३१।। ऐसे शब्द पडतां कानीं। आनंद झ़ाला त्यांच़े मनीं। जगाच़ें कल्याण होईल म्हणोनि। हर्ष झ़ाला अनिवार।।३२।। ज़री असे वय लहान। तरी सारें कळे त्यां पूर्ण। परि बळेंचि हट्ट धरिला ज़ाण। जगदोद्धाराकारणें।।३३।। कीं आपण न ज़ावें ऐसें शास्त्र। विदित असोनि पंकजनेत्र। सिद्ध झ़ाले ज़ावया अन्यत्र। स्थळीं उत्सव पहावया।।३४।। ऐसा धरितां आग्रह आपण। ओळेल सकळांवरी कृपाघन। येथेंचि रथोत्सव करतील म्हणोन। लडिवाळपणें घेती हट्ट।।३५।। यांत जगाच़ा काय उद्धार। म्हणाल तरी ऐका उत्तर। धर्मकार्यें करितां थोर। येती जन पहावया।।३६।। उत्सवमिसें येती बहुत। मठामाजीं त्यानिमित्त। देवाच़ा विनियोग बघाया त्यांप्रत। मिळे सहज़चि सकलांसी।।३७।। बघतां उत्सव प्रेमपूर्वक। भक्ति वृद्धि पावे साहजिक। अभक्तांचीं पापें अनेक। नाशुनी तेही भक्त होती।।३८।। कामुकांची कामना पुरेल। निष्कामियांसी ज्ञान होईल। ऐसा उत्सवाच़ा महिमा अढळ। असे ज़ाणा तुम्ही हो।।३९।। म्हणोनि उत्सवाच़ा त्यांनीं छंद। घेतला, त्यांच़ें अंतर

शुद्ध। झाला तयांसी परमानंद। निजमानसीं त्या समयीं।।४०।। आणिक घडे स्वामींचें दर्शन। दर्शनें होय पाप दहन। पाप नासतां ब्रह्मज्ञान। होय संशय ना कांहीं।।४१।। पाप सारें नासुनी ज़ातां। चित्त शुद्ध होय तत्त्वतां। तेणें होय परमार्था। योग्य तो नर त्या वेळीं।।४२।। तैसेंच बहुविध उत्सव। बघतांही पाप नासे सर्व। तेणें प्रगटे सात्त्विक भाव। कैसें तें सांगूं अणुमात्र।।४३।। देवाचा बघतां उत्सव थोर। अथवा गुरुदर्शन वारंवार। घडतां शांत होय मन स्थिर। पहा कैसें तें सांगूं।।४४।। तेथें नसे अन्य विचार। शुद्ध सात्त्विक तेथील आचार। केवळ सत्कर्मेंचि सुखकर। आनंदचि होय त्यामाजीं।।४५।। सत्कर्मांमाजीं रजोगुण। किंवा नसे तमोगुण। सत्त्वगुणचि भरला पूर्ण। त्या क्रियेमाझारीं।।४६।। तसबीर घ्यावयाचें यंत्र। ठेवितां ज्या ज्या स्थळीं समोर। टक् करितां उमटे समग्र। फिल्मावरी तत्काळ।।४७।। तैसें येथें देहरूप। कॅमेरायंत्र ठेवितां समीप। बुद्धि फिल्म यावरी आपोआप। उमटती भाव सारे पैं।।४८।। रज-तमाच्या पाहतां क्रिया। मनावरी उमटती भाव ते आपसया। सत्त्वगुणाच्या कार्या। बघतां सात्त्विक भाव उमटती।।४९।। म्हणोनि सत्त्वगुण वाढवावया। सत्कर्में वरिवरी दावावीं डोळियां। तेव्हां चित्त शुद्ध होऊनियां। होय ज्ञान तात्काळ।।५०।। प्रपंचीं येती प्रतिबंध अनेक। ज़री असे तो परम भाविक। न मिळे ज़ावया मठासी देख। तळमळे अंतरीं तेणें तो।।५१।। म्हणोनि ठेवितां ऐसा उत्सव। तया निमित्तें येती सर्व। तेव्हां लाभ होय अपूर्व। सत्कर्में तेवीं सद्गुरुदर्शन।।५२।। घडीघडी ज़री दर्शन होय। प्रेम उद्भवे तेथें निश्चय। गुरुप्रेमें सोडी दुर्विषय। ज़री तो असे मंदमति।।५३।। त्यागितां दुर्विषयांची प्रीति। सहज़चि घडे

स्वधर्म निश्चितीं। स्वधर्में चालतां तयाप्रती। मुमुक्षुत्व अंगीं येतसे।।५४।। मुमुक्षुत्व येतां अंगीं। उपरी साधकदशा ये वेगीं। मग ब्रह्मज्ञान तयालागीं। सद्गुरुकृपें होय झणीं।।५५।। म्हणोनि पांडुरंगाश्रमगुरूंनीं। जगदोद्धारार्थ हट्ट धरूनी। रथोत्सवाचें कार्य तें झणीं। करविलें जाणा प्रेमानें।।५६।। श्रोते येथें करितील प्रश्न। हल्लीं कां उत्सव टाकिला काढोन। काय सांगा त्याचें कारण। आम्हांलागीं निश्चयेंसीं।।५७।। तरी त्यांतही जनांचें हित। पाहुनी केलें कार्य समस्त। जैसी परिस्थिती ज्या काळीं असत। तैसें करणें हें योग्य।।५८।। सत्पुरुष जें जें करिती। तें तें योग्यचि असे निश्चितीं। सदा सर्वदा त्यांच्या चित्तीं। कल्याण व्हावें जनांचें।।५९।। त्याचें करूं पुढें विवरण। नवम आश्रमाचें सांगतां आख्यान। प्रस्तुत करूं हेंचि कथन। रथोत्सवाची पूर्ण कथा।।६०।। असो कृष्णाश्रमस्वामींनीं। विचार केला आपुल्या मनीं। शिष्याचा हेतु अंतरीं समजोनी। केली सिद्धता सारी पैं।।६१।। करितां ऐसा रथोत्सव। परमार्थलाभ घेतील सर्व। हा शिष्याचा अंतर्भाव। सत्यचि असे उत्कृष्ट।।६२।। ऐसा हेतु धरोनि अंतरीं। करविला रथ सुंदर भारी। तेचि वर्षीं पहा सत्वरी। चैत्र शुद्ध पौर्णिमेसी।।६३।। परम उत्कृष्ट केला उत्सव। बघाया आले जन सर्व। उत्सव बघोनि अपूर्व। आनंद जाहला सकलांसी।।६४।। ऐसा उत्सव इतुका सुंदर। कवण्या स्थानींही नसे साचार। बघतां चित्त होय एकाग्र। काय सांगूं नवलाई।।६५।। आतां करूं त्याचें वर्णन। परिसा आपुलें चित्त देऊन। ऐकतां पापें होती दहन। इतुकें पुण्य त्यांचें पैं ।।६६।। चैत्र शुद्ध दशमीपासुनी । आरंभ होय उत्सवालागुनी। कैसा तो सावध ऐका झणीं। करूं वर्णन

अणुमात्र।।६७।। दशमीच्या दिवशीं गरुडस्तंभ। पुज़ूनि करिती उत्सवारंभ। जन अपार येउनी लाभ। घेती त्या उत्सवाच़ा।।६८।। दशमीपासुनी चतुर्दशीवरी। पांच़ दिवस पालखीमाझ़ारीं। भवानीशंकर देवासी निर्धारीं। बसवुनी मिरविती प्रेमानें।।६९।। माध्यान्हीं आणि रात्रीं देख। करिती उत्सव सुरेख। पुराण प्रवचन कीर्तन सकळिक। भजन अष्टाविधानसह।।७०।। दोन्ही वेळां दुपारीं रात्रीं। देवबली देती ते अवसरीं। तैशा उत्सवाची थोरी। वर्णूं न शके कवणही।।७१।। ते वेळीं ज़ें वाद्य वाज़विती। परम मधुर ऐकाया अति। आनंद न समावे चित्तीं। बहु प्रेमळ उत्सव तो।।७२।। ग्रामोग्रामींच़े येती जन। तेथेंचि सर्वां उपहार आणि भोजन। गरीब-श्रीमंतां सर्वां समान। घरच्यापरीच़ हो सारें।।७३।। म्हणोनि सारा दिवस त्यांच़ा ।सत्कर्में पहाया ज़ाय साच़ा। भार न लागे संसाराच़ा। राहती ज़ोंवरी तेथें पैं।।७४।। माहेराहुनी अधिक होय सुख। अणुभरी मनासी नाहीं दुःख। तेणेंचि होय परमार्थ च़ोख। साऱ्या भक्तजनांच़ा।।७५।। असो बहुविध उत्सव थोर। पौर्णिमेदिवशीं रथोत्सव सुंदर। ओढिती रथ प्रेमपुरःसर। दिपती डोळे बघतांचि।।७६।। उत्सव संपूर्ण होई तोंवरी। सहस्रभोजनें तृप्त करी। न्यूनता न पडे अणुभरी। कवण्याही कार्यासी।।७७।। करितां सारें वर्णन। ग्रंथ वाढेल अमितचि ज़ाण। एवं निजभक्तांकारण। देह झिज़विती श्रीस्वामी।।७८।। यांत नाहीं अणुमात्र संदेह। कित्येक आपुल्या परिवारासह। येती बहुत भक्तसमूह। रथोत्सव बघण्यासी।।७९।। सर्व जनांसी समान बघोनि। दर्शन देती त्यांलागोनि। करिती सारी व्यवस्था झ़णीं। अन्नपाण्याची त्या समयीं।।८०।।

केवळ भक्तप्रेमासाठीं। सहन करिती सर्व गोष्टी। उद्धारावया उठाउठी। झिज़विती शरीर आपुलें हें।।८१।। क्षुधा तृषा शीत उष्ण। सहन करिती भक्तांकारण। एवं करिती सर्वांचें रक्षण। मातेपरी प्रेमानें।।८२।। यापरी सारे भक्तमनोरथ। पुरविती आळस न करितां किंचित। ऐसे स्वामी सद्गुरुनाथ। कष्टविती देह दिनरजनीं।।८३।। ते निजभक्तांसाठीं। सर्वही करिती कार्यें मोठीं। सांगावया न ये ओठीं। आम्हां अज्ञ मानवांसी।।८४।। ज़ें ज़ें मागती आपुले भक्त। तें तें देती सद्गुरुनाथ। त्यांच्या इच्छेपरी वर्तत। अति उत्साहें हो पाहीं।।८५।। इच्छेपरी वागती म्हणुनी। भलतेंचि सांगतां न घेती कानीं। विचारपूर्वक विहित करणी। करिती सर्व कृपेनें।।८६।। नाहीं त्यांसी मानावमान। परि न सोडिती स्वाभिमान। हेंचि ज्ञानियांचें लक्षण। शुद्ध मन त्यांचें हो।।८७।। असावा आपुला स्वाभिमान। दुरभिमान द्यावा सोडून। हेंचि शिकावें आपण। सद्गुरुस्वामींकडूनियां।।८८।। असो माता पुरवी मुलाचा हट्ट। भलतेंचि मागतां येई वीट। म्हणे भारी माज़ला चावट। थोबाडीं देत क्रोधानें।।८९।। तैसी आमुची श्रीगुरुमाय। भक्तांचे मनोरथ पुरवी निश्चयें। परि दुष्कर्में दुर्विषय। येथें ज़ाऊं नेदी त्यां।।९०।। प्रवचनरूप काठी घेउनी। बडवी आपुल्या भक्तांलागुनी। स्वधर्म सत्कर्म दावी झणीं। इच्छा करितां तत्काळ।।९१।। असो ऐसी सद्गुरुमाय। निजभक्तांचें करी कार्य। म्हणोनि रथोत्सव करिती सदय। कृष्णाश्रमस्वामी ते।।९२।। ऐसें ज़े करिती सत्कार्य। तें आपुल्यासाठीं नव्हे हा निश्चय। पुन्हां पुन्हां सांगावें काय। भक्तांसाठीं म्हणोनियां।।९३।। पुढील अध्यायीं कथा सुरस। सांगूं महिमा अद्भुत तुम्हांस।

ऐकतां पापें पावतील नाश। नाहीं संशय यामाजीं ।।९४।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें अष्टाविंश। अध्याय गुरुदासें संपविला।।९५।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां होईल ब्रह्मज्ञान थोर। अष्टाविंशाध्याय रसाळ हा।। ९६।। अध्याय २८ ।। ओंव्या ९६।। ॐ तत्सत् श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति अष्टाविंशोऽध्यायः समाप्तः।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

।। श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीकृष्णाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय सद्गुरु निर्विकारा। कैसा ओलांडूं या भवसमुद्रा। तूंचि सांग बा यतींद्रा। निजबाळालागीं पैं।।१।। जगामाजीं कांहीं एक। सत्य न दिसे मज़ला देख। ज़री विषय आले सन्मुख। सेवावे ऐसें न वाटे।।२।। परि ज़ें सत्यस्वरूप असे। त्याचें ज्ञान मज़ला नसे। कीं भरलें अंतरीं विकल्प-पिसें। तेव्हां कैसें समज़ेल।।३।। ज़ोंवरी असे विकल्प थोर। तोंवरी अज्ञान निरसेना साचार। मग कैंचा आत्मविचार। दृढ होय सांग बापा।।४।। म्हणोनि देवा कृपा करुनी। सोडवीं विकल्प-ज़ाळयामधुनी। हेचि प्रार्थना असे तव चरणीं। प्रभो देवा कृपाघना।।५।। तुझी लीला परम अद्भुत। न समज़े ती कवणाप्रत। करावयासी विकल्पघात। उशीर कैंचा तुज़लागीं।।६।। तुझ्या सत्तेवांचुनी जगीं। कोणती क्रिया होय ती वेगीं। ज़री झाला असे तो त्यागी। काय उपयोग त्याचा हो।।७।। तुज़ला विसरुनी नाना प्रयत्न। ज़री केले न सोडितां क्षण। तरी निष्फल होती ते ज़ाण। सद्गुरुराया दयाळा।।८।। ज़री सोडिले विषय सारे। गोड न वाटती अणुमात्र खरे। परि देवा तुज़ला ज़ो विसरे। काय उपयोग त्याचा पैं।।९।। तूंचि एक सत्यस्वरूप। असोनि आमुच्या बहुत समीप। त्यागुनी ज़ातों धुंडाया खूप। जिकडे तिकडे हो पाहीं।।१०।। एवं तुझ्या प्रेमावांचुनी। काय उपयोग विषय त्यागुनी। ऐसें रहावें कासया धरणीं। धिक् धिक् जिणें हें आमुचें।।११।। सकलविद्यापारंगत। दिनरजनीं बडबडे वेदान्त। परि सद्गुरुप्रेमावांचुनी व्यर्थ। काय करावा तो घेवोनी।।१२।। त्यांत आणिक अधिकचि बापा। अभिमान वाढुनी घालितों खेपा। जन्म-मरणाचा मार्ग सोपा। लक्षचौऱ्यांशीं

योनींच़ा।।१३।। म्हणोनि सद्गुरुभक्ति श्रेष्ठ। तेणें अभिमान होय नष्ट। सांपडे सत्स्वरूपाची वाट। तत्काळचि हो पाहीं।।१४।। म्हणोनि देवा करुणासागरा। तुझ्या प्रेमाच़ा देईं आसरा। तेव्हांचि येईल चित्तासि थारा। म्हणोनि मागतों प्रेम तुझें।।१५।। असो आतां श्रोते हो सज्जन। मागील अध्यायीं केलें निरूपण। पांडुरंगाश्रमा निमित्त करोन। रथोत्सव केला सद्गुरूंनीं।।१६।। ऐसी ती सद्गुरुमाउली। मत्सर नाहीं कवणाज़वळी। निंदा केली ज़री कोणीं आपुली। त्यावरीही ना द्वेष।।१७।। यावरी एक सांगूं आतां। परम सुंदर सुरस कथा। इकडेचि लावा आपुल्या चित्ता। तुम्ही सज्जन श्रोते हो।।१८।। कार्तिक शुद्ध पौर्णिमेसी। वनभोजन असे त्या दिवशीं। चित्रापुर-मठाची पालखी परियेसीं। ज़ाई दूरवरी मिरवीत।।१९।। वनभोजनासाठीं पाहीं। पालखी लांबवरी नेती सर्वही। रात्र होई तोंवरी राही। पालखी सुंदर त्या स्थानीं।।२०।। मग दीपोत्सवासहित तेथूनि। पालखी येत बाज़ारांतूनि। दुकानदार आरती आणि। नारळ केळीं अर्पिती।।२१।। मग घेऊन देवाच़ा प्रसाद। गृहासी ज़ाती पावुनी आनंद। ऐसी च़ाल असे प्रसिद्ध। दुकानदार यांची हो।।२२।। एके वर्षीं श्रीकृष्णाश्रम। यांच्या कालीं पालखी उत्तम। सज़वुनी नेली ओलांडुनी ग्राम। भवानीशंकर देवाची।।२३।। त्या दिवशीं वनभोजन। वर्षापरी रात्र करोन। पालखी आणिली मिरवीत ज़ाण। ग्रामामाजी ती पाहीं।।२४।। परि तेथील दुकानदार। आपसामाजी करिती विचार। कीं आज़ आम्ही करूं निर्धार। न लावूं दीप बाज़ारीं।।२५।। नये देऊं नारळ केळीं। आणि आरतीही नको या वेळीं। न देतांचि गृहाज़वळी। ज़ाऊं झडकरी आम्ही हो।।२६।।

इतुकें बोलुनी ते दुकानदार। ज़ाती आपुल्या गृहामाझार। इतुका कासया द्वेष साचार। त्यांना,ऐका श्रोते हो।।२७।। कांहींएक कारणास्तव। क्षोभले होते मठावरी सर्व। म्हणोनि धरुनी अंतरीं सर्व। गेले पळोनि आधींच़।।२८।। ग्रामांतुनी पालखी आली। जनांच्या आरत्या नारळ केळीं। घेउनी येत बाज़ाराज़वळी। परि तेथें अंधार।।२९।। कवाडें सारीं बंद करोनी। कुलुपें लाविलीं सर्व दुकानीं। मग कैंच़े दीप त्या स्थानीं। कोण लाविती प्रेमानें।।३०।। ऐसें देखुनी पालखी घेऊन। पुढें गेले सर्वही जन। मठामाजीं पोहोंच़तां ज़ाण। कथिली वार्ता स्वामींसी।।३१।। कीं तेथें बाज़ारामाजीं। दिवेचि न लाविले आजि। ऐसें ऐकतां बोलती गुरुजी। कृष्णाश्रम-श्रीस्वामी।।३२।। भवानीशंकर देवालागीं। जितुका प्रकाश पाहिजे या जगीं। तितुका तोचि उज़ळुनी वेगीं। घेतो आपणचि पाहीं पां।।३३।। ऐसे शब्द श्रीस्वामींनीं। उच्चारितां मुखांतुनी। तत्क्षणीं लागला बाज़ारासी अग्नि। कळलें व्यापाऱ्यांलागीं पैं।।३४।। तोंच़ उठले सकल जन। भ्यालें त्यांच़ें अंतःकरण। श्रीस्वामींच़ा क्षोभ समज़ोन। गेले सत्वर मठांत।।३५।। स्वामींसी प्रार्थना करिती ते नर। म्हणती देवा अज्ञ पामर। नकळे सारासार विचार। मूर्ख आम्ही निश्चयेंसीं।।३६।। मठाच्या जनांवरी आला क्रोध। परि तो दाविला देवासंनिध। ऐसा आमुच़ा थोर अपराध। क्षमा करावी गुरुराया।।३७।। ऐकुनी ऐसें करुणावचन। स्वामी सद्गुरु चैतन्यघन। द्रवलें त्यांच़ें अंतःकरण। कोमल ज़ाण तें पाहीं।।३८।। झणींच़ पाठविले मठाच़े ब्राह्मण। विस्तव विझ़वावयासी तेथून। आज्ञेपरी ज़ाउनी ते जन। विझ़विते झ़ाले विस्तव तो।।३९।। त्याउपरी बोलती

सद्गुरु-। स्वामी ते करुणासागरु। म्हणती तुमचा नाहीं थोरु। अपराध बापा खचितचि।।४०।। ज़ैसें असे ज्याचें प्रारब्ध। त्यापरी बुद्धि होय बहुविध। परमेश्वर असे तो शुद्ध। नाहीं त्यासी क्षोभ कधीं।।४१।। न करी तो कुणाचें अकल्याण। सदा सर्वदा असे प्रसन्न। नाहीं त्यासी मानावमान। भिऊं नका हो तुम्ही।।४२।। ऐसें ऐकतां सद्गुरुवचन। व्यापाऱ्यांचें संतोषलें मन। करोनि चरणीं साष्टांग वंदन। भाकिली करुणा तयांनीं।।४३।। मग विस्तव विझवोनि। आले जन मठीं परतोनि। आनंदले दुकानदार स्वमनीं। कळली महिमा स्वामींची।।४४।। पहा कैसी सद्गुरुमाय। ज़री आला अपमान-समय। तरीही न क्षोभे त्यांवरी सदय। नाहीं मत्सर त्यांसी पैं।।४५।। तरी कासया लागला अग्नि। स्वामींच्या एका वाक्यावरुनी। पुसाल तरी सांगतों झणीं। ऐका सावध श्रोते हो।।४६।। नाहीं दिधला स्वामींनीं शाप। अणुमात्र आला नाहीं कोप। भरला प्रकाश देवासमीप। भक्तिभावेंचि बोलिले।।४७।। कीं भवानीशंकर देवालागीं। जितुका प्रकाश पाहिजे या जगीं। तितुका तोचि उज़ळुनी वेगीं। घेतो आपणचि पाहीं पां।।४८।। तरी ऐका याचा भावार्थ। कीं भवानीशंकर असे समर्थ। आपुल्या प्रकाशेंचि यथार्थ। उज़ळील दीप तो पाहीं।।४९।। त्याच्या प्रकाशेंचि हें जग। चाले सर्व व्यवहार, काय मग। त्यासी द्यावा कोणीं सांग। प्रकाश दीप उज़ळोनि।।५०।। सूर्य देई जनांसी प्रकाश। त्यापुढें अंधार न राहे खास। तैसा शंकर स्वयंप्रकाश। त्यासी कोणीं प्रकाशावें।।५१।। दीप-सूर्य-जग सकलही। त्याच्याच प्रकाशें भासे पाहीं। ऐशा त्यासी कवणही नाहीं। प्रकाशदाता त्रिभुवनीं।।५२।। ऐसे हे प्रेमाचे उद्गार। स्वामि-मुखांतुनी आले सत्वर। असे प्रेमळ कोमल अंतर। नाहीं अणुमात्र

कोपले ते।।५३।। परि आपुल्या भक्तांचा महिमा। वाढवावया शंकर-उमा। यांनींच दाविलें पराक्रमा। परि हानी न केली कवणाची ।।५४।। दुकानदार निश्चयें पाहीं। देवगुरूवरी क्षोभले नाहीं। मठाच्या लोकांचा अपराध कांहीं। हुडकुनी क्षोभले होते ते।।५५।। जेव्हां कळला तेथील पराक्रम। अहंकारासी ठोकला रामराम। तेव्हांपासुनी धरोनि नेम। भजती मठासी ते जन।।५६।। अद्यापवरी भक्तिप्रसार। सारिखा त्यांचा चालिला परिकर। एवं आमुच्या मठासी ते नर। दुकानदार भजती पैं।।५७।। असो यापरी सद्गुरुस्वामी। क्षमा शांति धरुनी अंतर्यामीं। देह झिजविती नेहमीं। निजभक्तांच्या कार्यासी।।५८।। ऐसें करितां करितां सहज। झाले वृद्ध सद्गुरुराज। संपलें त्यांचें अवतार-काज। म्हणोनि बोलविती शिष्यासी।।५९।। म्हणती बाळा पांडुरंगा। जाण तूं नश्वर साऱ्या जगा। तेवीं येथील सर्वही भोगा। कैसें सत्यत्व असेल बा।।६०।। सर्व तुजला असे विदित। आम्हीं सांगावें नाहीं लागत। तूं अससी साक्षात् दत्त। नाहीं संशय यामाजीं।।६१।। परि सांगतों जग-हितार्थ। धरीं आपुल्या चित्तीं सतत। स्वधर्म-प्रसार करीं तूं बहुत। जननिंदेसी पाहूं नको।।६२।। सारें जग हें ब्रह्मरूप। ऐसें धरावें मनीं अमूप। जें जें दिसे भासे समीप। तें तें नश्वर समजावें।।६३।। केवळ एकचि ब्रह्म आपण। अंतरीं धरावा विचार पूर्ण। परि न करावें शास्त्रबाह्य आचरण। एक म्हणोनि कदापिही।।६४।। एक म्हणोनि स्वधर्म सोडुनी। परधर्म न करावा कोणी। विधिनिषेध सर्वही समजुनी। करावा व्यवहार तो पाहीं।।६५।। पहा अलंकार असती बहुत। परि एकचि सुवर्ण त्यांत। तैसा भाव धरावा मनांत। कीं हें जग ब्रह्मरूप।।६६।। परि त्या सुवर्णाचें आभरण। अंगावरी करितां

धारण। तेथें भेदचि धरावा, कारण। काय तें सांगूं आतांचि।।६७।। सारें सुवर्णचि म्हणोनि। जेथें घालावें तेथें सोडूनि। अन्य स्थळीं घालितां कोणी। म्हणतील त्यासी वेडा हा।।६८।। गळां घाली हार कंठी। अंगुळीं घालितसे अंगुठी। कर्णीं भिकबाळी गोमटी। ऐसेंच़ करी तो पाहीं।।६९।। पुरुष न घाली बांगड्या-बुगड्या। स्त्रिया न घेती भिकबाळ्या ज़ाड्या। ऐसें करितां म्हणतील वेड्या। काय सोंग हें म्हणोनियां।।७०।। म्हणोनि ज़े दागिने जेथ। आणि ज्यांनीं घालावे निश्चित। तैसेंचि करिती जन यथार्थ। परि अंतरीं असे सुवर्णभाव।।७१।। संदुकामाजीं ठेवितां आपण। सुवर्णचि ऐसा भाव धरोन। ठेवितों एवं करितों रक्षण। सुवर्णाच़ें निर्धारें।।७२।। अलंकारापरी आपण। स्वधर्माच़ा राखावा मान। ज़ैसें करावें तैसेंच़ वर्तन। ठेवावें व्यवहारीं सर्वांनीं।।७३।। दागिने ज़ैसे पृथक् पृथक्। तैसा व्यवहार करावा च़ोख। मनामाजीं सुवर्ण एक। तैसें परब्रह्म बघावें।।७४।। ठेवावा भाव सुवर्णाच़ा। तैसा अंतरीं भाव ब्रह्माच़ा। आणिक एक चमत्कार साच़ा। सांगतों ऐक बाळा तूं।।७५।। अंगावर घालितां अलंकार। तेव्हांही सुवर्णचि भासे साचार। सुवर्णासी न विसंबे निरंतर। असे निश्चय त्याच़ा पैं।।७६।। तैसें येथें स्वधर्म थोर। व्यवहार करितांही निरंतर। ब्रह्मभाव न विसरें साचार। सारें ब्रह्मचि तूं पाहीं।।७७।। देहभाव सोडुनी एक। ब्रह्मभाव निश्चयात्मक। धरोनि स्वधर्मापरी देख। वर्तावें आपण प्रेमानें।।७८।। त्यापरीच़ जनासी ज़ाण। करोनि द्यावें स्वधर्मज्ञान। तेव्हां समज़ेल परमार्थ सघन। सहज़चि त्यांसी त्या समयीं।।७९।। असो आतां सारा स्वधर्म। शिकवुनी जनांसी आणिक नेम। घालुनी

द्यावा त्यांसी उत्तम। न धरिं भीड त्यांपाशीं।।८०।। असो यापरी श्रीकृष्णाश्रम। स्वामी आमुचे परम उत्तम। अधिष्ठानासहित सांगुनी स्वधर्म। निघाले ज़ावया निजधामा।।८१।। त्यांनीं जितुका केला बोध। तितुका सांगाया मी मतिमंद। अणुमात्र कथिला त्यांतचि आनंद। मानावा आपण श्रोते हो।।८२।। पहा आतां सूर्यासमीप। काय करावा लहान दीप।परि रात्रीं तोचि खूप। होय उपयोग तयाचा।।८३।। तैसें येथें सद्गुरुस्वामी। नसती ज़री आमुच्या ग्रामीं। तरी त्याचा उपयोग आम्हीं। करूनि घेतां येईल।।८४।। जेव्हां होईल स्वामींची भेट। तेव्हां आपण ऐकूनि नीट। त्यांचा बोध न्यावा थेट। अंतःकरणामाजीं पैं।।८५।। असो सतराशें पंचायशीं शक। रुधिरोद्गारी संवत्सर सुरेख। मार्गशीर्ष अष्टमीसी देख। झाले कृष्णाश्रम मुक्त पहा।।८६।। मग करोनि विधिपूर्वक। समाधि दिधली मठीं सुरेख। उत्तराभिमुख समाधि सकळिक। तेथील दुसरी हीच असे।।८७।। असो ऐशी सद्गुरुमाउली। जगाच्या कल्याणा अवनीं आली। तितुकें करोनि पावली। अंतर्धान ती पाहीं।।८८।। पहा करोनि जनांचा उद्धार। संपविला आपुला अवतार। ऐशी मूर्ति प्रेमळ सुखकर। तिचिया चरणीं नमन असो।।८९।। श्रीकृष्णाश्रम सप्तम आश्रम। झालें अवतारकार्य सुगम। दाविला जनांसी मार्ग उत्तम। सुलभ करोनि सकलांसी।।९०।। यापरी करोनि प्रेमानें यांनीं। शके सतराशें एकसष्टापासुनी। पंचायशींवरी जगीं राहोनी। स्वधर्मराज्य चालविलें।।९१।। पुढील अध्यायीं अष्टम आश्रम। पांडुरंगाश्रमस्वामी परम। सद्गुणी माउली चालवील स्वधर्म-। राज्य सारस्वतवृंदाचें।।९२।। त्यांची कथा परम रसाळ। ऐकतां तल्लीन होतील प्रेमळ। महिमा

वर्णूं न शके हा बाळ। अज्ञ पामर निश्चयेंसीं।।९३।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ एकचि खास। यांच्या कृपाप्रसादें एकोनत्रिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।९४।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां निमती दोष समग्र। एकोनत्रिंशाध्याय रसाळ हा।।९५।। अध्याय २९।। ओंव्या ९५।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति एकोनत्रिंशोऽध्यायः समाप्तः।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

मनुष्यजन्म दुर्लभ। येथेंचि करावा परमार्थ लगबग।
दाविती सद्गुरु मार्ग सुलभ। जावें आपण त्या पंथें।।

भक्ति-प्रेम हेंचि श्रेष्ठ। त्यावीण अनेक साधनें उत्कृष्ट।
केली जरी नाना खटपट। तरी निष्फळ तें सारें।।

- श्रीमत् पांडुरंगाश्रम स्वामीजी

परमपूज्य पांडुरंगाश्रम स्वामिजींची समाधि (चित्रापुर मठ)

शिवगंगा सरोवर (चित्रापुर मठ)

।। श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीपांडुरंगाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।।

श्रीमत्परमहंस अष्टम। श्रीसद्गुरु ''पांडुरंगाश्रम-। स्वामी गुरुमहाराज की जय'' प्रथम।
बोलुनी वंदन करूं तुज़ला।।१।।

मद मत्सर आणि लोभ। काम क्रोध मोह दंभ। हे षड्रिपु, हाचि चित्तीं सूक्ष्म कोंब।
करी विघ्न परमार्था।।२।।

तमोगुण अंगीं फार। म्हणोनि कामादिक हे दुस्तर। माज़ुनी राहिले करोनि घर।
हृदयांतरीं या माझ्या।।३।।

परि ते करितां थोर प्रयत्न। तव कृपेनें ज़ातील पळून। तरी देवा आणिक लपून।
बैसला एक अनिवार।।४।।

रजोगुण हाचि पाहीं। त्याहुनी विशेष अधिकचि राही। चंचळ अवघें मन हें होई।
न स्थिरे कांहीं क्षण एक।।५।।

मर्कटापरी विषय-फळासी। बघुनी झोंबे मन हें दिननिशीं। तेव्हां काय करावें यासी।
तूंचि सांगें बा मज़ला।।६।।

हंबरतां वत्स धेनु धांवे। तैसा तूं भक्तां पावसी स्वभावें। ऐशा तुज़ला कैसें विसरावें।
सद्गुरुराया कृपाघना।।७।।

सद्विचार तुज़वांचोनी। कवणही सांगूं न शके त्रिभुवनीं। म्हणोनि तूं अवतार घेउनी।
येसी भक्तकार्यासी।।८।।

श्रीपाद श्रीवल्लभ। तूंचि भेटलासी भक्तां सुलभ। घेतला सकलांनीं अमितचि लाभ।
योग्यांसही दुर्लभ तूं।।९।।

पांडुरंगाश्रम नाम सुंदर। घेउनी आलासी येथें भूवर। करावया जनांचा उद्धार।
झिज़विला देह हा आपुला।।१०।।

डुलतचि रहावें ऐसें वाटे। तुझें गुण गातां ऐकतां नेटें। निरतिशयानंद स्वयें भेटे।
ऐसे गोमटे गुण तुझें।।११।।

रंग आला तूं येतांचि। उन्नति झाली आमुच्या मठाची। भक्ति वाढली बहुत जनांची।
वर्णूं न शकें तव गुण बा।।१२।।

गातां तुझें सद्गुणगान। वृत्ति होय बहु तल्लीन। ऐसें तुझें सद्गुरो! महिमान।
न कळे आम्हां अज्ञांसी।।१३।।

श्रवण करितां आपुली कीर्ति। सारी फिटूनि ज़ाय भ्रांति। ऐसी ऐकिली तव प्रख्याति।
सद्गुरुस्वामी दयाळुवा।।१४।।

मनीं ध्यातां तुझी मूर्ति। विषय खोटे निश्चित वाटती। अहाहा काय तव अद्भुत शक्ति।
नवलाई तुझी गुरुनाथा।।१५।।

स्वानंद-साम्राज्य तुझें सारें। त्यावरी राज्य ना आणिक दुसरें। म्हणुनी 'सद्गुरुमहाराज' तुज़ रे।
म्हणती सकलही प्रेमानें।।१६।।

मीपणरूप शत्रु मारुनी। स्वस्वरूप-राज्य घेतलें तूं झणीं। साऱ्या जगाचा तूंचि बा धनी।
अससी निश्चयें गुरुराया।।१७।।

गुरुराज-संनिधीं केला वास। बाळपणींच घेउनी संन्यास। परमार्थमार्गीं अति हौस।
ऐसा गुरुनाथ तूं माझा।।१८।।

रुज़ला सद्गुरुबोध हृदयीं। कांहीं केल्या तो नच ज़ाई। झालासि निमग्न तूं त्या ठायीं।
सच्चित्स्वरूपामाजीं हो।।१९।।

मग काय सांगूं सदया। उणीवता नसे आम्हां जगीं या। शरण ज़ातां आपुल्या पाया।
नाहीं भय तें अणुमात्र।।२०।।

हाताज़वळी असतां अन्न। भुकेला जेवीत सहज़चि आपण। तैसा तूं असतां संनिध ज़ाण।
बोधामृतासी ना तोटा।।२१।।

राहे ज़री अन्नाच्या डोंगरीं। अज्ञ बालक तें नेणे अंतरीं। भूक लागतां रडतसे भारी।
भलतेंचि मागे खावयासी।।२२।।

ज़र असे तो बुद्धिवंत। खटपट करूनि जेवी त्वरित। एवं भुकेचें शमन करीत।
आपुल्या ज्ञानें देहाचें।।२३।।

कीड मुंगी सारे जीव। पोटासाठीं झटती सर्व। मग कैसा भुकेला मानव। दवडील अन्न रुचकर तें।।२४।।

ज़री आम्हां पाहिजे बोध। तरी बाहेर कां करावा शोध। तूं असतां आम्हां संनिध। कोण दवडील ही संधि।। २५।।

यथार्थ करितां श्रवण। तव कृपें उणीवता नाहीं ज़ाण। म्हणोनि आलासि देवा तूं धांवून। निजभक्तांसी ताराया।। २६।।

'हंस' पक्षी क्षीर-नीर। एकत्र असतां दूध साचार। दूधचि गिळुनी समग्र। पाणी सारें सोडी पैं।।२७।। तैसे स्वामी-सद्गुरुवर। 'परम' म्हणजे उत्कृष्ट थोर। सत्य हें धरी निरंतर। त्याग तो करी मिथ्याचा।।२८।। म्हणोनि देवा तुज़ला खास। म्हणती निश्चयें 'परमहंस'। ऐसें संत वदती सुरस। स्वामी तुज़ला कृपाघना।।२९।। ऐशी तव मूर्ति सुंदर। केला निजभक्तांचा उद्धार। त्यापरीच देवा मज़वर। करीं कृपा गुरुराया।।३०।। अणुमात्र तुझें करावें वर्णन। म्हणोनि सरसावलों ज़ाण। परि तूं देवा कां बा येऊन। स्फूर्ति न देसी कवनातें।।३१।। मज़ला नाहीं भक्ति म्हणोनि। न येसी कीं सांग तूं झणीं। अथवा विश्वास नाहीं चरणीं। म्हणूनि न येसी कीं सांगें।।३२।। बाळाच्या अंगीं बहुत दुर्गुण। म्हणोनि मातेनें देतां टाकून। कुठें ज़ाईल बाळ तें अज्ञ। सांग देवा दयाळा।।३३।। एकाची भक्ति परम थोर। एक किंचित करी तो नर। मी तरी अभक्तचि खर। परि तूंचि होसी उद्धर्ता।।३४।। अज्ञ म्हणोनि टाकितां आपण।

कवणासी ज़ाऊं आतां शरण। जगीं नाहीं सद्गुरूवीण। अन्य त्राता मानवांसी।।३५।। म्हणोनि देवा तुज़चि शरण। आलों उद्धरीं मज़लागोन। एकचि मागतों आतां ज़ाण। देईं देवा निजभक्ति।।३६।। अष्टम हीच़ 'सख्य' भक्ति। आणि देईं बा तूं विरक्ति। तैसीच़ देईं निजसुख-शांति। ऐसी प्रार्थना तव पायीं।।३७।। असो आतां सद्गुरुदेवा। करवीं ग्रंथ पूर्ण ही सेवा । देउनी स्फूर्ति निश्चय बरवा। करवीं कार्य मज़कडुनी।।३८।। तुज़ काय असाध्य जगतीं। अवतार अससी त्रैमूर्ती। यांत संशय नाहीं चित्तीं। प्रभो दयाळा गुरुराया।।३९।। रज-तम-सत्त्व मिळोनि। एकचि ऐसें दाविलें जनीं। एवं त्रिगुणातीत असोनि। आलासि येथें अवनीं या।।४०।। ऐसा तूं माझ़ा दत्तात्रेय। प्रगटला जगदोद्धारा सदय। महिमा तुझी अवर्णनीय। कैसी वर्णूं बा देवा।।४१।। मी काय वर्णूं ताता। तूंचि सर्वही कर्ता करविता। माझ्या जिव्हाग्रीं बैसुनी आतां। तूंचि वदवीं तव स्तोत्रा।।४२।। तुझें स्वरूप धरोनि मानसीं। बोलतों सत्वरी आतां येविषीं। पडतां बालक माता ज़ैसी। धांवे तैसा तूं येईं।।४३।। मी ज़री विसरें तुज़ला। तूं न विसरें या तव बाळा। आहे निश्चयें पोटीं कळवळा। नाहीं संशय यामाजीं।।४४।। असो आतां श्रोते हो सकल। तुम्ही तिष्ठत आहां ये वेळ। पांडुरंगाश्रम- सद्गुरु प्रेमळ। ती कथा समूळ ऐकाया।।४५।। तरी आतां झ़णींच़ कथन। करितों ऐका सावधान। तेचि वदविती मज़कडोन। निश्चयें ज़ाणा तुम्ही हो।।४६।। मागील अध्यायीं कथानिरूपण। कृष्णाश्रमस्वामींनीं आपण। दुकानदारांच़ा अपराध असोन। क्षमा करोनि सांभाळिलें।।४७।। आणिक सांगुनी उत्तम बोध। क्रमिला मार्ग आपण सुखद। अधिकारी केले स्वामी प्रसिद्ध। पांडुरंगाश्रम स्वधर्मराज्या।।४८।।

आतां श्रीपांडुरंगाश्रम। स्वामी आमुचे मठाचे अष्टम। यांची कथा गोड परम। सांगूं उत्तम श्रोत्यांसी।।४९।। मंगळूरग्रामामाजीं एक। सारस्वत ब्राह्मण भाविक। त्यांचें नांव 'सांतप्पय्या' देख। 'नगर' हें असे उपनांव।।५०।। त्याची भार्या पतिव्रता। नाम तियेचें 'लक्ष्मी' तत्त्वतां। दुर्गुण नसे अंगीं सर्वथा। परम सद्गुणी आणि गुरुभक्त।।५१।। तियेच्या उदरीं पुण्यपुरुष। अवतार घेई जगन्निवास। श्रीदत्तात्रेय हाचि खास। काय पुण्य त्या साध्वीचें।।५२।। अनेक सुकृतें असतां गांठीं। होय अवतार ऐशिया पोटीं। उद्धरती त्यांचीं कुळें कोटी। कितीही वर्णितां पुरवेना।।५३।। अहा अहा धन्य ती माई। काय सांगूं तुम्हां पाहीं। धन्य ते पितादिक सर्वही। न वर्णवे आमुचेनि।।५४।। ऐसें तें ज़ोडपें करितां संसार। झाली लक्ष्मी गरोदर। तिचे डोहाळे परम सुंदर। ऐका आतां भाविक हो।।५५।। परम अद्भुत वृत्ति सात्त्विक। इच्छा उपज़ली प्रेमळ सुरेख। कीर्तन पुराण श्रवण निश्चयात्मक। ऐकावें वाटे तिज़ला पैं।।५६।। आणि सत्कर्मांची बहु हौस। मन तें शांत बहुवस। ऐसें असतां भरले मास। नऊ ते पूर्ण तिज़लागीं।।५७।। शके सत्राशें एकुणसत्तर। प्लवंग नाम संवत्सर। ज्येष्ठ शुद्ध षष्ठीसी परिकर। प्रसवली ती पुण्यवती।।५८।। पुत्ररत्न झालें सुरेख। गौरवर्ण त्याचा देख। बघाया जनांचें मन उत्सुक। झालें तेव्हां अनिवार।।५९।। ब्रह्मतेज तें मुखावरी। विलसे त्याच्या सुंदर भारी। नाहीं कळलें कवणा अंतरीं। अवतारी पुरुष हा असे।।६०।। मग बारशाच्या दिवशीं। लागेल दृष्टी म्हणोनि त्यासी। घातलें नाम 'काळप्पा' परियेसीं। मायबापांनीं प्रेमानें।।६१।। अहा काय तें मूल सुकुमार। घेती सर्वही नारीनर। म्हणती रतिमदनाहुनि सुंदर। काय लावण्य तव

बाळा।।६२।। ऐसें असतां बाळ तें सहज़। वाढूं लागलें सारिखें रोज़। आनंद झाला म्हणती आज़। धन्य मानसीं मायबाप।।६३।। झालें परम तीव्र चतुर। बोलतां वाटे बृहस्पति थोर। शांत सद्गुण असती अपार। वर्णूं न शकें मी मंदमति।।६४।। अष्टम वर्षीं मौंजीबंधन। केलें काळप्पयाचें ज़ाण। मुलांमाजीं ज्येष्ठ असून। बुद्धिही तैसीच़ श्रेष्ठ बहु।।६५।। असो ऐसें असतां पाहीं। विद्याभ्यास करिती लवलाहीं। स्वधर्मा न चुके अणुभरही। बहु प्रेम त्यामाजीं।।६६।। नाहीं अंगीं आळस अणुमात्र। असे आचार परम पवित्र। ईश्वरभक्ति अहोरात्र। करिती प्रेमळ चित्तानें।।६७।। बालपणींच़ ऐसी भक्ति। बघुनी जन विस्मय पावती। साधु होईल पुढती निश्चितीं। ऐसें बोलती नरनारी।।६८।। परम तीव्र बुद्धि चतुर। हरएक कार्या सूक्ष्म विचार। वडील जनांसी सन्मान थोर। देई साचार निश्चयेंसीं।।६९।। काय तें रूप गुण अमित। मुख पाहतां आनंद होत। चिंतादिक ज़ाऊनि चित्त। होय शांत सकलांचें।।७०।। बहुत कासया बोलावें आतां। मेदिनी न पुरे सद्गुण लिहितां। असो मग ऐसें असतां। दहा वर्षें झालीं तया।।७१।। तेव्हां तेथें स्वामी कृष्णाश्रम। सद्गुरु ज़े सप्तम आश्रम। आले तेव्हां ते सुखधाम। मंगळूरग्रामीं हो पाहीं।।७२।। त्यांनीं बघोनि ऐशी मूर्ति। निवडिली शिष्य-स्वीकारार्थीं। मागितला पुत्र सांतप्पय्यांप्रति। उत्कृष्ट बुद्धि देखोनियां।।७३।। आणिक केला शिष्य-स्वीकार। ही कथा मागील अध्यायीं सविस्तर। सांगितली कृष्णाश्रम गुरुवर। यांच्या चरित्रीं हो पाहीं।।७४।। तेवींच़ कांहीं गोष्टी सुंदर। त्याही वर्णिल्या तेथेंचि समग्र। आतां आणिक अणुमात्र। सांगूं येथें लवलाहीं।।७५।। अकराव्या वर्षीं संन्यासग्रहण। तेव्हां त्यांचें

प रि ज्ञा ना श्र म शं क र स द्गु रु

बालपण। ज़री असती अवतारी दयाघन। प्रकृतिधर्म न चुके तयां।।७६।। श्रीकृष्ण असतां बाळ। नानापरी खेळे खेळ। कासया केल्या ते वेळ। खोड्या अमित सांगा हो।।७७।। ज्या ज्या त्यानें केल्या खोड्या। त्या कीं नव्हे वेड्यावांकुड्या। जेणें हित होय त्या बापुड्या। बाळगोपाळांलागीं पैं।।७८।। दहीं लोणी चोरिलें त्यानें। निज गोपाळांकारणें। दहीं दूध नसतां तेणें। रोडले सवंगडी म्हणोनि।।७९।। गौळणी विकिती लोणी दहीं। मुलांसी खाया न देती कांहीं। म्हणोनि श्रीकृष्ण लवलाहीं। चोरुनी देत गोपाळां।।८०।। हा नव्हे त्याचा दुर्गुण। तो ज़ें करी तेंचि कल्याण। नाहीं त्यासी स्वार्थ ज़ाण। अणुमात्र आपुला त्यामाजीं।।८१।। तो न करी कदापि खोडी। गौळणींच्या खोड्या मोडुनि काढी। ज्यासी त्याच्या प्रेमाची गोडी। तोचि ज़ाणेल हें मर्म।।८२।। असो यापरी सद्गुरुमाय। पांडुरंगाश्रम-स्वामिराय। बालपणांत प्रेमळ सदय। काय करिती तें ऐका।।८३।। मठाच्या अंगणीं ज़ाउनी सुगुण। कांहीं वेळ खेळे ज़ाण। परि बाहतां सद्गुरु आपण। ज़ाय शीघ्र लगबगेंसीं।।८४।। आणि करिती शास्त्राध्ययन। गुरु-आज्ञेपरी करिती वर्तन। किंचित् वेळ मिळतां तेथून। ज़ाती पुनरपि खेळाया।।८५।। परि खेळ नव्हे वाईट। धरोनि अंतरीं सद्गुरु श्रेष्ठ। पालखी आणि सुंदर मठ। भवानीशंकर हाचि मनीं।।८६।। तोचि खेळे खेळ ज़ाऊनि। मानसपूजा करी बैसोनि। आणिक विचार नाहीं स्वमनीं। 'सत्य कोणतें' हाचि पैं।।८७।। जनां वाटे खेळाया आले। परि यांच्या मनीं असे वेगळें। परमार्थ- विचार निजबळें। करिती अहर्निशीं प्रेमानें।।८८।। करोनि हट्ट सद्गुरूपाशीं। रथोत्सव केला परियेसीं। ही कथा मागें कथिली ऐसी। सकलांसी ती आठवेल।।८९।। तेंही केलें

जनहितार्थ। आपुल्यासाठीं नव्हे किंचित। हेंही कथिलें असे तेथ। मागील अध्यायीं सकलही।।९०।। असो यापरी बालपणींचा। काल गेला सुखानें त्यांचा। तेवढ्या वयांतचि साचा। गुरुभाव दाविला जनांसी।।९१।। जैसें सांगती सद्गुरुराय। तैसेंचि करी धरोनि निश्चय। दत्तावतार यांत नाहीं संशय। पहा कैसें तें श्रोते हो।।९२।। चपल बुद्धि ग्रहणशक्ति। बघुनी सद्गुरु संतोषती। आणिक करिती परम प्रीति। शिष्यावरी हर्षभरें।।९३।। योगाभ्यासादि शिक्षण। उपनिषदादि वेदांत-श्रवण। गुरुमुखेंचि झालें अनुदिन। बहुत प्रकारें तयांसी।।९४।। झालें पूर्ण ब्रह्मज्ञान। मुखावरीच झळके उठोन। बघतांचि योग्यता यांची पूर्ण। समजोनि चुके जनांसी।।९५।। मग होतां सद्गुरु मुक्त। गादीवरी बैसविती यांप्रत। पांडुरंगाश्रम नाम विख्यात। झालें जगतीं हो पाहीं।।९६।। मग काश्मीर देशाहुनी। सारस्वत एक पंडित सद्गुणी। रघुनाथशास्त्री म्हणती त्यांलागुनी। बोलाविलें त्यांसी मठांत।।९७।। त्यांच्याजवळी संस्कृत व्याकरण। तर्कशास्त्र वेदाध्ययन। वेदान्तादि सारें शिकोन। झाले प्रवीण त्यामाजीं।।९८।। तेवींच ज्योतिषशास्त्र सकल। शिकले त्यांतही परम चपल। ऐशी मूर्ति सुंदर प्रेमळ। दैदीप्यमान ती पाहीं।।९९।। ते सत्यपूत वदती वदनीं। असत्य न होय त्यांची वाणी। असे अत्यंत अद्भुत करणी। पुढें वानूं ती पाहीं।।१००।। पुढील अध्यायीं हेंचि निरूपण। श्रीपांडुरंगाश्रम चिद्घन। केवळ जगदोद्धाराकारण। नाना प्रयत्न करिती ते।।१०१।। आनंदाश्रम परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें त्रिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।१०२।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां होय भ्रम दूर। त्रिंशत्तमाध्याय रसाळ हा।।१०३।। अध्याय३०।। ओव्या १०३।। ॐ तत्सत्- श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।। ।। इति त्रिंशोऽध्यायः समाप्तः।।

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमत्पांडुरंगाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय सद्गुरो जगदीशा । भक्तवत्सला पुराणपुरुषा। करीं देवा भवभयनाशा। देउनी भक्ति मज़लागीं।।१।। दृढ भक्ति असतां पूर्ण। मग कैंचें त्यासी बंधन। म्हणोनि देवा तीचि ज़ाण। मागतो आतां तुज़पाशीं।।२।। तुज़ला कैंचैं असाध्य बापा। दाविसी झणींच मार्ग सोपा। तेव्हां सहज़चि चुकती खेपा। जन्ममरणाच्या बा पाहीं।।३।। आठवितां तुज़लागोन। झणीं येसी हो धांवोन। नाहीं तुज़ला मानावमान। अणुमात्र स्तवितां भुलसी तूं।।४।। ऐसा तूं माझा सद्गुरु सदय। प्रकाशरूप अससी अद्वय। म्हणोनि धैर्यानें करितों कार्य। चरित्रलेखन या समयीं।।५।। ज़री बोलिलों वेडें वांकुडें। तरी देवा तुज़ला आवडे। म्हणोनि करितों कवन मी थोडें। आतां तुज़पुढें गुरुराया।।६।। तूंचि अससी सर्व जगांत। तुज़वीण अन्य वस्तु नसे त्रिभुवनांत। तेवींच तूं सर्व शब्दांत। अससी व्यापक हो पाहीं।।७।। म्हणोनि या कवनामाजीं। असे सच्चिन्मूर्ति तुझी। त्यावीण आणिक नाहीं दुजी। सत्य ज़ाण गुरुराया।।८।। एवं शब्द-शब्दांतरीं। तूंचि अससी व्यापक श्रीहरी। ज़ैसें सुवर्ण अलंकारीं। तैसा शब्दीं तूं भरलासी।।९।। अलंकार करितां वेडा वांकुडा। ज़री झाला कैसाही बापुडा। सुवर्णासी अणूएवढा। नाहीं संबंध त्याचा पैं।।१०।। तें न होय कधींही ओखटें। सुंदरचि असे तें गोमटें। ज़ाडें वांकुडें नाज़ूक हें खोटें। नामरूप त्याचें पैं।।११।। मुद्रिका मणि नाम हें सारें। नाज़ूक गोल रूप हें साजिरें। परि त्यामाजीं सुवर्णचि भरे। गोल मुद्रिका नामरूपीं।।१२।। तैसे देवा माझे शब्द। ज़री गायिले अबद्ध सुबद्ध। तरी त्यांमाजीं तूंचि शुद्ध। भरला अससी परिपूर्ण।।१३।। ज्यासी

पाहिजे केवळ सुवर्ण। तो न विचारी अलंकारालागून। तैसे सद्भक्त तुझे ज़ाण। आनंद मात्र घेतील।।१४।। शब्द आणि वाक्यरचना। त्यांकडे ते ढुंकूनि बघती ना। केवल तव प्रेमचि ज़ाणा। धरितील ऐसा निश्चय।।१५।। म्हणोनि देवा करुणाकरा। लागलों चरित्र कराया त्वरा। पार घालीं यांतुनी पामरा। तूंचि गुरुराया दयाळा।।१६।। तूंचि कर्ता करविता एक। ऐसा भाव निश्चयात्मक। देऊनि वदवीं ग्रंथ सुरेख। या बालकाकडूनियां।।१७।। असो आतां श्रोते हो सज्जन। मागील अध्यायीं निरूपण। पांडुरंगाश्रम यांचे सद्गुण। उपज़ल्यापासूनि वर्णियेले।।१८।। आतां परिसा सावधान। आणिक त्यांचें सद्गुणवर्णन। जगाच्या कल्याणाकारण। झिज़विला देह त्यांनी निज।।१९।। मठाची बहुपरी केली उन्नती। बहुत वाढविला मठ हा निश्चितीं। अर्थात् बांधविला विशेष रीतीं। केवळ जनांच्या कल्याणा।।२०।। यांत जनांचें काय कल्याण। ऐसा येईल कवणाही प्रश्न। तरी पुढें करूं कथन। प्रस्तुत ऐका गुणमहिमा।।२१।। मठांतील सकल समाधि। फिरूनि नेटक्या बांधविल्या आधीं। आणि घालविलें ताम्रशासनादि। परम सुंदर हो ज़ाणा।।२२।। नूतन आणिक बहुत शेतें। घेतलीं असती सद्गुरुनाथें। उत्पन्न वाढलें अमितचि तें। मठाचें ज़ाणा त्या समयीं।।२३।। मठाच्या संनिध विस्तृत ज़ागीं। स्वच्छ पाण्याचें सरोवर वेगीं। बांधविलें जनांच्या उपयोगीं। पडावें याकारणें।।२४।। तेथील ज़ुनीं देवालयें थोर। केला त्यांचा जीर्णोद्धार। आणिक एक ऐका सविस्तर। तुम्ही सकल श्रोते हो।।२५।। ग्रामांतील कांहीं देउळें। मठाज़वळीच आणुनी ते वेळे। राजमार्गाच्या बाज़ूनें सत्ताबळें। स्थापिलीं स्वामी-सद्गुरूंनीं।।२६।। तेथेंचि शिराली-ग्रामांतरीं। नजीकचि पहा डोंगरावरी। इमारत

बांधविली साजिरी। दोन मज़ली ती असे।।२७।। वटवृक्ष लाविले पांच़। इमारतीज़वळीच़ साच़। 'पंचवटी' त्या स्थानासीच़। नाम ठेविलें गुरुरायें।।२८।। तेथें ज़ावया मार्ग सुखकर। करविला विशालसा सुंदर। आणिक शिरालीहूनि चित्रापुर। मठापर्यंत मार्ग केला।।२९।। पंचवटीची इमारत। असे परम शोभिवंत। दुरूनिही ती अत्यंत। सुंदर दिसे नयनांला।।३०।। तेवींच़ गृहें बांधावीं लोकांनीं। राजमार्गाच्या दोन्ही बाज़ूंनीं। ऐशी व्यवस्था केली स्वामींनीं। लोकहिताकारणें।।३१।। आणि मठाच्या संनिध पाहीं। पोस्ट- ऑफिस आणाया सर्वही। व्यवस्था केली त्या ठायीं। परम उत्कृष्ट ज़ाणा हो।।३२।। पोस्ट आणि पोस्ट मास्तर। यांकरितां गृह सुंदर। बांधवुनी, आणविलें तेथेंचि सत्वर। शिरालीच़ें ऑफिस तें।।३३।। आणि तेथेंचि मठाज़वळी। कर्नाटक-शाळा बांधवुनी ते वेळीं। स्वामींनीं प्रेमें स्थापियली। लोकांकरितां ज़ाणा हो।।३४।। आठवड्यामाजीं एक वार। भरावा तेथें बाज़ार। ऐसीही व्यवस्था केली थोर। परोपकारासाठीं हो।।३५।। आणिक राजमार्गावरी। जेथें तेथें दीपस्तंभ झडकरी। ठेवविले प्रकाश पडावया भारी। रात्रिसमयीं सुंदर ते।।३६।। ऐसींच़ कार्ये नानापरींचीं। बहुजनांच्या उपयोगाचीं। मठाच्याचि आश्रयें साचीं। करविलीं आपण आनंदे।।३७।। वाक्य कानीं पडतांचि सत्वर। काम करिती जन समग्र। न धिक्कारी कवणही नर। त्यांच़ें वचन कसलेंही।।३८।। शब्द निघतां मुखांतुनी। कार्य तें होय निश्चयें झणीं। यावरी एक तुम्हांलागुनी। सांगतों वृत्तांत सुंदरसा।।३९।। जेव्हां मठ बांधविला थोर। तेव्हां एक घडला चमत्कार। तो वृत्तांत तुम्हां समग्र। सांगूं ऐका प्रेमानें।।४०।। मठ पूर्ण बांधिल्यावरी। भोजनशाला

बांधावी सत्वरी। ऐसा विचार केला, उपरी। एक प्रतिबंध आढळला।।४१।। तेथें होता एक नारिकेल वृक्ष। तेणें प्रतिबंध वाटे बांधावयास। याचा विचार चालिला बहुवस। एके दिनीं रात्रीं पैं।।४२।। ज़री उपटावा तो कल्पवृक्ष। तरी असे परमदोष। ठेवितां अडथळा होय खास। भोजनशाळा बांधावया।।४३।। म्हणोनि श्रीसद्गुरुराय। विचारिती होउनी चिंतामय। काय करावा यासी उपाय। म्हणोनि बोलिले सहज़चि।।४४।। मग सर्वही रात्रीं ज़ाण। स्वामीसहित झोपले जन। तेव्हां ऐका वर्तमान। काय झालें तें सारें।।४५।। अवचित भरलें ढगानें आकाश। अंधकार पडला तैं विशेष। सौदामिनीचा लखलखे प्रकाश। झाला गडगडाट भयंकर।।४६।। पडला पर्जन्य महाथोर। वीज़ पडली कल्पवृक्षावर। वृक्ष सहज़चि मेला सत्वर। निमिषामाजीं तो पाहीं।।४७।। पहा काय चमत्कार। श्रीस्वामींचा पराक्रम थोर। शब्द निघतां मुखाबाहेर। होय अनुकूल सारें तें।।४८।। साक्षात् दत्ताचा अवतार। तया काय असाध्य भूवर। इच्छामात्रें होय साचार। सारें अनुकूल सहज़चि।।४९।। त्यांच्या अंगीं नाहीं स्वार्थ। सारें करिती जनहितार्थ। कार्याकार्यविचार धूर्त। शुद्ध वृत्ति त्यांची असे।।५०।। सदा बोलती सत्यवचन। सदा इच्छिती जनकल्याण। म्हणोनि त्यांचे मुखींचें भाषण। न होय असत्य कदापिही।।५१।। ते न करिती कधींही अविचार। म्हणोनि वृक्ष उपटों न देती साचार। कल्पवृक्ष तोडितां थोर। पाप होय म्हणोनि।।५२।। सद्गुरुस्वामींसी निश्चित। पाप पुण्य न लागे खचित। परि ते करीत नसत। अधर्माचरण कदापिही।।५३।। खरे ज़े साधुसंत। हे अवतारीच असती समस्त। तेव्हां ते कैसे होतील प्रवृत्त। अधर्माचरण करावया।।५४।। जनांसी शिकविती धर्म। तेचि कैसे करितील

अधर्म। म्हणूनि त्यांचें प्रेमानें नाम। अद्यापिही जन घेती।।५५।। बहुत राज़े होऊनि गेले। अनेक पंडित शास्त्री झ़ाले। ऐसे बहुविध जन्मूनि मेले। कुणीही न घेती नाम त्यांचें।।५६।। परि ज़े साधु अवतारिक। त्यांची कीर्ति गाती सकळिक। जेथें तेथें देवालयें सुरेख। बांधिती त्यांचीं प्रीतीनें।।५७।। पहा 'जय जय रामकृष्ण'। ऐसें करिती त्यांचें भजन। दशरथ वसुदेव यांचें कोणी न। करिती भजन कदापिही।।५८।। त्यापरीच़ सद्गुरुस्वामी। यांचे नाम घेती नेहमीं। धरोनि मूर्ति अंतर्यामी। आठविती त्यांसी सद्भक्त।।५९।। परि त्यांच्या वडिलांलागीं। न भज़ती कुणीही या ज़ागीं। नाम त्यांचें कवणही विरागी। सद्भक्तही न घेती।।६०।। अहो पहा आमुचे पूर्वज। होऊनि गेले बहुतचि आज़। त्यांचीं नामें निश्चयें मज़। नसती विदित तीं ज़ाणा।।६१।। हें मज़ मात्र नव्हे ऐका। कवणासीही विदित न देखा। कीं आमुचे आज़े पणज़े ज़े कां। त्यांचीं नामें काय तीं।।६२।।परि आमुचे स्वामी आनंदाश्रम। त्यांचें सद्गुरु पांडुरंगाश्रम। त्यांचे गुरु ते कृष्णाश्रम। वामनाश्रम त्यांचे गुरु।।६३।। त्यांचे गुरुजी केशवाश्रम। त्यांचे सद्गुरु शंकराश्रम। त्यांचे गुरु परिज्ञानाश्रम। शंकराश्रम यांचे सद्गुरु।।६४।। आणि त्यांचे गुरुजी ऐका। आद्य परिज्ञानाश्रम देखा। ऐसी नामावळी ही सकळिकां। अद्यापिही विदित असे।।६५।। त्या समयींचे ज़े आमुचे। पूर्वज होऊनि गेले त्यांचें। नामही न ज़ाणती साचें। मग स्मरण कैंचें करितील।।६६।। नामें त्यांचीं नाहींत विदित। आम्हांलागीं कवणाप्रत। हें सांगावेंचि न लागत। असे सकलांसी विदितचि।।६७।। एवं हे साधुसंत। त्यांचीं नामें असती प्रख्यात। काय कारण तरी तेथ। नाहीं द्वैत म्हणोनियां।।६८।। असो ऐसे ते सद्गुरु सदय। त्यांच्या

हातूनि अधर्म न होय। नाहीं यामाजीं अणुभरी संशय। धन्य धन्य ते जगतीं।।६९।। म्हणोनि त्यांसी पडिला विचार। कीं कल्पवृक्ष असतां थोर। भोजनशाळा बांधावया साचार। काय करावें यासाठीं।।७०।। तेव्हां भवानीशंकर-देवें। आपुल्या भक्तासि अनुकूल बरवें। करोनि दिधलें सहज़चि आघवें। चिंता सर्व निवारिली।।७१।। मेलियावरी कल्पवृक्ष। उपटितां नाहीं कवणही दोष। न करितां साहस विशेष। झ़ालें कार्य उत्तम तें।।७२।। एवं सद्गुरु स्वामिवर। यांच्या मुखांतुनी निघतां सत्वर। कार्य तें व्हावेंच़ हा निर्धार। पहा कैसें झ़ालें तें।।७३।। मग बांधविली भोजनशाळा। अनुकूल झ़ालें सकल जनांला। किती वंदावें ऐशा गुरुला। न कळे आम्हां अज्ञांसी।।७४।। ज़े असती पूर्ण ज्ञानी। आपणा सुख व्हावें म्हणोनि। हेतु त्यांच्या नसतो मनीं। अणुमात्रही ज़ाणा हो।।७५।। ते ज़ें करिती कार्य। केवल जनहितार्थचि होय। स्वार्थ नाहीं ऐसे गुरु सदय। लाभणें दुर्लभ निश्चयेंसीं।।७६।। परोपकारा झिज़विती देह। आणि असती अति निःस्पृह। यामाजीं नाहीं संदेह। अणुइतका हो ज़ाणा।।७७।। त्यांची वृत्ति असे अविनाश। अकर्ता अभोक्ता आपण खास। तेव्हां कैंच़ा येईल त्यांस। अभिमान तो सांगा हो।।७८।। अभिमान धरूनि ज़री कार्य। केलें तरी तें निष्फल होय। तोचि एक आमुच़ें हृदय। गृह करोनि बैसला।।७९।। त्यासी घालविल्यावांच़ोनि। आत्मज्ञान दृढावे ना मनीं। परि तो न ज़ाय सोडुनी। हृदयभुवन आमुच़ें हें।।८०।। म्हणोनि यासी एकचि उपाय। धरावे सद्गुरूच़े पाय । तेचि सांगती साधन सदय। घालवाया अभिमाना।।८१।। निष्काम चित्तें ज़ातां शरण । तेचि तारिती न लागतां क्षण। अन्य ज़री केले प्रयत्न। व्यर्थ होती ते सारे।।८२।।

रोग ज़ावा ज़री समूळ। हुशार वैद्य आणावा ते वेळ। तेव्हांच़ रोगी बरा होईल। सर्व पीडा ज़ाऊनियां ।।८३।। तैसें श्रीगुरूंच़ा उपदेश ग्रहण। करितां होय भवरोग-निरसन। होय वृत्ति निरभिमान। निश्चयें ज़ाणा तुम्ही हो।।८४।। असो ऐका आणिक वर्णन। करा चित्त सावधान। तेणें होय समाधान। सद्गुरुगुण ऐकतांचि।।८५।। यापरी करोनि नाना प्रयत्न। झिज़वुनी आपला देह ज़ाण। केली व्यवस्था उत्तम करोन। शिराली-ग्रामामाजीं पैं।।८६।। एवं चित्रापुरग्राम सुंदर। आमुच्या जनांच़ें क्षेत्र मनोहर। बनविलें खेड्याच़ें शहर। पांडुरंगाश्रमस्वामींनीं।।८७।। ज़णूं काय म्युनिसीपालिटी। असे कीं तेथें गोमटी। व्यवस्था केली कैसी मोठी। बघतां दृष्टी लागे हो।।८८।। श्रीमंत मोठे आणि युरोपियन। सरकारी अधिकारी वगैरे जन। जेव्हां येती प्रवासालागून। मठ बघावया येती ते।।८९।। बघोनि तेथील सुंदर व्यवस्था। ही स्वामींची बुद्धि-कौशल्यता। ऐसें म्हणोनि त्यांच्या चित्ता। होय संतोष निश्चयेंसीं।।९०।। तेथील तीं सकल कार्यें। केलीं असती बुद्धिचातुर्यें। इंजिनियरापरीच़ केलें स्वयें। बघतां आश्चर्य वाटतें त्यां।।९१।। पाहूनि करिती वाखाणणी। म्हणती चातुर्याची हे खाणी। ऐसी सद्गुरुमूर्ति पाहुनी। संतोषती जन सारे।।९२।। अठराशें नऊ शकामाझारीं। काशीयात्रेसी गेलियावरी। तेथील पंडितांनीं सन्मान भारी। दिधला यांसी प्रेमभरें।।९३।। जेथें ज़ाती तेथें त्यांसी। सन्मानचि देती बहुवसी। मुख बघतांचि तेजोराशी। तोषतें मन सकलांच़े।।९४।। आणि करिती नमस्कार। त्यांच्या चरणांवरी सत्वर। ज़री तो असे निंदक पामर। बघतांचि मन विरे त्याच़ें।।९५।। ऐशी मूर्ति शांत सुंदर। पसरली कीर्ति जगभर। असे साक्षात् अवतार। श्रीदत्ताच़ा

म्हणोनियां।।९६।। प्रवचनें देती परम सुंदर। गीर्वाणींही बोलती चतुर। न चुकती त्यांत अणुमात्र। महाविद्वान पंडित ते।।९७।। यांची कीर्ति ऐकुनी पाहीं। भज़ती सकल इतर ज़ातीही। संकटकालीं ते लवलाहीं। करिती नवस यांपाशीं।।९८।। तेव्हां त्यांचीं सकल संकटें। स्वामी निवारिती नेटें। ऐसें हें रत्न परम गोमटें। कोण दवडील सांगा हो।।९९।। त्या कथा वर्णूं पुढती। आणिक सांगूं यांची प्रख्याति। परंतु आपण धरावे चित्तीं। त्यांचे सद्गुण दिनरजनीं।।१००।। तेवींच करावी कथा श्रवण। धरोनि मनीं सारे सद्गुण। करावें त्यापरी आपणही वर्तन। तरीच जन्म सफल खरा।।१०१।। करितां 'तत्कथन तच्चिंतन'। सारे ज़ाउनी आपुले दुर्गुण। येती आमुच्या अंगीं सद्गुण। म्हणोनि चरित्र ऐकावें।।१०२।। असो आतां पुढील अध्यायीं। आणिक सद्गुण बोलूं लवलाहीं। आपण श्रोते जन सर्वही। तिष्ठत असाल अमित हो।।१०३।। माझ्या अंगीं ज़री ना भक्ति। श्रोत्यांच्या प्रेमासाठीं करविती। श्रीसद्गुरुस्वामी निश्चितीं। ग्रंथ हा सारा मज़कडुनी।।१०४।। ज़री आपुल्या प्रेमासाठीं। करविला ग्रंथ सरळ मराठी। तरी मज़ही लाभेल गोमटी। प्रेमाची गोडी अणुमात्र ।।१०५।। वत्साकरितां दूध दे गाई। त्याचा सकलांसी लाभ होई। तैसी तुमच्या प्रेमाची नवलाई। मज़ही लाभेल गोडी ती।।१०६।। असो पुढील अध्यायीं सुरस। कथा सांगूं गुरुकृपेंचि खास। ऐकतां होईल परम संतोष। तुम्हां भाविक श्रोत्यांसी।।१०७।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें एकत्रिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।१०८।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां निरसे अज्ञान समग्र। एकत्रिंशाध्याय रसाळ हा।।१०९।। अध्याय ३१।। ओंव्या १०९।।ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमत्पांडुरंगाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय सद्गुरो करुणाकरा। भक्तवत्सला परम उदारा। देईं सुमति मज़ पामरा। कृपा करोनि आतां पैं।।१।। ज़री माझी मंदमति। तुज़ला स्मरतां शीघ्रगति। होय बुद्धि तीव्र बा ती। नाहीं शंका यामाजीं।।२।। परि असावी दृढतर भक्ति। तेणें मानसीं येई मूर्ति। मूर्ति धरितां निष्काम चित्तीं। पार पावे सहज़चि।।३।। म्हणोनि देवा मज़ला आतां। भक्ति देईं तूं बा ताता। कवणही न देईल सर्वथा। तुज़वीण, म्हणोनि शरण मी।।४।। असो आतां श्रोते हो सज्जन। मागील अध्यायीं कथा निरूपण। पांडुरंगाश्रम सद्गुरु दयाघन। यांच्या इच्छेपरी होत कार्य।।५।। आतां आणिक सांगूं सद्गुण। अगाध महिमा त्यांचा पूर्ण। ऐसी सद्गुरुमाय सगुण। ध्यावी निरंतर हृदयांत।।६।। तरीच आम्हां मानवांसी। इहपरलोकीं सुख परियेसीं। आणिक बोलूं सद्गुणराशी। सावध असावें श्रोते हो।।७।। परम ज्ञानी निर्भयवृत्ति। विचारपूर्वक कार्य करिती। जनांसी वरिवरी धर्मजागृति। देती प्रेमानें उल्हासें।।८।। धर्माविरुद्ध जनांचें वर्तन। होऊं नेदिती कदापि ज़ाण। विरुद्ध वागतां तयांलागून। शासन करिती तात्काळ।।९।। पंचगव्य प्रायश्चित्त। देऊनि त्यांसी शुद्ध करीत। नाहीं कदापि भीड त्यांप्रत। कवणाचीही हो पाहीं।।१०।। मातेसी कवणाची असे भीड। मुलांसी मारुनी मोडिते खोड। म्हणे माज़लास तूं द्वाड। यापरी बोले क्रोधानें।।११।। तैसे सद्गुरुमहाराज। आपुल्या भक्तांसी सांगती रोज़। कीं स्वधर्मापरी वर्तणें तुज़। उचित असे सर्वदा।।१२।। एतद्विषयीं वारंवार। करिती बोध जनां सविस्तार। ज़री न करी त्यापरी नर। त्यासी शासन करिती पैं।।१३।।

शासन म्हणिजे नव्हे शिक्षा। शास्त्रापरी हरिती दोषा। त्याकारणें मठासी पैसा। दंड म्हणोनि द्यावा तो।।१४।। श्रीस्वामींसी त्या पैशाचा। कवडीचाही लाभ नसे साचा। जनांच्या कल्याणास्तव त्याचा। खर्च होय निर्धारें।।१५।। मठासी देतां पैसा आपण। काय होय जनांचें कल्याण। याचें सांगतों वर्णन। सविस्तर तें ऐकावें।।१६।। दंड द्यावा हें शासन। कां म्हणाल तरी ऐका वचन। सांगूं आतां गुरूंसी स्मरून। सावध असा श्रोते हो।।१७।। अधर्म अकर्म करितां नरासी। पाप घडे निश्चयेंसीं। तेव्हां करितां पुण्यराशी। ज़ळे पाप सारें तें।।१८।। म्हणोनि मठासी देतां दंड। पुण्य अंगीं येई उदंड। ज़री तो झाला पापी मूढ। तरीही उद्धरे त्यायोगें।।१९।। असो सद्गुरुस्वामिराय। सकल जनांचें हितचि होय। ऐसेंचि करिती हा निश्चय। नाहीं स्वार्थ त्यांसी हो।।२०।। परि अज्ञपणें कांहीं जन। छळूं लागतां त्यांसी ज़ाण। सद्गुरुस्वामी क्षमाशील पूर्ण। न क्षोभती त्यांज़वरी।।२१।। इंग्लंडादि परदेशीं ज़ाती नर। त्यांसी शास्त्राधारें घालिती बहिष्कार ज़ाण। प्रायश्चित्त त्यांलागूनि साचार। न मिळे ज़ाणा कदापिही।।२२।। ऐशाविषयीं एकेकाळीं। महासभा बोलावुनी ते वेळीं। श्रीपांडुरंगाश्रम-स्वामींज़वळी। मांडिला प्रश्न जनांनी।।२३।। तेव्हां सद्गुरुस्वामींनीं आपण। युक्तिपूर्वक चातुर्यें ज़ाण। उत्तर दिधलें त्यांलागून। शांत प्रेमळ मृदु वचनें।।२४।। त्यांनी जनांसीच करोनि प्रश्न। त्यांच्याचि मुखांतुनी आपण। करविला निर्णय उत्कृष्ट ज़ाण। ऐशी माउली चतुर बहु।।२५।। सकल जनां तो होऊनि मान्य। म्हणती स्वामींसी धन्य धन्य। इतुके चतुर नाहींत अन्य। ऐसें बोलती एकमेकां।।२६।। परि हा निर्णय कांहीं जनांला। मुळीच पहा नाहीं रुचला। विरुद्ध झाले ते स्वामींला।

परि बोलण्यासी धैर्य नसे।।२७।। मागें करिती निंदा बहुत। स्वामींसी सारें होई विदित। परि न क्षोभती ते मनांत। अणुभरीही त्यांज़वरी।।२८।। ज़री पडली निंदा कानीं। खेद किंचितही न करिती मनीं। प्रार्थिती ते दिनरजनीं। भवानीशंकर-देवासी।।२९।। म्हणती प्रभो दयाघना। ज़री केली निंदा नाना। तरी रक्षावें सकल जनां। क्षमा करोनि बा देवा।।३०।। बाळानें ज़री केला अपराध। माता तयावरी न करी क्रोध। ज़री झाला बहु मतिमंद। तरी नुपेक्षी ती निजपुत्रा।।३१।। तैसें देवा तुज़ला सर्व। मुलेंचि असती सकल जीव। अपराध पोटीं घालूनि धांव। रक्षावया तयांसी।।३२।। दुर्गुणी म्हणूनि ज़री त्यागिसी। तरी काय करावें तैसियांसी। कोण रक्षण करील त्यांसी। सांग कृपाळा दयानिधे।।३३।। तूंचि देऊनि बुद्धि चांगली। धर्मजागृति करीं ये वेळीं। घेईं जनांसी प्रेमें ज़वळी। सांभाळीं आपुलीं हीं बाळें।।३४।। ऐसी प्रार्थना करिती दिननिशीं। श्रीभवानीशंकरचरणांपाशीं। स्वामी आमुचे कळवळोनि मानसीं। आम्हां अज्ञान्यांकारणें।।३५।। ज़री झाले अभक्त थोर। तरीही त्यांसी न करिती दूर। ऐसे आमुचे सद्गुरुवर। काय वर्णावे गुण त्यांचे।।३६।। ऐसियांचे धरितां चरण। सहज़चि होती कष्ट निवारण। आणिक होय आत्मज्ञान। निश्चयें ज़ाणा तुम्ही हो।।३७।। यावरी कांहीं कथा सुरस। सांगूं आतां गुरुकृपेंचि तुम्हांस। चित्त येथेंचि द्यावें खास। इतर विषय टाकोनि।।३८।। भटकळ या ग्रामीं एक। होता सारस्वत ब्राह्मण भाविक। त्याचें नाम मंगेश देख। 'बैंदुर' हें उपनांव।।३९।। महालकरी तो तेथील ज़ाण। अंगीं असती बहुत सद्गुण। पांडुरंगाश्रमस्वामी दयाघन। यांसि भज़े नित्य तो।।४०।। ऐसें असतां एके काळीं। आलें संकट त्याचिया कपाळीं।

काय तें ऐका श्रोते ये वेळीं। सांगूं सारा वृत्तांत।।४१।। तेथें होते कांहीं यवन। त्यांसी मंगेशावरी द्वेष पूर्ण। म्हणोनि खोटा आरोप घालोन। चालविला खटला तयांनी।।४२।। कीं सरकारी वृक्ष वाळले कांहीं। ते लिलांव करितां पाहीं। आपुल्या ज्ञातिजनांसी सर्वही। विकले कमी मोलानें।।४३।। म्हणोनि नुकसान बहुत। सरकारासी ज़ाहलें खचित। ऐसें खोटेंचि कळवूनि त्याप्रत। खटला घातला त्यावरी।।४४।। डिव्हिजनल मॅजिस्ट्रेट यापाशीं। गेला खटला विचारासी। त्यानें विचार करोनि मानसीं। कारवारासी पाठविला।।४५।। आणि बैंदुर मंगेश यासी। तूं ज़ा कारवार-ग्रामासी। ऐशी आज्ञा केली वेगेंसीं। मॅजिस्ट्रेट- साहेबानें।।४६।। ऐकतां झालें दुःख परम। मुखीं घेत सद्गुरुनाम। धरोनि अंतरी शुद्ध प्रेम। चालिला मंगेश शिरालीसी।।४७।। घेऊनि भेट श्रीस्वामींची। साष्टांग नमन केलें सवेंचि। इच्छा निवेदिली मनींची। प्रार्थना करोनि येणेंपरी।।४८।। म्हणे प्रभो श्रीपांडुरंगा। सद्गुरुराया तूं कृपांगा। कोण रक्षील मज़ला सांगा। तुज़वांचोनि या समयीं।।४९।। प्रपंचीं परमार्थीं देख। तूंचि रक्षिसी सद्गुरु एक। तुज़वीण नाहीं आणिक। या बाळासी कवणही।।५०।। तूं तारीं अथवा मारीं। न सोडीं हे चरण निर्धारीं। काय करशील तें करीं। भार घातला तुज़वरी।।५१।। द्यावें मज़ अभय वचन। आशीर्वाद द्यावा ज़ाण। तरीच मी ज़ाईन येथोन। म्हणोनि घातलें दंडवत।।५२।। ऐशी प्रार्थना करोनि स्वामींसी। चरणांसंनिध तो परियेसीं। आडवा पडला न उठवे त्यासी। तेव्हां कळवळले गुरुराय।।५३।। येऊनि भवानीशंकरसंनिध। केली प्रार्थना बहुविध। मंगेशा म्हणती हो सावध। ऊठ वत्सा भिऊं नको।।५४।। श्री भवानीशंकर देव। तुज़ला रक्षील सदैव। ठेवीं तूं

आपुला दृढभाव। नाहीं भय तुज़लागीं।।५५।। तुझें करील तो कल्याण। न होऊं देईल अवमान। न धरीं यांत अनुमान। सत्यवचन हें आमुचें।।५६।। नको करूं चिंता ज़ाण। झडकरीं ज़ा कारवारालागून। ऐसें बोलुनी स्वयें आपण। उठविला तेव्हां प्रेमानें।।५७।। तैं उठला मंगेश सत्वरीं। अश्रु लोटले नयनामाझारीं। ओंठ कांपती थरथरां भारी। म्हणे देवा कनवाळू तूं।।५८।। आपुली आज्ञा शिरसा मान्य। तुज़हुनी मज़ला देव नसे अन्य। तुझ्या दर्शनें झालों धन्य। काय उणें आतां मज़लागीं।।५९।। ऐसें म्हणोनि धरिले चरण। श्रीस्वामींचे प्रेमेंकरोन। मनीं धरोनि सद्गुरुवचन। ज़ावया निघाला कारवारा।।६०।। तेव्हां दिधला देवाचा प्रसाद। आणिक देती आशीर्वाद। तेणें होय अधिकचि आनंद। बैंदूर मंगेशरायासी।।६१।। मग करोनि साष्टांग नमन। गेला कारवारालागोन। आतां ऐका सावधान। तेथील वृत्तांत श्रोते हो।।६२।। कोर्टामाजीं न्यायाधीश। यांनी खटला चालविला विशेष। पुसती वृत्तांत मंगेशास। तों काय वर्तलें तें ऐका।।६३।। फॉरेस्ट कन्सर्वेटर कर्नल पेटन। अवचित तेथें आला ज़ाण। स्वामींच्या कृपेची ही खूण। पटली मंगेश यासी पैं।।६४।। ती कैसी हें सांगतों आतां। पेटन जज्जाचा मित्र होता। तो त्या भेटाया बंगल्यासी ज़ाता। दिसली गडबड कोर्टाज़वळी।।६५।। जज्ज कोर्टांत असे बैसला। हें कळलें पेटन साहेबाला। भेटावयासी तो चालला। आला अंगणीं सहज़चि।।६६।। तेथें फळ्या त्या आंब्याच्या। ज्या ज़प्त करूनि आणिल्या साच्या। त्या ह्या कर्नलसाहेबाच्या। दृष्टीस पडल्या सहज़चि तेव्हां।।६७।। अंगणामाजीं पडिलें लांकूड। आंब्याचें तें पाहिलें उघड। पायानें

ढकलुनी ते ज़ाड। आपुल्यांतचि बडबडला।।६८।। ''आंब्याचें हें लांकूड वाईट। उपयोगा न ये दिसे स्पष्ट''। ऐसें बोलुनी गेला थेट। जज्जसाहेबाज़वळी तो।।६९।। दोघांच्याही झाल्या भेटी। परस्पर प्रेमें बोलती। आला विषय सहज़गती। मंगेशाच्या खटल्याचा।।७०।। न्यायाधीश म्हणे पेटनासी। लांकडाची परीक्षा असे तुम्हांसी। याची किंमत किती, ऐशी। पृच्छा केली तयानें।।७१।। यावरी बोले पेटनसाहेब। हें विकितां काय होय लाभ। निरुपयोगी हें लांकूड, सुलभ। मिळे निश्चयें केव्हांही।।७२।। ऐसें ऐकतां त्याचें उत्तर। न्यायाधीशाचें कळवळलें अंतर। म्हणे आम्हीं केला अविचार। मागें पुढें न बघतां।।७३।। आंब्याचें लांकूड असे स्वस्त। मंगेशाचा ना अपराध यांत। विकिलें असे ती योग्य किंमत। सोडूं आतां त्यालागीं।।७४।। ऐसें बोलुनी केला विचार। मंगेशासी सोडिलें सत्वर। सन्मानें पाठविला सुखकर। भटकळासी त्या समयीं।।७५।। पुनरपि तीचि नोकरी। महालकरी या ज़ागेवरी। पाठविला प्रेमानें झडकरी। न्यायाधीशानें त्या समयीं।।७६।। तेव्हां मंगेश गेला ग्रामा। अंतरीं धरूनि सद्गुरुनामा। म्हणे देवा तुझिया प्रेमा। उपमा नाहीं कसलीही।।७७।। मग तो गेला चित्रापुरा थेट। घेतली श्रीस्वामींची भेट। अंतरीं उठली प्रेमाची लाट। घातलें दंडवत साष्टांगें।।७८।। आणि बोले सद्गुरो दयाळा। देवा तूंचि पावलासी ये वेळां। अगाध असे तुझी लीला। काय सांगूं नवलाई।।७९।। माझ्या कार्याकरितांचि पेटन-। साहेबासी पाठविलें तेथें आपण। योगायोग आणिला ज़ुळवून। म्हणोनि येथें मी पोचलों।।८०।। ही तुझी कृपाचि होय। न्यायाधीशाचें कळवळलें हृदय। महिमा तुझी अवर्णनीय। भक्तवत्सला गुरुराया।।८१।।

आपुलें वाक्य न होय असत्य। साक्षात् दत्ताचा अवतार तूं सत्य। दाविसी जनांसी नित्य। अगाध लीला आपुली ही।।८२।। परि आम्हांसी नाहीं भक्ति। म्हणोनि मनुष्य भावितों तुज़प्रति। अंधासी कैंची दिसेल ज्योति। तैसी तव मूर्ति अज्ञांसी।।८३।। असो आतां प्रभो दयाळा। दावीं चिन्मय स्वरूप डोळां। इतुकें बोलुनी चरणीं घातला। साष्टांग प्रणिपात तयानें।।८४।। यावरी बोले सद्गुरुराय। धरितां आपण दृढ निश्चय। रक्षण आपुलें सहज़चि होय। नाहीं संशय यामाजीं।।८५।। निश्चयें होय सर्वही प्राप्त। सद्गुण सद्भक्ति येई त्वरित। तेणेंचि समाधान पावे चित्त। क्षण न लागतां बा पाहीं।।८६।। म्हणोनि देव सद्गुरु आणि सत्- शास्त्र। यांवरी विश्वास ठेवावा निरंतर। भय नाहीं त्यासी अणुमात्र। सत्यवचन हें आमुचें।।८७।। प्रपंचीं आणि परमार्थीं। त्यासी रक्षी जगत्पति। प्रेमभाव धरावा चित्तीं। तरीच कार्य साधेल।।८८।। प्रेमावीण कोरडा निश्चय। काय उपयोग त्याचा होय। प्रेमचि श्रेष्ठ यांत संशय। नाहीं अणुभरी ज़ाणा हो।।८९।। भक्ति-प्रेम हेंचि श्रेष्ठ। त्यावीण अनेक साधनें उत्कृष्ट। केली ज़री नाना खटपट। तरी निष्फळ तें सारें।।९०।। बहुत दागिने अंगावरी। रूप सुंदर आणि गोरी। कपाळीं कुंकूं नसतां नारी। काय शोभा तियेची।।९१।। वरण आमटी खमंग रुचिकर। परि लवणावांचुनी निःसार। तैसें प्रेमावीण निष्फल समग्र। काय उपयोग तयाचा।।९२।। म्हणोनि निश्चय ज़री धरिला। तरी भक्तिप्रेमावीण तो आंधळा। त्यावांचोनि होतो ढिला। वारंवार तो पाहीं।।९३।। भक्ति-प्रेमयुक्त ज़ो निश्चय। तोचि सदा दृढतर होय। मग कैंचें त्यासी भय। सांग बापा तूं आतां।।९४।। आम्हीं काय केलें ये वेळां। तुझा निश्चयचि तुज़ फळला। निश्चयेंचि भवानीशंकर

पावला। सत्य ज़ाण मंगेशा।।९५।। ऐकुनी हें सद्गुरुवचन। संतोषला मंगेश ज़ाण। धरोनि अंतरीं सद्गुरुचरण। गेला भटकळ-ग्रामासी।।९६।। अधिकचि वाढली त्याची भक्ति। कीं स्वामींची महिमा अगाध अति। ऐसा ध्यास धरिला चित्तीं। सदा आठवी गुरुनाथा।।९७।। पहा श्रोते हो सद्गुरुराज। वृत्ति त्यांची सहज़ासहज़। नसे त्यांच्यांत अहंकार-बीज। 'मी कर्ता भोक्ता' म्हणोनियां।।९८।। करिती आपुल्या भक्तांचें कल्याण। परि 'मी केलें' न म्हणे मन। साक्षात् दत्तावतार पूर्ण। निश्चयें ज़ाण तो पाहीं।।९९।। पुढील अध्यायीं ऐसीच कथा। दर्शन दिधलें आपुल्या भक्तां। ऐका सावध करोनि चित्ता। तुम्ही भाविक श्रोते हो।।१००।। ज़री नाहीं वक्त्यासी भक्ति। तरी आपण ऐकावें प्रीतीं। आपुल्या प्रेमानें मज़ला स्फूर्ति। देतील सद्गुरु वदण्या तें।।१०१।। म्हणुनी सरसावलों ग्रंथ कराया। ज़री नसे निश्चय अंतरीं माझिया। तरी तुमच्या संगें करोनियां। मज़ही लाभ होईल।।१०२।। चातकासाठीं पडे पर्जन्य। त्याचा उपयोग घेती अन्य। तैसें तुमच्या निमित्तें होय मी धन्य। सद्गुरुकथामृत सेवोनियां।।१०३।। खचितचि मी सांगतों तुम्हां। नाहीं माझ्या अंगीं प्रेमा। मग कैसें सद्गुरुनामा। घेऊं सांगा तुम्हीच।।१०४।। नाम धरितां प्रेमें चित्तीं। प्रगटेल तेव्हां सद्गुरुमूर्ति। त्यावीण कैंची येईल स्फूर्ति। कथन कराया हो पाहीं।।१०५।। तुमच्या प्रेमें कां होईना। अणुमात्र वर्णन करवी ज़ाणा। मज़कडूनि श्रीसद्गुरुराणा। सत्य सत्य त्रिवाचा।।१०६।। ज्ञानदेवें बोलविले वेद। रेड्यामुखीं, हें असे प्रसिद्ध। परि त्या रेड्यासी काय ते शब्द। झाले का अवगत त्या समयीं।।१०७।। तो असे अज्ञ रेडा। ज्ञानदेवकृपें बोलिला भडभडां। परि तो त्यांतील अर्थ बापुडा। काय ज़ाणूं शकेल हो।।१०८।।

तैसे श्रीसद्गुरुराय। करविती ग्रंथ मज़कडूनि सदय। परि त्यांतील अर्थ अन्वय। मज़लागीं न कळे तो।।१०९।। असो आतां सद्गुरुनाथ। काय वदविती ते वदवोत। तुम्ही करोनि सावध चित्त। ऐका पुढील अध्यायीं।।११०।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें द्वात्रिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।१११।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां पापें नासती समग्र। द्वात्रिंशाध्याय रसाळ हा।।११२।। अध्याय ३२।। ओंव्या ११२।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति द्वात्रिंशोऽध्यायः समाप्तः।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमत्पांडुरंगाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय देवा श्रीगुरुराया। तुज़वांचोनि मज़ला जगीं या। समर्थ नसे उद्धाराया। कवणही ज़ाण आतां पैं।।१।। जगीं पाहतां तुज़वांचोनि। न दिसे मला या त्रिभुवनीं। तूंचि भरलासि असे या जनीं। सत्य ज़ाण गुरुनाथा।।२।। पहातां तुझें रूप सुंदर । आनंद चित्तीं होय अपार। वाचेनें बोलतां न ये साचार। काय सांगूं गुरुराया।।३।। ऐसी तुझी अगाध महिमा। कैसी वर्णावी न कळे आम्हां। तुझ्या प्रेमासी नाहीं सीमा। काय कैसें न कळे तें।।४।। आतां श्रोते हो ऐका उत्तम। श्रीसद्गुरु पांडुरंगाश्रम। यांची कथा सुंदर परम। रसाळ असे ज़ाणा ती।।५।। ज़े असती भाविक भक्त। त्यांसी प्रसन्न होती त्वरित। ज्यांचा निश्चय दृढतर सतत। त्यांसी नच ते धिक्कारिती।।६।। तरी ऐका सावधान। करितों सद्गुरुप्रेम कथन। ऐकतां सकलांचें मन तल्लीन। होतसे ज़ाण सहज़चि।।७।। शिर्शींत एक भाविक ब्राह्मण। सारस्वत आमुचा असे ज़ाण। 'हासगणी कुळकर्णी' त्यालागुन। म्हणती सकल जन तेथें।।८।। एके काळीं तो कुळकर्णी। गेला स्वामीमठालागुनी। घेतलें प्रेमें दर्शन झणीं। पांडुरंगाश्रमस्वामींचें।।९।। ज़ाऊनि श्रीस्वामींसी शरण। मंत्र घेतला तयांकडोन। आणि श्रीगुरुचरित्र पठण। कराया आरंभ पैं केला।।१०।। ज़ाऊनि राहिला आपुल्या ग्रामीं। गुरुचरित्रपारायण करी नेहमीं। धरूनि श्रीदत्त अंतर्यामीं। सप्ताह करी प्रतिवर्षीं।।११।। तो असे परम दत्तभक्त। दत्ताचेंचि ध्यान करी सतत। कधीं भेट होईल मज़प्रत। ऐसा ध्यास तयासी।।१२।। ज़री तो करी कुळकर्णी-काम। मुखीं अखंड दत्तनाम। अंतरीं असे बहुत प्रेम। ध्यातसे मूर्ति हृदयांत।।१३।। जारिणी करी

पतिसेवा। अमितचि दावी प्रेमभावा। परि नाहीं तिच्या जीवा। पतिप्रेम अणुमात्र।।१४।। तिचें लक्ष असे तेथ। जार पुरुषावरीच सतत। वरिवरी पतिसेवा करोनि, त्वरित। ज़ाय धांवोनि जाराकडे।।१५।। तैसा हा कुळकर्णी भक्त। करी प्रपंच वरिवरी सतत। परि त्याचें मन असे रत। दत्तचरणीं सारें तें।।१६।। लागलें श्रीदत्ताचें ध्यान। तळमळे मानसीं रात्रंदिन। म्हणे दत्ता तुझें वदन। कधीं दाविसी मज़लागीं।।१७।। ऐसा करितां करितां धांवा। श्रमला बहुतचि घेऊनि नांवा। परि न भेटे दत्त, तो भावा। बघतो त्याचिया निश्चयासी।।१८।। ऐसेचि कांहीं दिन लोटले। त्याचिया मानसीं ध्यान लागलें। श्रीदत्ताचें दर्शन आगळें। व्हावें मज़ला आतांचि।।१९।। कांहीं केल्या न भेटे मज़ला। आतां काय करावें याला। मिळे कीं ज़ातां त्याच्या स्थळा। गाणगापूर-वाडीसी।।२०।। ऐसा विचार करोनि मानसीं। बहुत तळमळ होय त्यासी। मातेवीण बाळ रडे उपवासी। तैसें ज़ाहलें त्यासी पां।।२१।। पतिवीण पतिव्रता। गायीवांचूनि वत्स तत्त्वतां। तैसें होय त्याच्या चित्ता। दत्तदर्शनावांचोनि।।२२।। असो मग करोनि विचार। उठोनि चालिला सत्वर। गांठिलें ज़ाऊनि गाणगापूर। राहिला तेथें मासवरी।।२३।। भाकिली करुणा नानापरी। न भेटे त्रैमूर्ति साजिरी। तेणें दुःखित झाला भारी। अंतःकरणीं त्या समयीं।।२४।। तेव्हां आणिक योजिलें त्यानें। उचित नव्हे येथें राहणें। नरसोबावाडीसी ज़ाणें। हेंचि बहु बरें मज़लागीं।।२५।। तेथें ज़ातां होईल दर्शन। श्रीदत्ताचें न लागतां क्षण। ऐसी मानसीं कल्पना करून। गेला थेट वाडीसी।।२६।। तेथें राहिला दोन मास। करी ध्यान रात्रंदिवस। घडी घडी प्रार्थी श्रीदत्तास। भेटी देईं म्हणोनियां

।।२७।। म्हणे देवा प्रभो दत्ता। देईं दर्शन मज़ला ताता। तुज़वांचोनि कवणही त्राता। अन्य नसे या जगतीं।।२८।। मी अपराधी हीन दीन। म्हणोनि न टाकीं मज़लागोन। येईं लगबगें तूं धांवोन। वाट पाहतों तव बापा।।२९।। तूं दीनदासांचा कैवारी। ऐसें म्हणती तुज़ला सारीं। परि मज़लाचि कां बा वैरी। होसी देवा दयाळा।।३०।। श्रीगुरुचरित्र केलें पठण। अमितचि केलें पारायण। परि तूं न भेटलासि म्हणोन। गेलों गाणगापुरासी।।३१।। तेथें राहिलों एक मास। प्रार्थिलें तुज़ला बहुवस। तरीही न भेटसी म्हणोनि वाडीस। ज़ाऊं ऐसें वाटलें।।३२।। आतां येथें दोन मास। येऊनि झ़ाले मज़ला खास। परि तूं न देशी दर्शन, यास। काय करावें बा सांगें।।३३।। तूं ज़री न भेटसी आतां। निश्चयें देईन प्राण ताता। येचि स्थानीं तव पायीं तत्त्वतां। सत्य सत्य गुरुदेवा।।३४।। तुझ्या भेटीवीण देवराया । शरीर हें ठेवावें कासया। वाउगेंचि पोसुनी वाढवावें तया। श्रम घेवोनि कां इतुके।।३५।। त्याहुनी येथेंचि राहावें पडोन। अन्न-उदकावांचोनि ज़ाण। ज़ावो अथवा राहो प्राण। त्याची चिंता मज़ नाहीं।।३६।। तुज़वांचोनि जग हें अनित्य। तुझें स्वरूपचि एक असे नित्य। म्हणोनि देवा सांगतों सत्य। तुज़वीण मज़ला करमेना।।३७।। किती आळवूं आतां तुज़ला। माझ़ा घसा कोरडा झ़ाला। येईं झ़डकरी भक्तवत्सला। देईं दर्शन मज़लागीं।।३८।। तुझ्या चरित्रीं ऐकिली लीला। आतां ती लपली कां ये वेळां। इतुका निष्ठुर कां हो दयाळा। झ़ालासी सांग गुरुनाथा।।३९।। बालकाअंगीं ज़री दुर्गुण। मातेसी कधींही वीट न ये ज़ाण। रडतांचि येई धांवोन। सांडोनि काज़ हातींचें।।४०।। जन म्हणती तुज़ला माउली। श्रांतांची तूं अससी साउली। कां न दया माझी या वेळीं। येतसे तुज़ला सांगें हो।।४१।।

परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

तुझे भक्त असतील अगणित। सकळांचा सांभाळ तूंचि करीत। म्हणोनि नसे कीं तुज़ला उसंत। काय कारणें न येसी।।४२।। तूं सर्वशक्तिमान आणि सर्वज्ञ। तुज़ला काय हो असे कठिण। यावें लागे कीं येथें दुरोन। हेंही कारण नसे बा।।४३।। येथेंचि अससी हृदयामाजीं। नलगे उशीर यावया आजि। पाहूं नको परीक्षा माझी। देवा दयाळा प्रभुराया।।४४।। अससी ज़री हृदयांतरीं। अज्ञत्वें मी न ज़ाणें निर्धारीं। म्हणोनि देवा मज़ला सत्वरीं। प्रत्यक्ष भेट देईं तूं।।४५।। नेणें मी बा कांहीं एक। तुझ्या प्रेमावांचूनि आणिक। तूंचि अससी माय जनक। आप्त इष्ट सकलही तूं।।४६।। सारे विषय तूंचि ज़ाण। न रुचती अन्य तुज़वांचोन। येईं आतां कृपा करोन। देईं दर्शन वेगेंचि।।४७।। बहुत जनांचे कष्ट निवारण। केलेस गुरुराया तूं धांवोन। मज़पाशींच कां इतुकें कठीण। केलें मन वज्राहुनी।।४८।। तूंचि लिहिलें कीं पुराणीं। सारे विषय तुच्छ म्हणोनि। सद्गुरुदेवचि श्रेष्ठ धनी। तोचि करील उद्धार।।४९।। तूंचि गुरु आणि देव माझा। मज़ नसेचि भाव दुज़ा । दास असें मी निश्चयें तुझा। मज़ कां तूं न भेटसी।।५०।। कितीतरी विनवूं तुज़ला। अंत किती पाहसी भला। प्राण ज़री माझा गेला। तरीही न वचें येथुनी।।५१।। आतां निश्चयें सांगतों देवा। दर्शन दिधल्यावांचूनि तुवां। अन्न-उदक न घें मी माधवा। खचितचि ज़ाण निर्धारें।।५२।। ऐसी त्यानें नानापरी। करुणा भाकिली निज अंतरीं। उपवासी राहिला सप्त दिनवरी। अन्न-उदकावीणचि तो।।५३।। म्हणे येथेंचि राहोन। तव संनिधचि देईन प्राण। ऐसें बोलुनी रात्रंदिन। करीत ध्यान बैसला।।५४।। तेव्हां ज़ाहला चमत्कार। तो आतां ऐका सविस्तर। साक्षात् दत्तात्रेयाचा

अवतार। पांडुरंगाश्रम सद्गुरु हे।।५५।। यांत संशय नाहीं अणुमात्र। ऐकतां सहज़चि कळे साचार। सावध चित्त करा सत्वर। तुम्ही सकल श्रोते हो।।५६।। तेथेंच़ तो देऊळासंनिधीं। राहिला आळवीत परमावधि। लाविली तेणें आपुली बुद्धि। दत्तध्यानीं निरंतर।।५७।। तेव्हा इकडे चित्रापुर-ग्रामीं। श्रीगुरु पांडुरंगाश्रम- स्वामी। कळवळले बहुत अंतर्यामीं। आठवुनि आपुल्या भक्तातें ।।५८।। म्हणती मानसीं मद्भक्त थोर। अज्ञपणें न कळे विचार। त्यासी आणावें भानावर। म्हणोनि उठले लगबगें।।५९।। दंड कमंडलु घेऊनि हातीं। पायीं पादुका मधुर वाज़ती। भगवी छाटी अंगावरुती। सुंदर मूर्ति च़ालली।।६०।। इकडे वाडीमाजीं हा भक्त। निज़ला असे धांवा करीत। डोळा लागला त्यासी त्वरित। काय वर्तलें तें ऐका।।६१।। आठव्या दिवशीं प्रातःकाळीं। पांच़ वाज़तां तयेवेळीं। धांवत आली सद्गुरुमाउली। स्वप्नामाजीं भक्ताच्या।।६२।। पहा कैसा निश्चय फळला। ज़री अज्ञपणें स्वामींसी विसरला। तरी स्वामी न विसरले त्याला। कळवळोनि धांविन्नले।।६३।। बालक ज़री विसरे मातेसी। तरी माता न विसरे त्यासी। सदा चिंता तिच्या मानसीं। निजबाळाची निश्चयें।।६४।। तैसी सद्गुरुमाउली आमुची। तिज़ला चिंता निजभक्तांची। विसरतांही रक्षी साची। करी कृपा तयांवरी।।६५।। परि प्रेम असावें बळकट। तरीच़ गुरुकृपा होय निकट। त्यावीण करितां बहु खटपट। होय व्यर्थ ती ज़ाणा।।६६।। असो मग ते सद्गुरु दयाघन। बैसले तेथें ज़वळी येऊन। पाठीवरी थोपटती स्वयें ज़ाण। आणि म्हणती मद्भक्ता।।६७।। ऊठ येईं आमुच्या संनिधीं। चित्रापुरासी निघें आधीं। तेथें मी असता तुझी बुद्धि। कुठें गेली हिंडाया।।६८।। म्हणोनि जिकडे तिकडे पाहीं। भटकुनी म्हणसी भेट देईं।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकरसद्गुरु

येथें मी निश्चयें नाहीं। आहें चित्रापुर-ग्रामासी।।६९।। ऐसें असतां तूं येथें ज़री। बैसलास आळवीत जन्मभरी। तुज़ला भेट न होय निर्धारीं। येईं झडकरी तेथेंचि।।७०।। ऐसें बोलुनी मधुर वचन। हस्त फिरविला पाठीवरोन। क्षणेंचि पावले अंतर्धान। ज़ागा ज़ाहला तो भक्त।।७१।। विस्मय करी आपुल्या चित्तीं। काय देखिलें स्वप्न निश्चितीं। पांडुरंगाश्रम-सद्गुरुमूर्ति। भेटली कैसी मज़लागीं।।७२।। मी आळविलें रात्रंदिन। श्रीदत्तासी प्रेमेंकरून। परि दिधलें स्वामींनीं दर्शन। स्वप्नामाजीं मज़लागीं।।७३।। आणि म्हणती चित्रापुरीं। मी असेंचि बा निर्धारीं। यावरोनि तेचि विधि-हरि-। हर त्रैमूर्ति निश्चयेंसीं।।७४।। म्हणोनि आतां तेथेंचि ज़ाउनी। घ्यावें दर्शन स्वामींचें झणीं। ऐसा विचार मानसीं करोनि। निघाला ज़ावया चित्रापुरा।।७५।। ज़ाऊनि पोहोंचला शिराली-ग्रामीं। त्वरितचि गेला सद्गुरुस्वामी। यांच्या संनिध पडला भूमीं। घातलें दंडवत प्रेमभरें।।७६।। तेव्हां सद्गुरुस्वामिराय। म्हणती तुज़ला दत्तात्रेय। यांनीं पाठविला कीं काय। सांग बापा या समयीं।।७७।। ऐसें बोलुनी प्रसन्नवदन। हस्त फिरविती मस्तकावरोन। तेव्हां काय चमत्कार तो आपण। ऐका सावध होऊनियां।।७८।। नसे देहभान अणुमात्र। निजानंदीं समरसला सुपवित्र। बघतां तोषले पंकजनेत्र। सद्गुरुवर्य त्या समयीं।।७९।। असो मग तो कुळकर्णी भक्त। दोन तासांवरी बैसला स्वस्थ। जन सारे झाले तटस्थ। आनंदले श्रीस्वामीही।।८०।। पहा ऐसा सद्गुरुमहिमा। कैसा वर्णावा न कळे आम्हां। त्यांच्या धरितां पादपद्मा। काय उणीव ती राहील।।८१।। झालें ऐक्य दत्तचरणीं। देहभान हरपलें झणीं। असे ही श्रीस्वामींची करणी। नाहीं अनुमान यामाजीं।।८२।। सद्गुरुकृपा झालियावरी। इच्छित प्राप्त होय

झडकरी। उशीर नलगे तयासी निर्धारीं। सत्य सत्य त्रिवाचा।।८३।। परि असावा भावार्थ थोर। नच त्या धिक्कारी गुरुवर। ज़री विसरे आपुल्यासी तो नर। तरीही त्यासी रक्षिती।।८४।। तो हासगणीचा गृहस्थ। असे परम दत्तभक्त। परि स्वामीचि असती दत्त। हें तो न ज़ाणे अज्ञपणें।।८५।। घेतला उपदेश स्वामींकडुनी। परि गेला धुंडाया दुज्या स्थानीं। दत्ता धांव धांव म्हणोनि। केली दिनरजनीं विज्ञापना।।८६।। परि साक्षात् दत्तावतार। तोचि याचा सद्गुरुवर। असोनि ग्रामीं चित्रापुर। कासया भेटेल अन्य स्थळीं।।८७।। आपुल्या भक्ताचा भाव बघोनि। करुणा उपज़ली स्वामींच्या मनीं। अज्ञ भक्त माझा म्हणोनि। कळवळोनि धांविन्नले।।८८।। नेणतें बालक आपुल्या मातेसी। नेणोनि, अन्य स्त्रियेच्या स्तनासी। लागे,परतोनि हुडके परियेसीं।परि न मिळे दूध तयातें।।८९।। तेव्हां कळवळोनि ती माय। लगबगेंचि धांवोनि ज़ाय। ओसंगा धरीतसे ती सदय। निजबाळकालागीं हो।।९०।। अज्ञ बाळ नेणे आपुल्यासी। हें माता समज़े निजमानसीं। तरीही न क्षोभे निश्चयेंसीं। बालकावरी कदापि ती।।९१।। तैसा हा कुळकर्णी भक्त। नेणोनि स्वामींचा महिमा अद्भुत। सैरावैरां धांवला अमित। दत्तभेटीस्तव पाहीं।।९२।। परि ज़ाणती सद्गुरु त्यासी। कळला हेतु भक्ताचा मानसीं। म्हणोनीच भेट दिधली त्यासी। कळवळोनि सत्य पहा।।९३।। पहा कैसी सद्गुरुकृपा। दाविला कैसा मार्ग सोपा। ज़ावया ऐशा सत्स्वरूपा। बहुविध यत्न लागती जनां।।९४।। गुरुकृपेवीण स्वरूपस्थिति। न लाभे निश्चयें कवणाप्रति। म्हणोनि ऐसी सद्गुरुमूर्ति। धरावी हृदयीं सतत पहा।।९५।। सद्गुरुस्वामी कृपाघन। मनुष्य नसे तो निश्चयें ज़ाण। नातरी ऐसीं कार्यें आम्हांकडोन। कैसीं होतील

सांगा पैं।।९६।। आणिक ऐका महिमा अद्भुत। साक्षात् अवतरलासे हा दत्त। त्याचा ऐका पुढील वृत्तांत। तुम्ही भाविक श्रोते हो।।९७।। कुळकर्णी श्रीदत्तस्वरूपीं लीन। होउनी राहे तास दोन। मग तो पावे सहज़ उत्थान। घाली लोटांगण गुरुचरणीं।।९८।। तेव्हां स्वामी म्हणती तयासी। अरे बाळा तूं उपवासी। राहिलास सात दिवसनिशीं। ऊठ झडकरी आतां पैं।।९९।। स्नान करोनियां सत्वर। घेईं भोजन-प्रसाद थोर। ऐसें बोलत असतां भरले नेत्र। प्रेमाश्रूंनीं स्वामींचे।।१००।। कंठ झाला सद्गदित। पुढें न बोलवे शब्दही त्यांप्रत। 'सद्गुरुमाउली' म्हणतां शोभत। याचिकारणें हो पाहीं।।१०१।। ज़ैसी माता आपुल्या बाळां। सांभाळी प्रेमानें वेळोवेळां। तैसा सद्गुरुनाथ हा आपुला। करितो रक्षण भक्तांचें।।१०२।। देह झिज़विती रात्रंदिन। संकटीं रक्षिती भक्तांलागोन। स्वार्थ ना अंगीं अणुमात्र ज़ाण। नसे अनुमान यामाजीं।।१०३।। असो मग तो हासगणी-भक्त। साष्टांग नमुनी उठला त्वरित। गुरु-आज्ञेपरी स्नानादि निश्चित। उरकुनी भोजना बैसला।।१०४।। मग सद्गुरुस्वामींनीं त्यासी। बोलाविलें विश्रांति घ्यावयासी। माडीवरीच नीज़ तूं ऐशी। दिधली आज्ञा प्रेमानें।।१०५।। तेव्हां तो ज़ाउनी निज़ला स्वस्थ। श्रमला होता तो अत्यंत। घोर निद्रा लागली त्याप्रत। सुखानें पहुडे त्याठायीं।।१०६।। संध्याकाळ झाल्यावरी। दिवे लागले घरोघरीं। दोन तास झाले तरी। हा भक्त पडला घोरतचि।।१०७।। मग झाला तो जैं जागृत। नयनीं देखे चमत्कार अद्भुत। सद्गुरुस्वामी शेज़ारीं फिरत। विश्रांतिस्थानीं आपुल्या।।१०८।। तितुक्या माजीं तेथें सुंदर। दत्तात्रेयचि देखिला सत्वर। तीन शिरें सहा हात परिकर। देखिली मूर्ति

स्वामींची।।१०९।। मुखें बघतां श्रीस्वामींचीं। तीन असती तीं सुंदर साचीं। दचकोनि बैसे तेथेंचि। प्रेमाश्रु आले नयनांत।।११०।। बोलूं ज़ातां फुटेना शब्द। बैसला तेव्हां तैसाचि स्तब्ध। पोटीं न समावे आनंद। बघुनी मूर्ति दत्ताची।।१११।। तेव्हां म्हणती सद्गुरुनाथ। इच्छा तुझी झ़ाली कीं तृप्त। भेटला कां तुज़ला दत्त। सांग बाळा आतां तूं।।११२।। मग पुनरपि पाहतां वदन। दिसतसे एकचि त्यालागून। तेव्हां तयासी पटली खूण। साक्षात् अवतार हा दत्ताचा।।११३।। आणि म्हणे सद्गुरुस्वामी। नोळखिलें देवा तुज़ला मीं। दर्शनासाठीं ग्रामोग्रामीं। हिंडलों वृथाचि हो पाहीं।।११४।। टाकुनी कल्पवृक्ष हातींचा। दारोदारीं हिंडें मी साचा। ज़वळी असतां तूं देव आमुचा। गेलों धुंडाया अन्य स्थळीं।।११५।। गृहामाजींच माय असत। अज्ञ बालक ज़ाय रांगत। हुडके तिसी रडत रडत। जिकडे तिकडे लवलाहीं।।११६।। रडें ऐकुनी माय त्वरित। काम टाकुनि येई धांवत। बालकासि त्या उचलूनि घेत। कळवळोनि लडिवाळपणें।।११७।। तैसी ज़वळीच तूं गुरुमाय। असतां साक्षात् दत्तात्रेय। इकडे तिकडे धुंडित ज़ाय।अज्ञपणें मी देवा।।११८।। मातेपरी धांवत येऊन। केलेंस माझें प्रेमें रक्षण। दाविले श्रीदत्ताचे चरण। येथेंच तूं बा आत्मत्वें।।११९।। अज्ञान्यांसी दाविती वाट। सद्गुरु हेचि असती श्रेष्ठ। तेवीं मी असतांही कनिष्ठ। आणिला बळेंचि ओढुनी।।१२०।। बालक ज़ातां इकडेतिकडे। माय आणीत त्या आपुल्याकडे। निवारी त्याचें घोरही सांकडें। तैसें देवा केलेंस तूं।।१२१।। माता असे आपुली रक्षक। ऐसें नेणूनि धांवे बालक। हें ज़ाणूनि माय ती देख। आणी ओढुनी त्यालागीं।।१२२।। तद्वत् देवा तूंचि त्राता। साक्षात् दत्तचि आमुचा असतां। हें नेणूनि भल-

त्याचि पंथा। गेलों तुज़ला शोधाया।।१२३।। तेव्हां मी अज्ञ हें ज़ाणोनि। धांविन्नलास तूं पाठ धरोनि। बलात्कारें आणिला झणीं। निजस्थानासी प्रेमानें।।१२४।। किती देवा हे तव उपकार। विसरूं कसा मी सांग सत्वर। फेडूं कैसे ते न कळे निर्धार। प्रभो गुरुराया कृपाघना।।१२५।। ऐसी बहुविध करुनी प्रार्थना। वृत्तांत सारा कथिला ज़ाणा। ऐकुनी बोले सद्गुरुराणा। पूर्वपुण्य तुझें हें।।१२६।। इतुकें बोलुनी नानापरी। केला बोध तया निर्धारीं। तेव्हां ज़ाहला आनंद भारी। तया कुळकर्णी-भक्तासी।।१२७।। धरोनि तो मानसीं बोध। त्यापरीच़ वागला तो प्रसिद्ध। तेणें ज़ाहलें तयासी शुद्ध। ब्रह्मज्ञान गुरुकृपें।।१२८।। काय सांगूं सद्गुरु- महिमा। अधिक न वर्णवे ती आम्हां। पुढील अध्यायीं आणिक तुम्हां। सांगू चरित्र स्वामींचें।।१२९।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ एकचि खास। यांच्या कृपाप्रसादें त्रयस्त्रिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।१३०।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां पापें नासती थोर। त्रयस्त्रिंशाध्याय रसाळ हा।।१३१।। अध्याय ३३।। ओंव्या १३१।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति त्रयस्त्रिंशोऽध्यायः समाप्तः।।

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमत्पांडुरंगाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय देवा श्रीगुरुराया। तव कृपेची पडतां छाया। तेव्हां काय उणीव तया। भक्तालागीं निश्चयेंसीं।।१।। ऐसी तूं सद्गुरु माउली। कीर्ति वर्णितां मूर्ति आपुली। निश्चयें न उरे मज़हुनी वेगळी। काय देवा ही नवलाई।।२।। फिटोनि ज़ाय सकल भ्रांती। अहंता ममता सर्वही पळती। मी-तूंपणाचा भाव हा निश्चितीं। सर्वही ज़ाय क्षणमात्रें।।३।। सारें जग हें तुज़वांचोनि। न दिसे अन्य बा मज़लागोनि। ऐसी तुझी महिमा म्हणोनि। झालों धन्य मी जगीं बापा।।४।। तुझ्या कृपेवांचूनि इतुकी। स्थिति न बाणे कवणासी निकी। कैसी ती आतां सांगतों मी कीं। देवा गुरुराया तुज़लागीं।।५।। सकलही विदित असे तुज़ला। मी काय सांगूं देवा दयाळा। परि प्रेम नावरे मज़ला। म्हणोनि बडबड करितों बा।।६।। बालकाच्या सकलही खेळा। माता पाहे आपुल्या डोळां। परि वृत्तांत सांगे आपुला। बाळ बोबड्या बोलानें।।७।। तैसें देवा मी अज्ञ बालक। सांगतों प्रेमें तुज़ला देख। मातेपरी तूं ऐकसी चोख। प्रेमकटाक्षें बघोनियां।।८।। पहा कैसी तुझी महिमा। पात्र होतां तुझिया प्रेमा। आत्मज्ञान होय आम्हां। क्षण न लागतां हो पाहीं।।९।। प्रपंचामाजीं आप्त बहुत। त्यांची जनांसी सहज़चि प्रीत। परि कवणाही ज्ञान प्राप्त।न होय आप्तांकडोनियां।।१०।। उलट होय दुःख अमित। आप्तसंगेंकरोनि सतत। तुझ्या संगें न होय खचित। दुःख अणुमात्र दयाघना।।११।। तुझी मूर्ति धरितां सतत। आत्मज्ञान होय त्वरित। म्हणोनि तुझा महिमा अद्भुत। नाहीं संशय यामाजीं।।१२।। माता पिता भगिनी पत्नी। भ्रतार पुत्र कन्या निशिदिनीं। ज़री

आम्ही धरितों स्वमनीं। तरीही सुख ना अणुमात्र।।१३।। परि देवा तुज़ आठवुनी। घडीभरी मूर्ति धरितां स्वमनीं। अति आनंद होय तो गगनीं। न समावे निश्चयेंसीं।।१४।। वृत्ति होऊनि तल्लीन सारी। मी-तूंपणा न उरे अणुभरी। ऐसी तुझी मूर्ति साजिरी। वर्णाया अशक्त मी पाहीं।।१५।। ज़ो असे खरा भक्त। त्यासीच़ होय ज्ञान प्राप्त। तल्लीन होय सतत। तुझ्या पदीं बा देवा।।१६।। मी एक अज्ञ पामर। न कळे सारासार विचार। तुझें प्रेम अणुमात्र। न शिवे बा मज़लागीं।।१७।। असो आतां श्रोते सज्जन। मागील अध्यायीं कथिलें ज़ाण। हासगणी-कुळकर्णी यालागोन। उद्धरिलें स्वामी-कृपाघनें।।१८।। ऐका सावध आणिक कथा। श्रीपांडुरंगाश्रमस्वामींच्या आतां। अद्भुत महिमा ऐकतां। पाप निवारण होय पां।।१९।। मंगळूर या ग्रामामाजीं। श्रीपांडुरंगाश्रम-गुरुजी। प्रतिवर्षीं ज़ाती सहजीं। समाधि-दर्शनालागीं पैं।।२०।। ग्रामासंनिध येतांक्षणीं। सामोरे ज़ाती जन त्या स्थानीं। पालखीमाजीं बैसवुनी। आणिती मिरवीत प्रेमानें।।२१।। तेव्हां तेथील सारे जन। घरोघरीं दिवे लावोन। बांधिती तोरणें गोमटीं ज़ाण। देती नारळ आरती पैं।।२२।। तेथें राहती वैष्णव जन। तेही स्वामींसी भज़ती ज़ाण। दीप लावुनी आरती भजन। करिती सदनासमीप ते।।२३।। ऐसें करिती प्रतिवर्षीं। आमुच़े स्वामी आलिया दिवशीं। घरोघरीं दिवे लावुनी परियेसीं। ओवाळिती आरती प्रेमानें।।२४।। ऐसें असतां तेथील एक। सावकार वैष्णव ज़ातीच़ा देख। तोचि मुख्य त्यांतील भजक। पुढारी सकळ कार्यांच़ा।।२५।। तयालागीं एकचि पुत्र। सद्गुणी असुनी आचरण पवित्र। पडला अंथरुणीं न उघडे नेत्र। विषमज्वर आलासे त्या।।२६।। नाना उपचार करोनि बघती। परि ते निष्फल सारे होती।

आप्तजन सकळही रडती। ज़गेना पुत्र म्हणोनियां।।२७।। सुटे अंगीं घाम बहुत। शुद्धिच नाहीं तयाप्रत। वैद्यही म्हणती न वांचे निश्चित। पडला हाहाःकार त्या समयीं।।२८।। तेव्हां तेचि दिनीं स्वामी। आले पांडुरंगाश्रम त्या ग्रामीं। आतां ऐका श्रोते हो तुम्ही। पुढील वृत्तांत सारा पैं।।२९।। प्रतिवर्षीं सावकार। स्वामी येतां गृहासमोर। दिवे तोरणें इत्यादि शृंगार। करीत परम भक्तीनें।।३०।। येणें करितां सकलही वैष्णव। करिती आपणही दीपादि सर्व। ये वर्षीं सावकाराचा भक्तिभाव। गेला सारा पुत्रावरी।।३१।। पुत्र पडला निचेष्टित। तेव्हां काय आठवे त्याप्रत। दिवे न लाविले कुणींही तेथ। व्यापिलें अंतर दुःखानळें।।३२।। मग कैंचा गुरुदेव। आठवे बापुड्यालागीं सर्व। आतां ऐका पुढील अपूर्व। कथा तुम्ही भाविक हो।।३३।। इकडे स्वामींची पालखी देख। मिरवित आणिली भक्तांनीं सुरेख। घरोघरीं दीप लाविले सन्मुख। देती आरती नारळ पैं।।३४।। तेव्हां सावकाराच्या गृहाज़वळी। दिवे न लाविले म्हणोनि त्या स्थळीं। कासया ज़ाऊं आम्ही ये वेळीं। ऐसा विचार केला जनीं।।३५।। म्हणोनि दुज्या द्वारें ज़ावया। निघाले जन हें पाहोनियां। सद्गुरुस्वामी म्हणती कासया। वैष्णव-गल्ली सोडियली।।३६।। तेव्हां म्हणती भक्तजन। दिवे न लाविले तेथें म्हणोन। कासया वृथाचि ज़ावें आपण। अनेक वाटा असती पैं।।३७।। तेव्हां म्हणती सद्गुरु दयाळ। कां न लाविले दिवे ये वेळ। बघूं आपण ज़ाऊनि सकळ। काय कारण हें सारें।।३८।। काहींतरी असावा आघात। म्हणोनि दिवे न लाविले तेथ। नातरी न सोडिती सत्कर्म निश्चित। झडकरी ज़ाऊं तेथेंचि।।३९।। पहा कैसी सद्गुरु–माउली। भक्तांवरी कृपेनें ओळली। चित्तवृत्ति बहुतचि द्रवली। ज़ाऊं म्हणती त्या स्थानीं

।।४०।। सकलही विदित तयांलागून। अंतर्ज्ञानी असती पूर्ण। परि न दाविती जनांसी ज़ाण। अंतर-हेतु हो पाहीं।।४१।। येर जनांसी कैसें वाटे। कीं तेथें दिवे न लाविले नेटें। कासया ज़ावें तया वाटे। वृथाचि आपण या विचारें।।४२।। परि सद्गुरु-स्वामींलागीं। चिंता होऊनि म्हणती वेगीं। ज़ाऊं आपण त्याचि मार्गीं। काय कारण बघूं सारें।।४३।। इतुकें कासया त्यांसी सांगें। सकलही भार वाहती अंगें। याती कूळ कांहीं न बघे। प्रेमभाव बघती पैं।।४४।। असो इकडे सावकार। वाद्यें ऐकतां महाथोर। म्हणे मानसीं काय बा मी खर। विसरलों देवा तुज़लागीं।।४५।। प्रतिवर्षीं दीपोत्सव करूनि। सुंदर मूर्ति पाहिली नयनीं। आतां पडिलों मी दिनरजनीं। सुतचिंतेच्या ज़ाळयांतरीं।।४६।। म्हणोनि न बांधिलें तोरण। ठेविले नाहीं दिवे उज़ळोन। भूल पडली मज़लागोन। अपराध थोर केला पैं।।४७।। ऐसें बोलुनी उठला लगबगें। नारळ केळीं आरती संगें। घेऊनि आरती धांवूं लागे। तोंवरी पालखी आली पैं।।४८।। येतां आपुल्या गृहासंनिध। भेटला ज़ाऊनि म्हणे मी अंध। तेव्हां बोलती स्वामी प्रसिद्ध। काय विशेष आजि पैं।।४९।। तेव्हां बोले सावकार। असे माझ्या आज़ारी पुत्र। आजिच्या दिन न ज़ाय साचार। ऐसें वाटे मज़लागीं।।५०।। म्हणोनि देवा आम्हांलागीं। दिवे उज़ळाया आमुच्या मार्गीं। भानचि राहिलें नाहीं अंगीं। थोर अपराध झ़ाला पैं।।५१।। यावरी बोलती सद्गुरुराज। इतुकेंचि पुरे आम्हां आज़। पुढील वर्षीं उत्सव सहज़। कराल पुत्रासहितचि।।५२।। यावरी बोले सावकार। आपुल्या कृपेंचि ज़गावा पुत्र। नातरी त्यासी बघतां साचार। आजिच्या दिवस नच ज़ाये।।५३।। देवा दयाळा तूंचि रक्षावें। आणिक उपाय न देखें बरवे। ऐसें बोलुनी दृढभावें। वंदिले चरण स्वामींचे।।५४।। यावरी

बोलती भक्तवत्सल। भवानीशंकर तोचि हरील। संकट सारें तुझें सकल। म्हणोनि प्रसाद दिधला पैं।।५५।। मग तो इसम करी काय। चरण प्रक्षाळुनी तीर्थ घेय। नमुनी सद्भावें धांवत ज़ाय। गृहासी आपुल्या तात्काळ।।५६।। मुखीं घातलें चरणतीर्थ। प्रसाद गंध लाविलें अंगाप्रत। पहा चमत्कार अद्भुत। ऐका प्रेमळ श्रोते हो।।५७।। सद्गुरुकृपा झालियावरी। कैंचें दुःख उरेल भूवरी। तीर्थ घालितां मुखामाझारीं। गिळिलें सारें क्षणमात्रें।।५८।। थेंबही उदक न ज़ाय पोटीं। परि चरणतीर्थ घालितां ओठीं। पसरूनि मुख उठाउठीं। गिळिलें तत्काळ क्षणमात्रें।।५९।। तेव्हां बघती सकलही जन। आश्चर्यें म्हणती अहो हे कोण। साक्षात् कृष्णचि कीं अवतरले ज़ाण। ऐसें परस्पर बोलती।।६०।। असो मग तो सावकार-सुत। हळू हळू शुद्धीवरी येत। तीन तासां-माजींच होत। बोल बोलता तो ज़ाणा।।६१।। तेव्हां त्याचीं मातापिता। बघती अंग त्याचें तत्त्वतां। ज्वर नाहीं म्हणोनि चित्ता। ज़ाहला हर्ष सकलांसी।।६२।। असो मग म्हणे तो सुत। मज़ क्षुधा लागली बहुत। देईं कांहीं आई गे निश्चित। पोटासी ग्रास मज़लागीं।।६३।। तेव्हां ऐकोनि पुत्राचें वचन। दिधलें दूध तयालागुन। निद्रा लागली न लागतां क्षण। सुखंड त्यासी ते समयीं।।६४।। तीन दिवस नव्हती शुद्धि। गुरुप्रसादें सकलही व्याधि। गेली हरोनि म्हणोनि पदोपदीं। आठविती सद्गुरुस्वामींसी।।६५।। पहांट होतांक्षणीं ज़ाण। गेला सावकार घ्यावया दर्शन। श्रीपांडुरंगाश्रम सघन। यांच्या संनिधीं हो पाहीं।।६६।।आणिक करी त्यांचें स्तवन। म्हणे स्वामी तूं कृपाघन। तव कृपेनें पुत्र ज़ाण। ज़गला निश्चयें सत्य पहा।।६७।। प्रयत्न केले नानाविध। निष्फल होती ते सबंध। तुझा देतां तीर्थ-प्रसाद। वांचला मम बाळ

देवा।।६८।। आज़वरी मी भज़लों तुज़ला। परि तूं देवचि असें न कळे मज़ला। 'सारस्वतस्वामी' इतुकेंचि आपुला। समज़ोनि राहिलों खचित मी।।६९।। आतां कळलें मज़लागुनी। श्रीकृष्णचि अवतरलासी अवनीं। किती वानूं तुझी करणी। अगाध बापा कळेना।।७०।। मी असें अज्ञ पामर। तूंचि रक्षीं निज किंकर। शरण आलों देवा सत्वर। तारीं तारीं गुरुराया।।७१।। काय करूं आतां उपाय। तोडावयासि दुस्तर भवभय। तूंचि सांगें देउनी अभय। ठेवितों माथा तव चरणीं।।७२।। ऐसें म्हणोनि ठेविला माथा। श्रीस्वामींच्या चरणावरुता। अनुताप बहुत झ़ाला चित्ता। सावकाराच्या त्या समयीं।।७३।। कंठ ज़ाहला सद्गदित। रोमांच उठती अंगाप्रत। नेत्रांतुनी होई अश्रुपात। केला अभिषेक चरणांवरी।।७४।। पुढें न बोलवे एकही शब्द। उभा राहिला होऊनि स्तब्ध। चित्तीं भरला प्रेमानंद। ओठ कांपती थरथर ते।।७५।। तेव्हां बोलती सद्गुरुराज। अणुमात्र भय नाहीं तुज़। मनुष्य-जन्म असतां सहज़। काय उणीवता असे बा।।७६।। देवावरी घालितां भार। तोचि करील त्यांतुनी पार। ऐसा धरीं दृढ निर्धार। निरंतर तूं बापा।।७७।। न कळे ज़री ज्ञानाज्ञान। न घडे अणुमात्र चिंतन। तरी धरितां त्याचे चरण। करी तो उद्धार निश्चयेंसीं।।७८।। आणिक साधन न लगे कांहीं। चिंतीत असावें तयासी हृदयीं। तनुमन इत्यादि सर्वही। करावें अर्पण प्रेमें त्या।।७९।। न सोडीं तूं प्रपंच ज़ाण। नको राहूं गुरुगृहीं ज़ाऊन। संसार-धंदा करीत असतां चरण। हृदयीं धरीं तयाचे।।८०।। इतुकें करितां तुज़लागोन। होय निश्चयें आत्मज्ञान। त्याहुनी श्रेष्ठ आणिक साधन। नसे अन्य जगतीं बा।।८१।। ऐकुनी म्हणतसे सावकार। देव आम्हां न दिसे साचार।

गुरुचि ब्रह्मा-विष्णु-महेश्वर। ऐसें कथिलें शास्त्रांतरीं।।८२।। तोचि असे परब्रह्म। तेणेंचि दावावा मार्ग सुगम। अन्य नर ज़री झाला उत्तम। तरीही तो असमर्थ।।८३।। सद्गुरु केवळ पूर्ण ब्रह्म। नाहीं त्यासी रूप नाम। आनंदाची मूर्ति परम। द्वैत नसे त्या ठायीं।।८४।। ऐशी मूर्ति ध्यातां स्वमनीं। ध्याता होय ब्रह्मचि झणीं। ऐसें आम्हीं ऐकिलें कर्णीं। शास्त्रें-संतांकडूनही।।८५।। सद्गुरु म्हणजे देव खास। प्रकाशस्वरूप म्हणती त्यास। स्वानंदाची मूर्ति सुरस। प्राकृत-सुखदुःखरहित तो।।८६।। ऐशियासंनिध ज़ातां आपण। क्षण न लागतां निरसे अज्ञान। अणुमात्र नुरे भेदभान। ऐसें म्हणे तो सावकार।।८७।। येथें येईल सहज़ प्रश्न। गुरूसी भेटती बहुत जन। उपदेश घेती त्यांकडोन। परि कां न फिटे अज्ञान तें।।८८।। तरी सांगतों त्याची खूण। कीं सद्गुरूकडे राहिलों आपण। तरी नव्हे तें खरें दर्शन। न होय उपयोग त्याचा पैं।।८९।। नाहीं झाला उपदेश-ग्रहण। वरीवरी केलें सर्वही ज़ाण। दृढतर गुरुभक्तीवीण। निष्फळ सारें तें होय।।९०।। जेव्हां होईल खरें दर्शन। तेव्हांचि होय अज्ञाननिरसन। कैसें तें सांगूं वचन। एकाग्र चित्तें ऐकावें।।९१।। सद्गुरुचरणीं मनुष्यभाव। नसावा पहा सर्वथैव। सद्गुरु हा असे देव। ऐसा निश्चय धरावा।।९२।। सद्गुरुवीण न अन्य शास्त्र। तोचि धर्म-सिंधु पवित्र। त्याची आज्ञा नुल्लंघे अणुमात्र। अति प्रेमानें गुरुभक्त।।९३।। ऐसें होतां खरें दर्शन। वृत्तिशून्य होय मन। तेव्हां होय अज्ञान-निरसन। क्षण न लागतां हो ज़ाणा।।९४।। ज़ोंवरी असे मनुष्यभाव। तोंवरी न दिसे त्यासी देव। देव देखणें याचें नांव। खरें दर्शन श्रीगुरूचें।।९५।। जेव्हां श्रीसद्गुरुराणा। देवचि दिसे आपणा। अज्ञान निरसुनी पावे ज्ञाना। निजानंद प्रगटे

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

तैं।।९६।। असो बहुत कासया बोलणें। धरितां चरण समाधान बाणे। त्यावीण आणिक नाहींत साधनें। करावी पालन गुरु-आज्ञा।।९७।। गुरु-आज्ञाचि मुख्य जनांसी। तेणेंचि समाधान होय त्यांसी। अन्य साधन नाहीं परियेसीं। सत्य सत्य त्रिवाचा।।९८।। असो सावकार परम भक्त। झाला सद्गुरूचा यथार्थ। पूजूनियां सद्गुरूप्रत। चरणतीर्थ घेऊन गेला।।९९।। तीर्थप्रसाद त्या पुत्रासी। दिला इतरही मंडळीसी। आनंद झाला सर्वांसी। गुरुमहिमा ऐकूनियां।।१००।। त्यानंतर तो त्याचा सुत। होऊनियां ज्वरमुक्त। स्वामींचें दर्शन घ्यावया मठाप्रत। गेला संगें पितयाच्या।।१०१।। जाउनी बोले देवा तुझिया। कृपेनें वांचलों गुरुराया। तुज मनुष्य म्हणे जो सखया। गहन नरक होय त्यासी।।१०२।। पूर्व सुकृत उदया आलें। म्हणोनि हे चरण लाभले। इतुके दिवस नाहीं कळलें। तूं देवचि ऐसें आम्हांतें।।१०३।। ऐसें हर्षोद्गारें स्तवुनी। प्रेमभरें पाहे नयनीं। स्वामी तूंचि समर्थ एक अवनीं। म्हणोनि घातलें दंडवत।।१०४।। तेव्हां बोलती सद्गुरुनाथ। तुमचा भाव असे बळकट। तोचि फळला तुम्हांप्रत। आमुचें काय यामाजीं।।१०५।। पहा श्रोते हो आतां सकळ। स्वामींचें हृदय कैसें निर्मल। 'मी कर्ता' ऐसा भाव समूळ। गेला निमोनि तयांचा।।१०६।। नाहीं अभिमान त्यांच्यापाशीं। अणुभरीही निश्चयेंसीं। सारें ब्रह्मचि दिसे तयांसी। कैंचा येईल अभिमान।।१०७।।जेथें असे दुजेपणा। तेथेंचि वसे अभिमान जाणा। आपुला आपणचि एकटा, तयांना। कैंचा स्फुरेल अभिमान।।१०८।। नसे ज्यांसी उंच नीच। सारें ब्रह्मचि जयां साच। तयां कैंचा अभिमान, तुम्हीच। सांगा श्रोते सज्जन हो।।१०९।। जेथें कांहीं असे द्वैत। तेथें अभिमान उठे अमित। सारें ब्रह्मचि ज्ञानियांप्रत। तेथें येई द्वैत

कोठोनि।।११०।। द्वैत नाहीं तेथें कैंचा। अभिमान उठे सांगा साचा। ऐसा सद्गुरुनाथ आमुचा। किती वानूं त्यालागीं।।१११।। आणिक ऐका त्यांचें महिमान। पुढील अध्यायीं करूं वर्णन। त्यांचें वाक्यचि अमृत ज्ञाण। तेणेंचि तरती जन पाहीं।।११२।। हेचि कथा अद्भुत। पुढील अध्यायीं सांगूं त्वरित।आतां संपूर्ण करूं येथ। सावकार-कथा हो पाहीं।।११३।। मग उभय जनक-कुमर। राहती सुखानें स्मरूनि गुरुवर। ज़री ज़ातीचे वैष्णववीर। तरीही भज़ती स्वामींतें।।११४।। ऐसे आमुचे स्वामी गुरुवर। श्रीपांडुरंगाश्रम थोर। महिमा असे त्यांचा अपार। वर्णूं शकेंना अज्ञ मी।।११५।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें चतुस्त्रिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।११६।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां पापें ज़ळती समग्र। चतुस्त्रिंशाध्याय रसाळ हा।।११७।। अध्याय ३४।। ओंव्या ११७।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति चतुस्त्रिंशोऽध्यायः समाप्तः।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीपांडुरंगाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय सद्गुरो करुणासागरा। तारीं तूं या अज्ञ पामरा। तुज़वीण अन्य नाहीं आसरा। दीनालागीं निश्चयेंसीं।।१।। तुझ्या कृपेंचि जन पावती। निश्चयें बापा मोक्षाप्रति। म्हणोनि देवा आम्हां जगतीं। हेचि चरण लाभोत बा।।२।। तूं ज़री टाकिलेंस मज़ला। कोण नेईल परमपदाला। तुज़वीण जन्म व्यर्थचि ज़ाहला। ऐसें वाटतें मज़लागीं।।३।। ज़री म्यां केला अन्याय थोर। तरी तूं देवा कृपासागर। क्षमा करोनि उद्धरीं सत्वर। भक्तवत्सला गुरुराया।।४।। माता ज़री उपेक्षी बाळासी। तें ज़ाईल कुठें कोणत्या दिशेसी। ऐसा विचार करोनि मानसीं। करीं उद्धार माझ्या पैं।।५।। ज़री असें मी बुद्धिहीन। तरी तूं देवा कृपा करोन। सांभाळीं बा मज़लागोन। येतों शरण तुज़लागीं।।६।। ज़री मज़ला जन्म देसी। तरी तूंही येईं अवतारासी। ज़री अवतार न घेऊं म्हणसी। तरी मीही जन्म नेघें कधीं।।७।। ज़री अवतरसी भक्तांसाठीं। तरी मीही जन्मोनि उठाउठीं। न सोडीन तुझी पाठी। निश्चयें ताता गुरुराया।।८।। अहा गुरुमूर्ति किती गोमटी। बघतांचि निजस्वरूपीं मिठी। पडे निश्चयें उठाउठीं। किती वानूं दयाळा।।९।। तूंचि वर्णवीं तुझी कीर्ति। ऐकाया उत्सुक श्रोते होती। झणींच़ करवीं ग्रंथसमाप्ति। देऊनि स्फूर्ति मज़लागीं।।१०।। आतां ऐका श्रोते हो सज्जन। मागील अध्यायीं केलें निरूपण। सावकार-पुत्र वांच़विला ज़ाण। पांडुरंगाश्रम-गुरुरायें।।११।। आणिक बोलूं महिमावर्णन। त्यांचिया कृपाप्रसादेंकरोन। तुम्ही सकलही लक्ष देऊन। परिसा आतां भाविक हो।।१२।। सद्गुरुस्वामी यांची कीर्ति। वर्णाया मेदिनी न पुरे निश्चितीं। त्यामाजीं

मुख्य जी प्रख्याति। तीचि सांगूं आतां पैं।।१३।। सद्गुरु बघती भक्तांचा भाव। आळवितां नुपेक्षिती सर्वथैव। ऐका कथा आतां अपूर्व। सावधचित्तें श्रोते हो।।१४।। हल्याळ या ग्रामामाजीं। नामें माने गणपत रामजी। फॉरेस्ट-रेंजर ऐशा काजीं। होता परम भाविक तो।।१५।। ऐसें असतां एकेकाळीं। मामलेदार याच्याज़वळी। खटला एक चालला त्या स्थळीं। जंगल-खात्याचा परियेसा।।१६।। तेव्हां मॅजिस्ट्रेटसाहेब यासी। माने यावरी संशय परियेसीं। म्हणोनि गुन्हेगार त्यासी। ठरविला फॉरेस्टसाहेबें।।१७।। त्यापरी तो आपुल्या ठरावीं। माने अपराधी हें लिहूनि ठेवी। तेव्हां त्यासी नोकरी केवीं। देतील सांगा तुम्ही हो।।१८।। मग गेलें त्याचें काम। बैसला म्हणत रामराम। चिंताक्रांत होऊनि परम। हळहळे मानसीं बहुतचि ।।१९।। आतां काय करूं देवा। कवण देवाची करूं सेवा। कवण पोहोंचेल मज़सी बरवा। ऐसा तळमळे हृदयांतरीं।।२०।। इतुक्यामाजीं आमुचा एक। त्याचा मित्र सारस्वत देख। उभा राहिला त्याच्या सन्मुख। म्हणे काय विचार चालविला।।२१।। बघुनी मित्रासी गणपत माने। खिन्न मनेंचि या हो म्हणे। येरु बोले त्याज़ला त्वरेनें। चिंतातुर बा कां दिससी।।२२।। यावरी म्हणे गणपति मित्रासी। काय सांगूं बा रे तुज़सी। दुस्तर संकट ओढवलें मज़सी। म्हणोनि चिंता वाटे बहु।।२३।। माझी नोकरी गेली ज़ाण। काय उपाय करावा येथून। हेंचि न कळे मज़लागोन। सांग मित्रा आतां तूं।।२४।। तेव्हां बोले सारस्वत। आम्हां मानवां काय कळत। आतां एक सांगतों तुज़प्रत। ज़ावें शरण गुरुदेवा।।२५।। आमुचे सारस्वत-मठाधीश। पांडुरंगाश्रम-परमहंस। साक्षात् दत्तावतार खास। अवतरला अवनीं या पाहीं।।२६।। त्यांसी शरण ज़ातां आपण। सारें संकट

होय निवारण। याहुनी उपाय मज़ला आन। न दिसे ज़ाण निश्चयेंसीं।।२७।। काय सांगूं आतां तुम्हां। असे अद्भुत त्यांची महिमा। भक्तजनांच्या बहुविध कामा। पुरविती प्रेमानें तात्काळ ।।२८।। चित्रापुरीं असे वास। तेथें करीं तूं प्रार्थना बहुवस। भवानीशंकरा करीं नवस। महारुद्र-अभिषेकाचा।।२९।। तोचि तेथील मुख्यदेव। नानापरी करिती उत्सव। ऐसें करितां सद्गुरुराव। तुष्टती बहुत निश्चयेंसीं।।३०।। स्वामींसी होतां संतोष। मग काय उणीवता आम्हांस। स्वामींसी प्रिय तें करितां खास। संकटें सारीं दुरावती।।३१।। असो आतां ज़ाईं शरण। पांडुरंगाश्रम-स्वामींसी ज़ाण। ऊठ झडकरी न लागतां क्षण। उशीर न करीं ये वेळे।।३२।। ऐकुनी बोले माने गणपति। प्रस्तुत नसे पैसा हातीं। कैसें ज़ाऊं त्या ग्रामाप्रती। भेटाया स्वामी-सद्गुरूतें।।३३।। यावरी बोले मित्र सारस्वत। विनंतिपत्र पाठवीं तेथ। आणिक नलगे सायास तुज़प्रत। नको ज़ाऊं त्या ठायीं।।३४।। इतुकें ऐकतां मित्राचें वचन। लिहिलें पत्र न लागतां क्षण। काय तें ऐका सावधान। श्रोते सज्जन प्रेमानें।।३५।। श्रीमत्परमहंस। सद्गुरुस्वामी पुण्यपुरुष। ऐशा चरणसंनिधीं बहुवस। प्रणिपात माझा दृढभावें।।३६।। जय जय देवा भक्तवत्सला। करुणासमुद्रा दीनदयाळा। शरण असे बाळ हा आपुला। रक्षीं रक्षीं जगदीशा ।।३७।। गुरुराया तुझी कीर्ति ऐकुनी। आलों शरण दृढभावें चरणीं। नाहीं कोणी तुज़वांचोनि। संकट माझें हरावया।।३८।। साक्षात् दत्तावतार म्हणोनि। ऐकिली कीर्ति आपुली कर्णीं। मज़ला रक्षीं कृपा करोनि। सद्गुरुराया दयानिधे।।३९।। मी असें परमसंकटीं। नोकरी गेली माझी मोठी। आली हातीं करवंटी। काय करूं हो ये वेळीं।।४०।। तूंचि आतां मज़ आधार। कवणही रक्षूं न शके साचार।

ऐसा माझा निश्चय थोर। खचित देवा गुरुराया।।४१।। काय करूं कवणा विचारूं। कोणता देव पोहोंचेल थोरु। ऐसें चिंतितां सारस्वत नरु। अवचित मित्र आला माझा।।४२।। त्यासी सांगतां वर्तमान। तो सांगता झाला मज़लागोन। आपुलें अद्भुत महिमान। प्रेमळ वचनें हो ज़ाणा।।४३।। ऐकतांक्षणीं आपुल्या ठायीं। भक्ति बैसली लवलाहीं। आतां न सोडूं कदापिही। ऐसे चरण हे देवा।।४४।। तारीं अथवा मारीं मज़ला। परि न सोडीं चरणकमलां। विशेष काय लिहूं बा तुज़ला। सर्व विदित तुज़ गुरुनाथा।।४५।। मी असें हा अज्ञ पामर। काय प्रार्थितों तुज़ला मी नर। न कळे सारासार विचार। देहबुद्धि मज़ भारी।।४६।। म्हणोनि देवा तूंचि आतां। शिकवीं सारें मज़ला ताता। अज्ञ म्हणोनि न टाकीं सर्वथा। आपुल्या बाळालागीं पैं।।४७।। असो आतां आपणां नमन। केलें माझें शरीर अर्पण। तव चरणांवरी ज़ाण। भार सर्वही तुज़वरीचि।।४८।। बालकचिंता मातेसी सहज़। तीचि करी प्रेमानें काज़। तैसी तूं मम माउली आज़। असतां कैंचें भय मज़ला।।४९।। असो आतां आपुलें बालक। गणपत रामजी माने एक। याचा साष्टांग प्रणिपात देख। स्वीकारीं देवा गुरुराया।।५०।। यापरी गणपत माने यानें। विनंतिपत्र लिहुनी त्वरेनें। पाठविलें परम प्रीतीनें। असो ऐका पुढें श्रोते हो।।५१।। तेव्हां सद्गुरु-पांडुरंगाश्रमें। विनंतिपत्र स्वीकारोनि प्रेमें। केली प्रार्थना मानेच्या नामें। भवानीशंकरासंनिध।।५२।। म्हणती प्रभो भवानीशंकरा। नीलकंठा कर्पूरगौरा। उमाधवा करुणाकरा। रक्षीं किंकरा ह्या तुझ्या।।५३।। नानापरी केली प्रार्थना। लिहितां होईल विस्तार ज़ाणा। असो मग तो सद्गुरुराणा। पाठवी प्रसाद गणपतिसी।।५४।।

आणि आज्ञा केली त्यासी। कीं हा प्रसाद तूं परियेसीं। अंगावर धारण करितां तुज़सी। होईल गुण निश्चयें।।५५।। म्हणोनि खटला संपेतोंवरी। धारण करीं अंगावरी। भवानीशंकर तुज़ निर्धारीं। रक्षील तोचि निश्चयेंसीं।।५६।। ऐसें लिहूनि आशीर्वादपूर्वक। पाठविलें पत्र त्यासी देख। पत्र वाचितां गणपति भाविक। आनंदला चित्तीं बहुतचि।।५७।। आणि आज्ञेपरी प्रसाद। अंगावरी धरिला प्रसिद्ध। मग पत्र लिहिलें शुद्ध। इंग्लंड देशीं तात्काळ।।५८।। त्याच्यावरील ज़ो अधिकारी। रज़ा घेऊनि देशांतरीं। इंग्लंडदेशामाझारीं। गेला होता त्या समयीं।।५९।। त्यासी लिहिला सकल वृत्तांत। ऐकतां तो आला धांवत। त्याचें नाम 'उड्रॉफ' असत। पुढील गंमत ऐका हो।।६०।। बघतां पत्र न लागतां क्षण। हल्याळ-ग्रामीं येई धांवोन। भेटूनि गणपत मानेलागून। सविस्तर वृत्तांत ऐकिला।।६१।। तो म्हणे भिऊं नको सर्वथा। करोनि खटपट तुज़ला आतां। पार घालीन ऐशी चित्ता। लागली हुरहुर माझिया।।६२।। म्हणूनि आलों धांवत तेथुनी। न करीं चिंता अणुमात्र मनीं। धरीं विश्वास माझिया वचनीं। नको संशय यामाजीं।।६३।। पहा काय स्वामींची करणी। त्यांची कृपाच़ ज़ाहली झणीं। यांवरी संशय न धरा मनीं। तुम्ही भाविक श्रोते हो।।६४।। तो असे ज़ातीच़ा म्लेंच्छ। आपुल्या देशाच़ाही नव्हे साच़। कासया धांवला म्हणाल तुम्हीच़। गुरुकृपा ऐसेंचि बोलाल।।६५।। साक्षात् दत्तावतार म्हणती। यांत संशय नसे चित्तीं। पुढें परिसा सावध अति। वदविती ज़ें गुरुनाथ।।६६।। मग 'उड्रॉफ' यानें तेथील सारे। कागदपत्र पाहिले नेत्रें। अपराध नाहीं ज़ाणिलें त्वरें। मानेच़ा यांत अणुमात्र।।६७।। मग सरकारामाजीं त्यानें। मानेकडुनी अपील त्वरेनें। करविलें तेव्हां निर्लोभमनें। द्रव्य खर्च़ोनि

आपुलेंचि।।६८।। तेव्हां सरकारानें लवलाहीं। कागदपत्रें तपासिलीं पाहीं। मानेचा अपराध अणुमात्र नाहीं। ऐसें ठरविलें त्या समयीं।।६९।। आणि पुनरपि त्यासी त्याच्या। ज़ागेवरी नेमिला साचा। मागील पगार सर्वही त्याचा। दिधला तत्काळ त्यालागीं।।७०।। शिवाय वरिष्ठ ज़ागा तयासी। दिधली साहेबें अतिप्रेमेंसीं। ही घटना ज़ाहली कैसी। सांगा तुम्ही श्रोते हो ।।७१।। एक गुरुकृपा झालिया पूर्ण। मग भय कैंचें त्या नरा ज़ाण। असो पुढें ऐका संपूर्ण। कथा सुंदर हो पाहीं।।७२।। तेव्हां गणपत माने यासी। कळली स्वामींची महिमा परियेसीं। तत्काळ गेला शिराळी-ग्रामासी। भेटला सद्गुरुस्वामींतें।।७३।। आणि भवानीशंकर देवाचें। घेऊनि दर्शन प्रेमळ साचें। स्तवन करोनि, आनंदें त्याचे। भरले नेत्र प्रेमभरें।।७४।। माने म्हणे स्वामिराया। तव कृपेची पडतां छाया। काय उणीव निजदासा या। निश्चयें देवा दयाळुवा।।७५।। तव कृपाप्रसादें ज़ाण। सारें संकट झालें निवारण। वरील ज़ागा पूर्वींहून। श्रेष्ठ ऐशी दिधली पैं।।७६।। आपणचि हें सारें केलें। इंग्लंडाहुनि 'उड्रॉफ' यासी आणिलें। अपील करोनि पुनरपि नेमिलें। कामावरी तेणें मज़लागीं।।७७।। आणि वरील ज़ागा मज़सी। तूंचि दिधली बा परियेसीं। नातरी काय गति कैसी। होत असती माझी हो।।७८।। म्हणोनि मी देवा सद्गुरुनाथा। हे चरण कदापि न सोडीं सर्वथा। कृपा करीं मज़वरी आतां। तारीं तारीं करुणाळा।।७९।। ऐसें प्रार्थूनि घाली लोटांगण। केलें सद्गुरुचरणीं वंदन। स्वामी म्हणती त्यालागोन। ऐक वचन आतां पैं।।८०।। हें जग सारें नश्वर। येथील भोगही अनित्य साचार। अज्ञपणें आसक्त होय नर। भुलोनि संसारा या साऱ्या।।८१।। ज़ें ज़ें प्रारब्ध असे ज्याचें। तें तें भोगावें आनंदें साचें।

तेव्हांचि ब्रह्मपदीं तो नाचे। सत्य सत्य हो बापा।।८२।। सारें नश्वर बघतां दृष्टीं। केवीं होईल दुःख पोटीं। सत्य म्हणोनि बघतां, कष्टीं। पडे मन हें निश्चयेंसीं।।८३।। संकटें येतां होय दुःख। तें हरतां होय निश्चयें सुख। पुनरपि कष्ट होतां देख। आणिक दुःख त्या लाभे।।८४।। सुखचि पाहिजे सर्वांलागून। दुःखाची इच्छा न करी कवण। परि प्रारब्ध म्हणे आपण। सुखदुःख घ्या दोन्ही।।८५।। विचार करितां दोन्ही नश्वर। एकही न राहतसे स्थिर। ब्रह्म एक सत्य हा निर्धार। नसे अणुमात्र संशय येथ।।८६।। आतां म्हणसी आम्हां सर्वथा। ब्रह्म हें न कळे चित्ता। जग हेंचि सत्य ताता। दिसे आम्हांलागीं पैं।।८७।। तरी ऐक सांगतों आतां। निष्कामें भज़ावें देवा गुरुनाथा। तरीच़ समज़ेल सर्वही चित्ता। सत्य ब्रह्मचि हें पाहीं।।८८।। सारें जग हें मिथ्या समज़ोनी। त्याग करीं बा त्याच़ा तूं झणीं। त्याग म्हणतां ज़ाशील भिउनी। नको भिऊं तूं अणुमात्र।।८९।। नको सोडूं दारा-सुत-धन। न सोडीं कधींही नोकरी ज़ाण। करीं प्रपंच सुखेंकरोन। परि सर्वही अनित्य पहा।।९०।। ज़री न येई मिथ्या दृष्टी। तरीही धरीं निश्चय पोटीं। कीं सद्गुरु ज्या सांगती गोष्टी। न होती खोट्या कदापि त्या।।९१।। ऐसें करितां करितां सहज़। येईल अंगीं विचार तो तुज़। विचारेंचि सर्वही आज़। झाले ब्रह्मज्ञानी बा।।९२।। म्हणोनि सद्गुरुचरणीं एक। दृढ विश्वास धरितां देख। समाधान होय निश्चयात्मक। सत्य वचन हें आमुच़ें।।९३।। सद्गुरु-संनिध मागावें हेंचि। निजसुख देईं म्हणोनि त्यांची। सदा प्रार्थना करावी साची। अन्य कामना त्यागोनि।।९४।। मनुष्यजन्म असे दुर्लभ। येथेंचि करावा परमार्थ लगबग। दाविती सद्गुरु मार्ग सुलभ। ज़ावें आपण त्या पंथें।।९५।। बहु न पडे सायास तुज़प्रति। ज़ें ज़ें दिसे भासे चित्तीं। तें

तें मिथ्या समज़ोनि निश्चितीं। स्वीकारीं रक्षणापुरतें तूं।।९६।। न होतां विषयीं आसक्त। भोजनादि व्यापार समस्त। करीं तूं देहसंरक्षणार्थ। अन्य व्यवसाय तूं त्यागीं।।९७।। स्वधर्मापरी करावें वर्तन। परनिंदा न करीं ज़ाण। परधन परदारा यांसी दुरोन। बघतां पळोन ज़ाईं झणीं।।९८।। ऐसियापरी परमबोध। केला स्वामींनीं नानाविध। ऐकतां चित्तीं झाला आनंद। गणपत माने यासी पैं।।।९९।। मानूनि आभार श्रीस्वामींचे। ठेविलें मस्तक चरणीं साचें। म्हणे देवा निश्चयें आमुचें। भाग्य उदेलें आजि खरें।।१००।। म्हणोनि ऐसे चरण लाभले। तेणेंचि होय आमुचें भलें। कृपा करीं बा ये वेळे। बालकावरी गुरुराया।।१०१।। ऐसें करूनि त्यानें स्तवन। करविलें प्रेमानें स्वामींचें पूजन। भवानीशंकर देवासी ज़ाण। महारुद्र अभिषेक करविला।।१०२।। यापरी करूनि सेवा सर्व। ठेवुनी स्वामींवरी भाव। सुखानें घेत त्यांचें नांव। गेला आपुल्या ग्रामासी।।१०३।। धरिली मनीं सद्गुरुमूर्ति। दरवर्षीं तो शिरालीप्रती। ज़ाई रथोत्सवासी निश्चिती। करवी सेवा प्रेमानें।।१०४।। असो ऐसी सद्गुरुमूर्ति। पहा कैसी पसरली कीर्ति। भज़ती त्यांसी सर्वही ज़ाति। ब्राह्मणादि समस्तही।।१०५।। पुढील अध्यायीं आणिक कथन। श्रीस्वामींचें महिमान। मज़ नसे ज्ञानाज्ञान। कर्ता करविता तोचि पैं।।१०६।। आनंदाश्रम परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें पंचत्रिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।१०७।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां मोह निरसेल समग्र। पंचत्रिंशाध्याय रसाळ हा।।१०८।। अध्याय ३५।। ओंव्या १०८।। ॐ तत्सत्- श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति पंचत्रिंशोऽध्यायः समाप्तः।।

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमत्पांडुरंगाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय देवा सद्गुरुराया। काय वर्णन करावें सदया। तूंचि जगीं भरलास म्हणोनियां। न सुचे वर्णाया अणुमात्र।।१।। तूं मी एक असतां निश्चयें। कैसा विसरूं तुज़ला माये। आपुल्यासी आपण विसरूनि ज़ाये। ऐसा कवणही ना जगतीं।।२।। आणिक प्रभो देवा सदया। तुज़ स्मरणेंही नाहीं गुरुराया। तूं मी एक म्हणोनियां। स्मरण विस्मरण कैंचें हो।।३।। परि देवा हें सद्गुरुप्रेम। नावरे कवणाही असे निरुपम। अहा देवा असे तें परम। कठिण प्रेम अनिवार।।४।। तुझ्या प्रेमीं माझें प्रेम। मिळतां तद्रूप रूपनाम। अगाध तुझी महिमा परम। वर्णाया अशक्य मज़लागीं।।५।। ज़ैशी तुझी इच्छा बापा। तैसेंच वर्ततां आम्हांस सोपा। मार्ग लाभेल मोक्षाचा, ही कृपा-। महिमा तुझी किती वर्णूं।।६।। तुझी इच्छा ही कीं एक। आनंदाची खाणीच सकळिक। रिता ठाव त्यावीण आणिक। नाहीं साऱ्या ब्रह्मांडीं।।७।। सूर्य उगवतां धरणीं। प्रकाशचि पडे साऱ्या स्थानीं। तैसी इच्छा उद्भवतां तव मनीं। आनंद पसरे चोहोंकडे।।८।। कसलीही असो आपुली इच्छा। आनंदचि तींत भरला साचा। तेव्हां वाईट बरवा कैंचा। गुणदोष तियेमाजीं।।९।। इच्छा आम्हां मानवांची। बरी वाईट असे साची। परंतु सद्गुरुमाउलीची। इच्छा गुणदोषविहीन।।१०।। देवा तूं गुणदोषातीत। नाहीं तुज़ला द्वैताद्वैत। सारा आनंदचि दुमदुमित। भरला तुझ्या इच्छेमाजीं।।११।। म्हणोनि देवा सद्गुरो दयाळा। तूं ठेविसी ज़ैसें या तव बाळा। त्यांतचि आनंद मानोनि ये वेळां। रहाया बुद्धि दे बापा।।१२।। आतां देवा तूं ज़ें करिसी। तें करीं बा रे मज़सी। आनंदचि त्यांत निश्चयेंसीं।

त्यावीण कांहीं ना अन्य।।१३।। सुखदुःखांमाजीं एक। केवल ब्रह्मानंदचि देख। मग कैंचें भय बा आणिक। बोलाया वाव ना उरला।।१४।। म्हणोनि तुझी इच्छा देवा। बाधक न होय कवण्याही जीवा। उद्धारचि होईल बरवा। सर्वांचा हो गुरुराया।।१५।। जैसी तुझी इच्छा असे। तैशीच तव आज्ञा होतसे। तुझ्या प्रेमळ आज्ञेंतही वसे। आनंदचि खरा बा देवा।।१६।। म्हणोनि देवा सद्गुरुवचन। हेंचि आम्हां श्रेष्ठ ज्ञाण। आज्ञा पाळितां समाधान। होय आम्हां अज्ञांचें।।१७।। श्रीगुरो आतां तेंचि कथन। वदवीं देवा मज़कडोन। नच धिक्कारीं अज्ञ म्हणोन। तूंचि उद्धरीं या दासा।।१८।। असो आतां श्रोते हो सज्जन। मागील अध्यायीं केलें निरूपण। गणपत-मानेचें संकष्ट-निवारण। केलें स्वामींनीं कृपाबळें।।१९।। पहा कैसी सद्गुरुमूर्ति। काय त्यांची महिमा अपूर्व ती। मुखांतुनी शब्द जे निघती। तेणेंचि उद्धार होतसे।।२०।। यावरी सांगूं कथा एक। चित्त देऊनि ऐका सकळिक। स्फुरविती सद्गुरु जैसें देख। तैसें कथितों आतां पैं।।२१।। शिर्शीमाजीं एक ब्राह्मण। आमुचा सारस्वतचि ज्ञाण। रंगप्पय्या गोकर्ण। म्हणती त्यासी जन सारे।।२२।। त्यासी दोघे असती पुत्र। दत्तात्रेय आणि शंकर। या नामें बाहती समग्र। ऐका कथा त्यांचि हो।।२३।। ती कथा सांगूं सुंदर। धाकुटा पुत्र गोकर्ण शंकर। याचा कैसा केला उद्धार। श्रीस्वामींनीं तें सांगूं।।२४।। दत्ता शंकर यांचें ज्ञाण। केलें पितयानें मौंजीबंधन। आणिक लावी भजनीं ज्ञाण। पुत्रांसी आपुल्या प्रेमानें।।२५।। रंगप्पय्या ईश्वरभक्त। ईश्वरदेउळीं पूजा सतत। षोडशोपचार विधियुक्त। करी प्रेमळ चित्तानें।।२६।। पुत्रासीही सांगे कधीं कधीं। भक्ति करा देवाची आधीं। तोचि हरील आधि-व्याधी। परि न रुचे

हें शंकरासी।।२७।। म्हणे मानसीं हा काय खेळ। लागलें माझ्या पितयासी खूळ। पूजेमाजीं व्यर्थचि वेळ। रात्रंदिन घालवी हा।।२८।। यासी सांगणें नव्हे उचित। आमुचा पिता असे हा निश्चित। म्हणोनि राहे तो स्वस्थ। न बोलतां अणुमात्र।।२९।। कां करावी पूजा व्यर्थ। तेणें काय होय आम्हां प्राप्त। यांत कांहीं नाहीं अर्थ। ऐसें वाटे शंकरासी।।३०।। त्याच्या चित्तीं वाटे ज़ाण। कैंचा देव कैंचें भजन। ऐसें म्हणुनी रात्रंदिन। काल व्यर्थ घालवी तो।।३१।। ऐसें असतां एके काळीं। कुलदेव मंगेश या स्थळीं। शंकर रंगप्पय्या आदि मंडळी। गेली यात्रेसी हो ज़ाणा ।।३२।। तेथील सारा उत्सव नयनीं। बघतां शंकर हरुषे स्वमनीं। सिंहनाद ऐकुनी कर्णीं। आश्चर्य करी तो बहु।।३३।। म्हणे मानसीं शंकर तेव्हां। खेळ नव्हे हा निश्चयें देवा। सत्यचि अससी तूं करुणार्णवा। नव्हे खूळ पितयाचें।।३४।। मीचि असें परम मूर्ख। माझ्या चित्तीं नाहीं विवेक। म्हणोनि शब्द ठेविला देख। माझ्या प्रेमळ पितयासी।।३५।। क्षमा करीं बा मंगेशा। अज्ञ मूर्ख पामर ऐशा। बाळालागीं दावीं दिशा। उत्तम खऱ्या मार्गाची।।३६।। मग धरोनि मनीं दृढभाव। त्यांनीं गांठिला आपुला गांव। शिर्शींत येऊनियां सर्व। पोंचले देवकृपें निजसदना ।।३७।। ऐसें असतां तेथें एक। नाडघर शांताबाई नामक। होती परम सात्त्विक भाविक। ब्रह्मज्ञानी ती पाहीं।।३८।। ती असे सारस्वत आमुची। प्रख्याति तेथें बहुत तियेची। भजन पुराण श्रवण यांतचि। घालवी काल आपुला ती।।३९।। जन ज़ाती ऐकाया बहुत। शंकरही ऐकाया तेथें ज़ात। वेदेश्वरी-शिवगीताटीका प्रख्यात। हंसराजस्वामींची वाचिती।।४०।। ऐकतां ती शंकरा वाटे आपण। सद्गुरु करावा येथोन। तेव्हां रात्रीं

देखिलें स्वप्न। परम सुंदर तयानें।।४१।। श्रीमत्पांडुरंगाश्रमस्वामी। आले शांताबाईच्या धामीं। म्हणती ऐक शंकरा सांगतों तें मी। पाळीं तूं आज्ञा आमुची।।४२।। शांताबाईसी विचारीं प्रश्न। ती सांगेल तुज़ला खूण। धरोनि हृदयीं त्यापरी ज़ाण। करीं तूं वर्तन प्रस्तुत।।४३।। ऐसें बोलोनि मृदुवचन। सद्गुरुस्वामी न लगतां क्षण। पावले ज़ाण अंतर्धान। जागृत झ़ाला शंकर।।४४।। विस्मय पावूनि आपुल्या चित्तीं। गेला त्वरित धांवूनि निश्चितीं। शांताबाईच्या सदनाप्रती। बैसला तिष्ठत त्या समयीं।।४५।। तेव्हां बघूनि शंकरासी। शांताबाई म्हणे त्यासी। काय कारण बैसलासी। सांग बाळा ये वेळीं।।४६।। शंकरें निवेदिला तिज़सी देख। स्वप्नाच़ा वृत्तांत सकळिक। उपज़ला त्याच्या पोटीं विवेक। पाहुनी शांताबाई तुष्टली।।४७।। तिनें प्रेमें पंचीकरण। विस्तारें कथिलें तयालागून। ऐकतां आनंदला चित्तीं ज़ाण। शंकर गोकर्ण तेधवां।।४८।। आनंद उच़ंबळे त्याप्रत। घडीघडी त्यासी हंसूं येत। खूळ त्या लागलें ऐसें बोलत। जन सारे त्या समयीं।।४९।। घालिती डोक्यावरी पाणी। आप्त सारे त्यालागोनि। अधिकचि हांसे खदखदोनि। बोले मुखानें अणुमात्र।।५०।। अंतर्भाव न कळे कवणा। वेडचि लागलें म्हणती ज़ाणा। परि लागला ध्यास त्याच्या मना। निजस्वरूपाच़ा हो पाहीं।।५१।। मग तो श्रीचित्रापुरास। पांडुरंगाश्रम-परमहंस। त्यांच्या संनिधीं दर्शनास। गेला लगबगें धांवोनि।।५२।। भेटला सद्गुरुस्वामींसी। आणि हेतु उद्भवला ज़ो मानसीं। निवेदिला तो प्रेमें तयांसी। कर ज़ोडोनि नम्रपणें।।५३।। तेव्हां बोलती सद्गुरुराज। सांगतों वचन एकचि तुज़। तैसें करितां आत्मज्ञान सहज़। होईल बापा निश्चयेंसीं।।५४।। वेंकटराय निलेकणी।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

यासी जप दिधला ये स्थानीं। लिहूनि घेतला तेणें येथूनि। तूं घे तयाकडूनि तो।।५५।। करीत असतां संसार-धंदा। तो जप वाचूनि करीं सदा। अर्थावरी लक्ष ठेवूनि, त्या पदा। पोंचशील तूं तत्काळ।।५६।। इतुकें सांगूनि सद्गुरुनाथ। ठेविते झाले मस्तकीं हस्त। तेव्हां शंकर प्रेमभरित। झाला सद्गदित त्या समयीं।।५७।। मग तो गेला आपुल्या ग्रामा। पुढें ऐका सद्गुरुमहिमा। ऐकतां येईल भाविकां प्रेमा। श्रोते हो तुम्हां सकलांसी।।५८।। त्यावरी तो शंकरराय। गुरुआज्ञेपरी करीत ज़ाय। दृढविश्वासें करितां होय। आत्मज्ञान त्यालागीं।।५९।। लिहुनी घेतला वेंकटाकडुनी। जप चालविला दिवसरजनीं। लाविलें मन अनुसंधानीं। 'मी ब्रह्म' ऐशा हो पाहीं।।६०।। मग ऐसें करितां करितां। झालें त्या लयसाक्षीज्ञान तत्त्वतां। तोचि अभ्यास करीत असतां। पावला पूर्ण समाधान।।६१।। पहा कैसी सद्गुरुमहिमा। परम अगाध न वर्णवे आम्हां। अणुमात्र सांगूं आतां तुम्हां। गुरुकृपेंचि श्रोते हो।।६२।। स्वामींनीं नाहीं केला उपदेश। वाक्यचि त्यांचें असे विशेष। तेणेंचि आत्मसाक्षात्कार खास। झाला शंकर यासी पहा।।६३।। गुरुआज्ञेपरी वाक्य लिहोनी। घेतलें वेंकट याचेकडोनी। तेंचि पाळिलें तेणेंकरोनी। झालें समाधान पूर्ण तया।।६४।। गुरुमुखांतुनी निघे ज़ें वचन। तें असत्य न होय कदापि ज़ाण। सद्गुरुमहिमा कथाया कठिण। असे सत्य सत्य पहा।।६५।। सद्गुरुमूर्ति केवल ब्रह्म। नाम घेतांचि पावन जन्म। ऐशा मूर्तीचें काय तें वर्म। न कळे कवणालागींही।।६६।। चरणीं ठेवितां दृढ विश्वास। होय निश्चयें आत्मज्ञान खास। त्यांची आज्ञा हेंचि आम्हांस। मुख्य साधन हो पाहीं।।६७।। पाहूं नये त्यांचे गुणदोष। गुणदोषातीत असती ते खास। केवल ब्रह्मानंद निर्विशेष। निर्गुण

निराकार ते पाहीं।।६८।। त्यांसी नाहीं विधि-निषेध। ते ज़ें करिती तेंचि सिद्ध। त्यांच्यापरी श्रेष्ठ प्रसिद्ध। धुंडितां त्रिभुवनीं मिळे ना।।६९।। म्हणोनि ते ज़ें करिती कार्य। त्याहुनी श्रेष्ठ नाहीं अन्य। बरें वाईट नसे हा निश्चय। त्यांच्या कार्यामाजीं हो।।७०।। पाप-पुण्य नाहीं त्यांसी। अधिक वर्णवेना मज़सी। ज़ें ज़ें येईल त्यांच्या मानसीं। तें तें उत्कृष्टचि होय पहा।।७१।। यावरी कवणही करील प्रश्न। ज्ञानियां कां ना पाप-पुण्य। ज़री केलें यथेष्टाचरण। तरीही पाप ना कैसें हो।।७२।। तरी ऐका सावधान। ज्यासी होय पूर्ण ज्ञान। त्यासी 'मी कर्ता' ऐसा अभिमान। नाहीं निश्चयें अणुमात्र।।७३।। 'मी कर्ता भोक्ता' वाटे ज्यासी। पाप-पुण्य बाधे त्यासी। दोन्ही नाहीं ज्ञानियासी। अकर्ता अभोक्ता तो ज़ाणा।।७४।। ज्ञानी न करिती यथेष्टाचरण। अवतारचि त्यांचा असे ज़ाण। जन उद्धरायास्तव कृपाघन। करिती सत्कार्यें निरभिमानें।।७५।। प्रारब्धानुसार ज़री हातुनी। घडलें दुष्कर्म समज़ा धरणीं। तरीही पाप ना त्यांलागोनि। पुण्यही न लगे त्यांसी पैं।।७६।। त्यांसी ज़े स्तविती भक्त। पुण्य सारें ज़ाय त्यांप्रत। पाप घेती निंदक समस्त। ऐशी शास्त्रव्यवस्था असे।।७७।। ज्ञानी होती पापपुण्यरहित। 'संचित-क्रियमाण' त्यांचें दग्ध होत। 'प्रारब्ध' एक भोगणें त्यांप्रत। परि तेंही मिथ्या तयांसी।।७८।। ज्ञानियांच्या दृष्टीसी प्रारब्धभोग। मिथ्याचि सारा देहसंग। म्हणोनि विषयसुखाचा त्याग। करिती आनंदें ते ज़ाणा।।७९।। प्रारब्धापरी सुख-दुःख। भोगिती ते भोग अनेक। परि सामान्य जनासम सम्यक। लिप्त न होती त्यांमाजीं।।८०।। सुख येतां हरुष न मानिती। दुःख येतां खेद नसे चित्तीं। सुख-दुःख दोन्ही तयांप्रति। समचि वाटे सर्वदा।।८१।। असो, ऐसा ज़ो ज्ञानी पुरुष। त्याचे न

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

पहावे गुणदोष। तो ज़ें करील त्यांतचि हरुष। मानावा आम्हीं अज्ञ जनीं।।८२।। तरीच़ होईल उद्धार आमुच़ा। धरितां विश्वास गुरुचरणीं साच़ा। पाठिराखा आपुल्या भक्तांच़ा। सदा सर्वदा तोचि असे।।८३।। सकलही असे त्याच्या स्वाधीन। तोचि सर्वां अधिष्ठान। ऐसा स्वामी कृपाघन। पांडुरंगाश्रम ज़ाणा हो।।८४।। एवं सद्गुरु पांडुरंगाश्रम। मुखींच़ें वाक्य श्रेष्ठ परम। मुखांतुनी निघतांचि उत्तम। होय तें कार्य निश्चयेंसीं।।८५।। पुढील अध्यायीं आणिक बहुत। सांगूं वाक्याची महिमा अद्भुत। ऐका सावधचित्तें समस्त। तुम्ही प्रेमळ श्रोते हो।।८६।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें षट्त्रिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।८७।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां ब्रह्मज्ञान दृढावे साचार। षट्त्रिंशाध्याय रसाळ हा।।८८।। अध्याय ३६।। ओंव्या ८८।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति षट्त्रिंशोऽध्यायः समाप्तः।।

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

।। श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।। श्रीमत्पांडुरंगाश्रमगुरुभ्यो नमः।।ॐ।। जय जय देवा सद्गुरुराया। तुझें स्वरूप अगाध सदया। ज़ातां वर्णन करावया। तल्लीन होय तेथेंचि ।।१।। कर्णीं पडतां तुझें वचन। आनंदें भरोनि येई मन। नुरे अणुमात्र मीतूंपण। अहाहा देवा प्रभुराया।।२।। चरणस्पर्श होतां मस्तकीं। निरसुनी अज्ञान सारें टाकी। ऐसा सद्गुरु तूं माझ्या या लोकीं। अवतरला साक्षात् शंकराचार्य।।३।। देवा मज़ निश्चयें ज़ाण। न कळे कांहीं ज्ञानाज्ञान। तेव्हां कैंचें ग्रंथलेखन। घडेल सदया मज़कडुनि।।४।। तुझी महिमा कराया वर्णन। योग्यता नाहीं मज़लागोन। ज़ेवीं सूर्याचें वर्णन ज़ाण। जन्मांधासी न करवे।।५।। प्रभो आतां सद्गुरुराया। पार घालीं निजदासा या। वेडी वांकुडी सेवा म्हणूनियां। नच धिक्कारीं तूं बापा।।६।। ज़ैसे बाळाचे बोबडे बोल। मातेसी तेचि गोड केवल। तैसें तुज़ला माझें सकल। गोडचि वाटे निश्चयेंसीं।।७।। असो आतां श्रोते हो सज्जन। सांगूं तुम्हां सद्गुरुवचन। मी पापी मतिहीन। परि तुम्ही परिसा प्रेमानें।।८।। तुमच्या प्रेमास्तवचि गुरु करील। सत्वर ग्रंथाची समाप्ति सकल। ऐसी आशा दिसे ये वेळे। निश्चयें ज़ाणा तुम्ही हो।।९।। ज़री मी करितों भलती बडबड। गुरुवीण नसे ती पहा उघड। अवघ्या शब्दांमाजीं गोड। त्यांचेंचि स्वरूप भरलें हो।।१०।। त्यांचें नाम म्हणिजे एक। अमृताहुनी गोड सुरेख। त्याहुनी जगीं नाहीं आणिक। साधन सोपें निजमार्गा।।११।। नाम घेतां दिसे रूप। रूप पाहतां आपोआप। तात्काळ होय ब्रह्मरूप। प्रेमळ भक्त हो ज़ाणा।।१२।। मूर्ति धरितां निजमानसीं। त्यांच्या वचनीं परियेसीं। विश्वास उपज़े निश्चयेंसीं। सत्य वचन पहा हें।।१३।। धरितां वाक्यीं विश्वास।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

मग काय उणीवता त्यास। तेणेंचि तो पावे खास। ब्रह्मज्ञान निश्चयेंसीं।।१४।। सद्गुरुवचनामाजीं निश्चयें। भरला ब्रह्मानंदचि पाहें। तें आम्हीं पाळितां लवलाहें। काय उशीर मग सांगा।।१५।। समज़ा असे एक टोपली। ती आम्रफळांनीं भरली। झांकुनी ठेविली असतां त्या स्थळीं। आला तेथें बाळ एक।।१६।। वास सुटला घमघमित। बाळ घाली टोपलींत हात। प्रयत्न केला त्यानें बहुत। आंबे त्यांतूनि काढावया।।१७।। ऐसें साहस करितां त्यासी। फळें प्राप्त झालीं परियेसीं। खाउनी तो तृप्त होय मानसीं। ज़ाई नाच़त आनंदें।।१८।। तद्वत् येथें आंब्यांची टोपली। ज़ाणा सद्गुरुनाथ-माउली। तीमाजीं असती भरलीं। परब्रह्मरूप आम्रफळें ।।१९।। गुरुदेह-टोपलीमाझार। भरलीं आम्रफळें गोड सुंदर। वचनरूप वास परिकर।येई मुखांतूनि तो ज़ाणा।।२०।। वास येतांही आम्रफळांच़ा। दुर्लक्षोनि ज़री बाळ तैंच़ा। ज़ाता सोडोनि फळें साच़ा। तृप्त झाला असता काय।।२१।। बहु प्रयत्नें घेतल्याकारण। तृप्त झाला तो खाऊन। तैसें येथें सकलही आपण। धरावा विश्वास सद्गुरुवचनीं।।२२।। येतां आम्रफळांच़ा वास। येथें आंबे असती खास। ऐसें समज़ोनि बाळास। इच्छा होय खाण्याची।।२३।। यापरी येथें सद्गुरुवचन। हेचि निजस्वरूपाची खूण। त्या विश्वासें ज़ातां पूर्ण। पावे समाधान तात्काळ ।।२४।। सद्गुरु केवळ परब्रह्म। म्हणोनि वचन गोड परम। आनंदचि त्यांत उत्तम। भरला असे हो ज़ाणा।।२५।। आंब्यांमाजीं गोडी आणि वास। दोन्ही असती पहा विशेष। तैसे सद्गुरुनाथ ब्रह्म खास। त्यांच्या वचनीं सारें असे।।२६।। त्यांच़ें वचनचि परब्रह्म। आनंदरस त्यांतचि उत्तम। भरला असे अप्रतिम। काय सांगूं तुम्हांसी।।२७।। आम्रवासें आंबा सांपडे। गुरुवाक्यें परब्रह्म

आतुडे। सद्भक्तांचें तुटे सांकडें। विलंब नसे तयासी।।२८।। एवं सद्गुरुवचनामाजीं। परब्रह्मचि भरलें सहजीं। म्हणोनि त्यांचें वचनचि आजि। श्रेष्ठ बोलती संतजन।।२९।। हेंचि मागील अध्यायीं निरूपण। सारस्वत भक्त शंकर गोकर्ण। गुरुवचनेंचि समाधान। पावला पूर्ण पहा तो।।३०।। म्हणोनि ऐसें सद्गुरुवचन। हेंचि करी सर्वांचें रक्षण। प्रपंचीं परमार्थीं ज़ाण। सद्गुरुवचनचि उद्धरी।।३१।। ज्यासी हवें ज़ें ज़ें ज़ाण। तें तें द्यावया समर्थ कृपाघन। परि करावा प्रयत्न आपण। दृढ विश्वासें हो पाहीं।।३२।। विश्वास धरोनि करितां कार्य। करितो रक्षण सद्गुरुवर्य। म्हणोनीच त्यांचे पाय। धरावे आधीं लवलाहीं।।३३।। असो आतां सावधान। ऐका श्रोते तुम्ही सज्जन। सर्वांगाचे करोनि कान। सद्गुणगान श्रीगुरूंचें।।३४।। तीचि कथा सांगूं आतां। सद्गुरुवचनचि श्रेष्ठ तत्त्वतां। तेंचि पार घाली समस्तां। निजभक्तांलागीं पैं।।३५।। मंगेश भट्ट नामें एक। सारस्वत होता भाविक। तयाची भार्या पार्वती देख। नांदती कारवार-ग्रामीं हो।।३६।। एके काळीं पार्वती आपण। मुलांसहित गेली तेथून। शिरालीमाजीं कांहीं दिन। राहिली आज़ारी म्हणोनि।।३७।। तेथें शांतादुर्गा-देउळीं। मंगेश भट्ट याची ते स्थळीं। बंधुपत्नी होती ते वेळीं। त्यांच्या सदनीं ती राहे।।३८।। तेव्हां मंगेशाचें एक मूल। पांच वर्षांचें होतें बाळ। पडलें आज़ारी ते वेळ। शिराली-ग्रामीं हो पाहीं।।३९।। झाला सन्निपात विपरीत। किंकाळ्या फोडी मुलगी बहुत। नाना उपचार करिती समस्त। परि उपयोग न होय।।४०।। झाले सर्व वैद्य थकले। ज्वर अणुमात्रही न हाले। शुद्धि नसतां तीन दिन झाले। पार्वती बहुत घाबरली।।४१।। 'आंबा' म्हणोनि एकचि शब्द। घेऊनि किंकाळे बाळ बेशुद्ध। आणिक कांहीं भेदाभेद। न समज़ेचि

अणुमात्र।।४२।। ऐसें पाहुनी सकळ जन। चिंता करिती बहुत ज़ाण। मूल न वांचे आमुचें म्हणोन। माय रडतसे ते समयीं।।४३।। तेव्हां स्वामी सद्गुरुनाथ। भक्तांची माउली प्रख्यात। आली भेटाया देवीसी तेथ। शांतादुर्गा-देउळासी।।४४।। तेव्हां मुलीच्या किंकाळ्या ऐकुनी। स्वामी वदले मृदुवचनीं। ज्वर गेला नाहीं कां अज़ुनी। तेव्हां कुळकर्णी मूर्ति उत्तर दे।।४५।। म्हणे स्वामिन् आज़ तियेस। शुद्धि नसतां झ़ाले तीन दिवस। आंबा आंबा म्हणे त्याहुनी विशेष। नाहीं शुद्धी तिज़लागीं।।४६।। यावरी म्हणती स्वामीराज। नगर-रामराय यांचें आज़। औषध द्या म्हणिजे सहज़। गुण येईल तिज़लागीं।।४७।। येरू बोले त्यांचें आम्हीं। औषध दिधलें होतें स्वामी। ज़े वैद्य शिराली-ग्रामीं। थकले सर्वही ये समयीं।।४८।। तेव्हां स्वामी पुनरपि म्हणती। नगररामाचें औषध निश्चितीं। द्यावें आज़चि सत्वरगतीं। होईल बरी ती ईशकृपें।।४९।। आणि देवीसन्मुख तिज़ला। पायऱ्यांवरी आणुनी घाला। गुण होईल सत्वर बाळा। इतुकें बोलुनी गेले ते।।५०।। मठामाजीं ज़ाउनी सत्वरीं। आंबा पाठविला ते अवसरीं। निरोप धाडिला आंबा मुखांतरीं। घाला त्या बाळाच्या प्रसाद हा।।५१।। सद्गुरु-आज्ञा होतां ऐसी। तात्काळ आंबा लाविला मुखासी। धरिला विश्वास निजमानसीं। वचनावरी स्वामींच्या।।५२।। आणि नगररामरायासी। बोलावुनी आणिला आज्ञेसरशी। म्हणती तुमचें औषध इज़सी। द्यावें पुनरपि आतां पैं।।५३।। यावरी बोले रामराव। आमुचें औषध झ़ालें सर्व। उपयोगा न ये सर्वथैव। कासया पुनरपि वृथाचि।।५४।। तेव्हां बोले पार्वती त्यासी। श्रीस्वामींची आज्ञा आम्हांसी। तुमचें औषध द्यावें इज़सी। म्हणोनि तुम्हीच द्या कृपेनें।।५५।। श्रीस्वामींचें वाक्यचि श्रेष्ठ। तेचि

हरिती सर्वही कष्ट। ऐशी ऐकतां सारी गोष्ट। स्मित-मुख झाला रामराव।।५६।। आणि म्हणे श्रीस्वामींची। आज्ञा असतां भीति कैंची। देतों औषध आतांचि। उशीर न करूं ये समयीं ।।५७।। इतुकें बोलुनी कांहीं जिन्नस। देऊनि म्हणे याचा सुरस। काढा करूनि पाजावा मुलीस। बरी होईल गुरुकृपें।।५८।। ऐसें ऐकतां वैद्याचें वचन। काढा केला न लागतां क्षण। पाजिला सद्गुरुवाक्य स्मरोन। भक्तिपूर्वक ते समयीं।।५९।। पहा कैसा चमत्कार। सद्गुरुमहिमा परम अपार। काढा देतांचि सत्वर। आला घाम तिजलागीं।।६०।। आणि ज्वर गेला निघोनी। आनंद झाला सर्वांच्या मनीं। म्हणती काय ही स्वामींची करणी। धन्य धन्य गुरुनाथ ते।।६१।। मग थोड्या दिवसांमाजीं । ज्वर सारा गेला सहजीं। श्रीपांडुरंगाश्रम-गुरुजी। यांची कृपा सारी ही।।६२।। पहा कैसें सद्गुरुवचन। वचनेंचि बरी झाली ती पूर्ण। यांत नाहीं अनुमान। ऐका श्रोते हो सावध।।६३।। आधीं दिधलें होतें औषध। बहुत वैद्यांचें नानाविध। आणि रामरावाचेंही प्रसिद्ध। दिधलें होतें ते समयीं।।६४।। माझ्या औषधें न होय गुण। कासया वृथाचि देऊं आपण। रामरायें ऐसें बोलून। औषध बंद ठेविलें।।६५।। परि तेंचि देतां पुनरपि त्वरित। गुण आला गुरुकृपेंचि निश्चित। काय महिमा त्यांचा अद्भुत। न वर्णवे आम्हां अज्ञांसी।।६६।। एवं सद्गुरुवाक्यचि श्रेष्ठ। प्रपंचीं परमार्थीं हरे संकट। आणि पावती सकलाभीष्ट। गुरुवाक्येंचि हो पाहीं।।६७।। त्यांचें वाक्य इतुकें कासया। श्रेष्ठ म्हणाल प्रपंचीं या। तरी चित्त सावध करोनियां। ऐका सज्जन श्रोते हो।।६८।। सद्गुरुमूर्ति परम सात्त्विक। नाहीं द्वैतभाव त्यांसी देख। दिसे परब्रह्मचि सकळिक। सच्चिदानंद त्यां पाहीं।।६९।। म्हणोनि त्यांची शुद्ध बुद्धि। आणि

वाणी सरळ साधी। तेवींच असत्य न होय सुधी। वाक्य त्यांचें कदापिही।।७०।। ज़री अत्यंत वस्त्र मलिन। त्यासी शुद्ध लावितां साबण। घाण ज़ाय सारी निघोन। वसन होय तें शुभ्र ।।७१।। तैसी सद्गुरुस्वामींची वाणी। साबणापरी शुद्ध म्हणोनि। बोलतां जनांचीं दुरितें पळोनि। ज़ाती सर्वही तत्काळ।।७२।। साबण काढी वस्त्राचें मलिनत्व। तैसें आम्हां अज्ञांचें सर्व। पाप नासुनी टाकी गुरुदेव। आपुल्या वाणीनें लगबगेंसीं।।७३।। पूर्वपापें होय ग्रहबाधा। तेणें नाना रोग ज़डती सदा। आणि येई बहुत आपदा। पापानेंच सारी ती।।७४।। तेव्हां सद्गुरूचें शुद्ध वचन। निघतांचि त्यांचे मुखांतून। आणि कृपारूप घालितां जीवन। धुऊनि टाकिती पापमळ।।७५।। पाप नसतां ग्रह पळती। ग्रह पळतां रोग ज़ाती। ऐशी सत्पुरुषांची मूर्ति। काय सांगूं नवलाई।।७६।। म्हणोनि सद्गुरुवचनापरतें। आणिक नाहीं साधन आमुतें। तेंचि पालन करितां आयितें। साधे आपणा परमार्थ।।७७।। प्रपंचीं अथवा परमार्थीं। गुरुवचनचि थोर अति। तेणेंचि होय सुख निश्चितीं। नाहीं संदेह यामाजीं।।७८।। परमार्थाचा पंथ हा कठिण। ऐसें आम्हां वाटे ज़ाण। परि पाळितां सद्गुरुवचन। परम सुलभ होय तो।।७९।। म्हणोनि सद्गुरुस्वामी दयाघन। यांचे धरावे आधीं चरण। आणि पाळावें त्यांचें वचन। मग कैंचें भय त्याला।।८०।। संसाररूप नदी खोल। ओलांडावी आम्हीं सकळ। काय उपाय करावा ये वेळ। तरी नौका लक्षावी।।८१।। येथें सद्गुरु-आज्ञा हीचि। परम सुंदर नौका आमुची। त्यावरी बैसावें त्वरितचि। तीचि पार नेत असे।।८२।। नावेवरी न बैसतां। पैलतीरा पायींच ज़ातां। तो बुडूनि मरेल क्षण न लागतां। 'मी शहाणा' या अभि-

मानें।।८३।। तैसें येथें सद्गुरु-आज्ञा। धिक्कारूनि म्हणे मीचि शहाणा। ऐशा अभिमानें करितां गर्जना। काय गति होईल ती ऐका।।८४।। मोक्ष राहे ठायींच्या ठायीं। परि अंतीं अधोगतीसी ज़ाई। त्याहूनि संसारीं रमतां कांहीं। नाहीं तितुका दोष खरा।।८५।। पहा कैसें तें परिसा आधीं। जेणें ओलांडावी नदी। तेणें बैसतां नौकेमधीं। ज़ाय पैलतीरा बिनधोकपणें।।८६।। पैलतीरींचि राहतां ज़ाण। सुखी राहे तो कीं आपण। चालूनि ज़ाय ज़री नदींतून। मेल्याविण न राहे।।८७।। तद्वत् येथें भवनदीपार। ज़ाऊनि निजसुखीं रहावें हा निर्धार। परि गुरुआज्ञारूप नाव साचार। त्यागुनी अभिमानें अन्य करी।।८८।। मोडितां सद्गुरु-आज्ञा आपण। ज़ावें लागे अधोगतीस ज़ाण। मग कैंचा मोक्ष गहन। लाभेल सांगा आम्हांसी।।८९।। इकडे संसारींही बरवी गति। नाहीं कदापि त्याप्रति। ऐसी गुरु-आज्ञेची प्रचीति। अनुभवसिद्ध हो ज़ाणा।।९०।। यावरी येईल सहज़चि प्रश्न। ज़ावें ज़री त्या गुरूसी शरण। तरी अणुमात्र चुकतां आपण। गति कठिण होईल पैं।।९१।। तरी परिसा याचें उत्तर। श्रीगुरूसी भज़तां दृढतर। नाहीं भय त्यां हा निर्धार। सद्गुरु माउली कनवाळू।।९२।। ते न करिती आज्ञा कठिण। अति सुलभ सांगे कृपाघन। ज्याची योग्यता जितुकी ज़ाण। तैसीच करिती आज्ञा ते।।९३।। तीही भक्तांच्या हितासाठीं। त्यांत स्वार्थ नसे त्यांच्या पोटीं। असो ज्याची योग्यता मोठी। त्यासीच कठिण आज्ञा करिती।।९४।। सारांश, ज्याची जितुकी योग्यता। तितुकेंचि त्यासी सांगती तत्त्वतां। ज़ैसी रक्षी मुलांसी माता। तैसीच रक्षी गुरुमाउली।।९५।। ज़ें असे लहान बालक। त्यासी दूधचि पाजी माता देख। जया पेज़ घालावी आणिक। भात ज्यासी तें त्या देई।।९६।।

यापरी करी माता जतन। जया ज़ें द्यावें तेंचि देऊन। तैसे सद्गुरुस्वामी सघन। सांगती मार्ग भक्तांसी।।९७।। आणि माता करी काय। ज़ें करितां हित होय। तेंचि कराया शिकवी निर्भय। निजबाळासी प्रेमानें।।९८।। न केल्या ती कोपे बहुत। बहुविध त्यासी शिक्षा करीत। परि अंतरीं तिच्या अमित। प्रेम असेचि ज़ाणा हो।।९९।। अमुक अमुक करीं ऐशी। आज्ञा करी ती दिननिशीं। हित व्हावें हाचि मानसीं। हेतु असे तियेच़ा।।१००।। जेणें पाळिली मातेची आज्ञा। तोचि पुढें होय शहाणा। नातरी होय दुर्गुणी ज़ाणा। ढुंकून त्याकडे पाहीना कोणी।।१०१।। तद्वत् ज़े साधु संत। केवळ जनांच़ें कल्याण इच्छितात। त्याचि कारणें आज्ञापिती त्यांप्रत। स्वधर्मापरी वर्तावें म्हणूनि।।१०२।। सोडावें तुम्हीं अन्नपान। संसार सोडूनि सेवावें वन। ऐसें कदापि न सांगती वचन। साधुसंत गुरुराज।।१०३।। ठायींच़ बैसोनि करावा परमार्थ। दुर्विषय सारे सोडावे येथ। आणि दुर्गुण सोडूनि सतत। ध्यावें मानसीं प्रभुराया।।१०४।। आणिक करावा स्वधर्म आपुला। भगवद्भाव धरोनि च़ांगला। प्राणिमात्रांसीं पहावें सकलां। हीचि आज्ञा करिती ते।।१०५।। 'हातीं काम मनीं राम'। यांतचि घाला अवघा जन्म। ऐसा भक्तांसी मार्ग सुगम। दाविती प्रेमळ चित्तें ते।।१०६।। ते ज़ें सांगती साधन। तेंचि प्रेमें करावें आपण। ज़री मीचि शहाणा म्हणोन। वर्तेल तरी घसरे तो।।१०७।। एवं गुरु-आज्ञेपरी वर्ततां। प्रपंचीं अथवा परमार्थीं भक्तां। सुखचि होय तयांसी तत्त्वतां। नाहीं संशय यामाजीं।।१०८।। सद्गुरुप्रेम ज्याच़े चित्तीं। त्यासी गुरुआज्ञा सुलभचि दिसे ती। प्रेमें पाळितां उद्धार निश्चितीं। होय त्या भक्ताच़ा तत्काळ।।१०९।। ज़ो असे खरा भक्त। त्यासी मिळती खरे संत। तेणें तत्काळ होय तो मुक्त। सत्य

सत्य त्रिवाचा।।११०।। एवं सद्गुरु-महिमा अपार। पुढील अध्यायीं सांगूं सविस्तर। तेणें तराल भवसागर। सद्गुरुकृपेंचि सज्जन हो।।१११।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपा-प्रसादें सप्तत्रिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।११२।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां पापें ज़ळती समग्र। सप्तत्रिंशाध्याय रसाळ हा।।११३।। अध्याय ३७।। ओंव्या ११३।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति सप्तत्रिंशोऽध्यायः समाप्तः।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम श्रीशंकर सद्गुरु

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमत्पांडुरंगाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जया जी सद्गुरुदेवा। म्यां कांहीं न केली सेवा। परि न धिक्कारिलें मज़ तुवां। उपकार कैसा फेडावा।।१।। अन्य कवणाचाही उपकार। फेडाया होय साचार। परि सद्गुरूचा उपकार थोर। न होय फेडाया कवणाही।।२।। धन्य धन्य सद्गुरुराया। तव कृपेची पडतां छाया। काय उणीवता निजदासा या। भक्तवत्सला कृपाघना।।३।। मज़ नसतां प्रेमभक्ति। तूंचि करोनि निष्काम प्रीति। ओढूनि घेतलें मन माझें निश्चितीं। आपुल्या चरणीं बा देवा।।४।। आतां नच ज़ाय कदापि मन्मन। सोडोनियां हे तुझे चरण। बळेंचि ओढितांही ज़ाण। तरीही न येई सोडोनि ।।५।। अहा काय मोहक शक्ति। कैशी ओढिते लगबगें ती। म्हणोनि देवा तुझी प्रीति। खरी याचिकारणें।।६।। म्हणोनि देवा न मागें कांहीं। तुझें प्रेम एकचि देईं। त्यावीण सारें नश्वर पाहीं। देवा गुरुराया कृपाघना।।७।। असो आतां श्रोते हो सज्जन। मागील अध्यायीं केलें निरूपण। पांडुरंगाश्रमस्वामी सघन। यांचें वाक्यचि श्रेष्ठ असे।।८।। मंगेशभट यांच्या मुलीसी। ज्वरमुक्त करोनि परियेसीं। वांचविली महिमा ऐसी। कथिली हेचि सुरस कथा।।९।। आतां आणिक सांगूं महिमा। नाहीं निश्चयें त्यासी सीमा। ऐकतां सहज़ उपज़ेल प्रेमा। भाविक सज्जन श्रोत्यांसी।।१०।। असो आतां ऐका सादर। श्रीपांडुरंगाश्रम गुरुवर। साक्षात् दत्ताचा अवतार। नाहीं संशय यामाजीं।।११।। पहा आणिक सांगूं कथा। स्वामींची अद्भुत शक्ति आतां। ठेवावें येथेंचि आपुल्या चित्ता। स्थिर करोनि गुरुचरणीं।।१२।। दक्षिणदेशीं कुंदापुर। या नामें असे एक नगर। तेथें होता सावकार। कामत उपनाम तयाचें।।१३।। तो करी व्यापार थोर। तेव्हां ओढवलें

संकट दुस्तर। खटला झाला तयावर। काय कारणें तें ऐका।।१४।। सरकारासी नकळत। मीठ बनवोनि तो विकीत। ऐसा आरोप दुर्जन घालीत। सावकार कामत याज़वरी।।१५।। आणि खटला केला त्याज़वरी। मॅजिस्ट्रेट याकडे सत्वरी। पोटीं धरोनि मत्सर भारी। जनांनीं झडकरी त्या समयीं ।।१६।। होता ख्रिश्चन मॅजिस्ट्रेट। त्याकडे खटला नेला थेट। विचार त्यानें केला नीट। कायद्याची दृष्टि धरूनि।।१७।। मुख्य ठराव सांगणें एक। तो सांगूं ज़ाणा उदयीक। ऐसें बोलिला मॅजिस्ट्रेट देख। आरोपियातें परियेसा।।१८।। बोलुनी तो गेला गृहासी। कामतही आपुल्या सदनासी। होऊनि चिंतातुर मानसीं। विचार करीत बैसला।।१९।। उदयीक सारा ठराव होय। शिक्षा ठरविती कीं काय। आतां कोण मज़ला अभय। द्यावया समर्थ या जगतीं।।२०।। ऐशी चिंता करीत मानसीं। बैसला असतां त्या समयासी। त्याच़ा मित्र सारस्वत त्यासी। अवचित येऊनि त्या बोले।।२१।। अहो भिऊं नको सर्वथा। सोडीं निश्चयें सर्वही चिंता। आमुच़े स्वामी येती आतां। तेचि हरतील संकट हो।।२२।। चित्रापुर-स्वामी पांडुरंगाश्रम। ब्रह्मज्ञानी श्रेष्ठ परम। आमुच़े सारस्वतांच़े गुरुजी उत्तम। दत्तावतार म्हणती तयां।।२३।। उदयीकचि येती येथें। त्यांच्या भेटीसी नेऊं तूंतें। शरण ज़ाऊनि त्यां, चरणांतें। करीं साष्टांग प्रणिपात।।२४।। त्यांसी ज़ातां दृढभावें शरण। ते रक्षितील तुज़लागोन। यामाजीं नको अनुमान। धरूं तूं बा लवलाहीं।।२५।। यावरी कामत याच़ें हृदय। शांत झालें ऐकुनी अभय। म्हणे तूं मज़ला ये समय। बरवा पोंच़लास धैर्याला।।२६।। ज़ाऊं आम्ही तये स्थानीं। पूर्वसुकृत उगवलें म्हणुनी। ऐशा संकटीं येती धांवुनी। ऐसें मज़ला वाटतें।।२७।। व्याधीनें

पीडितां बहुत। चालुनी आला वैद्य अवचित। तैसे तुमचे सद्गुरुनाथ। येती संकटीं रक्षाया।।२८।। दरिद्री भुकेनें झाला व्याकुळ। पाचारुनी अन्न घालिती ते वेळ। तैसे आपुले स्वामी दयाळ। आले मज़ला रक्षावया।।२९।। असो बहुत कासया बोलावें। उदयीक तुवां सत्वर यावें। स्वामि-दर्शना मज़ला न्यावें। उपकार तुझे होतील बा।।३०।। यावरी बोले त्याचा मित्र। येतों निश्चयें सरतां रात्र। ऐसें बोलत असतां भरले नेत्र। त्या मित्राचे प्रेमानें।।३१।। तो म्हणे कामता तुज़ला। संशय न यावा कीं मी आपुला। ज़ातीचा नव्हे म्हणोनि मज़ला। स्वामी पोंचती कीं नाहीं।।३२।। ऐसें अनुमान सोडीं सकल। स्वामी मनुष्य नव्हे दयाळ। देवचि, त्यांचा भेद समूळ। नासूनि गेला आधींच।।३३।। ते न बघती याती कुळ। भाव ज्याचा असे निश्चळ। त्याचा करिती सांभाळ। सांगावें नलगे त्यांलागीं।।३४।। इतुकें बोलुनी मित्र सारस्वत। गेला,तो दुज्या दिनीं त्वरित। आला कामताच्या सदनाप्रत। ज़ावया दरुशना स्वामींच्या।।३५।। मग दोघे मित्र मिळोनि। गेले भेटाया स्वामींलागोनि। येत होते ते जेथोनि। तेथें गेले सामोरे।।३६।। मार्गीं तिष्ठत बैसला कामत। तोंच आली पालखी तेथ। तेव्हां घातला साष्टांग प्रणिपात। मार्गींच तेणें प्रेमानें।।३७।। मार्गीं पालथा पडला पायां। तो न उठेचि तेथोनियां। प्रेमाश्रु लोटले कांपे काया। भयभक्तीनें ते समयीं।।३८।। बघुनी लोकीं त्यासी उठवुनी। पालखीज़वळी गेले घेउनी। वंदन केलें चरणांलागुनी। कामत-सावकारें त्या समयीं।।३९।। तो म्हणे कर ज़ोडोनि। प्रभो स्वामिन् तुज़वांचोनि। रक्षिता नसे आन त्रिभुवनीं। म्हणोनि आलों शरण तुला।।४०।। मज़वरी झाला असे खटला। आजिचा दिन हा शेवटला। शिक्षाचि

होईल ये वेळां। ऐसें मज़ला वाटतसे।।४१।। ऐसा अपमान करोनि सहन। ज़गण्याहुनी बरवें मरण। म्हणोनि आलों वंदावया चरण। अंतकाळीं हे आपुले।।४२।। अंतकाळीं सद्गुरु-भेट। त्याहुनी आणिक नाहीं श्रेष्ठ। माझें मन हें झालें भ्रमिष्ट। तव पदकमलीं स्थिर करीं।।४३।। आणिक कांहीं मागणें नाहीं। हीचि प्रार्थना या तव पायीं। भक्तवत्सल तूं गुरुमाई। परम कृपाळू दयाघन।।४४।। पहा कैसा प्रेमळ भक्त। चुकवी अपकीर्ति नाहीं बोलत। त्यासी वाटे श्रीगुरूप्रत। ऐसें मागणें उचित नव्हे।।४५।। त्यांसी घालूं नये भीड। आमुच्या सुखदुःखाची धडपड। बोलणें व्यर्थ बडबड। ते ज़ाणती सारें मन आमुचें।।४६।। मातेसी सांगावें नलगे बालकें। सहज़चि जतन करी कौतुकें। तिच्या हस्तीं असे ज़ें निकें। तें देउनी लाड पुरवी ती।।४७।। परि ज़ें नसे तिचे हातीं। तें कोठुनि कैसें देईल ती। रडतांही बाळ आक्रोशे अति। न शके ती द्यावया।।४८।। हट्ट केला त्यानें अति। मारी सक्रोधें तयाप्रति। आणि म्हणे माझिया हस्तीं। नसतां काय तुज़ देऊं।।४९।। तद्वत् सद्गुरु स्वामीनाथ। यांसी कळतसे भक्त-हेत। परि प्रारब्ध चुकवाया नच होत। कवणासीही निश्चयें।।५०।। ज़ें असे सद्गुरु-हस्तीं। भाविकां भज़तां प्रेमें देती। मागावें न लगे तयांप्रती। आपणचि देती संतोषें।।५१।। यावरी येईल सहज़ प्रश्न। ज़री प्रारब्धें मिळे ज़ाण। तरी गुरुकृपा काय कारण। सहज़चि मिळे तें त्यासी।।५२।। तरी ऐका सावध चित्तें। कीं ग्रह फिरतां संकट येतें। त्यासी गुरुकृपा झालिया अवचितें। परिहार होय त्याचा पैं।।५३।। सारें जगचि त्यांच्या हातीं। तेव्हां ग्रहांसी यावया छाती। सद्गुरुसन्मुख कैशा रीतीं। होईल सांगा तुम्ही हो।।५४।। मातेपरी त्यांच्या हस्तीं। ज़ें असे तेंचि देती।

ईश्वरें प्रारब्ध रचिलें त्याप्रति। न करिती ते प्रतिबंध।।५५।। प्रारब्ध चुकवावयासी। कवणाही न होय परियेसीं। न चुके प्रारब्ध ज्ञानियांसी। चुकवील कैसा तो अन्याचें।।५६।। रामकृष्णादि अवतार। त्यांसही प्रारब्ध-भोग थोर। चुकले नाहींत साचार। एवं कवणाही न चुके प्रारब्ध।।५७।। आज़वरी ऐसेच ब्रह्मज्ञानी। होऊनि गेले अनेक धरणीं। न घेतलें प्रारब्ध चुकवोनि। कधींकाळीं कवणेंही ।।५८।। ग्रहबाधें कांहीं येती संकष्टें। सद्गुरुकृपें तीं पळती नेटें। परि प्रारब्ध हें न सुटे। सद्गुरुकृपा असतांही।।५९।। ईश्वर-इच्छेच्यावरी आपण। सद्गुरुस्वामी कृपाघन। न करी अन्य मत-स्थापन। कदापिही निश्चयेंसीं।।६०।। ग्रहबाधें जीं येती संकष्टें। तीं तोडिती आपुल्या कृपेनें नेटें। ऐसें सद्गुरुनाथ मोठे। अगाध महिमा त्यांची पैं।।६१।। कालमृत्यु हा प्रारब्धाचा। अपमृत्यु हा ग्रहबाधेचा। म्हणोनि कालमृत्यु कवणाचा। न चुके कदापि हो ज़ाणा।।६२।। अपमृत्यु हा सद्गुरुकृपेनें। चुकतो ज़ाणा निश्चयानें। तैशींच संकटें येती जीं ग्रहबाधेनें। गुरुकृपेनें तीं चुकती।।६३।। यावरी आतां येईल प्रश्न। सद्गुरु हा ईश्वर असतां ज़ाण। त्यावरी आणिक ईश्वर कवण। प्रारब्ध-रचिता तो।।६४।। तरी ऐका याचें उत्तर। ईश्वर म्हणिजे नव्हे साकार। साकार ईश्वर परतंत्र साचार। प्रारब्धें भोगे तो सुख-दुःख।।६५।। तरी श्रोते ऐका हा प्रकार। सांगूं कोण असे तो ईश्वर। परि क्षमा करा मज़ला सत्वर। वृथाचि वटवटतो म्हणूं नका।।६६।। परब्रह्म ज़ें निर्विकार। त्याचें मायेंत प्रतिबिंब साचार। तयासीच म्हणती ईश्वर। त्याच्याचि प्रेरणें प्रारब्ध हें।।६७।। बुद्धीमाजीं ज़ें प्रतिबिंब पडे। तेणें तें ब्रह्मचि जीव रोकडें। प्रारब्धापरी सुखदुःख उघडें। भोगी 'मी कर्ता' म्हणोनि

तो ।।६८।। मायेमाजीं पडे प्रतिबिंब। म्हणोनि तो ईश्वर नियंता स्वयंभ। तेणें प्रेरणा करितां आरंभ। होय सर्वही कार्यासी।।६९।। त्याच़ेवरी ब्रह्मज्ञानी आपुली। थोरवी न दाविती भूतळीं। यावरी संशय धरूं नये ये वेळीं। ज्ञानी असमर्थ म्हणोनियां।।७०।। समर्थचि असे तो निश्चित। तोचि ईश्वर असे प्रख्यात। असाध्य कैंच़ें असे त्याप्रत। परि हानी न करी प्रारब्धाची।।७१।। काय कारणें तें ऐका। त्यांच़ा अवतार कासया तो निका। जगदोद्धारासाठींच़ देखा। नव्हे भुलवाया जनांसी।।७२।। ज़री प्रारब्ध चुकवील आपण। तरी सर्वही धरितील चरण। उसंतचि न मिळे त्यालागोन। क्षणभरीही ज़ाणा निश्चयें।।७३।। मग कैंच़ा जगदोद्धार। एकमेकां वधितील नर। पापाच़ें भय सारें दूर। पळोनि ज़ाय निर्धारें ।।७४।। नाना पापें करोनि जगतीं। प्रार्थितील श्रीसद्गुरूप्रती। आणिक म्हणतील चित्तीं। गुरुकृपें भय ना आम्हांसी।।७५।। यापरि होईल म्हणोनी। प्रारब्ध न चुकविती ते अवनीं। ज़ो भज़े निष्काम चरणीं। त्यासीच़ उद्धरिती कनवाळू।।७६।। म्हणोनि सद्गुरुस्वामी सदय। ज्याच़ा असे प्रारब्ध-उदय। त्याच़ें संकष्ट करिती चिन्मय। कृपाप्रसादें आपुलिया।।७७।। आणिक ज़े निष्काम मुमुक्षु। त्यांच़ा तोडिती भवपाशु। दाविती आनंद निर्विशेषु। करिती उद्धार तयांच़ा।।७८।। निष्कामा बघतां अनिवार। सद्गुरूच्या प्रेमासी येई पूर। सकामांच़ाही अंगीकार। करुनि उद्धरिती युक्तीनें।।७९।। एवं सद्गुरुस्वामींच़ा अवतार। जगाच्या कल्याणा असे साचार। देह झिज़विती निरंतर। परोपकारास्तव ज़ाणा।।८०।। म्हणोनि प्रारब्ध चुकविणें हातीं। सत्पुरुष कदापि न घेती। निजकृपेनें ग्रहबाधा चुकविती। पापें ज़ाळोनि अवलीळें।।८१।। असो तो सावकार कामत।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

याचिकारणें नाहीं बोलत। कीं मज़ संकटीं रक्षो गुरुनाथ। ऐसें न मागे तो ज़ाणा।।८२।। म्हणे देवा सद्गुरुराया। पार करीं निजदासा या। अज्ञ बालक असें मी सदया। न कळे कांहीं मज़लागीं।।८३।। ऐकूनि कामत याचें वचन। झालें सद्गद अंतःकरण। दया उपज़ली स्वामींलागून। तेव्हां बोलती प्रेमानें।।८४।।भिऊं नको तूं बा सर्वथा। भवानीशंकर हरील चिंता। तोचि रक्षील तुज़ला आतां। संकटांतुनी निश्चयेंसीं।।८५।। येईं मध्यान्हीं आमुच्या स्थानीं। महापूजा पाहीं नयनीं। प्रस्तुत प्रसाद घेईं हा झणीं। भवानीशंकर देवाचा।।८६।। तेव्हां प्रेमें घेतला प्रसाद। बांधिला उपरण्यामाजीं शुद्ध। वंदुनी श्रीसद्गुरूचे पाद। गेला कोर्टामाजीं तो।।८७।। काय ठराव झाला ऐसें। बघाया कोर्टासी गेला उल्हासें। तेव्हां आनंदा पार नसे। ऐका काय कैसें तें।।८८।। तो ख्रिश्चन मॅजिस्ट्रेट। गृहींच बैसलासे लिहीत। कागदपत्र सर्वही तेथ। पाही सारें तपासोनि।।८९।। कोर्टासी नाहीं येत ये दिनीं। ऐसी वार्ता पडली कर्णीं। आनंदें कामत निजमनीं। म्हणे मज़ सद्गुरु पावले।।९०।। महापूजे येई आजि। मध्यान्हींच्या समयामाजीं। ऐसें आज्ञापिती स्वामीजी। कृपा त्यांची मज़वरी।।९१।। म्हणोनि आजि कोर्टांतरीं। साहेब न आला ही गुरुकृपा खरी। पूजेसी ज़ावया मज़ला बरी। सोय करोनि दिधली पैं।।९२।। मग ज़ाऊनि सदनाप्रत। स्नान-संध्या उरकुनी त्वरित। गेला सद्गुरुसंनिधीं धांवत। महापूजेसी ते समयीं।।९३।। इकडे मॅजिस्ट्रेट ख्रिश्चन। बैसला ठराव लिहायालागून। झाला सर्व रिपोर्ट लिहोन। मुख्य ठराव राहिला।।९४।। मुख्य ठराव लिहिण्या अवचित। न सुचे कांहींही त्याप्रत। घाबरला मानसीं बहुत। धडधडे छाती त्याची हो।।९५।।

बैसला तेव्हां क्षणभरी स्तब्ध। बोलवेना त्या एकही शब्द। पहा हो श्रोते स्वामींची प्रसिद्ध। महिमा कैसी अद्भुत ती।।९६।। मग आपुलें खाज़वुनी डोकें। कारकुनाच्या ज़वळी निरखे। बोलूं लागे परम कौतुकें। काय झालें बा मज़लागीं।।९७।। तेथें होता ज़ो कारकून। तो चित्रापुर-सारस्वत ब्राह्मण। त्याज़कडे बोले आपण। मॅजिस्ट्रेट प्रेमानें।।९८।। म्हणे पुढें काय लिहावें आतां। हेंचि न सुचे माझिया चित्ता। आज़वरी ऐसें न झालें तत्त्वतां। कांहीं न कळे मज़लागीं।।९९।। इतुकें बोलुनी आपुली लेखणी। ठेविली धरणीवरी तत्क्षणीं। ध्यानस्थापरी बैसला ते स्थानीं। कारकून निरखोनि पाहे त्या।।१००।। कांहीं क्षण गेलिया। कारकून बोले ते अवसरीं। तुम्हीं कागदपत्रावरी। सारें कांहीं लिहिलें असे।।१०१।। अखेर एकचि ठराव उरला। ऐसें वाटतसे हो मज़ला। तितुकाचि एक लिहितां संपला। अधिक लिहिणें नुरलेंसे।।१०२।। यावरी तो साहेब बोले। तेंचि लिहाया कठिण झालें। इतुकें सुलभपणें लिहिलें। मुख्य तेंचि समज़ेना।।१०३।। आज़चि ऐसें व्हावया कारण। काय असे तें सांग बा पूर्ण। कळत असे कां तुज़लागोन। काय नवल हें बापा।।१०४।। यावरी बोले कारकून। मज़ कैसें हें येईल कळून। परि एकचि कारण सांगूं शकेन।स्वामींची महिमा ही वाटे।।१०५।। आजिचे दिनीं आरोपी कामत। भेटला आमुचे स्वामींप्रत। त्यांनीं दिधला आशीर्वाद निश्चित। याविणें नेणें मी कांहीं।।१०६।। यावरी बोले मॅजिस्ट्रेट। तुमचे स्वामीजी इतुके श्रेष्ठ। दाविती अद्भुत चमत्कार स्पष्ट। खरें बोलसी कां तूं हें।।१०७।। तेव्हां बोले कारकून। सत्य समज़ा माझें वचन। काय सांगूं महिमान। वर्णितां न ये मज़लागीं।।१०८।। आपुला क्राइस्ट होता ज़ैसा।

परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

आमुचा सद्गुरुनाथही तैसा। साक्षात् परमेश्वरचि परियेसा। असत्य नव्हे कदापिही।।१०९।। तेचि आम्हां रक्षिती खास। ऐसा आमुच्या जनांसी विश्वास। आणिक काय सांगूं तुम्हांस। न वर्णवे आमुचेनी।।११०।। तेव्हां तो मॅजिस्ट्रेट स्वमनीं। विचार करिता झाला ते क्षणीं। नाना प्रकारें विचार करोनि। ठराव सिद्ध तेणें केला।।१११।। विचारांतीं काय ठरलें। ऐका आतां श्रोते ये वेळे। गुरुकृपाचि त्यावरी ओळे। नाहीं संशय यामाजीं ।।११२।। परिसा आतां चित्त देऊन। काय सांगूं सद्गुरु-महिमान। कैसा उलटला साहेब पूर्ण। काय ठराव तो ऐका।।११३।। जेणें दिधली फिर्याद। तया साक्षी-पुरावे बहुविध। म्हणोनि आरोपीच शुद्ध। गुन्हेगार होत असे।।११४।। परि कोर्टांतरी ज़ें आणिलें मीठ। आणि बाज़ार-मीठ तें स्पष्ट। एकचि दिसे परम उत्कृष्ट। नसे भेद त्यामाजीं।।११५।। यापरी आरोपी यानें मीठ। चोरुनी न केलें हें स्पष्ट। दिसे, म्हणोनि व्यर्थ वटवट। कासया आपणा पाहिजे।।११६।। एवं गुन्हेगार नाहीं होत।कामत हा कदापि निश्चित। ऐसें ठरवोनि मी त्याप्रत। सोडितों निर्दोषी म्हणोनि।।११७।। ऐसा ठराव लिहोनि। गेला तो कोर्टालागोनि। बैसला होता कामतही येवोनि। गुरुस्मरण करीत।।११८।। ठराव वाचला सर्वांसमोर। निर्दोषी कामत सावकार। ऐसें सांगूनि सत्वर। सोडूनि दिधलें तयासी।।११९।। सद्गुरु-कृपेनेंचि माझी। सुटका झाली खचितचि आजि। ऐसें म्हणोनि मनामाजीं। कामत पावला आनंद।।१२०।। मग तो गेला धांवत। श्रीस्वामींच्या मठाप्रत। भेट घ्यावयासी त्वरित। पांडुरंगाश्रमस्वामींची।।१२१।। वंदिले चरण प्रेमपूर्वक। निवेदिला वृत्तांत सकळिक। पादपूजादि करूनि

सुरेख। तीर्थ घेतलें प्रेमानें।।१२२।। आणि म्हणे प्रभो गुरुराया। पडतां आपुल्या कृपेची छाया। काय उणीवता निजदासा या। भक्तवत्सला दयाळा।।१२३।। साक्षात् तूं विष्णूचा अवतार। मज़ नसे संशय अणुमात्र। न विसंबें मी तव उपकार। कदापिही निर्धारें।।१२४।। तुझें नाम गातां सत्वर। येई अशक्तांसी धीर। महिमा तुझा अगाध थोर। न वर्णवे माझेनी।।१२५।। असो यापरि करितां स्तोत्र। भरले प्रेमाश्रूंनीं नेत्र। मग सद्गुरु परम पवित्र। फलमंत्राक्षता देती तया।।१२६।। घेउनी गेला आपुल्या गृहास। भज़े स्वामींसी रात्रंदिवस। ठेवूनि त्यांचे चरणीं विश्वास। सेवेसी तत्पर सर्वदा ।।१२७।। स्वामी राहती शिराली-ग्रामीं। तरीही कामत त्यांची नेहमीं। मूर्ति धरोनि अंतर्यामीं। ध्यान करी प्रेमानें।।१२८।। कधीं कधीं ज़ाय दरुशनासी। स्वामीही प्रेमानें बघती त्यासी। याती-कुळ नाहीं मानसीं। श्रीस्वामींच्या अणुमात्र।।१२९।। याती-कुळ न पाहे सद्गुरु। तो असे दयेचा सागरु। स्वधर्मापरी राहावे हा निर्धारु। परि समदृष्टी त्यांची असे।।१३०।।आणिक बोलूं महिमा अपार। पुढील अध्यायीं सविस्तर। चित्त करोनि एकाग्र। ऐका तुम्ही भाविक हो।।१३१।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें अष्टत्रिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।१३२।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां पापें ज़ळती समग्र। अष्टत्रिंशाध्याय रसाळ हा।।१३३।। अध्याय ३८।। ओंव्या १३३।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति अष्टत्रिंशोऽध्यायः समाप्तः।।

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमत्पांडुरंगाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय श्रीसद्गुरु सदया। तूं भक्तवत्सल म्हणोनियां। जगीं कीर्ति घेसी, परि या। बाळाचें वात्सल्य ना तुज़ला।।१।। तुझा नव्हे हा अपराध। वृथाच़ दिधला दोष बहुविध। काय अज्ञ मी मतिमंद। विचार अणुमात्र न करितां।।२।। विचारांतीं समज़े निश्चयें। पक्षपात नसे तुज़ गुरुमाये। समदृष्टि तुज़ला आहे। मातेसमान तूं देवा।।३।। देवा तुज़ला सारे भक्त। एकचि सारे भेद ना किंचित। आमुचे दुर्गुणचि आम्हां बाधत। नाहीं संशय यामाजीं।।४।। तुझ्या वचनाहुनी आणिक । श्रेष्ठ कवणही जगीं ना देख। परि मी नायकें वचन सुरेख। दवडितों अमूल्य तव वचन ।।५।। तुझिया वचनीं भरला आनंद। केवल शुद्ध ब्रह्मानंद। परि मी नेणता मतिमंद। धिक्कारीं दुर्लक्ष करोनियां।।६।। भक्तप्रेमेंचि करिसी आज्ञा। तितुकी पाळाया बुद्धि मज़ ना। भलतेंचि करितों सोडुनी वचना। तेव्हां वात्सल्य कोठूनि ये।।७।। ऐसा दुर्गुणी तुझा भक्त। तेव्हां कैंची कृपा होत। हेंचि भय वाटतें मज़प्रत। सद्गुरुराया दयाळा।।८।। म्हणोनि देवा सद्गुरुराया। अल्प म्हणोनि न टाकीं सदया। तूंचि टाकितां लोटोनियां। कैसी बुद्धि येईल ती।।९।। मी न पाळीं आपुलें वचन। म्हणोनि ज़री अवकृपा करोन। धिक्कारिसी तरी ज़ाण। होय बुद्धि मलिन बहु।।१०।। तेव्हां आज्ञा कैंची पालन। होय देवा मज़कडोन। पाहें तूंचि विचारें ज़ाण। मी तरी अज्ञ बालक।।११।। तुझ्या कृपाकटाक्षावीण। कैसें घडेल आज्ञा पालन। सांगणें नलगे तुज़लागोन। सारें ज़ाणसी तूं देवा।।१२।। माझ्या अंगीं दुर्गुण बहुत। परि अनन्य-शरण तुज़प्रत। येतों मी बा प्रेमानें निश्चित। मग कैंचें भय मज़ला।।१३।। ज़ो येई अनन्य-शरण।

सद्गुरु त्याचें करी रक्षण। ऐसा मज़ विश्वास पूर्ण। असे ज़ाण गुरुराया।।१४।। आतां तरी कृपा करोनि। रक्षीं मज़प्रति येईं धांवूनि। करितों प्रार्थना कर ज़ोडूनि। आलों चरणीं शरण पहा।।१५।। मीं केले अन्याय अगणित। परि तूं रक्षिलें मज़प्रत। याचि धैर्यें राहिलों जगांत। मूर्ति मानसीं धरोनियां।।१६।। असो आतां सद्गुरुनाथा। देईं स्फूर्ति माझिया चित्ता। ग्रंथसमाप्ति करवीं ताता। झडकरींच़ कृपाघना।।१७।। आतां ऐका सावधान। तुम्ही भाविक श्रोते हो सज्जन। मागील अध्यायीं केलें निरूपण। सावकार कामत रक्षियला।।१८।। कीं त्याच़ा तुरुंगवास। चुकविला स्वामींनीं कृपेनें खास। ऐसे पांडुरंगाश्रम परमहंस। न कळे महिमा त्यांची हो।।१९।। आणिक बोलूं महिमा अपार। श्रोते हो करोनि चित्त स्थिर। परिसावें आतां होऊनि सादर। गुरुमूर्ति नयनीं आणूनियां।।२०।। दक्षिण प्रांतीं बैंदूर-ग्रामीं। खेडें असे 'एडतरे' नामीं। तेथें दुग्गप्पशेट्टी हा नेहमीं। करी व्यापार मोठा पैं।।२१।। दुज्या देशाहुनी माल। आणवी ज़हाज़ावरी तो सकल। ऐसें असतां एकवेळ। झाली अघटित घटना पैं ।।२२।। आली तार दुग्गप्पशेट्टीस। कीं माल पाठविला तुज़ला ये दिवस। उतरवुनी घ्यावा तुम्हीं खास। लगबगेंसीं व्यवस्थित।।२३।। तेव्हां दुग्गप्पशेट्टी यानें। केली व्यवस्था सारी त्वरेनें। माल उतरूनि घ्यावयाकारणें। मनुष्य ठेविले त्या ठायीं।।२४।। तीन मास लोटुनी गेले। अज़ूनही ज़हाज़ नाहीं आलें। म्हणोनि चिंता करी ते वेळे। पाठवी मनुष्य जेथें तेथें।।२५।। कुठेंही न लागे ठाव ठिकाण। ज़हाज़ बुडालें कीं काय म्हणोन। हेंही न कळे कवणालागून। थोर चिंता लागली।।२६।। होता त्यावरी माल बहुत। पंचदश सहस्र रुपयांच़ा होत।

हानि म्हणुनी चिंताक्रांत। झाला दुग्गप्पशेट्टी तो।।२७।। ऐसें असतां तये वेळीं। बैंदुराहुनी सारस्वत-मंडळी। आली एडतरे-ग्रामाज़वळी। त्यांसी भेटला दुग्गप्पा।।२८।। तेव्हां म्हणे हो आमुचें ज़हाज़। अज़ुनी न आलें म्हणोनि मज़। चिंता पडली तीचि आज़। कांहीं न सुचे ये समयीं।।२९।। यावरी म्हणती सारस्वत भक्त। सांगूं एक आतां तुज़प्रत। आमुचे स्वामी आज़ येत। म्हणोनि ज़ातों सामोरे।।३०।। ज़ाऊनि नदीतीराज़वळी। मिरवुनी आणितों आम्ही ये वेळीं। तूंही येउनि चरणकमळीं। ज़ाईं शरण त्यांलागीं।।३१।। त्यांची महिमा असे अपार। तेचि रक्षितील तुज़ला साचार। ऐसें बोलतां निघाला सत्वर। आमुच्या जनासंगें तो।।३२।। असो गेला दुग्गप्पशेट्टी। जनासंगें स्वामींच्या भेटी। ज़ाऊनि पोहोंचला नदीकांठीं। तोंवरी आली पालखी पैं।।३३।। भेटला श्रीस्वामींलागीं। साष्टांग नमस्कार केला वेगीं। म्हणे स्वामिन् महाराज योगी। कृपा असावी मज़वरुती।।३४।। ऐसें प्रार्थुनी सारा वृत्तांत। निवेदिला तेव्हां भीत भीत। यावरी बोलती कृपावंत। श्रीपांडुरंगाश्रमस्वामी ते।।३५।। भवानीशंकरकृपेंकरुनी। उदयीक येईल ज़हाज़ बा झणीं। नको करूं चिंता म्हणोनि। दिधला प्रसाद त्या समयीं।।३६।। तेव्हां करोनि साष्टांग नमन। गेला दुग्गप्पा कामालागून। स्वामी बैंदूर-ग्रामीं ज़ाण। गेले भक्तांसमवेत।।३७।। तेथ राहुनी दोन दिवस। गेले शिरालीमाजीं मठास। इकडे दुग्गप्पशेट्टी यास। लागला ध्यास ज़हाज़ाचा।।।३८।। स्वामिचरणीं धरोनि विश्वास। गेला दुजे दिनीं पहावयास। ज़हाज़ आलें कीं म्हणोनि हरुष। धरोनि मानसीं गेला तो।।३९।। ज़ाऊनि समुद्रकिनाऱ्यापाशीं। बैसला ध्यात श्रीस्वामींसी। सायंकाळीं आलें

परियेसीं। ज़हाज़ हळू हळू त्या स्थानीं।।४०।। बघतां आनंद न मावे पोटीं। म्हणे स्वामींची कृपादृष्टी। असत्य न होय बोलिलें ओठीं। श्रीस्वामींनीं संशय ना।।४१।। असो मग सर्वही माल। शाबित पाहूनि तये वेळ। करोनि व्यवस्था त्याची सकल। गेला भेटीसी चित्रापुरा।।४२।। श्रीस्वामींची घेऊनि भेट। मुखें बोले स्तोत्र पटपट। आणि सेवा करविली उत्कृष्ट। दुग्गप्पशेट्टीनें प्रेमभरें।।४३।। तेव्हां सद्गुरु स्वामिरायें। दिधला प्रसाद आपण स्वयें। उपरणी आणि घोडा निश्चयें। दुग्गप्पशेट्टीसी ते समयीं।।४४।। तेव्हां दुग्गप्पशेट्टी यासी। अभिमान आला निजमानसीं। मी श्रीमंत असोनि बहुवसी। कासया घेऊं स्वामींचें।।४५।। ऐसें मानूनि न घेतां ज़ाण। गेला आपुल्या गांवालागोन। परि अभिमान न होय सहन। परमेश्वरासी कदापि।।४६।। कवणाही येतां अभिमान। करी शिक्षा प्रभु तो आपण। ज़े परम भक्त असती पूर्ण। त्यांचाही हरण करी गर्व।।४७।। द्रौपदी बहुत प्रीतीची भगिनी। तिचाही गर्व हरण करोनि। अर्जुन-गर्व सर्व हरोनि। उद्धरिलें त्यांसी श्रीकृष्णें।।४८।। गरुड-सत्यभामेचेंही। गर्वहरण केलें पाहीं। ऐशा कथा ऐकिल्या कांहीं। पुराणांतरीं सकलांनीं।।४९।। कसलाही असो तो गर्व। न करी सहन सद्गुरुदेव। तत्काळ हरी त्याचें सर्व। निजकृपाबळेंकरोनियां।।५०।। सद्गुरु म्हणिजे देवाहूनि। श्रेष्ठ असे निश्चयें म्हणोनि। त्यापुढें गर्व करितां कोणी। नावडे देवा कदापिही।।५१।। भगवद्गीतेमाजीं देखा। स्वयें श्रीकृष्णें कथिलें सकळिकां। सद्गुरूसी भज़तां एका। मज़ पोहोंचे निर्धारें।।५२।। एवं सद्गुरु श्रेष्ठ म्हणोनि। दाविलें भगवंतें प्रेमेंकरोनि। तेवींच न साहे त्यालागोनि। गर्व करितां

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

सद्गुरूपुढें।।५३।। सद्गुरु-देव एकचि ज़ाण। यांत कांहीं ना अनुमान। सद्गुरूचा ज़ो अपमान। तो देवासीच़ होत पहा।।५४।। असो गर्व केलिया मानवें। कां हरण केला देवें। भक्तांवरी तो कोप नव्हे। कृपाचि ती खचित पहा।।५५।। अभिमानें वृत्ति मलिन होय। तेणें विवेक लोपे निश्चय। मग कैंची स्वरूपचिन्मय-। प्राप्ति त्यासी होय कदा।।५६।। अणुमात्र ज़री मीपणा उपज़े। तेथेंचि येई गर्व सहज़ें। सद्गुरूवीण न पाहे दुज़ें। त्यासि न ये गर्व कदा।।५७।। डोळ्यांमाजीं अणूइतका। केर पडला तरी तो देखा। त्रास देई बहुत निका। हें सकळांसी विदित असे।।५८।। तैसें येथें भाविकांलागीं। अणुमात्र अभिमान येतां जगीं। परमार्थाची हानि ती वेगीं। होय निश्चयें ती ज़ाणा।।५९।। म्हणोनि त्याच़ें करोनि खंडण। हळू हळू नेती परमार्थीं ज़ाण। तैसेंच़ सोडितां अभिमान। बळावे अपार तो पाहीं।।६०।। असो त्या दुग्गप्पाशेट्टीसी। अभिमान आला निश्चयेंसीं। ग्रामीं ज़ातांक्षणीं परियेसीं। पडला आज़ारी बहुतचि।।६१।। शुद्धीच़ नाहीं अंगावरुती। आप्तेष्ट सारीं घाबरलीं अति। म्हणती आतां कवण गति। काय करणें हें कळेना।।६२।। पहा स्वामींच़ा चमत्कार। मग थोडी शुद्धि आली अंगावर। तेव्हां त्यासी कळलें साचार। मी विपरीत व्याधीनें पीडिलों।।६३।। ऐसें व्हावया काय कारण। हेंही आठवलें त्यालागोन। स्वामींपुढें केला अभिमान। मी श्रीमंत म्हणोनियां।।६४।। ऐसी आठवण होतांक्षणीं। केली प्रार्थना स्वामींची स्वमनीं। म्हणे देवा कृपा करोनि। उठवा मज़ला ये समयीं।।६५।। मी येतों उठल्याक्षणीं। घेतों मागुनी घोडा-उपरणी। अहंकार दावितां तुझ्या चरणीं। नाहीं उपयोग बा पाहीं।।६६।। मी इतुका श्रीमंत असोनि।

घ्यावें कासया आपुल्याकडोनि। ऐसा अभिमान वाटला मनीं। क्षमा करावी मज़लागीं।।६७।। तुज़पुढें आम्ही अज्ञ नर। केवीं होऊं श्रीमंत परिकर। तूंचि श्रीमंत अमित थोर। तुज़पुढें येर कनिष्ठचि।।६८।। विद्येमाजीं तूंचि श्रेष्ठ। बुद्धिही तुझीच़ ज्येष्ठ। तुज़वीण नाहीं जगतीं वरिष्ठ। यावरी नाहीं बोलणें पैं।।६९।। तूं अससी परम ज्ञानी। ज्ञानीच़ श्रेष्ठ सर्वांहुनी। सार्वभौम राजाही धरणीं। नसे तुज़हुनी श्रेष्ठ कदा।।७०।। तूं त्रिभुवनाच़ा महाराजा। तुझे हातीं सारी प्रजा। ऐसा तूं बा सद्गुरु माझा। न लागे तुझा अंत कधीं।।७१।। ऐशा तुज़पुढें करितां गर्व। सहज़चि हरोनि ज़ाय सर्व। क्षमा करोनि धांव धांव। रक्षीं मज़ला गुरुराया।।७२।। सारें जगचि तुझें असतां। वृथाचि अभिमान घेतला माथां। श्रीमंत कोणीं केला हें न कळतां। व्यर्थ अभिमानें हुंबरलों।।७३।। ही सारी धन-दौलत। तूं न देतां कैंची लाभत। पूर्वकर्मापरी प्राप्त। करूनि त्वांचि दिधली पैं।।७४।। तव सत्तेवांचुनी जग। न वर्ते लवभरी च़ांग। परि तूं राहसी निस्संग। सोंग घेसी मानवाच़ें।।७५।। सारी सत्ता असुनी हातीं। परतंत्रता दाविसी जगतीं। महिमा न कळे कवणाप्रति। अगाध म्हणुनी ती पाहीं।।७६।। असो आतां स्वामी दयाळा। करीं कृपा मज़वरी ये वेळां। बोलतां कंठ सद्गद झाला। उठले अंगीं रोमांच।।७७।। ऐशी केली बहुविध प्रार्थना। ध्यात राहिला स्वामींच्या चरणा। धरिली मनीं दृढतर भावना। दुग्गप्पशेट्टीनें हो पाहीं।।७८।। असो ऐशी करितां प्रार्थना। श्रीस्वामींसी आली करुणा। आज़ारांतून उठविला ज़ाणा। मग तो गेला चित्रापुरा।।७९।। श्रीस्वामींच़ें घेऊनि दर्शन। केली प्रार्थना करोनि नमन। म्हणे देवा मज़लागोन। द्यावा प्रसाद हातींच़ा।।८०।। आपुल्या हातींच़ा प्रेमळ प्रसाद। न घेतां

गेलों मी मतिमंद। तुझी महिमा न कळतां प्रसिद्ध। अभिमान केला तुज़पुढें।।८१।। म्हणोनि मिळालें त्याचें फळ। व्याधिग्रस्त झालों ते वेळ। क्षण न लागतां तत्काळ। पडलों आज़ारी बहुतचि।।८२।। थोडी शुद्धि येतां मज़ला। बहुत प्रार्थना केली तुज़ला। तेव्हां तूंचि आलासि रक्षायाला। धांवत धांवत ते समयीं।।८३।। तव कृपेंचि वांचलों देवा। म्हणोनि प्रसाद मागुनी घ्यावा। ऐसा हेतु धरोनि बरवा। आलों शरण या चरणीं।।८४।। ऐसें ऐकतां स्वामींचें मन। प्रेमभरित ज़ाहलें पूर्ण। म्हणती पुनरपि तुज़ देईन। प्रसाद ठेविला तो पाहीं।।८५।। इतुकें बोलुनी दिधला प्रसाद। घोडा-उपरणी प्रेमें शुद्ध। त्यांत ओतोनि प्रेमानंद। दिधला दुग्गप्पशेट्टीसी।।८६।। तो प्रसाद केवळ प्रेममय। प्रेमावांचुनी आणिक काय। असेल यांत नाहीं संशय। पहा कैसें सांगूं तें।।८७।। सद्गुरुभक्ति ज्याच्या हृदयीं। त्यासीच कळे प्रेम हें पाहीं। आम्हां अज्ञजनांलागीं कांहीं। ठाव न लगे अणुमात्र।।८८।। सद्गुरुस्वामींचा हस्तस्पर्श। होतां त्यांत न उरे दोष। कवणही वस्तु असो ती विशेष। होय शुद्ध ती पाहीं।।८९।। त्यांचे सद्गुण तयांमाजीं। निश्चयें येती सहज़ासहजीं। म्हणोनि इतुकें महत्त्व आजि। बघती जन प्रसादांत।।९०।। ज़े असती भक्त प्रेमळ। दर्शना ज़ातां नेती नारळ। करस्पर्श होतां तत्काळ। होय तो निर्मळ निश्चयें।।९१।। पडतां पदरीं फलमंत्राक्षत। मन होय प्रेमभरित। ज़री असे तो अभक्त। पळभरी आनंद होय तया।।९२।। सद्गुरुमूर्ति आनंद-खाणी। त्यांचा स्पर्श होतांक्षणीं। वस्तूंत आनंद भरे झणीं। हें दृष्टांतासहित सांगूं पैं।।९३।। पाणी असे परम शीत। वस्त्र घालितां आपण त्यांत। तेंही शीत होय त्वरित। उदकाच्या संगेंकरोनि।।९४।। तेवींच तें

शीतवस्त्र। समज़ा ज्याच़ा भडके नेत्र। त्यासि लावितां अणुमात्र। क्षणैक सुख होय तया।।९५।। तैसी सद्गुरुरायांची मूर्ति। आनंदमय सदा असे ती। त्यांच़ा करस्पर्श होतां त्याप्रति। वस्तुही त्यापरी होय पहा।।९६।। पाण्यासंगें वस्त्र ज़ैसें। सद्गुरुसंगें होय तैसें। हस्तस्पर्श होतां आपैसे। येती त्यांच़े गुण त्यांत।।९७।। सात्त्विक वृत्ति आनंदभरित। तयांहस्तें घेतां फलमंत्राक्षत। शीतवस्त्रें ज़ैसें नेत्रांसी सुख होत। तैसें मन आमुच़ें उल्हासे।।९८।। प्रेम उच़ंबळे अमित। ऐसा प्रसाद-महिमा अद्भुत। म्हणोनि प्रसाद प्रेममय निश्चित। लटके बोल नव्हती हे।।९९।। ते प्रसन्नचित्तें देती ज़ें कीं। तो प्रसादचि म्हणोनि लोकीं। प्रचार असे, म्हणोनि मस्तकीं। धरावा प्रेमानें सकळिकीं।।१००।। तेव्हां होय आमुच़ेंही मन। आनंदरूप निश्चयें ज़ाण। सद्गुरुकृपाचि ही पूर्ण। नाहीं संशय यामाजीं।।१०१।। सद्गुरु प्रेमानें ज़ें देती। त्यांत सारें प्रेम ओतिती। तैसी प्रेमळ वस्तु त्यांच्या हस्तीं। घेतां आनंद न वर्णवे।।१०२।। असो मग दुग्गप्पासी। प्रसाद देती तेजोराशी। घोडा उपरणें परियेसीं। गेला घेऊनि ग्रामा तो।।१०३।। तो भज़े श्रीस्वामींस। धरिला त्यांच्या चरणीं विश्वास। कधीं कधीं ज़ाय दर्शनास। श्रीसंनिधीं दुग्गप्पा।।१०४।। ऐसी सद्गुरुमहिमा अपार। सारे भज़ती प्रेमपुरःसर। न करिती स्वामी धिक्कार। हीन ज़ातीच़ा म्हणोनियां।।१०५।। दुग्गप्पशेट्टी ज़ातीच़ा एक। नाडगीर होता देख। श्रीस्वामी बघती सुरेख। भक्तिभाव हाचि पैं।।१०६।। स्वधर्मापरी वर्तन। न घेती त्यांच़ें अन्नपान। मनीं एकचि सारे जन। नाहीं भेद अणुमात्र।।१०७।। असो आतां आणिक सांगूं। पुढील अध्यायीं कथेच़ा योगु। परम रसाळ न करावा त्यागु। परिसा प्रेमानें तुम्ही हो।।१०८।।

आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ एकचि खास। यांच्या कृपाप्रसादें एकोनचत्वारिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।१०९।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां लाभे मोक्ष साचार। एकोनचत्वारिंशत्तमाध्याय रसाळ हा।।११०।। अध्याय ३९।। ओंव्या ११०।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति एकोनचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः।।

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमत्पांडुरंगाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय सद्गुरो करुणासागरा। भक्तवत्सला सद्गुणसांद्रा। अससी व्यापक तूं बा यतींद्रा। काय वर्णावी तव महिमा।।१।। तुज़ ध्यातां न उरे कांहीं। वृत्ति विरोनि ज़ाय सर्वही। साक्षिरूपें ब्रह्मात्मा राही। ऐसा सद्गुरु माझा तूं।।२।। नामरूप सारें खोटें। तुझें स्वरूपचि एक गोमटें। त्यावीण अन्य स्थळ असे कोठें। साऱ्या ब्रह्मांडीं हो पाहीं।।३।। परि आम्ही असों मतिमंद। लावितों वृथाचि तुला शब्द। कीं धरोनि देहसंबंध। वर्णाश्रम-नामादि।।४।। ऐसा तूं अससी देव। नाहीं तुज़ला द्वैतभाव। सारें आत्मरूपचि सदैव। बघसी सर्वत्र तूं देवा।।५।। ऐशिया तुझिया चरणीं लागतां। तुटे सारी भवभय-चिंता। कितीही स्तविलें ज़री आतां। तृप्ति न होय मानसीं।।६।। अहा देवा सद्गुरुनाथा। तुझें प्रेम अद्भुतचि ताता। कल्पना करवेना चित्ता। अंतचि नसे त्यालागीं।।७।। हर एक विषय जनांसी ज़ाण। अप्रिय होती एके दिन। प्रियाप्रियता त्यांलागोन। असेचि ज़ाण सर्वदा।।८।। तुझें प्रेम नव्हे तैसें। त्याच़ा वीट केव्हांही नसे। म्हणोनि तुझें प्रेम सत्य असे। खचित खचित गुरुनाथा।।९।। असो आतां श्रोते तिष्ठती। म्हणोनि द्यावी मज़ला स्फूर्ति। तुझी तूंचि वर्णवीं कीर्ति। मज़कडोनि हो देवा।।१०।। ऐका तुम्ही श्रोते सज्जन। मागील अध्यायीं केलें निरूपण। दुग्गप्पशेट्टीच़ें ज़हाज़ ज़ाण। आलें सत्वर गुरुकृपें।।११।। आतां ऐका कथा रसाळ। गुरूची महिमा अद्भुत केवळ। आणि हृदय त्यांच़ें अति कोमळ। कैसें वानावें न कळे तें।।१२।। सर्वांभूतीं समान भाव। यातिकुळाच़ा पुसला ठाव। सकलां समचि बघती गुरुदेव। ऐसी माउली ती ज़ाणा।।१३।। अंगीं असे ज़ो दृढभाव। तोचि बघती

करुणार्णव। हीन यातीचा ज़री तो मानव। तरी त्यासी उद्धरिती।।१४।। यावरी एक सांगूं कथा। इकडेचि लावा आपुल्या चित्ता। सर्वही दोष हरती ऐकतां। आम्हां सकल अज्ञांचे।।१५।। अठराशें चोवीस शकामाझारीं। कुमठा म्हणजे कुंभापुरीं। तया ग्रामीं एके अवसरीं। यावया निघाले श्रीस्वामी।।१६।। तेव्हां तेथें एक यवन। अल्लीशा नांवाचा ज़ाण। कोर्टामाजीं कारकून। होता तया ग्रामीं हो।।१७।। रुपये तीस त्याचा पगार। इंग्रजी न येत त्यासी फार। परि त्यानें केला विचार। अर्ज़ करावा सरकारा।।१८।। मज़ला इंग्रजी येतसे बरवें। म्हणोनि वरचिया ज़ागेसी न्यावें। ऐसी अर्जी केली स्वभावें। सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्या।।१९।। तेव्हां कारवार कोर्टांत। नेमिला इंग्रजी कामावरी त्वरित। दहा रुपये बढती त्याप्रत। मंज़ूर केली जज्जानें।।२०।। तेव्हां तेथें कारवारीं। अल्लीशावरील अधिकारी। त्यानें केली तक्रार भारी। न्यायाधीशाज़वळी पैं।।२१।। अल्लीशासी चांगलें इंग्रजी। येत नसे म्हणोनि तो त्यामाजीं। काम कराया योग्य नव्हे जी। ऐसें वाटतें मज़लागीं।।२२।। ऐकतां क्षोभला न्यायाधीश। म्हणे असत्य अर्जी पाठविली आम्हांस। म्हणोनि बळेंचि आणितों त्यास। येथील इंग्रजी कामावरी।।२३।। ज़री तो काम यथाप्रकार। न करील तरी तया सत्वर। काढुनी टाकूं हा निर्धार। ऐसें बोलिला तो ज़ाणा।।२४।। इतुकें बोलुनी न्यायाधीश। हुकूम पाठवी कुमठेस। तेथील सबजज्ज यास। अल्लीशासी पाठवाया।।२५।। तेव्हां अल्लीशाचा मित्र यवन। कारवार कोर्टांतील कारकून। त्यासी ही हकीकत संपूर्ण। कळली तत्काळ ज़ाणा हो।।२६।। त्यानें कळविली बातमी सारी। गुप्तपणें अल्लीशाला सत्वरी। ऐकुनी दचकला तो अंतरीं। बैसला चिंतायुक्त बहु।।२७।। कोर्टामाजीं बैसे सचिंत। नाहीं गेला सदनाप्रत। जेवावयासी तो

विसरत। झाला चिंताक्रांत बहु।।२८।। तेव्हां तेथें त्याच्या सन्मुख। बैसला होता कारकून एक। सारस्वत मंगेशभट्ट नामक। परम भाविक तो ज़ाणा।।२९।। त्यानें बघोनि म्लानवदन। पुसिलें तेव्हां अल्लीशालागून। तूं कसली चिंता करिसी ज़ाण। काय झालें तुज़ला बा।।३०।। तूं न गेलास जेवावयासी। काय कारण तें सांग मज़सी। ऐसें ऐकतां अल्लीशानें त्यासी। निवेदिला सकल वृत्तांत।।३१।। ऐकुनी सकल वर्तमान। बोले मंगेशभट्ट कारकून। ना भी तुज़ला सांगतों ज़ाण। सद्गुरु आमुचे येती पैं।।३२।। तूं न करीं चिंता कांहीं। त्या सद्गुरूंसी शरण ज़ाईं। तेचि रक्षितील तूतें पाहीं। संशय नाहीं यामाजीं।।३३।। चित्रापुरीं असे त्यांचा वास। पांडुरंगाश्रम म्हणती त्यांस। सायंकाळीं येचि ग्रामास। येती निश्चयें आजि पैं।।३४।। त्यांचा तुज़ला आशीर्वाद। देववूं निश्चयें होईल आनंद। ते असती परम प्रसिद्ध। साक्षात् अवतार दत्ताचे।।३५।। तेचि तुझी सारी चिंता। हरितील निश्चयें ज़ाण तत्त्वतां। नसे कवणही भय तुज़ आतां। धरीं विश्वास त्यांचे चरणीं।।३६।। ऐसे शब्द पडतां कानीं। उठला हरुषें गर्जना करोनि। म्हणे तुमचे स्वामी देखिल्यावांचोनि। ना घें पाणी निर्धारें।।३७।। यापरी बोलुनी बैसला स्वस्थ। श्रीस्वामींचे चरण ध्यात। नाहीं गेला सदनाप्रत। जेवावयालागीं तो।।३८।। सकाळपासूनि कोर्टामाझारीं। बैसला होता कामावरी। न गेला बघुनी ते अवसरीं। म्हणे मंगेशभट्ट तया।।३९।। अरे अल्लीशा आतां ज़ाईं। जेवावया वेगें निजगृहीं। सायंकाळीं दर्शन पाहीं। होईल पहा स्वामींचें।।४०।। यावरी बोले अल्लीशा आपण। तुझे गुरुपाय देखिल्या वीण। न घें मी पाणी निश्चयें ज़ाण। हरितील तेचि मम चिंता।।४१।। माझा निश्चयचि झाला ऐसा।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

भेटीवीण पाणी न घें सहसा। त्यांच्या चरणीं ठेविला भरंवसा। तेचि रक्षितील मज़लागीं।।४२।। त्यांसीच़ आतां ज़ातों शरण। ज़री आलें मज़ला मरण। मी न सोडीं त्यांच़े चरण। सत्य सत्य त्रिवाचा।।४३।। पहा कैसी महिमा अगाध। स्वामींच्या नामाच़ा शब्द। कानीं पडतांचि झ़ाला आनंद। धैर्य आलें मज़लागीं।।४४।। नाम-महिमाच़ ज़र इतुकी। तर दर्शन-महिमा असेल कितुकी। हें सांगावें नलगे सुज्ञांस कीं। ते ज़ाणतील सहज़चि पैं।।४५।। त्यांच्या आशीर्वादेंकरून। कार्य होईल न लागतां क्षण। ऐसी दृढ आशा मनीं धरून। राहिलों असें मी निश्चयें।।४६।। माझ्या मनाची स्थिती आज़। काय झ़ाली खरी ती तुज़। सांगतों कीं काय गति मज़। होईल कांहीं कळेना।।४७।। हाय हाय कवणा सांगूं। काय असे माझ़ा भोगू। कांहीं न कळे कैसा मी ज़गूं। भिक्षापात्रावांच़ोनि।।४८।। माझी ज़ाईल निश्चयें नोकरी। ज़ाऊं आतां कवणा घरीं। कोण माझ़ें रक्षण करी। ऐशा संकटापासूनियां।।४९।। जगामाजीं अपकीर्ति थोर। घेउनी ज़गणें कासया भूवर। याहुनी मरणें बरें शीघ्र। ऐसा विचार येई मनीं।।५०।। इतुक्यामाजीं तुज़कडून मीं। ऐकतां सद्गुरुमहिमा नामी। माझी स्थिति अंतर्यामीं। कैशी ज़ाहली ती ऐका।।५१।। समज़ा गृहासी लागली आग। ऐशा समयीं आकाशीं ढग। अवचित भरोनि गर्ज़े मेघ। पडला पर्जन्य तत्काळ।।५२।। तेव्हां होऊनि अग्नि शांत। सदन दिसे शोभिवंत। ज़ैशाच़ें तैसेंच़ उरे तेथ। अणुमात्र हानी न होतां।।५३।। तैसें आपुल्या सद्गुरूच़ें नाम। कर्णीं पडतांक्षणीं उत्तम। तापाग्नि हृदयींच़ा मम। विझ़ला तेव्हांचि तो पाहीं।।५४।। एवं माझ़ें हृदय शांत। झ़ालें आनंदमय निश्चित। ऐसा नामाच़ा महिमा अद्भुत। काय सांगूं तुज़ला

मी।।५५।। ज़री नामेंच़ इतुकें होय। दर्शनें सारी भीति ज़ाय। आशीर्वादें होईल कार्य। नाहीं संशय यामाजीं।।५६।। ऐशिया त्या गुरुमाईच़े। दर्शनावीण मी सदनीं न वच़ें। जीवनही न घें साच़ें। ज़री गेला प्राण पहा।।५७।। ऐसें बोलुनी तैसेंच़ तेणें। केलें निग्रहें नलगे सांगणें। सायंकाळीं पहा तो त्वरेनें। गेला स्वामींसी सामोरा।।५८।। सारे शिष्यवृंद सारस्वत। ग्रामाबाहेरी ज़ाती धांवत। त्यांच्यासंगें हाही ज़ात। राहिला शेतांत कडेसी उभा।।५९।। असें मी हीन ज़ातीच़ा यवन। हे असती श्रेष्ठ ब्राह्मण। त्यांत मिसळूं नये आपण। ऐसें समज़ुनी दूर राहे।।६०।। तेव्हां श्रीस्वामींची पालखी। लांबुनी येतां नयनीं विलोकी। साष्टांग प्रणिपात घातला तेणें कीं। शेतांतरींच़ हो ज़ाणा।।६१।। हातामाजीं होता ज़ो नारळ। मार्गावरी टाकुनी ते वेळ। घातला ज़ो नमस्कार प्रेमळ। ना उठे पालखी येई तों।।६२।। मग हळू हळू पालखी आली। सारस्वत ब्राह्मण भक्तांज़वळी। ज़ो नारळ पडला ते स्थळीं। जनांनीं अर्पिला तो स्वामींसी।।६३।। आणि वाद्यें घेऊनि थोर। मिरवीत नेले श्रीसद्गुरुवर। गेले सांगातीं सकल नर। अल्लीशाही गेला दुरोनियां।।६४।। शंकरनारायण-देउळीं। पालखी स्वामींची मिरवीत नेली। हाही गेला तये स्थळीं। अतिप्रेमानें तत्काळ।।६५।। मग स्वामी सद्गुरुराय। यांच़े भक्तांनीं प्रक्षालुनी पाय। आंत घेउनी ज़ाती ते समय। बोलती कृपाघन काय पहा।।६६।। आमुच्या कोंकणी भाषेच़ें वचन। ऐका स्वामींच़ें सावधान। परम रसाळ मृदु भाषण। अमृतवाक्य तें ज़ाण।।६७।। ''ताव्वळी कुम्टे गांवांभायर येवनु। गाद्या बैलांतु तुर्कांच़ो पाय पोण्णु। निद्दलेलो खैं गेलो पोळौनु। ताक्का आत्तां आप्पया''।।६८।। ऐसें बोलुनी आणविला त्यासी। फलमंत्राक्षता देवविल्या त्या निशीं। आनंद झ़ाला त्याच्या मानसीं।

बैसला तो तेथेंचि रस्त्यावरी।।६९।। करूं लागला स्वामींचें ध्यान। मनामाजीं प्रेमेंकरोन। नाहीं गेला गृहालागोन। भान नसे त्या देहाचें।।७०।। म्हणे देवा सद्गुरुनाथा। धांव पाव बापा अनाथा। तूंचि देवा मज़ला त्राता। तुज़वीण अन्य ना जगतीं।।७१।। मी पापी हीन दीन। असें एक अज्ञ यवन। परि अव्हेर न करीं ज़ाण। प्रभो दयाळा कृपाघना।।७२।। आपुली मूर्ति मनीं धरोन। सदा ध्यातों निश्चयें ज़ाण। द्यावें गुरुराया अभयवचन। चिंता सारी दूर करीं।।७३।। मज़ला उद्धरा परमेश्वरा। आलों शरण अनन्य गुरुवरा। तुज़वांचोनि अन्य थारा। देईं ना मी चित्तासी।।७४।। ऐसी करुणा भाकुनी तेव्हां। ध्यात बैसला सद्गुरुदेवा। धरुनी मानसीं दृढभावा। सारी रात्र तेथेंचि।।७५।। इकडे देउळीं सर्व मंडळी। अष्टावधान आरती ते वेळीं। पाहुनी आपुल्या गृहासी गेली। प्रसाद घेउनी ते समयीं।।७६।। हा बैसला म्हणुनी कवणा ना विदित। आठवणही नाहीं कवणाप्रत। मुलगा येतां माघारा धाडित। येत नाहीं मी घरीं म्हणे।।७७।। असो मग पहाट झाली। भक्तमंडळी येऊं लागली। स्वामींच्या दर्शना देउळीं। उत्सुक होऊनि लगबगेंसी।।७८।। ज़ो त्याचा मित्र सारस्वत। जेणें कथिली कीर्ति त्याप्रत। तोही आला तेथें त्वरित। दर्शन घ्यावया स्वामींचें।।७९।। तेथें बघुनी अल्लीशासी। तो मित्र बोले परियेसीं। अरे तूं अज़ुनी न गेलासी। सदनाप्रति कीं बापा।।८०।। यावरी बोले अल्लीशा आपण। तुमच्या स्वामींचें आशीर्वचन। न ज़ाय घेतल्यावीण येथून। सदनाप्रति मी पाहीं।।८१।। यावरी म्हणे मित्र कारकून। तुज़ला फलमंत्राक्षता ज़ाण। दिधलें तेंचि आशीर्वचन। समज़ बाबा निश्चयेंसीं।।८२।। अरे आपुल्या मनींचा हेतु। साधु ओळखती

निश्चयें ज़ाण तूं। उगीच़ भलतें नको चिंतूं। नाना कुतर्क घेऊनियां।।८३।। शेतामाजीं पालथा पडुनी। नमस्कार घातलास तूं दुरूनी। नाहीं पाहिलें तुज़लागोनी। ब्राह्मण कीं यवन म्हणोनियां।।८४।। परि ज़ातां देवळामाझ़ारीं। 'तो यवन कुठें गेला पाचारीं'। हें कळल्यावांचुनी स्वामी अंतरीं। कैसें बोलिले सांगें बा।।८५।। यावरी बोले अल्लीशा यवन। अहो ते स्वामी कृपाघन। जेव्हां देतील आशीर्वचन। तेव्हांचि ज़ाईन मी सदना।।८६।। तोंवरी येथेंचि बैसेन निश्चयें। ज़री दिवस-रात्र पाहें। बैसावें लागे, तरीही न ज़ायें। येथुनी सत्य ज़ाण तूं।।८७।। ते जेव्हां देतील दर्शन। तेव्हां माझ़ा वृत्तांत सांगेन। ऐकूनि त्यांनीं आशीर्वचन। देतां ज़ाईन जेवाया।।८८।। फलमंत्राक्षता दिधली खरें। परि ना कळविले मनोरथ सारे। म्हणोनि कळवुनी हेतु मम त्वरें। आशीर्वाद घेऊं इच्छितों मी।।८९।। त्यावीण नाहीं ज़ात येथुनी। सदनाप्रति चरण ते सोडुनी। नाहीं घेत अन्नपाणी। बैसेन मी दिवसभरी।।९०।। ज़री गेला माझ़ा प्राण। तरीही न ज़ायें मी येथोन। इतुकें बोलुनी तेथेंचि ज़ाण। बैसला तिष्ठत अल्लीशा।।९१।। इकडे स्वामी स्नान करोनी। बैसले आपल्या अनुष्ठानीं। ज़री विदित असे त्यांलागोनि। तरी ते बघती अंत पहा।।९२।। असो मग तो श्रीस्वामींची। भिक्षा होई तों बैसे तैसाचि। भिक्षा होतांचि इच्छा त्याची। कळविली सारस्वत-कारकुनें।।९३।। सुब्राव भटजी तेथील शास्त्री। त्यांकडे गोष्ट कळविली सारी। त्यांनीं स्वामीसंनिध सत्वरी। कथिली लगबगें ज़ाऊनियां।।९४।। अहाहा काय कनवाळू मूर्ति। ऐकतां सद्गुरु कळवळले चित्तीं। कीं उपवासी बैसला दिनरातीं। यवन अल्लीशा हा पाहीं।।९५।। कंठ ज़ाहला सद्गदित। विमलांबुधारा नयनीं वाहत। कैसें पहा साधूंचें

चित्त। किती कोमल तें सांगूं।।९६।। सत्पुरुषांसी राजा-रंक। असती समचि पहा सकळिक। मुलांसी माता ज़ैसी देख। तैसी पाहे गुरुमाउली।।९७।। नाहीं बघती उंच़-नीच ज़ात। स्वजन-अन्य नसे त्यांप्रत। नाहीं गरीब आणि श्रीमंत। धनदौलत ना बघती।।९८।। साधु बघती भक्तिप्रेम। आणि निश्चय निष्ठा दृढतम। तेव्हांच़ पुरविती ते काम। सकाम निष्काम भक्तांच़ा।।९९।। ज़ातीच़ा तो ज़री यवन। तरी प्रेम त्याच़ें यवन न ज़ाण। आणिक ऐका सावधान। तुम्ही सज्जन श्रोते हो।।१००।। प्रेमासी नाहीं ज़ात-गोत। आपपर नाहीं त्याच्यांत। परि देहासी असे निश्चित। स्वधर्मापरी वर्तणें।।१०१।। साधु न सोडिती स्वधर्म। परधर्माची निंदा ही अधर्म। हें न करिती ते सद्गुणधाम। परम दयाळू कनवाळू।।१०२।। असती खरे साधुसंत। ते न सोडिती स्वधर्म निश्चित। व्यवहारीं ज़ैसें वागावें ज्याप्रत। तैसेंच़ वागती त्यापाशीं।।१०३।। स्वधर्माची न करिती हानी। प्रेम न देती झुगारुनी। देहासी असे ज़ात म्हणुनी। त्यापरी वर्तविती देहासी।।१०४।। प्रेमासी नाहीं निश्चयें ज़ात। प्रेम ना विकलें कवणाप्रत। नाहीं भेद कैंच़ाही प्रेमांत। तें प्रेम कुठलें सांगा हो।।१०५।। प्रेम हें असे निजस्वरूपाच़ें। तेथुनीच़ उठतें निश्चयें साच़ें। स्वरूप हें आपुलें कैसें याच़ें। करूं विवरण अणुमात्र।।१०६।। आत्मरूप हें अभेद स्वरूप। त्याच़ेंचि अंग प्रेम हें अल्प। तैसेंच़ तें प्रेम होत अमूप। वेगळें सांगणें नलगेचि।।१०७।। सूर्या सोडुनी नाहीं रश्मी। तेवीं स्वरूपासीं प्रेम अभिन्न नेहमीं। म्हणोनि प्रेम हें उठे अंतर्यामीं। निजस्वरूपांतुनीचि पैं।।१०८।। परि आम्हां अज्ञजनांसी। न कळे त्याची थोरवी कैसी। एक ब्रह्मज्ञानीच़ ज़ाणे त्यासी। आपुल्या अनुभवेंकरूनियां।।१०९।। एवं सकलांच़ें प्रेम हें एक। त्यामाजीं

नसती भेद अनेक। यवन-ब्राह्मणादि सकळिक। देहासी हें सारें असे।।११०।। म्हणोनि सद्गुरु बघती प्रेम। न बघती देह रूप नाम। ज़ातगोत अधम उत्तम। हेंही न बघती कदापि ते ।।१११।। कवणही ज़ातीचा असो मानव। अंत्यजही भज़ो धरोनि दृढभाव। त्यासी रक्षिती सद्गुरुदेव। न धिक्कारिती कदापिही।।११२।। कालपासुनी न घेतलें उदक। तेवींच न सेवी अन्न-निद्रादिक। तिष्ठत बैसला देवळासन्मुख। रात्रभरी तो दृढनिष्ठें।।११३।। ऐसें सुब्रायभटांनीं सांगितलें। ऐकुनी स्वामी बहु कळवळले। आधींच कां न तुम्हीं सांगितलें। ऐसें म्हणुनी उठले ते।।११४।। प्रेमाश्रु आले त्यांचे नयनीं। धांव घेतली त्यांनीं झणीं। बैसला अल्लीशा ज़े स्थानीं। मार्गाज़वळी गेले ते।।११५।। ओट्यावरी ज़ाऊनि बैसले। भटजींमार्फत बोलते झाले। म्हणती बाळा सांग वहिलें। वृत्त आपुलें आम्हांसी।।११६।। सांग मनींचा हेतु सारा। खुळ्यापरी न करीं अविचारा। जग हें सारें नश्वर नेत्रा। ज़ें ज़ें दिसतें तें पाहीं।।११७।। आपुलें देह-धन-सुत-दारा। सकल नश्वर व्यर्थ पसारा। ऐसें समज़ुनी ध्याईं प्रभुवरा। विचार करोनि तूं बाबा।।११८।। करीं तुझ्या अल्लाचें स्मरण। तोचि तुझें करील कल्याण। काय हेतु तुझा ज़ाण। असे तो सांग निर्मळ मनें।।११९।। यावरी अल्लीशा नमन करोन। बोलता झाला गहिंवरोन। काय सांगूं देवा आपण। आहां सर्वज्ञ सर्वसाक्षी।।१२०।। परि मी अज्ञ म्हणोन। निवेदितों कर्मकथन। तूंचि एक मज़लागोन। आप्तइष्ट मायबाप।।१२१।। तुज़हुनी नाहीं अन्य देव। मरेतोंवरी घेईन नांव। न विसंबें सर्वथैव। प्रभो देवा तुज़लागीं।।१२२।। असो मी एक कोर्टामाजीं। कारकून असें हो गुरुजी। तीस रुपये पगार सहजीं। मिळे मज़ला ईशकृपें।।१२३।। परि

आशा ही महाघातक। लागली मनासी रुखरुख। मज़ला बढती व्हावी आणिक। म्हणोनि घातला गोंधळ म्यां।।१२४।। मज़ला बरवें येतसे इंग्रजी। म्हणोनि कारवार-कोर्टामाजीं। केली तांतडीनें म्यां अर्जी। तेथील न्यायाधीशासी हो।।१२५।। परि मज़ला इंग्रजी च़ांगलें। येतें म्हणोनि खोटेंच़ सगळें। लिहोनि अर्ज़ पाठविला बळें। विचार अणुमात्र न करितां।।१२६।। मज़ला इंग्रजी ना ये च़ांगलें। हें कुणीतरी साहेबासी कळविलें। कोपला साहेब ते वेळे। मज़वरी बहुत हो पाहीं।।१२७।। ऐसें म्हणोनि सारा वृत्तांत। निवेदिला स्वामीसंनिध त्वरित। नोकरी माझी ज़ाईल निश्चित। हेंचि भय वाटतसे।।१२८।। हीचि चिंता मज़लागोन। कीं लोभें केलें असत्य भाषण। बढतीऐवजीं नोकरी ज़ावोन। दीनदशेसी पाचारिलें।।१२९।। असे ज़री मम अपराध। तरी तूं देव अससी प्रसिद्ध। रक्षिसील हा मतिमंद। ऐसें ऐकुनी शरण आलों।।१३०।। मज़ला क्षमा करोनि दयाळा। रक्षण करावें तूंचि ये वेळां। तुज़वांच़ोनि नाहीं वेगळा। अन्य त्राता जगीं मज़।।१३१।। ऐसें बोलुनी करी तो नमन। तेव्हां स्वामी बोलती आपण। भिऊं नको चिंता करील हरण। भवानीशंकर निश्चयेंसीं।।१३२।। यश येईल तुझिया कार्या। विश्वास असों दे तव हृदया। तोचि रक्षील न धरीं संशया। अणुभरीही तूं ज़ाण।।१३३।। ज़ो ज़ाईल अनन्य-शरण। 'अनन्य' म्हणिजे तयावांच़ून। अन्य वस्तु आणिक जगीं न। ऐसें भज़तां तो रक्षी।।१३४।। अनन्य-भक्तिभावें भज़तां। त्यासी तो कृपाळू न करी परता। कल्याण करी रक्षी भक्तां। ना भी ना भी तूं पाहीं।।१३५।। इतुकें बोलुनी पुनरपि त्यासी। दिधली फलमंत्राक्षता प्रेमेंसीं। आणिक त्याला जेवावयासी। वाढविलें तेव्हां स्वामींनीं।।१३६।। मग तो प्रेमानें

जेवुनी प्रसाद। स्तुति केली स्वामींची बहुविध। गुरुमूर्ति मनीं धरोनी प्रसिद्ध। गेला आपुल्या सदनासी।।१३७।। सद्गुरुनाथ करिती कल्याण। ऐसा निश्चय अंतरीं धरोन। लागला आपुल्या कामालागुन। झाले तीन दिवस पहा।।१३८।। आली तार कारवाराहुनी। न्यायाधीशाची मुन्सफालागुनी। दुजा हुकूम धाडिल्यावांचुनी। नका पाठवूं अल्लीशासी।।१३९।। हें ऐकतां अल्लीशालागीं। आनंद होऊनि धांवला मार्गीं। स्वामीसंनिध सांगाया वेगीं। गेला देवळामाजीं तो।।१४०।। कळविली वार्ता श्रीस्वामींसी। म्हणे आपुलीच़ कृपा परियेसीं। बढती न मिळो नोकरी मज़सी। तितुकीच़ राहो तुमच्या कृपें।।१४१।। यावरी बोलती स्वामिराय। बढतीही होईल निःसंशय। धरीं तूं आपुल्या हृदयीं निश्चय। विश्वास ठेव देवावरी।।१४२।। असो मग काय थोर। झाला सांगूं चमत्कार। पंचेचाळीस करोनि पगार। नेमिला नाझ़र शिर्शीसी।।१४३।। कुणीं कांहीं न्यायाधीशासी। न सुच़वितां स्वयेंचि परियेसीं। नाझ़र नेमिला अल्लीशासी। शिर्शी-कोर्टामाजीं पैं।।१४४।। इतुक्यांत स्वामी पांडुरंगाश्रम। यांनीं गोकर्णीं केला मुक्काम। हुकूम बघतां अल्लीशा परम। आनंदें धांवला गोकर्णा।।१४५।। कागदपत्र जेथिंच्या तेथें। टाकुनी गेला गोकर्णातें। भेटला श्रीसद्गुरुस्वामींतें। कळविला वृत्तांत सारा तयां।।१४६।। म्हणे देवा सद्गुरुराया। आपुल्या आशीर्वादेंकरोनियां। झालें सकल कार्य सदया। असत्य न होय तव वाणी।।१४७।। आतां आला दास हा शरण। न सोडीं हे कधींही चरण। न विसरें मी तुज़लागोन। देवा गुरुराया दयाळा।।१४८।। मी ज़ातीच़ा हीन म्हणोन। नाहीं अव्हेरिलें मज़लागोन। सकलां बघतां शिशुसमान। किती सद्गुणी तूं माये।।१४९।। काय वानूं तुझी महिमा। परम अगाध नसे

परिज्ञानाश्रम शंकर सद्गुरु

त्या उपमा। न समज़े कवणाही गरिमा। मी तरी अविचारी काय कळे।।१५०।। आपुल्या कृपाप्रसादें खचित। अघटित घटना झाली निश्चित। न्यायाधीशें केलें ज़ें समस्त। सांगतों देवा तुज़लागीं।।१५१।। माझी नोकरी काढण्याऐवजीं। बदली केली शिर्शीमाजीं। नाझर नेमिला ही कृपा तुझी। आणि गंमत सांगूं पैं।।१५२।। पूर्वीं होता पगार तीस। कारवारींचा होता चाळिस। आतां केला पंचेचाळीस। कृपा आपुली ही देवा।।१५३।। आतां स्वामी एकचि मागणें। दुज़ें कांहीं न मागें ज़ाणें। अज्ञ बालक कांहीं नेणे। तूंचि शिकवावें मज़लागीं।।१५४।। आपुले सद्गुणचि गावे निशिदिनीं। यांतचि झिज़वीं माझी वाणी। देईं ठाव तुझिया चरणीं। यावीण मागणें नाहीं दुज़ें।।१५५।। ऐसें बोलुनी नमन करुनी। सुंदर मूर्ति तो न्याहाळी नयनीं। आनंद होय त्याचिया मनीं। तेव्हां बोलती श्रीस्वामी।।१५६।। होईल तुझें इहपर कल्याण। तुझा जन्म होय पावन। करीं सतत अल्लाचें स्मरण। नाहीं भय बा तुज़लागीं।।१५७।। यापरी देतां आशीर्वचन। अल्लीशा संतोषे स्वमनीं ज़ाण। सेवा 'काणिका' करवोन। प्रसाद घेऊन गेला तो।।१५८।। तैसाच हुकुमापरी तेथ। शिर्शीमाजीं ज़ाउनी राहात। श्रीस्वामींचें ध्यान करीत। राहे दिननिशीं तो प्रेमें।।१५९।। असो पुढील अध्यायीं आणिक। कथा सांगूं परम सुरेख। याचि अल्लीशालागीं देख। रक्षिती सद्गुरुस्वामी हो।।१६०।। आनंदाश्रम- परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें चत्वारिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।१६१।।स्वस्ति श्रीचित्रापुर-।गुरुपरंपराचरित्र सुंदर।ऐकतां लाभेल मोक्ष शीघ्र।चत्वारिंशत्तमाध्याय रसाळ हा।।१६२।। अध्याय ४०।। ओंव्या १६२।।ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति चत्वारिंशोऽध्यायः समाप्तः।।

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमत्पांडुरंगाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।।जय जय सद्गुरो भक्तवत्सला। करुणार्णवा परम कृपाळा। अवर्णनीय तुझी लीला। लिहाया मेदिनी न पुरे ही।।१।। कैसे वर्णावे तुझे सद्गुण। न कळे देवा मज़ला ज़ाण। ज़री केला विचार पूर्ण। गुणातीत तूं असशी हो।।२।। पहा बघतां कैसें दिसे। दुर्गुण अंगीं एकही नसे। दुर्गुणावीण सद्गुण ऐसें। नाम कोठोनि ये देवा।।३।। अंधारावरुनी प्रकाश ऐसें। नाम येई त्या परियेसें। आणि प्रकाश जेथें असे। तेथें अंधार नच राहे।।४।। तेवीं सद्गुण जेथें वसे। तेथुनी दुर्गुण धांवतसे। दुर्गुण नसतां नाम कैसें। सद्गुण ऐसें येतें पैं।।५।। एवं जेथें असे द्वैत। तेथेंचि नाम अमुक हें देत। सारें एकचि असे जेथ। नामरूप तेथ कैंचें पैं।।६।। एवं देवा सद्गुण दुर्गुण। तुझ्या अंगीं नाहींत ज़ाण। म्हणोनि गुणातीत तूं पूर्ण। मग कैंचे गुण वर्णावे।।७।। अहो देवा मज़ला कांहीं। कवन कराया बुद्धि नाहीं। वेडीवांकुडी सेवा म्हणुनी ही। अंगीकारीं गुरुराया।।८।। तूं करितां अंगीकार। अबद्ध कैसें होईल साचार। म्हणोनि सरसावलों धरोनि धीर। चरित्रारंभा मी पाहीं।।९।। असो आतां श्रोते हो सज्जन। परिसा चित्त स्थिर करोन। मी ज़री असें मतिहीन। सांभाळून घ्यावें मज़ तुम्ही।।१०।। माझें चित्त असे चंचळ। म्हणोनि तुम्ही श्रोते सकळ। लक्ष देतां बरवें होईल। अर्थ सारा समज़ेल पैं।।११।। म्हणोनि घडीघडी 'सावधान'। म्हणतों तुम्हां श्रोत्यांलागून। परि या बालका क्षमा करोन। प्रेम धरावें श्रवणांत।।१२।। असो मागील अध्यायीं निरूपण। रक्षिला स्वामींनीं अल्लीशा यवन। पुढें आणिक ऐका हो सज्जन। यवनाची त्या सुरस कथा।।१३।। शिर्शी-कोर्टामाजीं नाझर। झाला अल्लीशा,

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

हा विस्तार। मागील अध्यायीं कथिला साचार। आतां ऐका पुढील कथा।।१४।। तो राहिला सुखानें तेथ। त्याच़ा गांवचि तो असे सत्य। मग काय उणीवता त्याप्रत। सद्गुरुकृपेनें सांगा हो।।१५।। तो श्रीस्वामींच़ें ध्यान। करी मानसीं रात्रंदिन। ऐसें असतां झ़ालीं तीन। वर्षें तेथ येऊनियां।।१६।। अल्लीशा असे अति भोळा। 'श्वेत' म्हणतां दूध दिसे डोळां। ऐशिया कोण विचारी ते वेळां। फसविलें त्याज़ला कारकुनें।।१७।। तीन वर्षांमाजीं ज़ाण। सरकारी पैसा गट्ट करोन। बैसला त्याच़ा कारकून। अल्लीशाच़ा हो पाहीं।।१८।। पैसा असे नाझ़रा-हातीं। म्हणोनि अल्लीशासी भीति। इंग्रजी न येतां त्याप्रति। फसविलें कारकुनें त्या समयीं।।१९।। तेव्हां कारवार-कोर्टाहूनि। न्यायाधीश आदिकरूनि। आले कराया तपासणी। शिर्शी- कोर्टामाजीं पैं।।२०।। त्यांनीं केला सारा तपास। तेव्हां कळलें न्यायाधीशास। पैसा गट्ट केला बहुवस। आलें नाझ़रावरीचि पैं।।२१।। तेव्हां खटला करावा म्हणोनि। ठरविलें न्यायाधीशें झ़णीं। विदित नाहीं अल्लीशालागूनि। असे तो निश्चिंत गुरुकृपें।।२२।। परि कुमठेच़ा मित्र सारस्वत। मंगेशभट्ट आला होता तेथ। न्यायाधीशासंगें शिर्शींत। फिरतीवरी ते समयीं।।२३।। तो गेला अल्लीशापाशीं। म्हणे काय झ़ालें तुज़सी। खटला होईल तुज़वरी परियेसीं। नोकरी ज़ाईल बापा ही।।२४।। ऐसा कैसा तूं भोळा शंकर। कारकुनें तुज़ फसविलें साचार। नाहीं केला कांहीं विचार। आतां काय करिसील तूं।।२५।। त्यानें पैसा गिळिला ज़री। तुज़वरीच़ तो येई निर्धारीं। तुज़वरी असे ज़बाबदारी। असे कठिण काळ पहा।।२६।। आतां तुज़ला तुरुंगवास। घडेल वाटे मज़ला खास। पुढें काय गति ती देवास। विदित ज़ाण बा पाहीं।।२७।। यावरी

अल्लीशा हांसोन गदागदां। म्हणे कां तुम्हां नाहीं धंदा। श्रीस्वामींच्या धरितां पदा। कैंचें भय बा मज़लागीं।।२८।। त्यांच्या वचनीं माझा विश्वास। तेचि रक्षिती मज़ला खास। त्यांनीं दिधले आशीर्वाद बहुवस। मग कां भ्यावें मीं पाहीं।।२९।। श्रीपांडुरंगाश्रमस्वामी। माझ्या पाठीशीं असती नेहमीं। ऐसा निश्चय मनीं धरिला मीं। तेचि मज़ला रक्षिती।।३०।। त्यांचा आशीर्वादचि पाहीं। माझ्या कार्यासि शोभा देई। तेणेंच निश्चयें ज़ागा मज़ ही। प्राप्त झाली विदित तुला।।३१।। त्यांच्या आशीर्वादबळें ज़ाण। कवणही अपराध ज़ाईल झांकून। मग कैंचें भय मज़लागोन। सांगें तूंचि बा पाहीं।।३२।। गुरुदेवापुढें मानव कोणी। खटला कैसा करितील धरणीं। विसरलासि कां तूं मागील करणी। श्रीस्वामींची तुमच्या पैं।।३३।। मी ना भीत कधींकाळीं। तोचि मज़ला प्रेमें सांभाळी। तयासन्मुख न ये ज़वळी। कळिकाळही निश्चयेंसीं।।३४।। न्यायाधीशानें लिहितां ठराव। लेखणीवरी बैसोनि गुरुदेव। खटल्याचा विचार मोडील सर्व। ऐसा निश्चय माझा पैं।।३५।। तपासावया येती म्हणोनि। आधींच श्रीस्वामींलागूनि। विनंतिपत्र मीं धाडिलें झणीं। काय तें सांगतों ऐक ज़रा।।३६।। श्रीमत्पांडुरंगाश्रमस्वामी। यांच्या चरणारविंदीं करितों मी। साष्टांग नमन अंतर्यामीं। धरोनि मूर्ति आपुली ती।।३७।। येतील वरिष्ठ तपासावया। कवणही विघ्न न यावें त्या समया। इतुकी कृपा करावी गुरुराया। चरणीं तुझ्या मस्तक हें।।३८।। यापरी करोनि प्रार्थना बहुविध। सेवा करविली आला प्रसाद। स्वामीमठाकडुनी प्रसिद्ध। मग कैंचें भय मज़ला।।३९।। ते कनवाळू स्वामिराय। माझें अनिष्ट करतील काय। रक्षितील ऐसा निश्चय। असे मज़ला दृढतर तो।।४०।। इतुकें बोलुनी

अल्लीशा भक्त। राहिला ठेवूनि शांत चित्त। श्रीस्वामींचें नामस्मरण सतत। चालवी प्रेमानें तो पाहीं।।४१।। न करी चिंता कांहीं एक। प्रफुल्लित दिसे त्याचें मुख। तेव्हां चमत्कार काय तो सुरेख। झाला ऐका श्रोते हो।।४२।। दुसऱ्या दिवशीं करितां तपास। काय लिही तो न्यायाधीश। खटला टाकिला एका दिशेस। केलें हितचि त्याचें हो।।४३।। बदली केली होन्नावरासी। तेव्हां अधिकचि अल्लीशासी। आनंद झाला त्याचे मानसीं। काय कारण सांगूं तें।।४४।। होन्नावरासि जातां आपण। वारंवार स्वामींचें दर्शन। घेऊं चित्रापुरीं जाऊन। नजीक होय तो गांव।।४५।। म्हणोनि अल्लीशालागोनि। परम आनंद झाला मनीं। मग तो गेला होन्नावरा तेथूनि। हुकुमापरी तेधवां ।।४६।। असो मग तो वारंवार। जाय चित्रापुरा धरूनि निर्धार। श्रीपांडुरंगाश्रम-गुरुवर। यांचें दर्शन घे प्रेमें।।४७।। मग कांहीं वर्षें लोटतां। पेन्शन घेऊनि राहिला तत्त्वतां। श्रीगुरुचरणां न विसरतां। स्मरण करीत सतत पहा।।४८।। मरे तोंवरी केलें स्मरण। अंतकाळीं ध्याइला कृपाघन। दीर्घ स्वरें आरंभिलें स्तवन। श्रीस्वामींचें प्रेमानें।।४९।। म्हणे सद्गुरुमाउली कृपांगे। तुज़वीण सारे विषय वाउगे। न येती कवणाच्याही संगें। तूंचि पोंचविसी मोक्षातें।।५०।। तुझें प्रेम हेंचि एक। येई सांगातीं निश्चयात्मक। तेणेंच आमुचा उद्धार देख। होय देवा कृपाघना।।५१।। तूंचि आमुची जननी जनक। तुज़हुनी मज़ ना जगतीं आणिक। तूंचि पावलास निश्चयात्मक। कुमठाग्रामीं संकटीं ।।५२।। देवा काय तुझी महिमा। अवर्णनीय नाहीं त्या सीमा। अभक्तांसिही लाविसी प्रेमा। करिसी निजभक्त तत्काळ त्या।।५३।। मी कोण कुठील ज़ातीचा यवन। ऐशिया लागलें तुझें ध्यान। ज़डलें

प्रेम अद्भुत कोठून। तुझीच करणी ही सारी।।५४।। अहा देवा ऐसें प्रेम। ज़डतां कैंचा उरेल भवभ्रम। पाप सारें होऊनि भस्म। चित्त शुद्ध होय खरें।।५५।। ऐसा तूं बा माझा देव। तुज़ला सारखे रंक राव। किती वर्णावें सद्गुणवैभव। बोलूं न शकें मी बापा।।५६।। झाले तुझे उपकार अमित। कैसा उतराई होऊं यांत। कवणही उतराई नाहीं होत। मी तरी अज्ञ यवन पहा।।५७।। असो देवा अंतीं तुज़ला। स्मरूनि देह हा तुज़ अर्पिला। देईं ठाव चरणीं मज़ला। दीनदयाळा प्रभुराया।।५८।। ऐशियापरी करूनि प्रार्थना। देह अर्पिला श्रीसद्गुरूंना। एवं सोडिलें आपुल्या प्राणा। त्या अल्लीशा यवनानें ।।५९।। पहा कैसी सद्गुरुमहिमा। ज़री आला यवनजन्मा। गुरुकृपेंचि स्तविलें नामा। श्रीस्वामींच्या प्रेमभरें।।६०।। इतुकें प्रेम लागाया कारण। सद्गुरुमहिमाचि ती ज़ाण। त्याहूनि कांहीं नाहीं आन। नसे संशय यामाजीं।।६१।। ना दाविती कलाकौशल्य। नाहीं घातली जनांसि भुरळ। परि बघतांचि मूर्ति प्रेमळ। उपज़े प्रेम अंतरीं।।६२।। ऐसें व्हावया काय कारण। सांगूं आतां त्याची खूण। परिसा भाविक श्रोते सज्जन। चित्त देऊनि प्रेमानें।।६३।। ब्रह्मज्ञानिया सकल जन। राजा रंक ब्राह्मण यवन। आपपर सारे समान। त्यामुळें उद्धरिलें अल्लीशासी।।६४।। सद्गुरुमूर्तिच असे तैशी। परम कनवाळू भेद ना मानसीं। तेचि आमुचे हितकर्ते निश्चयेंसीं। त्याहुनी त्रिजगतीं ना अन्य।।६५।। ऐशिया सद्गुरुदर्शनें आपुलें। पाप-ताप-दैन्य सगळें। ज़ाणा खचितचि भस्म ज़ाहलें। नाहीं संशय यामाजीं।।६६।। काय सांगूं त्यांची महिमा। त्यांच्या कृपेस नाहीं सीमा। ज़ातां सन्मुख त्यांच्या प्रेमा-। माजीं सांपडती निश्चयेंसीं।।६७।। लोहचुंबकासंनिध ज़ैसें। ठेवितां लोखंड चळे आपैसें। सद्गुरुसंनिध

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

ज़ातां तैसें। ओढिती मन भाविकांचें।।६८।। लोखंडावीण वस्तु आन। ओढितां न ये चुंबकालागोन। तैसें सद्भक्ताविण अन्य जन। त्यांसि सद्गुरु काय करी।।६९।। ज्यासि असे जीवात्मबुद्धि। तोचि सद्गुरु देखतां आधीं। प्रेमें धांवे त्यांच्या पदीं। चरण न सोडी कदापि।।७०।। देहात्मबुद्धि ज्याची असे। तो गुरुप्रेमांत विरत नसे। ज़री संनिधींत राहतसे। सद्गुरु देवचि हें न ज़ाणे।।७१।। ज़ो असे प्रेमळ भक्त। सद्गुरु आपुल्या प्रेमानें त्याप्रत। ओढुनी नेती त्यासी त्वरित। निजस्वरूपीं निर्धारें।।७२।। आणि ज़े असती खरे संत। चुंबकापरी ओढिती भक्त। तारिती आपुल्या कृपेनें त्यांप्रत। क्षण न लागतां हो पाहीं।।७३।। त्यांच्या कृपेनें ज़री यवन। तारला, तरी कां हो आपण। तरूं नये सांगा वचन। विचार करितां सहज़ कळे।।७४।। धरितां मनीं दृढ विश्वास। तरूं निश्चयें आम्ही खास। प्रेमें भज़तां ते आम्हांस। उद्धरिती ज़ाणा पहा हो।७५।। जगाच्या कल्याणास्तवचि देह। झिज़विती ते निःसंदेह। नाहीं देहावरी मोह। ममता तैशी अणुमात्र।।७६।। असो बहुत कासया बोलणें। नाहीं त्यांसी प्रपंच करणें। इतुके कष्ट कोणत्या कारणें। कां घेती भार भक्तांचा।।७७।। केवळ लोकोद्धारावांचुनी। कर्तव्य नाहीं तयांलागुनी। साऱ्या जगाचेचि धनी। असती गुरुराज ते पहा।।७८।। सारें जगचि त्यांचें होय। ते जगाचे असती हा निश्चय। साऱ्या ब्रह्मांडीं वसती सदय। रिता ठाव ना गुरुवीण।।७९।। ऐसी ती प्रेमळ सद्गुरुमूर्ति। सदा स्मरावी आपुल्या चित्तीं। मग कैंची आम्हां भीति। त्यांच्या कृपेनें पहा हो।।८०।। असो आतां कथिली ही कथा। ज़े ऐकती पठती त्यां भक्तां। स्वहिताचा मार्ग मिळेल अवचितां। न लागतां सायास अणुमात्र।।८१।। पुढील अध्यायीं कथा रसाळ।

ऐकतां तोषतील भक्त प्रेमळ। लटिके नव्हती आमुचे बोल। परिसा निर्मल चित्तानें।।८२।। आनंदाश्रम परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें एकचत्वारिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।८३।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां मोह होय तो दूर। एकचत्वारिंशाध्याय रसाळ हा।।८४।। अध्याय ४१।। ओंव्या ८४।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति एकचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः।।

ॐ परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमत्पांडुरंगाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय देवा सद्गुरुराया। काय मूर्ति तुझी सदया। न मिळे कवणा तुज़वांचुनियां। चित्ता थारा कदापिही।।१।। तूंचि एक जगीं मज़ला। ज़ाऊं कुठें सांग ये वेळां। म्हणोनि घट्ट चरणकमलां। धरिलें देवा विश्वासें ।।२।। घातला सकलही तुज़वरी भार। तूंचि रक्षिसी अज्ञ पामर। ऐसा भरंवसा ठेवितों तुज़वर। मग कैंचें भय मज़लागीं।।३।। मी कासया मागावें तुज़ला। तूं ज़ें करिसी तेंचि मज़ला। हितासी कारण होय वेल्हाळा। अहाहा काय वानूं तूंतें मी।।४।। नाना संकटें येवोत अपार। तैसेचि अनेक दुःखांचे डोंगर। अथवा सुखसागरीं बुडतां शीघ्र। दोन्हीमाजीं आनंदचि ।।५।। तूं ज़ें करिसी तेथें दुःख। नसे अणुमात्र आणि ना सुख। केवल आनंद एकचि देख। तूंचि भरलासि त्या ठायीं।।६।। नको यावरी मोक्ष तो मज़ला। ज़री लक्षचौऱ्यांशींचा झोला। फिरविसी तरी चिंता कशाला। वहावी देवा मीं सांग।।७।। तुज़वांचोनि रिता ठाव। नाहीं, तूंचि भरला देव। स्वर्ग-मृत्यु-पाताळ सर्व। साऱ्या ब्रह्मांडीं भरलासी।।८।। तेव्हां घातलेंसि योनीं कवण्याही। अथवा ठेविलेंसि आपुल्या पायीं। किंवा दिलीस अधोगतिही। परमानंदचि तेथें हो।।९।। म्हणोनि सद्गुरुस्वामी देवा। ज़ैसें ठेविसी या मम जीवा। त्यांतचि घेऊनि तुझ्या नांवा। आनंदें राहूं निश्चयेंसीं।।१०।। मन हें यापरी तूंचि करिसी। आहे तुझी महिमाच ऐसी। ती म्यां अज्ञें वर्णावी कैसी। न कळे देवा गुरुराया।।११।। असो आतां श्रोते हो सज्जन। मागील अध्यायीं कथानिरूपण। अल्लीशहा नाझर भक्त यवन। यासी रक्षिलें स्वामींनीं।।१२।। आणिक सांगूं कथा

रसाळ। श्रीस्वामींची महिमा समूळ। परिसा तुम्ही भक्त प्रेमळ। श्रोते हो सज्जन सावधान।।१३।। आमुची माता पार्वतीबाई। मंगेशभट्ट पिता तो पाहीं। स्वामींच्या आशीर्वचनें अज़ूनिही। असती धारवाड-ग्रामांत।।१४।। त्यांची कथा सांगूं आतां। लावावें श्रोत्यांनीं आपुल्या चित्ता। पांडुरंगाश्रम यांची तत्त्वतां। महिमा थोर परिसा हो।।१५।। चित्रापुर-ग्रामानजिक।'बिज़ूर' नामें खेडें एक। तेथें 'म्हाळप्पय्या' नामें देख। होता ब्राह्मण सारस्वत।।१६।। त्यासी असती तीन पुत्र। द्वितीय सुत रामचंद्र। याची कन्या झ्राली उपवर। नाम तियेचें 'राधा' पैं।।१७।। नऊ वरुषें भरलीं पूर्ण। लागली चिंता थोर ज़ाण। बिज़ूर म्हाळप्पय्यालागून। उज़वावी इज़ला म्हणोनियां।।१८।। रामचंद्र परम विरक्त। संसारीं नाहीं त्याचें चित्त। पिता म्हाळप्पा प्रतिपाळी तिज़प्रत। माता निवर्तली पूर्वींच ।।१९।। म्हणोनि संरक्षीतसे तिज़सी। आज़ोबा तिचा म्हाळप्पा परियेसीं। असो लागली चिंता त्यासी। राधेसी उज़वावी म्हणोनि।।२०।। त्याची कन्या मंकीमाजीं। होता नामें अण्णय्यभटजी। त्यासी दिधली होती सहजीं। ती गेली होती परलोकीं।।२१।। परि ज़ांवई अण्णय्यभटजी। होता अर्चक मंकीमाजीं। 'जनार्दन' देवातें तो पूजी। ग्रामस्थांच्या वतीनें।।२२।। त्याचा द्वितीय पुत्र मंगेश।'फटभट्ट' म्हणती त्यास। एवं म्हाळप्पय्याचा नातू विशेष। कन्येचा पुत्र तो पाहीं।।२३।। तेव्हां तो बिज़ूर म्हाळप्पय्या। गेला मंकीसी विचारावया। राधेसी मंगेशा द्यावया। आपुल्या नात्यामध्येंच कीं।।२४।। आणि म्हणे अण्णय्यभट्टासी। आमुची राधा मंगेशासी। द्यावी ऐशी माझ्या मानसीं। इच्छा असे बहुतचि।।२५।। यावरी जातक घेऊनि तियेचें। बघे अण्णय्यभट्ट स्वयें साचें। शांतपणें बोले वाचे। नाहीं बरवें ज़ुळत

हें।।२६।। लग्न होतां वर्षाआंत। पति मरोनि ज़ाईल निश्चित। जातक बघतां ऐसें दिसत। 'हेड्तलें[१] आहे दोहांसी।।२७।। ऐसें असतां कैसें आपण। देऊं सांग तुज़ला वचन। ऐकूनि झ़ालें म्लानवदन। म्हाळप्पाचें ते समयीं।।२८।। मग तो गेला चित्रापुरासी। हेतु धरोनि आपुल्या मानसीं। कीं आशीर्वाद घ्यावा येविषीं। श्रीस्वामींकडोनियां।।२९।। गेला लगबगें स्वामीमठासी। पांडुरंगाश्रमस्वामींपाशीं। भेट घ्यावया प्रेमासरशीं। धांवला थेट संनिधींत।।३०।। तेव्हां स्वामींनीं बघुनी यासी। म्हणती म्हाळप्पय्या कां आलासी। काय कारण सांगें आम्हांसी। ऐकतां आनंदे म्हाळप्पा।।३१।। तेव्हां म्हाळप्पा करोनि नमन। बोलता झ़ाला मृदुवचन। पाणावले त्याचे नयन। प्रेमळ मन त्याचें पैं।।३२।। म्हणे देवा सद्गुरुनाथा। आमुच्या बाळूच्या कन्येकरितां। वर बघाया गेलों ताता। मंकीमाजीं मी पाहीं।।३३।। मंकीग्रामीं अण्णय्यभट्ट। जामात आमुचा असे श्रेष्ठ। त्याचा द्वितीय पुत्र फटभट्ट। यासी द्यावयाकारणें।।३४।। परि अण्णय्यभटजी यांनीं। नाकारिलें जातक पाहुनी। अन्य स्थळ बघावें म्हणुनी। आलों पुसाया संनिधीतें।।३५।। आपल्या कृपेनें उत्तम वर। मिळावा ऐसा आशीर्वाद थोर। घ्यावयासी आलों सत्वर। चरणसंनिधीं बा देवा।।३६।। ऐसें ऐकतां त्याचें उत्तर। स्वामी सद्गुरु परम चतुर। धाडिती मनुष्य मंकीमाझ़ार। अण्णय्यभट्टासी बोलवाया।।३७।। स्वामींची आज्ञा ऐकोन। उठला यावया न लागतां क्षण। पावला त्वरित मठालागून। चित्रापुर-ग्रामासी।।३८।। येऊनि तत्काळ घेतली भेटी। पाहिली नयनीं मूर्ति गोमटी।

१ ज्योतिषशास्त्रोक्त एक दुष्ट योग

आनंद न समाये पोटीं। बोलाया ओठीं येईना।।३९।। कंठ ज़ाहला सद्गदित। नयनीं अश्रुधारा वाहत। अंगीं रोमांच उठत। दर्शन घेतांचि स्वामींचें।।४०।। घातला साष्टांग प्रणिपात। हृदयीं उचंबळे प्रेम बहुत। झ़ाला तल्लीन आनंदांत। सद्गुरुप्रेम नावरे।।४१।। मग उठोनि कर ज़ोडोनि। उभा राहिला नम्र होऊनि। तेव्हां बोलती स्वामी हांसूनि। प्रेमळ वचनें त्यालागीं।।४२।। म्हणती अण्णय्या हा तव। सासरा आलासे कशास्तव। हें तुज़ विदित असेल कीं सर्व। वऱ्हाडी व्हावें तूं म्हणोनि।।४३।। कासया नसे तुझी कबूली। सांग बा आम्हां ये वेळीं। काय कारण तुज़ या स्थळीं। नको ऐसें वाटाया।।४४।। तेव्हां बोले भटजी अण्णय्या। कवणही कारण नसे या ठाया। एकचि प्रतिबंध असे लग्ना या। जातकदोष थोर बहु।।४५।। लग्न झ़ालिया वर्षाआंत। पतीसी मरण असे येथ। म्हणोनि माझ़ें मन हें भीत। त्यावीण अन्य ठीक असे।।४६।। तेव्हां बोलती श्रीगुरुराय। होय तूं आतां मानसीं निर्भय। दोष निरसन करील तो सदय। भवानीशंकर कृपाळू।।४७।। भिऊं नको तूं आतां सर्वथा। तोचि रक्षील निश्चयें तव सुता। अखंड सौभाग्य पावे दुहिता। याच्या बाळूची हो ज़ाण।।४८।। चला तुम्ही आतां ज़ावोनि। स्नान करोनि दोघेही या झ़णीं। स्वामींचें वचन ऐकतांक्षणीं। गेले नमूनि स्नानासी।।४९।। स्नान करूनि आले मठासी। बोलाविलें स्वामींनीं देवापाशीं। भवानीशंकर- संनिधीसी। करिती प्रार्थना कृपाघना।।५०।। बोलती स्वामी कर ज़ोडुनी। भवानीशंकरा पिनाकपाणी। कथितों आतां यांची कहाणी। तुज़ सर्वसाक्षी सर्वज्ञा।।५१।। तुज़ला सांगावें नलगे कांहीं। देवा विदितचि तुज़ सर्वही। परि सांगूं लडिवाळपणें पाहीं। सारा वृत्तांत तुज़लागीं।।५२।। अण्णय्याच्या पुत्रालागुन।

म्हाळप्पय्याची नात देऊन। लग्न करावें म्हणोन। असे मानसीं याच्या बा।।५३।। परि जातक-दोष थोर। तोचि एक प्रतिबंध साचार। म्हणोनि देवा तूं करुणाकर। करीं रक्षण यांचें बा।।५४।। संकष्टें सारीं निरसोनि। संरक्षावें वधूवरांलागूनि। पाठीराखा तूंचि म्हणोनि। भार घालतों तुज़वरी।।५५।। तुझ्यावांचूनि अन्य ना कवण। दोघेही तुझे भक्त ज़ाण। अखंड सौभाग्य देईं पूर्ण। त्या मुलीसी लवलाहीं।।५६।। ऐसी प्रार्थना केली बहुविध। आणि दिधला दोघांसी प्रसाद। दोघांसीही झाला आनंद। सद्गुरु-आज्ञा म्हणोनियां।।५७।। म्हाळप्पय्या अण्णय्यभटजी। दोघेही म्हणती श्रीसद्गुरुजी। आपुला आशीर्वाद आजि। लाभतां कैंचें भय आम्हां।।५८।। ऐसें बोलुनी घातलें दंडवत। प्रेमाश्रु आले नयनांत। बोलती दोघे आपसांत। गुरुवाक्यचि श्रेष्ठ असे।।५९।। होईल सत्य त्यांचें वचन। यांत अणुमात्र ना अनुमान। आतां ठरवूं मुहूर्त आपण। मठांतचि तत्काळ।।६०।। इतुकें बोलूनि ठरविला मुहूर्त। गेले आपापुल्या ग्रामाप्रत। म्हाळप्पय्या वेगें लागत। लग्नसिद्धतेलागीं पैं।।६१।। मग राधा मंगेश यांचा। विवाह झाला विधियुक्त साचा। सद्गुरुस्वामींची वाचा। असत्य न होय कदापिही।।६२।। अद्यापिही असे तें दंपत्य। आमुची माता पिता हें सत्य। ऐसें मी बोलें त्यांचें अपत्य। आशीर्वादें स्वामींच्या।।६३।। मातेलागीं झालीं वरुषें। साठीवरी पांच परियेसें। अद्यापि सौभाग्यावरीच असे। सद्गुरु-आशीर्वचनेंचि।।६४।। पहा कैसें स्वामींचें वचन। असत्य न होय कदापि ज़ाण। म्हणोनि त्यांचें चुकलें मरण। ना अनुमान यामाजीं।।६५।। जातक बघतां पतिमरणाचा। निश्चय दिधला अण्णय्यास साचा। आशीर्वादें श्रीस्वामींच्या। चुकलें मरण मंगेशाचें।।६६।। अद्यापिही जातक

दोघांचें। ज्योतिष्यालागीं दावितां साचें। आश्चर्यानें बोलती वाचे। कैसें केलें हें लग्न।।६७।। म्हणती मंगेशभट्ट यासी। नवल हें कैसा तूं वांचलासी। न जुळे जातक, मरण तुज़सी। लग्न केल्या वरुषींच ।।६८।। हें जातक बघतां कवणही। न करील विवाह निश्चयें पाहीं। ऐसें असतां पत्नी तुम्हीं ही। कैसी केली नवल हें।।६९।। असो सद्गुरुस्वामींची कृपा। यांत नाहीं संशय पहा पां। ऐसे हे चरण धरितां खेपा। चुकती जन्म-मरणांच्या।।७०।। ज़री संसारीं त्यांचें वचन। बोलिलें तें सत्य होय ज़ाण। तरी परमार्थीं बोलतां कां न। होय तें सत्य सांगा हो।।७१।। त्यांचा अवतार काय कारण। कीं सत्पथ दावा यालागुन। ऐशियाचे आम्हीं चरण। नच दवडावे कदापिही ।।७२।। कोण इतुकें बोधिती उत्तम। नाहीं त्यांसी क्रोधकाम। सारे षड्रिपु पळाले धूम। ठोकुनी प्रतापें तयांच्या ।।७३।। ऐसी ही मूर्ति परम सुंदर। काय वानूं त्यांचें चरित्र। असती निश्चयें परम पवित्र। नाहीं अणुमात्र अवगुण पैं।।७४।। साक्षात् अवतरे दत्तात्रेय। यांत अणुभरी नसे संशय। यावरी आणिक कथा रमणीय। सांगूं आतां सविस्तर।।७५।। मंगळूर या ग्रामीं एक। सारस्वत आमुचा देख। होता प्रपंचीं भोगित सुख। परि स्वामींची निंदा करीत बहु।।७६।। स्वामी येतां मंगळूरासी। स्वप्नींही बघेना ज़ाउनी त्यांसी। कां ज़ावें म्हणे मानसीं। त्यासी भेटाया निष्कारण।।७७।। त्यासी आम्हां काय भेद। आमच्याहूनि तो मतिमंद। म्हणोनिच लागला त्यासी छंद। स्वधर्म देव याचाचि।।७८।। काय जनांसी पडली भूल। स्वामी मठ यांचेंचि खूळ। काय त्यासी लागला गूळ। मूर्ख जन हे असती सारे।।७९।। उगीच मठाचा स्वामी करोनि। अंधश्रद्धेनें ठेविला

जनांनीं। नाचती स्वामी देव म्हणोनि। काय देवत्व त्यासी असे।।८०।। ऐसे नानापरी दोष। देत मानसीं रात्रंदिवस। परि स्वामी न सोडिती त्यास। ओढिती प्रेमबळेंकरोनि।।८१।। पहा कैसें पूर्व सुकृत। उदया आलें अकस्मात। ऐका आतां पुढें त्याप्रत। कैसें ओढिलें स्वामींनीं।।८२।। त्यासी निंदा करतां करतां। वाटलें एकेकाळीं चित्ता। कीं स्वामींच्या मठामाजीं आतां। ज़ावें एकदां बघावया।।८३।। काय करिती कैसे राहती। काय महत्त्व स्वामींप्रती। कासया उगीच़ जन हे भुलती। हें बघावें ज़ाऊनियां।।८४।। ऐसा विचार करोनि मानसीं। गेला निघोनि चित्रापुरासी। उतरला एका मित्रापाशीं। वळकटी सामान घेऊनियां।।८५।। मग स्नान-भोजनादि उरकुनी। गेला स्वामी-मठालागुनी। विचारीतसे भटजींस ज़ाउनी। स्वामी कुठें असती हो।।८६।। म्हणे स्वामींच़ें मज़ला दर्शन। व्हावें ऐसी इच्छा धरोन। आलों होतों येथें धांवून। खचितचि मी ज़ाणा हो।।८७।। तरी आतां स्वामी मज़प्रती। कधीं काय सांगा भेटती। मिळतील काय ये वेळीं निश्चितीं। ऐसें म्हणोनि राहिला।।८८।। यावरी भटजी बोले शांत। सद्गुरुस्वामी असती आंत। बैसले भिक्षेलागीं तेथ। बाहेर आलिया होय दर्शन।।८९।। यावरी तो मंगळूर-गृहस्थ। बैसला बहुविध विचार करीत। बघावें आतां सारें येथ। स्वामी कैसे असती हे।।९०।। असो इकडे भटजीबुवा। भिक्षा होतां सांगे गुरुदेवा। मंगळूर-गांवींच़ा गृहस्थ नवा। आला भेटाया या स्थानीं।।९१।। यावरी स्वामी न बोलतां कांहीं। च़ालले आपुल्या विश्रांति-गृहीं। अंतर्ज्ञानी ज़ाणती सर्वही। हृदय सकल जनांच़ें।।९२।। हा इसम परीक्षा घ्यावया। आला ऐसें मनीं ज़ाणूनियां। बळेंच़ गेले विश्रांतिठाया। माडीवरी

ते पाहीं।।९३।। तेव्हां हा बघावयास वेगें। गेला तयांच्या पाठीमागें। स्वामी जिना चढतां लगबगें। येरूही चढूं लागला।।९४।। उपरी ज़ातां मागें वळोनि। बघती स्वामिराय ते झणीं। तेव्हां देखिली त्रिमूर्ति नयनीं। या गृहस्थें सुंदर ती।।९५।। देऊनि दत्तदर्शन त्यासी। गेले स्वामी आपुल्या स्थानासी। बैसले ज़ाऊनि स्वस्थचित्तेंसीं। स्वानंदीं निमग्न होऊनियां।।९६।। तेव्हां मंगळूर-ग्रामींचा गृहस्थ। थरथरां कांपे बघूनि अद्भुत। नयनीं अश्रुधारा वाहत। झाला भयभीत हृदयीं तो।।९७।। दो पायऱ्या चढतांक्षणीं। देखिली मूर्ति दत्ताची नयनीं। पुढें न ज़ातां धांवला तो झणीं। भटजीकडे तेधवां।।९८।। स्फुंदस्फुंदोनि रडे गृहस्थ। म्हणे अपराध झाला बहुत। भेट करवा स्वामींची मज़प्रत। करावा उपकार इतुका हो।।९९।। मी असें खचितचि पापी। यांत संशय नसे हो किमपि। स्वामींची मूर्ति परम प्रतापी। हें न कळलें मज़लागीं।।१००।। मीं केली निंदा बहुत। हें कळलें त्यांसी निश्चित। म्हणोनि दर्शन न देतां त्वरित। गेले माडीवरीच पहा।।१०१।। आणिक दाविलें दत्तस्वरूप। झाला असेल मज़वरी कोप। हृदय कळवळे माझें खूप। आतां निश्चयें हो ज़ाणा।।१०२।। आतां कळलें देवचि ते ऐसें। याउपरी निंदा न करीन मानसें। दर्शन करवा तुम्ही साहसें। पडतों पायां तुमच्या मी।।१०३।। इतुकें बोलुनी धरिले चरण। वेदमूर्ति भटजींचे ज़ाण। द्रवलें भटजींचें अंतःकरण। म्हणती भिऊं नको सर्वथा।।१०४।। इतुकें बोलुनी स्वामीसंनिधीं। गेले भटजी धांवूनि आधीं। केली प्रार्थना परमावधी। म्हणे स्वामिन् करुणाळा।।१०५।। तो गृहस्थ हळहळे भारी। नानाविध प्रार्थना तो करी। द्यावें

दर्शन त्याज़ला सत्वरी। कृपा करोनि गुरुराया।।१०६।। ऐकतां भटजीचें वचन। कळवळलें स्वामींचें अंतःकरण। पाचारीं आतांच त्यासी ज़ाऊन। देतों दर्शन ये समयीं।।१०७।। मग गेले भटजी शीघ्र। म्हणे आज्ञा झाली साचार। दर्शन द्यावया बैसले गुरुवर। येईं सत्वर माडीवरी।।१०८।। तेव्हां आनंदें घेऊनि नारळ। गेला धांवूनि दर्शना ते वेळ। साष्टांग प्रणिपात घातला प्रेमळ। अंतःकरणें तेणें हो।।१०९।। आणि म्हणे प्रभो दयाळा। अपराध माझा थोर ज़ाहला। क्षमा करावी या निजबाळा। स्वामिराजा दयानिधे।।११०।। नानापरी केली निंदा। देव तूं ऐसें या मतिमंदा। न कळतां ऐशा या पदा। नमन ना केलें केव्हांही।।१११।। ऐसा मी खळ निर्दय। पाहिले नाहीं आपुले पाय। परि झाला पुण्योदय। दाविलें स्वरूप दत्ताचें।।११२।। ज़ातां माडीवरी आपण। पाहिलीं निश्चयें मुखें तीन। सहा हात दत्त दयाघन। याचें दर्शन मज़ झालें।।११३।। कळलें आतां आपण कोण। साक्षात् दत्तात्रेयचि म्हणून। तेवींच दाविलीं मुखें तीन। दत्तात्रेय होऊनियां।।११४।। तूं देवा क्षमाशील। म्हणोनि मज़ला घेतलें ज़वळ। तुझे उपकार कवण विसरेल। तुज़ला मनुष्य कोण म्हणे।।११५।। इतुकें कोमल अंतःकरण। किती वानूं देवा तुझे सद्गुण। शक्ति नसे कराया वर्णन। वाणीसी माझ्या अज्ञपणें।।११६।। ज़री म्यां केला अपराध थोर। तरी दर्शन दिधलें तूं साचार। अहा देवा करुणासागर। मज़ अज्ञासी उद्धरिलें।।११७।। देवाहुनी सद्गुरु श्रेष्ठ। ऐसी भक्त सांगती गोष्ट। इतुकें बोलतां कांपती ओठ। थरथर त्याचे पहा हो।।११८।। नेत्रीं वाहती अश्रुधारा। रोमांच उभे राहती शरीरा। पुनरपि करी नमस्कारा। प्रेमपूर्वक ते समयीं।।११९।। आणि

बोले सद्गुरुराजा। तूंचि देव अससी माझा। जगीं अन्य नसे दुजा। रक्षक आम्हां बालकांसी।।१२०।। देव न करी इतुकें प्रेम। ज़ो करी त्याची भक्ति उत्तम। त्यासीच़ रक्षी पुरुषोत्तम। अन्यांसी करी ताडन पैं।।१२१।। रामानें मारिलें रावणासी। कंस वधिला श्रीकृष्णें परियेसीं। सद्गुरुराया शत्रु ना तुज़सी। निंदक वंदक सम सारे।।१२२।। निंदकांवरी न करिसी द्वेष। दया उपज़े त्यांची बहुवस। परि संनिधीं न ज़ातां त्यांस। कैसा उद्धरिसी तूं बापा।।१२३।। निंदामिसें ज़री घे दर्शन। तरी तूं त्यासी करिसी पावन। घ्यावें आतां उदाहरण। माझ़ेंचि ज़ाणा हो देवा।।१२४।। मी आलों होतों कासया। घडलें काय सद्गुरुराया। कृपा ही तुझी सदया। निंदकांवरी निश्चयेंसीं।।१२५।। असो आतां देवा दयाळा। काय करावें मी ये वेळां। कोण गति सांगा मज़ला। या खळासी आतां हो।।१२६।। इतुकें बोलुनी केलें नमन। पाणावले त्याच़े नयन। तेव्हां बोलती कृपाघन। कळवळोनि प्रेमानें।।१२७।। अरे बाळा तुज़लागोन। नाहीं भय कवणही ज़ाण। तळमळलें तुझ़ें अंतःकरण। झ़ालें निरसन पापाच़ें।।१२८।। पुनः न करीं ऐसी निंदा। कवणही संतसाधूंच्या पदा। चित्तीं नाम धरीं सदा। होईल कल्याण निर्धारें।।१२९।। नामस्मरणें सारें पाप। निरसन होईल आपोआप। नाममहिमा असे अमूप। काय सांगूं तुज़लागीं।।१३०।। नामें तरला वाल्या कोळी। उलटें ज़री वदला भूतळीं। नामेंचि सेतू बांधिला जळीं। एवं अनेक तरले पैं।।१३१।। नामें होय पापनाश। तेणें चित्त शुद्ध होय खास। ऐसें तें नाम परम सुरस। काय सांगूं नवलाई।।१३२।। यावरी बोले तो गृहस्थ। मम मन हें विषयीं रत। तेव्हां कैंच़ें नाम येत। माझ्या मनीं दयाघना।।१३३।। ज़री मी मुखानें वदलों नाम। मन हें करी

अन्यचि काम। तेव्हां देवा कैसें बा मम। पाप नासे हो पाहीं।।१३४।। यावरी बोलती स्वामिराज। सांगतों बापा तुज़ला सहज़। कवणही सर्वथा भय ना तुज़। भवानीशंकर समर्थ असे।।१३५।। न कळतां पद अग्नीवरी। पडलें पहा चुकुनी ज़री। तरी दाह होय तो निर्धारीं। अग्नीचा धर्मचि हा ज़ाण।।१३६।। तद्वत् करितां नामस्मरण। पाप सारें होय दहन। ज़री त्यावरी नाहीं मन। तरीही ज़ळती पापें तीं।।१३७।। अग्नीचा गुणचि ज़ाळण्याचा। नाममहिमा तैसाचि साचा। पाप नाश करी, म्हणोनि वाचा। नामस्मरणीं तूं लावीं सदा।।१३८।। तेणें होऊनि चित्त शुद्ध। पावसी निजात्मज्ञान प्रसिद्ध। ज़ाऊनि सारा तुझा खेद। होईल कल्याण ईशकृपें।।१३९।। इतुकें बोलतां सद्गुरुराय। तेणें धरिले स्वामींचे पाय। म्हणे सद्गुरो तूं मम माय। न सोडीं कधींही चरण तुझे।।१४०।। असो पुढें ज़ो निंदक गृहस्थ। झाला क्षणेंचि परमभक्त। कैसी महिमा परम अद्भुत। पांडुरंगाश्रम-गुरूंची।।१४१।। पहा कैसे करुणासागर। ओळले कैसे त्या गृहस्थावर। निंदक वंदक सकल नर। सारे समान गुरुराया।।१४२।। असो आणिक सांगूं पुढती। महिमा अद्भुत कैसी काय ती। वर्णूं सद्गुण परम प्रीतीं। पुढील अध्यायीं पहा हो।।१४३।। आनंदाश्रम परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें द्विचत्वारिंश-। अध्याय गुरुदासें संपविला।।१४४।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां पापें ज़ळती समग्र। द्विचत्वारिंशाध्याय रसाळ हा।।१४५।। अध्याय ४२।। ओंव्या १४५।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।।इति द्विचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः।।

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमत्पांडुरंगाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जया जी श्रीगुरुराया। काय स्वरूप तुझें हें सदया। कल्पनाचि न करवे बुद्धीसी या। ऐसें प्रेमळ रूप तुझें।।१।। इतुकें प्रेम लागाया भक्तां। काय कारण श्रीगुरुनाथा। तूंचि सांगें मज़ला ताता। भक्तवत्सला कृपाघना।।२।। सगुण स्वरूप बघतां प्रेम। उपज़े तरी जगीं परम। सुंदर गौरवर्ण उत्तम। असती अनेक जन बापा।।३।। सद्गुण बघोनि म्हणतां ज़री। ते न दिसती बाहेरी। परि मूर्ति बघतांचि अंतरीं। भरे प्रेम अनिवार।।४।। बरें स्वरूप बघतांचि साजिरें। कवण्या ठायीं म्हणावें 'बरें'। नासिका कर्ण कीं नयन हें सारें। यामाजीं सुरेख काय असे।।५।। सकळ मिळोनि एक वदन। कवणा सुंदर म्हणावें आपण। हेंचि न कळे मज़लागोन। यास्तव साकार हें लटकेंचि।।६।। गुण बघतां नानाविध। तेही सत्य नव्हती हें प्रसिद्ध। परि देवा होय आनंद। तुझी मूर्ति आठवितां।।७।। साधु-संत बोलती वचन। सद्गुरूसी भज़ावें आपण। तेचि चुकविती जन्म-मरण। पोहोंच़विती मोक्षासी।।८।। परि देवा विचार करितां। तुझें प्रेमचि मोक्ष तत्त्वतां। तुज़वांच़ोनि श्रेष्ठ तें ताता। नसे कांहीं अणुमात्र।।९।। रूप गुण विद्या सर्वही। तव चरणींच़ असती पाहीं। नाना कुतर्क घेतले तरीही। तूं श्रेष्ठ हें सिद्ध होय।।१०।। श्रेष्ठ कनिष्ठ कांहीं एक। म्हणाया तुज़ला वाव ना देख। पहा कैसें तें निश्चयात्मक। सांगतों परि हंसूं नको।।११।। श्रेष्ठ ज़री म्हणूं तुज़सी। भक्तांपुढें तूं कनिष्ठ होसी। कारण त्यांच्या कार्यांसी। झटसी लाज़ सोडूनियां।।१२।। ज़री कनिष्ठ म्हणूं तुज़सी। तरी सर्वांच़ा मालक अससी। वरिष्ठही भज़ती बहुवसी। डौल सारूनि एकीकडे।।१३।। वांकविती मान आपुली तुज़पुढें।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

प्रार्थना करिती येतां सांकडें। तुज़ला पाहतां होती वेडे। कांहीं नावडे तुज़वीण।।१४।। तेव्हां कनिष्ठ म्हणतां तूंतें। कैसें शोभेल सांगा मातें। एकचि दिसे मज़ला खरें तें। बोलतों देवा प्रेमभरें।।१५।। कवणही नसे बोलाया वाट। तुझी इच्छाच़ ही एक श्रेष्ठ। इच्छेसरिसें होय तें उत्कृष्ट। ज़ें ज़ें करिसी तें देवा।।१६।। म्हणोनि तुझी भक्ति करितां। कवणही न उरे चिंता। मग कैंच़ें भय त्या भक्ता। तव कृपें हो दयाळा।।१७।। असो आतां श्रोते हो सज्जन। मागील अध्यायीं केलें निरूपण। मंगेशभट्ट-राधेच़ें लग्न। आशीर्वादें झालें पैं।।१८।। आणि मंगळूर-ग्रामींच़ा गृहस्थ। यासी दाविलें स्वामींनीं त्वरित। आपण होऊनि साक्षात् दत्त। ऐशी कथा वर्णियेली।।१९।। आणिक बोलूं त्यांच़ें महिमान। तुम्ही श्रोते सावधान। परिसा मूर्ति मानसीं धरोन। तेव्हां येईल दुडदुडां ती।।२०।। श्रीसद्गुरु-पांडुरंगाश्रम। यांनीं च़ालविलें साम्राज्य परम। बावन्न वर्षें वरी उत्तम। अधिकचि होय यांच़ें पैं।।२१।। परमतीव्र वैराग्य यांच़ें। धर्मरक्षण करिती साच़ें। जनां सांगती स्वधर्माच़ें। आचरण कदापि सोडूं नका।।२२।। धर्मकार्यीं झिज़विला देह। परम कडक वृत्ति निःस्पृह। नाहीं अंगीं ममता मोह। सांगती निक्षुनी धर्म जनां।।२३।। शिखेवीण कोणी येतां नर। च़ोपुनी सांगती त्यासी विचार। न धरिती भीड अणुमात्र। जनांमाजीं पहा हो।।२४।। निंदो अथवा वंदो कुणी। न धरिती अणुमात्रही मनीं। जगाच़ें कल्याण एकचि झणीं। व्हावें हें अंतरीं सर्वदा।।२५।। ज़ो हें समज़े मानसीं भक्त। त्याच़ें कल्याण होय निश्चित। अज्ञपणें निंदित त्यांप्रत। नशीबचि त्याच़ें म्हणावें पैं।।२६।। खरे ज़े असती साधु-संत। सदा जनांच़ें कल्याण इच्छित। नाहीं कवणाच़ें भय त्यांप्रत। मायबापचि ज़ाणा ते।।२७।।

मायबापांसी आपुल्या मुलांचें। चोपुनी सांगाया भय तें कैंचें। उद्धट वर्तन करितां साचें। करिती शिक्षा तात्काळ।।२८।। तद्वत् आमुचे मठाधीश। स्वामी मायबापचि आम्हांस। स्वधर्मरक्षक म्हणोनि तयांस। अधर्म नावडे अणुमात्र।।२९।। ज़री करिती अधर्म स्वजन। कळवळे सद्गुरुस्वामींचें मन। झिज़विती देह रात्रंदिन। स्वधर्म-रक्षणास्तव ज़ाणा।।३०।। जनांचें हित व्हावें ऐसा। एकचि हेतु त्यांचा परियेसा। म्हणोनि कोपही दाविती खासा। जनांलागीं ते पाहीं।।३१।। यावरी येईल सहज़ प्रश्न। स्वधर्में वागतां हित तें कवण। तरी परिसावें सावधान। श्रोते सज्जन हो तुम्ही।।३२।। हें जग सारें नश्वर। सर्वही ज़ाणती श्रेष्ठ नर। कीं व्यवहारीं आपण बोलतों चतुर। काय भरंवसा देहाचा।।३३।। परि वरिवरी बोलती ते शब्द। नाहीं अंतरीं अणुमात्र खेद। कीं मी घ्यावा निज-आनंद। ऐसा अनुताप ना पोटीं।।३४।। ऐसें व्हावया काय कारण। जग सारें भासे खरें म्हणोन। घडे हातुनी यथेष्ट आचरण। विषयलालसा असल्यामुळें।।३५।। ज़री ना घातले स्वामींनीं नियम। वाढे बहुतचि आमुचा काम। न ये क्षणभरी मुखांतुनी 'राम'। रमोनि ज़ाय मन विषयीं।।३६।। विषयीं गर्क होतां निश्चयें। इहपरासी मुकतो तो स्वयें। मग कैंचें समाधान मनासी ये। फिरे नाना योनी तो।।३७।। एकदां गेला मनुष्यदेह। पुनरपि न मिळे तो लवलाहें। यांत नाहीं अणुमात्र संदेह। म्हणोनि नच तो दवडावा।।३८।। तेवीं येचि जन्मीं आपण। चुकवावें आपुलें जन्म-मरण। विषयीं न ज़ावें बुडोन। तरीच लाभे मोक्ष तया।।३९।। जीवा सहज़चि विषयीं ममता। त्याचा त्याग न करवे चित्ता। सारा जन्म त्यांतचि तत्त्वतां। घालितों आपण दिनरजनीं।।४०।। म्हणोनि

सद्गुरुस्वामी आम्हांसी। स्वधर्माचे नियम ते बहुवसी। घालुनी देती प्रेमासरशीं। आपणही वर्तती तैसेचि।।४१।। नियमें विषयलालसा ज़ात। हें विदितचि असे सकलांप्रत। तरीही विवरूं आतां किंचित। लक्ष देऊनि अवधारा।।४२।। ज़री असे लहान बाळ। तेंही नियमें विषय सकळ। त्यागाया सिद्ध होय ते वेळ। परम प्रीतीनें हो ज़ाणा।।४३।। सणावारीं करिती पक्कान्न। नानाविध सारे जन। देवासि नैवेद्य केल्यावीण। न खाती अनेक जन पाहीं।।४४।। बाळ मागतां सांगे माता। देवाचा नैवेद्य न होतां। तुज़ द्यावया न होय सर्वथा। म्हणोनि नाहीं देत कधीं।।४५।। ऐसें करितां पुढें त्या बाळा। आवरूनि घ्यावया मन ते वेळां। सहज़चि होय नियमें त्याला। क्षणभरी तरी निश्चयें।।४६।। तें म्हणे ''आई नैवेद्य करोनि। मग देईल मज़लागोनि।'' तोंवरी मन आवरोनि। धरी तें अज्ञ बालक।।४७।। इतुके तरी तीन तास। विषयलालसा सोडी खास। अज्ञ बालक ज़री तें बहुवस। नियमेंचि सोडी विषयसुखा।।४८।। तेव्हां आम्हां कैसें न होय। नियम पाळितां सोडाया विषय। म्हणूनीच सांगती स्वामिराय। स्वधर्मनियम पाळाया।।४९।। स्नानसंध्या केल्यावीण। ब्राह्मणें जेवूं नये आपण। ऐसें वेदशास्त्रवचन। सांगती समज़ा गुरुराय।।५०।। पाळितांचि तितुके नियम। मन आवराया मार्ग सुगम। तैसेच आणिक नाना धर्म। करावे लागती आपुल्यासी।।५१।। तेणेंकरोनि मनासी बंधन। बंधनें विषयीं न ज़ाय मन। मग सहज़चि पाप-क्षालन। होय निश्चयें जनांचें।।५२।। पापनाश होतां सत्वरी। चित्त शुद्ध होय निर्धारीं। चित्त शुद्ध झालियावरी। आत्मज्ञान होय झणीं।।५३।। याचिकारणें स्वामिराय। करिती जनांसी बोध सदय। स्वधर्में राहाटतां नाहीं

भय। ऐसें गर्जती प्रेमभरें।।५४।। त्यांचा अवतार याचिकारणें। जगाचें कल्याण होईल जेणें। तेंचि करिती परमप्रीतीनें। आम्हां अज्ञांस्तव ते ज़ाणा।।५५।। त्यांनीं ज़री स्वधर्मबंधन। नाहीं घातलें तरी हें मन। विषयीं बुडोनि रात्रंदिन। ज़ातील अधःपाता जन सारे।।५६।। म्हणोनि स्वामी श्रीगुरूंसी। लागली चिंता काय करूं ऐसी। पार घालूं कैसें अज्ञांसी। भक्तां अभक्तां सकळां हो।।५७।। म्हणोनि घडिघडी करिती बोध। जनांसि आपुल्या नानाविध। म्हणती नका होऊं मोहांध। नका ज़ाऊं आडमार्गें।।५८।। सोडूं नका स्वधर्म सारा। जितुका होय तितुकाचि करा। कष्ट न लागती कदापि हो नरा। स्वधर्मरक्षण करण्यातें।।५९।। परधर्म भयदायक। स्वधर्म तो सर्वां रक्षक। सोडूं नये आपुला सुरेख। कधींकाळीं निश्चयेंसीं।।६०।। ज़री वाटे परधर्में सुख। तरी नव्हे, दुःखचि देख। ऐसा चित्तीं करावा विवेक। रात्रंदिन मानवांनीं।।६१।। स्वधर्में वर्ततां ज़ें होय सुख। अन्यधर्में तें न होय देख। परधर्म हा क्लेशकारक। कैसें तें पहा सांगूं पैं।।६२।। पहा कैसें स्वधर्में वर्ततां। नाहीं भय कवणाचें तत्त्वतां। अधर्म कराया प्रवर्ततां। लपवुनी करावा लागे तो।।६३।। समज़ा एकानें अधर्म करितां। त्याचा मित्र येई अवचिता। तेव्हां आला ऐसें ऐकतां। दचकुनी उठे लगबगें तो।।६४।। त्यासी कळली कीं माझी करणी। ऐसी भीति वाटे त्याच्या मनीं। एवं भीति अधर्मालागुनी। कवणही असो तें कार्य।।६५।। धर्मापरी वर्ततां आपण। नाहीं कोणतेंही भय त्यालागून। परधर्म आणि अधर्म गहन। बहुतचि भय कीं त्यामाजीं।।६६।। तैसें तें भय, हेंचि अतिशय। ओझें डोईं आपुल्या होय। तें उतरावया श्रीगुरुमाय। येत आपुली प्रेमानें।।६७।। एकदां सारें उतरलें तेव्हां। आणिक पुनरपि भार न घ्यावा। करूं नये तो

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

आपण कां करावा। अधर्म ज़ाणा हो तुम्ही।।६८।। ज़ो असे आपुला धर्म। तोच़ श्रेष्ठ आम्हांसी परम। म्हणोनि सद्गुरु ते गुणग्राम। बोधिती उत्तम सकलांसी।।६९।। कष्ट सोसुनी आपण सकल। कंठशोष करिती वेल्हाळ। परि ना आम्हां जनांसी तळमळ। घालितों गोंधळ अधिकचि।।७०।। असो आपुला स्वधर्म थोर। पाळितां आपुलें मन हें सत्वर। त्यागुनी विषयसुखासी निर्धार। पावें निजसुखासी तात्काळ।।७१।। वरी कथिल्यापरी मन हें। स्वधर्मनियमें बांधिलें पाहें। विषयांपासुनी दूर राहे। क्षणभरी तरी निश्चयेंसीं।।७२।। कीं ब्राह्मणें अमुक न करावें। करावें अमुक ऐसेंचि बरवें। स्त्री-पुरुषें-गृहस्थें-विधवें। चातुर्वर्णां स्वधर्म श्रेष्ठ असे।।७३।। ऐशिया स्वधर्माच़ें बंधन। वेदशास्त्रीं केलें कथन। तेंचि सांगती कृपा करोन। लटिकें न सांगती अणुमात्र।।७४।। ऐसें बंधन ज़री न केलें। भलतेंचि आचरण घडेल ये वेळे। मानवांकडोनि म्हणोनि नेमिलें। वेदशास्त्रें बंधन पैं।।७५।। तेंचि सांगती सद्गुरु सघन। परि नायकतों आम्ही त्यांच़ें वचन। म्हणोनि खेद झ़ाला उत्पन्न। श्रीपांडुरंगाश्रमस्वामींसी।।७६।। कीं नायकती आपुलें वचन। तरी पुढती यां गति कवण। कैसी बुद्धि यांची म्हणोन। त्रासती अंतरीं बहुतचि।।७७।। दाविली वाट ती सोडोनी। अन्यचि धरिली असे जनांनीं। तेव्हां वाटे अंतःकरणीं। कैसे तरुनी ज़ातील हे।।७८।। स्वधर्माची होतां हानी। उरली नाहीं आणिक करणी। तोचि भवनदीसी सेतू असुनी। तेणेंचि होय ज्ञान पैं।।७९।। स्वधर्म हाचि सेतू तोडितां।कैसें ज़ावें पार तत्त्वतां। म्हणोनि जनांची लागली चिंता। श्रीस्वामींसी अनिवार।।८०।। कीं आतां आमुच्या वृद्धापकाळीं। परधर्म शिकले जन ये वेळीं। कैसें साहूं देखतां डोळीं। म्हणोनि हळहळती मानसीं।।८१।।

असो ऐसें असतां पाहीं। एकेकाळीं प्रार्थिती सर्वही। अहो देवा श्रीगुरुमाई। भक्तवत्सले करुणाळे।।८२।। आतां करावा शिष्य-स्वीकार। ऐशी कृपा करावी आम्हांवर। यावरी स्वामी नेदिती उत्तर। संमतीचें लोकांसी।।८३।। तेव्हां भक्त करतील काय। मानसीं परम खेद होय। कधीं करतील शिष्य गुरुवर्य। ऐसा ध्यास धरिला जनीं।।८४।। मग गेले कांहीं दिवस। शके अठराशें छत्तीस।यावेळीं श्रीस्वामींस। अवचित आज़ार झ़ाला पैं।।८५।। ज्वर येई सदा त्यांसी। क्षीण झ़ाले तेव्हां बहुवसी। वार्ता पसरली देशोदेशीं। आमुच्या जनामाझ़ारीं।।८६।। तेव्हां रावबहादुर येन्नेमिडी। व्यंकटराव आला तांतडीं। आणि बैंदूर नारायण आवडीं। आला धांवत शिरालीसी।।८७।। तेवीं चिक्रमने भवानीशंकर। आणिक प्रमुख बहुत नर। आले धांवत चित्रापुर-। स्थानीं बहुत चिंतेनें।।८८।। ज़ाऊनि स्वामीसंनिधीं। प्रार्थना केली परमावधी। काय ती सांगतों ऐका आधीं। सद्गुरुचरणां स्मरोनि।।८९।। म्हणती देवा सद्गुरुराया। आतां शिष्य-स्वीकार सदया। करावा कृपा करोनियां। आमुच्यास्तव तुम्ही हो।।९०।। सद्गुरु नसतां जगीं आम्ही। राहावें कैसें सांगा स्वामी। कोण दावील मार्ग हा नेहमीं। गुरुवीण नाहीं गति अन्य।।९१।। सद्गुरु नसतां मठामाजीं। काय शोभा येईल गुरुजी। म्हणोनि आमुची विनंती आजि। करावी मान्य हो देवा।।९२।। देउळासि नसतां कळस। कवणही न म्हणे देऊळ त्यास। तैसें मठामाजीं बघतां खास। सद्गुरु नसतां मठ नव्हे।।९३।। ज़री मठीं असती अनेक जन। तरी स्वामीविण दिसे शून्य। म्हणोनि कवणही न धरितां अनुमान। शिष्य-स्वीकार करावा।।९४।। आधींच़ धर्मग्लानि होय। सद्गुरु नसतां गति काय। आम्हां अज्ञांसी कोण सदय। शिकवील

गहन स्वधर्म खरा।।९५।। कोण सांगेल सद्विचार। पुढें कोण गति होय साचार। आणिक नाहीं आधार। गुरुवीण जगतीं अन्य पहा।।९६।। जगीं नाना संकटें येती। तेव्हां धांवुनी येतों मठाप्रति। निवारील कवण सांगा तीं। गुरुवांचोनि दयाघना।।९७।। सारें तुज़ला असे विदित। प्रार्थावें नलगे देवा तुज़प्रत। आमुचा सारा हेतु तूं खचित। ज़ाणसी तेव्हां काय वदों।।९८।। ऐशियापरी करोनि प्रार्थना। साष्टांग प्रणिपात घातला चरणा। तेव्हां बोले श्रीगुरुराणा। काय म्हणोनि तें परिसा।।९९।। गृहस्थ जनांचें बघतां वर्तन। आमुचें मन होय अति उद्विग्न। तेव्हां शिष्य-स्वीकार न करूं पूर्ण। निश्चय आमुचा झाला असे।।१००।। ऐसें ऐकतां सद्गुरुवचन। जनांचें होय म्लान वदन। खिन्न ज़ाहलें अंतःकरण। परि बोलाया धैर्य नसे।।१०१।। मग सारे मिळोनि जन। सर्व-समाधींसंनिध ज़ाऊन। तेवींच भवानीशंकर देवासी भेटोन। प्रार्थना करिती त्यासमयीं।।१०२।। सेवाही करविली त्यांनीं बहुत। कीं शिष्य-स्वीकार करावा त्वरित। ऐसी प्रेरणा होवो स्वामींप्रत। यापरी जनांनीं प्रार्थिलें।।१०३।। इतुकें ज़री प्रार्थिलें जनांनीं। तरी उदासीनचि ते अंतःकरणीं। ऐसे निष्ठुर कां झाले म्हणोनि। कुणीही पुसतील तरी ऐका।।१०४।। सद्गुरु खचितचि असती दयाळ। कठोर नव्हती, असती कोमळ। परि पाहिली परीक्षा सकळ। भक्तजनांची तेधवां।।१०५।। वरूनि दाखविला कोप बहुत। बघाया जनांचा भावार्थ। न करूं म्हणती शिष्य निश्चित। ऐसा हट्ट धरियेला।।१०६।। ज़री असती मुलें चतुर। माता बोले चुकतां अणुमात्र। म्हणे तूं अससी खचितचि खर। काय कारणें तें ऐका।।१०७।। असे ज़री परम चतुर। किंचित चुकतां वारंवार। ज़री न कथिलें तरी पुढें

तो कुमार। चूकचि करील निर्धारें।।१०८।। म्हणोनि बोलती मातापिता। शहाणा अधिकचि व्हावें तत्त्वतां। ऐसी धरोनियां ममता। प्रेमेंच बोलती त्यालागीं।।१०९।। तद्वत् आमुचे स्वामी कृपाघन। बोलिले कीं जनांचें वर्तन। बघुनी न होत समाधान। म्हणोनि शिष्य न करूं।।११०।। परि अनेक जनांचें प्रेम बघोन। आनंदें उचंबळें त्यांचें मन । अधिकार वाढवावयालागून। दाविला कोप वरकरणी।।१११।। ज्याच्या अंगीं खरी भक्ति। तो न ढळे कदापि अंतीं। ज़री स्वामी अत्यंत क्षोभती । तरी प्रेमचि वाढे अनिवार।।११२।। म्हणोनि भक्तांचें प्रेम अधिक। वाढवावें निश्चयात्मक। इतुकाच त्यांचा हेतु देख। म्हणुनीच ओळले नाहीं ते।।११३।। म्हणती मानसीं लागो ध्यास। सद्गुरु असावा ऐसा विश्वास। दृढ होतां शिष्य करितां खास। न ढळे प्रेम कदापिही।।११४।। आमुच्या कोंकणीमाजीं एक। म्हण असे परम सुरेख।'घ'म्हणतांक्षणींच देख। 'घप्प' करूं नये कधीं।।११५।। ऐशा म्हणीपरी करितां कार्य। तें बरवें कदापि न होय। म्हणोनि कोणतेंही असो कार्य। सावकाश विचारें करावें।।११६।। बालका चांगली क्षुधा न लागतां। वाढी अन्न त्यासी माता। भुकेल्यावीण मुखीं घालतां। थुंकोनि टाकी तो ग्रास।।११७।। ज्यासी खरी लागली भूक। अन्न दे म्हणोनि मातेसन्मुख। लगबगें धांवे जेवी तात्काळिक। अन्न सारें तें बाळ।।११८।। म्हणोनि माता काय करी। मुलाची भूक समजुनी निर्धारीं। ताट वाढी नानापरी। मग तें धांवे जेवावया।।११९।। तद्वत् सद्गुरु-श्रीस्वामींनीं। जनांचें प्रेम वाढावें अजुनी। ऐशा उद्देशें आग्रह धरुनी। नको शिष्य ऐसें सांगितलें।।१२०।। गुरुप्रेमाची लागतां भूक। शिष्य करतां होय सुख। कीं प्रेमासरशीं धांवती सकळिक। श्रीसद्गुरूच्या संनिधीं।।१२१।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

ज़ेवीं हातींचा खेळ सोडुनी बाळ। भूक लागतां मातेज़वळ। धांवे दुडदुडां ते वेळ। जेवूं घाल म्हणोनियां।।१२२।। यास्तव माता काय करी। भुकेल्यावीण न देई निर्धारीं। ज़री मागाया आलें तरी। नेदी सर्वथा ती पाहीं।।१२३।। म्हणे वृथाचि देऊं कासया। भूक ना तुज़ टाकिशील वायां। भूक लागतां आपण होऊनियां। देई ती जेवाया प्रेमानें।।१२४।। तैसें स्वामिरायें येथ केलें। कीं प्रेमाची भूक लागतां ते वेळे। शिष्य करितां स्वीकारिती निजबळें। आनंदानें गृहस्थ पैं।।१२५।। भुकेला अन्न कोण दवडी। तैसी गुरुप्रेमाची ज्यासी गोडी। तो कदापि चरण न सोडी। श्रीसद्गुरूंचे पहा हो।।१२६।। यावरी करितील श्रोते प्रश्न। अन्नाची उपमा सद्गुरूलागून। कैसी शोभे सांगा वचन। तरी अवधारा उत्तर तें।।१२७।। सद्गुरु म्हणिजे मुख्य जीवित। तेणेंच होय समाधान प्राप्त। अन्नानें कैसी भूक शमत। तेणेंचि वांचत देह खरा।।१२८।। तैसें येथें सद्गुरुराज। तेंचि आमुचें जीवन आज़। त्यावीण न होय समाधान सहज़। अन्य मार्ग न दूसरा।।१२९।। पहा देहासी नाना उपचार। वस्त्रें भूषणें लेववी सुंदर। परि अन्नाविण न ज़गे साचार। कोणीही प्राणी या जगीं।।१३०।। ज्या ज्या प्राण्यासी ज़ो ज़ो आहार। तो तो त्यासी अन्नचि साचार। मनुष्यांमाजींही नाना प्रकार। असती अन्नाचे पहा हो।।१३१।। गहूं ज्वारी तांदुळादि अनेक। संवयीपरी खाती देख। परि त्यांचें तेंचि सुरेख। अन्न ज़ाणा हो निर्धारें।।१३२।। असो एवं अन्नावांचुनी। न ज़गे कदापि कोणी प्राणी।तैसें श्रीसद्गुरुवांचोनि। न पावे कोणी निजात्मज्ञान।।१३३।। म्हणोनि सद्गुरु हेंचि जीवन। व्हावया पूर्ण निजात्मज्ञान। तेचि नेती हळूहळू करोन। अनेक मार्गीं भक्तांसी।।१३४।। म्हणोनि सद्गुरु नसतां जगांत।

भक्त भुकेनें व्याकुळ होत। तेवींच जगीं साधुसंत। अवतरती जगाच्या कल्याणा।।१३५।। एक ज़ातां निजधामासी। दुज़ा तयार ठेविती त्या ज़ागेसी। तेवींच कळवळती निजमानसीं। स्वामी पांडुरंगाश्रम आपुले।।१३६।। परि बघावया भाव भक्तांचा। शिष्य न करूं म्हणती साचा। वरील उपमेपरी व्हावा प्रेमाचा। सुकाळ अनिवार सकळ जनीं।।१३७।। अर्थात् प्रेमाची लागावी बहुत। क्षुधा निश्चयें निजभक्तांप्रत। म्हणोनि करोनि स्वस्थ चित्त। राहिले ज़ाणा गुरुराय।।१३८।। प्रेम वाढो बलवत्तर। करूं तेव्हां शिष्य-स्वीकार। कैसी गति होय जगामाझार। ऐसें हळहळोत भक्त मनीं।।१३९।। त्यांचा अवतार म्हणजे जगाचें कल्याण। अंगीं असोनि त्रिकाळ-ज्ञान। शिष्य-स्वीकार न करिती आपण। ऐसें सहज़ न घडेचि।।१४०।। एवं सद्गुरु दयाघन। साक्षात् परमात्मस्वरूपचि पूर्ण। जगाच्या कल्याणा अवतरोन। करी उद्धार जनांचा।।१४१।। देह रक्षाया निर्मिलें धान्य। तेवींच व्हावया स्वरूपज्ञान। अवतरोनि स्वयें आपण। समाधान करी भक्तांचें।।१४२।। धन धान्य सारी संपत्ति। चराचर देव मानव जगतीं। आपणचि नटला जगत्पति। साऱ्या ब्रह्मांडीं हो ज़ाणा।।१४३।। म्हणोनि वरील उपमेमाजीं। अन्न माता सारें गुरुजी। यांसी घेतलें बोलतां सहजीं। चूक न माना श्रोते हो।।१४४।। इतुकें मात्र नव्हे ऐका। श्रीगुरूसी उपमाचि न देखा। कवणही दिल्या उपमेसारिखा। दिसे योग्य गुरुराय।।१४५।। ऐसा आमुचा सद्गुरुनाथ। काय सांगूं त्याची मात। केवळ परब्रह्मचि असे निश्चित। नाहीं संशय यामाजीं।।१४६।। सद्गुरु हाचि निश्चयें मोक्ष। त्यावीण नाहीं आणिक विशेष। आनंद कवणही त्रिभुवनीं खास। सत्य सत्य त्रिवाचा।।१४७।। असो इकडे

भक्तजन। गेले आपुल्या ग्रामालागुन। तळमळती मानसीं रात्रंदिन। स्वामी पाहिजे म्हणोनियां।।१४८।। पुढील अध्यायीं बोलूं सारें। शिष्य-स्वीकार करितील त्वरें। हेंचि कथन करूं विस्तारें। सद्गुरुकृपाप्रसादेंचि।।१४९।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें त्रिचत्वारिंश-। अध्याय गुरुदासें संपविला।।१५०।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां पापें ज़ळती समग्र। त्रिचत्वारिंशाध्याय रसाळ हा।।१५१।। अध्याय ४३।। ओंव्या १५१।। ॐ तत्सत्- श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति त्रिचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः।।

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमत्पांडुरंगाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय सद्गुरो करुणाकरा। तुज़ला पाहतां सामोरा। आणिक न दिसे अन्य पसारा। ऐसी मूर्ति तव देवा।।१।। तरी एक असे आक्षेप। कीं ध्यातां तुझें सुंदर स्वरूप। कवणही न ये आमुच्या समीप। तूंचि एक दिससी पैं।।२।। तुज़वांच़ोनि अन्य नसतां। मीं-तूंपणा कैसा ये ताता। मीं-तूंपणाविण सर्वथा। प्रेम कैंच़ें उद्भवे तें।।३।। जगीं ज़री नसे द्वैत। तरी कैंच़ें प्रेम होय उपस्थित। कैंच़ा मानसीं भगवंत। येईल ध्यानीं आमुच्या बा।।४।। एका गृहीं एक पुरुष। बैसला तेव्हां मन उदास। दुज़ा येतां होय हरुष। त्या पुरुषासी तत्काळ।।५।। दुज़ा येतां प्रेम उपज़े। म्हणोनि मनासि हरुष होईज़े। एवं द्वैतेंचि प्रेम हें साज़े। हें सिद्ध होय निर्धारें।।६।। तैसें तुझ्या मूर्तिदर्शनें। मानसीं अथवा प्रत्यक्षपणें। प्रेम उद्भवे निश्चयें तेणें। एवं द्वैतेंचि प्रेम भरे।।७।। द्वैतावांचुनी नुद्भवे प्रेम। प्रेमाच़ा तो कोठुनी उगम। तुझ्या स्वरूपाची गोडी परम। कारण यासी अन्य नसे।।८।। स्वरूपीं नाहीं निश्चयें द्वैत। प्रेम हें तेथूनि उत्पन्न होत। तेव्हां वाटे प्रेम अद्भुत। द्वैत कीं अद्वैत न कळे हें।।९।। अद्वैत ज़री म्हणूं ज़ातां। तुज़वीण प्रेम नुपज़े चित्ता। तुझी प्रेमळ मूर्ति बघतां। आनंद होय अनिवार।।१०।। ज़री द्वैत म्हणावें तरी। तुझी मूर्ति ध्यातां अंतरीं। प्रेम उपज़ोनि होय सत्वरी। वृत्ति लीन तव चरणीं ।।११।। मग कैंच़ा द्वैतभेद। गुरुशिष्य-भाव प्रसिद्ध। केवळ एक ब्रह्मानंद। ऐसा सद्गुरु तूं माझा।।१२।। खोल विचार केलिया देवा। आक्षेपही झडोनि ज़ावा। ऐसा सद्गुरुकृपेच़ा ठेवा। कुणीं विसरावा सांगें बा।।१३।। आधीं धराया मूर्ति सगुण। द्वैतावीण न होय ज़ाण।

कीं माझी सद्गुरुमाउली म्हणोन। उद्धवे आनंद तो पाहीं।।१४।। तुझें माझें प्रेम एक। होतांक्षणीं निश्चयात्मक। आनंद प्रगटे त्यांतुनी देख। तेंचि निजरूप बा पाहीं।।१५।। तेव्हां कैंचा उरे भेद। एकचि ब्रह्म सहज़ सिद्ध। तुज़वांचोनि जग ना द्विविध। हाचि निर्णय दावियला।।१६।। म्हणोनि देवा तव प्रेमासी। कैसें वर्णावें न कळे मज़सी। साऱ्या प्रेमाचा तूंचि होसी। उगमस्थान कृपाघना।।१७।। उगम म्हणतां श्रोते हो सज्जन। तुम्ही कराल भला प्रश्न। अमुक नदीचें उगमस्थान। अमुकचि देशीं असे पैं।।१८।। तैसे सद्गुरु-स्वामी आमुचे। एकदेशी असती कीं साचे। ऐसा प्रश्न करितां वाचे। देऊं उत्तर गुरुकृपेंचि।।१९।। श्रीसद्गुरुनाथ हे आपुले। प्रेमाचें उगमस्थान तें भलें। साऱ्या ब्रह्मांडीं संचरलें। व्यापक आकाशसम एक।।२०।। देश-काल-वस्तुपरिच्छेद। सजातीय-विजातीय स्वगतभेद। नाहीं अणुमात्र भेद त्रिविध। असे सर्वत्र व्यापक।।२१।। 'उगम' ही न शोभे उपमा। परि काय हो सांगूं तुम्हां। गुरुप्रेमासी नसे हो सीमा। अमुक ऐसी कांहीं एक।।२२।। नाहीं त्यासी विधि-निषेध। न होय ठेवाया त्यासी शब्द। ऐसा सद्गुरुप्रेमाचा आनंद। असे विदितचि गुरुभक्तां।।२३।। पुनरपि येथें सांगावें नलगे। परि प्रेमचि बोलवी काय करूं सांगें। बोलिल्यावीण न राहे उगें। मन आमुचें तव प्रेमें।।२४।। असो आतां क्षमा करावी। सद्गुरु आमुचे महालाघवी। ऐका आणिक कथा बरवी। तुम्ही सज्जन श्रोते हो।।२५।। मागील अध्यायीं निरूपण। श्रीस्वामी सद्गुरु सघन। यांसी प्रार्थना केली ज़ाण। भक्तजनांनीं शिष्य कराया।।२६।। परि न केली प्रार्थना मान्य। तेव्हां विन्मुख होउनी ते जन। गेले आपुल्या ग्रामालागोन। करीत ध्यान स्वामींचें।।२७।।

कधीं करितील शिष्य-स्वीकार। कां न करिती ऐसा विचार। करोनि होती चिंतातुर। निजमानसीं भक्तजन।।२८।। इकडे शिरालीमाजीं ऐका। बैंदूर नारायण तो देखा। ध्यास लागला त्यासी निका। करी प्रार्थना दिनरजनीं।।२९।। म्हणे मानसीं सद्गुरुनाथा। ज़री झ़ाला अपराध आतां। तरी क्षमा करोनियां ताता। करावा शिष्य-स्वीकार झ़णीं।।३०।। देईं धीर आम्हां दयाळा। इतुके निष्ठुर कां हो झ़ालां। त्यागितां तूं ज़ाऊं कुणाला। शरण देवा सांग मज़।।३१।। कां तूं लाविलें आम्हां वेड। दाविले कां चरण गोड। तरी पुरवीं आतां कोड। सांगतों उघड तुज़लागीं।।३२।। तुझ़ें प्रेम लागतां पाठीं। कैसें धिक्कारूं उठाउठी। तूंचि घातली इतुकी मोठी। प्रेमाची गांठी हो पाहीं।।३३।। ज़री न केला शिष्य-स्वीकार। पुढें सुटेल गांठी प्रेमाची सत्वर। वारंवार बोधिल्यावीण निर्धार। न होय घट्ट ती पाहीं।।३४।। आमुची गोष्ट असो आतां। साऱ्या आमुच्या सारस्वतां। कैसें कळेल सद्गुरु नसतां। स्वधर्म थोर अनिवार।।३५।। लोकांमाजीं नसतां राजा। धुंद होईल सारी प्रजा। एकमेकां मारुनी मौज़। करितील जन निर्भयेंचि।।३६।। तैसें येथें नसतां गुरुराज। सारा अधर्मचि माज़ेल सहज़। हें सारें असुनी विदित बा तुज़। कासया कृपा न करिसी।।३७।। असो आतां बहुत कासया। बोलावें मी अज्ञ असूनियां। तूं ज़ें करिसी तें करीं सदया। भार सारा तुझ्यावरीच़।।३८।। परि केली प्रार्थना तुज़पुढें। तूंचि फेडिसी आमुच़ें सांकडें। म्हणोनि कृपादृष्टी मज़कडे। करीं देवा दयाळुवा।।३९।। ऐसी प्रार्थना केली बहुविध। बैंदूर नारायणें मानसीं शुद्ध। यापरीच़ सर्व भक्तवृंद। करिती प्रार्थना निजमानसीं।।४०।। ज़री केली मानसीं प्रार्थना। कळे हृदयीं त्या दयाघना। परि न दाविती बाहेरी जनां।

कांहीं नेणे ऐसें दाविती।।४१।। असो आतां ऐका सकळ। सद्गुरुस्वामींचें चरित्र प्रेमळ। ऐकतां होय मन निर्मळ। क्षण न लागतां हो पाहीं।।४२।। स्वामी सद्गुरु झाले क्षीण। उपचार करिती सारे जन। ऐसें असतां एके दिन। झाला चमत्कार तो ऐका।।४३।। शिष्य-स्वीकार न करिती म्हणोन। गृहस्थ गेले ग्रामांलागुन। राहिला एक बैंदूर नारायण। कथिलें मागील अध्यायीं।।४४।। मग गेले दोन दिवस। रात्रीं पहुडले जगन्निवास। जागृत राहती जन बहुवस। स्वामी आज़ारी म्हणोनियां।।४५।। कीं स्वामींसी व्यथा होय दारुण। म्हणोनि करिती जन जाग्रण। घड्याळावरी वाज़ले दोन। बैसले स्तब्ध तिष्ठत ते।।४६।। तेव्हां सद्गुरुस्वामीयांसी। स्वप्नीं येऊनि एक संन्यासी। शिष्य-स्वीकार करीं ऐसी। आज्ञा करिती स्वामींतें।।४७।। तेव्हां बोलती निद्रेमाजीं। आमुचे पांडुरंगाश्रम गुरुजी। कोण आले येथें आजि। करा सत्कार अतिथींचा।।४८।। करोनि पादप्रक्षालन। द्यावें झडकरी त्यांसी आसन। कां न करितां येथें असोन। ऐसें बोलिले स्पष्ट पहा।।४९।। तये समयीं नारायण बैंदूर। हेम्माड वीरप्पादि कांहीं नर। ज़ागे बैसले होते, समग्र। ऐकिलें भाषण स्वामींचें।।५०।। तेव्हां कळलें ऐकुनी वचन। कीं स्वामी स्वप्नांत बोलती म्हणोन। हेम्माड वीरप्पा ज़वळी ज़ावोन। प्रार्थना करी ते समयीं।।५१।। म्हणे ''स्वामिन्'' वीरप्पा हेम्माडी। ''आतां रात्र उरली थोडी। आणिक शेष दहा घडी। शयन करावें ये वेळीं''।।५२।। मग पुनरपि वाज़तां चार। निद्रेमाजींच बोलती साचार।''अज़ुनी त्यांचा सत्कार। कां न केला अतिथींचा।।५३।। किती वेळ सांगा त्यांनीं। उभें रहावें'' ऐसें म्हणोनि। बोलिले जनांसी दरडावोनि। बैसले उठोनि तत्काळ।।५४।। आणि हांक मारिली अनुक्रमें। सुब्राय, रामचंद्र,

मंगेश या नामें। बोलविलें त्यांसी ज़वळी प्रेमें। आले सारे तत्काळ।।५५।। संनिध येउनी कर ज़ोडोनि। काय आज्ञा ऐसें म्हणोनि। उभे राहिले पाहत नयनीं। मूर्ति सुंदर त्या समयीं।।५६।। तेव्हां बोलती स्वामिराय। सुब्राया तुम्हीं प्रार्थिलें सविनय। कीं करावा आतां शिष्यवर्य। होईल तें कार्य बघ आतां।।५७।। कारण तैसेंचि कराया आम्हांलागीं। प्रेरणा देवाची झ़ाली वेगीं। सिद्धता त्वरें करा, वाउगी। वेळ दवडूं नका आतांची।।५८।। ऐशी सद्गुरु-आज्ञा होतां।सुब्रायभट नमवी माथा। आनंद झ़ाला त्याचिया चित्ता। बोले अति प्रेमानें तो।।५९।। म्हणे स्वामिन् सद्गुरुनाथा। तुमच़ा हा निश्चय ऐकतां। परम हरुष झ़ाला चित्ता। साऱ्या जनांच्या हो स्वामी।।६०।। यास्तव देवा या चरणांच़े। आणि भवानीशंकर-देवाच़े। आभारी आहों आम्ही साच़े। म्हणोनि घातलें दंडवत।।६१।। तेव्हा म्हणती कवणालागीं। शिष्य करावा हो या जगीं। कळलें नाहीं आम्हांलागीं। कृपा करणें स्वामींनीं।।६२।। यावरी सद्गुरुस्वामी दयाळ। मंगेशभटासी बोलावुनी ज़वळ। म्हणती मंगेशा ये वेळ। देईं पुत्रासी तव पाहीं।।६३।। तुज़ला पुत्र असती तीन। एक देईं आम्हांलागून। शिष्य-स्वीकार करावया ज़ाण। ऐसें बोलिले प्रेमभरें।।६४।। यावरी शुक्लभटजी बोले। सद्गुरुस्वामीसंनिध ते वेळे। मम पुत्रासी द्यावया दयाळे। न होय अनुकूळ मज़लागीं।।६५।। यावरी बोलती सद्गुरुस्वामी। विचार करीं अंतर्यामीं। येरु बोले काय सांगूं मी। सद्गुरुराया दयाळा।।६६।। कवणाही द्यावया मज़सी। न होय अनुकूळ तेजोराशी। ऐकुनी वाटलें जनांसी। कीं विघ्न-पर्वत कोसळला।।६७।। मंगेशभटजी भाविक असोनि। कां न देई पुत्रालागुनी। ऐसे तळमळती गृहस्थ निजमनीं।

प्रार्थिती अंतरी श्रीगुरूसी।।६८।। मंगेशभटजी खचितचि भाविक। हृदय त्यांचें परम सात्त्विक। त्यांच्या सद्गुणांचें सकळिक। पुढें वर्णन येईल।।६९।। असो मग सद्गुरुस्वामी। रामचंद्र-भटजीसी म्हणती, आम्ही। मागतों तव सुतासी या कामीं। शांतमूर्तीसी दे आतां।।७०।। यावरी सुब्रायभटजी आपण। रामचंद्र-भटजींस करिती खूण। तेव्हां तत्काळ हालविली मान। हरिदास रामचंद्र-भटजींनीं।।७१।। म्हणे सद्गुरुस्वामींची आज्ञा। शिरसावंद्य असे कृपाघना। अर्पण करूं आपुल्या चरणा। द्वितीय पुत्र शांतमूर्ति।।७२।। यावरी बोलती सद्गुरुनाथ। आतां सदनीं ज़ाईं त्वरित। विचारीं तव कांतेप्रत। कीं संमती काय असे।।७३।। आज्ञेपरी गेला गृहासी। म्हणे तेव्हां निजकांतेसी। सद्गुरु-आज्ञा झाली परियेसीं। शांतमूर्तीसी मागती ते।।७४।। शिष्य-स्वीकार कराया सिद्ध। झाले आतां हाचि आनंद। ऐशा समयीं न होत मतिमंद। देणें योग्य मज़ वाटे।।७५।। ऐसें ऐकतां पतीचें वचन। क्षणभरी ती धरी मौन। मनीं विचार करोनि पूर्ण। बोले ती प्रेमळ पतिलागीं।।७६।। म्हणे इच्छा सद्गुरुस्वामींची। तैशीच ज़री आहे तुमची। नाहीं म्हणाया आम्हां कैंची। प्राज्ञा असे सांगा हो।।७७।। देवाच्या इच्छेवरी आमुची। इच्छा घडेल कैसी साची। कर्ता करविता सर्वही तोचि। काय करील मानव।।७८।। ऐसे तिचे ऐकतां शब्द। जनांसी झाला बहुत आनंद। धांवती लगबगें भक्तवृंद। शांतमूर्तीच्या संनिधीं।।७९।। मग सद्गुरुआज्ञेपरी। शांतमूर्तीची संमती सत्वरी। घ्यावी म्हणोनि ते अवसरीं। गेले शोधाया त्यासी जन।।८०।। शांतमूर्तीसी हें न विदित। तो श्रीकृष्णाच्या देउळांत।बैसला होता पुष्पें निवडीत। नित्यापरी बाळभावें।।८१।। हें कळलें जनांसीं मार्गीं। आले धांवुनी तेथें वेगीं।

आणि सर्व शांतमूर्तिलागीं। बघतचि उभे राहिले।।८२।। म्हणे कायकिणी सुब्रायभटजी। आमुच्या सद्गुरुस्वामींनीं आजि। शिष्यस्वीकार-संमती दिधली, ही ताजी। बातमी सांगाया आलों हो।।८३।।ऐसें ऐकतां शांतमूर्तीचें वदन। हरुषें प्रफुल्लीत झालें पूर्ण। आणि म्हणे निवडिला कवण। शिष्य कराया मज़ सांगा।।८४।। मंगेश-मामाचे पुत्र तीन। यांतील एक करितील म्हणोन। ऐसें वाटतें मज़लागोन। होय कां आतां सांगा तें।।८५।। यावरी बोले सुब्रायभट। तुमचा मामा संमति न देत। म्हणोनि स्वामी सद्गुरुनाथ। यांनीं तुम्हांसीच निवडिलें।।८६।। तेव्हां बोले रामचंद्रतनय। श्रीस्वामी-सद्गुरुराय। यांनीं मज़लाचि निवडिलें काय। स्पष्ट सांगा मज़प्रति।।८७।। इतुकें बोलुनी शांतमूर्ति। विचार करीत बैसले चित्तीं। हातींचें काम ठेवुनी खालती। क्षणभरी तेव्हां स्तब्धपणें।।८८।। मग बोले स्मितमुखेंकरुनी। श्रीसद्गुरुस्वामीरायांनीं। ज़री मज़ला काढिलें निवडोनी। तरी ती आज्ञा मज़ मान्य।।८९।। त्यांची इच्छा तीचि श्रेष्ठ। ते ज़ें करिती तेंचि इष्ट। तेणेंचि हरती सारे कष्ट। जनांचे ज़ाणा लवलाहीं।।९०।। म्हणोनि इच्छा गुरुदेवांची। मज़ला संमत असे साची। नाहीं म्हणाया वाचा कोणाची। समर्थ होईल ती सांगा।।९१।। ऐसें ऐकतां प्रेमळ वचन। सुब्रायभटजी आणि सारे जन। आनंदित झाले पूर्ण। निजमानसीं तेधवां।।९२।। मग सारे गेले धांवुनी। श्रीस्वामीसद्गुरुस्थानीं। सकल वृत्तांत निवेदिला त्यांनीं। श्रीस्वामीसंनिधीसी।।९३।। तेव्हां बोलती स्वामिराय। सुब्रायभटजीप्रति सदय। झणीं सिद्धता करा ये समय। शिष्य-स्वीकार करायाची ।।९४।। ऐसी आज्ञा करितां गुरुवरें। सुब्रायभटजी बोलिले त्वरें। प्रभो स्वामिन्

सांगतों खरें। ये दिनीं मुहूर्त ना बरवा।।९५।। यावरी बोलती सद्गुरुराय। आमुच्या देहाचा भरंवसा काय। देशील कीं तूं आम्हां अभय। सांग तूं बा सत्वरी।।९६।। म्हणोनि आतां करा वेगीं। तयारी शिष्य-स्वीकारालागीं। आतांचि तुम्ही सामुग्री अवघी। करा सिद्ध, उशीर नको।।९७।। मुख्य शेवटील उपदेशकार्य। त्यासी बघोनि मुहूर्तसमय। करूं ते शुभदिनीं निर्भय-। चित्तें, ऐसें आज्ञापिती ।।९८।। हें ऐकतां सद्गुरुवचन। गेले सर्वही न लागतां क्षण। सारी सिद्धता करावया पूर्ण। अति उल्हासें लागले।।९९।। पुढील अध्यायीं हेंचि कथन। करितील शिष्य-स्वीकार दयाघन। स्वामी 'आनंदाश्रम' म्हणोन। होतील प्रसिद्ध सर्वत्र।।१००।। सर्वांसी परिचय असे म्हणोनि। ऐकाया उत्सुक होतील निजमनीं। तैसेंचि माझ्याही अंतरापासूनि। निघेल वर्णन हौसेनें।।१०१।। तेचि करविती सकल कार्य। निमित्तमात्र मी कीं होय। म्हणोनि पाठीसी असतां गुरुवर्य। चिंता कासया करावी।।१०२।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें चतुश्चत्वारिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।१०३।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां दोष हरती समग्र। चतुश्चत्वारिंशाध्याय रसाळ हा।।१०४।। अध्याय ४४।। ओंव्या १०४।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति चतुश्चत्वारिंशोऽध्यायः समाप्तः।।

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमत्पांडुरंगाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय देवा सद्गुरो सदया। ठेवितों मस्तक या तव पायां। पार घालीं तूंचि गुरुराया। भवभयांतुनी मज़लागीं।।१।। बाल्यावस्थेमाजीं सारें। खेळांतरीं आयुष्य हें सरे। तारुण्यांत विषयीं बुडोनी मरे। वृद्धापकाळीं कांहीं करवेना।।२।। करावया बैसलों ज़री जप। तरी येई आधीं झोंप। नाना कल्पना येती खूप। तेव्हां कैंचा देव मला।।३।। बैसतां बोलत जनांच्या गोष्टी। होय आनंद बहुत पोटीं। परि देवा तुझी गोमटी। मूर्ति धराया उबग मना।।४।। एकांतवास कधींही नावडे। लोकांत बैसाया वृत्ति ओढे। हा कवण, तो कवण, इकडे तिकडे। बघाया धडपडे मन हें बा।।५।। ज़री ज़ाती मार्गीं जन। आपापुल्या कामालागून। तेव्हां बोलावितों यावें म्हणोन। अति आग्रहेंकरोनि।।६।। ज़री त्यांनीं यावयालागून। सवड ना आतां, ज़ातों म्हणोन। म्हणतां काकुळतीस येतों आपण। 'किंचित् येउनी ज़ा तुम्ही'।।७।। इतुकें प्रार्थाया काय कारण। संसार गोड वाटे म्हणोन। परि तुज़ला ज़ावया शरण। लाज़ वाटे मम जीवा।।८।। ऐसा मी विषयांध कृपाघना। विषयां भुलोनि नाडलों ज़ाणा। म्हणोनि भोगीं नाना यातना। दुःख असमाधान सदा।।९।। आतां देवा तुज़वांचोनि। कोण निवारण करील धरणीं। तूंचि एक सोडविता यांतुनी। म्हणोनि बाहतों तुज़लागीं।।१०।। आतां धांवोनि येईं त्वरेनें। होईल समाधान बा जेणें। तेंचि करोनि तारीं कृपेनें। सद्गुरुराया कृपाघना।।११।। असो आतां श्रोते हो सज्जन। मागील अध्यायीं स्वामी कृपाघन। यांनीं केली आज्ञा ज़ाण। शिष्य-स्वीकारसिद्धतेसी।।१२।। तेव्हां करिती तेथील जन। सारी सिद्धता प्रेमेंकरोन। म्हणती 'आजिचा

धन्य सुदिन'। स्वर्गींचे देवही, हो, पाहीं।।१३।। यावरी कवणाही येईल संशय। कीं 'स्वर्गींचे देव म्हणती' हें काय। लटिका बोलसी तूं हा विषय। दिसती कां ते आम्हांसी।।१४।। वृथा बडबड करिसी हा निश्चय। आतां कलियुगीं स्वर्ग तो काय। दिसती कां ते देव स्वर्गीय। कोणीं पाहिलें वा ऐकिलें।।१५।। तरी ऐका याचें उत्तर। ज़री ते न दिसती पृथ्वीवर। सत्पुरुषांचे असती ते किंकर। वाटे त्यां येथील नर धन्य।।१६।। ''निजभक्तांची[१] चरणधूळ। मस्तकीं वंदी घननीळ। ऐसी वाणी असे प्रांजळ। वेदव्यासांची भागवतीं।।१७।। वैश्वदेव आणि यज्ञहोम। करिती ज़े का विप्रोत्तम। देव त्यांच्या घरीं परम। प्रेमें येती गुप्तरूपें।।१८।। पितृभक्त आणि गुरुभक्त। तेवींच पतिव्रता, स्त्रिया समस्त। यांच्या घरीं येऊनि देव सतत। आशीर्वाद देत गुप्तरूपें।।१९।। स्वधर्माचरण, पंचमहायज्ञ। करितां देव ते प्रसन्न। होउनी करिती मनोरथ पूर्ण। ऐसी उक्ती गीतेमाजीं।।२०।। हरिगुरु-भक्त निष्ठावंत। तयांसी दिव्य दृष्टि प्राप्त होत। त्या दिव्यदृष्टीनें तयांप्रत। अदृश्य देव दृश्य होती।।२१।। देवांचीं शरीरें वायुरूप। पिशाचादि-योनीही तद्रूप। दिव्य आणि अदिव्य परमाणूंचीं, खूप। सूक्ष्म असती तीं ज़ाणा।।२२।। सूक्ष्म म्हणजे दिव्यदृष्टि। ज्यांना हरिगुरुकृपें गोमटी। लाभलीसे ते संत सृष्टीं। पाहती देवादिकांना।।२३।। 'गुरु हा संतकुळींचा राजा'। ज्ञानदेववाणी ही उमज़ा। म्हणुनी देवादि गुरुपदाब्जा। वंदिती प्रेमेंकरोनि।।२४।।'' सत्पुरुषांचा संग ज्यांसी। त्यांची असे पुण्यराशी।

१ अवतरण चिन्हांत घातलेल्या ओंव्या क्रमांक १७ ते २४ ह्या श्रीयुत रा.रा. ह. भ. प. श्रीगुरुचरित्राचे संशोधक रा. कृ. कामत यांनीं सूक्ष्मसृष्टीच्या स्पष्टीकरणार्थ तद्विषयक ग्रंथाधारें लिहून जोडल्या आहेत.

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

तेवींच घडे सत्संग त्यांसी। नाहीं अनुमान यामाजीं।।२५।। सद्गुरुइतुका श्रेष्ठ देव। नसे त्रिभुवनीं सर्वथैव। बघतां सद्गुरूंचें वैभव। सुरवरां उल्हास निजमानसीं।।२६।। म्हणोनि सद्गुरुस्वामी आमुचे। करिती शिष्या, म्हणोनि साचे। देव सारे म्हणती वाचे। ''धन्य दिवस हा भाग्याचा''।।२७।। आणिक म्हणती ''स्वामींचे भक्त। काय त्यांची पुण्याई अमित। म्हणोनि भजती दिवसरात। सद्गुरुरायांलागीं ते।।२८।। ऐशा भक्तांपुढें आम्ही। काय कराया खावया पराक्रमी। मनुष्यजन्मचि श्रेष्ठ नामी। मिळे सत्संग सर्वदा''।।२९।। असो ऐसें देव जें बोलती। असत्य नव्हे सत्यचि निश्चितीं। मनुष्यचि पावे सद्गति। सत्संगतीनें हो जाणा।।३०।। मनुष्यजन्मा आलियावीण। न पावती आत्मज्ञाननैपुण्य। देवादि पशुही म्हणोन। देवही वांछिती मनुष्यजन्म।।३१।। म्हणोनि 'हा मनुष्यजन्म। दवडूं नका ऐसा उत्तम। जावया मोक्षाचा दरवाजा सुगम'। ऐसें बोलती संत भले।।३२।। असो आतां शिरालीग्रामीं। जाऊनि घटना तेथील आम्ही। पाहूं आनंदाश्रम नूतन स्वामी। प्रेमें मूर्ति सुंदर ती।।३३।। तेथें झाली सिद्धता सारी। एकचि चिंता उरली ते अवसरीं। नव्या स्वामींसी दंड स्वकरीं। नवीन आणावा कोठोनी।।३४।। अमुक ऐसा असावा दंड। तो त्वरेनें मिळाया होय अवघड। ऐसी सुब्रायभटजींसी अखंड। लागली चिंता तेधवां।।३५।। कुठें गवसेल ऐसें म्हणोन। विचार करितां भटजींनीं जाण। श्रीस्वामींसी झालें स्मरण। दंड असे एक पाकगृहीं।।३६।। आपुल्या संन्याससमयीं दोन। आणिले होते दंड जाण। एक ठेविला घट्ट बांधोन। चुलीवरती पाकगृहीं।।३७।। तैं सांगूं लागले कृपाघन। तेव्हां धांवती तेथील जन।

मग काय त्यांनीं अपूर्व ज़ाण। चमत्कार नयनीं देखिला।।३८।। ज़ो बांधोनि ठेविला दंड घट्ट। कवणाही ना विदित ही गोष्ट। ते दिनीं जनांची पडतांचि दृष्ट। दोरा तुटला तत्काळ।।३९।। आणिक एक ज़ातां घटिका। पडला असता निश्चयें देखा। कीं सिद्धचि होउनी बैसला निका। स्वामींसन्निधीं ज़ावया।।४०।। यावरी कवणही करितील प्रश्न। यांत आश्चर्य आहे तें कवण। तरी ऐका आतां सावधान। सकल सज्जन श्रोते हो।।४१।। ज़ो ठेविला होता तेथ दंड। आज़वरी तैसाच़ राहिला अखंड। तेचि दिनीं तो दोरा ज़ाड। तुटोनी गेला कैसा हो।।४२।। कीं सर्वांदेखत आतांच़ दोरा। तुटला हा चमत्कार नव्हे कां खरा। म्हणोनि ऐशा सद्गुरुवरा। कितीही वर्णितां पुरे ना।।४३।। सकळ कार्य तेचि करविती। निमित्तमात्र भक्त होती। त्यांसी अवघड नसे निश्चितीं। कवणही कार्य ज़ाणा हो।।४४।। सर्वही सिद्धता क्षणेंचि होय। क्षणमात्रेंचि होय निश्चय। असाध्य कांहींही नसे त्यां गुरुवर्य-। स्वामीरायांलागीं हो।।४५।। सर्व जगचि त्यांच़े हातीं। तेव्हां काय कराया न होय त्यांप्रती। उगीच़ आम्ही मंदमती। वाहतों अभिमान 'म्यां केलें'।।४६।। असो! सुब्रायभटजी आणि जन। पालखी नाना वाद्यें घेवोन। गोपालकृष्णदेवुळीं ज़ाण। आनंदानें गेले हो।।४७।। तेथें बैसले ज़ाउनी जन। घेउनी यावया शांतमूर्तीलागून। मातापित्यांसी करवुनी नमन। अहेरादि करविले।।४८।। मोह ममता परम कठिण। ज़ाई पुत्र आपुल्यासी सोडून। म्हणोनि माता अश्रुसिंचन। करी नयनांतूनि पहा।।४९।। म्हणे मानसीं अरे बाळा। पुनरपि न मिळसी बोलायाला। कैसी राहूं सोडोनि तुज़ला। जगीं आतां मी पाहीं।।५०।। आज़वरी तूं बाळ म्हणोनि।

सांभाळिलें तुज़लागोनि। आतां सर्व जगाचा तूं धनी। सर्वां रक्षिसी तूंचि बा।।५१।। बोलिलें आज़वरी सलगीनें तुज़प्रती। तूं देवचि ऐसें कळलें ना चित्तीं। अवतारीच तूं निश्चितीं। म्हणोनि नेती शिष्यपदा।।५२।। माझे अपराध अमित असोनि। बोलिल्यें कधींकधीं तुज़लागोनि। तूं नसतांही निश्चयें दुर्गुणी। सहज़ स्वभावें बोलिल्यें।।५३।। आम्ही माता म्हणोनि बालकां। त्यांनीं अणुमात्र करितां चुका। शब्द लावितों त्यांसी निका। दुर्गुण नसतांही अंगीं पैं।।५४।। तेवींच मीं तुज़ला बाळा। दरडाविलें कितीक वेळां। परि तूं ना उलट मज़ला। बोलिलास कधींही निश्चयें।।५५।। तुझे गुण शांत बहुत । किती आठवूं मी हृदयांत। नच बोलवे बा आणिक मज़प्रत। हृदय कांपत थरथर हें।।५६।। इतुकी योग्यता आली कोठोनि। हेंचि न कळे मज़लागोनि। पूर्वसुकृत असे म्हणोनि। आलास उदरीं माझ्या या।।५७।। असो आतां माझ्या बाळा। साऱ्या सुखाचा निश्चयें आपुल्या। त्याग करिसी तूं ये वेळां। हेंचि वाटे दुःख मज़।।५८।। आहार, निद्रा, विषय सारे। बालपणींच सोडिसी कैसा रे। आठवितां सर्व, दुःख नावरे। काय सांगूं मम बाळा।।५९।। आतां देत्यें आशीर्वाद। रक्षण करीं तूं भक्तवृंद। दीर्घायुषी होऊनि आनंद। देईं सर्वांसी मम बाळा।।६०।। यापरी मानसीं बोलिली माता। शोक नावरे तिचिया चित्ता। मातेचें हृदय कैसें तें समस्तां। जियेसी अनुभव तियेसीच कळे।।६१।। परम प्रेमें विलोकी वदन। करी त्याचें घडी घडी स्मरण। आणि म्हणे बाळा तुज़ कोण। मातापिता बा पाहीं।।६२।। ऐसें बोलतां घळघळां नेत्रीं। अश्रु लोटले,पडले धरित्रीं। नावरे कांहीं केल्या सर्वत्रीं। वाटे तिज़ला दुःख बहु।।६३।। तैसेंच साऱ्या आप्तजनांसी।

वाटे बहुत दुःख मानसीं। परि शांतमूर्तीच्या चित्तासी। ना खंत ना खेद।।६४।। पुढें करूं याचें विवरण। यांच्या चरित्रीं सारें कथन। आतां ऐका सावधान। पुढील वार्ता सप्रेमें।।६५।। तेथें एक असे प्रघात। शिष्य-स्वीकाराआधीं त्याप्रत। आप्त सारे बोलावुनी नेत। घरोघरीं भोजनासी।।६६।। बहुविध पक्कान्नें रुचिकर। करूनि वाढिती प्रेमें सुंदर। ऐसा प्रघात समाजीं मनोहर। पडिला असे आमुच्या।।६७।। परि आतां शांतमूर्तीसी। न होय ऐसें करावयासी। अवचित घडलें कार्यासी। न मिळे अवकाश यां सर्वां।।६८।। म्हणोनि सकळांसी झाली हळहळ। मातापित्यासी अतिशय तळमळ। प्रीतीचे पदार्थ द्यावया वेळ। नाहीं म्हणोनि अति दुःख।।६९।। असो मग आले जे जन। बैसले देउळीं सारे येऊन। आली शांत मूर्ति गोमटी तेथून। सदनांतूनि तेधवां।।७०।। परम सुंदर गौरवर्ण। मुखकमल दैदीप्यमान। कोटी मन्मथ ओंवाळून। मुखावरोन टाकावे।।७१।। असो मग ते सकळ जन। पालखी सज़वुनी आणिती ज़ाण। तियेंत बैसविलें प्रेमेंकरोन। शांतमूर्तीसी तेधवां ।।७२।। नाना वाद्यें घेउनी संगें। मिरवीत आणिलें बहुतचि रंगें। जन येती धांवुनी लगबगें। पाहाण्यास उत्सव त्या समयीं।।७३।। ज़ो असे कार्यक्रम विधियुक्त। संन्यास-समयीं विख्यात। केला सारा साज़रा त्वरित। गुरु-आज्ञेपरी त्या समयीं।।७४।। मुख्य ज़ो संन्यास-उपदेश ज़ाण। तो पाहुनी मुहूर्त शुभ दिन। केलें कार्य आनंदेंकरोन। ऐका दिवस तो आतां।।७५।। शके अठराशें सदतीस। राक्षस संवत्सर वैशाख मास। वद्य अष्टमी द्वितीय प्रहरास। 'आश्रम'- संन्यास दिधला हो।।७६।। पाठवुनी तारा ग्रामोग्रामीं। गृहस्थ आले पहावया

स्वामी। ते जन भाविक अंतर्यामीं। धरोनी पाहती ती मूर्ति।।७७।। झाला उत्सव परम थोर। पाहूनि संतोषले जन समग्र। म्हणती आमुचें भाग्य अपार। म्हणोनि लाभले गुरुवर हे।।७८।। धन्य धन्य ऐसा सुदिन। बघाया हवें विपुल पुण्य। साक्षात् लाभतां नारायण। काय उणें त्यां भक्तांसी।।७९।। मग सद्गुरु स्वामीराय। निजशिष्यासी ते समय। 'आनंदाश्रम' नामाभिधान सुखमय। देते ज़ाहले प्रेमानें।।८०।। आणि घेउनी संगें शिष्य। गेले भवानीशंकरसंनिधीस। करोनि प्रार्थना बहुवस। ठेविला वरदहस्त शिरीं।।८१।। आणिक केला उपदेश थोर। बोलती प्रेमानें परमचतुर। म्हणती बाळा सांगतों विचार। धरीं स्वमनीं दिनरजनीं।।८२।। तूं इतुके दिवसवरी। होतासी मायबापांच्या घरीं। त्यांचा पुत्र होउनी निर्धारीं। राहिला होतास ज़ाण पां।।८३।। आतां तुझीं माय-बाप-भगिनी। बंधु-चुलते आदिकरोनी। भवानीशंकर देवचि असुनी। तोचि रक्षील तुज़लागीं।।८४।। ठेवुनी त्यावर विश्वास। दक्ष राहुनी करूनि साहस। तुझें कर्तव्यकर्म रजनी-दिवस। करीं प्रेमें निर्धारें।।८५।। तुझ्या मानसीं होय ज़ो निश्चय। तो सहज़चि योग्य होय। तो करावया न करीं संशय। नच फिरे, माघारां कदापि।।८६।। श्रीभवानीशंकरा स्मरोनि अंतरीं। सकलही कार्य प्रेमानें करीं। भिऊं नको तूं निर्धारीं। अणुमात्रही मम बाळा।।८७।। गरीब अथवा श्रीमंत कुणीही। मोठा अधिकारी पदवीधर त्याही। पक्षपात न धरितां पाहीं। समदृष्टि ती धरोनियां।।८८।। धर्मापरी करीं न्याय। त्यामाजीं न धरीं संशय। नाहीं तुज़ला कवणही भय। सत्यवचन हें आमुचें।।८९।। दक्षिणस्कंधीं भवानीशंकर। वामस्कंधीं आम्ही गुरुवर। मागें पुढें सकल-परंपरा थोर। असती साह्य तुज़लागीं।।९०।। सिद्ध होउनी असती ते आपण। वर्त-

वावया तुज़लागोन। कर्ते करविते तेचि ज़ाण। म्हणोनि सर्वथा भिऊं नको।।९१।। धरितां सद्गुरुचरणीं विश्वास। तोचि पार घालील खास। तो ज़ें करी तेंचि भक्तांस। हितकारक होत असे।।९२।। म्हणोनि काहीं येतां संकटें। ढुंकूं नयेच़ तयां वाटे। सद्गुरु एक आमुच़े मोठे। असतां कैंच़ें भय आम्हां।।९३।। त्याच्या इच्छेपरी सकल होय। मग कैंच़ें भक्तांसी भय। कर्ता करविता तोचि चिन्मय। न च़ाले उपाय आमुच़ा।।९४।। परि ज़ें असे आपुलें कार्य। 'कर्तव्य' म्हणोनि करावें निर्भय। यांत न करीं अणुमात्र संशय। सांगतों तुज़ला प्रेमानें।।९५।। देव-गुरुरायांसी स्मरोनी। आपुलें कर्तव्यकार्य करावें झणीं। यश द्यावया समर्थ कोणी। नसे त्रिभुवनीं त्यांविण।।९६।। सत्य एक हृदयीं धरोनी। करीं कार्य कैंच़ेंही धरणीं। ऐसें करितां निश्चयें, स्वमनीं। कवण भय त्या मानवा।।९७।। नाहीं सत्यासी नाश कधींही। सत्यानें वागतां अंगीं सर्वही। सद्गुण येती निश्चयें लवलाहीं। हें खचितचि ज़ाण तूं।।९८।। सद्गुणेंचि पावे आत्मज्ञान। ज़री तो असे मंदमति कवण। तरी त्यासी तो कृपाघन। उद्धरीतसे निर्धारें।।९९।। ज़ो जग हें मिथ्या पाहे। तोचि सत्यानें वागे निश्चयें। म्हणोनि आधीं बघावें, जग हें। सत्य नसे अणुमात्र।।१००।। नित्यानित्य होतां विवेक। विषयत्याग करीतसे देख। तेव्हां सत्यानें वर्ते निश्चयात्मक। नाहीं संशय यामाजीं।।१०१।। विषयचि सारे देखतां मिथ्या। कासया ज़ाईल असत्यपंथा। ज़ें ज़ें पाही तें तें सत्यचि, तत्त्वतां। दिसे त्या कैसें तें सांगूं।।१०२।। समज़ा गारुडी आला एक। दावितो खेळ करोनि अनेक। रुपये पुष्पें आंबे सुरेख। करी बहुविध त्या समयीं।।१०३।। तेव्हां तेथील सारे विषय। मिथ्या समज़ुनी कवणही न घेय। लहान बालकें नाच़ती थयथय। तें घ्या

हें घ्या म्हणती ते।।१०४।। तेव्हां त्यांसी मायबाप। समज़ावुनी सांगती खूप। तेव्हां हळू हळू त्यांचें स्वरूप। कळे जादूचा माल खोटा।।१०५।। तैसें अज्ञांसी सारें जग। सत्यचि भासे तेव्हां, काय मग। कैसा करवेल त्याचा त्याग। सत्य मिथ्या नच कळतां।।१०६।। म्हणोनी विषयचि गोड बहुत। धरिती ते त्यांवरीच प्रीत। नाना खटपटी करिती तेथ। त्यांच्याच प्राप्तीकारणें।।१०७।। विषयांमाजीं होतां गर्क। कांहीं न दिसे निश्चयात्मक । तेव्हां जगीं असत्यचि देख। घडे व्यवहार तयांचा।।१०८।। कवणा कांहीं न पुसतां आपण। करिती सदा यथेच्छाचरण। कीं सत्यचि वाटे तेंचि त्यांलागून। तेवींच वर्तती त्यापरी ते।।१०९।। तेणेंचि असत्य वर्तत भारी। नाना घडामोडी करिती बहुपरी। मग सत्यत्व त्यांच्या शरीरीं। येईल, कैसें तें सांगा।।११०।। म्हणोनि जग हें मिथ्या समज़ून। त्याग करावा न लागतां क्षण। सत्य तितुकें निजमनीं धरोन। वर्ततां ज्ञान ये हाता।।१११।। सत्य कळतां सहज़चि त्याग। होय विषयसुखाचा, त्या मग। काय उणीवता तेव्हां सांग। आत्मज्ञाना ना तोटा।।११२।। म्हणोनि विषय मिथ्या समज़ुनी। सत्यानें वर्तत असतां, झणीं। त्वरेचि होय ब्रह्मज्ञानी। सारें जगचि ब्रह्मरूप।।११३।। न कळे ज़री अद्वैत ज्ञान। सर्वांठायीं सत्यत्व धरोन। वागे ज़ो नर आपण। तया तो सांभाळी भगवंत।।११४।। सत्य हें एकचि सन्मार्गदर्शक। त्याहुनी नाहीं साधन आणिक। तेणेंचि समाधान होय देख। निश्चयें पाहीं मम बाळा।।११५।। तुज़ला कवणही नाहीं भय। सकल मागील स्वामी सदय। भवानीशंकर देव चिन्मय। असती तव पाठीसी।।११६।। असो यापरी करोनी बोध।ठेवुनी मस्तकीं हस्त वरद।श्रीपांडुरंगाश्रमस्वामी प्रसिद्ध। घेती शिष्यासी

प्रेमानें।।११७।। असो यापरी करोनियां उपदेश। संपविला संन्यासक्रमविशेष। एवं शिष्य-स्वीकार होतां, संतोष। झाला सर्व भक्तजनां।।११८।। तेथें मिळाले आपुले ज़े जन। त्यांसी झाला हर्ष पूर्ण। सारा समारंभ पाहोन। तेचि समयीं हो ज़ाणा।।११९।। परि स्वामी पांडुरंगाश्रम। यांचें दुखणें बघोनि, जनां परम। दुःख ज़ाहलें त्या सुखासम। सुखदुःख दोन्ही एकेचि वेळीं।।१२०।। एकीकडे झाला आनंद। दुज्या प्रकारें दुःख बहुविध। कीं पांडुरंगाश्रम सद्गुरुपाद। अंतरती आपुल्यास म्हणोनियां।।१२१।। अश्रुधारा वाहती नयनीं। सर्व जनांच्या प्रेमेंकरोनी। सद्गुरुमूर्तीच़ तैसी म्हणोनी। लागती भजनीं त्यांच्या हो।।१२२।। काय वर्णूं त्यांच़ा महिमा। वर्णूं ज़ातां न मिळे उपमा। काय सांगूं श्रोते हो तुम्हां। सांगतां न ये कवणाही।।१२३।। असो सद्गुरुस्वामीराय। अशक्त क्षीण ज़ाहले अतिशय। चिंताक्रांत होती ते समय। भक्तजन बहुतचि।।१२४।। शिष्य-स्वीकार झालियावरी। आठ दिवस होतां सत्वरी। स्वामींच़ा आज़ार वाढला बहुपरी। भ्याले सारे भक्तजन।।१२५।। ज्येष्ठ शुद्ध द्वितीये दिवशीं। सोमवार प्रदोष समयासी। शके अठराशें सदतिशीं। राक्षस संवत्सर होतें तैं।।१२६।। तये दिवशीं ज़ाहले मुक्त। हाहाःकार उडाला जनांत। सद्गुण आठविती समस्त। श्रीसद्गुरुस्वामींच़े।।१२७।। पसरली वार्ता न लागतां क्षण। ज़वळींच़े जन येती धांवून। बघती मूर्ति प्रेमेंकरोन। श्रीस्वामींची त्या समयीं।।१२८।। बैंदूर भटकळ मुर्डेश्वर। नजीक ग्रामींच़े येती समग्र। थव्यांच़े थवे भरले अपार। तासामाजींच़ तत्काल।।१२९।। म्हणती मानसीं सद्गुरुदेवा। तूं एक कृपेच़ा ठेवा। विसरूं कैसें करुणार्णवा। तुझे उपकार आम्ही बा।।१३०।।

केला सकलांचा सांभाळ। देह झिज़वुनी आपुला कोमळ। स्वधर्म शिकवुनी केलें प्रेमळ। जनांचें अंतःकरण तुवां।।१३१।। ऐसे आठवुनी सद्गुण। अश्रु ढाळिती भक्तजन। पुढें ऐका सावधान। तुम्ही श्रोते सज्जन हो।।१३२।। मग श्रीस्वामीसद्गुरूंलागीं। पालखींत बैसवुनी वेगीं। मिरविती सकलही मार्गीं। ग्रामाभोंवतीं ते समयीं।।१३३।। निघाले रात्रीं प्रहर एकावरी। परतले ते तिसऱ्या प्रहरीं। मिरवित मिरवित नगरीं। मठामाजीं सावकाश।।१३४।। घरोघरीं आरत्या नारळ। देती भक्तजन प्रेमळ। म्हणोनी रात्र झाली विपुल। यावया पालखी मठासी।।१३५।। असो स्वामींची मिरवणूक। आली मठामाजीं देख। तोंवरी इकडे केली सकळिक। सिद्धता समाधी द्यावयासी।।१३६।। गणपती देवाच्या संनिधीं। दक्षिणभागीं खणुनी गुंफादी। बैसवावया गुरुमूर्ती त्यामधीं। केली सिद्धता वेगेंसी।।१३७।। मग सुंदर पवित्र ती मूर्ती। बैसविली पद्मासनें परमप्रीतीं। त्या गुंफेमाजीं निश्चिती। विधिपूर्वक करोनी।।१३८।। घालुनी कर्पूरादि सुगंध द्रव्य। मस्तकीं ठेविलें शालिग्रामादि सर्व। करूनी विधियुक्त विधानवैभव। दिधली समाधी त्या समयीं।।१३९।। ऐसी माउली सद्गुरुमूर्ति। जगीं राहिली सतत कीर्ति। काय वानूं कवण्या रीतीं। करूं वर्णन न कळे हो।।१४०।। असो आतां स्वामी यांची। जीवनयात्रा संपली साची। महिमा वर्णाया न पुरे आमुची। मति मंद असे ती।।१४१।। झिज़विला सारा देह आपुला। केवल जनकल्याणा वाहिला। आणिक कांहीं नाहीं त्यांज़ला। करणें होतें जगामाजीं।।१४२।। कासया त्यांसी इतुके कष्ट। सांगा तुम्ही श्रोते हो श्रेष्ठ। जनकल्याणावांचुनी गोष्ट। नाहीं अन्य त्या स्थानीं।।१४३।। काय केलें

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

जनकल्याण। ऐसा येईल ज़री प्रश्न। तरी परिसा सावधान। उत्तर त्याचें श्रोते हो।।१४४।। मग कथिल्यापरी त्यांसी। कासया मठाचें बंधन परियेसीं। जनांचा उद्धार व्हावा ऐसी। इच्छा मानसीं हेंचि कीं।।१४५।। त्याचिकारणें जनांसी बोधिलें। कंठशोष करोनि शिणले। रात्रंदिन शरीर झिज़विलें। नाना परीनें त्यांनीं हो।।१४६।। होतां रात्र तीनप्रहर। स्नानादि करिती स्वामी साचार। मग अनुष्ठान महाथोर। करिती दयाळ ते ज़ाणा।।१४७।। यापरीच त्रिकाळ-स्नान। आणि करिती अनुष्ठान। ऐसें स्वधर्मापरी वर्तोनि आपण। सांगती अन्यांसी स्वधर्म।।१४८।।आपण करोनि दाविती। मग अन्यांसी उपदेश करिती। ब्रह्मज्ञानी ऐसेच असती। बोलती तैसें वर्तती ते।।१४९।। कासया त्यांसी अनुष्ठान। ज़े असती ब्रह्मज्ञानी पूर्ण। परि नाहीं त्यांसी अभिमान। म्हणोनि करिती स्वधर्म।।१५०।। शिक्षकासी नलगे शिकणें। अ,आ, इ, ई ऐसें म्हणणें। परि म्हणतो मुलांकारणें। घोकावें लागे दिनरजनीं।।१५१।। हा असे शिक्षक आपण। कासया घोकितो अ, आ म्हणोन। ऐसें न बोलती त्यालागून। बुद्धिवंत निर्धारें।।१५२।। तद्वत् येथें श्रीस्वामींसी। नलगे अनुष्ठानादि परियेसीं। पूर्ण ज्ञानी ऐसियांसी। काय करणें हें सारें।।१५३।। त्यांसी नाहीं कर्तव्य कांहीं। ते अकर्ते अभोक्ते असती पाहीं। आम्हां अज्ञजनांसी सर्वही। अमुक कर्तव्य अमुकाचें।।१५४।। ज्यासी असे कर्तृत्वबुद्धि। त्यासीच लागली कर्तव्यव्याधि। हीचि एक थोर उपाधि। आम्हां अज्ञजनांलागीं।।१५५।। 'कर्तव्य' ही व्याधि कैसी। तरी आतां सांगूं तुम्हांसी। सद्गुरुकृपेंचि मज़सी। स्फुरेल जितुकें तितुकेंचि।।१५६।। कर्तव्यासी नाहीं तूट। मरे तोंवरी न सोडी पाठ। ज़री मेलों तरी ही

कटकट। न चुके निश्चयें अज्ञांसी।।१५७।। मेल्यावरी कर्तव्य आपुलें। वासनेमाजीं ज़ाऊनि लपलें। मागुता जन्म घेई ते वेळे। कर्तव्यासहित ये जन्मा।।१५८।। ज्याची वासना ज्ञानें ज़ळाली। त्याची कर्तव्यभावना मेली। ऐसी ही आमुची माउली। कर्तव्यरहित समज़ा हो।।१५९।। नाहीं त्यांसी अणुमात्र वासना। ज़ळोनि खाक ज्ञानें, ज़ाणा। मग कैंचें हो त्यां गुरुराणां। अमुक कर्तव्य आहे तें।।१६०।। म्हणोनि नाहीं विधि-निषेध। ते ज़ें करिती तेंचि सुसिद्ध। हाचि त्यांचा विधि शुद्ध। न करिती ज़ें तें निषेध तो।।१६१।। परि ते कदापिही आपण। न करिती अधर्माचरण। अधर्में वर्तले तरीही त्यांसी न। लागे पाप अणुमात्र।।१६२।। तेचि सकलां अधिष्ठान। त्यांसी कैंचें पाप-पुण्य। प्रारब्धापरी त्यांचें वर्तन। घडे त्यांच्याकडुनी पैं।।१६३।। त्यांचा अवतार जनांकारण। काज़ नाहीं जगीं आन। ते ज़ें करिती तेंचि आपण। उत्कृष्ट ऐसें ज़ाणावें।।१६४।। त्यांच्या कार्यावरी आपण। शब्द न ठेवावा अणुमात्र ज़ाण। तरीच होईल आमुचें कल्याण। आणिक साधन नलगे पैं।।१६५।। जनकल्याणावांचून दुज़ा। हेतु नाहीं आणिक समज़ा। ते ज़ें करिती तें जनकाज़ा। स्वार्थ नाहीं त्यामाजीं।।१६६।। पहा कैसें सांगूं आतां। लावा इकडे आपुल्या चित्ता। स्फुरवील ज़ें सद्गुरुमाता। तेंचि कथूं हो तुम्हांतें।।१६७।। कथिती जनांसी स्वधर्म करा। कीं अज्ञांच्या चित्ता अन्य ना थारा। म्हणोनि बोधिती जन्म सारा। जनांस्तवचि निश्चयें।।१६८।। ऐके ज़री कुणीही वचन। तरी सांगती त्यासी निक्षून। दाविती वरिवरी कोप दारुण। परि अंतरीं शांत सदा।।१६९।। क्षोभ दावाया काय कारण। निजभक्तांचें व्हावें कल्याण।

एवं हेतु नसे अन्य। जनांचें हितचि इच्छिती ते।।१७०।। नानापरी करोनि बोधा। तीव्र करिती मतिमंदा। इतुका कासया त्यांसी धंदा। केवळ कल्याणा आमुच्या हो।।१७१।। साम-दान-भेद-दंड। चारी उपचार करुनी अखंड-। सुख दावाया इतुकी धडपड। करिती झिज़वुनी निजदेहा।।१७२।। असो साम-दान-भेद-दंड। यांचा अर्थ करूं उघड। ऐका श्रोते हो तुम्ही सुखंड। परम प्रीतीनें आतां हो।।१७३।। 'साम' म्हणिजे आपुला ऐसें। वर्तमान प्रेमानें सांगतसे। ज़री ना ऐके तरी त्या साहसें। दानोपचार दाविती।।१७४।। 'दान' म्हणिजे फलाशा दावुनी। बोध करिती प्रेमें ते झणीं। ज़री ना ऐके हेंही ऐकुनी। भेदोपचार करिती ते।।१७५।। 'भेद' म्हणिजे काय तें ऐका। अन्यांसी फुलवुनी फल देवूनि कां। भेद दावुनी करिती सारिखा। बोध तये समयीं हो।।१७६।। तरीही न ऐके ज़री वचन। तेव्हां दंडचि करावा म्हणोन। क्रोध दाविती वरिवरी कठिण। निजभक्तांसी प्रेमानें।।१७७।। परि आम्ही अज्ञ जन। लक्ष न देतां आपण। आपुलेंचि अहित घेतों करोन। दुरभिमानें करोनियां।।१७८।। आणिक करूं विस्तार सारा। सामदानादि यांचा बरा। देउनी आपुल्या चित्तासी थारा। प्रेमानें अवधारा तुम्ही हो।।१७९।। असे एक ब्राह्मणपुत्र। खोड्या करी अहोरात्र। त्यासी सांगे माय पवित्र। ऐक बाळा मम वचना।।१८०।। ऐसा होऊं नको उनाड। म्हणोनि बोधी बोलुनी गोड। हाचि सामोपचार उघड। सांगे वारंवार सदा।।१८१।। परि तो बाळ न ऐके वचन। अधिकचि करी अनर्थ दारुण। तेव्हां ती दुजा उपचार दान। हाचि करी ते समयीं।।१८२।। म्हणे बाळा ज़री वचन। ऐकसी तरी तुज़लागोन। देत्यें निश्चयें परम छान। वस्तु एक यापुढती।।१८३।। तेंही तो ना

घे कर्णीं। ऐसें ती माय बघुनी नयनीं। भेद दावी पुत्रालागूनी। काय तो परिसा आतां पैं।।१८४।। म्हणे तो रामु कैसा धीट। आणि हुशार तुज़हुनी श्रेष्ठ। त्यासी मिळाली ही नोट। बक्षीस दहा रुपयांची।।१८५।। तुज़हुनी तो लहान असोनी। शहाणा झ़ाला पाहें तूं नयनीं। तोचि मज़ आवडे तुज़हुनी। ऐसा भेद दावी ती।।१८६।। हाही करितां उपचार थोर। ज़री न ऐके तिच़ा पुत्र। मग करी दंडचि साचार। शिक्षा अनिवारही करी।।१८७।। तरीही ज़री न सोडी हट्ट। होय तो पुढती मतिभ्रष्ट। जगीं निंद्य होय तो दुष्ट। वर्णावें नलगे हें कांहीं।।१८८।। तैसें येथें सद्गुरुराज। सामोपचारें बोधिती सहज़। स्वधर्म करणें तुझें काज़। ऐसें बहुपरी सांगती।।१८९।। इतुकें बोधितां ना ऐके ज़री। दानोपचारें सांगती निर्धारीं। स्वधर्मानें वर्तसी तरी। देव देईल विपुल सुख।।१९०।। संतति संपत्ति मिळे अपार। सकल सुख मिळे सत्वर। हेंही न ऐके वचन थोर। भेदोपचार करिती ते।।१९१।। कीं ज़ो स्वधर्में वर्ते गृहस्थ। त्यावरी दाविती बहुत प्रीत। बघतां आम्हां अज्ञांसी दिसत। सद्गुरु करिती भेद बहु।।१९२।। म्हणतों आम्ही काय हें ऐसें। राग-द्वेष कराया असे। त्यासी बघतां मन उल्हासे। आमुच्याकडे दुर्लक्ष।।१९३।। ऐसें आम्ही म्हणतों अज्ञ। परि त्यांसी सारे समान। भक्तांनीं व्हावें सद्भक्त म्हणोन। भेद दाविती वरिवरी।।१९४।। एकावरी करितां प्रीती। दुज्यासी वाटे बहुत खंती। कीं स्वामी क्षोभले मज़वरती। म्हणोनि कळवळे मानसीं।।१९५।। आणि करी गुरुआज्ञा- पालन। तेवींच़ भेद दाविती ज़ाण। तेंही ज़री ना ऐकूं आपण। दंडोपचार करिताती।।१९६।। मठासी द्यावा लागे दंड। प्रायश्चित्त घे म्हणती उदंड। तेंही न ऐके तो प्रचंड। काय करतील त्यासी ते।।१९७।।

तेव्हां सहज़चि होईल हानि। हें नलगे सांगावें वचनीं। म्हणोनि कनवाळु सद्गुरु ते झणीं। बोधिती जनांसी बहुविध।।१९८।। याचिकारणें वरिवरी कोप। दाविती जनांच्या कल्याणा खूप। म्हणोनि जगीं मायबाप। तेचि आम्हांसी अज्ञजनां।।१९९।। यास्तव सद्गुरुस्वामींलागीं। दोष न द्यावा सर्वथा जगीं। दोषचि नसे त्यांच्या अंगीं। नाहीं संशय यामाजीं।।२००।। गुणदोषातीत माउली। कैसें तें ऐका येवेळीं। श्रीसद्गुरुचरणकमळीं। स्थिर होऊनि परिसा हो।।२०१।। सारें जगचि आत्मरूप। 'त्यावीण अन्य असे' हा जल्प। मग 'गुणदोष सुखदुःख' हा विलाप। ऐसियां कैसा सांगा हो।।२०२।। शुद्ध सात्त्विक वृत्ति ज्यांची। तेथें मलिनता येईल कैंची। म्हणोनि सारें जगचि। आत्मरूप दिसे तयां।।२०३।। आपुल्याहुनी वस्तू ना दुजी। तेथें गुणदोष कैसे सांगा जी। केवळ आनंद जगामाजीं। दिसे त्यांसी निर्धारें।।२०४।। जेथें असे द्वैतभेद। तेथें गुण दिसे द्विविध। गुण तेथें दोष हें सिद्ध। होय निश्चयें परियेसा।।२०५।। जेथें नसती गुणचि ज़ाण। तेथें दोष येती कोठोन। एकचि असतां नामाभिधान। 'गुण-दोष' ऐसें कोण म्हणे।।२०६।। सारें दिसे ब्रह्मचि पूर्ण। मग कैंचे बघती 'दोष-गुण'। नाहीं त्यांसीं 'मी-तूंपण' । 'बरा-वाईट' नसे त्यांसी।।२०७।। म्हणोनि सद्गुरुस्वामींलागीं। गुणदोषचि न दिसती जगीं। तेवींच नसती त्यांच्या अंगीं। गुणदोष कांहीं पहा हो।।२०८।। ज्याच्या अंगीं असती गुणदोष। त्यासीच दिसती जगींही विशेष। ज्यासी कामीण झाली त्यास। पीतवर्ण दिसे सारें।।२०९।। तैसें आम्हां अज्ञजनांसी। गुण-दोष असती बहुवसीं। जगीं बघतां गुणी दोषी। जीव सारे हे दिसती।।२१०।। साधुपुरुषांलागीं पाहीं। गुणी दोषी न दिसे कांहीं।

देवचि दिसे त्यांसी सर्वही। खचितचि ज़ाणा निश्चयेंसीं।।२११।। आपुल्या मनापरी सारें जग हें। बघती सारे साधुसंत निश्चयें। त्यांची वृत्तीच़ ब्रह्मरूप होये। तैसेंच़ भासे त्यां सर्व।।२१२।। मग कैंच़े गुण दोष। बाधतील सांगा तयांस। म्हणोनि गुण-दोषातीत ते खास। जगकल्याणा झ़टती ते।।२१३।। म्हणोनि आम्हीं त्यांच़े दोष। बघूं नये सर्वथा लवलेश। ते ज़ें करिती तें आमुच्या हितास। ऐसा विश्वास धरावा।।२१४।। एवं सद्गुरुस्वामिराय। त्यांच़ा महिमा अवर्णनीय। केवल जगाच्या उद्धारा होय। अवतार त्यांच़ा निश्चयें।।२१५।। म्हणोनि मठाच़ें बंधन। जनांस्तवचि सोशिती आपण। नातरी ते कासया येऊन। राहती सांगा मठामाजीं।।२१६।। श्रीपांडुरंगाश्रम अष्टम। झ़ालें त्यांच़ें अवतारकार्य सुगम। दाविला जनांसी मार्ग उत्तम। सुलभ करोनि सकलांसी।।२१७।। यापरी प्रेमेंकरोनि यांनीं। शके सत्राशें पंच्यायशींपासुनी। अठराशें सदतीसवरी धरणीं। स्वधर्मराज्य च़ालविलें।।२१८।। पुढील अध्यायीं विवरण। करूं सद्गुरुमहिमा पूर्ण। अवधारावें चित्त देऊन। श्रोते हो सज्जन प्रेमानें।।२१९।। आणिक नवम आश्रम थोर। आनंदाश्रम करुणासागर। स्वधर्मराज्य च़ालवितील चतुर। परम प्रीतीनें हो पहा।।२२०।। आनंदाश्रम परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें पंचचत्वारिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।२२१।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां निरसे अज्ञान समग्र। पंचचत्वारिंशाध्याय रसाळ हा।।२२२।। अध्याय ४५।। ओंव्या २२२।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति पंचचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः।।

आरती श्री पांडुरंगाश्रम स्वामीजींची

ॐ नमो पांडुरंगाश्रम श्रीगुरुराया। सद्गुरुराया।
ओवाळू पंचारती पंचभूत काया ।।ॐ।।
वैराग्य स्नान ज्ञान तिलक जो भाळा।
नवविधा भक्ती हे नवरत्नांची माळा।
मुद्रिका अगोचर्यादि क्षात्रजन पाळा।
दृढ शांती मेखळा झळके विद्युत्जाळा।।१।।
पुरुषार्थ सुमनहार तो पाळिला ।
अभिमान धूप हा सारा जाळिला।
संस्कृतीरूप हा दीप प्रज्वाळिला।
नैवेद्य भाव शर्करा अर्पू हर्षाया।।२।।

अर्पितो श्रुती स्मृती मंत्रपुष्प हे माथा।
गाईन मुखाने अगण्य गुण गण गाथा।
हे प्रदक्षिणा सत्वाची सज्जन नाथा।
मी दीन होऊनी ठेवितसे पदीं माथा।।३।।

किती सद्गुण गाते प्राणी पाळिले।
दुर्दैव तयांचे सारे जाळिले।
किती मलीन जन तीर्थाने क्षाळिले।
भवनदी तारिले शुद्ध करुनिया काया।।४।।

श्री गंगाधर गोसावी गुरु हे आदी।
वंदुनी स्तविता गेली मम उपाधी।
सज्जनगडी वंदिली त्यांची समाधी।
लोळे दुर्गादास स्वामींच्या लागलो नादीं।। ५।।

दुष्प्रपंच वृत्ती भोगे ह्या जगी।
ह्या ब्रह्मसत्वाचा त्रासे धगधगी।
न संशय व्हावा वंदितसे तव पाया।
नमो पांडुरंगाश्रम सद्गुरुराया। श्री गुरुराया।।६।।

आरती श्री सद्गुरूंची

मंगलारती करीन भावे सद्गुरुरायासी
माझ्या सद्गुरु पतितपावन
आनंदाश्रमश्रीगुरुसी,
परिज्ञानाश्रम श्रीगुरुसी,
सद्योजात शंकर गुरुसी।। पल्ल।।

विश्वव्यापका दीनदयाळा तारक तू होसी।
सत्त्व रज तम माया निरसुनि
दैवी नटलासी।
धाव रे पाव रे करुणाघनमूर्ती ।।१।।

चिन्मयमूर्ती चित्सुखदाता
भवभय हरलासी।
उन्मनी सुख हे दाखवी
जगता निजपदि रमलासी।
तारका त्र्यंबका सुरमुनीवरदासी ।।२।।

भक्तवत्सला करुणासागरा तारी दीनासी।
निशिदिनि नमितो तव पदकमले
चित्रापुरेश तुजसी ।।३।।

।। श्रीगुरुभ्यो नमः ।।

।। श्रीभवानीशङ्कराय नमः ।।

पूज्य आरुर उमाबायि आक्काक भावपूर्ण आदरांजलि

लिहिला हा थोर ग्रंथ । दिलें गुरुकृपामृत । व्हावयासी भवमुक्त । मनोभावें प्राशावें ।।१।।

गुरुभक्ति हीच शक्ति । गुरुभक्ति हीच मुक्ति । हेंच वात्सल्याच्या पोटीं । सांगे आरुर उमाक्का ।।२।।

संत भवपार होती । इतरांसीही तारिती । प्रेमें धरुनियां हातीं । ग्रंथरूपें सदैव ।।३।।

ऋषी पंचमीचा दिन । इसवी एकोणीसशें सन । दिलें देवानें धाडून । हिज ह्याच कारणें ।।४।।

बाळपणीं जो मांडिला । संसार हिचा मोडला । भवपाश जो सुटला । तो गुंते गुरुपायीं ।।५।।

शिवानंद तीर्थ गुरु । नेती हिज पैलपारु । जाहले हे मोक्षगुरु । बाड मठाधिपति ।।६।।

गुरुकृपा विसरतां । येईना पुढती जातां । चित्रापूरींचे भेटतां । धर्मपीठींचे गुरु ।।७।।

त्या सर्वांसी हिची आई । भक्तिभावें नित्य ध्यायी । म्हणे लेकीस तूं लिही । सारें हें मराठींत ।।८।।

मातृआज्ञेचें पालन । मोक्षसिद्धीचें साधन । परी करावें लेखन । कैसें म्हणे ही लेक ।।९।।

हिच्या मनींचें जाणूनी । श्रीमदानंदाश्रमांनीं । हाती देऊनी लेखणी । चेतविली प्रतिभा ।।१०।।

सद्विचार सदाचार । निजधर्मासी आधार । सांगती साधनासार । धर्मगुरु हिजसी ।।११।।

कोणी कशी किती गावी । हिच्या भक्तीची थोरवी । सांगा कोण दीप लावी । पहावया सूर्यासी ।।१२।।

पुण्यक्षेत्र शिरालींत । एकादशीचा मुहुर्त । एकोणीसशें चौऱ्यांहत्तर । मेची अठरा तारीख ।।१३।।

काळानें हे हिरावून । नेलें आमुचें भूषण । कराया परी जतन । ठेविलें हें भांडार ।।१४।।

पुण्यवान भाग्यवान । आम्ही सारस्वत जन । अक्षय हें वरदान । लाभे गुरुकृपेचें ।।१५।।

५ जून २००७, मधु चंदावरकर (गोरेगांव)

दीक्षितं शिष्यमोक्षार्थे साक्षात्कृतमहत्पदम् ।

दक्षिणामुखदेवांशं ब्रह्मनिष्ठं गुरुं भजे ।।

मज्जन्मजन्मसाफल्यमहो जातमयत्नतः ।

यदङ्घ्रिरेणुसंस्पर्शात् तमानन्दं गुरुं भजे ।।



कामादिसर्पव्रजगारुडाभ्यां विवेकवैराग्यनिधिप्रदाभ्याम्।
बोधप्रदाभ्यां द्रुतमोक्षदाभ्यां नमो नमः श्रीगुरुपादुकाभ्याम्।।
अनन्त-संसारसमुद्रतार-नौकायिताभ्यां स्थिरभक्तिदाभ्याम्।
जाड्याब्धि-संशोषण-वाडवाभ्यां नमो नमः श्रीगुरुपादुकाभ्याम्।।

॥ सभा-समाप्ति-प्रार्थना ॥

नन्दन्तु साधकाः सर्वे विनश्यन्तु विदूषकाः ।
अवस्था शाम्भवी मेऽस्तु प्रसन्नोऽस्तु गुरुः सदा ॥१॥

सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखमाप्नुयात् ॥२॥

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

॥ ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥३॥